PROGRAMME OF ACTION

NATIONAL POLICY
ON
EDUCATION 1986

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - १९८६

# शैक्षणिक आव्हानाकडून कृति कार्यक्रमाकडे

National Policy
on education 1986

PROGRAMME OF ACTION

NATIONAL POLICY
ON
EDUCATION 1986

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण
# १९८६

□

# शैक्षणिक आव्हानाकडून
# कृति कार्यक्रमाकडे

NIEPA DC
D09052

□ संपादक व प्रकाशक
डॉ. वसंत काळपांडे
संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे ४११ ०३०

□ मूल्य : रुपये ३५/-

**किमत रु. ५०/-**

□ पुनर्मुद्रण : १९८९
पुनर्मुद्रण सप्टेंबर १९९५
प्रती : ५१००

LIBRARY & DOCUMENTATION CENTRE
National Institute of Educational
Planning and Administration.
17-B, Sri Aurobindo Marg,
New Delhi-110016
DOC, No D-9052
Date 22-02-96

□ मुद्रक
रुना ग्राफिक्स,
४५०, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

ऑपरेशन ब्लॅकबोर्ड योजनेअंतर्गत पुस्तक १९९५-९६

# अनुक्रमणिका

शैक्षणिक आव्हान :

१. शिक्षण, समाज आणि विकास १
२. शैक्षणिक विकासाचे विहंगमावलोकन १५
३. समीक्षणात्मक मूल्यमापन ३१
४. शैक्षणिक पुनर्रचनाविषयक दृष्टिकोन ६५

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ :

५. प्रास्ताविक ११२
६. शिक्षणाचे सार आणि भूमिका ११६
७. राष्ट्रीय शिक्षण पद्धती ११७
८. समानतेसाठी शिक्षण १२१
९. विविध स्तरांवर शिक्षणाची पुनर्रचना १२८
१०. तांत्रिक व व्यवस्थापन विषयक शिक्षण १३७
११. पद्धति कार्यान्वित करण्याबाबत १४२
१२. शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया यांचा पुनर्विचार १४३
१३. शिक्षक १५०
१४. शिक्षणाचे व्यवस्थापन १५२
१५. साधन संपत्ती आणि आढावा १५५
१६. भवितव्य १५८

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ : कृति कार्यक्रम


| | | |
|---|---|---|
| १७. | प्रस्तावना | १६० |
| १८. | बालसंगोपन व शिक्षण | १६६ |
| १९. | प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व खडू-फळा मोहीम | १७८ |
| २०. | माध्यमिक शिक्षण आणि नवोदय विद्यालये | १९८ |
| २१. | शिक्षणाचे व्यावसायीकरण सद्य:स्थिती | २०४ |
| २२. | उच्च शिक्षण | २२२ |
| २३. | मुक्त विद्यापीठे आणि दूरशिक्षण | २३५ |
| २४. | ग्रामीण विद्यापीठे व संस्था | २३७ |
| २५. | तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षण | २४० |
| २६. | पद्धती कार्यान्वित करणे | २६१ |
| २७. | पदवी व नोकऱ्या यांतील संबंध तोडणे व मनुष्यबळाचे नियोजन | २७७ |
| २८. | संशोधन व विकास | २८० |
| २९. | स्त्रियांच्या समानतेसाठी शिक्षण | ३२० |
| ३०. | अनुसूचित जाती जमाती व इतर मागास वर्गीयांचे शिक्षण | ३२९ |
| ३१. | अल्पसंख्यांकांचे शिक्षण | ३३५ |
| ३२. | अपंगांचे शिक्षण | ३४५ |
| ३३. | प्रौढ शिक्षण | ३६० |
| ३४. | शालेय शिक्षणाचा आशय व प्रक्रिया | ३७३ |
| ३५. | मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा सुधार | ३८४ |
| ३६. | युवक आणि क्रीडा | ३९० |
| ३७. | भाषा विकास | ४०१ |
| ३८. | सांस्कृतिक यथार्थ दर्शन | ४११ |
| ३९. | प्रसार माध्यमे व शैक्षणिक तंत्रज्ञान | ४२७ |
| ४०. | शिक्षक आणि त्यांचे प्रशिक्षण | ४३४ |
| ४१. | शिक्षणाचे व्यवस्थापन | ४५१ |

# विभाग १ ला

# शैक्षणिक आव्हान

## एक धोरणात्मक यथार्थदर्शन

१. शिक्षण; समाज आणि विकास

२. शैक्षणिक विकासाचे विहंगमावलोकन

३. समीक्षणात्मक मूल्यमापन

४. शैक्षणिक पुनर्रचनाविषयक दृष्टिकोन

# प्रस्तावना

शिक्षण प्रेमी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कार्यवाही संपूर्ण राष्ट्रभर यशस्वीरीत्या व पूर्वनिश्चित दिशने व्हावी या उद्देशाने मानवी साधन संपत्ति विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या (Programme of Action) या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद आपल्या हाती देताना मला आनंद होतो आहे

आपल्या भारताचे लाडके पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी आपल्या पहिल्याच धोरणात्मक भाषणात भारताच्या २१ व्या शतकातील पदार्पणाच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण घडणीचा मानस व्यक्त केला होता. त्यांच्या शब्दाप्रमाणे ऑगस्ट १९८५ मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' ठरविण्याच्या दृष्टीने 'शैक्षणिक आव्हान' या नावाचा प्रलेख लोकसभेत सादर केला गेला. लोकशाही समाजवादी राष्ट्रातील नागरिकांच्या मुला-मुलींची जडण घडण ज्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून होणार, ते स्वतः नागरिकांनीच ठरवावे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे लादलेले नसावे व ते तयार होताना त्यात जनमानसाच्या प्रतिक्रिया आणि सूचना यांचा देखील विचार झालेला असावा या उद्देशाने ही पुस्तिका समाजातील सर्व शिक्षणप्रेमी, नागरिक, उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ व महिला यांचेप्रत पोचविण्याची व्यवस्था करण्यात आली. जवळ जवळ आठ महिन्यांच्या कालावधीत विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रे व परिसंवादातून व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया लक्षात घेऊन, मे १९८६ मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' अंतिम स्वरूपात तयार

झाले आहे. भारतीय शिक्षणाच्या इतिहासात अशा प्रकारे जनमानसाच्या प्रतिक्रियांचा विचार करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविले जाण्याची ही पहिलीच वेळ आहे, असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

राष्ट्राचे शैक्षणिक धोरण ठरवूनच केवळ भागत नाही तर त्या धोरणाची यशस्वी कार्यवाही कशी होईल हे पहाणे त्याहीपेक्षा महत्त्वाचे ठरते. यापूर्वी ज्या वेळी शैक्षणिक धोरण ठरविण्यात आले त्या वेळी त्या धोरणाची कार्यवाही होण्यासाठी निश्चित स्वरूपाच्या मार्गदर्शक कार्य-योजनेचा विचार झालेला नव्हता. १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरल्यानंतर त्याची कार्यवाही योग्य दिशेने होण्यासाठी 'मानवी साधन संपत्ति विकास' मंत्रालयाने तितक्याच तातडीने, संबंधितांच्या हाती या धोरणाची कार्ययोजना म्हणजेच कृतिकार्यक्रम देखील सुपूर्त केला, हे खरोखर योग्य व व्यवहार्य पाऊल होय.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कार्यवाही होत असताना, शिक्षणा-तील ज्या विविध क्षेत्रांचा व समस्यांचा संबंध येणे अनिवार्य आहे, अशी तेवीस कार्यक्षेत्रे प्रथम निश्चित करण्यात आली. या तेवीस कार्य-क्षेत्रांच्या संदर्भात कृति कार्यक्रमाची मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यासाठी केंद्र शासनाकडून राष्ट्रीय पातळीवर तेवीस कार्यगट नेमण्यात आले होते. या तेवीस कार्यगटांनी विचारपूर्वक केलेल्या प्रयत्नांचे फलस्वरूप म्हणजे आपल्या हाती येत असलेला कृति कार्यक्रम होय.

केंद्र शासनाने प्रसारित केलेल्या कृति कार्यक्रम पुस्तिकेतील क्षेत्र निहाय कृतीची मार्गदर्शक तत्त्वे अंमलात आणण्यापूर्वी महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षात प्रगतीच्या दिशेने जी वाटचाल झाली आहे तिचा मागोवा घेणे संयुक्तिक ठरेल.

महाराष्ट्र राज्य प्रथम पासूनच सर्व आघाड्यांवर प्रगतशील राज्य म्हणून नावाजले गेले आहे. शिक्षण क्षेत्र हे देखील त्याला अपवाद नाही. पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये, आपल्या राज्याने भरीव व प्रशंसनीय कामगिरी, आपणा सर्वांच्या सहकार्याने व सेवावृत्तीमुळे शक्य करून दाखविली आहे.

गाव तेथे बालवाडी स्थापन करणे, एक शिक्षकी शाळांचे रूपांतर द्विशिक्षकी शाळेत करणे, शिक्षणापासून वंचित समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षण प्रवाहात सर्वांच्या बरोबरीने समान संधी मिळावी या हेतूने पुस्तक पेढी योजना, गणवेष वाटप, लेखन साहित्य पुरविणे अशा कितीतरी योजना, यशस्वीपणे कार्यान्वित झाल्या आहेत.

शिक्षणातील संख्यात्मक विकास हा शासनाच्या आर्थिक सहाय्यातून होऊ शकतो. परंतु शिक्षणाचा गुणात्मक विकास होण्यासाठी आवश्यक असतात ते शिक्षकांचे स्वयंस्फूर्त, निरपेक्ष प्रयत्न आणि समाजाचा सक्रिय सहभाग. या दोन्ही बाबतीत आमचा शिक्षक आणि समाज कधीही उणे पडलेले नाहीत ही अभिमानाची बाब आहे.

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेसारख्या राष्ट्रीय पाळीवरील स्पर्धात्मक परीक्षेत एकूण यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे वाढते प्रमाण, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेस जनतेकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व शाळा समूह केंद्राच्या पायावर आधारलेला संपर्काधिष्ठित गुणवत्ता विकासाचा कार्यक्रम यासारख्या उल्लेखनीय घटनांमुळे महाराष्ट्र ही शिक्षणाची प्रयोग शाळा म्हणून मान्यताप्राप्त झाली आहे, हे नमूद करावयास हवे.

केंद्र शासनाने प्रसारित केलेल्या कृति कार्यक्रमातील ज्या कार्यक्रमासाठी जादा आर्थिक तरतूद करावी लागणार नाही अशा कार्यक्रमांची सुरूवात त्वरित केली आहे व पुस्तिकेत नमूद केलेल्या सर्व क्षेत्रासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचा निर्धार शासनाने केला आहे.

शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी अधिक भरीव कार्यक्रम हाती घेण्याचा विचार करण्यात येत आहे. प्राथमिक शाळांना किमान सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक माहिती संकलित करण्याची मोहीम पूर्ण झाली असून त्यानुसार सुविधा पुरविण्याचे कार्य हाती घेण्यात येईल. अपंग एकात्म शिक्षण योजनेखाली प्रत्येक जिल्ह्यातून किमान एक संस्था उघडण्याच्या शक्यतेचा विचार होत आहे. मुलींच्या शिक्षणाच्या संदर्भात दत्तक पालक योजनेस पालकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता, त्या योजनेचे मूल्यमापन

करण्यात येत आहे. त्यातून हाती येणाऱ्या निष्कर्षावरून ही योजना अधिक परिणामकारकरीत्या कशी राबविता येईल व अधिक व्यवहार्य ठरेल याचा विचार चालू आहे.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६' सादर होण्यापूर्वी जे राष्ट्र-व्यापी विचारमंथन झाले त्यात महाराष्ट्राने महत्त्वाचा वाटा उचलला. राज्याने राज्यान्तर्गत परिसंवादाशिवाय दोन राष्ट्रीय परिसंवाद (जिल्हा परिषद पदाधिकारी व विधान परिषदेतील शिक्षक सदस्य) आयोजिले. वर्धा येथे झालेल्या राज्यपातळीवरील परिसंवादात केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री ना. नरसिंह राव यांनी 'केंद्र शासन महाराष्ट्राकडे शिक्षणाची प्रयोगशाळा या दृष्टिकोनातून पहात आहे'. अशी समर्पक घोषणा केली.

केंद्र शासनाने व्यक्त केलेली ही अपेक्षा सार्थ ठरविण्यासाठी आपण सर्व एकत्र येऊया.

प्रस्तुत पुस्तकामध्ये शिक्षणाच्या आव्हानापासून कृतिकार्यक्रमा-पर्यंत शैक्षणिक धोरणाची वाटचाल कशी झाली हे शिक्षणक्षेत्रातील शिक्षणप्रेमी, शिक्षणतज्ज्ञ व शिक्षणाचा विचार करणाऱ्या सर्वांना मातृभाषेतून ज्ञात व्हावे या उद्देशाने, शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातील मूळ तिन्ही पुस्तकांचा मराठी अनुवाद एकत्रितरीत्या महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आपल्या हाती या ग्रंथरूपाने दिला आहे. या उपक्रमाबद्दल परिषद अभिनंदनास पात्र आहे. भावी काळात हे पुस्तक शिक्षणाच्या इतिहासाचा एक संदर्भग्रंथ ठरेल असे वाटते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कार्यवाही महाराष्ट्र राज्यात यशस्वीपणे करून दाखविण्यासाठी कृति कार्यक्रमातील मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग करून शिक्षणाचा हा जगन्नाथाचा रथ आपणा सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे वाटचाल करेल असा आत्मविश्वास व्यक्त करतो.

**प्रा. राम मेघे**
शिक्षण मंत्री
महाराष्ट्र राज्य

मुंबई
८ एप्रिल १९८७

# ऋणनिर्देश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६– शिक्षणाचे आव्हानाकडून कृति कार्यक्रमाकडे हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना संकल्पपूर्तीचा आनंद होत आहे.

मानवी साधन संपत्ति व विकास मंत्रालयाकडून 'चॅलेंज ऑफ एज्युकेशन', 'नॅशनल पॉलिसी ऑफ एज्युकेशन' व 'प्रोग्रॅम ऑफ अॅक्शन' ही इंग्रजी प्रकाशने गेल्या दोन वर्षात प्रकाशित झाली. ही पुस्तके ज्या क्रमाने प्रकाशित झाली, त्याचक्रमाने महाराष्ट्रातील शिक्षणप्रेमी वाचकांसाठी त्यांचा मराठी अनुवाद करण्याचे कार्य परिषदेने हाती घेऊन पूर्ण केले.

प्रारंभी पहिली दोन प्रकाशने प्रकाशित करण्यात आली. नंतर 'प्रोग्रॅम ऑफ अॅक्शन' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद करण्याचे काम पूर्ण झाले.

ही तिन्ही पुस्तके एकत्रितपणे छापल्यास शैक्षणिक धोरणाचा अभ्यास सविस्तरपणे करणारांना उपयुक्त ठरेल असा विचार आला. शिक्षण विभागाचे सचिव मा. म. रा. कोल्हटकर यांनी हा विचार उचलून धरला व प्रोत्साहन दिले. त्यांनी दिलेल्या प्रेरणेचे व प्रोत्साहनाचे फलस्वरूप म्हणजे हे पुस्तक होय, हे नमूद करावयास हवे.

मूळ तिन्ही इंग्रजी प्रकाशनांचा मराठी अनुवाद करण्यामध्ये, परिषदेतील अधिकारी वर्ग आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी प्रारंभापासून परिश्रम घेतले आहेत. मूळ इंग्रजी पुस्तकातील आशयाचा मराठी अनुवाद करताना, तो बरोबर उतरावा यासाठी सर्वश्री डॉ. प्र. ल. गावडे, व. द. देसाई व ना. गो. शुक्ल यांनी हस्तलिखितातील आशय तपासण्याचे काम वेळोवेळी केले.

सर्वोदय मुद्रणालयाचे श्री. शिगरे यांनी अल्पकालावधीत मुद्रणाचे कार्य सुबक व आकर्षक स्वरूपात पूर्ण करून दिले आहे.

प्रस्तावनेशिवाय पुस्तक पूर्ण होत नाही. महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री, माननीय, प्रा. राम मेघे, यांनी वेळात वेळ काढून या पुस्तकास प्रस्तावना दिली त्याबद्दल परिषद त्यांची ऋणी आहे.

शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात प्रकाशित झालेली तिन्ही पुस्तके म्हणजे शैक्षणिक धोरणाच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे आहेत. या तिन्ही टप्प्यातील आशय संकलित स्वरूपात उपलब्ध व्हावा या हेतूने तिन्ही प्रकाशने एकाच ग्रंथात ग्रथित करून छापण्याचा हा प्रयत्न आहे.

मूळ इंग्रजी पुस्तकांच्या अनुवादाचे परिशीलन करीत असताना, अधिक सखोल माहितीसाठी, अभ्यासकांनी मूळ इंग्रजी पुस्तके अभ्यासावीत असे सुचवावेसे वाटते.

शेवटी या पुस्तकातील 'न्यून ते पुरते करून घ्यावे' ही शिक्षणप्रेमी वाचकांना नम्र विनंती आहे.

संचालक,

प्रकरण १ ले

# शिक्षण, समाज आणि विकास

१.१. इ. स. १९६८ मध्ये जेव्हा राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण ठरविण्यात आले तेव्हा असे विचारात घेण्यात आले की, दर पाच वर्षांनी शिक्षणातील प्रगतीचा आढावा घेऊन नवीन धोरण व कार्यक्रम ठरविण्यात येतील. त्यानुसार प्रत्येक पंचवार्षिक योजना आखताना शिक्षणातील त्रुटी व फलनिष्पत्ती यांचे मूल्यांकन करून, येणाऱ्या पुढील पाच वर्षांत कोणते कार्यक्रम आखावयाचे याबाबत पुनर्विलोकन करण्यात आले. या पुनर्विलोकनामुळे महत्त्वाचा उद्देश साध्य झाला असला तरी आता असे वाटते की, केवळ पुनर्विलोकन करणे व काही किरकोळ फेर-बदल करणे सध्याच्या शिक्षणाच्या चौकटीला पुरेसे ठरणार नाहीत. सध्या देश एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभा आहे. आता ज्यांचे जन्म झाले असतील अशी बालके एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करून नव्या जगात प्रवेश करतील. जे भविष्यातील आव्हाने आणि गतिमान बदल पेलण्यास सज्ज असतील अशांना हे जग मानवजातीच्या इतिहासात अभूतपूर्व अशा संधी उपलब्ध करून देईल.

१.२. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सतत होणाऱ्या क्रांतीतून निष्पन्न होणाऱ्या आव्हानाखेरीज भारताला स्वतःच्या देशातील ज्यांची निकड नाकारता येत नाही अशा आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. देश-अंतर्गत तसेच बाह्य आव्हाने समर्थपणे पेलू शकतो किंवा नाही यावरून उद्याच्य नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा ठरला जाईल. जे राष्ट्र आपल्या लोकांना चांगले, परिपूर्ण व अधिक हेतुपूर्ण जीवन उपलब्ध करून देऊ शकेल असे गतिशील, स्पंदनशील व संलग्नशील राष्ट्र निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास, हेतुपूर्ण जाणीव व ज्ञानशील केवळ शिक्षणच देशातील लोकांमध्ये बिंबवू शकेल.

१.३. शिक्षणाकडे विशिष्ट कार्य नियुक्त करण्यापूर्वी शिक्षणाचे स्वरूप व कार्य आणि समाज व व्यक्तीचा विकास घडवून आणण्यासाठी

शिक्षणांतर्गत विविध क्षेत्रातील भूमिका तपासून पाहणे आवश्यक आहे. एकदा असे समीक्षण केल्यानंतर शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी सुयोग्य धोरण व तंत्र निश्चित करणे सोपे होईल, की, ज्यायोगे शिक्षणाची विविध कार्ये त्याद्वारा पार पाडली जातील.

१.४. मानवजातीच्या इतिहासात समाजाच्या विकासासाठी शिक्षण पायाभूत व अखंडित गोष्ट बनलेले आहे. ज्ञानात्मक व कौशल्यात्मक वृत्ती, मूल्ये व क्षमता याद्वारा शिक्षण लोकांमध्ये बदलत्या स्थितीस प्रतिसाद देण्यासाठी व समाजविकासास कारणीभूत व सहाय्यभूत होण्यासाठी आवश्यक असणारे सामर्थ्य व लवचिकता निर्माण करील. इतिहासाने निःसंशयपणाने असे सिद्ध केले आहे की, राष्ट्राच्या विकासात मानवी साधन संपत्तीने निर्णायक भूमिका पार पाडलेली आहे, आणि मानवी संपत्तीचा विकास हे शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे.

**सामाजिक विकास**

१.५. समाज विकास या संबोधात लोकांची भौतिक स्थिती सुधारण्यासाठी आर्थिक विकास, सुसंवादी जीवनासाठी लोकसत्ताक व न्याय्य समाज निर्मितीसाठी सामाजिक व राजकीय विकास, जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी बौद्धिक, सांस्कृतिक व सौंदर्यविषयक विकास या सर्वांचा समावेश होतो.

१.६. यशस्वी जीवनासाठी 'जैसे थे'' स्थिती ऐवजी "बदल" हा परवलीचा शब्द बनला आहे. सुव्यवस्थित रीतीने बदल घडवून आणण्याचे साधन म्हणून शिक्षणाला मान्यता मिळालेली आहे. शिक्षणाचे कार्य मूलतः वैयक्तिक विकास असले तरीही हे मूलभूत कार्य सामाजिक हितसंबंधाने मर्यादित झाले आहे. संघर्ष व हिंसाचार कमी करण्याच्या दृष्टिकोनातून सामाजिक हितसंबंधांना नवीन महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणाकडे सुपूर्द केलेली भूमिका पार पाडण्यासाठी योजावयाच्या पद्धतीबाबत अनुभव संपन्नता संचयित झालेली आहे. ह्या प्रक्रियेत शिक्षणाचा मूळ संबोधच बदलला आहे. शिक्षण आता औपचारिक पद्धती व संस्था यांच्या मर्यादेत राहिलेले नाही. ज्ञानाच्या विस्ताराच्या गतिशीलतेमुळे व्यक्तीसाठी यावज्जीव अध्ययन व निरतर शिक्षणासाठी संस्थांची उत्क्रान्ती असा संबोध निर्माण झाला आहे. अध्ययन प्रक्रिया

व तिच्या व्यक्तिगत स्वरुपाबाबत बरेच शोध लागलेले आहेत. भूतकाळातील सुस्थापित झालेल्या ज्ञानशाखांच्या मर्यादांनी विविध ज्ञानशाखांतर्गत अध्ययन व संशोधन यांस मार्ग दाखवून दिला. शिक्षणाची गुणवत्ता उंचवण्यासाठी व शिक्षणाचा आवाका वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यास सुरूवात झाली आहे.

१.७. कोणत्याही देशात समाज विकासाच्या उद्दिष्टात तेथील लोकांच्या आकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या असतात. भारतात ही उद्दिष्टे भारतीय संविधानात समाविष्ट केलेली आहेत. संविधानानुसार सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, त्याचप्रमाणे दर्जाची व संधीची समानता यावर आधारित असा समाज दृष्टिसमोर होता. घटनेने राष्ट्राला, प्रत्येक नागरिकात व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा आदेश अधिकारवाणीने दिला. याशिवाय घटनेने समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही गणराज्य घडविण्याचा संकल्पपूर्वक निर्धार केला आहे.

१.८. भारताने स्वातंत्र्याचे ध्येय प्रदीर्घ लढ्यानंतर प्राप्त केले आहे. त्या काळातील स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांच्या दूरदृष्टीमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांना मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे. ह्या दृष्टिसमोर मनुष्यबळ व साधनसंपत्ती यांचेद्वारा स्वयंपूर्ण राष्ट्र घडविणे आणि समान व सोशिक समाज निर्माण करणे या गोष्टी होत्या. योजनाकारांच्या मनात असा विश्वास होता की, आर्थिक शक्ती व जीवनशक्ती राजकीय स्वातंत्र्याचा दर्जा व व्याप्ती ठरवितील. तर लाखोंच्या मनात स्वातंत्र्याचा दर्जा उत्पादन वाढीबरोबरच माल व सेवेचे समान वाटप यावर अवलंबून होता. हे सारे नेमगुकात वाढ, विस्तार व फेरबदलाने शक्य होईल असे मानले गेले. मानवी दृष्टिकोनातून असे गृहीत धरले आहे की, लोकशाही विकासात सर्व नागरिकांना व्यक्तिविकासासाठी जात, धर्म लिंगनिरपेक्ष अशी संधीची समानता उपलब्ध होते. ज्ञानप्राप्तीसाठी सर्वांना प्रवेश व कला, शास्त्र, समाजशास्त्र यावरोबरच मूल्य व रूढींबाबत जाणीव निर्माण होणे असेही ध्वनित होते. भारतीय राजनीतीत व्यक्तीचा विकासासाठी उपयोग करणे यावर जोर दिला नसून व्यक्तीची उन्नती करणे हे महत्त्वाचे

मानले आहे. भारतीय संदर्भात राष्ट्रीय विकास हा आर्थिक विकासापेक्षा खूप दूरगामी आहे, तो लोकशाही मूल्यांना वाहून घेतलेल्या आत्मविश्वासपूर्ण व्यक्तीविकासाशी संबंधित आहे. विविध संस्कृतीत रुजलेल्या, विविध धर्मांचे अनुकरण करणाऱ्या व विविध भाषा बोलणाऱ्या लोकांमधून एकाच हेतूने प्रेरित झालेल्या लोकांचे राष्ट्र निर्माण करण्याशी संबंधित आहे. ज्या समाजाने विकासासाठी हुकूमशाहीचा मार्ग न अनुसरता लोकशाहीची निवड केलेली आहे, त्या समाजात शिक्षण हाच राष्ट्रीय उपक्रमातील प्रमुख आधारस्तंभ आहे.

**शिक्षणाची भूमिका**

१.९. व्यक्तिगत, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकासाची बहुविध परंतु अन्योन्याश्रयी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वैयक्तिक व आर्थिक विकासाची भिन्न पातळीवरील, भिन्न भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक गुणधर्म असलेल्या लोकांसाठी सुयोग्य, एकात्मिक शैक्षणिक कार्यक्रम आखण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. अशा कार्यक्रमांना विविधतेतील एकता मजबूत करण्यासाठी देशातील एका भागातून दुसऱ्या भागाकडे लागू पडणारा असा एकच समान गाभा असलेला अभ्यासक्रम हवा.

१.१०. राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत शिक्षणपद्धतीतील लोकशाहीस अनुसरून आपली भूमिका चोखपणे पार पाडण्यासाठी हे आवश्यक आहे की, सर्व लोकांना शिक्षणाचा फायदा मिळेल एवढी खात्री पटवून देण्याशिवाय संपादन केलेल्या शिक्षणाच्या स्तरात स्त्री-पुरुषांत, निरनिराळ्या भौगोलिक प्रदेशांतील लोकात व सामाजिक समूहात फारशी तफावत असणार नाही.

१.११. जर शिक्षणाच्या प्रसारासाठी योग्य व पुरेसे उपाय अवलंबिले नाही तर आर्थिक दुर्बलतेमुळे निर्माण होणारी दरी विभागीय असंतुलन व सामाजिक अन्याय यांच्या कक्षा रुंदावतील आणि त्यामुळे विघटनात्मक ताण वाढीस लागतील. योग्य त्या शिक्षणाद्वारे आर्थिक व सामाजिक विकास घडवून येणे त्वरित व सुकर होईल. मानवी साधनसंपत्तीच्या विकासाने इतर साधन संपत्तीच्या वापरावर बहुगुणित परिणाम होतील. म्हणूनच शिक्षण म्हणजे विकासासाठी गुंतवणूक असे मोठ्या प्रमाणात

मान्य केले आहे, आणि म्हणूनच शिक्षण आयोगाने (१९६४-६६) शिक्षणाला शांततापूर्ण सामाजिक बदल घडवून आणण्याचे साधन म्हणून उल्लेखिलेले आहे.

**शैक्षणिक विकासातील अग्रक्रम**

१.१२. प्राथमिक शिक्षण ही शिक्षणातील अति-महत्त्वाची पायरी आहे. प्राथमिक शिक्षणाची कालमर्यादा आठ वर्षांची असून ह्या कालावधीत व्यक्तिमत्त्व, वृत्ती, सामाजिक जाणीव, सवयी, अध्ययन कौशल्ये, विद्यार्थ्यांमधील विचारांची देवाणघेवाण इत्यादी गोष्टींचा पाया घातला जातो. वाचन, लेखन व गणन ही तीन मूलभूत कौशल्ये या कालात संपादन केली जातात. मूल्ये रूजविली जातात व परिसराची जाणीव तीक्ष्ण होते. ह्याच काळात शारीरिक वाढ होत असते. खेळात अभिरूची व साहसी वृत्ती जागृत केली जाते. श्रमातील निपुणता जोपासली जाते. ह्या काळात विद्यार्थ्याला जर चांगले प्राथमिक शिक्षण मिळाले तर पुढील आयुष्यातील अडचणींवर मात करण्यासाठी पुढाकार घेण्यास तो पात्र झाला असल्याने त्याला मागे वळून पाहण्याची आवश्यकता भासत नाही.

१.१३. अनेक अभ्यासकांचा असा निष्कर्ष आहे की, शिक्षणक्षेत्रात प्राथमिक शिक्षणावरील गुंतवणूक उच्चतम दराने परतफेड करीत असते व सर्वसामान्यांच्या सुस्थितीवर व निर्माण क्षमतेवर वैशिष्टयपूर्ण ठसा उमटविते. घटनेतील राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वातील अनुच्छेद ४५ मध्ये संविधानाच्या प्रारंभापासून मान्य करण्यात आले आहे की, अंगभूत व्यक्तिगत सामर्थ्याचा विकास करण्यासाठी सर्वांना समान संधी उपलब्ध करून देऊन लोकशाही दृढमूल करण्याची प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. शिक्षणाबाबत राष्ट्रीय धोरण ठरविताना १९६८ साली ठरावाद्वारे या गोष्टीचा पुनरूच्चार केला गेला. व्यापक पायावर आधारित, क्रियात्मक व सुसंबद्ध शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे प्रौढांमधील निरक्षरता निर्मूलन करणे आवश्यक आहे, कारण व्यापक अर्थाने विचारात घेता साक्षरता सहभाग घेणाऱ्यात त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीत रस घेण्याची जागरूकता निर्माण करणे. त्याचप्रमाणे प्रक्रिया व उपाययोजना यात आवड निर्माण झाल्याने

त्याची उत्पादन क्षमता वाढेल व त्याचे व्यक्तिगत जीवन समृद्ध होईल. ज्या देशांनी लोकशाही स्वीकारली आहे अशा बहुतेक सर्व राष्ट्रांनी आपले सारे लक्ष प्रशासकीय व राजकीय साधनांद्वारे, सेवाभावी संस्थांच्या सहाय्याने व प्रत्येक सुशिक्षित नागरिकाच्या मदतीने सामुदायिक चळवळीद्वारा सार्वत्रिक साक्षरता निर्माण करण्याकडे केंद्रित केले आहे. शिक्षणातील उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायीकरण विशिष्ट संस्थांमार्फत दिले जाणारे धंदेशिक्षण हे आर्थिक वाढीसाठी मनुष्यबळ पुरविण्याकरिता व लोकशाहीच्या संरक्षणाकरिता व उत्पादन तंत्रज्ञानाकरिता अति आवश्यक आहे. शिक्षणातील व्यवसायविस्तार मोठ्या प्रमाणात उत्पादनकार्य, रोजगार व शैक्षणिक प्रक्रिया यांना जोडणारा दुवा आहे. व्यवसाय कौशल्ये शिकविण्यासाठी शालेय पद्धती नजिकच्या परिसराशी व त्या परिसरातील समाजाशी एकरूप झाली पाहिजे.

१.१४. भविष्याला आकार देण्यासाठी कल्पना व मनुष्यबळ उच्चशिक्षण पुरवीत असल्याने व शिक्षणाच्या इतर पातळ्या कायम ठेवीत असल्याने उच्च शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. कोणत्याही राष्ट्रातील जीवनाचा दर्जा व विकासाचा वेग तेथील विचारप्रणालींच्या वातावरणावर अवलंबून असतो. तसेच इतिहास, संस्कृती, रूढी व मूल्ये यांतील विस्तारित बोध आणि जीवनातील भौतिक, सामाजिक व आध्यात्मिक प्रश्नावर मात करण्यासाठी लागणाऱ्या मानवी क्षमतेबाबतच्या आत्मविश्वासावरही तो (वेग) अवलंबून असतो, उच्च शिक्षण व त्यावर परिपुष्ट झालेला विद्यावंत वर्ग यांना एकूण परिसराचा दर्जा ठरविण्यात महत्त्वाची भूमिका असते. उद्योगासाठी, शेतीसाठी, प्रशासनासाठी व सेवेसाठी लागणारे विविधांगी बदलते मनुष्यबळ व वाढत्या संख्येने नागरलोक उच्च शिक्षण पुरविते. जेव्हा सक्षम व्यक्ती अंदाज करण्यासाठी, नियोजनासाठी, संशोधन व विकासात्मक कृती करण्यासाठी जगातील घडामोडींबाबत भारताने परिपूर्ण असावे यासाठी अंमलात आणण्याकरता उपलब्ध असतील तेव्हा आत्मनिर्भर व देशीय अर्थव्यवस्था टिकविली जाते.

१.१५. शिक्षण पद्धतीच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी समानता, गुणवत्ता व मागास गटोन्नती यांची नितांत आवश्यकता आहे.

भारतीय शिक्षण आयोगाने (१९६४ ते ६६) यावर पुढील शद्वात जोर दिलेला आहे. "संख्यात्मक दृष्टिने शिक्षण सामाजिक न्यायाची उन्नती करण्यासाठी अगर त्याची गती रोखण्यासाठी आयोजित करता येईल." इतिहासातील काही उदाहरणे हेच दर्शवितात की, काही सामाजिक समूहांनी व समाजातील निवडक लोकांनी शिक्षणाचा त्यांच्या सत्तेचा परमाधिकार म्हणून वापर केला आहे. आणि त्यांचे धुरिणत्व टिकविण्यासाठी शिक्षणाचा एक साधन म्हणून वापर केला. त्यांची सत्ता ज्या मूल्यांवर आधारित होती ती मूल्ये अखंड चालू राहतील यासाठी शिक्षणाचा उपयोग केला आहे. दुसऱ्या बाजूने काही उदाहरणे अशी सापडतील की, जेथे शिक्षण पद्धतीत सामाजिक व राजकीय क्रान्ती घडवून आणली गेली व शैक्षणिक संधीची समानता पुरविण्यात आली. शिक्षणाचा अधिकाधिक सामर्थ्यशाली प्रज्ञावंत निर्माण करण्यासाठी बुद्धिपुरस्सर उपयोग करण्यात आला. राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी अशा बुद्धिवंतांचा उपयोग करून घेण्यात आला. शिक्षणाच्या दर्जाबाबतही ही बाब अधिक सत्य आहे. विद्यापीठीय शिक्षण ज्याद्वारा सक्षम व्यावसायिक मनुष्यबळ अधिक प्रमाणात उपलब्ध होते ते शिक्षण उत्पादन क्षमता व आर्थिक विकास यांना सहाय्यभूत ठरते. दुसरी उच्च शिक्षण पद्धती की, ज्याद्वारा इतकेच मनुष्यबळ निर्माण होते, पण ते उदासीन व कला शाखेतील पदवीधारक असतात. त्यांच्यातील अनेक बेकार असतात अथवा नोकरी करण्यास लायक नसतात असे लोक सामाजिक ताण निर्माण करतात आणि आर्थिक विकास खुंटवतात. पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणारे योग्य प्रकारचे शिक्षण राष्ट्रीय विकास घडवून आणू शकते पण अशा प्रकारची संधी न मिळाल्यास मात्र उलटया प्रकारचे परिणाम घडून येण्याची शक्यता असते.

**शिक्षणपद्धतीच्या मर्यादा**

१.१६. सर्वसाधारणपणे शिक्षणाची भूमिका आणि खास करून शिक्षणाच्या विविध पातळ्यांबाबत चर्चा केल्यानंतर शिक्षणपद्धतीच्या मर्यादा समजून घेणे योग्य ठरेल. नाहीतर शिक्षणपद्धतीवर नियंत्रणाबाहेरील असणाऱ्या त्रुटींबद्दल दोष देण्यात येईल. शिक्षणपद्धती पोकळीत काम करू शकत नाही. परिसरातील वैशिष्टयांचा तिच्यावर फार मोठा प्रभाव असतो. धोरण ठरविणारे नियोजनकार व प्रशासक संपूर्ण सहभाग

देण्यास तयार असल्याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता व तिचे लोकशाही स्वरूप टिकणार नाही. भविष्यातील विकासासाठी शिक्षण ही एक अत्यावश्यक गुंतवणूक आहे ही भूमिका धोरण ठरविणाऱ्यांना पटल्याशिवाय मनुष्यबळ अगर अर्थबळ शैक्षणिक बाबतीत पुढाकार घेण्यास व आधार देण्यास पुढे येणार नाही.

१.१७. समाजातील निर्णय घेणाऱ्यांनी शिक्षणाची संख्यात्मक, गुणात्मक, स्थळात्मक व ऐहिक उद्दिष्टे स्पष्टपणे मांडल्यावर आणि नैतिकता व उत्कृष्टता यांचे आवाहन कोणत्या पद्धतीने पूर्ण करता येईल याबाबत प्रतिपादव केल्यावर, साधनसंपत्तीच्या तंग निर्बंधात त्यांना अग्रक्रम दिल्यावरच शैक्षणिक नियोजन अर्थपूर्ण रीतीने होऊ शकेल. मूलभूत तत्त्वे ठरविताना आर्थिक मर्यादांबरोबरच राजकीय, सामाजिक, संघटनात्मक परिस्थितीच्या संदर्भात पर्यायी चित्र दृष्टिसमोर ठेवावे लागले. शिक्षण हे भविष्यकाळाशी निगडित असल्याने चालू शिक्षण व्यवस्थापनाने डोळसपणाने व बुद्धिपुरस्सर राजकीय गैरसोयी व अस्ताव्यस्तपणापासून प्रागतिक व यथायोग्य सुरक्षित असले पाहिजे, याबाबत शैक्षणिक बाबतीत नियोजन करणारे फक्त खात्री पटवून देणारे नाहीत तर सामाजिक नेत्यांनी व तात्त्विक विचारवंतांनी शिक्षणाला सुरक्षित ठेवण्यासाठी जनमत व आकांक्षा निर्माण केल्या पाहिजेत.

१.१८. जेव्हा शिक्षणातील आशय व पद्धती व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी अग्रक्रमाने ठरविल्या जातील तेव्हा शिक्षणाने तांत्रिक, आर्थिक, सामाजिक उद्दिष्टांच्या संदर्भातील विशिष्ट कामगिरीबाबत पारंपारिक व राष्ट्रीय विकासाच्या दिशेने येणाऱ्या आवश्यक कर्तव्यांना योग्य तो प्रतिसाद दिला पाहिजे.

१.१९. प्रत्येक धोरणात्मक चौकट ही निर्विवादपणे मूल्यांशी निगडित असते हे मान्य केलेच पाहिजे. जर शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची किंमत अथवा उत्कृष्ट संस्थांची निर्मिती ही खर्चिक बाब असेल तर यापेक्षाही जास्त किंमत "बदल नको" अशा चुकीच्या निर्णयासाठी मोजावी लागेल.

१.२०. स्वातंत्र्यानंतर भारतात सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांच्या संख्येतील वाढ, पटनोंदणीसाठी लोंढेच्या लोंढे, शैक्षणिक कार्यक्रमातील

विविधता व सरमिसळ इत्यादी बाबतीत लक्षात येण्याजोगी प्रगती केली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. तरीसुद्धा सर्वसमावेशक, समन्यायाने विभागणी व शिक्षणाचा दर्जा याबाबतीतील राष्ट्रीय आकांक्षा शिक्षण पूर्ण करू शकलेले नाही.

१.२१. जगातील चांगल्यातल्या चांगल्या विद्यापीठातील चांगल्या-तल्या चांगल्या विद्वानांशी भारतातील शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यावंत, अभियंते, तंत्रज्ञ, डॉक्टर्स, व्यवस्थापनात कुशलता प्राप्त केलेल्या व्यक्तींची तुलना करता येते हे निर्विवाद आहे. पण हेही सत्य आहे की ह्या थोड्या मोजक्या दर्जेदार विद्वानांच्या तुलनेत उच्च शैक्षणिक संस्थातून मोठ्या संख्येने बाहेर पडलेले विद्यार्थी हे केवळ पदवीधारक पण केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा थोडेसेच अधिक ज्ञान असलेले, स्वयंअध्ययनाची क्षमता नसलेले, भाषा व निवेदनकौशल्य अवगत नसलेले, जगाचा संकुचित अभ्यास असलेले, सामाजिक बांधिलकीच्या जाणीवांचा अभाव असणारे असेच असतात.

१.२२. स्वतःला फारशी खर्चाची तोशीस न पडता ज्या तीक्ष्ण ग्रहणशक्ती असणाऱ्या बुद्धिमंतांना इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट किंवा मेडिकल कॉलेज यासारख्या चांगल्या शैक्षणिक संस्थात शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली असते त्या बुद्धिमंतांमध्येसुद्धा सामाजिक जबाबदारीची अपेक्षित जाणीव थोडी-सुद्धा असल्याचे आढळून येत नाही. चांगल्या दर्जाच्या शाळांतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थीवर्गाला हीच परिस्थिती लागू पडते, तद्वतच हा प्रश्न शालेय पातळीवर अधिक तीव्र होतो. कारण काही थोड्याच उत्तम शाळा आपल्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उपकाराची जाणीव निर्माण करण्यात भाग घेतात. त्याचा परिणाम असा दिसून येतो की विकसनशील वयात त्यांच्यात दुःख व दारिद्र्य याबाबत संवेदन-शीलता निर्माण करण्याची संधी गमावली जाते व उलट त्यांच्यामध्ये स्वतःला शिष्ट समजण्याचा स्वभाव तयार झाल्याने त्यांच्या परिसरा-तील सत्यापासून तो वर्ग दूर राहतो.

१.२३. परीक्षापद्धतीचा विचार केल्याखेरीज समकालीन शैक्षणिक चित्राचे वर्णन परिपूर्ण होणार नाही. कारण परीक्षापद्धती फक्त

विद्यार्थ्यांचेच भवितव्य ठरवीत नाही तर आशय, उद्‌बोधन व मला स्तरांवरील शिक्षणाचा दर्जा निश्चित करते. पाठांतर व स्मरणशक्तीच्या आधारावर परीक्षार्थीचे मूल्यमापन करण्याखेरीज वार्षिक परीक्षा पद्धती वर्षातील तीन-चार महिनेच अभ्यास करून उरलेला वेळ टंगळमंगळ करीत घालविण्याची प्रवृत्ती व परिस्थिती निर्माण करते. याच कारणास्तव ज्ञानाचे उपयोजन सातत्याने न झाल्याने वर्षअखेरीस सहन न होण्याजोगे तणाव निर्माण होतात व त्याचा दृश्य परिणाम परीक्षेवर वहिष्कार टाकणे, परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटणे, सामुदायिक कॉपी करणे, तपासनीसांना लाचलुचपत देणे आणि इतर अन्य अनैतिक कृत्ये करण्यावर होतो. परिणामतः पदव्या व पदविका सर्वसामान्य जनतेत व सार्वजनिक खासगी क्षेत्रातील नियोजकांमध्ये विश्वसनीयता मिळवून देत नाहीत. ही सर्व उच्च शिक्षणाची प्रक्रिया वेडीवाकडी, दिशाहीन व अकार्यक्षम झाल्याने मोठ्या संख्येने तरुण मुले व मुली नोकरी मिळण्यास अपात्र ठरणारे असेच या शिक्षणसंस्थांमधून बाहेर पडतात.

**मूल्ये व आधुनिकता**

१.२४. समाजातील सर्व क्षेत्रातील विचारवंत मूल्यांचा वाढता ऱ्हास व त्याचा परिणाम म्हणून दूषित समाजजीवन पाहून सचिंत झाले आहेत. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शिक्षक, विद्यार्थी यांना व्यापून राहिलेली मूल्यांची अधोगती ही बाब अधिक विघातक घटना म्हणून पाहिली जाते. असे आग्रहाने प्रतिपादन करणे आवश्यक आहे की शिक्षण प्रक्रिया पुनर्प्रस्थापित केली पाहिजे. तरुण पिढीला जाणीव करून दिली पाहिजे की समाजात असुरक्षितता, हिंसाचार व धाडसी कृत्ये यांना थारा दिला जाता कामा नये. संघटनात्मक समाज सामाजिक, राजकीय व आर्थिक आचरणाच्या नियमांची अंमलबजावणी आणि सक्ती केल्याशिवाय टिकून राहात नाही. भूतकाळातील मागील अनुभवावरून असे अपेक्षित आहे. संलग्न, परिणामकारक व जगण्यासारखी मूल्यपद्धती तर्कशुद्ध, शास्त्रीय व नैतिक दृष्टिकोनावर आधारीत असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे समाजात रोवली जाईल.

१.२५. शतकानुशतके भारतखंडातील संलग्नता वैशिष्ट्यपूर्ण राहिली असे असून देखील राजकीय एकता मात्र स्वातंत्र्यासाठी लढा

करूनच निर्माण झाली. ही राजकीय एकात्मता जातीय, धर्मीय व विभागीय प्रवृत्तींमधून निर्माण झालेल्या विघटनात्मक वृत्तीमुळे सध्या तरी अतिशय तणावाखाली आहे. म्हणून सर्वांकडून वरील अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी परिणामकारक प्रतिउपाय योजून स्वातंत्र्यलढ्याबाबत, राष्ट्रीय एकरूपतेच्या मूल्यांबाबत, जातीजमातींच्या तुकड्यांच्या धोक्यांबाबत, लोकांना शिक्षण दिले पाहिजे यासाठी सतत मागणी येत आहे. भिन्न विचारसरणीच्या लोकांनी भारतीय सर्व समावेशक संस्कृती जतन करण्यासाठी मदत केली आहे अशी संस्कृती बळकट करण्याची आज गरज आहे. आजचे चित्र हे शैक्षणिक पद्धतीच्या असफलतेचे द्योतक आहे आणि निदान यापुढे तरी पुढील पिढीला विघटनात्मक प्रवृत्तींपासून वाचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले पाहिजेत.

१.२६. कुठलेही राष्ट्र अथवा व्यक्ती आत्मविश्वास व अभिमान यांच्याशिवाय तग धरू शकणार नाही. असे दिसून येते की, फार थोड्या लोकांना भारताला फार मोठा उज्वल भूतकाळ होता आणि जगातील कोणत्याही राष्ट्राबरोबर आहोत असे सिद्ध करणारा वर्तमानकाळ आहे व विकसित देशातील उत्तम लोकांच्या कर्तृत्वाची बरोबरी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे याची जाणीव आहे. भारत एकविसाव्या शतकात भिक्षापात्र घेऊन पदार्पण करणार नाही, म्हणून तरुण पिढीच्या मनात त्यांच्या सुप्तशक्तींची जाण निर्माण करण्यासाठी तातडीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१.२७. देशातील शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांत, शारीरिक कामे व व्यवसाय हे रूळलेल्या कारकुनी पेशापेक्षा कमी दर्जाचे आहेत अशी प्रबळ भावना आहे. ज्या समाजाला आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात पुढे जावयाचे आहे त्याला ही पारंपारिक वृत्ती मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण करणारी आहे. प्रगतिशील राष्ट्रांनी अशा वृत्तींवर मात केलेली आहे आणि भारतीयांनीसुद्धा अशा प्रकारच्या कालबाह्य कल्पना टाकून दिल्या पाहिजेत. हे सर्व केव्हा शक्य होईल जेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याकडून शालेय शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी त्याच्या स्वतःच्या हातांनी समाजोपयोगी काम करून घेतली जातील आणि त्याच्या मनावर श्रमशक्तीचे महत्त्व पक्के बिंबवले जाईल तेव्हा.

१.२८. दिवसेंदिवस हे स्पष्ट होत आहे की भारताला इतर राष्ट्रांमधील असणारे आपले स्वतःचे आजचे स्थान टिकवावयाचे असेल तर वाढत्या लोकसंख्येच्या वेगावर कडक निर्बंध घातले पाहिजेत व याशिवाय पुढे येणाऱ्या पिढीतील मोठ्या व पुरेशा प्रमाणातील विभागाला तंत्रज्ञानातील क्रांतीशी मुकाबला करण्यास सक्षम बनण्यासाठी योजना तयार केल्या पाहिजेत. तंत्रज्ञानातील क्रांतीने यापूर्वीच उत्पादनपद्धती, परिवहन, दळणवळण आणि व्यवस्थापन यांच्या संकल्पनात बदल घडवून आणलेला आहे. एवढेच नव्हे तर आचरणाच्या साच्यात संघटनात्मक पद्धतीत व सांस्कृतिकमूल्य तत्त्वातही बदल घडविलेला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या उत्तम शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये आधुनिकीकरण झाले पाहिजे आणि नव्या संस्था स्थापन झाल्या पाहिजेत की ज्या ज्ञानसंपन्न, सभ्य व सृजनशील मनुष्यबळ निर्माण करण्याबाबत दक्षता घेतील. याही गोष्टींची खात्री करून घेणे आवश्यक आहे की, संपूर्ण परिसर आधुनिक व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विस्तृत प्रमाणावर झालेल्या प्रसाराद्वारा बदललेला आहे. सभोवतालच्या परिस्थितीत गुणात्मक बदल झाला नाही तर उत्तम शिक्षण देणाऱ्या संस्था परंपरेने जखडलेल्या, मंदगतीने जाणाऱ्या व सर्वसाधारणपणे क्रियाशून्य असलेल्या लोंढ्याने गुदमरून टाकल्या जातील.

१.२९. असे आढळून आले आहे की, बहुतांशी विद्यार्थ्यांना कोणत्याही आव्हानाला सामोरे जावे लागत नसल्याने त्यांच्यातील सृजनात्मक व नवनिर्माणक्षम सुप्तशक्तींच्या विकासास वाव मिळत नाही, कारण शिक्षणाची सध्याची पद्धती ही वर्गकाम, पाठांतर व पुनः-पुन्हा उजळणी करण्यावर भर देणाऱ्या परीक्षा या लक्षणांनी युक्त आहे. निःसंशयपणे शैक्षणिक तंत्र त्याचप्रमाणे अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तके यामध्ये पूर्णतः बदल करावा लागेल. हे सुद्धा पुरेसे होणार नाही तर शिक्षकाचे उद्बोधन, आचारनीतिशास्त्र ज्ञान व कौशल्ये यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी काहीतरी करणे आवश्यक आहे. शिक्षकांना आपल्या कामात अध्यापनापेक्षा अध्ययनात सृजनशीलता आणून आपले काम करावे लागेल. त्यासाठी त्यांना नवीन तंत्रे व कल्पना सतत आत्मसात कराव्या लागतील.

१.३० शिक्षणावर सोपविलेल्या विविध कामांचा विचार केला असता असे दिसून येते की, भरभक्कम राष्ट्र निर्माण करणाऱ्या आपल्या अफाट मनुष्यबळातील समर्थ शक्तींची जोपासना विद्यार्थ्यांनी आपल्या वयास योग्य अशा कार्यक्रमांत सक्रीय भाग घेतल्याशिवाय होणार नाही. ह्याचा अर्थ असा की, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण ही बाब यापुढे निवडीची राहणार नाही. पण सार्वत्रिकीकरण साध्य होणे ही बाब केवळ जीवनाशी निगडित शैक्षणिक तंत्र व आशय यांच्याशी संबंध स्थापण्यावर अवलंबून नसून पालकांच्या शिक्षणमूल्यांबाबतच्या जाणीवेवर अवलंबून आहे. प्रौढांना क्रियाशील, प्रसंगोचित शिक्षणात गुंतवून टाकण्यासाठी भरभक्कम कार्यक्रम सुरू करावे लागतील.

**नवीन शैक्षणिक धोरणाकडे वाटचाल**

१.३१. राष्ट्रीय विकासाच्या बाबतीत घटनात्मक रचनेत राज्यांची फार महत्त्वाची भूमिका असते.त्यामुळे केंद्रसरकारच्या व राज्यसरकारांच्या शिक्षणातील विविध घटक व शिक्षणाची पातळी याबाबतच्या अधिकाराच्या मर्यादा नक्की केल्या पाहिजेत. विशेषेकरून सामायिक यादीत सध्या असलेल्या शिक्षणाच्या संदर्भात हे झाले पाहिजे. याच संदर्भात एकूण उपलब्ध साधने व प्रशासकीय विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांकडे सोपवून देण्याची कामे याबाबतही विचार करावा लागेल.

१.३२ सद्यकालीन शिक्षणाच्या संख्यात्मक व गुणात्मक दर्जाबाबत पुर्नविलोकन करण्यात पुढाकार घेणे म्हणजे गेल्या वीस वर्षात शिक्षणक्षेत्रातील बऱ्याच गोष्टीत काही चांगला तर काही वाईट बदल झालेला आहे, या सर्वदूर पसरलेल्या भावनेचे प्रतिबिंब होय. या प्रबंधात संबंधित विभागांतून हे स्पष्ट दिसून येईल की, यापूर्वीच्या शिक्षण समित्या व विशेषत: भारतीय शिक्षण आयोग (१९६४-६६) यांच्या लक्षात शिक्षणात आवश्यक असणारे बदल यापूर्वीच आलेले होते. कदाचित आजचे प्रश्न बहुतांशी या चेंगट व यदृच्छया होणाऱ्या कार्यवाहीचे आणि साधनांच्या वाटपातील वाढत्या ऱ्हासाचेच परिणाम असू शकतील आणि म्हणून नवीन शैक्षणिक धोरण ठरविताना शिक्षणाची उद्दिष्टे, संकल्पना, अग्रक्रम यांचा उच्चार केला पाहिजे. एवढेच नाही तर अल्पकालीन व दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळ, आर्थिक,

भौतिक व संघटनात्मक गरजांसह कार्यतंत्राचा तपशीलही विचारात घेतला पाहिजे. जर शैक्षणिक धोरणातील आमूलाग्र बदल स्वीकारावयाचा असेल तर त्या धोरणाला व्यावसायिक आकार देण्यासाठी साधने व संघटनात्मक रचना यातही आमूलाग्र बदल करण्याबाबत योजना तयार कराव्या लागतील.

१.३३. प्रत्यक्ष कार्यवाहीत बहुधा गुंतल्या जाणाऱ्या लोकांच्या कल्पना त्यांचा सक्रीय सहभाग व त्यांची प्रज्ञा यामधून राष्ट्रीय धोरण ठरविले गेले पाहिजे. राज्ये, स्थानिक संस्था, सेवाभावी संस्था, शिक्षक, विद्यार्थी, पालक, शास्त्रज्ञ, व्यवस्थापक, उपक्रमपरिचालक, कामगार, खासदार व आमदार आणि पत्रकार यांनी धोरण ठरविताना सक्रीय सहभाग घेतला पाहिजे.

१.३४. हा प्रबंध शिक्षणाच्या विविध व्यावहारिक व धोरणात्मक बाबींबाबतचा विशाल दृष्टिकोन सादर करीत असून, ह्या प्रबंधात सद्यकालीन गुणात्मक व संख्यात्मक, प्राथमिक, माध्यमिक, व्यावसायिक, उच्च, तांत्रिक, प्रौढ व शिक्षण प्रशिक्षणाबरोबर धोरणविषयक पर्याय व तंत्रे याबाबतचे सिंहावलोकन सादर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

□ □ □

प्रकरण २

# शैक्षणिक विकासाचे विहंगमावलोकन

२.१. समाज, विकास आणि शिक्षण यांचा अन्योन्य संबंध आपण पहिल्या प्रकरणात पाहिला. या प्रकरणात, विविध योजनांमधून आपण काय साध्य केले याचा आढावा घेणे जरूर आहे. आपण काय साध्य केले व अद्यापि काय साध्य व्हावयाचे राहिले आहे यावर प्रकाश पडेल. विविध स्तरांवर झालेली संस्थांमधील संख्यात्मक वाढ, पटसंख्येतील वाढ, स्थगिती व गळती यांचे दर, अनौपचारिक शिक्षण, साक्षरतेतील वाढ, शिक्षक संख्या व शैक्षणिक बाबींवर होणारा खर्च यावर आपणास प्रामुख्याने विचार करावयाचा आहे.

२.२. गेल्या साडेतीन दशकांत शैक्षणिक संस्थांची सख्या २.३ लाखांवरून ६.९ लाखांवर गेली. म्हणजेच तिपटीने वाढ झाली. यातील ७३ टक्के संस्था (सुमारे ५.०४ लाख) प्राथमिक शाळा आहेत. १९५० ते १९८३ या कालावधीत ही वाढ २.४ पट होते आणि वार्षिक वाढीचा दर २.८ टक्के येतो. तरीही अलिकडील वर्षात वाढीचा हा वेग मंदावत आहे. सर्वच राज्यांत प्राथमिक शाळांच्या वाढीचा हा दर सारखा नाही. काही शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्यांनी १९५० ते १९६० या कालावधीत आपले शैक्षणिक कार्यक्रम आखले. या राज्यांनी बहुतेक लोकवस्तीला प्राथमिक शाळा दिली. म्हणूनच आता वाढीचा वेग मंदावला आहे. या उलट उशीरा विकास झालेल्या हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या सारख्या राज्यांनी १९७० पर्यंत वाढीचा वेग कायम ठेवला आहे. प्राथमिक शिक्षणाचा आराखडा विचारात घेतला तर बहुतेक राज्यांतून ५ वर्षांचे प्राथमिक शिक्षण आणि त्यानंतर ३ वर्षांचे पूर्व माध्यमिक शिक्षण दिले जाते. काही राज्यां-तून हा आराखडा ४+३ वर्षांचा अगर ४+४ वर्षांचा आहे.

२.३. १९५०-५१ मध्ये पूर्व माध्यमिक शाळा १३.४ हजार होत्या त्या वाढून १९८२-८३ मध्ये १२३.३ हजार झाल्या. सरासरी वार्षिक वाढीचा दर ७.२ टक्के इतका येतो. १९५०-५१ मध्ये दर १५ प्राथमिक शाळांमागे एक पूर्व माध्यमिक शाळा होती. १९८२-८३ मध्ये हेच गुणोत्तर ४ : १ असे आहे. सारांशाने १९५० ते १९८३ या कालावधीत प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शाळा मिळून संस्थांची संख्या २.२३ लाखांवरून ६.२७ लाखांपर्यंत वाढली. ही वाढ वार्षिक सरासरी ३.३ टक्के पडते.

२.४. १९५०-५१ मध्ये देशात ७३०० माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा होत्या. त्या वाढून १९८२-८३ मध्ये अशा शाळांची संख्या ५२२७९ झाली. म्हणजेच सरासरी वार्षिक वाढीचे प्रमाण ६.३ टक्के पडते. पूर्व माध्यमिक शाळांपेक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वाढीचे प्रमाण कमी आहे हे लक्षात घेणे जरूर आहे. १९५१ मध्ये दर १.८४ पूर्व माध्यमिक शाळेमागे एक माध्यमिक शाळा होती. हे प्रमाण १९८२-८३ मध्ये १ : २.५ असे झाले. तथापि सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा साचा सारखा नव्हता. काही शाळांमधून (६०३०), १०+२ असा आकृतीबंध होता तर उरलेल्या (३४७३) शाळात जुनाच आकृतीबंध होता. परंतु बहुतांश शाळा माध्यमिक आहेत. (४२७७६) महाराष्ट्र व आंध्रप्रदेशात यातील २२ टक्के शाळा येतात.

२.५. राष्ट्रीय पातळीवरील समान आकृतीबंधानुसार व्यावसायिक शिक्षणासाठी १०+२ हा आकृतीबंध स्वीकारला गेला. १९७६-७७ नंतर फक्त तीन राज्यांत याने काहीसा आकार घेतला. परंतु १९८३-८४ मध्ये ११ राज्ये व केंद्रशासित प्रदेश यातून तो स्वीकारला गेला. १६०० पैकी निम्म्याहून अधिक व्यावसायिक शिक्षणसंस्था तामीळनाडूत होत्या. हा व्यावसायिक शिक्षणातील उच्चांक आहे. महाराष्ट्रात २५० संस्था असून या राज्याचा क्रम दुसरा लागतो.

२.६. तंत्रनिकेतनाच्या संस्थेतील वार्षिक वाढीचा दर ६.८ टक्के येतो. १९७५-७६ मध्ये ३२५ तंत्रनिकेतने होती ती वाढून १९८२-८३ मध्ये ५१५ झाली. तंत्रनिकेतनांची सर्वात जास्त संख्या तामीळनाडूत आहे. त्यानंतर कर्नाटक, उत्तरप्रदेश व महाराष्ट्र यांचा क्रम लागतो.

या संस्थांच्या वाढीच्या तुलनेत याच कालावधीतील अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संख्येत झालेली वाढ लक्षणीय आहे. १९७५–७६ मध्ये अशी १०८ महाविद्यालये होती. ती वाढून १९८२-८३ मध्ये २०० झाली. ही वाढ प्रतिवर्षी सरासरी ९.२ टक्के येते. यातील सुमारे १/४ संस्था कर्नाटकात (४८) आहेत हे नमूद केले पाहिजे. त्यानंतर आंध्रप्रदेशाचा (२६) क्रम लागतो.

२.७. १९५० ते १९८३ या कालावधीत सामान्य शिक्षणासाठी निर्माण झालेल्या पदवीपूर्व महाविद्यालयांच्या संख्येतील वाढ लक्षणीय आहे. आज अशा तऱ्हेची ५२४६ महाविद्यालये असून १४० विद्यापीठे देशात अस्तित्वात आहेत. विद्यापीठे व महाविद्यालये यांचा वार्षिक वाढीचा दर ६ टक्के आहे.

**पटसंख्या**

२.८. मुले आणि मुली मिळून शिक्षणाच्या सर्व स्तरांवर पटसंख्येत झालेली वाढ मोठी आहे. १९५०–५१ मध्ये सर्व स्तरांवरील विद्यार्थी संख्या २.८ कोटी होती ती वाढून १९८२–८३ मध्ये ११.४ कोटी झाली. वाढीचा वार्षिक दर ४.५ टक्के पडतो. याच कालावधीत मुलींच्या पटनोंदणीच्या वाढीचा वार्षिक दर ५.५ टक्के पडतो तर मुलांच्या बाबतीत वाढीचा दर ३.९ टक्के इतका पडतो. तरीही प्रारंभी पडलेला हा फरक लक्षात घेऊनही मुलींची पटनोंदणी मुलांच्या एकूण पटनोंदणीपेक्षा कमी आहे. पटनोंदणीची स्थिती शिक्षणाच्या विविध स्तरांवर व राज्याराज्यातून आणि केंद्रशासित प्रदेशातून भिन्न भिन्न आहे. विविध स्तरांवरील मुले आणि मुली यांच्या पटनोंदणीचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

२.९. जनगणनेच्या कालावधीतील १९५१ ते १९८१ दरम्यान प्रत्येक दशकातील पटनोंदणी विचारात घेतली तर, प्राथमिक शिक्षणाचे बाबतीत ती ५१ ते ६० मध्ये ६.२ टक्के होती, ६१ ते ७० मध्ये ५.० टक्के होती आणि ७१ ते ८० मध्ये २.५ टक्के होती. हे दर अभ्यासीत असताना अनेक बाबींचा विचार होणे जरूर आहे. प्रथमतः दर दशकात विद्यार्थी संख्या वाढत होती व पटनोंदणी वाढूनही प्रत्यक्षात पटनोंदणीची टक्केवारी कमी पडत होती. दुसरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर

शैक्षणिक सुविधा वाढल्या व जनतेने त्याचा अधिकाधिक फायदा घेतला. जसा कालावधी लोटत गेला, प्राथमिक शाळांची सार्वत्रिक सोय झाली, तसतशी त्यात घट होत गेली. मागील काही वर्षात प्राथमिक शाळांतील जादा व कमी वयाच्या मुलांच्या पटनोंदणीचे प्रमाण घटत आहे. जर या मुलांच्या पटनोंदणीचे प्रमाण विचारात घेतले नाही तर, ते नेहमी इतकेच म्हणजे १९७१ ते १९८१ या दशकातील प्रमाणाएवढे म्हणजे सुमारे २.५ टक्के येते. याचाच अर्थ अशिक्षितांच्या संख्येतील मागासलेपणा दरवर्षी उत्तरोत्तर वाढतच आहे. याचे शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावर गंभीर परिणाम होतील.

२.१०. १९६०–६१ मध्ये पटनोंदणीचे कमाल प्रमाण तामीळनाडूमध्ये होते व किमान प्रमाण जम्मू-काश्मीर, मध्यप्रदेश आणि बिहारमध्ये होते. १९८२–८३ मध्ये हे चित्र बदलले आणि आसाम, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि ओरिसा ही राज्ये वगळता इतर बहुतेक राज्यांनी, मुलांचे बाबतीत १०० टक्के पटनोंदणी केली. या पटनोंदणीत जादा व कमी वयाच्या मुलांच्या पटनोंदणीचा समावेश आहे हे मुद्दाम नमूद केले पाहिजे.

२.११. मुलींच्या बाबतीत पटनोंदणीचे हे चित्र जवळजवळ सारखेच आहे. फक्त किमान पटनोंदणीचे हे प्रमाण (१६) राजस्थान, जम्मू-काश्मीर, बिहार व मध्यप्रदेशात आढळते. परंतु १९८२-८३ मध्ये सर्वच राज्यात याबाबत चौफेर प्रगती झालेली आढळते. गुजरात, हिमाचल प्रदेश, केरळ, महाराष्ट्र, पंजाब आणि तामीळनाडू ही त्यांची काही उदारहणे आहेत. उत्तरप्रदेशातील ४९ टक्के हे मुलींच्या पटनोंदणीचे प्रमाण (प्राथमिक स्तरावरील) सर्वात कमी आहे.

२.१२. शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या योजनेत ८ वी पर्यन्तचे शिक्षण येते. या बाबतीतील प्रगतीचा आढावा घेणे योग्य ठरते. प्रथमतः पूर्व माध्यमिक स्तरावरील पटनोंदणी १९५०–५१ मध्ये ०.२६ कोटी होती ती १९८२–८३ मध्ये १.४७ कोटी झाली (प्रतीवर्षी वाढ ५.५ टक्के). जरी मुलींच्या पटनोंदणीचा दर अधिक असला (८.६ टक्के) तरी फक्त संबंधित वयोगटातील ३०.६ टक्के मुलींचीच पटनोंदणी झाली होती. मुलांचे बाबतीत मात्र ही टक्केवारी ५.६३ टक्के होती.

प्राथमिक स्तरावरील प्रत्येक मुलामागे दाखल झालेली मुलगी ०.६३ होती तर, पूर्व माध्यमिक स्तरावर हेच प्रमाण ०.५१ इतके होते.

२.१३. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत वस्तुस्थिती मांडणे थोडे कठीण आहे कारण १९६८ च्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे माध्यमिक शिक्षणाचा आकृतीबंध बदलला. तरीही माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील (९ वी ते ११ वी) पटनोंदणी १९५१ मध्ये १२.२ लाख होती ती १९८०–८१ मध्ये ९४.९ लाख झाली. वाढीचा वार्षिक दर ७.८ टक्के पडतो. लिंगभेदानुसार भरतीच्या प्रमाणातही मोठा बदल झाला. मुलींच्या भरतीचे शेकडा प्रमाण १९५० ते ८१ या कालावधीत १०.१ इतके राहिले. १९५१ मध्ये दर मुलामागे फक्त ०.१६ मुलगी या स्तरावर भरती होत होती. १९८०–८१ मध्ये हे प्रमाण १ : ०.४२ इतके झाले.

२.१४. उच्च शिक्षणातील विद्यार्थी भरतीचे प्रमाण विस्मयकारक चित्र उभे करते. १९५० ते १९८२ या कालावधीत भरतीचा वेग दर-वर्षी शेकडा ९.७ ने वाढला. दशकवार भरतीचा वेग विचारात घेतला तर १९५१ ते ६० या दशकात ही वाढ १२.४ होती तर १९६१ ते ७० या कालावधीत ही वाढ १३.४ होती आणि १९७१ ते १९८० या दशकात हा दर शेकडा ३.८ इतका राहिला. या स्तरावरील भरतीचा वाढीचा वेग मंदावत आहे असे दिसून येईल.

२.१५. उच्च शिक्षणात शास्त्रनिहाय भरतीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येईल. मात्र कला विषयातील भरतीचे प्रमाण कमी झाले आहे, तर वाणिज्य शाखेतील भरतीचे प्रमाण वाढले आहे. सर्व-सामान्य शिक्षणातील भरतीच्या वाढीचे वार्षिक प्रमाण ४.५ इतके आहे तरी धंदेशिक्षणातील भरतीचे वार्षिक वाढीचे प्रमाण २.५ इतके आहे. अभियांत्रिकी, तांत्रिक स्थापत्यशास्त्र (३६.६ टक्के) व वैद्यकशास्त्र (३९.१ टक्के) यातील वाढीचे प्रमाण लक्ष वेधून घेते. शेतकी विज्ञान शाखेतील भरतीच्या वाढीचे प्रमाण ५.४ टक्के आहे, तर पशुवैद्यकीय शाखेतील वाढ २.६ टक्के आहे. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमातील

भरतीचे वार्षिक वाढीचे शेकडा प्रमाण २.६ आहे. त्यात मुलींचे प्रमाण सतत वाढते आहे. त्याचा दर प्रतिवर्षी शेकडा ५.१ टक्के इतका येतो.

२.१६. १९६०–८३ या कालावधीत अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रवेश संख्या ४३००० पासून १,१२,००० पर्यन्त म्हणजेच सुमारे २.६ पट वाढली. जरी मुलींनी घेतलेल्या प्रवेशाची पटीत वाढ १७ असली तरी मुलांच्या प्रवेशाशी तुलना करता, प्रवेश घेतलेल्या मुलींचे प्रमाण अजूनही मुलांच्या प्रवेशाच्या ५ टक्के आहे. मुलांच्या प्रवेशाबाबत लक्षणीय वाढ झालेली राज्ये आंध्रप्रदेश, आसाम, कर्नाटक व उत्तरप्रदेश ही आहेत. त्यातील कर्नाटक राज्यातील वाढ विशेष लक्षणीय आहे. या राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रवेश या कालावधीत ५००० पासून २०००० हून अधिक वाढले. ही वाढ वार्षिक शेकडा ८ टक्के येते.

२.१७. या व्यतिरिक्त अनेक राज्यांतून तंत्र निकेतने, तंत्रशाळा व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे यातील भरतीचे प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक, राजस्थान आणि उत्तरप्रदेश ही राज्ये तंत्र निकेतनात भरती करण्यात आघाडीवर आहेत. याउलट आंध्र प्रदेश, गुजरात, जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र, पंजाब यांची तंत्रशाळा व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे यातील भरतीत स्पृहणीय वाढ आहे.

२.१८. याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भरतीचे प्रमाण शिक्षण क्षेत्रातील सर्व स्तरांवर व सर्व शाखांमधून चांगले वाढले आहे. तरीसुद्धा प्राथमिक स्तरावर होणारी जादा भरती वाढत्या शैक्षणिक संधीचा फायदा घेऊ शकत नाही. सर्व स्तरांवरील भरतीचे प्रमाण हळू हळू घटत आहे. याचाच अर्थ विस्तार प्रक्रियेचा स्वातंत्र्योत्तर काळातील पहिला टप्पा संपत आला आहे. यापुढे विस्तार करावयाचा झाल्यास, शैक्षणिक आराखड्यात आणि नियोजन व प्रशासन यांत आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. मुलींच्या शाळा प्रवेशाबाबत लक्षणीय प्रगती झाली असली तरीही, मूळची त्रुटी भरून काढण्याइतपत ती अजूनही नाही. शिक्षणाचा यापुढील विस्तार मुलांच्या आणि मुलींच्या शाळेतील भरतीत जी तफावत अजूनही आहे ती दूर करण्यावर अवलंबून आहे.

## रिक्त राहण्याचे प्रमाण आणि गळती

२.१९. शिक्षण प्रसाराच्या संदर्भात, स्थगितीच्या दरावरून खरे फायदे कोणते झाले हे तपासणे महत्वाचे आहे. या संदर्भात पुरेशी माहिती उपलब्ध नाही. जो काही थोडका पुरावा उपलब्ध आहे त्यावरून काही अवलोकन करणे शक्य आहे. प्राथमिक स्तरावर रिक्त राहण्याचे प्रमाण हळूहळू का होईना सुधारत आहे. १ ते ५ वर्गातून १९६८ साली टिकून राहण्याचे प्रमाण ३३.५ टक्के होते ते १९७४ साली ३८.६ टक्के इतके वाढले. प्राथमिक शिक्षण पुरे करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे यावरून या निष्कर्षास पुष्टी मिळते. तथापि टिकून राहण्याच्या प्रमाणात १९६१ ते ७० या दशकातच सुधारणा झाल्याचे दिसून येते.

२.२०. दुसऱ्या बाजूने पटनोंदणीचा प्रभावीपणा गळतीच्या प्रमाणावरून तपासता येईल. १९६४–६५ ते १९७९–८० या काळांत राज्यवार गळतीच्या प्रमाणात थोडीफार घट दिसते. आसाम, बिहार, कर्नाटक व उत्तर प्रदेश या राज्यांत गळतीचे प्रमाण अधिक दिसते. केरळ राज्यांत गळतीचे प्रमाण किमान आहे. जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, हरयाणा या राज्यांतही गळतीचे प्रमाण कमी होत आहे. परंतु ही सुधारणा १९६१ ते ७० या दशकातच आढळते. उत्तरप्रदेश याला अपवाद आहे. कारण या राज्यांत गळतीचे प्रमाण गेल्या काही वर्षातच वाढत आहे.

२.२१. टिकून राहण्याचे अत्यल्प प्रमाण आणि मोठ्या प्रमाणातील गळती शिक्षणाच्या विस्ताराने होणारे फायदे खाऊन टाकतात. शिक्षणाच्या विकासात या बाबींचा मोठा अडथळा आहे.

## अनौपचारिक शिक्षण व साक्षरता

२.२२. शिक्षण प्रसारात नुसत्या औपचारिक शिक्षणाचा उपयोग होत नाही. जरी औपचारिक शिक्षण संपूर्ण शिक्षणाचा पाया असला तरी तेवढ्याने काम भागत नाही. ९ ते १४ वयोगटासाठी जी मुले शाळेत जाऊ शकत नाहीत त्यांचेसाठी अनौपचारिक शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते.

२.२३. सहाव्या पंचवार्षिक योजनेत प्राथमिक वयोगटासाठी अनौपचारिक शिक्षणावर भर देण्यात आला. १९८२-८३ मधील आकडे-वारीवरून अनौपचारिक शिक्षणवर्गाच्या संख्येत आणि दाखल झालेल्या मुलांच्या संख्येत पुरेशी प्रगती दिसून येते. विशेषतः शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या राज्यांत जेथे अनौपचारिक शिक्षणावर अधिक भर देण्यात आला होता, तेथे ६८ हजारांहूनही अधिक वर्ग उघडण्यांत आले. यातील ९० टक्के वर्ग प्राथमिक स्तरावर आणि उर्वरित १० टक्के पूर्व माध्यमिक स्तरावर होते. उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशात अधिकतर वर्ग पूर्व माध्यमिक स्तरावर होते. इतर राज्यात बहुतांशी हे वर्ग प्राथमिक स्तरावर होते. उत्तर प्रदेशात १६६०८ आणि पश्चिम बंगाल १५००० अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग एकवटले होते. ही संख्या एकूण वर्गांच्या ५० टक्क्याहूनही अधिक आहे.

२.२४. या केंद्रातून १४.७ लाख विद्यार्थी शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या नऊ राज्यांतून नोंदले गेले. यातील ९२ टक्के विद्यार्थी प्राथमिक स्तरावर व उर्वरित पूर्व माध्यमिक स्तरावर शिक्षण घेत होते. प्रत्येक अनौपचारिक शिक्षण वर्गातून सरासरी विद्यार्थी संख्या २० होती. उत्तरप्रदेशात सर्वाधिक म्हणजे ४.३५ लाख विद्यार्थी या कार्यक्रमाखाली नोंदले गेले होते.

२.२५. साक्षरतेचे प्रमाण स्वातंत्र्योत्तर काळात १९५१ साली शेकडा १६.६७ इतके होते, ते १९८१ साली ३६.२३ इतके वाढले. साक्षरांची संख्या १९५१ मध्ये ६ कोटी होती, ती १९८१ मध्ये चौपट म्हणजे २४.८ कोटी इतकी वाढली. तथापि पुरुष आणि स्त्रिया यांच्या साक्षरतेच्या प्रमाणात अनुक्रमे ४६.९ आणि २४.८ इतकी तफावत आहे. ग्रामीण भागात ती तफावत अधिकच आहे. (४०.८ आणि १८.०) साक्षरतेचे प्रमाण केरळमध्ये सर्वात जास्त (७०.४) असून ते राजस्थान-मध्ये सर्वात कमी म्हणजे २४.३८ टक्के आहे. राजस्थानमध्ये साक्षर स्त्रियांचे प्रमाण अवघे ५.४६ टक्के आहे.

२.२६. १५ ते ३५ या उत्पादनक्षम वयोगटासाठी किमान गरजांच्या कार्यक्रमानुसार, सहाव्या योजनेत प्रौढ शिक्षणाचा अंतर्भाव झाला आहे. देशातील दोन लाख केंद्रांतून ५८ लाख प्रौढ निरक्षर मार्च

१९८५ मध्ये शिकत होते. राज्यवार आकडेवारीनुसार महाराष्ट्र, तामीळनाडू व कर्नाटक ही राज्ये प्रौढ शिक्षणात आघाडीवर आहेत. आंध्र प्रदेश, आसाम, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल येथील पटसंख्येच्या तुलनेत वर नमूद केलेली राज्ये पुढे आहेत. सहाव्या योजनेच्या काळात योजनेच्या अखेरीस २.३ कोटी प्रौढ या योजनेचा लाभ घेत होते. म्हणजेच १५ ते ३५ वयोगटातील आणखी ८.७ कोटी निरक्षरांना या योजनेखाली आणण्यास फार परिश्रम घ्यावे लागतील. म्हणजेच या वयोगटाची संपूर्ण १०० टक्के निरक्षरता १९९० अखेर दूर करण्याचे ध्येय साधता येईल.

२.२७. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार भारतात, २००० साली निरक्षरांची फार मोठी संख्या असेल. जगातील निरक्षर लोकसंख्येच्या ५४.८ टक्के निरक्षर भारतात असतील. निरक्षरतेचा प्रश्न केवढा मोठा आहे आणि २१ व्या शतकाच्या सुरवातीला निरक्षरता निर्मूलन कार्याचा प्रश्न केवढा बिकट आहे हे ध्यानात येईल व अनौपचारिक शिक्षण व प्रौढ शिक्षण यावर किती परिश्रम करावे लागतील हे ध्यानात येईल.

**शिक्षक**

२.२८. १९५० ते १९८३ या कालावधीत शिक्षकांची संख्या ७.५ लाखांवरून ३२ लाखांपर्यंत वाढली. वाढीचा हा दर प्रतिवर्षी शेकडा ४.६ पडतो. प्राथमिक शिक्षकांच्या संख्येच्या वाढीचा दर प्रतिवर्षी ३ टक्के आहे. पूर्व माध्यमिक शिक्षकांच्या संख्येचा वाढीचा दर सर्वात जास्त म्हणजे ७.५ टक्के आहे. शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर महिला शिक्षकांच्या वाढीचा दर पुरुष शिक्षकांपेक्षा जास्त आहे. १९४९–५० साली प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण ५६.१ टक्के होते ते १९८२–८३ साली ८८.४ टक्के झाले. प्राथमिक स्तरावर शिक्षक विद्यार्थी प्रमाणात फारसा फरक झालेला नाही. पूर्व माध्यमिक स्तरावर शिक्षक व विद्यार्थी यांचे प्रमाण वाढले आहे.

२.२९. शिक्षकांची गुणवत्ता वाढली आहे. गुणवत्ता सुधार कार्यक्रमानुसार ही गुणवत्ता वाढली. १९५१ ते १९७८ या कालावधीत प्राथमिक शाळांतील पदवीधर शिक्षकांचे प्रमाण १ टक्के वरून १७.२ टक्के पर्यंत वाढले. याउलट एस. एस. सी. पेक्षा कमी शिकलेल्या शिक्षकांचे

प्रमाण १९५१ मध्ये ३४.४ टक्के होते ते घटून १९७८ मध्ये २२.७ टक्के एवढे झाले.

**आर्थिक भार (खर्च)**

२.३०. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर सर्व प्रकारच्या शैक्षणिक स्तरावरील खर्च सर्व बाजूंनी वाढला. १९५०–५१ साली हा खर्च ११४.३ कोटी होता, तो वाढून १९७६-७७ साली २३०४.१६ कोटी रु. झाला आणि १९८२–८३ मधील अंदाजपत्रकातील तरतूद ५१८५.९ कोटी रु. होती. विविध राज्यांच्या अंदाजपत्रकातील शिक्षणावरील तरतुदींचे प्रमाण वेगवेगळे होते. सिक्कीममध्ये कमीत कमी एकूण रकमेच्या १२.७ टक्के होते तर केरळमध्ये सर्वांत जास्त म्हणजे एकूण रकमेच्या ३६.१ टक्के तरतूद शिक्षणासाठी होती. शिक्षणावरील दरडोई अंदाज-पत्रकातील खर्च सर्वात कमी होता.

२.३१. संरक्षण विभागाच्या खालोखाल अंदाजपत्रकात शिक्षण-विषयक खर्च येतो. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या अंदाजे तीन टक्क्यांहून थोडा जास्त खर्च देश शिक्षणावर करतो. या खर्चात योजना आणि नायोजना असे दोन भाग पडतात हे नमूद केले पाहिजे. योजनांतर्गत खर्च नवीन योजना अगर कार्यक्रम यासाठी असतो, तर नायोजना अंतर्गत खर्च जुन्या योजना चालू ठेवण्यास व स्थायी खर्चास वापरला जातो. १९८२–८३ मधील एकूण ५१८५.९ कोटी रुपयांपैकी १५.७ टक्के खर्च योजनांतर्गत आहे व उरलेला नायोजनांतर्गत खर्च आहे. हे नमूद करणे जरूर आहे, की योजनेच्या काळात दरवर्षी योजनांतर्गत आणि योजनाबाह्य खर्चाचे गुणोत्तर वाढत जाते.

२.३२. इतर देशाशी तुलना करता भारत, एकूण राष्ट्रीय उत्पन्न विचारात घेता शिक्षणावर बराच कमी खर्च करतो. आकडेवारी असे दर्शविते की अनेक देश राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ ते ८ टक्के खर्च शिक्षणा-वर करतात तर भारतात हेच प्रमाण अवघे ३ टक्के आहे. दक्षिण आशियातील ब्रह्मदेश, पाकिस्तान, अफगाणिस्तान हे देश मात्र भारताच्या तुलनेत खर्च कमी करतात. १९६४–६६ मध्ये नेमलेल्या शैक्षणिक आयोगाने हा खर्च ६ टक्के इतका वाढवावा अशी शिफारस केली होती हे नमूद करणे जरूर आहे.

२.३३. प्रत्येक पुढील पंचवार्षिक योजनेत शिक्षणावरील खर्चाचा आराखडा वाढत आहे. पहिल्या योजनेत तो १६९ कोटी रु. होता तर सहाव्या योजनेत तो २५२४ कोटी रु. इतका वाढला. प्राथमिक शिक्षणावरील खर्च पहिल्या योजनेत एकूण खर्चाच्या ५५ टक्के होता तर सहाव्या योजनेत तो एकूण खर्चाच्या ३६ टक्के होता.

२.३४. १९५०–५१ मध्ये प्राथमिक शिक्षणाचा खर्च एकूण शिक्षण विषयक खर्चाच्या ४३ टक्के एवढा होता. त्या खालोखाल माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील खर्च २९.७ टक्के होता. म्हणजेच या दोन विभागांवर एकूण खर्चाच्या सुमारे ७५ टक्के रक्कम खर्च होत होती. १९७६–७७ मध्ये प्राथमिक शिक्षणावरील खर्च ४३ टक्क्यांवरून २७ टक्क्यांवर घसरला आणि माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च २९.७ पासून ३१.७ टक्के इतका वाढला आणि दोन्ही विभागांचा एकूण खर्च ६० टक्के इतका झाला. पूर्व माध्यमिक स्तरावरील शिक्षण खर्चात सर्वात जास्त म्हणजे दुप्पट वाढ झाली. हा खर्च ९.९ टक्क्यांवरून २०.७ टक्क्यांपर्यंत वाढला. अन्य शैक्षणिक स्तरावरील खर्चातील वाढ नाममात्र आहे.

२.३५. आवर्ती खर्चापैकी ७५ टक्के भाग शिक्षकांच्या पगारावर खर्च होतो व १० टक्के भाग प्रशासकीय कामासाठी खर्च होतो. आंध्र प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश आणि केरळ या राज्यात पगारावरील खर्च ८० टक्के इतका आहे. त्यामुळे इतर बाबींवरील शैक्षणिक खर्च आपोआपच कमी होतो.

२.३६. संरक्षण खर्चाच्या खालोखाल शिक्षणावरील खर्च जास्तीत जास्त होत असला तरीही शैक्षणिक गरजांसाठी साधनसंपत्ती पुरवणे हा यक्षप्रश्न आहे. कारण खर्चाचा बहुतांश हिस्सा पगारावर खर्च पडतो. अन्य शैक्षणिक सुविधांसाठी पैसा उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या हाती काहीच साधने पडत नाहीत व अशा बाबींवर खर्च करण्यास पैसा उपलब्ध नसल्याने शिक्षकवर्गाचा पूर्ण क्षमतेने वापर होऊ शकत नाही.

**प्रादेशिक असमतोल आणि सुविधा**

२.३७. ग्रामीण भागात होणाऱ्या शिक्षणावरील खर्चात हळूहळू सुधारणा होत आहे. १९५०–५१ मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चाच्या

३५ टक्के रक्कम ग्रामीण भागासाठी उपयोगात आणली जात होती. ताज्या आकडेवारीनुसार हा खर्च ४० टक्के इतका वाढला आहे. तरीही ग्रामीण भागासाठी अधिक रक्कम उपलब्ध होणे जरूर आहे.

२.३८. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळाभरतीचे प्रमाण प्रत्येक राज्यात वाढले आहे. १९७७ ते ८३ या कालावधीतील आकडेवारीवरून त्यात भरीव वाढ झाली आहे असे दिसते. तथापि ही प्रगती अनुसूचित जातींच्या मुलांबाबत आहे, मुलींबाबत नव्हे. १९७७ ते ८३ या काळात अनुसूचित जातीच्या मुलांचे शाळाभरतीचे प्रमाण ९८ पासून ११५ पर्यंत वाढले तर अनुसूचित जातींच्या मुलींचे प्रमाण फक्त ५१ पासून ६६ पर्यंत वाढले. पूर्व माध्यमिक स्तरावर ही तफावत जास्तच आहे. अनुसूचित जमातीच्या मुलांच्या शाळाभरतीचे प्रमाण कमी आहे आणि मुले आणि मुली यांच्या शाळाभरतीच्या प्रमाणात खूप तफावत आहे.

२.३९. शहरी विभागात अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ४७.५ टक्के पुरुषात आहे आणि ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे, आदिवासी लोकसंख्येबाबत जवळजवळ हीच स्थिती आहे. मात्र आदिवासी स्त्रियांची ग्रामीण भागातील साक्षरता आणखीनच कमी आहे.

२.४०. अनुसूचित जातीची मुले व इतर मुले यातील टिकून राहण्याच्या प्रमाणातील तफावत बेताबेताने सुधारत आहे. १९६८ साली अनुसूचित जातीची मुले व इतर मुले यांचे टिकून राहण्याचे प्रमाण अनुक्रमे २७.८ व ३५.३ होते ते कमी होऊन १९७४ मध्ये ते अनुक्रमे ३५.६ व ४०.५ इतके झाले. तरीही आदिवासी क्षेत्रात या प्रमाणात फारसा फरक पडलेला नाही. राज्यवार टिकून राहण्याच्या आकडेवारीची तुलना करता अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील मुलांचे टिकून राहण्याचे प्रमाण, प्राथमिक स्तरावर अद्यापही फारच कमी आहे असे दिसते. पूर्व माध्यमिक स्तरावर ते बरे आहे. आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल मध्ये ते कमी आहे. तर केरळ, हिमाचल प्रदेश, हरयाणा राज्यात ते बरेच जास्त आहे. पूर्व माध्यमिक स्तरावर शाळेत टिकून राहण्याचा कल साधारण असाच आहे. फक्त कर्नाटक राज्यात त्यात थोडीशी सुधारणा आढळते.

२.४१. अनेक प्राथमिक व पूर्व माध्यमिक शाळात मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. उदाहरणार्थ १९७८ चा अखिल भारतीय शैक्षणिक सर्वेक्षणाचा चौथा अहवाल असे दर्शवितो की, ९ टक्के प्राथमिक शाळांना स्वतःची इमारत नाही. अशा शाळा मोठ्या प्रमाणात पंजाब (२०.८ टक्के) उत्तर प्रदेश (१६.५ टक्के) आणि ओरिसात (१२.६ टक्के) आढळतात. इमारत नाही म्हणजे अन्य सुविधाही नाहीत हे सांगण्याची गरज नाही. उदाहरणार्थ भारतीय स्तरावर फक्त ५८.५ टक्के प्राथमिक शाळांत फळे उपलब्ध आहेत आणि ४६.६ टक्के शाळांना क्रीडांगणे उपलब्ध आहेत. तथापि याची राज्यवार स्थिती वेगवेगळी आहे. उदाहरणार्थ आसाम राज्यात १९.९ टक्के प्राथमिक शाळांत फळा उपलब्ध आहे. तर पश्चिम बंगालमध्ये ४ टक्के प्राथमिक शाळांत ग्रंथालय उपलब्ध आहे आणि बिहार राज्यांत १५ टक्के प्राथमिक शाळांना क्रीडांगण उपलब्ध आहे व काही राज्यांतून प्राथमिक शाळांतून पिण्याच्या पाण्याची सोयही उपलब्ध नाही. उदाहरणार्थ मध्यप्रदेशात फक्त २१ टक्के प्राथमिक शाळांत पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. याच उणीवा माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरही आढळतात. उदाहरणार्थ पश्चिम बंगालमध्ये फक्त ७६ टक्के माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांत पिण्याच्या पाण्याची सोय आढळली. बहुधा या उणिवा ग्रामीण भागात आढळतात. प्राथमिक शाळेत ८९ टक्के, पूर्व माध्यमिक स्तरावर ७० टक्के, माध्यमिक स्तरावर २७ टक्के, आणि उच्च माध्यमिक स्तरावर १० टक्के शाळांमधून मुताऱ्या व संडास यांची सोय उपलब्ध नाही.

**रोजगाराचा प्रश्न**

२.४२. विकासाच्या साखळीत शिक्षण आणि रोजगार यांच्या-संबंधास फार मोठे महत्त्व आहे. मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा विस्तार व वाढ आणि कामधंदा व रोजगार यांचा अतूट संबंध आहे. मोठ्या प्रमाणांत भारतीय मजूर अशिक्षित अगर अल्पशिक्षित आहे. मजूर शिक्षित नसून ठराविक उद्योगधंद्यात एकवटला आहे. १९८१–८२ मध्ये विकसित उद्योगधंद्याचे क्षेत्रात प्रतिवर्षी ३.२ टक्के वाढ होत आहे. या उद्योगातील १९६१ साली नोकऱ्यांचे प्रणाण ३३.१ टक्के होते ते वाढून १९८२ साली ते ४१.८ टक्के झाले. ही वाढ प्रतिवर्षी सरासरी ४.४ टक्के होते.

२.४३. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांनी भारताच्या सामाजिक व आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका घेतली. सुशिक्षितांना रोजगार उपलब्ध करून देणारा हा सर्वात मोठा विभाग आहे. ताज्या आकडेवारीनुसार सार्वजनिक क्षेत्रात १.५ कोटी कामगार कामावर होते. संघटित औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराशी तुलना करता हे प्रमाण ६० टक्के आहे आणि देशातील एकूण रोजगाराच्या ५.७ टक्के आहे.

२.४४. सार्वजनिक क्षेत्रातील रोजगारातील वाढ प्रतिवर्षी सरासरी सारखी नाही. तसेच सर्व धंद्यातही ती सारखी नाही. म्हणून शिक्षणाच्या नियोजकांनी रोजगार क्षेत्रात दरवर्षी होणारा बदल ध्यानात घेतला पाहिजे. विविध व्यवसायातील शिक्षणाचा प्रसार आणि त्याचा बदलता उपयोग यांचा सूक्ष्म अभ्यास होणे जरूर आहे. म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसायाला कोणते सामान्य व विशिष्ट शिक्षण आवश्यक आहे याची दखल घेणे जरूर आहे. अर्थात याचा अर्थ उद्योगधंद्यातील सर्व कामगारांना विशिष्ट दर्जाचे शिक्षण पाहिजे असा नाही. आकडेवारीनुसार ५८ टक्के कामगारांना विशिष्ट प्रकारचे तांत्रिक शिक्षण अगर कौशल्य असूनही सामान्य शिक्षण नसते आणि प्रशिक्षणही नसते. त्याचप्रमाणे आरोग्य विषयक व्यवसायातील २४ टक्के लोकांना कुठल्याही तऱ्हेचे औपचारिक शिक्षण अगर प्रशिक्षण नसते.

२.४५. औद्योगिक व तांत्रिकदृष्टचा कुशल कामगारांची मागणी वाढली आहे. गेल्या दोन दशकातील रोजगाराची जी वाढ झाली त्यात या वर्गाचा वाटा ४५ टक्के आहे. याउलट संघटित उद्योगातील अकुशल कामगारांची मागणी घटली. कारकून व सामान्य उत्पादन प्रक्रियेतील कामगारांची मागणी आहे तीच राहिली उत्पादन प्रक्रियेतील रोजगार, विशेष करून तंत्रनिकेतनातून बाहेर पडलेले पदविका धारक अगर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून बाहेर पडलेले प्रमाणपत्र धारक यांचेसाठी असतो. म्हणजेच उद्योगधंद्याची मागणी व्यवसाय शिक्षण घेतलेले व तंत्रज्ञान असलेले यांचेसाठी असते.

२.४६. खाजगी उद्योगधंद्यात सामान्य शिक्षण घेतलेले व विशिष्ट कसब असलेल्यांची मागणी सामान्यतः १:४ या प्रमाणात असते. सहाव्या

दशकापासून आठव्या दशकापर्यंत मागोवा घेतल्यास भविष्यात ही मागणी १:३ या प्रमाणांत राहील असे मानावयास हरकत नाही. खाजगी उद्योग-धंद्यातील ५८ टक्के लोकांना तांत्रिक कसब आवश्यक असले तरी औपचारिक शिक्षण अगर प्रशिक्षण नसते. याउलट व्यवसायातील ९४ टक्के लोकांना सामान्यज्ञान आणि कौशल्य यांची आवश्यकता असते.

२.४७. काही प्रमाणात सार्वजनिक व खाजगी उद्योगातील कामगारांची शिक्षणाची टक्केवारी सारखीच असली तरीही सुशिक्षित रोजगारांची वापर करण्याची क्षमता दोहोंमध्ये भिन्न आहे. दोन्ही क्षेत्रे या तऱ्हेने अगदी भिन्न असली तरीही व्यावसायिक अगर धंदे शिक्षणाची गरज दोन्ही क्षेत्रात सारखीच आहे.

२.४८. सुशिक्षित लोकांची बेरोजगाराबाबतची आकडेवारी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण आणि उद्योग विनिमय केंद्रातील नोंदणी यावरून मिळते. राष्ट्रीय सर्वेक्षणातून १९५६-५७ साली पदवीधर, बेकार आणि तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेतलेले बेकार अंदाजे ४ टक्के पुरुष व ६ टक्के महिला एवढे होते. मात्र माध्यमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रिया आणि पुरुष यांचे बाबतीत ही टक्केवारी अधिक होती. १९७२ च्या राष्ट्रीय सर्वेक्षणातून पदवीधर पुरुष आणि स्त्रिया यांचे बेकारीत वाढ झालेली दिसून आली. ७ टक्के पुरुष पदवीधर आणि १० टक्के महिला पदवीधर बेकार आहेत असे दिसून आले. याउलट माध्यमिक शिक्षण घेतलेले पुरुष आणि स्त्रिया यांच्या बेकारीत घट दिसून आली. १९७७-७८ च्या ३२ व्या सर्वेक्षणातून बेकारीत सार्वत्रिक वाढ झाल्याचे दिसून आले. सर्व स्तरांवरील सुशिक्षित बेकार वाढल्याचे आढळून आले, त्यांत स्त्री अथवा पुरुष असा फरक नव्हता. २७ व्या सर्वेक्षणांत शहरी भागातील एस. एस. सी. पास असलेल्या बेकारांत ६ टक्केवरून ७ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले, तर स्त्रियांचे बाबतीत ही वाढ ६ टक्केवरून ९ टक्के वर गेली. पदवीधर पुरुषांचे बाबतीत बेकारीचे प्रमाण ७ टक्केवरून ८ टक्के वर गेले आणि स्त्रियांचे बाबतीत हे प्रमाण ९ टक्क्यांवरून १६ टक्क्यांवर गेले. २७ व्या सर्वेक्षणापासून ३२ व्या सर्वेक्षणापर्यंत सामान्य शिक्षण घेतलेल्यांची बेकारी वाढत आहे असे दिसते. पुरुषांचे बाबतीत हे प्रमाण ७ टक्क्यांवरून ९ टक्क्यांवर गेले. याउलट तांत्रिक अगर व्यावसायिक

शिक्षण घेतलेल्या पदवीधरांचे बेकारीचे प्रमाण २७ व्या सर्वेक्षणांत अवघे ५ टक्के होते ते ३२ व्या सर्वेक्षणात ६ टक्क्यांहून थोडे कमी होते.

२.४९. ३२ व्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणावरून असे दिसून येते की ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांची स्थिती अधिकाधिक वाईट होत आहे. १९७२–७३ मध्ये सामान्य शिक्षण घेतलेले १८ टक्के पदवीधर बेकार होते. हा आकडा १९७७–७८ मध्ये १९ टक्के झाला. तसेच सामान्य शिक्षण घेतलेल्या १६ टक्के पदवीधर महिला १९७२–७३ मध्ये बेकार होत्या. १९७७–७८ मध्ये हा आकडा २४ टक्के पर्यंत वाढला.

२.५०. याच तऱ्हेचे चित्र नोकरी शोधणाऱ्यांचेबाबत दिसून येते. १९६१ ते १९८१ या कालावधीत नोकरीसाठी धडपडणारांची संख्या दसपटीने वाढली. या वर्गात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत आहे. नोकरी शोधणारांत अशी मंडळी १९६१ मध्ये एकूण संख्येच्या १।३ होती. १९८१ मध्ये ही संख्या १।२ झाली. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर बेकारीचे प्रमाण सर्वसामान्य बेकारांपेक्षा सुशिक्षित लोकांत अधिक वाढते आहे.

२.५१. बेकारीची समस्या निरनिराळ्या स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचे बाबत सारखी नाही. उदाहरणार्थ १९६१ मध्ये एकूण सुशिक्षित बेकारांमध्ये ३।४ लोक मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण झालेले होते. १९८१ मध्ये ही टक्केवारी ५५ इतकी खाली आली. पदवीधरांचे बाबतीत हे प्रमाण १९६१ ते १९८१ या कालावधीत ९.५ टक्क्यांवरून १८.७ टक्क्यांवर गेले.

२.५२. या प्रकरणात शैक्षणिक विकासाचा आढावा थोडक्यात घेण्यात आला आहे. आकार आणि विविधता या दृष्टिकोनातून शैक्षणिक प्रगती स्पृहणीय असली तरीही राष्ट्रीय ध्येये त्यामुळे कितपत साध्य झाली या निकषावर शिक्षणाचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. या स्थितीत साधनसंपत्ती आणि मनुष्यबळ या संदर्भात स्वातंत्र्योत्तर काळात किती शैक्षणिक प्रगती झाली याचा आढावा घेतलेला आहे. असे मूल्यमापन भविष्यकाळात उद्भवणाऱ्या अडचणींचा विचार करता आवश्यक आहे. काही बाबतीत आणि काही मुद्द्यांचे समीक्षणात्मक मूल्यमापन करण्याचा प्रयत्न तिसऱ्या प्रकरणात केलेला आहे.

## प्रकरण तिसरे

# समीक्षणात्मक मूल्यमापन

३.१. इ. सन १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविताना शिक्षण पद्धतीमध्ये मूलभूत बदल करून शिक्षण पद्धती लोकजीवनाशी अधिक जवळीक साधणारी, व्यापक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणारी, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व स्तरांवर सातत्याने प्रयत्न करणारी, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या विकासास महत्त्व देणारी आणि सामाजिक व नैतिक मूल्ये निर्माण करणारी असावी असा विचार मांडला गेला. या धोरणाचे अंतिम ध्येय भारतीय समाज मूल्यांशी एकरूप राहून देशाच्या सेवेसाठी आणि विकासासाठी वचनबद्ध असलेली चारित्र्यवान व समर्थ तरुण पिढी निर्माण करणे हे होते. पण ही ध्येये गाठण्यामध्ये आपण बहुतांशी अपुरे पडलो ही गोष्ट खरी आहे. कारण मध्यंतरीच्या काळात वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती, आणि सामाजिक आर्थिक वाढ इतक्या झपाटयाने झाल्यामुळे त्यातून नवीन शैक्षणिक गरजा निर्माण झाल्या आहेत.

३.२. उद्याच्या जगातील समाज हा तंत्रज्ञान आणि माहितीने समृद्ध झालेला असेल व त्याला शिक्षणाकडे एका वेगळ्या दृष्टीने पहावे लागेल. जे शिकलो आहोत त्यापेक्षा शिक्षण घेण्याची क्षमता विकसित होणे हे अधिक महत्त्वाचे आहे. संपूर्ण जीवनभर सातत्याने शिक्षण चालू राहणे ही काळाची गरज असेल. माणसाचे जीवन माहितीच्या तंत्रज्ञानाने व्यापून टाकल्यामुळे शिक्षणाची ध्येये व शिक्षणपद्धतीमध्ये महत्त्वपूर्ण-सुधारणा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय घटनेमध्ये जी उदात्त तत्त्वे अंतर्भूत केली आहेत त्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहणारा फार मोठा समाज निर्माण व्हावा ही अपेक्षा आहे. त्यामुळे समान प्रतिष्ठा व संधी मिळून धडाडीने कार्य करणे शक्य होईल. दळणवळणाच्या साधनांमुळे जग फार जवळ आले आहे व काही प्रमाणात राष्ट्राराष्ट्रातील

सीमा देखील पुसट झाल्या आहेत. या जगात आण्विक शक्तीचे व पर्यावरणाचे धोकेही आहेत. या संदर्भात मूल्यांच्या शिक्षणाला नवीन निकड व पैलू निर्माण झाले आहेत. वरील गोष्टींमुळे आपणाला एकाच वेळी दोन महत्त्वपूर्ण कामे करण्याचे आव्हान पेलावयाचे आहे. एका बाजूने आपल्याला प्रत्येक व्यक्तीतील सुप्त शक्तीचा विकास करण्यासाठी उत्तम शिक्षण द्यावयाचे आहे तर त्याचवेळी दुसऱ्या बाजूने भविष्यात निर्माण होणाऱ्या नवीन गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षण पद्धती व आशय यांच्यात बदल करावा लागेल.

३.३. आज देशामध्ये असा विश्वास व उत्साह आहे की, ज्यामुळे अडचणीचे डोंगर उल्लंघून या आव्हानांना तोंड देता येईल, म्हणून आजपर्यंत आपण जे मिळविले व जे मिळवावयाचे ठरविले होते त्याचे स्पष्ट व सूक्ष्म मूल्यांकन करण्याची हीच योग्य वेळ आहे. आपण आपले यश व अपयश ओळखले पाहिजे. (आपण आपल्या यशापयशाचे मूल्यमापन केले पाहिजे). भूतकाळातील आपल्या यशापयशाची खात्री करूनच आपल्याला आपले भविष्य घडविता येईल. स्वीकारलेली धोरणे व कार्यक्रमाचे पद्धतशीर व कठोर असे परीक्षण सामान्यन्याय, संख्यात्मक व गुणात्मक विकास लक्षात घेऊन जी उद्दिष्टे गृहीत धरली आहेत त्यांच्या संदर्भात झपाट्याने वाढणाऱ्या भविष्यातील गरजांचा विचार करून केले पाहिजे.

३.४. जरी आपले यश भरीव व संख्यात्मकदृष्ट्या चांगले असले तरी सगळ्या गोष्टी मिळवण्याचे दृष्टीने पुरेसे नाही. भारतासारख्या देशात विकासाची फळे सर्वांना विभागून देण्यासाठी वचनबद्ध असलेल्या उत्पादनक्षम व आधुनिक समाजाच्या विकासाच्या आकांक्षा लक्षात घेऊन त्याचे गंभीर आत्मनिरीक्षण करण्याची ही संधी आहे. हे करीत असताना शिक्षणाचे उद्बोधन देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीने योग्य त्या दिशेने सुसंबद्ध असले पाहिजे.

३.५. सर्वसामान्य राजकीय व सामाजिक व्यवस्था टिकून राहण्यात धोका निर्माण झाल्याशिवाय भौतिकदृष्ट्या शिक्षणाच्या बहुविध शाखांमध्ये बदल करणे शक्य होणार नाही. प्रत्यक्ष कार्यवाहीची यंत्रणा नीट

तपासून पाहण्याची हीच वेळ आहे, कारण त्यामुळे नवीन प्रभावी यंत्रणा निर्माण करता येईल व धोरण आखणे, कामाचा प्राधान्यक्रम ठरविणे, साधनांची विभागणी करणे, आंतरविभागीय सहसंबंध प्रस्थापित करणे, दर्जा प्रस्थापित करणे आणि देखरेख व मूल्यमापन यांची व्यवस्था करणे इत्यादी कामे या यंत्रणेकडून करून घेता येतील. धोरणात्मक ठराव, नियोजन, घोषणा ही त्यांच्या पूर्ततेसाठी खास उपाययोजना असल्या-शिवाय व्यर्थ होत.

खालील परिच्छेदामध्ये शिक्षणाच्या विविध विभागातील कामांचे सूक्ष्म मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

३.६. भारतीय राज्य घटनेमध्ये १४ वर्षापर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण सन १९६० पूर्वी देण्याच्या प्रयत्नासाठी खास तरतूद करण्यात आलेली होती व या संदर्भात सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देण्यासाठी विविध प्रकारची बांधिलकी स्वीकारूनही या क्षेत्रात झालेली प्रगती ही उद्दिष्टांच्या दृष्टीने अतिशय असमाधानकारक आहे. वास्तविक पाहता योग्य प्रकारच्या साधनांचा अभाव आणि व्यवहार्य क्लुप्त्यांची उणीव यामुळे निर्माण होणाऱ्या अपयशाला सावरून धरण्यासाठी उद्दिष्टेच पुढे पुढे जात आहेत. वरील संदर्भांकित वयोगटातील ७६ टक्के म्हणजे जवळ जवळ ११ कोटी मुले शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेत आहेत ही गोष्ट खरी आहे. आज या पातळीवर एकूण ९३.४ टक्के मुलांची नोंदणी करण्यात यश मिळविले आहे. हे आकडे जरी बोलके असले तरीसुद्धा राज्यभेद, विभागभेद आणि लिंगभेद यांचा विचार करता त्यांच्यामध्ये खूपच तफावत आढळते. ह्या एकूण नोंदणीच्या प्रमाणाचा विचार जास्तकमी वयाच्या मुलांच्या संदर्भात केला असताना या कामाची पातळी खालीच उतरते. आसाममध्ये ही नोंदणी ६२.९ टक्के तर राजस्थानच्या जालोर जिल्ह्यामध्ये १७ टक्के इतकी कमी आहे. मुलींच्या बाबतीत तर भारतीय स्तरावर ही नोंदणी ७५.५ टक्के आहे. वर्गीकृत जाती व जमातींच्या बाबतीत हे प्रमाण अनुक्रमे ९३.४ टक्के आणि ८१.९ टक्के आहे. ग्रामीण भागातील मुलांची नोंदणी असमाधानकारक आहे. विशेषत: वर्गीकृत जाती जमातींमध्ये कमी आहे. एकूण विचार करता मुलांची नोंदणी ही असमाधानकारक आहे.

३.७ बहुसंख्य मुलांना त्यांच्या घरापासून १ किलोमीटर अंतरावर प्राथमिक शाळेची सोय आहे. तथापि, १ लक्ष ९१ हजार वस्त्यांना म्हणजेच जवळजवळ ½ वस्त्यांना ३०० पेक्षा अधिक लोकसंख्या असूनही स्वतःच्या शाळा नाहीत. जेथे शाळा आहेत तेथे ४०% शाळांना पक्क्या इमारती नाहीत. ३९.७२% शाळांना फळे नाहीत आणि ५९.५०% शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही. ३५ टक्के शाळांमधून ३ ते ४ वेगवेगळे वर्ग शिकविण्याकरिता एकच शिक्षक आहेत. हे शिक्षक मुलांच्या विविध आवडी व शैक्षणिक गरजा पूर्ण करू शकत नाहीत; हे स्पष्टच आहे. वस्तुतः काही सर्वेक्षणावरून असे दिसून आले आहे की अनेक शाळांमधून बऱ्याच काळापर्यंत शिक्षकच नसतात; तरी काही ठिकाणी नेमलेला शिक्षक आपले शिकविण्याचे काम अपात्र व शैक्षणिक अनुभव नसलेल्या व्यक्तीकडे कंत्राटपद्धतीने देतात. शैक्षणिक नियोजन करताना हे धूसर चित्र बदलण्यास प्राधान्य दिले पाहिजे. , शाळांच्या इमारती, साधने, साहित्य, खेळ, छंदमंडळे आणि पुरेसे प्रशिक्षित शिक्षक या बाबतीत शहरातील शाळा व ग्रामीण शाळा यांच्यामधील साम्य वाढेल अशी खात्री करून घ्यावयास हवी.

३.८. अनेक राज्यांमध्ये एन्. सी. ई. आर. टी. आणि युनिसेफ यांच्या सहाय्याने परिसरनिष्ठ अभ्यासासाठी साहित्य विकसित केले आहे. तथापि, सर्वच शाळांमधून शिकविल्या जाणाऱ्या विषयांचा संबंध त्या मुलांच्या पर्यावरणाशी संबंधित असतोच असे नाही. पुष्कळ राज्यांमध्ये विज्ञान व गणित हे विषय शिकविण्यासाठी ज्या महत्त्वाच्या पद्धती आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे. आणि बहुतांशी शाळांमधून एन. सी ई. आर. टी. ने विकसित केलेले अध्यापन साहित्य तौलनिकदृष्टच्या खर्चिक असल्याने उपलब्ध नाही. थोडक्यात म्हणजे अध्यापन पद्धती ही कुचकामी झालेली आहे. या कुचकामी पद्धतीमुळे पाठांतराला उत्तेजन दिले जाते आणि अपेक्षित उत्तरांची उजळणी केली जाते. कार्यानुभव किंवा समाजोपयोगी उत्पादक कार्य हा कार्यक्रम अनेक शाळांतून राबविलाच जात नाही. महात्मा गांधीचे बुनियादी शिक्षण वरील तत्त्वावर आधारलेले होते. वरील कार्यक्रमाचा हेतू एकसंध कार्य, ज्ञान, नैतिकता व समाज संबंध निर्दोष व्हावेत असा आहे.

...ing and ...
...-B, Sri Aurobindo Marg,
New Delhi-110016
(३५)DOC, No............D-9052
Date..............22-02-96

३.९. अशाप्रकारच्या शाळा, अशाप्रकारचे शिक्षण आणि ४०% पेक्षा अधिक लोक दारिद्र्यरेषेच्या खाली जगणारे असताना शाळेतील नोंदणीचे प्रमाण घटते आहे यात आश्चर्य नाही. आधिक दु:खाची गोष्ट ही की, ते लवकरच शाळा सोडून जातात, पहिल्या वर्गात दाखल केलेल्या १०० मुलांपैकी फक्त २३ मुलेच आठवीच्या वर्गात जातात व बाकीची मुले अर्धसाक्षर किंवा निरक्षर होऊन देशांतील निरक्षरांची गर्दी वाढवितात. बहुसंख्य मुले ज्या शहरी किंवा ग्रामीण शाळांतून शिक्षण घेतात त्या शाळा शिक्षणाशी सुसंबद्धता, गुणवत्ता व सोयीच्या दृष्टीने फारच खालच्या दर्जाच्या असतात व त्यामुळेच सुखवस्तु मुलांच्या शाळांच्यापेक्षा या शाळांतील गळतीचे प्रमाण खूप मोठे असते. आपल्या प्राथमिक शाळेतील मुलाची अवस्था बहुअंशी विकसनशील राष्ट्राच्या तुलनेत फारच असमाधानकारक आहे. यासाठी आपण शाळेला आवश्यक असलेल्या सोयींची, शिक्षकांची, अभ्यासक्रमाची, आणि अध्यापन पद्धतीची योग्य तरतूद केली नाही; तर आपण अनेक निरक्षरांच्या जथ्यांसह २१ व्या शतकामध्ये पदार्पण करू. त्यामुळे प्रौढांना दर्जाहीन जिणे जगावे लागेल तर त्यांच्या मुलांना अज्ञान व दारिद्र्य यात खितपत पडावे लागेल. म्हणजेच गरीबांना दोन्ही बाजूंनी वंचित रहावे लागेल. पण जे अधिक सुखवस्तू आहेत त्यांच्या मानेभोवती दरिद्री, अज्ञानी लोक फास आवळून त्यांचा चक्काचूर केल्याशिवाय रहाणार नाहीत. तथापि वर म्हटल्याप्रमाणे दोन्ही बाजूंनी समाजाला वंचित ठेवणे हेही अशक्य आहे. काहीच न करणे म्हणजे कायदा न सुव्यवस्था यांच्यावर तणाव आणण्यासारखे होईल. भारत हा शांततापूर्ण व सुव्यवस्थित पद्धतीने सामाजिक व राजकीय उत्क्रांती करू इच्छिणारा लोकशाही प्रधान देश असल्यामुळे वरील सदोष विकल्प समूळ नष्ट केला पाहिजे.

३.१० शिक्षणातील आजच्या परिस्थितीची कारणे स्वयंसिद्ध आहेत. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे साधनांचे दारिद्र्य होय. नियोजनामध्ये शिक्षणावर होणाऱ्या खर्चासाठी अंदाजपत्रकी तरतूदीमध्ये भरपूर वाढ होत असूनही ती वाढती नोंदणी व वाढत्या किंमती यांच्याशी सुसंगत नाही; परिणामत: केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडून विद्यार्थ्यांवर होणारा दरडोई खर्च खऱ्या अर्थाने कमीच होत आहे. बहुतेक

राज्यांच्यामध्ये ९० टक्के पेक्षा अधिक खर्च केवळ प्रशासन व शिक्षकांचा पगार यावरच होत आहे. खडू, फळा, घेण्यास देखील काही उरत नाहीं; तर तक्ते इत्यादी खर्चिक शैक्षणिक साधने व पाणी पिण्यासाठी लागणाऱ्या मडक्याची गोष्ट तर सोडाच. ही परिस्थिती काबूत आणणे अर्थनिरपेक्ष पद्धतीने काम करून शक्य आहे; असे म्हणणे अवाजवी आहे. तर हा पर्यायी दृष्टिकोन व्यवहार्य व सुयोग्य असेल; तर त्यांच्या उदगात्यांनी देशांतील शिक्षणतज्ज्ञ व लोकांची तशी खात्री करून देण्यासाठी पुढे आले पाहिजे. प्राथमिक शिक्षणाविषयी घटनेत समाविष्ट केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जी तरतूद आहे ती राष्ट्रीय जबाबदारी समजली पाहिजे. केंद्र व राज्यशासन यांच्यामध्ये होणाऱ्या या जबाबदारीच्या विभाजनामुळे मूळ हेतूच बाजूला सारता येणार नाही.

३.११. शिक्षणासाठी मागणी निर्माण करण्याशी संबंधित चर्चा वारंवार शैक्षणिक वाङमयात केली जात आहे तिला फार महत्त्व आहे. आज शिक्षणाचा दर्जा कितीही कमी असला तरीदेखील किमानस्तरावर त्याचे विस्तृत प्रमाणावर प्रसारण होणे ही राष्ट्राच्या कल्याणासाठी आवश्यक बाब आहे. जर हीं गोष्ट स्वीकारली तर लोकांच्यामध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण करण्याची उपाययोजना करणे भागच आहे. देशातील समाज आपल्या मुलांच्या शिक्षणाची काळजी वाहणार नसेल तर त्याचे भवितव्यच धोक्यात आहे. सध्याच्या उदासीनतेमुळे सरकारवर अवलंबून राहून खेड्यातील विकास गटातील व जिल्ह्यातील समाजातील नेतृत्व योग्य पद्धतीने शाळा चालविण्यासाठी काहीच प्रयत्न करीत नाही. आजची शिक्षणपद्धती ही नोकरशाहीचा एक अविभाज्य घटक असल्यामुळे स्थानिक पातळीवर त्यात हात घालणे शक्य होत नाही. शिवाय शिक्षकांनाही स्वतः काही करता येत नाही हे नाकबूल करता येणार नाही जर समाजाला ह्यात परिणामकारकरीत्या सहभागी करावयाचे तर तो सहभाग हा अनेकविध हवा. समाजातील ज्या व्यक्तीजवळ साधने, ज्ञान आणि कौशल्य आहे त्यांनी शाळा उभी करण्यात व त्यांची व्यवस्था राखण्यात मदत केली पाहिजे. शाळेत जाणाऱ्या विशिष्ट वयाच्या मुलांनी समाजाच्या कार्यात भाग घेतला पाहिजे. याशिवाय शैक्षिणिक अनुभव व कौशल्य यांच्या विकासासाठी

इतर संस्थांनाही समाविष्ट करावयास हवे. कारण सर्व सोयी शाळेत उपलब्ध असतीलच असे नाही. समाजाला देखील शाळेच्या इमारती नीट ठेवणे, मधल्यावेळचे जेवण देणे, मुलांना युनिफॉर्म देणे (विशेषत: मुलींना), त्यांना पुस्तके देणे व इतर शैक्षणिक सुविधा निर्माण करावयास हव्यात. कारण त्यामुळे मुलांचे शाळेत कायम राहण्याचे प्रमाण वाढेल. शिक्षकांच्या व शाळेच्या कामावर लक्ष ठेवण्याचे अधिकार जर समाजाला दिले तर वरील गोष्ट करणे सोईचे होईल. शिवाय अभ्यासक्रमावरील त्यांचे मत काळजीपूर्वक लक्षात घेणे आवश्यक आहे. शिक्षणाची किमान गुणवत्ता, राष्ट्रीय एकात्मकतेची गरज, आंतरराज्यीय दळणवळण यासाठी एक सर्वसामान्य स्वरूपाचा व काळजीपूर्वक तयार ग्रंथसाहित्य यांनी बंदिस्त असा अभ्यासक्रम ही न टाळता येणारी गरज आहे. तथापि आवश्यक अभ्यासक्रम हा संपूर्ण अभ्यासक्रम होऊ शकत नाही. अभ्यासक्रमाचा बराच मोठा भाग हा स्थानिक परिसर व संस्कृति यांचेशी संबंधित असावयास हवा.

३.१२. प्राथमिक शिक्षणाच्या सूक्ष्ममूल्यांकनाने असे दाखवून दिले आहे की, आजच्या एकांगी शिक्षणाने शाळा आणि शिक्षकांच्या मध्ये वैयक्तिक कटुता निर्माण करणारे वातावरण निर्माण करत आहे व त्यामुळे त्यांच्यातील दोष किंवा निर्माणक्षमता लक्षात येऊ शकत नाही. सध्याच्या अध्यापनाचा दृष्टिकोन हा उपस्थिती आणि पाठांतर यावर भर देणारा असल्यामुळे तो त्यांना शाळेत थांबवून ठेवू शकत नाही अथवा समृद्धही करत नाही. भौतिक पर्यावरण असमाधानकारक असताना अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सुधारणा करणे केवळ अशक्य आहे. कायमस्वरूपी नोंदणीच्या आधारावरच कामाची मोजणी करणे हीच महत्त्वाची गरज आहे. मुली आणि गरीब मुले व निरक्षर कुटुंबे यांना विशेष. उपायात्मक कार्यक्रमांची गरज आहे. खेड्यातील शिक्षकांना कार्यप्रवण करण्यासाठी ज्याप्रमाणे उद्दाम व चुकार शिक्षकांना शिस्त लावण्यासाठी उपाययोजना केली जाते त्याचप्रमाणे त्यांना मिळणारा पगार, त्यांची राहण्याची व्यवस्था, सोयी यासुद्धा वस्तुस्थितीला धरून ठरविल्या पाहिजेत. अगदी मूलभूत विकासाची कामे करणाऱ्या ज्या प्रातिनिधीक संस्था व व्यक्ती आहेत त्यांच्यावर प्राथमिक शिक्षणाला मदत करण्याचे

काम सोपविले पाहिजे. कारण त्या माध्यमातूनच नवीन कल्पना, वर्तणुकीची अंगे आणि मूल्ये यांची नवीन पिढीमध्ये एकसंधपणे जोपासना करता येईल. मोठ्या प्रमाणावर मुलांचे शिक्षण हे प्राथमिक अवस्थेनंतर थांबणार आहे हें लक्षात ठेऊन प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे व ती साध्य करावयाची पातळी यांच्यामध्ये हळुवार बदल करणे आवश्यक आहे.

३.१३. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमाची नावीण्यपूर्णता देखाल उल्लेखनीय आहे. हा कार्यक्रम ६ व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी शैक्षणिकदृष्टचा मागासलेल्या ९ राज्यांमध्ये सुरू करण्यांत आलेला आहे. त्यामध्ये विद्यार्थी व शिक्षक प्रमाण, शिक्षकाची पात्रता, वर्गाची वेळ, अध्ययनाचा वेग या बाबतीत फारच लवचिकता ठेवलेली आहे. मूलतः गळतीची समस्या निवारण करण्यासाठी हा कार्यक्रम पुढे आला. विशेषतः मुली घरगुती काम व इतर दडपणामुळे शाळेत येऊ शकणार नाहीत असे वाटत होते. आता मात्र अन्य दडपणांमुळ अनौपचारिक शिक्षणावर १९९० साली शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण पूण करण्याच्या संदर्भात फार मोठी जबाबदारी टाकलेली आहे ६ कोटी ४० लक्ष मुले प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी येतील; त्यापैकी ३ कोटी ९० लक्ष मुलांचे शिक्षण पूर्णतया या पद्धतीने होईल अशी अपेक्षा आहे

३.१४. अनौपचारिक शिक्षणाच्या परिणामांचा प्रभाव दाखविणारा अभ्यास आजपर्यंत तरी पद्धतशीरपणे झालेला नाही. शिक्षणाचे नियोजन करणाऱ्या काही व्यक्तींचे असे म्हणणे आहे की, ही शिक्षणपद्धती शालेय शिक्षणाला पर्याय म्हणून सुयोग्य नाही. कारण या पद्धतीची प्रत्यक्ष कार्यवाही मूल्यमापन व देखरेख चांगल्या रीतीने होणे फारच कठीण आहे. औपचारिक शिक्षणपद्धतीत शिक्षण न घेणाऱ्या मुलांच्यासाठी काहीतरी वेगळी यंत्रणा असणे आवश्यक आहे.

३.१५. प्राथमिक शिक्षणाची मूळ उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जी भूमिका घेतली आहे त्यामुळे राष्ट्राभिमान, एकात्मता व सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि लोकशाही मूल्यांचे एकसंधपणे बीजारोपण होणे हे केवळ सर्वसामान्य अभ्यासक्रमाने साध्य होणार नसून त्यासाठी राष्ट्रीय विवेक जागृत करूनच होऊ शकेल; तेव्हा शिक्षण हा जरी सामाजिक

विषय केला तरीसुद्धा कोठल्याही संस्थेला किंवा घटक राज्याला व्यक्ति-विकास व राष्ट्रीय ध्येये साध्य करण्यासाठी आवश्यक असा शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्यास भाग पाडता येणार नाही, किंवा मुलांच्या मनावर प्रादेशिक, सामाजिक अथवा पूर्वग्रही तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने संकुचित करण्याच्या, प्रचार करण्याचा प्रतिबंध करता येणार नाही. या सगळ्या समस्यांची उकल कायदेशीर कृतीने किंवा कुठल्याही अन्य पद्धतीने लवकरात लवकर कशी करता येईल याकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावयास हवे.

**प्रौढ शिक्षण व कार्यात्मक साक्षरता (व्यावहारिक)**

३.१६. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या अपयशाचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून आपल्या देशात निरक्षरांची संख्या भरमसाठ वाढली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मते निरक्षरता हे पाप असून भारताला लांछन आहे. स्पष्ट बोलायचे तर, आज ४३ कोटी ७० लक्ष (१९८१ मध्ये) निरक्षरांची संख्या ही स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेपेक्षा फारच अधिक आहे. तसेच हेही खरे आहे की एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात साक्षरता प्रसाराची प्रगती फारच मंद झाली व त्यामुळे १९५१ साली १६.६७ टक्के असलेली साक्षरता १९८१ साली फक्त ३६.२३ टक्के इतकीच वाढली. राष्ट्रीय आकडेवारीप्रमाणे साक्षरतेचे जे चित्र निर्माण केले आहे ते स्त्री-पुरुष आणि प्रादेशिक विभाग यांच्या-मधील तफावत लपविणारे आहे. ग्रामीण भागात स्त्रियांची साक्षरता ही केरळमध्ये ६४.७ टक्के असून राजस्थानमध्ये ती ५.४ टक्के आहे. बिहार, मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश यांतील ग्रामीण भागातील टक्केवारी ३८ आहे व त्यातील स्त्रियांची साक्षरता ही ८.९९ टक्के ते १०.१७ अशा टप्प्यात आहे.

३.१७. लोकसंख्या वाढीच्या भरमसाठ वेगाने प्राथमिक शिक्षण व प्रौढ शिक्षणात केलेले बरेचसे प्रयत्न निःसंशयपणे हाणून पाडले आहेत. ह्यामुळे काही निर्णयात्मक कृतीची गरज महत्त्वाची झाली आहे. त्याचे विशेष कारण असे की कुटुंब नियोजनाच्या सवयी आत्मसात करण्यात साक्षरतेचा फार मोठा वाटा आहे. दुसऱ्या दृष्टीने विचार करता "लहान बदल नाही" ह्या विकल्पाला आत्मसात न करण्याचे अनेक

फाटे आहेत. लोकसंख्या वाढीच्या वेगात बदल झाला नाही आणि साक्षरता प्रसाराचे बाबतीत तशीच अवस्था राहिली ; तर इ.स. २००० मध्ये भारतात ५० कोटी लोक निरक्षर असतील. जागतिक बँकेच्या म्हणण्याप्रमाणे १५ ते १९ या वयातील जागतिक लोकसंख्येपैकी ५४ टक्के निरक्षर एकट्या भारतात असतील. प्रौढ शिक्षणाच्या क्षेत्रातील गेल्या ३० वर्षांच्या अनुभवाने आणि त्याचे बाह्य प्रतिनिधींनी केलेल्या मूल्यमापनाने असे दाखवून दिले आहे की, भरपूर प्रेरणेच्या अभावी निरक्षरांना प्रौढ शिक्षण कार्यक्रमात सातत्याने भाग घेण्यापासून प्रतिबंध घातला आहे. ह्या कार्यक्रमाला विकासात्मक कामे करणाऱ्या संस्था आणि मूलभूत काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटना, शैक्षणिक संस्थांचा काहीच आधार झाला नाही. मिळालाच असला तर तो अत्यल्पच. विकासाचे साधन म्हणून साक्षरतेचा उपयोग व प्रचार केला नाही, कारण गरीबी आणि निरक्षरता यातील निश्चित सहसंबंध अजूनही ओळखता आलेला नाही. योग्य प्रकारचे वळण लावलेला प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम देशाच्या लोकसंख्येला विकासाच्या मार्गातील अडसर न बनवता त्याला विकासाचे इंजिन बनवील हे निर्णय घेणाऱ्याला समजल्याचा पुरावा अजून तरी मिळाला नाही. प्रौढ शिक्षणाची निर्माण क्षमता वाढविण्याचे बाबतीत फार मोठा वाटा आहे. अशा परिस्थितीत ह्या कार्यक्रमाला आर्थिक व मानवी साधनांचा फारच थोडा लाभ झाला आहे हे सहज उमगू शकेल, तेव्हा २४.४ कोटी कामगारांपैकी ६० टक्के कामगार निरक्षर आहेत याचे आश्चर्य वाटायला नको. सुस्थापित व्यवसाय क्षेत्रातील मालकांनी ही जबाबदारी घेण्याबद्दल सांगितले जात नाही. निरक्षरांना कार्यात्मक शिक्षण दिल्याने त्याची किंमत वाढती निर्माणक्षमता निर्माण करणारे परिणामकारी घटक म्हणून होईल. ह्याच संदर्भात कॉलेज व युनिव्हर्सिटीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीसंख्येच्या सुप्त शक्तीचा उपयोग निरक्षरता नष्ट करण्यासाठी केला गेला नाही. पहिली डिग्री देताना एन. जी. एस. च्या माध्यमातून त्यांच्याकडून निरक्षरता निपटून काढण्यासाठी कमीत कमी काम केल्याशिवाय ती द्यावयाची नाही याचाही कुणी गंभीरपणे विचार केला नाही. प्रौढ शिक्षण जर जिवंत राहावयाचे असेल तर ते साक्षरता आणि सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय विकास यांमध्ये निश्चित सहसंबंध आहे या दृढ विश्वासाच्या आधारावर राहू शकेल.

३.१८. ज्या अनेक देशांनी लोकांचा अर्थपूर्ण सहभाग हा राजकीय निर्णय करण्याच्या अथवा राष्ट्राच्या उभारणीच्या प्रक्रियेमधील एक फार महत्त्वाची गोष्ट आहे असे मानले त्यांनी निरक्षरता नाहीसे करणे शक्य आहे हे दाखवून दिले आहे. हाच विचार किंवा भावना भारताच्या दृष्टीने अर्थ-पूर्ण आहे काय याचा विचार करावा लागेल व कायम स्वरूपी निर्णय घ्यावा लागेल. म्हणजे आज ज्या संदिग्धपणे प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम चालला आहे त्याचा शेवट होऊन ह्या बाबतीत निश्चित कृती ठरवता येईल.

३.१९. प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम चालू राहील, तथापि अशया गुणात्मकता पद्धती आणि ग्रंथसाहित्य यांचा साक्षरतोत्तर कार्यक्रमांवर काय परिणाम होतो त्याची सुयोग्यता तपासून पाहण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रौढ शिक्षण कार्यक्रमाला प्राधान्य देताना ह्या कार्य-क्रमाचा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणावर कोणता परिणाम होतो त्याची शक्यता विचारात घेणे भाग आहे. प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी व प्रौढ शिक्षण यांच्यामध्ये एक निश्चित दुवा आहे. युनेस्कोच्या अभ्यास पथकाचे असे म्हणणे आहे की, ७० टक्के साक्षरता निर्माण झाल्याशिवाय प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे दुरापास्त आहे. कारण निरक्षर पालक आपल्या मुलांना शाळेत घालणे शक्य नाही व घातलेच तर त्यांना ही अडचण निर्माण झाल्यास ते त्यांना शाळेतून काढून घेतील.

**माध्यमिक शिक्षण**

३.२०. माध्यमिक शिक्षणाचा दृश्य प्रसार झालेला दिसतो. १९४१ साली ४००० शाळा होत्या, त्या १९८२–८३ मध्ये ५२२७९ झाल्या. यात कनिष्ठ महाविद्यालये व इंटरमिडिएट महाविद्यालयांचा समावेश केल्यास हा आकडा ५०००० वरपर्यंत जाईल. शाळेच्या संख्येत १४ पट वाढ झाली आहे. त्याचबरोबर शाळेत भरती होणारांची संख्या २० पटीने वाढली आहे. १९४७ साली ७ लाख भरती होती ती आता १९८२–८३ मध्ये १४० लाख झाली. शिक्षकसंख्या मात्र फक्त १० पटीने वाढली आहे. ९३००० ते ९९३००० ह्यावरून हे स्पष्ट होते की, शाळा ह्या आकाराने वाढल्या आहेत पण शिक्षक विद्यार्थी प्रमाणावर त्याचा उलटा परिणाम झाला आहे. हा विस्ताराचा दात वाढेल व कायम राहील किंवा जसजसे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण होईल तसतसा वाढत राहील. आजच्या

१० वी व ९ वी तील वयोगटातील मुलांचे प्रमाण फक्त २२ टक्के आहे व हे प्रमाण विकसित देशाच्या प्रमाणाशी तुलना करता नगण्य ठरते. भारतामध्ये ज्यांना माध्यमिक शिक्षण घ्यावे वाटते त्या सर्वांना तशी मुभा दिली तरी प्राथमिक शाळेतून उत्तीर्ण होणाऱ्या मुलांच्या निम्मीच संख्या फक्त माध्यमिक शाळेत प्रवेश घेते. देशाने १० + २ + ३ हा आकृतिबंध स्वीकारलेला आहे. हेतू असा की अधिकाधिक मुलांनी माध्यमिक शिक्षण घेऊन ज्ञानाच्या मूलभूत शाखांशी सुपरिचित व्हावे. ह्यातच विज्ञान व गणित यांचा समावेश आहे ही बाब महत्त्वाची आहे. कारण त्यामुळे भावी नागरिकांचे जीवनमान तर सुधारेलच व त्याबरोबरच विकासाला आवश्यक असलेली त्यांची सुप्त शक्ती सुधारेल. मोठ्या संख्येने मुले पुढे येतील. विविध अभ्यासक्रम मुले पुढे घेतील, विशेषत: ती धंदेशिक्षणाकडे वळतील आणि त्यामुळे औद्योगिक जगातील त्यांचा प्रवेश सुखाचा होईल.

३.२१. एका बाजूने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी वाढणारी मागणी आणि दुसऱ्या बाजूने त्यांची उद्दिष्टे व त्यांची योग्यता याला कुठेही कमीपणा येणार नाही याची खात्री करून देणारी योग्य शिक्षणपद्धती तयार करणे हेच नियोजकांना एक शिक्षणाचे मोठे आव्हान आहे. शैक्षणिक संस्थेचे स्थान यादृष्टीने महत्त्वाचे आहे. साधनांच्या कमतरतेमुळे अयोग्य प्रकारच्या संस्थांची वाढ टाळली पाहिजे. प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे इत्यादी सोयी शाळांना पुरविण्यासाठी किमान ठरविले पाहिजेत.

३.२२. समान न्याय प्रस्थापित करण्यासाठी विज्ञान व गणित या विषयाचा अभ्यास करण्याची संधी मुलांना व मुलींना उपलब्ध करून दिली पाहिजे. अशी संधी १० वी पर्यंत दिल्यास शहरी व ग्रामीण मुलांना भवितव्यात ज्या उद्योगाची निवड करावयाची आहे त्यासाठी समान स्वातंत्र्य मिळेल. दुर्दैवाने आपल्या देशांतील अनेक प्रदेशात याची फारच तोकडी जाणीव आहे व त्यामुळे वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातील व्यवसायाकडे शहरी आणि उच्चभ्रू वर्गातील मुलांना अधिक वाव मिळणारी परिस्थिती निर्माण झाली आहे.

३.२३. निरनिराळ्या शाळेतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणात देखील खूपच तफावत आहे हे ही एक काळजीचे कारणच आहे. अभ्यासक्रमामध्ये देखील विविधता आहे. आपण जरी १०+२+३ हा आकृतिबंध सन १९६८ धोरण म्हणून स्वीकारला असला तरी अनेक राज्यांनी या धोरणाच्या शिफारशींची अंमलबजावणी केलेली नाही. राजस्थान, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांनी वरील धोरणाला तत्त्वत: मान्यता दिली तरी अजूनही १०/२/३ आकृतिबंध सुरू केलेला नाही. आकृतिबंधातील बदल हा केवळ गणिती बदल नसून त्यामुळे अध्यापन पद्धती, मूल्यमापन आणि अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण व दर्जा वाढ यांची सुरुवात व्हावी अशी अपेक्षा आहे. नवीन पद्धती ही जुन्या पद्धती पेक्षा अधिक खर्चिक आहे त्यामुळे सध्याच्या उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ३० ते ४० टक्के असल्याने गळतीला प्रतिबंध केला पाहिजे.

३.२४. प्राथमिक शाळेतून येणारे विद्यार्थी हे अपेक्षेपेक्षा कमी दर्जाचे असल्याने त्यांची भावी जीवनासाठी लागणारी तयारी करून घेण्याचे दुष्कर कार्य उच्च माध्यमिक शिक्षणावर येऊन पडलेले आहे. हे काम शिक्षक, विद्यार्थी, यातील प्रतिकूल विद्यार्थी शिक्षक प्रमाण, कालबाह्य अध्यापनपद्धती, प्रयोगशाळांची अपुरी सोय, अचेतन अभ्यासक्रम आणि नवनवीन धडाडीला वाव न देणाऱ्या व्यवस्थापनामुळे हे करणे शक्य नाही. नजिकच्या काळामध्ये गणित व विज्ञान या विषयामधील क्षमतांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. या भागाच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेला घटनेतील भाग ४ (अ) मधील कर्तव्य आणि नवीन धडपडीसाठी किमान क्षमता आणि निर्मितीमध्ये सहभाग व समन्वय साधणे यांच्या इतकेच महत्त्व आहे. मोजक्या शाळा वगळता इतर शाळांकडे दुर्लक्ष झालेले आहे. उत्तम अभ्यासक्रम व योग्य अध्यापन पद्धती यांच्या साहाय्याने मुलामुलींना औद्योगिक जगात आणि उच्च शिक्षणांत प्रवेश घेण्यासाठी ज्या क्षमता अपेक्षित आहेत त्या कशा निर्माण होतात आणि यांचे दिग्दर्शन करण्यासाठी गतीमान शाळांची स्थापना करण्याची गरज आहे.

३.२५. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या परीक्षा घेण्यासाठी विविध परीक्षा मंडळे आहेत. त्यांच्या परीक्षा घेण्याच्या पद्धतीकडे

लक्ष देणे ही ही विचार करण्याची बाब आहे. या मंडळांच्यावर सातत्याने टीका होत असते व टीकेचे विषय पेपर फुटणे, कॉपी करणे, रिझल्टमध्ये गोंधळ करणे आणि इतर अनैतिक बाबींशी असतो.

३.२६. आपण ज्या शिक्षणाला सामान्यप्रवाह म्हणून संबोधतो त्याबद्दल असे म्हणता येईल की, त्यातील उद्बोधन व अध्यापन पद्धती इतकी कुचकामी आहे की, उत्तमोत्तम शाळांमधून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा वैद्यकीय व अभियांत्रिकी शाळांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी बाह्य शिकवणीचा मार्ग स्वीकारावा लागतो. साहजिकच अनेक शिक्षक आपले नियोजित काम चुकवून किंवा त्याकडे दुर्लक्ष करून शिकवण्यांचे वर्ग चालवून भरपूर संपत्ती जमा करतात. इतके असूनही शिक्षणामध्ये राजकारण उच्चपातळीवरून घुसल्यामुळे गैरप्रकारांवर कोणतीही कार्यवाही करणे हे अवघड दुखणे आहे.

**व्यावसायीकरण**

३.२७. १९६८ च्या शैक्षणिक धोरणामध्ये उच्च शिक्षणाचे व्यावसायीकरण करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते, तथापि भूतकाळात केलेल्या प्रयत्नांना कोणतेही यश मिळालेले नाही आणि त्यामुळे ११ वी, १२ वी च्या वर्गामध्ये ५० टक्के पेक्षा अधिक विद्यार्थी यावेत अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र फारच कमी विद्यार्थी प्रवेश घेतात आणि थोड्या राज्यांमध्ये ही अपेक्षा मर्यादित राहिलेली आहे.

अल्प कल्पकता आणि आर्थिक तरतुदींचा अभाव यामुळे या अभ्यासक्रमाला महत्त्व आले नाही व त्यामुळे त्या अभ्यासक्रमांची विद्यार्थी आकर्षित करण्याची शक्ती कमी झाली. या परिस्थितीत भरपूर अर्थसहाय्य देऊन काहीतरी क्रांतिकारक बदल केल्याशिवाय हा मुळात चांगला असलेला प्रयोग चालू ठेवण्याला अर्थ उरणार नाही.

३.२८. कार्यानुभव हाही भाग माध्यमिक शिक्षणात दुबळाच राहिला आहे. १० + चा व्यावसायिक पाया तयार करावयाचा असेल तर ९ वी १० वी मध्ये व्यवसायपू[illegible] अनुभव कार्यक्रम हा पुनर्रचित केला पाहिजे. व्यावसायिक शाखेत प्रवेश देताना विद्यार्थ्यांची छाननी करण्यासाठी देखील अनन्यसाधार[illegible] [illegible] असणे ही काळाची गरज

आहे. जोपर्यंत कमी बुद्धिमान व अभ्यासात मागासलेली मुले या शाखेत जात राहतील व जोपर्यंत चांगली नोकरी मिळण्याची शक्यता, व्यवसायात वर जाण्याची संधी किंवा शिक्षणाच्या सामान्य कार्यक्रमामध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध होणार नाही तोपर्यंत व्यवसायिक शिक्षणासंबंधी असलेली अढी नाहीशी होणार नाही. व्यावसायिक शाखेचे अपयश हे काही अंशी उद्योग व स्वयंरोजगार यांच्याशी सहसंबंध नसल्यामध्ये आहे. प्रत्यक्ष काम करण्याचे ठिकाणीच योग्य प्रकारचे तात्त्विक व प्रात्यक्षिक व्यावसायिक शिक्षण मिळते व हे सत्य आहे.

३.२९. अनुभवी शिक्षकांचे असे म्हणणे आहे की, प्राथमिक शिक्षण पद्धतीमध्ये व्यावसायीकरण म्हणजे, नियोजन करणाऱ्यांना दूरदृष्टी नसल्यामुळे व रोजगाराच्या संधीची जाणीव नसल्यामुळे आणि व्यावसायिक रोजगारीसाठी कोणत्या प्रकारच्या क्षमता लागतात हे माहित नसल्यामुळे घडलेला अपघात आहे. त्यामुळे शिक्षकांचे प्रशिक्षण अभ्यासक्रमनिमिती, विषयांची निवड यांचे नियोजन करताना व व्यावसायिकबुद्धीचा अभाव आहे. स्वाभाविकच या क्षेत्रात योग्य प्रकारच्या कार्यक्रमासाठी पुरेसे अर्थसहाय्य कोणीही मागितलेही नाही व कोणीही दिलेही नाही. मध्यमवर्गीयांच्या मधील कुशलता असलेल्या मनुष्यबळांचा अभाव हे आर्थिक वाढ व निर्माण क्षमता यामधील अडसर असताना शिक्षणातील, व्यावसायीकरणाची वाढ त्या कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच खुंटली आहे हा वदतोव्याघातच आहे.

**उच्चशिक्षण**

३.३०. शालेय विरुद्ध महाविद्यालयीन शिक्षण याच्या श्रेष्ठतेविषयी शिक्षणतज्ज्ञांमध्ये वैचारिक गोंधळ आहे. उच्च शिक्षणाची अवस्था ही देशाच्या भवितव्याचे फार महत्त्वाचे एकमेव लक्षण आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात करताना असे घोषित केले की, जर विश्वविद्यालयात सर्वच आबादीआबाद असेल तर देशातही तशीच परिस्थिती असू शकेल. उच्च शिक्षणाला जरी महत्त्वाचा कार्यभाग दिला असला तरी त्या क्षेत्रातील विकास मात्र अतिशय विषम आहे. काही महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन विकासाच्या व आधुनिकीकरणाच्या

प्रक्रियेसाठी संशोधन कार्य करून उत्तम स्त्री–पुरुषांची निर्मिती करण्या-मध्ये अनन्य साधारण काम केले आहे. तथापि महाविद्यालये व विश्वविद्यालये यांची सामान्य परिस्थिती मात्र राष्ट्राच्या दृष्टीने काळजी करण्यासारखी आहे.

३.३१. केवळ संख्यात्मक दृष्टीने पाहिले तर उच्च शिक्षणाची फार मोठी पद्धती निर्माण झालेली आहे, पण हे केवळ मोठ्या लोकसंख्येमुळे झाले आहे. उच्च शिक्षणासाठी ज्या वयोगटातील मुलांनी प्रवेश घ्यावयास हवा, त्यांपैकी फक्त ४.१ टक्के मुलेच प्रवेश घेतात. हे प्रमाण अनेक भागांमध्ये, विशेषत: स्त्रिया, वर्गीकृत जाती व जमाती यांचेमध्ये फारच निकृष्ट आहे. ग्रामीण विभागात तर गुणात्मक उच्च शिक्षणाने नुसता ओझरता स्पर्शच केला आहे. विशेष म्हणजे नोंदणीचा आकृतिबंध हा सामान्य शिक्षणाच्या दृष्टीने फारच विखुरलेला आहे. विज्ञान, तंत्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण या बाबतीत केलेले प्रयत्न फार यशस्वी झालेले नाहीत.

३.३२. अंदाजे ५००० महाविद्यालयांमध्ये गुणात्मक योग्यतेच्या दृष्टीने असलेल्या सोईमध्ये फारच तफावत असून त्यांची पातळी फार निकृष्ट आहे. महाविद्यालये किंवा विश्वविद्यालये सुरू करताना शैक्षणिक गरजांचा योग्य विचार झालेला नाही. पुष्कळ वर्षांपासून या संस्था युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनने नेमून दिलेला किमान दर्जा नसतानाही दुर्मिळ साधनांचा समावेश करून राहिल्या आहेत. तत्त्वत: यु. जी. सी. ला अशा संस्थांना अनुदान देणे नाकारता येण्याजोगे आहे. परंतु प्रत्यक्षात संस्था उभी करणारी राज्ये आणि यु. जी. सी. ला पैसा पुरविणारे मध्यवर्ती सरकार यांचेमध्ये रुजवात करण्याचा धोका अनुस्यूत आहे. याबाबतीत अंतिम निर्णय केवळ समेटाचा असतो. हा समेट करताना संस्था उभ्या करणाऱ्या राज्यांकडून काही माफी मिळविली जाते. युजीसीकडे शैक्षणिक दर्जा उंचावण्याची जबाबदारी टाकली आहे ही गोष्ट भारतीय परिस्थिती परिचित असणाऱ्या कोणालाही नाकारता येणार नाही. तथापि, युजीसीने त्यासाठी केलेले प्रयत्न अत्यंत अपुरे आहेत हे आपले दुर्दैव आहे. अंतिमत: त्याचा परिणाम विद्यार्थ्यांना कमी दर्जाचे शिक्षण मिळण्यात होतो. या संदर्भात युजीसीला आपली वैधानिक

कामे कोणाचीही भीती अथवा मुलाहिजा न ठेवता करण्यासाठी पूर्ण पाठिंबा शासनाने दिला पाहिजे. विश्वविद्यालये आणि महाविद्यालये ही वाढती जातीयता, प्रादेशिकता व हीन दर्जा यासाठी कुप्रसिद्ध होत आहेत. काही थोड्या मान्यवर संस्था वगळल्यास इतर संस्थांमध्ये सत्ता व वर्चस्व यासाठी राजकारण आणि इतर भानगडींमुळे शिक्षकांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने सतत लाथाळ्या चालू असतात. काही कुलगुरू तर आपल्या घरात बसून पडद्याआडून जेवढा कारभार करता येईल तेवढाच कारभार त्यांच्या संपूर्ण कारकोर्दीत करतात. महाविद्यालयाचे यश हे त्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर, संशोधन क्षमता व शैक्षणिक क्षमता यावरून न ठरविता ती परीक्षांच्या कार्यक्रमाला चिकटून राहण्याने व कॉलेज बंद पडणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करण्याने ठरविले जाते.

३.३३ वर्षभरात परिणामकारकरीत्या काम करण्याचे दिवस ठरलेल्या वेळापत्रकाच्या अपेक्षित पातळीपेक्षा फार कमी आहेत. उच्च शिक्षणाच्या पद्धतीची अंतर्गत कार्यक्षमता देखील अगदीच कमी आहे. कमी दर्जाचे कोर्स व गळती आणि नापासी यांची मोठी संख्या यामुळे याचा पुरावा मिळतो. गळती नापासीचे प्रमाण ५९ टक्के असल्यामुळे साधनांचा निव्वळ अपव्यय दर्शवितो.

३.३४. जे विद्यार्थी पदवी परीक्षेत उत्तीर्ण होतात त्यांच्यापैकी बहुअंशी विद्यार्थ्यांना तिसरा वर्ग मिळतो हे ही उच्च शिक्षणाचा दर्जा कमी असल्याचे एक गमक आहे. याच प्रकारचे पदवीधर बेकारांचे रजिस्टर फुगविण्यास मदत करतात. आजच्या परीक्षा पद्धतीमध्ये विश्वासार्हता न राहिल्यामुळे माध्यमिक शिक्षणाप्रमाणे येथेही परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. अशी अवस्था निर्माण झाली आहे की, विश्वविद्यालये दुसऱ्या विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आपोआप मान्यता देत नाही व मोठ्या प्रमाणावर नोकरी देणारे खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांतील लोक हे उमेदवारांची गुणवत्ता आपापल्या-परीने अजमावतात. नजिकच्या भूतकाळामध्ये परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी जे प्रयत्न केले, त्याने फारशी प्रगती होऊ शकली नाही. कारण शिक्षक व विद्यार्थी यांनी अंतर्गत मूल्यमापनाला विरोध केला.

कामाचा बोजा वाढतो म्हणून शिक्षकांचा विरोध, तर सतत वर्षभर अभ्यासाची पातळी राखावी लागते आणि शिक्षक वस्तुनिष्ठतेने काम करतात यावर विश्वास नसल्यामुळे दोघांकडूनही विरोध होतो.

३.३५. विश्वविद्यालयांतील संशोधन पद्धतीचा विस्तार झाला आहे व ती किंमतीच्या दृष्टीने परिणामकारही आहे असे मानले जाते. परंतु, मोठा राष्ट्रीय खर्च व केलेले काम हे विश्वविद्यालयाच्या प्रयोगशाळेच्या बाहेरच होते व त्यामुळे प्रत्यक्ष ठळकपणे दिसणाऱ्या कामाच्या सोयीच्या संदर्भात एकप्रकारची वंचितता दिसून येते. या परिस्थितीत सुधारणा घडवून आणली पाहिजे, कारण गुणात्मक संशोधन कार्य केल्या शिवाय पदव्युत्तर अभ्यास व स्वाभाविकता यांच्यात सुधारणा होणार नाही. ज्ञानामध्ये होणाऱ्या वाढीबरोबरच संशोधन व तांत्रिकतेमधील अनुभव लक्षात घेवूनच अभ्यासक्रमामध्ये बदल करण्याचा एकमुखी प्रयत्न व्हावयास पाहिजे. प्रत्यक्षात महाविद्यालये व विश्वविद्यालये यांच्यामध्ये अध्यापनावर भरच भर दिला जातो व त्याचा परिणाम वर्षानुवर्षे चालत आलेल्या नोटचे लेखन करण्यास सांगण्यात व अध्यापनाच्या ऱ्हासात होतो.

३.३६. शाळेच्या अभ्यासक्रमाचे नूतनीकरण, मूल्यमापन, पूर्वचाचणी व देखरेख करण्यासाठी एन. सी. इ. आर. टी. व एस. सी. इ. आर. टी. यासारख्या संस्था आहेत पण विश्वविद्यालये व महाविद्यालये यांचा अभ्यासक्रम अद्ययावत करण्यासाठी काहीही व्यवस्था नाही. परिणामत: कला व सामाजिक शास्त्रे या विषयाच्या अभ्यासक्रमाचा कार्यक्रम एकमार्गी राहिला आहे. त्यामुळे जीवनाशी निगडित अशा विद्यार्थ्यांच्या बहुविध विकासासाठी लागणारे व्यक्तिमत्त्व, विचारशीलता व शिक्षणमतांशी संबंधित प्रयत्नांवाचून राहिले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान याबाबत देखील अभ्यासक्रमाची रचना ही केवळ मूलभूत कल्पना, तत्त्वज्ञान अशा अमूर्त पातळीवरच राहिली आहे. याशिवाय प्रयोगशाळांमध्ये तात्त्विक व प्रात्यक्षिक यामधील वस्तुस्थितीला हातभार लावण्याची व्यवस्था, प्रयोग साहित्य, उपकरणे व साधने उपलब्ध नाहीत.

३.३७. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये अनौपचारिक संबंध नसल्यामुळे त्यामुळे सहजीवन, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा यासाठी

असलेल्या सोईचा फार कमी अथवा वापरच होत नाही. आधीच स्पष्ट केलेल्या चित्राप्रमाणे राष्ट्रीय प्रश्न व मूल्ये यांचेसंबंधी चर्चा करण्यास काही वावच नाही. त्यामुळे महाविद्यालये व विश्वविद्यालये यामध्ये जो अभ्यास होतो तो अंशकालिक तर असतोच पण त्याची गरज केवळ पदवी मिळविण्यापुरती असल्यामुळे त्यांची विश्वासार्हता व महत्त्व हरवलेले आहे.

३.३८. उच्च शिक्षणाच्या हल्लीच्या विस्ताराकडे पाहिल्यास असे दिसून येते की, तो अंतरबाह्य अशा बाहेरील संस्थाच्या लुडबुडीचा परिणाम आहे. विश्वविद्यालये ही खऱ्या अर्थाने स्वायत्त व जबाबदार असली पाहिजेत. तथापि जबाबदारीची बळजबरी करता येत नाही. कारण राज्यांनी उभ्या केलेल्या संस्था मोडकळीस आणण्याची प्रक्रिया करता येत नाही. एकदा सुरू केलेली संस्था अथवा अभ्यासक्रम बंद करणे कठीण होवून बसले आहे आणि त्यामुळेच असेही कारण सांगितले जाते की, जबाबदारी ही आशयविरहीत कल्पना आहे. सरळ म्हणायचे तर उपकुलगुरुंच्या कार्यालयाभोवती विश्वविद्यालयांची रचना होते. तो सर्व समित्या व मंडळांचा अध्यक्ष असतो व त्याला तात्कालिक कारणासाठी वापरावयास दिलेले अधिकार अमर्यादित आहेत. प्रत्यक्षत: उपकुलगुरूला त्याची धोक्यात असलेली प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी, विश्वविद्यालय चालविण्यासाठी लागणारा पैसा मागण्यासाठी शासनाकडे धाव घ्यावी लागत असल्यामुळे व दुसऱ्या बाजूस विश्वविद्यालयाच्या कामावर ज्यांच्या निर्णयांचा काहीही परिणाम होत नाही अशा जबाबदारी नसणाऱ्या मंडळांच्या सदस्यांशी तडजोड करावी लागल्यामुळे कशीबशी सांभाळावी लागते. उपकुलगुरूंना त्यांच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाला देखील वठणीवर आणता येत नाही. कारण, ती महाविद्यालये देखील आपल्या स्वायतत्तेची जपणूक मोठ्या जिद्दीने व शक्तीने करतात.

३.३९. इतर विभागातील उच्च शिक्षणासाठी लागणारी साधने अतिशय अपुरी आहेत. विस्तार व गुणवत्ता विकासासाठी अनेक गोष्टींची गरज आहे. या संदर्भात यु. जी. सी. राज्ये व मध्यवर्ती शासन यांच्या जबाबदाऱ्या असंदिग्धपणे स्पष्ट केल्या पाहिजेत. म्हणजे अशा एकात्म पद्धतीने व भौतिक सुविधांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी टाकून

आर्थिक नियोजन करता येणे शक्य आहे. शिवाय शिस्त, आशय व गुणवत्ता यादृष्टीने परिणामकारकरीत्या काम करावयास भाग पाडता येईल.

३.४०. आर्थिक पुरवठ्याच्या पद्धतीमध्ये स्थैर्य आणण्याची गरज नाकारता येत नाही. त्यात पण उच्च शिक्षणासाठी आज ज्या पद्धतीने मदत केली जाते तेही न्याय्य नाही हे कबूल केले पाहिजे. उच्च शिक्षणासाठी लागणारी साधने वाढवण्यासाठी फी वाढ, सामाजिक वर्गणी व विकासखात्याच्या देणग्या व मनुष्यबळाचा वापर यांचा गंभीर विचार करणे आवश्यक आहे. विकसन क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर कोट्यावधी रुपये दिल्यास कुशल कारागीर, इंजिनियर, रचनाकार व संशोधक अशा विविध प्रकारच्या मनुष्यबळाला रोजगार देण्याची ताकद निर्माण होईल. अशा प्रकारचे मनुष्यबळ अल्प पैसा असणाऱ्या तांत्रिक संस्थेला अथवा विश्वविद्यालयाला निर्माण करता येणार नाही. मनुष्यबळाच्या विकसासाठी काही टक्के खर्च हा प्रकल्पाच्या कागदोपत्री दाखवला पाहिजे व तो योग्य पद्धतीने वापरण्यासाठी शिक्षण क्षेत्राला दिला पाहिजे.

**तांत्रिक शिक्षण**

३.४१. तांत्रिक शिक्षणाने भारताच्या आर्थिक विकासामध्ये फारच मोठा वाटा उचललेला आहे. ज्या कार्यक्रमामुळे देशातील विविध प्रकारच्या निर्मितीमध्ये स्वातंत्र्य काळापासून फार मोठा बदल झाला आहे. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी भारतीय तांत्रिक संस्थांचा हात आहे. या संस्थांमधील काही पदवीधर परदेशात काम करीत असून जगातील महत्त्वाच्या तंत्रज्ञानाच्या कामात भाग घेत आहेत. हे निश्चित यश लक्षात घेऊनसुद्धा या पद्धतीमध्ये ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांच्याकडे तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे. प्राय: असे दिसून येते की, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री यांचा अभाव व आर्थिक उणीव यांमुळे नवीन तंत्रज्ञानामध्ये संशोधन व प्रशिक्षण करणे अशक्य आहे. औद्योगिक विभाग जागतिक स्पर्धेच्या वाढत्या दडपणाखाली आहे. केवळ अस्तित्त्व टिकविण्यासाठीसुद्धा त्यास खूप धडपड करावी लागत आहे. ही बदलाची प्रक्रिया गतिमान करता येईल व तिला आधार देता येईल. पण आवश्यक तेव्हा योग्य ती उपकरणे उपलब्ध करून दिली

पाहिजेत. अभ्यासक्रम सघन व समृद्ध करण्यासाठी उपाय केले पाहिजेत. तांत्रिक शिक्षणासाठी मनुष्यबळाचा वापर वाढवून योग्य साहित्य, पाठ्य-पुस्तके यांची निर्मिती केली पाहिजे. औद्योगिक उत्पादनात वाढ करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाइतकेच तंत्रज्ञही महत्त्वाचे आहेत. कारण तेच खऱ्या अर्थाने या क्रियेचे साधन होत. तांत्रिक शिक्षकाच्या प्रशिक्षणासाठी संस्था निर्माण करून आणि विविध समित्यांच्या शिफारसी मान्य करूनही तंत्रनिकेतनातील शिक्षणाची गुणवत्ता व उद्‌बोधन या गोष्टी काळजी वाटायला लावणाऱ्या आहेत.

३.४२. तंत्रशिक्षण–संस्थात चांगले शिक्षक आकर्षित करून घेणे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे व त्यामुळे समस्येची उकल करणे वर्षानुवर्षे कठीण होऊन बसले आहे. कुठल्याही वेळी पदविका अथवा पदवी देणाऱ्या तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मंजूर असलेल्या कर्मचारी वृंदातील २० ते ३० जागा रिकाम्या असतात. उत्तम विद्यार्थी तंत्रशिक्षण संस्थात शिकविण्यासाठी आकर्षित होत नाहीत कारण त्यात पगार व इतर सुविधा उद्योगधंद्यांच्या मानाने अत्यंत अल्प असतात. शिवाय काम करण्याची सहजताही अपेक्षेइतकी नसते. गुणवत्ता व किंमतीवर परिणाम करण्याच्या संदर्भात उद्योग व तंत्रज्ञान संस्था यांच्यामध्ये सामंजस्य हवे, पण त्यांच्यामध्ये आपुलकीचे सहकार्य निर्माण करण्याचे प्रयत्न अपुरेच आहेत. तंत्रज्ञान संस्थांनी हाती घेतलेल्या संशोधन कार्यासाठी केलेली औद्योगिक संस्थांची गुंतवणूक देखील नगण्यच आहे. यात देखील उभयता-मध्ये मिळून उपयोगी असणाऱ्या प्रकल्पात व्यक्तींची देवाण-घेवाण आणि समावेश क्वचितच दिसून येतो.

३.४३. भारताच्या संदर्भात तंत्रज्ञानाने ग्रामीण विभागाचा विकास घडविण्यासाठी फार मोठी कामगिरी केली पाहिजे. ग्रामीण विभागातील सामान्य माणसाच्या फायद्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून जितक्या ताकदीने हे काम करावयास हवे तितक्या शक्तीने ते करण्याची काळजी तंत्रज्ञान संस्थांनी फार मोठ्या प्रमाणावर केली नाही. अर्थात काही थोड्या संस्थांनी या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. सामान्य माणसांचे जीवन व या संस्थांमध्ये अधिक सुसंवाद निर्माण करणे जरूरीचे आहे.

३.४४. वेगवेगळ्या तंत्रज्ञान संस्थांच्या दर्जामध्ये देखील खूपच फरक आहे. उदाहरणार्थ आय. आय. टी. प्रादेशिक इंजिनिअरिंग कॉलेजेस आणि राज्य सरकारची अभियांत्रिकी महाविद्यालये. काही राज्यात तर सर्व अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन यांच्यावर जेवढा खर्च होतो तो एका आय. आय. टी. च्या खर्चाएवढासुद्धा असत नाही. अशीही एक समजूत आहे की. आय. आय. टी मधील पदवीधर हे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाच्या बाजारातच फार उपयोगी पडणारे असतात. त्याचा भारताच्या विकासाच्या गरजेच्या दृष्टीने फारसा उपयोग होत नाही. परिणामत: या प्रतिष्ठित संस्थेतून निर्माण होणारे तंत्रज्ञ विकसित देशांमध्ये नोकरी करण्यासाठी प्रयत्नशील असतात व त्यात ते यशस्वी पण होतात. त्यामुळे आय. आय. टी. मधील कुशल व गुणवान तंत्रज्ञ ब्रेनड्रेनच्या प्रक्रियेत भरच घालतात.

३.४५. मनुष्यबळाच्या नियोजनाची तांत्रिक शिक्षणाशी सांगड घालण्याची फार मोठी निकड आहे. कारण आज ही स्थिती अत्यंत वाईट आहे हे उघड आहे. तंत्रज्ञानात्मक धोरणाच्या मते भारतीय उद्योगांचे त्वरेने आधुनिकीकरण झाले पाहिजे. आधुनिकीकरणाच्या नियोजनाप्रमाणे नवीन औद्योगिक क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव दिसून येईल. तेव्हा मनुष्यबळाचा शोध घ्यावा लागेल आणि खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या सहकार्याने शिक्षण व प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करावी लागेल. गुणवत्ता विकासाच्या आणि शाखांच्या विकासाचे कार्यक्रम व शिवाय कृती-संशोधन यांची आज आहे त्यापेक्षा फार जोराने वाढ करणे अगत्याचे आहे. या क्षेत्रात देखील पैशाची फार मोठी गरज आवश्यक गरजा भागविण्यासाठी व संस्थांचे कार्य सुधारण्यासाठी लागेल. अशी सूचना करण्यात आली आहे की, जे तांत्रिक मनुष्यबळ वापरतील त्यांना त्या वापराबद्दल काही कर द्यावा लागेल. हा कर त्याच्या धंद्यातील फायद्यावर निर्धारित राहील व त्याचा उपयोग तांत्रिक शिक्षणाच्या भल्यासाठी केला जाईल. ह्या मनुष्यबळापैकी आय. आय. टी मधील मोठे मनुष्यबळ हे सुस्थापित उद्योगांमध्येच वापरले जाते. मग त्याला करदात्यांनी मदत करण्याची काय गरज आहे? या

खेरीज एवढा मोठा दरडोई खर्च ज्या शिक्षणासाठी होतो त्यासाठी इतकी कमी फी ठेवणे हे देखील हास्यापद वाटते या म्हणण्याचा देखील विचार करावयास हवा.

**व्यवस्थापन शिक्षण**

३.४६. व्यवस्थापकीय शिक्षण हा शिक्षणाचा आणखी अेक विभाग आहे व तो निर्मितीच्या क्षेत्रात फार महत्त्वाचा आहे. भारतीय व्यवस्थापनाच्या ४ मोठ्या संस्था सोडल्यास आणखी ४९ विश्वविद्यालयांमध्ये व्यवस्थापनाचे शिक्षण देण्याची सोय आहे. याशिवाय काही खाजगी संस्थांमधून एतद्विषयक छोटे अभ्यासक्रम देण्याची व्यवस्था आहे. शिवाय या संस्थांच्या अभ्यासक्रमाचा दर्जा आणि गुणवत्ता यात फरक आढळतोच. अशा प्रकारच्या मनुष्यबळाची वाढती मागणी लक्षात घेवून योग्य ती साधने व पैसा नसतानासुद्धा संस्था अस्तित्वात आल्या. पूर्वी अशा प्रकारच्या शिक्षणाचे महत्त्व खाजगी क्षेत्रातच आवश्यक मानले जाई; व ते सुद्धा काही विशिष्ट क्षेत्रातच. या संदर्भात तांत्रिक शिक्षणासाठी ज्याप्रमाणे फी वाढ व इतर सूचना झाल्या त्याचा विचार करून या शिक्षणासाठी होणारा खर्च भरून काढला पाहिजे.

३.४७. व्यवस्थापन-शिक्षणाची आज गरज आहे. शेती, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य व समाजकल्याण या सर्वच क्षेत्रात गरज आहे. त्यामुळे या क्षेत्रातील गरजांची पूर्ती करणाऱ्या नमुन्याचे व विकसनशील व्यवस्थापनाची अंगे निर्मितीचे निश्चित स्वरूप, तयार होईल. पण जोपर्यंत व्यवस्थापन शिक्षण संस्था ह्या संशोधन, कृती-संशोधन व त्याचे लेखन करून ठेवीत नाहीत तोपर्यंत त्याच्या गरजेची जाण होऊनही उपयोग नाही.

३.४८. व्यवस्थापन शिक्षण संस्था, महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन तशा प्रकारचे विभाग, सार्वजनिक उद्योग, शासकीय व खाजगी संस्था यांच्यामध्ये एकमेकांना बांधून ठेवणारी व्यवस्था दिसत नाही. सर्व देशभर या शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अशा प्रकारची बांधिलकी भक्कम करणे अवश्य आहे. व्यवस्थापन शिक्षणाच्या क्षेत्रात धडक कार्यक्रमाशिवाय आर्थिक विकासासाठी आवश्यक अशा सतत वाढणाऱ्या उत्पादनाची गरज भागणार नाही.

**शिक्षक व शिक्षक प्रशिक्षण**

३.४९. शिक्षणाच्या क्षेत्रात शिक्षकाच्या कृतीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. काहीही धोरण ठरलेले असो, शेवटी शिक्षक स्वतःच्या उदाहरणाने आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतून त्याचे प्रात्यक्षिक अंमलबजावणीचे व स्पष्टीकरणाचे विश्लेषण करीत असतो. वर्गांमधील अध्यापनामध्ये क्रान्ती घडवून आणणारी नवी तंत्रयोजना विकसीत करण्याच्या आपण मार्गावर आहोत. पण दुर्दैवाने शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रम-अद्यावतीकरणीचे काम अतिशय मंद चालू आहे. शिक्षक प्रशिक्षणातला बराच भाग आजच्या गरजांच्या दृष्टीनेसुद्धा असंबद्ध आहे. मग भविष्याची गोष्ट सोडाच. शिक्षकांच्या निवडीची कार्यपद्धती आणि भरतीची पद्धत ही संख्या व गुणवत्ता यांच्याशी निगडित नाही. शिक्षकांकडून खूप अपेक्षा आहेत पण नोकरीच्या बाजारात त्या पेशाला शेवटचे स्थान आहे. आपण चांगली पुस्तके व संशोधन यावर भर देतो. शिक्षक मात्र वाढत्या प्रमाणात उदासीन आहेत हा विरोधाभासच आहे.

३.५०. शिक्षकावर वरील दोषारोपणाचा विचार करताना हे ही लक्षात ठेवायला हवे की, आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये जी गुणवत्ता आहे ती निश्चितपणे काही ध्येयनिष्ठ शिक्षकांच्यामुळेच निर्माण झालेली आहे. ह्या व्यवसायात असणारी दुःखे व दारिद्रचे यांचा विचार न करता त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी स्वतःला संपूर्ण वाहून घेऊन, श्रमपूर्वक नवनवीन गोष्टी आत्मसात केल्या व आपली अध्यापनशक्ती वाढवली आणि आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

३.५१. शिक्षकाची निवड, काम, प्रतिष्ठा, गुणवत्ता आणि प्रशिक्षण यासंबंधीचा संपूर्ण सखोल अभ्यास भारत सरकारने नेमलेल्या दोन शिक्षक-आयोगांनी केला आहे. म्हणून आता असा विचार आहे की, शिक्षकाच्या कामाचा शिक्षणाच्या एकंदर कार्यपद्धतीवर ज्याचा प्रत्यक्ष परिणाम होतो त्याचीच पूर्तता करावयाची.

३.५२. शिक्षकासकट अनेकांना असे वाटते की, शिक्षकांची निवड ही गुणवत्तेवर होत नाही. त्यामुळे ज्या लोकांजवळ शिकविण्याची जन्मजात क्षमता नाही किंवा त्याविषयी आवडही नाही असे लोक या व्यवसायात उतरतात. प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये ज्यावेळी विद्यार्थ्यांना

प्रवेश दिला जातो. त्यावेळी त्यांच्या ह्या व्यवसायासंबंधीच्या योग्या-योग्यतेची नीट छाननी केली जात नाही म्हणून वरील गोष्ट घडते. शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणाचे देखील योग्य नियोजन नसते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जे ज्ञान द्यावयाचे त्याविषयीची स्पष्टता, शुद्धता, लेखन व बोलण्याची कौशल्ये व याशिवाय चौकस बुद्धी, नेतृत्त्व, वैज्ञानिक दृष्टी अशा अनेक गोष्टींची वाढ करण्याची सोय नसते. विचारांची देवाण-घेवाण करण्याच्या कौशल्याची शिक्षकाच्या कामात फार मोठी गरज असते, पण त्याचाही नीट विकास होत नाही. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये आधुनिक शैक्षणिक साधने व दृकश्रवण साधने यांचा उपयोग करण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याचा पण विकास केला जात नाही. राष्ट्रीय, एकात्मता, सांस्कृतिक ऐक्य, मानवता मूल्यांचा विकास या गोष्टींसाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन असण्यावर सातत्याने जोर देऊन ही शिक्षक–प्रशिक्षण संस्था ह्या कल्पना शिक्षक प्रशिक्षकांना नीट समजावून देत नाहीत. अशा परिस्थितीत शिक्षक जर आपल्या ह्या कार्यात अपयशी ठरले तर आश्चर्य वाटावयास नको.

३.५३. भरमसाठ गतीने ज्ञान वाढणाऱ्या व तंत्रज्ञान व व्यवस्थापन असणाऱ्या जगात शिक्षक मात्र मोठ्या प्रमाणावर त्यापासून दूर असतो. त्याशिवाय नवीन समाजाची घडण करणाऱ्या बुद्धीवादी व इतर शक्तीं-पसूनही त्याला दूरच राहावे लागते. त्याच्याजवळ परिणामकारक शिक्षणासाठी आधुनिक तांत्रिक साधनांचा वापर करण्याइतके आर्थिक साधनही नाही. हेच शिक्षक जर आडवळणी ठिकाणी असलेल्या शाळा अथवा महाविद्यालयांमध्ये काम करीत असतील तर त्यांचा जगाशी संबंध राहात नाही व त्याच्या आधारस्तंभाशी विचारविनिमय पण करता येत नाही. पुष्कळ शिक्षकांना उन्हाळी वर्गांना किंवा उद्‌बोधन वर्गांना जावयास मिळतच नाही आणि ज्या थोड्यांना जावयास मिळते त्यांना असे जाणवते की ते ज्या एकतर्फी पद्धतीने काम करीत होते त्यापेक्षा कोणतीही वेगळी पद्धती या वर्गात त्यांचेसाठी वापरली जात नाही.

३.५४. शिक्षकाने राजकारणात भाग घेणे हा एक मुद्दाही दुर्लक्ष करण्याजोगा नाही. गल्या काही वर्षात हे प्रमाण इतके वाढले आहे का

शिक्षकांच्या संघटना ह्या राजकारणीच झाल्या आहेत. ह्याचा परिणाम शिक्षकाच्या मान्यवर पेशावर किती झाला आहे याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. विश्वविद्यालये व महाविद्यालये यांची गुणवत्तेवर आधारित बढती करण्याची पद्धत ही सेवाकालावर अवलंबून का ठेवता येत नाही? तथापि अशा योजनांच्या अंमलबजावणीच्या पद्धतीमुळे सेवाकालाच्या दीर्घतेवर आधारित बढती व्हावी अशा अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. मात्र एक मोठा वर्ग अशा प्रकारच्या घडामोडींमुळे काय परिणाम होतील याचा विचार करणारा आहे. शैक्षणिक क्षमतेपेक्षा वयावरच व्यावसायिक क्षमता ठरविली गेली तर स्वयंअध्ययन, प्रायोगिकता, संशोधन आणि योग्यता याविषयी काहीच उत्तेजन राहणार नाही आणि नाही म्हटले तरी विश्वविद्यालयीन शिक्षणात तत्वतः तरी ही गोष्ट अपरिहार्य आहे.

**काही सर्वसाधारण प्रश्न**

३.५५. या टीकात्मक परीक्षणाचा समारोप करण्यापूर्वी ज्या विशिष्ट शैक्षणिक समस्या व पैलूंचा संपूर्ण कार्यपद्धतीवर परिणाम होतो त्यांचा उल्लेख करणे जरूरीचे वाटते. या संदर्भात देशातील विविध सामाजिक व आर्थिक गटांना होणारा शिक्षणाचा लाभ व त्याच्या गुणवत्तेतील असमानता यांचेकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. या असमानतांचा व्यापक परिणाम म्हणजे शिक्षणामुळे निर्माण होणारा दृष्टीकोन, स्वत्त्वाची जाणिव आणि लोकांची सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील प्रगती यावर दिसून येतो.

३.५६. लोकसंख्येचा तीन चतुर्थांश भाग ग्रामीण जनतेचा असला तरी शैक्षणिक सुविधांचा वाटा त्यांना अत्यंत अल्प प्रमाणात मिळतो. तथापि ग्रामीण भागाला अधिक वाटा देण्याचा अलिकडे लक्षात घेण्या-इतपत कल दिसून येत आहे. सन १९५०–५१ मध्ये ग्रामीण भागावर फक्त रु. ३८.३ कोटी तर शहरी भागावर रु. ७१.६ कोटी खर्च झाला म्हणजे ग्रामीण व शहरी भागाचे प्रमाण ०.५३ असे होते. सन १९७०–७१ मध्ये ग्रामीण भागावर रु. ४९४.६ कोटी तर शहरी भागावर रु. ६२३.७ कोटी असा खर्च झाला म्हणजे हे प्रमाण ०.७९ झाले. तरीसुद्धा विशेष तपशीलवार पृथ्थकरण न करताही ग्रामीण लोकसंख्येचा प्रचंड विस्तार लक्षात घेता, शहरी-ग्रामीण समाजातील

तफावत स्पष्ट दिसून येते. शहरी भागातील शाळा व महाविद्यालयाच्या इमारतींची गुणवत्ता व स्थिती ही ग्रामीण भागातल्यांपेक्षा अधिक चांगली आहे असे दिसून येते. एकशिक्षकी शाळांच्या कच्च्या इमारतींची संख्या, फळे, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे यांचा अभाव असलेल्या संस्थांची संख्या शहरांपेक्षा ग्राणीण भागातच मोठ्या प्रमाणावर दिसून येते. वस्तुत: सर्वसाधारणपणे शहरी भागातल्या शाळांतून बऱ्यापैकी वाचनालये, प्रयोगशाळा शिक्षक, कामावर नसण्याचे प्रसंग अत्यंत कमी असणे या गोष्टी आढळून येतात. अशा प्रकारच्या तफावती आणि व्यवसाय विषयक व जीवन पद्धतीतील फरक यामुळे शाळा सोडून देणाऱ्या मुलांचे प्रमाणही ग्रामीण भागातल्यापेक्षा शहरी भागात फार कमी असते. शिक्षण संस्थांशी घनिष्ठ संबंध ठेवून त्यांचा चांगला लाभ घेण्यातही शहरी भाग आघाडीवर असतो.

३.५७. शहरी-ग्रामीण भागात तफावत वाढविण्यास दुसरा एक घटक म्हणजे खाजगी संस्थांनी चालविलेल्या ‘उच्च दर्जाच्या’ शिक्षण संस्था. या बव्हंशी शहरातच असून इंजिनियरिंग, वैद्यकीय व व्यवस्थापन शाखांसारख्या प्रतिष्ठित विद्याशाखात बिगरराखीव जागांत सिंहाचा वाटा घेण्यात पुढे येण्यासाठी विद्यार्थ्यांची जोरदार तयारी करून घेतात व त्यांना स्पर्धात्मक परिस्थितीचा सराव देऊन यश मिळवून देतात. अतिशय परिश्रम घेऊनसुद्धा वरच्या वर्गासाठी प्रवेश किंवा नोकरी लागण्यासाठी होणाऱ्या चाचण्यात शहरी संस्कृती वरचढच असणार असा अपसमज सततच्या प्रयत्नांनी व संशोधन करून नवनवीन पद्धती वापरून तो दूर करणे हे समानतेच्या दृष्टीने आवश्यक आहे.

३.५८. अलीकडच्या अनेक वर्षात खूप विचारपूर्वक उपाययोजना करून व जाणीवपूर्वक गती देऊनही शिक्षण क्षेत्रात मुलींचा सहभाग हा मुलांपेक्षा बराच कमी आहे असे स्वच्छपणे दिसून येते. ही तफावत शैक्षणिक सवलतींच्या अभावी नसून मोठ्या प्रमाणावर समाजातील सांस्कृतिक अपसमज, व्यावसायिक समस्या व आर्थिक असमानता यांचा परिणाम आहे. बहुसंख्य पालक मुलामुलींसाठी एकत्र असलेल्या शाळांत किंवा ज्या शाळात स्त्री शिक्षिका नाहीत त्या शाळांत आपल्या मुलींना पाठविण्यास तयार नसतात. मुलांपेक्षा मुलींची शैक्षणिक प्रगती

तौलनिकदृष्ट्या चांगली असूनही वैद्यकीय नर्सिंग किंवा शिक्षकीपेशा वगळता इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यास मुली पुढे येत नाहीत.

३.५९. वर्गीकृत जाती व वर्गीकृत जमातीमधील मुलांचा विचार करता ईशान्येकडील राज्ये वगळता इतरत्र वर्गीकृत जमातीतील मुले वर्गीकृत जातींतील मुलांइतकी पुढे आलेली नाहीत. १९७७ ते ८३ या पाच वर्षात अर्थात दोन्ही मागासवर्गातील मुले बरीच पुढारलेली आहेत असे दिसले तरी त्यातही मुलींचे प्रमाण बरेच कमी आहे. तोच प्रकार ही दरी शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात मोठी दिसून येण्यात झाला आहे.

३.६०. या ठिकाणी चर्चेला घेण्याजोगा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वर्गीकृत जाती व वर्गीकृत जमातीतील मुलांना केवळ राखीव जागांची तरतूद करूनही त्यांची असमर्थता दूर करू शकणार नाही तर त्यासाठी खास विशिष्ट शैक्षणिक परिश्रम घेणे आवश्यक आहे. वास्तविक अशा परिश्रमाच्या अभावी व्यावसायिक कोर्सेस व नोकऱ्या यात राखीव जागा देऊनही अपेक्षित परिणाम दिसून येण्यात अपयश येत आहे. मागास वर्गीयांपैकी बहुसंख्य विद्यार्थी हे शिक्षण क्षेत्रात पहिली पिढी म्हणूनच येत आहेत. त्यामुळे त्यांना बालवयात योग्य पोषण मिळालेले नाही. सामाजिक तुटकपणाची जाणीव त्यांना आहे, कामाच्या योग्य सवयी त्यांना नाहीत आणि अभ्यास विषयक सुप्त गुण आपल्या अंगी आहेत असा आत्मविश्वास त्यांचे ठिकाणी नाही. हे घटक इतरांच्या तुलनेत त्यांना उच्च शिक्षण क्षेत्रात व व्यवसायात समायोजन करून घेण्यात त्यांच्या विरोधात जातात. ही परिस्थिती त्यांचेवर मानसिक ताण व तणाव निर्माण करते, जी इतरांना जाणवत नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांत क्षमता वाढविण्यासाठी ज्यावेळी कार्यक्रम आखले जातात, त्याचवेळी तरुण पिढी एकमेकांशी समरस व्हावी अशी पार्श्वभूमी तयार करण्यात आली पाहिजे.

३.६१. सामाजिक व लैंगिक असमतोलाचा विचार करीत असताना शिक्षण क्षेत्रात दिसून येणाऱ्या इतरही तफावतींचा विचार करणे आवश्यक आहे. वस्तुनिष्ठ निकषांच्या पायावर आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, जम्मू-काश्मीर, मध्य प्रदेश, ओरीसा, राजस्थान,

उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही शैक्षणिकदृष्ट्या मागासलेली घटक राज्ये समजली जातात. विशेष लक्षणीय बाब म्हणजे १९८१–८२ मध्ये जम्मू-काश्मीर वगळता इतर घटक राज्ये ही शिक्षणावर राष्ट्रीय सरासरीपेक्षा दरडोई कमी खर्च करीत होती, परिणामत: इतर घटक राज्यांच्या तुलनेत ती दर लाख लोकसंख्येत शैक्षणिक प्रवेशाचे बाबतीत मागे रेंगाळत राहीली. यावरून शैक्षणिक मागासलेपणा हा शिक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणावरही अवलंबून आहे असे दिसून येते. तसेच हाच विचार दुसऱ्या प्रकारे मांडायचा तर सर्वसाधारणपणे घटक राज्याच्या आर्थिक क्षमतेवर व विशेषत: दरडोई उत्पन्नावर शिक्षणाची प्रगती निगडीत असते.

३.६२. मानवी सुप्त गुणांचा विकास हे शिक्षणाचे मूलभूत उद्दिष्ट आहे असे जेव्हा मान्य केले जाते तेव्हा त्याचा नोकरी किंवा कामधंदा मिळण्याच्या संबंधावर अधिक भर देणे योग्य नसते. दुर्दैवाने अशी परंपरागत वृत्ती होत गेली की शिक्षणाचा कौशल्याशी संबंध तुटला आणि शिक्षण हे लब्धप्रतिष्ठितांना 'साहित्यीक' बनविणारे व त्यासाठी ज्ञान देणारे साधन तर 'सामान्य' कामकरी वर्गाला मात्र कौशल्य शिकविण्याचे साधन अशी दरी निर्माण होत गेली. ही कालविसंगत वृत्ती दूर करण्याचे प्रयत्न बऱ्याच प्रमाणात यशस्वी होत आहेत. तरीसुद्धा वाङ्मय क्षेत्रात पदवी घेणारेच बहुसंख्य आहेत ही वस्तुस्थिती आहे. व्यवसाय, बाजार व शैक्षणिक प्राविण्य यात परस्पर पूरकता नाही याला जी कारणे आहेत त्यापैकी एक महत्त्वाचे कारण असे की संघटित श्रम (व्यवसाय) बाजार हा एकूण श्रमिकांच्या फक्त १० टक्के श्रमिकांपुरताच मर्यादित आहे. (प्रभावशाली आहे). बाकीच्या श्रमिकांसाठी त्यांच्या व्यावसायिक भूमिका व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन शैक्षणिक कार्यक्रमच आखले जात नाहीत.

३.६३. पुढील बाबींवर सध्या रंगविलेल्या चित्राचे वर्णन थोडक्यात करता येईल.

(अ) सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या एकूण श्रमिकांपैकी ५० टक्के श्रमिकांना त्याना व्यवसायासाठी आवश्यक असे ज्ञान/कौशल्ये

आवश्यक असे शिक्षण/प्रशिक्षण देऊन पुरविण्यात आलेले नाही. (त्याचा [illegible] वंचित आहेत)

(ब) ज्या व्यवसायात सर्वसामान्य शिक्षण हवे आहे. त्या व्यवसायातील ९४ टक्के श्रमिकांना औपचारिक शिक्षण मिळाले नाही.

(क) व्यवसाय आणि तंत्रज्ञान या बाबींमध्ये रोजगारांची झपाट्याने वाढ होत आहे. प्रामुख्याने ही वाढ नोकऱ्या या स्वरुपात आहे.

(ड) सामान्य विषयांमधील पदवीमधरांमध्ये माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण तसेच तांत्रिक व व्यावसायिक पदवीधर यांचेशी तुलना करता रोजगारी झपाट्याने कमी होत आहे.

(ई) दुसऱ्या बाजूस उच्च पदव्या प्राप्त केल्या तरी चांगल्या प्रतीचा रोजगार उपलब्ध होत नाही असा समज आहे तो चुकीचा आहे.

(फ) राष्ट्रीय व प्रादेशिक नोकरीच्या बाजारात निरनिराळ्या महाविद्यालयातून विश्वविद्यालयातून जे शेकडो विद्यार्थी प्रयत्न करतात त्यांच्या प्रतवारीच्या पद्धतीवर विश्वास उरलेला नाही. याशिवाय विश्वविद्यालयाकडून होणारी प्रतवारी यामुळे सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामध्ये शिक्षण तशी नोकरी ही गोष्ट झाकून ठेवल्यासारखी आणि १ ते ७ आणि ८ किंवा ९ ते १० किंवा ११ ते १२ ह्या शिक्षणाच्या अवस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे प्राविण्य वाढविण्याची कोणतीही पद्धती नाही ज्यामुळे त्यांना शेती अगर इतर ग्रामीण उद्योगधंद्यात नोकरी मिळू शकेल.

३.६४. आपल्या देशाच्या शैक्षणिक नियोजनामध्ये काम करणाऱ्या तीन महत्त्वाच्या संस्था आहेत. राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैशिक नियोजन और व्यवस्थापन संस्था आणि विश्वविद्यालय अनुदान आयोग ह्या त्या संस्था होत. पूर्वीच्या विधानामध्ये काही विश्वसनीयता असेलच तर या तिन्हीही संस्थांनी अपेक्षित प्रतिसाद मिळविण्यासाठी काही केले नाही हे अपरिहार्यपणे म्हणावे लागते. या संस्थांचे शिक्षणाची गुणवत्ता उद्दिष्टांच्या प्राधान्याचा विकास

संख्यात्मक व गुणात्मक मनुष्यबळाची निर्मिती आणि राष्ट्रीय उत्पादन व विकासाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जे प्रयत्न केले त्यांना यश मिळाले नाही कारण नियोजनाचे उगमस्थान पूर्णतया राज्यसरकारांच्या हातात आहे.

३.६५. शिक्षणाकरिता लागणाऱ्या साधनांच्या संपूर्ण आराखड्याची चर्चा जरी पुढील प्रकरणात केली असली तरी सुद्धा असे दिसते की, शैक्षणिक नियोजनाचे कडक धोरण सुरू केल्यास संबंधित आर्थिक मागणीसाठी व त्यांच्या स्वार्थापायी संघर्षाची स्थिती निर्माण करतील.

३.६६. व्याख्येप्रमाणे शैक्षणिक नियोजन हे चालू राहण्याची प्रक्रिया व उद्दिष्टांचे परीक्षण करून सुरू करावयास हवे. पण असे दिसून येते की, वाढते केन्द्रीकरण, नोकरशाही, शिस्तीच्या दर्जाचा कार्यक्रमाच्या पातळ्या यांच्या अभावापोटी परिस्थिती गंभीर झाली आहे.

३.६७. शैक्षणिक प्रगतीचा उगम योग्य पद्धतीने व्हावयाचा असल्यास त्याच्या करिता लागणारा पैसा फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असला पाहिजे व तो इतर वीज, पाणी, शेती, दळणवळणाची साधने या क्षेत्रात त्यांचे प्रकल्प व इतर गोष्टी चालू ठेवण्यास पैशाची तरतूद केल्यानंतर उरलेल्या पैशापेक्षा अधिक तरतूद शिक्षणासाठी हवी. शिवाय लोकसंख्येचे वाढते प्रमाण लक्षात घेऊनही ज्या देशात आधुनिकीकरण व स्वयंचलित उत्पादन करण्याची गरज आहे तेथे शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी अशा रीतीने बदलली पाहिजे की, त्यामुळे न्याय्य वाटपाची सोय करणारी केन्द्रे उघडणे व आर्थिक वाढ मिळविणे शक्य होईल. अशी उत्तम केन्द्रे स्थापन करून त्यांचे विकसन करून विविध प्रकारच्या रोजगारीसाठी लागणारे शिक्षणही अपरिहार्य गरज आहे. या पद्धतीत नोकरी देणाऱ्या क्षेत्राचे अनन्यसाधारण स्थान राहील.

३.६८. शिक्षणाने कामगारांच्यामध्ये उत्पादनक्षमता सुधारून व त्यांची कामाची निष्ठा वाढवून उत्पादन वाढवण्यासाठी लागणाऱ्या रोजगारीमध्ये काही फरक होऊ शकेल. साधनांची आत्यंतिक कमतरता असताना अगदी थोड्याच अवधीच्या सूचनेत प्रकल्प व कार्यक्रम यांच्याकडे झुकते माप टाकतात. आपला देश आता शैक्षणिक नियोजनाच्या

अशा प्रयोगाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे कारण पर्यावरण निसर्ग यांच्यामध्ये क्रांतीकारक बदल होत असून देशात व देशाबाहेर तत् संबंधीची आव्हाने निर्माण झाली आहेत

३.६९. बदललेल्या संदर्भात शिक्षणासाठी खूपच पैसा व साधने द्यावी लागतील व सध्याची जी धरमोडीची अवस्था आहे ती काढून टाकून एक नवीन पद्धत करण्याची सोय करावी लागेल. यासाठी नियोजनाचे कार्य राज्य सरकार व मध्यवर्ती शासन यांच्यामध्ये अशा पद्धतीने कार्यान्वित करावयास हवे की, त्यामुळे मूलभूत कार्य करण्यास राज्याला आणि वाहयता जबाबदारी स्वीकारण्याचे कार्य करण्याला मध्यवर्ती शासनाला वाव मिळेल. शिक्षणाची उद्दिष्टे व प्रक्रिया याविषयी निर्णय घेण्याची व अंमलबजावणी करण्याची यंत्रणा दोघांनाही पटणारी असली पाहिजे. ही गोष्ट मान्य केली पाहिजे की, काही महाविद्यालये नवीन सुरू करणे किंवा थोडी विश्वविद्यालये स्थापन करणे, परीक्षा वेळेवर घेणे या गोष्टी करण्यापेक्षा चांगल्या शिक्षणावर जास्त भर दिला पाहिजे.

३.७०. शिक्षणाच्या साधनांच्या विषयीचा प्रश्न या प्रकरणात अनेक वेळा आलेला आहे. त्याचे मुख्य कारण असे की, संख्यात्मक किंवा गुणात्मक विकासाचा विचार हा साधनांच्या पुरवठ्याविना करताच येत नाही. वस्तुतः शिक्षणाच्या संख्यात्मक विस्तारापेक्षा गुणात्मक बदलासाठी अधिक साधनांचा वापर व्हावयास हवा. अशाप्रकारे नवीन व अस्तित्वात असलेल्या संस्थांच्यामध्ये गुणवत्तेचे उर्ध्वीकरण करण्याची गरज आहे.

३.७१. प्राथमिक शिक्षणाचे उदाहरण घेतल्यास असे दिसून येईल की ९५ टक्के खर्च हा शिक्षकांचा पगार व व्यवस्थापन यावर होतो व त्यामुळे फारच थोडा पैसा, कार्यानुभव, सहली, छंद यासारख्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी राहतो. या परिस्थितीत उत्तम प्रशिक्षण मिळालेल्या व स्फूर्ती असलेल्या शिक्षकाला देखील पाठ्यपुस्तकाच्या आधारे ठोस शिक्षण आजच्या शाळांमधून द्यावे लागते.

३.७२. शैक्षणिक साधनसंपत्तीच्या बाबतीत मोठी वाढ झाली आहे हे म्हणणे तितकेसे विश्वसनीय नाही. १९५०–५१ साली रु. ११४ कोटी होणाऱ्या खर्चापासून तो खर्च १९७६–७७ साली २३०४.१६

कोटीपर्यन्त वाढलेला दिसेल. ह्या आकडयांना गुणवत्तेच्या संदर्भात तपासल्यास काही महत्त्व राहात नाही. विद्यार्थ्यांच्या संदर्भात किमतवाढ आणि वाढीव खर्च यांच्यामध्येही वाढीव किमतीमुळे खर्च कमी आहे. १९५०–५१ ते ७५–७६ सालात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या दरडोई साधनसंपत्तीचेमध्ये ४१.९ रुपयांपासून ५५.२ रुपयांइतकाच फरक नोंदविलेला आहे. म्हणजे दरवर्षी १.१ एवढाच दर वाढला आहे. याच कालावधीत महाविद्यालयातील दरडोई विद्यार्थ्यांच्या खर्चाचे प्रमाण ४६८.९ रुपयांपासून ते ३३०.९ पर्यन्त इतके घसरले. व्यावसायिक शिक्षणात तर ते १६४०.४ रुपयापासून ८९०.१ पर्यन्त घसरले.

३.७३. या योजनेखाली दाखवलेला खर्च हा फक्त आहे ती शिक्षणाची पद्धती कायम राखण्याच्या पुरताच मर्यादित असतो. या प्रमाणाचा शिक्षणाच्या विकास व विस्ताराच्या संदर्भात उपयोग नाही हे योजनांच्या आराखडयात प्रतिबिंबित होते. मध्यवर्ती शासन व राज्य-सरकार यांचा शिक्षणासाठी होणारा खर्च संपूर्ण नियोजनाच्या प्रमाणात ज्या टक्केवारीने होतो त्यातून असे दिसून येते की, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेशिवाय दरवेळी ही टक्केवारी कमीचे झाली आहे. पहिल्या योजनेत ७.२% असलेला खर्च आता सहाव्या योजनेत २.६% पर्यंत आला.

३.७४. घटनेच्या तरतुदीप्रमाणे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्री-करणाच्या बाबतीत शिक्षणक्षेत्रामध्ये खर्चासाठी नियोजनाचा जो भाग द्यावयाचा त्यात घसरण व्हावयाला नको होती. प्रत्यक्षात मात्र तशी गोष्ट घडली आहे. ५६% भागातून दुसऱ्या योजनेत ३५% तिसऱ्या योजनेत ३४% चौथ्या योजनेत ३०% पर्यंत घसरण झाली आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ही पातळी ३२% पासून वाढत सहाव्या योजनेमध्ये ३६% पर्यंत गेली तरीसुद्धा ती पहिल्या पंचवार्षिक योजने-पेक्षा २०% नी कमीच आहे. मात्र विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी खर्चाचे प्रमाण ९% वरून १६% पर्यंत वाढले आहे.

३.७५. शिक्षणावरील झालेल्या एकूण खर्चापैकी या शतकाच्या सुरुवातीला जवळ जवळ २५ टक्के खर्च हा खाजगी व कायम स्वरूपाच्या देणग्यामधून भागविला जात होता. १९५०–५१ मध्ये हा आकडा ११.६ टक्के पर्यंत खाली आला तर १९८०–८१ मध्ये तो ३ टक्के पर्यंत

घसरला. खाजगी साधनाचा वापर शैक्षणिक प्रगतीसाठी परत खेचून आणण्यापूर्वी ही भयानक घसरगुंडी का झाली, तिची करणे कोणती हे तपासणे आवश्यक आहे.

३.७६. शिक्षण देणे ही आतापर्यंत राज्य सरकारची जबाबदारी मानली जाते. खर्चाच्या ७० टक्के रक्कम राज्य सरकार पुरविते. म्हणजेच शैक्षणिक सुविधा या सर्व देशाच्या गरजेवर अवलंबून असतात असे नव्हे तर त्यांनी प्रगतीमध्ये केलेल्या परिवर्तनावर अवलंबून असतात. परिणामी बिहार, उत्तरप्रदेश, ओरिसा, मध्यप्रदेश, आसाम आणि राजस्थान येथील मुलांची तुलना पंजाब, केरळ, तामिळनाडू व महाराष्ट्र येथील मुलांशी करता त्यांचे बरेच नुकसान झाल्याचे आढळून येते. १९८२–८३ च्या प्रत्येक राज्याच्या शैक्षणिक अंदाजपत्रकातील. आकडयां-वरून असे सिद्ध करता येईल की, शिक्षणावरील दरडोई खर्च ४०.५ उत्तर प्रदेश, ४०.४ मध्यप्रदेश आणि ५१.१ बिहार मध्ये झालेला आहे. तर त्याच वर्षी ११९.५ केरळ, १०० पंजाब व भारताचा सरासरी खर्च ६८.२ एवढा झाला आहे. राष्ट्रीय कल्याण व विकास या दृष्टीने शिक्षणावर जी मूलभूत जबाबदारी टाकलेली आहे तिचा विचार करता मध्यवर्ती सरकारवर गृहित असलेल्या जबाबदारींपैकी राज्यांवर किती जबाबदारी ठेवावयाची, ती कोठपर्यंत वाढवावयाची, अग्रक्रमांक कोणत्या कार्यक्रमाला द्यावयाचा, व प्रत्येक राज्याच्या मागण्यांप्रमाणे किती हिस्सा द्यावयाचा हे निश्चित करणे आवश्यक आहे. प्रगतीच्या सुविधांच्या संदर्भात पुन: पुन्हा कोणती प्रक्रिया चालू ठेवणे आवश्यक आहे हे गुणा-त्मक, संख्यात्मक तात्कालिक शैक्षणिक उद्दिष्टे पडताळून पाहणे आवश्यक आहे. नाहीतर याचा परिणाम ध्येयापासून परावृत्त होणे, विस्कळितपणा; बेजबाबदारी, भांडखोरवृत्ती वाढण्यात होईल.

□ □ □

प्रकरण ४ थे

# शैक्षणिक पुनर्रचनाविषयक दृष्टिकोन

४.१. नवीन शैक्षणिक धोरण ठरविण्याची आवश्यकता का निर्माण झाली यासंबंधीचे विवेचन मागील प्रकरणांत केलेले आहे. अंतर्गत व बाह्य घटकांमुळे कालबाह्य संकल्पना व आकृतिबंध बदलून नवीन गरजा व त्यानुसार नवीन संस्थांची स्थापना आवश्यक आहे. त्यामुळे समाजाला नवचैतन्य प्राप्त होऊन तो अधिक जोमाने नवीन तंत्रज्ञानाने निर्माण केलेली आव्हाने समर्थपणे पेलू शकेल. उत्पादन, संवहन व संघटन यांच्या नवीन पद्धतीही तो आत्मसात करू शकतो.

४.२. शिक्षण पद्धतीची रचना संमिश्र असते. त्या पद्धतीत विविध घटक संस्था व व्यवस्थापन यांचा सहभाग असतो. शिक्षण प्रक्रियेत भविष्य काळातील गरजांचा विचार केलेला असतो. केंद्र शासनाने १९६८ साली निश्चित केलेल्या धोरणाने एक पिढी घडविली. त्याचप्रमाणे आज ठरविलेल्या धोरणाचा परिणाम पुढच्या पिढीवर होणार आहे. त्यामुळे शिक्षणाशी संबंधित असलेल्या व शिक्षणात रस असलेल्या सर्वांना शैक्षणिक उद्दिष्टे, शैक्षणिक तंत्रे व कार्यवाहीची पद्धती यासह नवीन शैक्षणिक धोरण आखताना सहभागी करून घ्यावे लागेल. शैक्षणिक पुनर्रचनेशी संबंधित सर्व घटकांवर राष्ट्रीय पातळीवर खुली चर्चा होऊन सर्वसंमत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखले जाऊ शकेल. शैक्षणिक धोरणाचा समाजावर दीर्घकालीन परिणाम होणार असल्याने नवीन संकल्पनांमध्ये सुस्पष्टता, अंतर्गत सुसंगती, आर्थिक भार, पुनरावृत्ती व उपयोजितता असणे आवश्यक आहे.

४.३. नवीन शैक्षणिक धोरण आखताना एकच संस्था सर्व समस्यांचा व त्यावरील उपायांचा विचार करू शकणार नाही. म्हणून या धोरण-विषयक निवेदनाचा राष्ट्रीय पातळीवर चर्चा घडविण्यासाठी उपयोग होऊ शकेल. या चर्चेत सहभागी होणारे शिक्षणातील अनेक त्रुटी निदर्शनास आणू शकतील.

४.४. शैक्षणिक धोरणात सर्वप्रथम उद्दिष्टे नोंदवावी लागतील. त्या संदर्भात मागील कार्याचा समीक्षणात्मक आढावा घेऊन सद्यस्थितीला कारणीभूत घटकांचा विचार करावा लागेल. तसेच धोरणासंबंधात वास्तववादी निर्णय घेण्यासाठी सोयी सवलती व मर्यादा लक्षात घ्याव्या लागतील.

४.५. शिक्षणाचा विकास व समान संधी याबाबत सद्यस्थितीचा संख्यात्मक व गुणात्मक आढावा मागील प्रकरणात घेण्यात आला आहे. तेव्हा शैक्षणिक उद्दिष्टे व ती साध्य करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सोयी–सवलती व मर्यादा यांचा विचार करणे उचित होईल.

**शैक्षणिक नियोजनासाठी उद्दिष्टांची पुनर्रचना**

४.६. घटनेने दिलेली व विचारवंत, नियोजनकार व धोरण निश्चित करणारे यांनी वेळोवेळी प्रतिपादिलेली शैक्षणिक उद्दिष्टे यावरून हा मूलभूत प्रश्न तिहेरी दृष्टिकोनातून विचारात घेतला पाहिजे असे दिसते.

४.७. शिक्षणाला स्वतःची एक भूमिका आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण हा त्या भूमिकेचा एक अंश होय. मानवी आकलनाच्या कक्षेतील सर्व ज्ञान शिक्षण पद्धतीतून मिळाले पाहिजे. समाजाच्या लाभाकरिता ज्ञानाची तत्त्वे, पद्धती व दिशा निश्चित झाली पाहिजे. विकासाच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य त्यातून मिळाले पाहिजे.

भौतिक व सामाजिक पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांच्या अंगी समज व दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे. म्हणून संशोधन विकास व विस्तार ही शैक्षणिक प्रक्रियेची आवश्यक अंगे बनली पाहिजेत.

४.८. शिक्षण प्रक्रियेने सामाजिक आर्थिक-कल्याण, क्षमता व सृजनशीलता यांचा विद्यार्थ्यांत विकास झाला पाहिजे. या विकासात खालील बाबींचा समावेश होतो.

(१) व्यक्तीचा शारीरिक, बौद्धिक व सौंदर्यदृष्ट्यात्मक विकास.

(२) वैज्ञानिक दृष्टी, लोकशाही, नैतिक व आध्यत्मिक मूल्ये यांचा विकास.

(३) आत्मविश्वास, नवोपक्रमशीलता व अपरिचित परिस्थितीशी समायोजन क्षमता यांचा विकास.

(४) भौतिक, सामाजिक, तंत्रज्ञानात्मक, आर्थिक व सांस्कृतिक पर्यावरणाविषयी जाणीव जागृती.

(५) श्रमप्रतिष्ठा व कठोर परिश्रम याविषयी सुयोग्य दृष्टीकोनाची निर्मिती.

(६) धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्याय या तत्त्वांशी बांधिलकी.

(७) राष्ट्रीय एकात्मता, सन्मान व विकास यासाठी समर्पण वृत्ती.

(८) आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा परिघोष.

४.९. वरील वैयक्तिक गुणांखेरीज शिक्षणाने विद्यार्थ्यांना विविध विषयातील सकल्पना व ज्ञान देऊन भाषा व आविष्कार यांची कौशल्ये तसेच खेळ व छंद यांची आवड या गोष्टी मिळवून दिल्या पाहिजेत.

४.१०. आर्थिक विकास व रोजगाराची संधी प्राप्त करून देण्या-बरोबरच शिक्षणाने विद्यार्थ्यांचा क्षमता विकास साधला पाहिजे. शिक्षणाने ज्ञान व कौशल्य प्राप्त व्हावीत आणि विविध पातळींवरील सुजाणता यावी, त्यातून रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व पर्यायाने देशाच्या विकासाला त्याचा हातभार लागावा, अशी अपेक्षा आहे.

४.११. व्यक्ती व समाज यांची एकात्मता साधण्यासाठी शिक्षणाला महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावयाची असते. तसेच शिक्षणामुळे आरोग्य, मानसिक उपयोजन क्षमता, वेळेचे व्यवस्थापन आणि शारीरिक, मानसिक व भावनिक सामर्थ्याचा संतुलीत वापर करण्याची क्षमता विद्यार्थ्यात यावयास हवी.

४.१२. शिक्षणाने माणसाला संधीची समानता प्राप्त करून देऊन माणसामाणसातील विषमतेची दरी बुजविली पाहिजे. संधीची समानता हा लोकशाही समाजातील प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे., म्हणून वर्ण, जात, पंथ, लिंग, आर्थिक दर्जा यांचा विचार न करता विद्यार्थ्यांना आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यासाठी दर्जेदार शिक्षण मिळावे, हे शिक्षण प्रणालीचे ध्येय असावयास हवे.

४.१३. उपर्निदिष्ट शैक्षणिक उद्दिष्टे सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी एकच असतील असे नाही. शालेय व विद्यापीठीय शिक्षणापेक्षा प्रौढ शिक्षणाचे उद्दिष्ट निराळे असेल. प्राथमिक, माध्यमिक, व्यावसायिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा व क्षमता भिन्न असतात, शिक्षण ही श्रेणीबध्द प्रक्रिया असल्याने प्रत्येक पातळीवरील शिक्षणाकरिता आवश्यक असलेली साधनसामग्री व फलनिष्पत्ती वेगवेगळी असेल, अनेक विद्यार्थ्यांना एका ठराविक पातळीपुढील औपचारिक शिक्षण घेणे शक्य नसते. म्हणून शिक्षणाच्या प्रत्येक स्तराची सुस्पष्ट उद्दिष्टे, त्यातून विकसित करावयाच्या क्षमता व त्यांच्या पूर्ततेसाठी औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाची एकात्मिक व परिपूर्ण रूपरेषा विकसित करणे आवश्यक आहे.

**शिक्षण व समाज यांच्यातील नाते**

४.१४. शिक्षण पद्धतीला ज्याप्रमाणे आधारांची गरज असते तसे शिक्षण हे विकासाच्या इतर क्षेत्रांना आधारभूत होते. म्हणून शैक्षणिक धोरण व शिक्षणाची योजना आखताना त्यातून निर्माण होणारे मनुष्यबळ ज्या क्षेत्रात वापरले जाते तसेच शिक्षणामुळे ज्यांचे वर्तन, क्षमता, अभिवृत्ती व व्यक्तिमत्त्व यांना आकार लाभतो त्या सर्वांचा सहभाग मिळविला पाहिजे.

४.१५. सुशिक्षितांच्या जीवनाविषयीचा आदर व सद्सद्विवेक-बुद्धी याशिवाय समाजाचे अस्तित्व टिकून राहणार नाही. परमत-सहिष्णुता व सहनशीलता याशिवाय लोकशाही व नागरीजीवन सुरक्षित राहणार नाही. युवकात साहस, नवोपक्रमशीलता, उद्यमशीलता विकसित झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य होणार नाही. विद्यार्थ्यांच्या अंगी शिक्षणाच्या प्रारंभापासूनच पर्यावरणविषयक जाणीव व मानवी जीवन आणि निसर्ग यांच्या परस्परावलंबित्वाविषयी समज निर्माण झाल्या-शिवाय पर्यावरणाचे जतन, उर्जेची बचत व लोकसंख्या नियंत्रण हे अग्रक्रमाचे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी समाज सहभाग मिळणार नाही.

**शैक्षणिक पुनर्रचना : उपकारक घटक**

४.१६. शैक्षणिक धोरणाच्या आखणीत अनेक महत्त्वपूर्ण घटक कारणीभूत ठरतात. शिक्षणक्षेत्रात अनेक चांगल्या घटना घडूनही सध्याची शिक्षणपद्धती आमूलाग्रपणे बदलली पाहिजे याबद्दल दुमत नाही. सध्याच्या शिक्षण क्षेत्राची अवनती व जीवनविन्मुखता याबद्दल सर्वजण सहमत आहेत. किरकोळ बदल करून परिस्थिती सुधारणार नाही. शिक्षणाचे अग्रक्रम, आशय, अध्ययन, अध्यापन पद्धती, मूल्यमापन आणि व्यवस्थापन पद्धती, यांच्यात आमूलाग्र बदल होण्याची नितांत आवश्यकता आहे.

४.१७. स्वातंत्र्योत्तर काळात देशाने आपल्या उत्पन्नाचा फार मोठा भाग शिक्षणावर खर्च केला आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्षम कारभाराची अपेक्षा करण्याचा देशाला अधिकार आहे. प्रत्येक समाजात शिक्षकांवर विशिष्ट जबाबदारी असते, ते ती कशी पार पाडतात यावर शिक्षणाचे स्वरूप अवलंबून असते. त्यांच्या हाती सोपविलेल्या युवकाच्या संस्कारक्षम मनाची मशागत त्यांनी सर्व सामर्थ्यानिशी केली पाहिजे, याबद्दल वाद नाही. असे झाले तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयींचा पूर्ण उपयोग करून घेता येईल व त्यातून त्यांच्या अंगी मूल्ये रूजतील, तसेच ते सुजाण नागरिक व चांगली माणसे बनतील. सध्या हे घडत नाही असा सार्वत्रिक समज आहे.

४.१८. सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्थितीत आमूलाग्र परिवर्तन घडल्या शिवाय शिक्षणात सुधारणा होण्यासाठी प्रेरणा मिळणार नाही. विघातक वृत्तीचे निर्मूलन, सहनशीलता व सहकार्य यासाठी वातावरण निर्मिती, गरीब व वंचित वर्गांचे कल्याण, उत्पादनाची वृद्धी व आधुनिकता यासाठी खूप काही करण्याची आवश्यकता आहे असे सर्वसामान्यांना वाटते. ही उद्दिष्टे साध्य करण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे. त्यामुळे शिक्षणाला आपली नियत कामगिरी पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली किमान साधनसामग्री शासन उपलब्ध करून देईल अशी आशा वाटते.

४.१९. गेल्या कांही वर्षातील शिक्षणक्षेत्रांतील लक्षणीय कामगिरीच्या पायावर नवीन शैक्षणिक धोरणाची आखणी करणे लाभदायक होईल.

भारतात सुदैवाने शैक्षणिक संस्थांचे जाळे पसरते आहे. सुमारे ९५ टक्के लोकसंख्येला एक किलोमीटरच्या परिसरात प्राथमिक शाळेची सुविधा आणि ८० टक्के लोकसंख्येसाठी ३ किलोमीटरच्या परिसरात उच्च प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध आहे. नवीन योजना राबविण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व तज्ज्ञ शिक्षण क्षेत्रात उपलब्ध आहेत. व्यक्तींच्या व समाजसेवी संस्थांच्या उपक्रमशीलतेतून शिक्षणात अनेक नवीन विचार प्रवाहित झाले आहेत. त्यामुळे कोणते नवविचार यशस्वीपणे रुजविले जाऊ शकतात याचा अंदाज येऊ शकतो.

४.२०. भारताने अवकाशात स्वतःचा उपग्रह प्रक्षेपित केला आहे. देशात्त दूरचित्रवाणी व आकाशवाणी केंद्रांचे जाळे पसरलेले आहे. त्यामुळे शालेय कार्यक्रम विकसित करण्यासाठी पुरेसे तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध आहे. साहजिकच फार मोठ्या लोकसंख्येला लाभदायक ठरू शकतील असे नवीन उपक्रम हाती घेणे शक्य होईल. या तंत्रज्ञानाच्या उपयोगातून औपचारिक शिक्षण समृद्ध होऊ शकेल आणि अनौपचारिक शिक्षणाला व दूर शिक्षणाला आधार प्राप्त होऊ शकेल.

४.२१. नवीन तंत्रज्ञानाने उपलब्ध सुविधांचा उपयोग करण्यासाठी 'कै. श्रीमती इंदिरा गांधी खुले विद्यापीठ' स्थापन करण्याच्या दिशेने शासन प्रयत्नशील आहे. ही संस्था नवीन शैक्षणिक तंत्रज्ञान व त्याचा अधिक प्रभावी उपयोग करण्याची प्रक्रिया विकसित करण्यास मोलाचा हातभार लावू शकेल. आर्थिक व इतर अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून वंचित झालेल्यांना हे विद्यापीठ वरदान ठरेल. संगणक साक्षरता कार्यक्रम हा दुसरा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे २००० संगणक १९८४-८६ या कालावधीत शाळांना वितरित केले जातील. यामुळे विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख होईल व ते हाताळण्याचे कौशल्य प्राप्त होईल. नजिकच्या काळात या कार्यक्रमाचा विस्तार होईल असे वातावरण निर्माण झाले आहे.

४.२२. शिक्षणाची पुनर्रचना संपूर्णपणे नव्याने करण्याची आवश्यकता नाही. राष्ट्रीय शिक्षण आयोग (१ व २) आणि केंद्रीय विद्यापीठाच्या कार्याचे समीक्षण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेली पुनर्विलोकन समिती यांच्या अहवालांचा यासाठी आधार घेता

येईल. इतर समित्या देखील शिक्षणाचे व्यावसायिकरण, पदव्यांचा रोजगारांशी संबंध नसणे, मनुष्यबळ आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध आणि तत्सम इतर समस्या यांचा अभ्यास करीत आहेत.

४.२३. शिक्षणाची समान संधी व शिक्षणाशी केंद्रीय शासनाची बांधिलकी यांचा पुरावा म्हणजे केंद्राकडून देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात स्थापण्यात यावयाची नमुनेदार विद्यालये ही होत. पालकांची आर्थिक स्थिती आड न येता ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना या विद्यालयात दर्जेदार शिक्षण मिळू शकेल. या विद्यालयांची कल्पना केंद्रीय विद्यालय संघटनेच्या देशव्यापी शाळांच्या यशस्वी कार्यवाहीतून पुढे आलेली आहे.

**धोरण आखणीतील बंधने**

४.२४. नवीन धोरण आखणीच्या संदर्भात अशी टीका केली जाते की, धोरण आखण्याकडे सर्व लक्ष केंद्रित केले जाते, मात्र कार्यवाहीच्या योजनेबाबत म्हणावे तितके लक्ष दिले जात नाही. या टीकेत फारसा तथ्यांश नाही. धोरण ठरविताना अंतर्गत व बाह्य बंधने विचारात न घेणे, साधनसामग्री, संस्था आणि व्यवस्थापन पद्धती व सोयी–सुविधा यांची पूर्तता करण्याची स्पष्ट तरतूद न झाल्यामुळे धोरण यशस्वी होऊ शकले नाही. धोरण आखणीला वास्तव रूप प्राप्त व्हावे म्हणून त्यातील बंधनांचा पुढे विचार केला आहे.

**अंतर्गत बंधने**

४.२५. इतर पद्धतींप्रमाणे शिक्षण पद्धतीतून लाभ घेणारे असतात. शिक्षण पद्धतीत इष्ट बदल करून तिची कार्यक्षमता, समानता व वस्तुनिष्ठता वाढविली तर या पद्धतीतून विशेष व असमर्थनीय फायदे उकळणाऱ्या व्यक्तींचे नुकसान होण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ परीक्षा पद्धतीत बदल केला तर अनेक लोक त्याला विरोध करतील, कारण या बदलामुळे शिकवणीचे वर्ग अनावश्यक ठरतील आणि पेपरफुटी, मार्गदर्शिका तयार करणे, सामुदायिक कॉपी इत्यादी गैरप्रकारांनी लाभ उकळणारे उघडे पडतील. असा बदल घडला तर उत्तर पत्रिकांची सखोल तपासणी, नियमित वर्गकाम आणि प्रभावी अध्यापनासाठी शिक्षकांना अधिक परिश्रम व पूर्वतयारी करावी लागेल. हे देखील अनेक शिक्षकांना आवडणार नाही.

४.२६. पाठांतराच्या ऐवजी अभिनव उपक्रम व परिसराशी निगडित अध्यापन सुरू केले, तर अनेक शिक्षकांना ते अवघड जाईल, कारण त्यांचे प्रशिक्षण यादृष्टीने झालेले नसते किंवा त्यांना तसे अनुभव मिळालेले नसतात. अशिक्षित बहुसंख्या असलेला समाज शिक्षकांकडून उच्च दर्जाच्या कार्याची अपेक्षा करीत नाही त्याच्या जोडीला व्यक्ती-सापेक्ष नसलेले व्यवस्थापन, पर्यवेक्षण व मूल्यमापन असल्यामुळे अपयशाची जबाबदारी शिक्षकांवर पडेल अशी त्यांना भिती वाटत नाही. शिक्षकांच्या कामावर नियंत्रण व मूल्यमापन समाजाकडे सोपविले तर त्यांना कामाच्या बाबतीत नियमित व कर्तव्यदक्ष राहावे लागले. शिवाय जवळच्या शहरांतून येण्या-जाण्याऐवजी ते शाळेच्या गावीच राहतील.

४.२७. शिक्षणाची राजकारणापासून फारकत करण्याची कल्पना प्रसिद्ध आहे. ही कल्पना प्रत्यक्षात आली, तर अनेक राजकीय संघटनांना त्याची झळ पोहोचेल. कारण निवडणुका लढविणे, निदर्शने, निषेध, मोर्चे व मिरवणुकी यात भाग घेणे यासाठी मनुष्यबळ मिळणार नाही. अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी आपले स्वतःचे काम करण्याऐवजी संघर्षातून अधिक चांगले लाभ मिळविण्याच्या प्रयत्नात असतात. ते या बदलामुळे या गैरलाभापासून वंचित होतील. गुणवत्तेवर पदोन्नती देण्याचे तत्त्व काटेकोरपणे अमलात आणले तर संशयास्पद गुणवत्ता असलेले बाजूला पडतील.

४.२८. जर पदव्यांची रोजगारापासून फारकत केली, तर संस्थांचे व्यवस्थापन याला विरोध करील, कारण त्यांना या बदलामुळे विद्यार्थी गमवावे लागतील. विद्यार्थी अशा संस्थांत प्रवेश घेतील, की ज्या संस्था विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील चाचण्या व परीक्षा यांच्यासंबंधी प्रशिक्षण देतील. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या क्षमतांची योग्यरीत्या चाचणी होईल व त्याचा पदवीशी संबंध असणार नाही.

४.२९. विकेंद्रित व्यवस्थापन पद्धतीमुळे व्यवस्थापकांना अनेक लाभ व प्रतिष्ठा यापासून वंचित व्हावे लागेल. कारण त्यांना मिळणारी प्रतिष्ठा व अधिकार त्यांच्या मार्गदर्शनाच्या गुणवत्तेवर आधारित नसतात, तर नेमणुका, पदोन्नती, बदली, साहित्याची केंद्रीय खरेदी यातून प्राप्त झालेले असतात.

४.३०. कौशल्याधारित शिक्षणासंबंधी समाजात असलेल्या पूर्वग्रहामुळे शिक्षणाचे व्यावसायिकरण गती घेऊ शकले नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभिवृत्तीप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमाला सक्तीने प्रवेश दिला तर त्यांच्या पालकांकडून त्याला विरोध होण्याची शक्यता आहे. मनुष्यबळाचे योग्य नियोजन नसल्यामुळे व्यवसाय शिक्षणाची रोजगाराशी सांगड घालणे शक्य झाले नाही किंवा कुशल मनुष्यबळाच्या गरजेनुसार त्यात बदल करणे शक्य झाले नाही. या तुटीच्या जोडीला व्यावसायिक शिक्षण संस्था सुसज्ज करण्यासाठी, शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी व त्यांना प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन पुरेशी आर्थिक तरतूद करू शकले नाही. त्यामुळे अडचणीत भरच पडली. शैक्षणिक पात्रता उंचावण्यासाठी पुरेशा सुविधा नसल्यामुळे योजनेच्या कार्यवाहीत अपेक्षित यश मिळू शकले नाही.

४.३१. शिक्षणाचा आशय व पद्धती यांच्याशी संबंधित संशोधन संस्था शैक्षणिक धोरणात मोठे वदल करण्यात विरोध करण्याची शक्यता आहे. कारण त्यामुळे त्यांची रचना, कार्यपद्धती यात वदल करावे लागतील. त्याशिवाय अभ्यासक्रम विकसन, पाठ्यपुस्तक व अध्यापन साहित्य निर्मिती आणि अध्ययन-अध्यापन पद्धती यात अपेक्षित बदल घडू शकणार नाहीत.

४.३२. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी बहुविध साधन सामुग्रीची आवश्यकता भासली तर ते धोरण राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या प्रशासनाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल. तसेच त्यांच्यावरील आर्थिक भार वाढेल, कारण चांगल्या दर्जाचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी अधिक पैसा खर्च करावा लागेल त्याचबरोबर शिक्षक–प्रशिक्षणाचा नवीन अभ्यासक्रम, नवीन अध्यापन तंत्रे, शिक्षक–प्रशिक्षकांचे सातत्याने उद्बोधन व त्यासाठी उन्हाळी अभ्यासक्रम आणि अल्पमुदतीची कृतिसत्रे व चर्चासत्रे यांची तरतूद करावी लागेल.

**तंत्रज्ञानात्मक बंधने**

४.३३. संवाहनाच्या नवीन तंत्रामुळे शिक्षण क्षेत्रात नवीन उपक्रम हाती घेणे सुलभ झाले आहे. या तंत्रामुळे अध्यापन संस्थांचे रुपांतर

अध्ययन संस्थात होऊ शकेल. परिणामी अभ्यासक्रम व अध्यापन विषयक तंत्रात परिवर्तन घडू शकेल. या तंत्रज्ञानाबाबत अति उत्साही व आशावादी असण्याचे कारण नाही, कारण अल्पावधीत त्यापासून मिळणारे लाभ किमान असतील. यंत्रसामुग्री मिळविणे सोपे आहे पण त्यासाठी आवश्यक असलेले अध्ययन–अध्यापन साहित्य विकसित करणे व विद्यार्थ्यांत संबंधित ज्ञान व अभिवृत्ती यांची जोपासना करणे सोपे नाही. कारण या तंत्रज्ञानाचे लाभ व मर्यादा यांची जाणीव त्यांच्यात निर्माण करण्याची गरज आहे. या तंत्रज्ञावाचे स्वरूप, साहित्य निर्मितीचा अनुभव व शाळेतील व शालाबाह्य विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. दूरशिक्षण हे अध्यापनाचे वेगळे व स्वतंत्र साधन आहे. या तंत्राचे लाभ मिळविण्यासाठी वेगवेगळ्या मुदतीचे प्रशिक्षण अभ्यासक्रम आयोजित करण्याची गरज आहे.

४.३४. नवीन शैक्षणिक तंत्रज्ञानाचे गुणदोष वर्णिताना दूरचित्रवाणीची विशेष भूमिका लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे औपचारिक शिक्षणाची गुणवत्ता वाढलेली असून अनौपचारिक शिक्षणाकरिता नवीन मार्ग उपलब्ध करून दिलेले आहेत. अल्पावधीत फार मोठ्या प्रमाणावर दूरचित्रवाणीचे जाळे कार्यान्वित करणे फार मोठ्या आर्थिक गुंतवणुकीशिवाय शक्य नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. दूरचित्रवाणीच्या संबंधातील सध्याच्या धोरणाचा पुनर्विचार केल्याशिवाय व त्यात आवश्यक ते बदल केल्याशिवाय या माध्यमाचा शिक्षणाकरिता फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करता येणार नाही.

४.३५. दूरचित्रवाणी व चित्रपट यांची भूमिका व प्रभाव याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. या माध्यमातून प्रसारित होणारे अनेक विषय शिक्षणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत नसतात असे आक्षेप काहीजण घेतात. अनेक पालक आणि शिक्षक यांच्या मते चित्रपट व दूरचित्रवाणी यावरून दाखविण्यात येणाऱ्या दृश्यांतील हिंसा, क्रौर्य, गुन्ह्यांचे उदात्तीकरण व संपत्तीचे अवाजवी प्रदर्शन यांचा तरूण पिढीवर अनिष्ट परिणाम होतो. चित्रपटांचे जाहिरात फलकदेखील लोकांच्या संवेदनशीलतेवर आघात करतात. या माध्यमांविषयी योग्य ते उद्बोधन [illegible] सहिष्णु व सुसंस्कृत समाजासाठी आवश्यक असलेल्या

मूल्यांचे संवर्धन शक्य होणार नाही. ही या माध्यमाची शैक्षणिकदृष्टया मर्यादा लक्षात घेणे गरजेचे आहे.

४.३६. आशय, गुणवत्ता व प्रसारणाची व्यवस्था याखेरीज रेडिओ, दूरचित्रवाणी संच, टेपरेकॉर्डर, व्हिडीओ कॅसेट प्लेअर्स यांच्या उपलब्धतेवर शैक्षणिक कार्यक्रमाचे यश अवलंबून आहे. ही सर्व साधने महाग असून त्यांच्या व्यवस्थापनाची व देखभालीची विश्वसनीय यंत्रणा उभारणेही गरजेचे आहे. या सर्वांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही तर या माध्यमाचे सुप्त सामर्थ्य खऱ्या अर्थाने उपयोगात आणता येणार नाही.

**आर्थिक बंधने**

४.३७. शिक्षणावर येणाऱ्या आर्थिक बंधनांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. ही बंधने उत्पादन संबंधाचे स्वरूप, ग्रामीण नागरी विषमता व उत्पन्नाचे असमान वाटप यामुळे निर्माण होतात. कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्याकरिता मुलांना अर्थार्जन करावे लागते. त्यातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या पातळीवर पटनोंदणी व शाळेत टिकून राहणे यासंबंधीच्या समस्या उद्भवतात. शैक्षणिक सोयींची समानता व गुणवत्ता यासाठी आर्थिक बंधने अडथळे ठरतात. ज्या मुलांना घरातील भावंडांकडे लक्ष पुरवावे लागते किंवा अर्थार्जन करावे लागते ते आर्थिकदृष्टया चांगल्या आर्थिक स्थितीतील मुलांइतके अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. सधन कुटुंबातील पालक आपल्या पाल्यांना चांगल्या सोयीसुविधा असलेल्या शाळांत पाठवू शकतात व मुलांचा शारीरिक, बौद्धिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणू शकतात. याउलट दुर्बल घटकातील मुलांना पडक्या इमारतीत भरणाऱ्या एकशिक्षकी शाळांत जाण्याशिवाय गत्यंतर नसते. समाजातील आर्थिक विषमतेमुळे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांकडून शाळांची गुणवत्ता वाढविण्याची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. पटनोंदणीच्या वाढीच्या दरावरून मुलांच्या शाळेत न येण्याशी दारिद्र्य व निरक्षरता यांचा प्रत्यक्ष संबंध असलेला दिसतो. या घटकातील लोकांची आर्थिक असहायता लक्षात घेणे आवश्यक आहे.

४.३८. दारिद्र्य निर्मूलनासाठी ग्रामीण व अनोंदणीकृत क्षेत्रातील उत्पादन पद्धती व तंत्रे बदलणे गरजेचे आहे. यासाठी संशोधन, विस्तार व प्रशिक्षण संस्थांनी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. या संस्था सध्या संयुक्त क्षेत्रातील उद्योगांसाठी काम करताना दिसतात. त्याबाबतीतही त्यांचे कार्य फलदायी ठरलेले दिसत नाही. आर्थिक रचना व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळविण्याची हाव यासाठी संशोधन चाललेले दिसते. ते बदलल्याशिवाय ग्रामीण विकासाशी संबंधित असलेली शेती व इतर कार्ये यांची उत्पादकता, गुणविकास व कार्यक्षमता यांच्याशी निगडित समस्या सुटणार नाहीत.

४.३९. शिक्षणाच्या आधुनिकीकरणासाठी शालेय व विद्यापीठीय पातळीवर उत्कृष्ट संस्था स्थापन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी गुणवान तरुणांची निवड करणे, त्यांना सर्वोत्तम शिक्षण देणे, त्यांचे प्रशिक्षण करणे, त्यांना कामासाठी योग्य परिस्थिती निर्माण करून देणे या बाबींची आवश्यकता आहे. असे झाले तर भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी आवश्यक असलेल्या नवनव्या कल्पना प्रत्यक्षात येऊ शकतील.

४.४०. तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण व आर्थिक व्यापकता यांच्या परिणामातून शाळेकरिता असलेल्या सोयी-सुविधांचा विस्तार होऊ शकेल. ग्रामीण भागाचे शहरीकरण करण्याच्या घाईचा वाईट परिणाम शाळा व महाविद्यालये यांच्या स्वयंपूर्णतेवर होतो.

४.४१. आगामी दशकांतील विकास प्रक्रियेचा अंदाज अद्यापि आलेला नसल्यामुळे त्याचा शैक्षणिक नियोजनावर होणाऱ्या परिणामांचा संपूर्ण विचार करणे कठीण आहे. त्यामुळे धोरणाची रूपरेषा तयार करताना लवचिकतेचा आश्रय घ्यावा लागेल. त्याशिवाय आगामी आव्हानांना सामोरे जाणे व गरजाधारित शैक्षणिक विकास साधणे शक्य होणार नाही.

**कायदेशीर बंधने**

४.४२. शिक्षण हा घटनेच्या समवर्ती सूचीत समाविष्ट केलेला विषय आहे. पण त्यासाठी कायद्यात व शिक्षणपद्धतीत आवश्यक ती

तरतूद करण्यात यावयाची आहे. या तरतुदीमुळे शैक्षणिक उद्दिष्टांच्या विरोधी होणाऱ्या कार्यास प्रतिबंध करणे, विकासाचा दर, समाविष्टता आणि शिक्षणाची गुणवत्ता देशभर निर्माण करणे ही केंद्राची जबाबदारी झालेली आहे, याबद्दल दुमत नाही.

४.४३. देशात असा वाढता मतप्रवाह आहे की, शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय होऊनही केंद्रशासनाचा प्रभाव शैक्षणिक पद्धतीवर पडण्यासाठी केंद्राने कोणतीही पावले उचललेली नाहीत. शैक्षणिक प्रक्रियेची कार्यक्षमता वाढण्यासाठी अध्यापन व परीक्षा यांचे कार्य वेळापत्रकाप्रमाणे काटेकोरपणे होण्यासाठी, शाळांना किमान सोयी पुरविण्यासाठी, शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमांची पुनर्रचना करण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक ऐक्य यांना विघातक ठरणाऱ्या साहित्य निर्मितीस प्रतिबंध करण्यासाठी, शैक्षणिक संस्थांचा सर्वमान्य किमान दर्जा राखण्यासाठी आणि शिक्षणाची राजकारणापासून फारकत करण्यासाठी राज्यांबरोबर कसे काम करता येईल याचे मार्ग केंद्र शासनाला शोधावे लागतील.

४.४४. भाषाध्यापनात त्रिभाषासूत्राची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासन यशस्वी होऊ शकले नाही. भाषा ही उद्याच्या भारतातील लोकांच्या गतिमानतेला बाधक ठरणार नाही याची दखल घेणे आवश्यक आहे.

४.४५ एखाद्या शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेकरिता केंद्र व राज्य अशा दोन्ही शासनांची परवानगी व नोंदणी आवश्यक आहे का, याबाबत अनिश्चितता आहे. खाजगी शाळांच्या बाबतीत त्यांचा खर्च, गुणवत्ता व शैक्षणिक पुनर्रचना यावर नियंत्रणाचा अभाव, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचे पुरेसे उपाय योजता आलेले नाहीत. बहुसंख्य शाळा शासनस्थापित असल्यामुळे पालकांचा आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठविण्याचा कल वाढत आहे. शासकीय व नगरपरिषदेच्या शाळा अनाकर्षक असतात त्या तशाच राहू द्यावयाच्या का सुधारावयाच्या यावर विचार होणे अगत्याचे आहे. खाजगी संस्थांच्या सहाय्याने उत्कृष्ट शाळांची स्थापना करण्याची व अभिनव शैक्षणिक उपक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे.

४.४६. राज्य व केंद्र शासनाच्या कायद्यांच्या मर्यादेत शैक्षणिक उद्दिष्टे निश्चित करण्याचा प्रश्न येतो. सर्व देशभर समान पायाभूत अभ्यासक्रम असावा व तो कायद्याने प्रस्थापित करावा असे काहींचे मत आहे. पण यासाठी कायदा नसावा याबाबत राज्यातील व केंद्रातील शैक्षणिक तज्ज्ञांचे एकमत आहे.

४.४७. व्यवस्थापन पद्धती व कार्यक्षमता याबाबतीत केंद्रीय वा राज्य शासनाच्या कायद्यांनी प्रस्थापित झालेल्या विद्यापीठांच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. विद्यापीठाचा आकार व विविध अधिकाऱ्यांत असलेले परस्पर संबंध यांचा पुनर्विचार होण्याची गरज आहे. कारण हा कारभार विद्यापीठांच्या आवाक्याबाहेर गेलेला आहे. विद्यापीठांना व्यवस्थापन पद्धतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी व त्यांचा राजकारणाशी असलेला संबंध तोडण्यासाठी केंद्र शासनाने स्वतःकडे अधिकार घ्यावेत का हा वादाचा मुद्दा आहे. विचारविनिमयातून त्यावर निर्णय झाला पाहिजे.

४.४८. वैद्यक, कायदा व वास्तुविद्या या क्षेत्रात व्यावसायिक कार्याची नियमन करण्याची कायदेशीर तरतूद आहे. पण अभियांत्रिकी शैक्षणिक व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात अशी तरतूद अद्यापि करण्यात आलेली नाही.

**वित्तीय बंधने**

४.४९. शैक्षणिक नियोजनाचा वित्तीय बंधनांशी निकटचा संबंध आहे. शैक्षणिक सोयींची समानता, समाविष्टता, गुणवत्ता, विविधता या बाबी पुरेशा आर्थिक तरतूदीशिवाय शक्य नाही. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शिक्षणाचे व्यावसायीकरण, निरक्षरता निर्मूलन, शालेय, उच्च व तांत्रिक शिक्षणाचा गुणवत्ता विकास किंवा उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांची स्थापना यासाठी दरडोई खर्च निश्चित करण्याकरिता वस्तुनिष्ठ निकष असण्याची व त्याप्रमाणे आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे.

४.५०. वरील समस्यांशिवाय शिक्षणासाठी पुरेसा निधी उभारण्याकरिता नवे मार्ग शोधून काढण्याची गरज आहे. आयात वस्तूंवर

कर लादणे, मोठ्या प्रकल्पांच्या अंदाजपत्रकात मनुष्यबळ विकासासाठी स्वतंत्र तरतूद करणे आणि खाजगी उद्योगांकडून पैसा मिळविणे इत्यादि मार्गांचा अवलंब करता येईल. विविध शैक्षणिक कार्यक्रमांसाठी केंद्र व राज्य शासनाचा वाटा किती असावा व त्याची कायदेशीर तरतूद यासंबंधी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय असल्यामुळे शैक्षणिक खर्चातील केंद्राचा वाटा वाढवावा लागेल. त्याशिवाय जबाबदाऱ्या आणि कार्यवाही यात सुसंगती राखता येणार नाही. शालेय व व्यावसायिक स्तरावरील शिक्षण सोडून इतरेतर स्तरावरील शिक्षणाच्या खर्चाबाबत पुनर्विचार होणे आवश्यक आहे. गुणवत्ता व सामाजिक न्याय यांच्याशी अनुदानाची सांगड घालणे अगत्याचे आहे.

**शिक्षण पद्धतीची बंधने**

४.५१. शिक्षण हे समाज पद्धतीचे अविभाज्य अंग आहे. त्यावर संस्कृतीचा व समग्र पर्यावरणाचा अटळ असा परिणाम होतो. शिक्षणाचे स्वतःचे देखील नियत कार्य आहे. भारतीय समाजपद्धतीवर असणारा पारंपारिक प्रतिष्ठेचा प्रभाव व साहसाचा अभाव यांचा निर्णय क्षमता, व्यवस्थापन व कार्यवाही यावर परिणाम होत असल्यामुळे कोणताही बदल समाजसंमतीशिवाय शक्य होणार नाही. दृष्टिकोनातील साचेबंद-पणा, विविध विभागात समन्वयाचा अभाव, सविस्तर नियोजन नसणे, प्रयोग क्षमतेचा अभाव, विज्ञान व नवीन संकल्पना यांच्याबद्दल साशंकता, परंपरागत दृष्टिकोन व हेतू दुर्लक्षून नियमांना शब्दशः चिकटून राहण्याची वृत्ती यांची यात भरच पडते. परिवर्तनासाठी सुरू करावयाचे उपक्रम राबविताना आवश्यक तो पुढाकार न घेतल्याने विकासोन्मुख निर्णयांची पिछेहाट होते व संबंधितात नैराश्याची भावना बळावते. यासाठी नोकरशाही बुद्धिवंतांचा दुरुपयोग करून घेते.

४.५२. वरील विधानांना प्रत्यक्ष उदाहरणांचा पुरावा देता येई

४.५३. शैक्षणिक दूरचित्रवाणीचा वेगाने विस्तार करण्याचा घेण्यात आला. तो उपक्रम यशस्वी व्हावा अशी प्रत्येकाची अपे पण यंत्रांची हाताळणी व कार्यक्रम निर्मिती यासाठी मनु

पुरवठा कमी आहे. बाजारातील मागणी व पुरवठा, वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता आणि भरती पद्धती यांचा विचार केल्याशिवाय मनुष्यबळाची उणीव दूर करता येणार नाही. यासाठी विशिष्ट पद्धती निश्चित करण्याची गरज आहे. अशी पद्धती यांत्रिकी व स्थापत्य शास्त्रातील अभियंत्यांच्या भरतीसाठी निश्चित केलेली आहे.

४.५४. प्रशासकीय पद्धतीच्या शैथिल्यामुळे संगणक यंत्रांचा वापर वर्षानुवर्षे शक्य होत नाही, अशा घटना घडलेल्या आहेत. परिणामी ही यंत्रे निरुपयोगी ठरतात. हे सुधारणे आवश्यक आहे.

४.५५. विकासाशी संबंधित खात्यात व्यवस्थापनाची आधुनिक तंत्रे वापरली जावीत असे प्रत्येकाला वाटते. पण व्यवस्थापन तज्ज्ञांना अन्य व्यवसायात जे वेतन व इतर सोयी सवलती मिळतात त्यांची तरतूद करणारी पदे निर्माण करता येत नाहीत. कर्तव्यदक्ष वित्तीय नियंत्रक आर्थिक तरतुदींचा काटेकोर वापर करण्यासंबंधी सूचना देतात पण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या विलंबाच्या आर्थिक भाराचा विचारही केला जात नाही.

४.५६. समकालीन पद्धतीची इतर दोन वैशिष्टयेही नमूद केली पाहिजेत. शासन, संस्था व व्यक्ती आपले अधिकार व कार्य इतरांवर सोपविण्यास अनुत्सुक असतात हे त्यातील पहिले वैशिष्ट्य आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळांचे कार्य सुरळीतपणे चालविण्यासाठी जिल्हा पातळीवर नियोजन, प्रशिक्षण, नियंत्रण व शैक्षणिक साधन केंद्र निर्माण करण्याची गरज आहे. त्याचबरोबर शालेय व्यवस्थापनात स्थानिक समाजाचाही प्रभावी सहभाग मिळविला पाहिजे. जिल्हा साधन केंद्रे स्थापणे कठीण नाही. कारण जिल्हा पातळीवर नवीन जागा व कार्यालये निर्माण करणे सोपे असते. पण या साधन केंद्रांना मर्यादित क्षेत्रात का होईना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यासाठी वरिष्ठांचे अधिकार कमी करणे कठीण आहे.

४.५७. पद्धतीचे स्वरूप विभागशः असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात, हे दुसरे लक्षण होय. अनेकवेळा मान्य करण्यात आले आहे की, विकास कार्यक्रमांचा अनेक विभागांशी संबंध येतो म्हणून त्याचे नियोजन,

आर्थिक तरतूद, कार्यवाही व नियंत्रण एकात्म पद्धतीने व्हावयास पाहिजे. या कार्यात अजून प्रगती होऊ शकली नाही.

४.५८. विभागांतर्गत इर्षेतून शिक्षण क्षेत्रात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. पदवीपूर्व पातळीवर कला, मानव्य व विज्ञान शाखांतील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची कार्यात्मकता व रोजगारक्षमता या दृष्टीने निरुपयोगी आहेत, हे मान्य झालेले आहे. पण या सर्वांचा एकात्म अभ्यासक्रम अद्यापि समूर्त होऊ शकला नाही. त्याला विभागांतर्गत विविध शाखांची अलिप्तता कारणीभूत आहे.

४.५९. शैक्षणिक पुनर्रचनेचे कार्य नियोजनकार व प्रशासक यांच्यापुरतेच मर्यादित राहिले, तर नवीन धोरणाची व नव्या उपक्रमांची आखणी व कार्यवाही यशस्वी होऊ शकणार नाही. यासाठी शैक्षणिक नियोजनावरील बंधने सविस्तरपणे चर्चिलेली आहेत.

**धोरणविषयक दृष्टिकोन**

४.६०. शैक्षणिक उद्दिष्टे व शैक्षणिक पुनर्रचनेला साहाय्यभूत व विरोधी घटक याचा विचार केल्यानंतर नवीन धोरणाच्या संदर्भातील दृष्टिकोनातून विचार करणे प्रस्तुत होईल. हे धोरण ठरविण्यासाठी भविष्यकालीन विस्तारासंबंधीची आवश्यक आकडेवारी उपलब्ध नसल्या-मुळे तसेच येत्या काही वर्षात, आरोग्य व कुटुंबकल्याण योजनांची परिणामकारकता, रोजगार क्षेत्रात एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या स्वरुपात होणारे बदल, तंत्रज्ञानाची निवड नागरिकीकरणाच्या प्रक्रियेचे आधुनिकीकरण व स्त्रियांचा सहभाग यासंबंधीचे स्पष्ट चित्र उपलब्ध नसल्यामुळे अडचणी उद्‌भवत आहेत. तरीपण शिक्षण क्षेत्राचे ढोबळ चित्रण दिलेले आहे. त्यामुळे नवीन धोरण ठरविण्यासाठी दृष्टी मिळू शकेल व त्यावर चर्चा घडू शकतील.

४.६१. सन १९८१ साली ६ ते १४ वयोगटातील मुलांची संख्या १५ कोटी होती. त्यापैकी ९.३ कोटी मुले प्राथमिक शाळात, ०.९५ कोटी मुले माध्यमिक शाळात व ०.३१ कोटी मुले उच्च शिक्षणास प्रविष्ट झाली. सन १९९० पर्यन्त या वयोगटातील वार्षिक वाढीचा दर १.५ टक्के धरला, तर १९९०–९१ साली या गटातील मुलांची

एकूण संख्या १७.४ कोटी होईल. शिक्षण विकासाचा सध्याचा दर लक्षात घेतला तर ११.२ कोटी मुले प्राथमिक स्तरावरील औपचारिक व अनौपचारिक शिक्षणात १.१५ कोटी मुले, माध्यमिक शिक्षणात ०.३८ कोटी मुले तर उच्च शिक्षणात समाविष्ट होऊ शकतील.

४.६२. विसाव्या शतकाच्या दहाव्या दशकात ६ ते १४ वयोगटातील मुलांची संख्या कमी होईल अशी अपेक्षा आहे. वार्षिक वाढीचा तेव्हाचा दर १ टक्का धरला तर २००० साली ही संख्या १९.२५ कोटी होईल. सन १९९० अखेर प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे उद्दिष्ट सफल झाले तर एकूण १७.४ कोटी मुलांपैकी ११ कोटी मुले प्राथमिक शिक्षणस्तरावर व ६.४ कोटी मुले उच्च प्राथमिक स्तरावर असतील. याचा अर्थ असा की प्राथमिक शिक्षणाचा विस्तार दीडपट व उच्च प्राथमिक शिक्षणाचा विस्तार ३.२ पट होईल. सन १९८०–८१ ची भावपातळी लक्षात घेता व १९७७–७८ मधील दरडोई खर्च तोच राहिला तर १९९०–९१ साली शिक्षणावरील खर्च ३२०० कोटी होईल. चलन फुगवटयाचा वार्षिक दर ८ टक्के धरला तर १९८०–८१ मधील खर्चाच्या चौपट खर्च शिक्षणावर करावा लागेल. सन १९८१ मध्ये २१.७ लाख प्राथमिक शिक्षक होते. सध्याच्या शिक्षण विकासाच्या गतीवर १९९० साली शिक्षकांची ही संख्या २९ लाख होईल. सन १९९० अखेर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी प्राथमिक शिक्षकांची संख्या ४४ लाखांपर्यंत वाढवावी लागेल.

४.६३. सध्याचा विद्यार्थी उत्तीर्णतेचा दर लक्षात घेतला तर माध्यमिक व उच्च शिक्षणस्तरावरावरील पटनोंदणी दुप्पट होईल. प्राथमिक शिक्षणाच्या दरडोई खर्चापेक्षा माध्यमिक व उच्च शिक्षणावरील दरडोई खर्च कितीतरी पटीने अधिक असतो. त्यामुळे शिक्षणाचा अर्थसंकल्प खूपच मोठा होईल. यात शैक्षणिक गुणवत्ता विकासावरील खर्च जमेस धरलेला नाही.

४.६४. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे त्या शिक्षणावरील खर्चच वाढेल असे नाही, तर एकूण शिक्षणावरील खर्च अनेक पटींनी वाढेल. म्हणूनच प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा विचार करताना आर्थिक बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे.

४.६५. याला पर्याय म्हणून अनौपचारिक शिक्षण, दूरशिक्षण आणि व्यावसायिकरण यांचा कार्यवाहीसह विस्ताराने विचार होणे आवश्यक आहे.

४.६६. वरील वर्णनावरून प्राथमिक शिक्षणाच्या कार्याचा प्रचंड व्याप लक्षात येईल. यासाठी प्रौढ शिक्षणातून लोकसंख्या नियंत्रणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याचे महत्त्व लक्षात येईल. हे कार्य शालेय व महाविद्यालयीन स्तरांवरदेखील करावे लागेल. त्यामुळे लहान कुटुंबाची संकल्पना समाज मनावर सखोलपणे ठरेल. अन्यथा लोकसंख्येच्या भारामुळे उपलब्ध साधनसामग्रीचा सुयोग्य वापर व समाजसहभाग या गोष्टी साध्य होऊ शकणार नाहीत.

४.६७. शैक्षणिक कार्यक्रमांची गुणवत्ता वाढविल्याशिवाय शिक्षणाची उद्दिष्टे साध्य होणार नाहीत. वर्तन, संकल्पना, पद्धती आणि संघटन यात मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. इमारती, फळे, अध्यापनसाहित्य, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, प्रयोगशाळा, विज्ञान साहित्य पेटचा व ग्रंथालये या किमान मूलभूत सोयी शैक्षणिक संस्थांना उपलब्ध करून दिल्याशिवाय उद्दिष्टपूर्ती होणार नाही. समाजोपयोगी उत्पादक कार्य, सृष्टिज्ञान, खेळ, शारीरिक शिक्षण आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या आयोजनासाठी आकस्मिक खर्चाची तरतूद करणेही गरजेचे आहे.

**शिक्षणासाठी साधनसामग्रीची जमवाजमव**

४.६८. शाळांना मूलभूत सोयी पुरवण्यासाठी अतिरिक्त खर्चाची आवश्यकता आहे. किमान शाळा व उत्कृष्ट संस्था यांच्यावर होणारा १०० टक्के खर्च केंद्र व राज्य शासनांनी भागविला पाहिजे. समाजाच्या दुर्बल व वंचित घटकातील मुलांना सोडून इतरांवर होणारा खर्च भार्गविण्यासाठी फीची पुनर्रचना करण्याबाबत विचार करावा लागेल. यामुळे शिक्षणासाठी अंतर्गतस्त्रोतापासून संस्थांना निधी उपलब्ध होऊ शकेल व शिक्षणाची खरी किंमत लोकांना कळेल.

४.६९. या संबंधात आलेल्या इतर सूचना अशा :– विकासक्षेत्राच्या अंदाजपत्रकात शिक्षणाकरिता ठराविक तरतूद करावी. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांनी मनुष्यबळ विकासासाठी आर्थिक तरतूद करावी. व्यावसायिक संस्थांतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी ज्या उद्योगात जातील त्या उद्योगांनी त्यांच्या शिक्षणखर्चाची अंशत: भरपाई करावी. आयातीवर कर लावावा. शैक्षणिक विकासासाठी गुंतवणूक करण्याकरिता खाजगी उद्योगक्षेत्रास प्रोत्साहन द्यावे. जे उद्योग व्यावसायिक व धंदे-शिक्षणात गुंतवणूक करतील त्यांना करात सवलत द्यावी. सार्वजनिक व खाजगी उद्योगांच्या सहकार्याने प्रशिक्षण संस्था स्थापन कराव्यात. जमिनीवरील व नागरी भागातील घरांवरील करांवर अधिभार लावावा.

४.७०. केंद्र व राज्य शासनाच्या अंदाजपत्रकातील शैक्षणिक तरतुदीने उच्च टोक गाठले आहे. शिक्षणाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची जाणीव असूनही त्याकडे गौणत्वाने पाहिले जाते व राज्यांकडे ते सोपविले जाते. राज्ये वित्तीय आयोगाने दिलेल्या व सुधारित गाडगीळ सूत्राप्रमाणे मिळणाऱ्या केंद्रीय साहाय्यातून शिक्षणविकासावरील खर्च भागवितात. आता शिक्षणाची विकास प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेऊन त्यावरील खर्चासाठी नवीन तंत्र विकसित केले पाहिजे. शिक्षण हे महाग असले तरी शिक्षणावर खर्च न करणे त्यापेक्षाही महाग पडणारे आहे. म्हणून उच्चाधिकार असलेले केंद्र व राज्ये यांचे एक संयुक्त मंडळ स्थापन करून शिक्षणाच्या गरजा भागविण्यासाठी साधनसामग्री जमविण्याकरिता दीर्घकालीन उपाययोजना केली पाहिजे.

**शैक्षणिक नियोजनाची तंत्रे**

४.७१. शैक्षणिक नियोजनात–

(अ) प्रवेश, (आ) समानता व किमान गरजा, (इ) सामाजिक संदर्भ विविधता व गुणवत्ता आणि (ई) पद्धती व व्यवस्थापन या संदर्भाच्या समस्यांचा विचार करावा लागतो.

**प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण**

४.७२. घटनेत, जात, लिंग, पंथ, आर्थिक दर्जा व विभाग यांचा विचार न करता प्रत्येक मुलाला चांगल्या दर्जाचे प्राथमिक शिक्षण देण्याचे

अभिवचन देण्यात आलेले आहे. हे कार्य १९६० पर्यंत पूर्ण करण्यात यावयाचे होते, पण ते अद्यापि पूर्ण झालेले नाही. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची विशिष्ट मर्यादा गाठल्यानंतर हे कार्य पूर्ण होईल असा काहींचा युक्तिवाद आहे. हा युक्तिवाद स्वीकारणे कठीण आहे. शिक्षण हा उपचार नाही. वयाची १४ वर्षे पूर्ण केलेल्या मुलांमुलींकडून संपादणुकीच्या ज्या किमान अपेक्षा आहेत त्या पूर्ण झाल्याशिवाय हे उद्दिष्ट साध्य होणार नाही. गळतीचा ७७ टक्के पर्यंतचा दर लक्षात घेता केवळ शाळाप्रवेशाला अर्थ उरत नाही.

४.७३. या परिस्थितीला सर्वसामान्य लोकात दिसून येणारी शिक्षणाविषयीची उदासीनता, दारिद्र्य, शिक्षणाचा जीवनाशी संबंध नसणे, स्त्री शिक्षकांची कमतरता आणि साधनसामग्रीची उणीव या गोष्टी कारणीभूत आहेत. राज्या-राज्यात, राज्यातील विविध भागात, अनुसूचित जाती-जमाती व मुली, ग्रामीण आणि शहरी भाग यांच्या शिक्षण विकासात असमतोल निर्माण झालेला आहे. मधल्या वेळचे जेवण, पुस्तके व गणवेश यांचा मोफत पुरवठा आणि शैक्षणिकदृष्टया मागास असलेल्या ९ राज्यांत एकशिक्षकी शाळांत स्त्री शिक्षक नेमण्यासाठी केंद्रीय साहाय्य या योजनांमुळे स्थितीत फारसा फरक पडला नाही. म्हणून अंशकालीन शाळा व अनौपचारिक वर्ग सुरू करण्याची योजना पुढे आलेली आहे. त्यामुळे कुटुंबाकरिता अर्थार्जन करणारी मुले घरकाम करणाऱ्या व लहान मुलांना साभाळणाऱ्या मुली यांच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल. अर्थार्जन करणारी मुले शाळेत आल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई करून शाळेच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी समाजाचा सहभाग व शाळेच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी शिक्षकांवर समाजाचे मूल्यमापनात्मक नियंत्रण या सूचनांचा विचार करता येईल. मुलांच्या औपचारिक व अनौपचारिक शिक्षणासाठी स्त्रियांचा सहभाग मिळावा म्हणून शैक्षणिक अर्हता व किमान वय यात सूट, स्त्रियांची नेमणूक व प्रशिक्षण यांची त्याच गावात सोय करणे व शाळा हे समाज सहभागाचे केंद्र बनविण्याची शक्यता अजमावणे या सूचनांना अनेकांनी पाठिंबा दिला आहे. ग्रामीण भागात नियुक्त झालेल्या सुशिक्षित लोकांना प्रशिक्षण देऊन त्यांचा उपयोग मुलांच्या शिक्षणाकरिता करून घेता

येईल. त्यांनी मुलांचा सखोल अभ्यास करवून घ्यावा व त्यांना इ. ५ वी च्या व ८ वींच्या बाह्य परीक्षांना बसवावे, अशी योजना आखता येईल. या मोबदल्यात त्यांना प्रत्येक विद्यार्थ्यामागे ठराविक रक्कम द्यावी लागेल.

**प्राथमिक शिक्षणाची पर्यायी योजना**

४.७४. एकात्मिक बालविकास योजनेतील अंगणवाडीत ज्या मुलांचे पूर्वप्राथमिक शिक्षण झाले आहे- अशी मुले पुढील शिक्षणात टिकून राहतात, असे अभ्यासातील निदर्शनास आले आहे. हा अनुभव जमेस धरून व मुलींना करावे लागणारे घरगुती काम लक्षात घेऊन, प्राथमिक शिक्षणाबाबत संपूर्णपणे निराळा दृष्टीकोन स्वीकारण्याची सूचना करण्यात आलेली आहे.

४.७५. ग्रामीण भागातील गरीबांच्या ११ वर्षांपुढील मुलांना शिक्षण देण्याची एकमेव योजना भारतीय परिस्थितीत स्वीकारणे शक्य नाही. त्यासाठी एक सर्वंकष योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. एकात्मिक बालविकास योजनेखाली अंगणवाड्याच्या साहाय्याने मुलांना तीन वर्षाचे पूर्वप्राथमिक शिक्षण व त्याला जोडूनच प्राथमिक शिक्षण एकाच ठिकाणी देता येईल. चौथ्या इयत्तेच्या शेवटी सार्वजनिक परीक्षा घेऊन मुलांना शिक्षणाच्या पुढील प्रवाहात नेऊन सोडता येईल. त्यांना माध्यमिक शाळेत इ. १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता येईल. या योजनेत मुलींना आपल्या लहान भावंडांना शाळेत घेऊन येता येईल. या मुलांची अंगणवाडीत काळजी घेतली जाऊ शकेल. या सोईमुळे मुली आपले पुढील शिक्षण घेऊ शकतील. खुल्या शाळा सुरू करून इ. १० वी पर्यंतच्या अनौपचारिक शिक्षणाची सोय करता येईल. या योजनेत मुलांना इ. १० वी पूर्वीही व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल.

४.७६. अनुसूचित जाती-जमातीच्या मुलांना व मुलींना माध्यमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची फार मोठी जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे. सर्वसामान्यपणे दूर अंतरावरील व एकत्रित शिक्षणाच्या माध्यमिक शाळात मुलींना पाठविण्याची पालकांची तयारी नसते. आर्थिक मर्यादांमुळे मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू करणे व गावाजवळच

मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे यासाठी शाळांची संख्या वाढविणे शक्य नाही. अशा स्थितीत औपचारिक शिक्षणाऐवजी कौशल्ये, ग्रामीण परिस्थिती व रोजगार संधी, यांच्याशी निगडित व्यावसायिक शिक्षण देण्याचा पर्याय शोधावा लागेल. यासंबंधी फारशा सूचना आलेल्या नाहीत. आलेल्या सूचना अशा :—ट्रायसेम योजनेशी प्राथमिकोत्तर प्रशिक्षणाची सांगड घालणे व त्यासाठी सामूहिक तंत्रनिकेतनाची मदत घेणे, फिरत्या शाळांची स्थापना करणे व त्यांना दूर शिक्षणाची व मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप यांची जोड देणे.

**प्रौढ शिक्षण**

४.७७. देशात ६४ टक्के लोक निरक्षर आहेत आणि त्या त्या कुटुंबात प्रथमच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी आहे. ज्या देशात सुशिक्षितांची संख्या जास्त असते, त्या देशातील लोकांचे शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्षमतेवर लक्ष असते. भारतात अशी स्थिती नाही. येथील शैक्षणिक व्यवस्थापन करणारे व इतर यांच्या शैक्षणिक दर्जात फार मोठी तफावत आहे. शिक्षणपद्धतीच्या यशस्वीतेसाठी शिक्षणाचे लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे. निरक्षरता निर्मूलन तसेच समाजात शैक्षणिक वातावरण निर्माण झाल्याशिवाय देशाची एकविसाव्या शतकाकडील वाटचाल सार्थपणे होऊ शकणार नाही.

४.७८. दुर्दैवाने प्रौढ शिक्षण-कार्यक्रमाचा प्रभाव फारसा दिसून येत नाही. विशिष्ट वयोगटातील लोकांना त्यांच्या जीवनाशी निगडित असलेले ज्ञान देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास व जीवनस्तर उंचावण्यास योग्य वातावरण निर्माण करण्याऐवजी फक्त साक्षरतेवरच भर देण्याचा हा परिणाम असावा. सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनासाठी लोकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळाल्याशिवाय प्रौढ शिक्षण कार्यक्रम जोमाने चालविता येणार नाही. विकास आणि उत्तरजीवित्व यासाठी प्रौढशिक्षणाची नितांत गरज आहे, ही जाणीव निर्माण झाल्याशिवाय प्रौढ शिक्षणाद्वारे राष्ट्रीय उद्दिष्टे कशी साध्य होऊ शकतील हे ठरविता येणार नाही.

४.७९. दारिद्रय निर्मूलन व उत्पादकता विकास यासाठी ग्रामीण विकास कार्यक्रमांची योजना केली जाते. त्यासाठी केलेल्या प्रयत्नांना प्रेरणा वर्तन-बदल व निवड करण्याची क्षमता यांची आवश्यकता असते. हे साध्य होण्यासाठी संबंधित विषयाचे सविस्तर ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. कुटुंबकल्याण, आरोग्य, रोगप्रतिकार व बालसंगोपन या विषयाचे ज्ञान मिळविण्यासाठी ज्यांना शाळेत जाता आले नाही अशा बहुसंख्य लोकांसाठी प्रौढ शिक्षण हे एक साधन आहे। असावयास हवे. निरक्षरता आणि बाल मृत्यू, लोकसंख्येची भरमसाठ वाढ, सकस आहाराची कमतरता आणि दारिद्रय यांचा सहसंबंध असतो, ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. लोकशाही राजकीय सहभागावर अवलंबून असते. त्यासाठी प्रौढ शिक्षण महत्त्वपूर्ण आहे.

४.८०. प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे सूत्र-चालन कोणी करावे हा खरा प्रश्न आहे. विकास विभागाशी संबंधित नोकरशाहीला यासंबंधीची भूमिका मान्य आहे ; पण या कार्यक्रमासाठी आवश्यक ती गतिमानता त्यांच्याजवळ आहे का, याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. सेवाभावी संस्था या चळवळीत चांगली भूमिका पार पाडू शकतात ; पण त्यांच्याकडून हे कार्य कसे करून घ्यावे हा मोठा प्रश्न आहे. तसेच संघटित क्षेत्रातील कामगारांच्या साक्षरतेसाठी त्यांच्या मालकांवर कोणती जबाबदारी टाकावी हेही ठरविण्याची गरज आहे. जेथे साक्षरतेचे हे प्रयत्न झाले तेथे औद्योगिक संबंध व उत्पादकता सुधारली असे चित्र दिसते. निरक्षर लोक, सहभागी शिक्षक व विद्यार्थी यांना मिळणाऱ्या लाभांचा अंदाज घेणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्थांचा या कार्यक्रमात सहभाग मिळविण्यापेक्षा शिक्षण व प्रौढ शिक्षण यांचा एकात्म विचार करणे लाभदायक होईल.

**सेवाभावी संस्था**

४.८१ आधुनिक शिक्षणाच्या इतिहासात सेवाभावी संस्थांच्या शैक्षणिक कार्याचा फार मोठा वाटा असल्याचे दिसून येते. थोर राजकीय व धार्मिक नेते तसेच साधू आणि संत यांनी शैक्षणिक संस्था स्थापन करून तरुणांच्या मनांना योग्य वळण दिले. त्यांची दृष्टी बदलून टाकली व त्यांना लोकशिक्षण, समाज सुधारणा व सांस्कृतिक विकास याकामी

लावले. अनेक लोक समाजसेवी संस्थांमध्ये अद्यापि काम करीत आहेत. पण त्यांचा सहभाग वाढविण्याठी खूप मोठा वाव आहे. जेथे शक्य होईल तेथे औपचारिक वा अनौपचारिक शिक्षणाचे व प्रौढ शिक्षणाचे कार्य त्यांच्यावर सोपविणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रयत्न व्हावयास हवा. त्यांची अभिनव विकासाची गती कायम ठेवणारे उपक्रम हाती घ्यावेत अशी अपेक्षा आहे.

४.८२. काही राज्य शासनांनी सेवाभावी संस्थांच्या सहभागाविषयी साशंकता प्रगट केली आहे. याउलट सेवाभावी संस्थांनी शासनाच्या त्यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर टीका केली आहे. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व्यक्ती आणि संस्था यांचा सहभाग मिळविण्याची समाधानकारक व्यवस्था करणे शक्य आहे.

**उच्च शिक्षण प्रवेश**

४.८३. पदवीपूर्व शिक्षणाच्या बाबतीत प्रवेश व संधीची समानता हा प्रश्न नाही; तर मोठ्या संख्येने बेरोजगार तयार करण्यासाठी दुर्मिळ राष्ट्रीय संपत्तीचा होणारा अपव्यय हा खरा प्रश्न आहे. व्यक्तिविकास सामाजिक व आर्थिक समस्या आणि कार्यजगत यांच्याशी शिक्षणाचा सांधा जोडण्यासाठी शिक्षणाच्या विविधतेचा अंगीकार केलेला आहे. त्याचा स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. ज्यांचा बौद्धिक कल आहे, त्यांनाच उच्च शिक्षणाकडे प्रवेश देण्यासाठी प्रभावी उपाय योजले पाहिजेत. शालेय अभिवृत्ती चाचण्यांची पद्धती अनेक देशात गेल्या अनेक दशकांपासून रूढ आहे. यांचा उपयोग भारतात का होऊ नये ?

४.८४. पदव्यांचा रोजगारांशी असणारा संबंध तोडावयाचा असेल तर मालकांच्या सहकार्याने प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. यामुळे उच्च शिक्षणाकडे जाणारा लोंढा थोपविता येईल. दूरशिक्षण पद्धतीच्या साहाय्याने नोकरीत असलेल्या इच्छुकांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून देता येईल.

४.८५. राखीव जागांच्या योजनेतून अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थींना उच्च शिक्षण प्रवेश मिळवून देण्यात आलेला आहे. पण हे

पुरेसे नाही. इतरांच्या बरोबरीने शिक्षणाचा वेग राखता आला, तरच या प्रवेशाला अर्थ आहे. आन्यथा त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतील. ते होऊ नयेत म्हणून त्यांच्यासाठी प्रवेशापूर्वी व नंतर विशेष वर्गाचे आयोजन करणे आवश्यक आहे.

४.८६. सामान्य शिक्षणाच्या पदव्युत्तर पातळीवरील शिक्षण घेण्यासाठी शिक्षणात चांगली गती असणाऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. खास तयार केलेल्या चाचण्यांच्या आधारावर हा शिक्षण प्रवेश नियंत्रित करता येईल. प्रवेशापूर्वी अशा चाचण्यात उत्तीर्ण होणारांनाच पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश द्यावा. नाहीतर ज्यांना वेळ आहे व इतर उद्योग नाहीत ते गर्दी करतील.

**ईशान्य डोंगरी विद्यापीठाचा उपक्रम**

४.८७. ईशान्य डोंगरी विद्यापीठाने विकसित केलेल्या यंत्रणेचा उल्लेख करणे योग्य होईल. इयत्ता १२ वी नंतर विद्यार्थ्यांना दोन वर्षाच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमास प्रवेश दिला जातो. या परीक्षेत ज्या विषयात ४५ टक्के गुण मिळतील त्या विषयाच्या एक वर्षाच्या पुढील विशेष अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल अशी स्पष्ट समज दिली जाते. ज्यांना यापेक्षा कमी गुण मिळतील त्यांना त्या दर्जाला येण्यासाठी दोनदा संधी दिली जाते. यासाठी कोणत्याही एका विषयाची निवड करता येते. यापद्धतीचे अनेक लाभ आहेत :-

१. पदवीपूर्वीच (१४ + ) विद्यार्थ्याला आपली क्षमता व मर्यादा लक्षात घेऊन विशेष अभ्यासाचा विषय निवडता येतो.

२. विशेष विषयांचा अभ्यास करणारे विद्यार्थी इतर विषयांच्या अभ्यासाकडे जे दुर्लक्ष करतात, ते तेथे घडणार नाही.

३. मर्यादित शैक्षणिक क्षमता असणारे विद्यार्थी आपोआप गळतात.

४. संलग्न महाविद्यालयांचे कार्य सुधारण्यासाठी व्यवस्थापनाला व शिक्षकांना प्रोत्साहन मिळते.

४.८८. तांत्रिक व व्यवस्थापन शिक्षणात अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. ज्यांना प्रात्यक्षिक ज्ञान व पूर्वानुभव आहे अशा सर्वसामान्य मुलांना

तांत्रिक व व्यवस्थापन शिक्षणात प्रवेश देण्याची तरतूद होणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती-जमातींच्या मुलांना प्रवेशपूर्व व प्रवेशोत्तर प्रशिक्षण पुरेसे नाही. त्यांचे बालपणीचे वातावरण, सामाजिक दडपणे आणि आत्मविश्वासाचा अभाव हे त्यांच्यापुढील खरे प्रश्न होत. वयाच्या सहाव्या व आठव्या वर्षी या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे व त्यांच्या विकासातील अडथळे दूर केले पाहिजेत.

**उच्च फी आकारणाऱ्या महाविद्यालयांचा उदय**

४.८९. काही राज्यात समतेच्या प्रश्नाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मोठ्या संख्येने उघडलेली अभियांत्रिकी महाविद्यालये प्रवेशाकरिता मोठी देणगी घेतात. ही महाविद्यालये पालकांच्या आर्थिक स्थितीवर मुलांना प्रवेश देतात, त्यांच्या गुणवत्तेवर नाही, अशा प्रकारची तीव्र भावना व्यक्त करण्यात येत आहे. त्या पद्धतीवर बंधन घालण्याची आवश्यकता प्रतिपादन केली जात आहे. याउलट या महाविद्यालयांच्या व्यवस्थापकांचे म्हणणे असे आहे की, ज्यांची ऐपत आहे अशा सुखवस्तु लोकांना त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा पूर्ण खर्च घेऊन त्यांना तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे. तसेच या शिक्षणाच्या प्रसाराला हातभार लावला जात आहे. एका गटाची अशी शिफारस आहे की, या महाविद्यालयातील २५ ते ५० टक्के जागा शासनाने गुणवत्तेवर भराव्यात व त्याकरिता देणगी द्यावी लागू नये.

**शिक्षक प्रशिक्षण**

४.९० शिक्षक प्रशिक्षणाच्या संदर्भात समानतेचा व प्रवेशाचा प्रश्न नाही, तर विद्यार्थ्यांच्या कमी गुणवत्तेचा आहे. शिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका व शिक्षकांचे शिक्षण प्रक्रियेतील निर्णायक स्थान लक्षात घेता शिक्षक-प्रशिक्षण संस्थातील भरती करताना अभिवृत्ती व संपादन चाचण्यांचा काटेकोरपणे उपयोग करणे आवश्यक आहे. विज्ञानाचे विद्यार्थी, खेळाडू आणि शरीराने बळकट असलेले व विविध अभिरुचीचे लोक यांचाही भरतीच्या वेळी विशेष विचार झाला पाहिजे.

४.९१. सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची व शिक्षकांच्या सेवांतर्गत किंवा निरंतर शिक्षण व्यवस्थेची गरज असल्याची जाणीव मोठ्या प्रमाणात होत आहे. ज्ञानाच्या प्रसाराने व विद्यार्थ्यांच्या जागृतीमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना शिक्षकांना सामोरे जावे लागत आहे. पालकांची अभिवृत्ती व मूल्ये, सामाजिक आंतर-क्रिया, सवंगडी, इत्यादींचा विद्यार्थ्यांवर प्रभाव पडतो. रेडिओ, दूर-चित्रवाणी आणि चित्रपट यांचा शिक्षण प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे शिक्षकांचे काम अधिकच अवघड झाले आहे. या माध्यमांचे पुनर्मूल्यमापन होण्याची गरज आहे. पण त्याचबरोबर शिक्षकांच्या प्रभावी व सातत्याने होणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज आहे.

**आंतरसंबंध व संकुचितता**

४.९२. समाजाच्या विविध थरातील मुलांच्या शिक्षण प्रवेशाच्या प्रश्नात येणाऱ्या अडथळ्यांचा विचार होणे आवश्यक आहे. एका विद्यालयातून दुसऱ्या विद्यालयात होणाऱ्या स्थलांतरात येणाऱ्या अडथळ्यांबाबत काहींनी चिंता प्रगट केली आहे. स्थानिक विद्यार्थ्यांकरिता राखीव जागा, त्याच विद्यापीठाच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्राधान्य यासारख्या अडथळ्यांचा समस्तर गतिमानतेत समावेश होतो. विलगता व राजकीयीकरण यातून आंतरसंबंध व संकुचितता निर्माण होते व त्यातून महाविद्यालये व विद्यापीठे यांच्यात अनिष्ट रूढी निर्माण होतात. त्या टाळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाला अधिकार देण्यात यावेत अशी सूचना करण्यात आली आहे.

४.९३. निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांनी स्वीकारलेल्या भाषा धोरणाने संवाहन आणि गतिमानता यात अडथळे निर्माण झाले आहेत. संस्थांचे जाळे, समान अभ्यासक्रम आणि समतुल्य दर्जा, इतरत्र उपलब्ध नसल्यामुळे केंद्रीय विद्यालयांचे जाळे स्थापन करावे लागले. बहुतेक राज्यांनी इतर राज्यांच्या भाषा शिकविण्याची टाळाटाळ केल्यामुळे अडचणीत भरच पडली आहे. या प्रश्नाची भावनात्मकता लक्षात न घेता यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**सामाजिक संबद्धता, विविधता व गुणवत्ता**

४.९४. शिक्षण व शैक्षणिक संस्था आणि समाज व इतर यांच्यात निर्माण झालेल्या दरीबद्दल पुष्कळ बोलून झाले आहे. शैक्षणिक संस्थांचा स्वतंत्रपणे विचार केला तर असे दिसून येते की, परिसराच्या समस्या, सामर्थ्य व गुणवैशिष्टचे यांचा त्यांना विसर पडलेला आहे व त्यांच्याशी त्यांचा संबंध तुटलेला आहे. त्यामुळे संशोधन आणि शैक्षणिक आशय यांची निरुपयोगिता, परिसराच्या सहभागाचा अभाव आणि विद्यार्थी व शिक्षक यांची जीवनाचे वास्तव व कार्यजगत यांच्यापासून झालेली फारकत हे दृश्य दिसते. तांत्रिकदृष्टया सुशिक्षित आणि शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम लोकांचा समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी होणाऱ्या उपयोगापासून शाळेभोवतीचा समाज़ वंचित झालेला आहे.

४.९५. सामाजिक संबद्धता नसल्यामुळे शैक्षणिक संस्थांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. रोजगाराचे व कामाचे जग आणि सामाजिक, सांस्कृतिक प्रक्रियेकरिता आवश्यक असलेली दृष्टी व कौशल्ये त्यांना मिळू शकली नाहीत.

४.९६. समाजोपयोगी उत्पादक कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना आणि इतर तत्सम कार्यक्रम यांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. कारण परीक्षेच्या प्रभावामुळे अभ्यासक्रम, आशय, पद्धती यातून विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीवर अनिष्ट परिणाम झालेला आहे. वर्षानुवर्षे विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीशी मर्यादा निगडीत झाली आहे. तिचा एक साचा बनला आहे. विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व, अभिवृत्ती आणि मूल्य यांच्या मूल्यमापनाशी परीक्षेचा संबंध उरला नाही. विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता व शारीरिक सुदृढता यांचे मापन परीक्षेमुळे होऊ शकत नाही.

४.९७. शिक्षणाचा सामाजिक संबंध लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची रचना अशा प्रकारे झाली पाहिजे की, शिक्षणाने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय वारशाबद्दल आदर वाटला पाहिजे. देशाचे ऐक्य आणि एकात्मता यांच्याशी त्यांचे नाते जडले पाहिजे. त्यातून विद्यार्थ्यांची समजशक्ती वाढून समाज व परिसर यांच्या विकासात त्यांचा सहभाग असला

पाहिजे ही उद्दिष्टचे साध्य होण्यासाठी शिक्षण पद्धतीचा प्रयत्न जीवनाशी सांधा जोडला पाहिजे.

४.९८. शिक्षणाच्या आशयाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध नसल्यामुळे बहुसंख्य लोक व काही बुद्धिवंत शिक्षणाविषयी उदासीन असलेले दिसतात. त्यामुळे पुढारी, नियोजनकार, उद्योगपती इतकेच नव्हे तर शिक्षणाचे प्रत्यक्ष लाभार्थी यांचा शिक्षण प्रक्रियेस सहभाग मिळत नाही.

४.९९. विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकात शालेय इमारती व समाजशिक्षण केंद्रे बांधण्यासाठी आणि त्यांना साहित्य पुरविण्यासाठी लोकांनी श्रम, साहित्य, पैसा यांच्या रुपाने मदत केली, कारण शिक्षणापासून लोकांना खूप अपेक्षा होत्या. त्यांनी स्वत: होऊन मुलांना शाळेत पाठविले व मोठ्या उत्साहाने ते प्रौढ शिक्षण वर्गात प्रविष्ट झाले. या उत्साही आणि आशादायक वातावरणात शिक्षक या कार्यात सहभागी झाले, पण कार्यक्रमांचे उद्दिष्ट आणि कार्यपद्धती या संदर्भात संपूर्ण कार्यप्रणालीचे पुनर्मूल्यमापन झाले नाही. त्यामुळे कार्यक्रमाची पुनर्रचना शक्य झाली नाही. तिचा समाजाशी प्रत्यक्ष संपर्क तुटला, समाज सहभाग मिळाला नाही, सर्व कार्यक्रम नोकरशाहीच्या हाती गेला. त्यातून त्यांनी विशिष्ट लाभ मिळविले व व्यवस्थापनातील देवघेव आणि सामाजिक उत्तरदायित्व यातून सुटका करून घेतली.

४.१००. समाज आणि शिक्षण संस्था यांच्यात संबद्धता निर्माण होण्यासाठी या दोन्हीत सातत्याने आंतरक्रिया होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक संस्थेचे कार्यक्षेत्र लाभार्थी व प्रमाण निश्चित करण्याची आवश्यकता आहे. एकदा ही संकल्पना सविस्तरपणे स्वीकृत झाली म्हणजे समाज संबद्धतेची विविध परिमाणे निश्चित करणे शैक्षणिक नियोजनकारांना शक्य होईल. तसेंच व्यवस्थापची संरचना, उत्तरदायित्व आणि आधार, अभ्यासक्रम आणि इतर यंत्रणांशी समस्तर व क्षितिजलंब संबंध याबाबत निर्णय घेता येतील. यामुळे पद्धती, संस्था आणि शिक्षक व विद्यार्थी यांची अभिवृत्ती यात लक्षणीय परिवर्तन घडून येईल. त्यासाठी नियंत्रणातून अनिष्ट लाभ मिळविणाऱ्यांना दूर सारण्याची गरज आहे.

४.१०१. शिक्षण समाजाशी संबद्ध झाले तर अभ्यासक्रम, आशय व अध्यापन पद्धती यांच्यात बदल घडून येऊन शाळा ग्रामविकासाचे केंद्र बनेल. दूरवर असणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून येणारे तपासनीस शाळांच्या गुणवत्ताविकासास अपेक्षित हातभार लावू शकत नाहीत. कारण ही व्यक्तिनिरपेक्ष पद्धती आहे. स्थानिक समाज मात्र अपेक्षित बदल घडवून आणू शकेल. हे घडून येण्यासाठी मार्गदर्शन आणि सहाय्य यांच्या साधनात अर्थपूर्ण साहचर्य हवे. शैक्षणिक नियोजन, प्रशिक्षण, नियंत्रण, विस्तार आणि कृतिसंशोधनाचा आधार यासाठी विकासगट किंवा जिल्हा नियोजनाचा घटक असला पाहिजे. या मताचा अनेकांनी पुरस्कार केला आहे. जिल्हा शैक्षणिक संस्था स्थापण्याचा प्रयोग जम्मू काश्मिरमध्ये करण्यात आला आहे. अशी जिल्हा केंद्रे प्रत्येक राज्यात स्थापन करण्यापूर्वी या प्रयोगाचा अभ्यास करावा लागेल. प्रत्येक जिल्ह्यात नमुनेदार शाळा स्थापण्याची योजना जिल्हा केंद्रांना काही अशी सहायक ठरू शकेल का, याची तपासणी करावी लागेल.

४.१०२. जिल्हा किंवा विकासगट हा नियोजनाचा घटक असलेल्या विकेंद्रित पद्धतीत विविध क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांकडे योग्य लक्ष पुरविता येईल. शारीरिक किंवा मानसिकदृष्टचा अपंग व ज्यांच्यामुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लागू शकेल अशी विशेष बुद्धिमान मुले यांच्याकडे वेगवेगळे लक्ष पुरविण्याची व त्यांना वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

४.१०३. सामाजिक संबद्धतेच्या धोरणामुळे शैक्षणिक अभ्यासक्रमात व आशयात विविधता येईल. शिक्षणाचा १०+२+३ हा आकृतिबंध हे त्या दिशेने टाकलेले एक पाऊल होते. पण दुर्दैवाने त्याचा आत्मा विकृत होऊन केवळ बाह्याकार रूढ झाला.

४.१०४. शिक्षणाच्या १०+२+३ या आकृतिबंधात दहा वर्षांच्या सामान्य शिक्षणाची तरतूद केलेली आहे. या शिक्षणात विज्ञान, गणित व सामाजिक शास्त्रे यांचा एकत्रितपणे समावेश केलेला आहे. त्यापुढील +२ स्तरावर व्यवसायपूर्व, विद्याविषयक व व्यावसायिक अशा तीन शाखांची विभागणी केलेली आहे. जुन्या आकृतिबंधात बदल करण्याचे कारण असे की, ती व्यवस्था शैक्षणिकदृष्टचा फारशी निकोप

नव्हती. सर्वसाधारणपणे वयाच्या १६ व्या वर्षी विद्यार्थी मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण होत असे. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्याला शाळेपेक्षा वेगळ्या अध्यापन पद्धतीला सामोरे जावे लागत असे. महाविद्यालयात शिक्षकाचा अधिव्याख्याता होतो. त्याचे काम विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान मिळविण्यास व कौशल्ये प्राप्त करून घेण्यास प्रेरणा देणे हे असते. त्यामुळे विद्यार्थ्याला स्वतःच पुढाकार घेऊन अभ्यास करावा लागतो. महाविद्यालयीन शिक्षणाची पहिली दोन वर्षे शालेय शिक्षणात समाविष्ट केल्यामुळे वयोमानाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या क्षमतेशी त्याचा अनुबंध जोडला आहे. ज्या राज्यात +२ स्तरावरील मुले मोठ्या संख्येने कनिष्ठ महाविद्यालयात प्रविष्ट झाली त्या राज्यात नवीन आकृतिबंधामागील +२ स्तराची उद्दिष्टे दुर्लक्षिली गेली.

४.१०५. दहा अधिक दोन या पद्धतीवर इतरही आक्षेप घेतले जातात. (१) या स्तरावरील शिक्षण देण्यासाठी शाळा सुसज्ज करण्याकरिता फार मोठा खर्च करावा लागेल. पूर्वी इंटरमिजिएट स्तरावरील महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च जास्त नव्हता. इंटरमिजिएट व पदवी या अभ्यासक्रमाकरिता प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची एकत्र सोय चालू शकत होती. (२) नवीन अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांवर क्रमिक साहित्याचा मोठा बोजा लादलेला आहे. तो विद्यार्थ्यांच्या क्षमतेच्या मानाने अधिक आहे. याउलट विद्याविषयक नियोजनकार असा युक्तिवाद करतात की, या टीकेत तथ्य नाही. कारण योजना अंशतःच अनुसरली गेली आहे. क्रमिक साहित्याचा बोजा वाटण्याचे कारण इ. १०वी पर्यन्त एकत्रित अभ्याससंच उपलब्ध झाले नाहीत. नवीन अभ्यासक्रमात कला व मानव्य शाखातील अंतर नाहीसे व्हावे आणि भौतिक, रसायन व जीव या शास्त्रांचा अभ्यास सामान्य विज्ञानात समाविष्ट व्हावा ही अपेक्षा होती. परंतु विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांचे अध्यापन पृथकपणे पण एकाच शीर्षकाखाली चालू राहिले.

४.१०६ नवीन आकृतिबंधाच्या समर्थकांच्या मते या आकृतिबंधामुळे संपूर्ण देशात शिक्षणाचा एकच आकृतिबंध रूढ झाला. रचना व अभ्यासक्रम यांच्या संदर्भात राष्ट्रीय शिक्षण पद्धती विकसित होण्याची

शक्यता निर्माण झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना सर्वत्र शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध झाली. याशिवाय मुले मुली असा भेद न करता उच्च शिक्षणाकरिता समान पाया या आकृतिबंधाने निर्माण झाला. विसाव्या शतकाच्या मध्यात ही शिक्षणपद्धती सुरू झाली. या पद्धतीत विज्ञान व गणित हे विषय न घेता मुलींना मॅट्रीक होता येत असे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत स्त्रियांना रोजगार क्षेत्रात अधिक सक्रीय व अर्थपूर्ण भूमिका पार पाडावयाची असते. ही भूमिका लक्षात घेऊन नवीन पद्धतीची निर्मिती केलेली आहे.

४.१०७. शिक्षणाच्या १० + २ पद्धतीचा गाभा कोणता याबद्दल समाजाच्या सर्व स्तरात व सुशिक्षितात मतभेद आहेत. व्यावसायीकरणा-मुळे हा महत्त्वपूर्ण नवीन प्रयोग आहे असे काहींना वाटते. तर बऱ्याच शिक्षणतज्ञांच्या मते नवीन आकृतिबंधाचा संबंध व्यावसायीकरणापेक्षा इ. १० वी पर्यन्तच्या आशय व अध्यापन पद्धती यांच्याशी आहे.

**उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण :**

४.१०८. व्यावसायिक शिक्षण हा १० + २ पद्धतीचा एकात्म भाग आहे की नाही हा वाद एका राज्यात दहावी पुढील व्यावसायिक शिक्षणाच्या उच्च माध्यमिक शिक्षणापासून झालेल्या फारकतीमुळे निर्माण झाला आहे. कै. जे. पी. नाईक (ते भारतीय शिक्षण आयोगाचे सदस्य सचिव होते) यांनी 'दि एज्युकेशन कमिशन अॅन्ड आफ्टर' या पुस्तकात केलेले विधान विचार करण्यासारखे आहे. ते म्हणतात 'शिक्षण आयोगाच्या शिफारशीची काळजीपूर्वक छाननी केली असता असे दिसून येईल की आयोगाचे माध्यमिक स्तरावरील व्यावसायीकरणाचे प्रस्ताव शिक्षणाच्या नवीन आकृतिबंध (१० + २ + ३) स्वीकारण्याशी मुळीच संबंधित नाहीत.' ज्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे त्यांच्यासाठी १ ते २ वर्षांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची तरतूद आयोगाला अपेक्षित होती. पण याउलट उच्च माध्यमिक शिक्षणाच्या बाहेर दोन वर्षांचे पूर्णवेळ व्यावसायिक अभ्यासक्रम राबविण्याची चर्चा होत आहे.

४.१०९. उच्च माध्यमिक शिक्षणाचा रोजगाराशी संबंध जोडला तर त्याचे स्वरूप पूर्णतः निराळे होईल. जर सामान्य विकासाची ती एक

अवस्था गृहीत धरली तर त्याचे स्वरूप उच्च शिक्षणासारखे होईल. उच्च शिक्षणाकडे कोणी जावे व व्यावसायिक शिक्षणाकरिता निवड कशी करावी, हा प्रश्न यातून निर्माण होतो. व्यावसायिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना सरळ रोजगार क्षेत्रात प्रवेश मिळावा इतके कौशल्य त्यांच्यात यावे अशी अपेक्षा करणे योग्य आहे का, हाही प्रश्न निर्माण होतो. व्यावसायीकरणाची संकल्पना आर्थिक नियोजनकारांकडून पुरस्कृत केली जाते. प्रचलित मूल्यांनुसार व्यावसायिक शिक्षणाला व्यवसायपूर्व आणि सामान्य शिक्षण यापेक्षा कमी दर्जा दिला जातो. विभाजनाची ही प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर केली, कमी संपादणुकीचे विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे वळविले तर ज्ञान व कौशल्ये यांचा संबंध उच्च व कनिष्ट कार्यक्रमाशी जोडला जाण्याची चूक होईल. ते परिणामी अनिष्ट होईल.

४.११०. व्यावसायिक अभ्यासक्रम फक्त + २ स्तरापुरते मर्यादित नाहीत ही गोष्ट स्पष्ट होणे आवश्यक आहे. पुढील अभ्यासक्रमास न जाणाऱ्या विद्यार्थ्यांची अभिरुची लक्षात घेऊन इ. ५ वी, ८ वी व १२ वी नंतर देखील सामान्य अभ्यासक्रमाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करणे शक्य आहे व ते झाले पाहिजेत. बहुसंख्य अभ्यासक्रम मात्र इ. १० वी नंतरचे असावेत. व्यावसायिक अभ्यासक्रम फक्त अभियांत्रिकी व तांत्रिक व्यवसायांपुरतेच मर्यादित नाहीत, तर कृषी, व्यापार व वाणिज्य, आरोग्य व निम-वैद्यकीय सेवा, गृहविज्ञान इत्यादी अभ्यासक्रमांचा देखील त्यात समावेश होतो. संबंधित दुय्यम क्षेत्राकरिता मनुष्यबळ तयार करणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या कामाची द्विरुक्ती करणारे हे अभ्यासक्रम नसावेत. सामाजिक, आर्थिक सर्वेक्षणाच्या आधारावर प्रशिक्षणाच्या गरजा या अभ्यासक्रमांमुळे भागविल्या जाव्यात. स्वयंउद्योग व समाजाच्या सेवाक्षेत्रातील गरजांवर आधारित ते असले पाहिजेत.

४.१११. हे कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी असणारी प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता हा एक मोठा प्रश्न आहे. व्यावसायीकरणाची यंत्रणा विचारात घेण्यापूर्वी वारंवार चर्चिल्या जाणाऱ्या काही प्रश्नांचा उल्लेख आवश्यक आहे.

(१) वेगवेगळ्या आकृतिबंधासाठी व वाढीच्या दरासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचा अंदाज करण्यासाठी विश्वसनीय प्रतिमाने उपलब्ध आहेत काय ?

(२) व्यावसायीकरणाचा संघटित किंवा असंघटित क्षेत्रातील रोजगाराशी कितपत संबंध जोडावा ? त्यामुळे विशेषत: ग्रामीण भागातील स्वयंरोजगाराला किती प्रोत्साहन मिळावे ?

(३) व्यावसायिक आणि / किंवा सामान्य शिक्षणात क्षितीजलंब गतिमानता निर्माण करण्यासाठी व्यावसायीकरणाचे आयोजन करावे काय ?

४.११२. व्यावसायीकरणाची एक शाखा + २ स्तराचा अविभाज्य भाग असावा काय ? किंवा व्यावसायिक शिक्षणाची संपूर्ण पद्धतीच स्वतंत्र असावी काय, किंवा उच्च तांत्रिक शिक्षण घेऊन वा उत्पादन केंद्रे यांना जोडून व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची सोय असावी काय यावर अद्याप निर्णय झालेला नाही. व्यावसायिक शिक्षणाचा खर्च गुणवत्ता व व्यवस्थापन यावर या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे.

४.११३. या प्रश्नावर कोणताही निर्णय होवो, जर व्यावसायीकरण जोमाने अंमलात आणावयाचे असेल तर पुरेशा शिक्षकांची व्यवस्था करण्याची प्रथम गरज आहे. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणारे ४० टक्के विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे जातील असे गृहित धरले तरी देशाला हजारो शिक्षक व त्यांना व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी शेकडो संस्था लागतील.

**सामाजिक संबद्धता आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय शिक्षण**

४.११४. तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व विशद करून सांगण्याची आवश्यकता नाही. भारताकडे फार मोठे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध आहे. वैज्ञानिक आणि औद्योगिक विकसास तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षित मनुष्यबळाचा फार मोठा आधार आहे. उत्पादनाच्या नवीन तंत्राशी सांधा जुळविण्यासाठी देशाला विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च गुणवत्ता प्राप्त मनुष्यबळाची गरज आहे. चांगल्या संस्थांतून बाहेर पडणाऱ्या अर्ध बेकारांचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाच्या संपूर्ण गरजेशी निगडित असलेला प्रश्न विचारात घेण्याची निकड आहे.

४.११५. अभियांत्रिकी शाखेतील अधिक बुद्धिवान मुलांना व्यवसायाचा आनंद मिळेल अशा प्रकारचे काम आणि वातावरण मिळत नाही असे वारंवार सुचविले जाते. परिणामी बुद्धिमंतांचा लोंढा विकसित देशाकडे वळतो किंवा ते विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील मूलभूत प्रशिक्षणविषयक व्यवसायाकडे जातात.

४.११६. भारतातील ४५ टक्के पीएच. डी धारक व ६९ टक्के पदव्युत्तर अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले विद्यार्थी संशोधन व विकास यांच्याशी संबंध नसलेल्या व्यवसायात गुंतलेले आहेत. अमेरिकेत हे प्रमाण अनुक्रमे ५ टक्के व ३७ टक्के आणि इंग्लंडमध्ये अनुक्रमे ७ टक्के व ३५ टक्के आहे. आव्हानात्मक संशोधन व विकासात्मक वातावरण यांचा अभाव किंवा प्रशिक्षणाचे स्वरूप किंवा तंत्रज्ञान आयात करण्याचे धोरण या परिस्थितीला कारणीभूत आहेत असे निश्चितपणे म्हणता येणार नाही. पण भारतीयांच्या बुद्धिमत्तेच्या क्षमतेशी सुसंगत असे मौलिक संशोधन फार थोडयांनी केलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

४.११७. तांत्रिक शिक्षण संस्थांची गुणवत्ता सुधारण्याची आवश्यकता आहे, याबद्दल सर्वसाधारण एकमत आहे. त्यांच्यात अद्यावतता आणण्यासाठी संशोधन आणि विकास यांच्या विस्तारासाठी आणि नवीन तंत्रज्ञान विषयक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्राधान्य-क्रमाने विचार होणे आवश्यक आहे. केवळ उपकरणे आणि भौतिक वातावरण यावर संस्थेची गुणवत्ता अवलंबून नसते. समानता, आंतर-क्रियात्मक आणि अनौपचारिक वातावरण, तसेच पुढाकार घेण्यासाठी वाव या गोष्टींचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देखभाल, उत्पादन आणि संशोधन या कार्यात भेदभावाला वाव न देणाऱ्या प्रशिक्षणातून गुणवत्तेची जाणीव वाढीला लागते. देखभालीकडे झालेल्या दुर्लक्षामुळे उपकरणे व तंत्रज्ञानविषयक संरचनेवर केलेल्या फार मोठ्या गुंतवणुकीतून अल्प लाभ मिळतात. भारतीय तंत्रज्ञान संस्था, विभागीय अभियांत्रिकी महाविद्यालये, राज्य अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांचा सामाजिक वापर होण्यासाठी लागणाऱ्या व्यवस्थेचा अभाव यावरही टीका केली जाते. शेती व संलग्न व्यवसायात आणि असंघटित क्षेत्रात

लहान प्रमाणावर कार्य केले जाते असे प्रतिपादन करण्यात आले आहे. या क्षेत्रात विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे ज्ञान आणि त्यात झालेले संशोधन व विकासात्मक प्रगती यांची गरज नाही असा चुकीचा समज पसरलेला आहे. या गैरसमजामुळे समाज आणि तांत्रिक शिक्षण यात दरी निर्माण झाली आहे.

४.११८. भारतासारखा गरीब देश उच्च प्रतीच्या तांत्रिक शिक्षणावर केलेल्या फार मोठ्या गुंतवणूकीतून समाजाला होणाऱ्या लाभाची अपेक्षा करतो. देशाच्या नामवंत तांत्रिक शिक्षण संस्थांतून बाहेर पडणाऱ्या बुद्धिमान विद्यार्थ्यांचा लोंढा बाहेरच्या देशाकडे जाऊ नये म्हणून विद्यार्थ्यांची अभिवृत्ती बदलण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असा दृष्टिकोन मांडला जातो. यावरोबर विकसित देशांकडून विकसनशील देशांकडे येणारा भांडवलाचा ओघ कमी होताना दिसतो. हा लोंढा थांबला तर अमेरिकेला १२ वैद्यकीय विद्यालये सुरू करावी लागतील. अमेरिका परकीय देशांना जी वैद्यकीय मदत देते तेवढीच रक्कम तिला या विद्यालयांवर खर्च करावी लागेल.

४.११९ भारतीय अर्थव्यवस्थेला भारतीय तंत्रज्ञान संस्थांनी मोलाचा हातभार लावला. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची विविध औद्योगिक उत्पादने निगडित करण्यात आली. याचा उद्देश तांत्रिक शिक्षणाला दिशा देणे एवढाच नव्हता, तर या संस्थांतील संशोधन व विकास कार्यासाठी साधनसामुग्री उपलब्ध व्हावी असा होता. या कामाला उद्योगपतींकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही, कारण त्यांच्या गुंतवणूकीवर अपेक्षित लाभांश मिळाला नाही. तसेच परदेशाकडून तंत्रज्ञान विकत घेणे अधिक सोपे आहे असे उद्योगपतींना वाटले असावे.

४.१२०. रशिया व इतर अनेक देशात विशेष व्यावसायिक क्षेत्रांशी निगडित तांत्रिक शिक्षण दिले जाते. विद्युत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या जोडीला विद्युत केंद्राचे व्यवस्थापन, जहाजबांधणी, संगणक, अभियांत्रिकी इत्यादी व्यवसायांचे शिक्षण दिले जाते. राष्ट्रीय पद्धतीत स्वतःची भूमिका लक्षात यावी म्हणून रशियात अभियांत्रिकी विद्यार्थ्याला मानव्य शास्त्रे, सामाजिक आणि राजकीय शिक्षण यातून जावे लागते. भारतातील

अभियांत्रिकी संस्थांत कला व मानव्य शास्त्रांच्या विषयांची सोय असते पण त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

४.१२१. व्यवस्थापन विषयक शिक्षणाचे महत्त्व आणि अर्थ-व्यवस्थेतील भूमिका सर्वांना पटलेली आहे. या शिक्षणावर शासनाकडून होणाऱ्या आर्थिक साहाय्यासंबंधी पुनर्विचार होण्याची गरज आहे. विदेशी विद्वानांच्या संबंधात हे होणे अधिक गरजेचे आहे. व्यवस्थापन संस्थांनी अनेक क्षेत्रांकडे लक्ष पुरविण्याची गरज आहे. विकासाच्या गतीला अद्यावत नसलेल्या शासकीय व्यवस्थापन पद्धतीची खीळ बसते. या संस्थातील संशोधन व विकास कार्यक्रमात या महत्त्वपूर्ण क्षेत्राकडे दुर्लक्ष झालेले आहे. शिक्षण पद्धतीचा विस्तार फार मोठा असून मोठ्या प्रमाणावर रोजगार पुरविणारे ते क्षेत्र आहे याबद्दल वाद नाही. व्यवस्थापन शिक्षण हा या पद्धतीचा एक भाग आहे. विद्यापीठ आणि शालेय पद्धती यांचे व्यवस्थापन त्यांच्या आवाक्यावाहेर गेलेले आहे. त्यामुळे त्यांच्या अकार्यक्षमतेवर चिंता व्यक्त केली आहे. व्यवस्थापन शिक्षण संस्थांनी यासाठी सुयोग्य पर्याय सुचविणे योग्य होईल.

**उच्च शिक्षण : सामाजिक संबद्धता आणि विविधता**

४.१२२. कला, मानव्य आणि विज्ञान शाखातील अभ्यासक्रमांचा समाज आणि कार्यजग यांच्याशी बळकट सांधा जोडण्याची गरज आहे. पदवीपूर्व अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार तात्त्विक ज्ञान, भाषा, संवाहन कौशल्य, संस्कृती, खेळ आणि एक व्यावसायिक कार्यक्रम जोडण्याचा प्रकल्प असला पाहिजे. विद्यार्थ्याला राजकीय तत्त्वज्ञान, लोक-शासन, गणित आणि पत्रव्यवहार हा अभ्यासक्रम घेऊन पदवीधर का होता येऊ नये ? महाविद्यालयीन किंवा विद्यापीठीय विद्यार्थ्यांना खाद्यपेय व्यवस्था, पर्यटन, गिर्यारोहण किंवा प्रौढशिक्षण सर्वेक्षण हाती घेणे, प्रदूषण नियंत्रण ज्ञान व कौशल्ये आणि रोपवाटिका संवर्धन या विषयात गुणवत्ता का प्राप्त करता येऊ नये ?

४.१२३. पारंपारिक पद्धतीची महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या विस्तारावर बंधन असावे असा विचार मांडण्यात आला आहे. नवीन महाविद्यालये व विद्यापीठे यांनी फक्त श्रमाशी व समाजाशी संबंधित

अभ्यासक्रम सुरू करावेत. या अभ्यासक्रमाशी इतर विषयांचा अनुबंध असावा. शेती आणि गृह अर्थशाळा, वने आणि भू व जलविकास, पीक कापणीनंतरचे तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि खरेदी–विक्रीव्यवस्था, नगर नियोजन आणि परिवहन व्यवस्थापन किंवा लोकशासन आणि कार्यालय व्यवस्थापन या अभ्यासक्रमांचे शिक्षण देणारी पदवीपूर्व महाविद्यालये ग्रामीण, नागरिक व विभागीय विकासाला हातभार लावू शकतील. कार्यजगत आणि ज्ञान याचा सांधा जोडलेला दिसत नाही. हा सांधा जोडण्यासाठी सुसूत्र प्रयत्नांची गरज आहे.

**गुणवत्ता आणि शिक्षण**

४.१२४. शिक्षणाच्या गुणवत्ता विषयक बाबींवर मागील प्रकरणात सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेला शिक्षण पद्धतीत प्रमुख स्थान कसे दिले जाईल याचा विचार करणे संयुक्तिक होईल.

४.१२५. गुणवत्तेची, विशेषत: शिक्षण प्रक्रियेच्या संदर्भात व्याख्या करणे कठीण आहे. गुणवत्तेची जाणीव असलेल्या पद्धतीतून कार्यात्मक आणि समाजसंबद्ध गुणधर्म, मानसिक चापल्य आणि शारीरिक सुदृढता, कार्यक्षमता व विश्वासार्हता, विश्वास आणि प्रभावीपणे संवाहन करण्याची क्षमता, नवीन परिस्थितीत पुढाकार घेऊन अभिनव उपक्रम हाती घेण्याची क्षमता व प्रयोगशीलता ही गुणवैशिष्टये असलेल्या व्यक्ती निर्माण होतात. ऐक्य, एकात्मता व दुर्बल व वंचितांच्या कल्पनांशी संबंधित मूल्यसरणी यांची वरील गुणधर्मात भर घालता येईल.

**परीक्षा पद्धती**

४.१२६. ज्या पद्धतीत प्रत्येक बाबीवर परीक्षा आणि श्रेणी यांचा प्रभाव असतो व इतर बाबींना गौण स्थान मिळते, त्या पद्धतीत वरील वैयक्तिक गुणधर्माकडे त्यांच्या मूल्यमापनाची व गुणांकनाची सोय असल्याशिवाय लक्ष पुरविले जात नाही. हे करण्यासाठी अभ्यासक्रमाचा आशय, क्रमिक साहित्य आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रिया यांच्यात आमूलाग्र परिवर्तन होण्याची गरज आहे. हे कार्य कोण करू शकेल

आणि ते कसे करता येईल यावर काळजीपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. या संदर्भी हे स्वयंस्पष्ट आहे की, सध्याच्या वार्षिक परीक्षेच्या पद्धतीत सुधारणा होणे आवश्यक आहे. कारण इतर घटकांपेक्षा ही परीक्षा गुणवत्तेच्या ऱ्हासाला कारणीभूत झाली आहे. आता अशी अवस्था आलेली आहे की, परीक्षा घेणारी यंत्रणा, अध्यापक व व्यवस्थापन यापैकी कोणाला परीक्षेच्या वाईट निकालाला जबाबदार धरावे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. अध्यापनपद्धती, अध्यापनाला दिला जाणारा वेळ, विद्यार्थ्यांची अभिवृद्धी, मर्यादा आणि सामर्थ्य यांच्या संदर्भात अभ्यासक्रम व मूल्यमापन पद्धती कालविसंगत झाली आहे. तौलनिक अभ्यास पद्धती, विश्लेषण, अभिरूपता कार्य आणि कृषीसंशोधन यांचा अभ्यासक्रमाच्या क्षेत्रात असलेला अभाव प्रामुख्याने जाणवतो.

४.१२७. पुढील तीन घटक शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. (१) कुवत, व्यावसायिक नीतिमत्ता आणि शिक्षकाचे अध्यापन कौशल्य, (२) बुद्धिवंतांच्या गुणात्मक क्षमतांना कमी लेखणाऱ्या संस्थांची काळजीपूर्वक निवड वा स्थापना, (३) अध्ययन–अध्यापनाची प्रभावी व सुस्थापित पद्धती. अनेक शतकांपासून ऑक्सफर्ड व केंब्रिज आणि आता काही दशकांपासून हार्वर्ड येल व स्टॅन्फोर्ड विद्यापीठांनी आपल्या पुढाकाराने व गुणवत्तेने इतर संस्था प्रभावित केल्या आहेत. शिक्षणाच्या विविध स्तरांवर अशा संस्था स्थापन झाल्या पाहिजेत.

४.१२८. शिक्षण प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम बदलण्याची तातडीची गरज आहे. प्रशिक्षण सध्याच्या विषयज्ञानाशी, संवाहन तंत्रांशी आणि शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेशी जोडण्याची आवश्यकता आहे. सुदृढ व संबद्ध मूल्यपद्धती याबरोबरच सामाजिक जागृती, तातडीच्या राष्ट्रीय गरजा, शारीरिक विकास व खेळ आणि भारताच्या सांस्कृतिक वारसाची समृद्धता यावर अभ्यासक्रमात भर देण्याची आवश्यकता आहे. सध्याच्या शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमातून शिक्षकाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी अपेक्षित सर्वज्ञान, अभिवृत्ती व कौशल्ये विकसित होऊ शकत नाहीत. प्रशिक्षणाचा कालावधी वाढविणे असा याचा अर्थ होऊ शकेल. याशिवाय छात्राध्यापकांसाठी प्रभावी मूल्यमापन पद्धती काळजीपूर्वक विकसित करावी लागेल.

४.१२९. शिक्षण प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे सुपरिणाम दीर्घ-कालीन असल्यामुळे थोड्या कालावधीत शिक्षकांना काळजीपूर्वक तयार केलेल्या कार्यक्रमाद्वारे सातत्याने व मोठ्या प्रमाणावर पुर्नप्रशिक्षण देण्याची गरज आहे. या नियत कार्यासाठी सर्व प्रशिक्षण संस्थांतून उपलब्ध असलेल्या सेवा व साधन सामग्री यांचा उपयोग करून घ्यावा लागेल.

**शिक्षणासाठी व्यवस्थापन पद्धती**

४.१३०. शिक्षणाच्या व्यवस्थापन पद्धतीचाही काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण मंडळाप्रमाणे बहुसंख्य विद्यापीठे संलग्न महाविद्यालयाच्या ओझ्याने दबून गेलेली आहेत. त्याच-बरोबर उत्कृष्ट महाविद्यालयांचे काम इतर महाविद्यालयांच्या कारभारा-मुळे झाकोळून गेलेले आहे. बऱ्याच काळापासून उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याची मागणी होत आहे पण त्या दिशेने अद्यापि प्रगति झालेली नाही. ही परिस्थिती त्वरित बदलली पाहिजे. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यातील आश्रयदाता व आश्रित हे नाते बदलून त्यांच्या सहभागाचे व सामाजिक जबाबदारीचे नाते विकसित व्हावयास हवे.

४.१३१. युरोप, अमेरिका व दक्षिण आशिया खंडातील बहुतेक विद्यापीठात संलग्न महाविद्यालये हा प्रकार अस्तित्वात नाही. पण यामुळे शिक्षणाची गुणवत्ता घसरल्याचे दृश्य दिसत नाही. भारतीय तंत्रज्ञान संस्था संबंधित विद्यापीठाशी संलग्न केल्या असल्या तर त्यांची उत्कृष्टाकडील वाटचाल अधिक चांगली झाली असती. या विधानात तथ्य उरत नाही. उच्च शिक्षण स्तरावर शिक्षण प्रक्रियेच्या विकेंद्रीकरणा-मुळे शैक्षणिक गुणवत्तेवर कितपत परिणाम होतो याची सविस्तर छाननी होण्याची आवश्यकता आहे.

४.१३२. कुलगुरू आणि इतर मंडळी यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या यात असलेले असंतुलन विविध मंडळांच्या विद्याविषयक व व्यवस्थापकीय कार्यात उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या व्यवस्थेचा अभाव ही विद्यापीठीय व्यवस्थापनाची वैशिष्टये आहेत. विविध विद्याशाखा, धोरण ठरविणारी मंडळी आणि कुलगुरू यांच्यातील प्रत्यक्ष

संबंधातील दर्शन घडविणारा बदल सध्याच्या पद्धतीत झाला पाहिजे. विद्यापीठे व महाविद्यालये यांची स्वायत्तता व उत्तरदायित्व निश्चित करण्यासंबंधी मतभेद आहेत. विद्यापीठ पद्धतीची सामाजिक जबाबदारी व त्यांच्या आस्थापनेवर व व्यवस्थापनावर होणारा समाजाचा खर्च यासंबंधी दृष्टीकोन यावरून स्पष्ट होतो. विद्यापीठे व त्यांच्या विविध शाखा व मंडळे यांच्या स्वयंपूर्णतेतून तसेच प्रोत्साहन व बंधने यांच्या तरतुदीतून त्यांच्या स्वायत्ततेला बळकटी येऊ शकेल.

४.१३३. शिक्षक संघटनांनी आचारसंहिता तयार करावी ही कल्पना वारंवार चर्चिली जाते. शिक्षक आयोगाने अशी शिफारस केली आहे की, या संघटना आचारसंहिता तयार करू शकल्या नाहीत तर, शासनाने ते काम करावे. तथापि शिक्षकांकरिता आचारसंहिता तयार करण्यापेक्षा ही समस्या मोठी आहे. महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या कामाचे मूल्यमापन कसे करावे, विद्यार्थ्यांच्या संपादणुकीला किती भारांश द्यावा, परीक्षा सुरळीतपणे पार पाडणे, महाविद्यालये व विद्यापीठे यांचे नियमित चालणे, संशोधनाची गुणवत्ता व प्रमाण इत्यादी संबंधी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सेवाज्येष्ठतेच्या आधारे आपोआप पदोन्नती देण्याचे प्रमाण किती असावे याचा निर्णय करण्याची आवश्यकता आहे. नुसत्या उत्तम अध्यापनाची कळकळ व गरज राहणार नाही. मध्यम प्रतीचे व गुणवंत यांच्यात जिथे फरक केला जात नाही तेथे बुद्धिमान व कल्पक तरुण कसे मिळतील. महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांचे वेतन व निवासासारख्या इतर सोयी सवलती ठरविताना उच्च गुणवत्तेचा विचार करण्याची पद्धती अंमलात आल्याशिवाय उच्च गुणवत्ताधारक व्यक्ती या क्षेत्राकडे वळणार नाहीत व टिकणार नाहीत.

४.१३४. उच्च शिक्षण संस्थांना मुळात संशोधनाकरिता आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले पाहिजे. अशी सूचना करण्यात आली आहे. इतर अभ्यासक्रमासाठी ज्यांची ऐपत असेल त्यांनी त्यांचा खर्च करावा. विशेष गुणवत्ताधारक व सामाजिकदृष्टया दुर्बल व वंचित यांना शिक्षणाकरिता शिष्यवृत्त्या देण्यात याव्यात. यामुळे या संस्था संशोधनाकडे अधिक लक्ष पुरवितात. संशोधनकार्याच्या अभावामुळे या संस्थांचे स्वरूप

विद्याविषयक संस्था म्हणून उरलेले नाही.' विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान देण्याची क्षमता, त्या त्या विषयाचे ज्ञान यापेक्षा निराळी कौशल्ये व दृष्टी यांची शैक्षणिक व्यवस्थापनास आवश्यकता आहे. केवळ मोठ्या संस्थेने व संघटनात्मक पद्धतीने संस्था चालविणे पुरेसे नाही. त्याकरिता शैक्षणिक प्रशासकांच्या प्रशिक्षणासाठी सुयोग्य अध्यापन पद्धती विकसित होणे गरजेचे आहे.

**शिक्षणाची राजकारणापासून विलगता**

४.१३५. शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण राजकारणापासून मुक्त असावे असे विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासक यांनी प्रतिपादन केले आहे. त्याशिवाय या संस्थांचे कार्य चांगले होणार नाही व त्यात अध्यापनाला योग्य वातावरण निर्माण होणार नाही असे त्यांचे मत आहे. भावी नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सहभाग घेता यावा यासाठी राजकीय शिक्षणाची गरज मात्र अनेकांनी प्रतिपादली आहे. याचा अर्थ असा की, राजकीय समस्यांवर बौद्धिक पातळीवर या संस्थांत चर्चा व्हावी पण विद्यापीठाचे प्रशासन एखाद्या पक्षाच्या लाभाकरिता राबविण्यात येऊ नये यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व इतर सत्ताधारी पक्ष यांनी स्वत:वर बंधने घालून घेतली पाहिजेत. या प्रश्नावर सर्वांचे एकमत होण्याची आवश्यकता आहे. यासाठी कायदेशीर उपाययोजनेची गरज आहे का याचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

४.१३६. या सूचनांशिवाय शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी आणि पुनर्रचनेसाठी अनेक बाबींवर तातडीने विचार करण्याची आवश्यकता आहे. केंद्र, विभाग, राज्य व जिल्हा पातळ्यांवर स्वयंपूर्ण व प्रभावी संरचना स्थापन करण्याची प्रामुख्याने निकड आहे. विविध कार्यक्रम, विश्वसनीय अभ्यास, सामुग्री, पद्धती आणि कार्यक्षमतेचे मूल्यमापन करणारी वस्तुनिष्ठ मूल्यमापन पद्धती विकसित करण्यासाठी विविध पातळ्यांवर नियोजन प्रक्रिया सुरू करण्याची गरज आहे. नियोजनाबरोबरच विविध शाखांशी संबंधित ज्ञान, पद्धती, कौशल्ये व नवतंत्रज्ञान यांच्यात परस्पर संबंध विकसित होण्यासाठी पद्धतशीर संशोधन, अभिनव उपक्रम आणि प्रयोग यांची पुरेशी तरतूद करण्याची आवश्यकता आहे

शिक्षण आणि इतर कार्यक्रम यांच्यात सुसंवाद, केंद्र व राज्ये यांचे सहकार्य यातून समस्तर व क्षितिजलंब संबंध विकसित व्हावेत म्हणून सुयोग्य संस्थात्मक व्यवस्था असली पाहिजे.

४.१३७. असा सुसंवाद स्थापन होण्याची आवश्यकता निर्विवाद आहे. यासाठी शिक्षण, क्रीडा व संस्कृती यात परस्पर संबंध असले पाहिजेत. खेळात सहभागी होण्यासाठी सोयी व प्रशिक्षण उपलब्ध करून दिल्याशिवाय विद्यार्थ्यांचे चारित्र्यसंवर्धन, शारीरिक विकास किंवा सामाजीकरण करण्याचे कार्य शिक्षणाने होणार नाही. शारीरिक शिक्षणाच्या सोयीशिवाय महाविद्यालय व शाळा यांना पूर्णत्व येणार नाही. त्याचप्रमाणे संस्कृतीच्या समृद्धीशिवाय भूतकाळाचे यथार्थ दर्शन, नवनिर्मितीक्षमता व जीवनातील उत्तम गोष्टीत आनंद उपभोगणे या बाबी शिक्षण विद्यार्थ्यांना देऊ शकणार नाही.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य**

४.१३८. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रात जवाहरलाल नेहरूंनी भारताला महत्त्वपूर्ण स्थान मिळवून दिले. एखाद्या सत्तागटाशी बांधिलकी न स्वीकारता भारताने सर्व देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आहेत. परस्पर आदरभाव, इतरांच्या कारभारात हस्तक्षेप न करणे व सक्रीय सहकार्य या आधारावर आमचे तृतीय जगतात स्थान निश्चित झाले आहे. अलिप्तता, राष्ट्राचे ऐक्य आणि नवीन जागतिक अर्थव्यवस्था यांना आपण नेहमीच पाठिंबा दिला आहे. या धोरणाने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्य यांना प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे भारताला राष्ट्रसमूहात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

४.१३९. युनेस्कोच्या स्थापनेपासून भारताने त्याच्या उद्दिष्टांना मान्यता दिली आहे. नवीन माहितीव्यवस्था स्थापन करणे व विभागीय सहकार्य बळकट करणे यात भारताने सक्रीय सहभाग घेतला आहे. राष्ट्रकुलाच्या सर्वात जुन्या सदस्यांपैकी भारत आहे. शैक्षणिक व सांस्कृतिक संदर्भात राजकीय व आर्थिक प्रश्नांच्या पलीकडे जाऊन भारताने आपली भूमिका बजावलेली आहे. विकसनशील देशांशी तांत्रिक सहकार्याची अनेक क्षेत्रे भावीकाळात उपलब्ध होणार आहेत. उच्च दर्जाच्या तांत्रिक व व्यावसायिक संस्थांचे जाळे निर्माण करण्यासाठी

विकसनशील देशांचे परस्पर सहकार्य मिळविणे, बुद्धीमंतांची, विद्यार्थ्यांची आणि कलाकारांची देवघेव यांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठा वाव निर्माण होणार आहे. गेल्या अनेक शतकापासून जे देश आमच्या समाईक वारस्यात भागीदार आहेत त्यांच्याशी सांस्कृतिक व शैक्षणिक बंध पक्के करण्यात आम्हाला विशेष रस आहे.

**एकात्म शिक्षण योजनेची रूपरेषा**

४.१४०. राष्ट्रीय अग्रक्रम, साधनसामग्रीच्या मर्यादा आणि अनेक कार्यक्रमांचे परस्परावलंबित्व यांच्या आधारावर एकात्म शिक्षण योजनेचे संकल्प चित्र रेखाटणे आवश्यक आहे.

४.१४१. विकास, एकात्मता, उत्कृष्टता आणि समता यासंबंधीची राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य व्हावीत, म्हणून प्रत्येक मुलाला किमान शिक्षण मिळाले पाहिजे. आजच्या काळाची आव्हाने पेलण्यासाठी व व्यक्तिमत्त्व विकास परिसराच्या मर्यादा व सामर्थ्य यांचा वेध घेण्याची क्षमता, मूल्यांची जपणूक, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमता यांच्या विकासासाठी किमान शिक्षणाची गरज आहे, तेव्हा प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हा राष्ट्रीय धोरणाचा महत्त्वपूर्ण घटक असला पाहिजे. सार्वत्रिकीकरण दुसऱ्या दृष्टीने देखील महत्त्वाचे आहे. कारण त्याशिवाय गळतीच्या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष वेधले जाणार नाही.

४.१४२. अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणासाठी व विस्तारासाठी उच्चशिक्षित, प्रशिक्षित प्रेरणा असलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची राष्ट्रीय धोरणात तरतूद असली पाहिजे. प्रगत देशांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या देशाने योग्य ती क्षमता प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. उच्च प्रतीची बुद्धीमत्ता सत्कारणी लावण्यासाठी व तिची जोपासना व्हावी म्हणून सर्व स्तरांवर उत्कृष्ट शैक्षणिक संस्था स्थापन करण्याची निकड आहे.

४.१४३. मूलभूत संरचना व आधुनिक सोयीसुविधा असल्याशिवाय उच्च व अभिप्रेत तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन व व्यवस्थापन टिकणार नाही. तंत्रनिकेतने, व्यावसायिक माध्यमिक शिक्षण, भारतीय

तंत्रज्ञान संस्था, सामूहिक तंत्रनिकेतने आणि तत्सम इतर संस्थांमधून प्रशिक्षित तंत्रज्ञ तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर व्यावसायीकरणाची गरज आहे. या प्रशिक्षण प्रक्रियेच्या गरजा भागविण्यासाठी या संस्था सुसज्ज करण्याची गरज आहे.

४.१४४. उपरिनिर्दिष्ट उद्दिष्टे व मूल्ये, अभिवृत्ती आणि लोकांचा सहभाग यावर आधारित उद्दिष्टे अज्ञान व उदासीनतेच्या वातावरणात साध्य होणार नाहीत. शिक्षणाचे महत्त्व, लोकसंख्या नियंत्रण, आरोग्य, पर्यावरण व सजीवसृष्टी, कायदा व सुव्यवस्था आणि राष्ट्रीय ऐक्य व अस्तित्त्व यासंबंधी तातडीच्या राष्ट्रीय गरजा याबाबीही रुजू शकणार नाहीत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. त्याला सर्व प्रसारण माध्यमे, सुशिक्षित नागरिक यांचे पाठबळ मिळणे आवश्यक आहे. विकास, कठोर परिश्रम आणि उत्कृष्टता यासाठी संपूर्ण वातावरण निर्माण करण्याकरिता सर्वांचा सहभाग असलेले कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे.

४.१४५. राष्ट्रीय धोरणात दीर्घकालीन शैक्षणिक योजनेचा समावेश असला पाहिजे. यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या गरजा, नवीन तंत्रज्ञानाला समर्थपणे व कल्पकतेने सामोरे जाणाऱ्या उच्च प्रतीच्या मनुष्यबळाची निर्मिती, विविधतायुक्त व्यावसायीकरण आणि बदल व विकास यासाठी पोषक वातावरण यांचा अंतर्भाव असेल. यासाठी प्रौढ व निरंतर शिक्षणातून गुणवत्ता साधण्यावर भर असेल. या एकात्म शिक्षण योजनेत विविध यंत्रणांकडे निश्चित भूमिका सोपवून सविस्तर योजना आखण्याचे व त्या कार्यान्वित करण्याचे काम द्यावे लागेल. हे शैक्षणिक धोरण वास्तव प्रगमनशील होण्यासाठी संरचनेत आंतरक्रिया व एकात्मता असणे अत्यावश्यक आहे.

□ □ □

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

## विभाग–दुसरा

अनुक्रम


१. प्रास्ताविक

२. शिक्षणाचे सार आणि भूमिका

३. राष्ट्रीय शिक्षण पद्धती

४. समानतेसाठी शिक्षण

५. विविध स्तरांवर शिक्षणाची पुनर्रचना

६. तांत्रिक व व्यवस्थापन विषयक शिक्षण

७. पद्धती कार्यान्वित करण्याबाबत

८. शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया यांचा पुनर्विचार

९. शिक्षक

१०. शिक्षणाचे व्यवस्थापन

११. साधनसंपत्ती आणि आढावा

१२. भवितव्य

प्रकरण १ ले

# प्रास्ताविक

१.१. मानवाच्या इतिहासाचा प्रारंभ झाला तेव्हापासून शिक्षणाची व्याप्ती आणि आवाका पाहिला तर असे दिसते की, ते सारखे उत्क्रान्त होत आहे, त्यात विविध प्रकार येत आहेत आणि ते व्यापक होत आहे. प्रत्येक देश आपली एक शिक्षण पद्धती विकसित करीत असतो. त्याद्वारा आपले खास सामाजिक आणि सांस्कृतिक वेगळेपण अभिव्यक्त करतो, प्रगत करतो, तसेच काळाच्या आव्हानांनाही तोंड देतो. काळाच्या ओघात असे प्रसंग येतात की ज्यावेळी युगानुयुगे चालत आलेल्या प्रक्रियेला नवी दिशा द्यावी लागते. तसा प्रसंग आज आला आहे.

१.२. आर्थिक आणि औद्योगिक कलांच्या विकासात हा देश एका विशिष्ट टप्प्यावर आलेला आहे. आजवर जे कमावलेले आहे, त्यापासून सर्वाधिक लाभ मिळविण्यासाठी फार मोठी मेहनत करणे भाग आहे. तसेच ह्या परिवर्तनाची फळे सर्व वर्गांच्या पदरात पडतील ह्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. त्या ध्येयाप्रत जाण्याचा शिक्षण हा राजमार्ग आहे.

१.३. हे ध्येय डोळ्यांपुढे ठेऊन केन्द्र शासनाने जानेवारी १९८५ मध्ये जाहीर केले की ह्या देशासाठी एक नवे शैक्षणिक धोरण आखले जाईल. प्रथम प्रचलित शिक्षण क्षेत्राची अवस्था कशी आहे, याचे साकल्याने मूल्यमापन केले गेले आणि त्यावर देशभर विस्तृत चर्चा झाली. वेगवेगळ्या भागांतून व्यक्त झालेली मते आणि आलेल्या सूचना यांचा काळजीपूर्वक अभ्यास केला गेला.

### १९६८ चे शिक्षण विषयक धोरण आणि त्यानंतर—

१.४. १९६८ चे हे राष्ट्रीय धोरण म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाच्या इतिहासात पुढे पडलेले एक लक्षणीय पाऊल होय. त्यात राष्ट्रीय विकासाला गती देणे हे ध्येय होते. आपण सगळे समान नागरिक आहोत, आपली एक समान संस्कृती आहे, ही भावना

वाढीला लावणे हे उद्दिष्ट होते. राष्ट्रीय एकात्मता बलवान व्हावी हे लक्ष्य होते. शिक्षणपद्धतीत आमूलाग्र पुर्नरचना करण्यावर त्यात ॰. र दिला होता. ह्यामुळे सर्व स्तरांवर गुणवत्ता वाढेल अशी अपेक्षा होती. विज्ञान आणि उद्योग व व्यवसाय विज्ञान किंवा तंत्रज्ञान याकडे त्यात जास्त लक्ष दिले होते. तसेच नैतिक मूल्ये रुजावी आणि लोकांचे जीवन व शिक्षण यांच्यात अधिक जवळीक साधावी म्हणून खूप दक्षता बाळगली होती.

१.५. १९६८ च्या शैक्षणिक धोरणाचा अवलंब केल्यापासून सर्व देशभर आणि सर्व स्तरांवर शैक्षणिक सोयी खूप प्रमाणात वाढल्या. देशाच्या ग्रामीण भागापैकी जवळजवळ ९० टक्के लोकांना एक किलोमीटरच्या परिसरात शाळा शिकण्याची सोय उपलब्ध झाली. इतर स्तरांवरही अशा सोयीत नाही म्हणायला बरीच वाढ झाली.

१.६. शिक्षणाचा समान आकृतिबंध सर्व देशभर स्वीकारला गेला आणि १० + २ + ३ ची पद्धती बऱ्हंश राज्यात सुरू झाली. ही बाब खास नमूद करण्यासारखी आहे. शालेय शिक्षणात मुलामुलींसाठी समान अभ्यासक्रम तर आखला गेलाच शिवाय ह्यात गणित आणि विज्ञान ह्यांचा अनिवार्य विषय म्हणून अंतर्भाव केला गेला. तसेच कार्यानुभवाला महत्त्वाचे स्थान दिले गेले.

१.७. पदवीपूर्व स्तरावर अभ्यासक्रमाची नव्याने उभारणी करणेही सुरू झाले. पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन यासाठी प्रगत अभ्यास केंद्रांची स्थापना केली गेली आणि आवश्यक तेवढ्या सुशिक्षित मनुष्य-बळाची गरज आपण भागवू शकलो.

१.८. हे जे काही साधले तेवढेही आपला प्रभाव पाडणारे असले तरी १९६८ च्या धोरणात सामावलेली सर्वसामान्य सूत्रे, अंमलात आणताना साकार झाली नाहीत. त्यासोबतच विशिष्ट जबाबदाऱ्या कुणावर असतील आणि पैशाची व संस्थांची मदत कुठून येईल हे आखता आले नाही. याचा परिणाम असा झाला की ; सुगमता, प्रत, प्रमाण, उपयुक्तता आणि अनेक वर्षांपासून तुंबून पडलेला पैशाचा व्यय याबाबत

समस्या निर्माण झाल्या आणि आता तर त्यांनी असे उग्र स्वरूप धारण केलेले आहे, की त्यांची सोडवणूक करणे अत्यंत निकडीचे होऊन बसलेले आहे.

१.९. आज भारतीय शिक्षणाने कोणता मार्ग स्वीकारावा ह्याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. सर्वसाधारणपणे ठराविक साच्याच्या शिक्षणाचा केवळ विस्तार करून किंवा आहे तो वेग आणि आहे ते सुधारणेचे स्वरूप कायम ठेवून प्रसंगाला तोंड देता येणार नाही.

१.१०. भारतीय विचारसरणीनुसार, माणूस हा एक अनमोल ठेवा आहे. तो राष्ट्राची बहुमोल संपत्ती आहे. त्याचे जतन करणे आवश्यक आहे. त्याचे नीट संगोपन व्हायला हवे आहे. त्याचा विकास साधला पाहिजे. हे सगळे अत्यंत काळजीपूर्वक आणि प्रभावीपणे करायला हवे. प्रत्येक व्यक्तीचा विकास म्हटला की, वेगवेगळ्या समस्यांचा विस्तार आणि गरजांचे प्रमाण आलेच आणि तेही त्यांच्या प्रत्येक अवस्थेत— अगदी जन्मापासून मृत्यूपर्यंत! विकासाच्या जटील आणि जोरदार प्रक्रियेत परिणामकारकरीतीने सहाय्य करणाऱ्या शिक्षणाच्या कार्याचे तपशीलवार नियोजन केले पाहिजे आणि अत्यंत संवेदनशीलतेने त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

१.११. भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात अशी एक अवस्था आलेली आहे की, आज दीर्घकाल उराशी बाळगलेली मूल्ये झिजून झिजून नाहीशी होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. सर्वधर्मसमभाव, समाजवाद, लोकशाही आणि व्यावसायिक आचारसंहिता ह्यांचे पालन करणे उत्तरोत्तर अवघड होत आहे.

१.१२. ग्रामीण आणि शहरी विभागातील विषमता कमी केल्याशिवाय आणि नोकऱ्यांचे विविध प्रकारे विकेंद्रीकरण केल्याशिवाय, तसेच वाढत्या प्रमाणात नोकऱ्यांचा ओघ वेगवेगळ्या भागात वळविल्याशिवाय ग्रामीण भागाला सुशिक्षित आणि प्रशिक्षित युवकांचा लाभ व्हायचा नाही, कारण तेथे अगदी तोकड्या सामाजिक सेवा उपलब्ध आहेत.

१.१३. येत्या काही दशकात आपल्या लोकसंख्येची वाढ फार मोठ्या प्रमाणात आटोक्यात आणणे निकडीचे आहे. हे साधण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे स्त्रियांमध्ये साक्षरतेचा आणि शिक्षणाचा प्रसार करणे हे होय.

१.१४. येत्या दशकातील जीवन, नवनवीन तणाव निर्माण करण्याची शक्यता आहे. पूर्वी कधीही नव्हत्या एवढ्या संधीही त्या-बरोबरच उपलब्ध होतील हेही शक्य आहे. ह्या नव्या वातावरणात, लोकांना लाभ घेता यावा म्हणून मानव साधन संपत्तीच्या विकासाचे नवे आराखडे आखावे लागतील. नव्या नव्या कल्पना सातत्याने आणि कल्पकतेने अंगीकृत करण्याची क्षमता नव्या पिढीत आली पाहिजे. मानवी मूल्यांच्या पालनासाठी आणि सामाजिक न्यायासाठी प्रभावीपणे वचनबद्ध व्हावे हे त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. सामाजिक न्याया-साठी हे सर्व करायचे म्हणजे चांगले शिक्षण हवेच.

१.१५. याशिवाय अनेक प्रकारची नवी आव्हाने आणि सामाजिक गरजा निर्माण झाल्याने देशासाठी नवे शैक्षणिक धोरण आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे शासनाला भाग पडत आहे. इतर कशानेही हा प्रसंग निभावणार नाही.

□ □

प्रकरण २ रे

# शिक्षणाचे सार आणि भूमिका

२.१. राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास शिक्षणाची गरज सगळयांनाच आहे. आपल्या सर्वांगीण विकासाचा मग तो भौतिक असो वा अध्यात्मिक हा पायाच आहे.

२.२. शिक्षणाची एक विशिष्ट भूमिका आहे. ते संवेदनशीलता आणि दृष्टिकोन शुद्ध करते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि विचारांचे व आत्म्याचे स्वातंत्र्य याचा लाभ होतो. परिणामत: आपल्या संविधानात प्रामुख्याने प्रतिपादिलेली समाजवाद, सर्वधर्मसमभाव आणि लोकशाही ही उद्दिष्टे गाठता येतात.

२.३. शिक्षणामुळे अर्थव्यवस्थेच्या विविध स्तरावर उपयुक्त असलेले मनुष्यबळ वाढीस लागते. शिवाय तो पाया आहे. त्या आधारेच संशोधन आणि विकास यांना वाव मिळतो. शेवटी त्यामुळेच राष्ट्र आत्मनिर्भर होईल अशी खात्री वाटते.

२.४. सारांश, शिक्षण ही आजची आणि उद्याची एकमेवाद्वितीय अशी गुंतवणूक आहे. हे प्रमुख तत्त्व म्हणजे राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरणाची गुरुकिल्ली होय.

□ □

# राष्ट्रीय शिक्षण पद्धती

३.१. राष्ट्रीय शिक्षणपद्धतीची संकल्पना ज्या तत्त्वांच्या आधारे केली आहे ती संविधानात समाविष्ट आहेत.

३.२. ठराविक स्तरापर्यंत सर्व विद्यार्थी, मग ते कोणत्याही जातीचे असोत, वंशाचे असोत, भागातले असोत, स्त्री असोत वा पुरुष असोत, त्यांना बऱ्या प्रतीचे शिक्षण घेता आले पाहिजे, हे राष्ट्रीय शिक्षणाच्या धोरणात गृहीत धरलेले आहे. हे साधण्यासाठी शासन शिक्षणविषयक उपक्रम हाती घेईल, त्याला पुरेसा पैसा पुरवील. १९६८ च्या धोरणात शिफारस केल्यानुसार, सर्वांसाठी एकत्र शाळा ह्या पद्धतीचा अवलंब करण्याच्या दिशेने परिणामकारक पावले उचलील.

३.३. राष्ट्रीय शिक्षणप्रणालीत सर्वांसाठी शिक्षणाचा एक समान आकृतिबंध अंगीकारलेला आहे. १०+२+३ चा आकृतिबंध आता देशातील सगळ्या भागात स्वीकारलेला आहे. पहिल्या दहा वर्षांचे आणखी विभाजन करताना पाच वर्षांचे प्राथमिक शिक्षण, तीन वर्षांचे उच्च प्राथमिक शिक्षण आणि त्यानंतर दोन वर्षे माध्यमिक शिक्षण अशा मूलगामी प्रणालीकडे वळण्यासाठी परिश्रम केले जातील.

३.४. राष्ट्रीय शिक्षणपद्धती राष्ट्रीय पातळीवरील अभ्यासक्रमाच्या आकृतिबंधावर आधारलेली राहील. तिच्यात सर्वांना साधारण असा एक अनिवार्य अभ्यासक्रम राहील. त्याबरोबरच तिची इतर अंगेही असतील पण त्यांच्या बाबतीतील धोरण लवचिक असेल. सर्वांना साधारण असा जो अनिवार्य अभ्यासक्रम असेल त्यात, भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, संविधानातील राष्ट्रीयत्व जोपासण्याठी आवश्यक असा भाग, सर्वांना बंधनकारक अशा कायदेशीर तरतूदी यांचा अंतर्भाव असेल. ह्या सर्व बाबी प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम आखताना लक्षात घेतल्या

जातील. त्यात भारताचा सांस्कृतिक वारसा, लोकशाही, सर्वधर्मसमभाव, स्त्री-पुरूष समानता, वातावरण शुद्ध राखणे, सामाजिक कुंपणे तोडणे, छोटया परिवाराच्या आदर्शाचे पालन आणि वैधानिक दृष्टिकोन बिंबवणे इत्यादी गोष्टींना प्रोत्साहन मिळेल, ह्याकडे लक्ष दिले जाईल. सर्वधर्मसमभावाची मूल्ये काटेकोरपणे पाळून शैक्षणिक उपक्रम अंमलात आणले जातील.

३.५. शांतता आणि राष्ट्राराष्ट्रातील सामंजस्य राखण्यासाठी भारत सदैव प्रयत्नशील राहिला आहे, ह्या प्राचीन परंपरेशी इमान राखून, शिक्षणाला हा जागतिक दृष्टिकोन बळकट करावा लागेल. आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांततामय सहजीवन अंगी बाणविण्यासाठी तरूण पिढयांना उद्युक्त करावे लागेल. ह्या अंगाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

३.६. समानता नांदावी म्हणून सर्वांना समान संधी पुरविणे आवश्यक ठरेल. हे केवळ शिक्षण घेता यावे या दृष्टिने नव्हे. तर त्यात यश मिळेल अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठीही महत्त्वाचे आहे. याशिवाय अनिवार्य अशा अभ्यासक्रमातून सर्वजण मुळात समान आहेत ही भावना जोपासावी लागेल. सामाजिक वातावरण आणि अमुक एक जन्म प्राप्त होणे हा योगायोग आहे पण ह्यामुळे निर्माण झालेले पूर्वग्रह आणि न्यूनगंड घालविणे हा या मागील उद्देश असेल.

३.७. शिक्षणाच्या प्रत्येक स्तरासाठी एक किमान ज्ञानाची पातळी आखून दिली जाईल. याशिवाय देशाच्या वेगवेगळया भागात राहणाऱ्या लोकांच्या वेगवेगळया सांस्कृतिक शैली आणि सामाजिक रीतिरिवाज समजून घेण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यात जोपासली जावी म्हणून पावले उचलावी लागतील. दुवा जोडणाऱ्या भाषेची वृद्धी करावी लागेल, पण त्याचबरोबर भरपूर प्रमाणात पुस्तकांची एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतरे करावी लागतील. तसेच बहुभाषिक शब्दकोष आणि टीका-टिप्पणी व व्युत्पत्तीसह अर्थ देणारे कोश तयार करण्याचे उपक्रम सुरू करावे लागतील. आपल्या मनातील प्रतिमेनुसार आणि दृष्टिकोनानुसार भारताचा नव्याने शोध घेण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन द्यावे लागेल.

३.८. उच्च शिक्षणाच्या बाबतीत सर्वसामान्यपणे आणि तंत्र-विज्ञानाच्या शिक्षणाबाबत विशेषत्वाने, एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात सहज जा-ये करता यावी यासाठी पावले उचलली जातील. त्यासाठी जन्मजातीचा विचार न करता आवश्यक ती गुणवत्ता असलेल्यांना (विविध शिक्षण शाखांत) प्रवेश घेण्यासाठी समान अवसर देण्यात येईल. यासाठी विद्यापीठे आणि उच्च शिक्षण देणाऱ्या इतर संस्था यांच्या सार्वत्रिक स्वरूपधर्माची व्याप्ती मर्यादित करावी लागेल.

३.९. संशोधन आणि विकास यांच्या क्षेत्रात तसेच विज्ञान आणि तंत्रविज्ञान ह्यांच्या शिक्षणाबाबत देशातील वेगवेगळ्या संस्थांचे एक जाळे निर्माण करण्यासाठी खास उपाय योजिले जातील. मग त्याद्वारा राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या उपक्रमात त्या सर्वांना सहभागी होता येईल आणि त्यांची साधनसामुग्री एकत्रित करता येईल.

३.१०. ह्या शिक्षण संक्रमणातील उपक्रमांना, साधनसंपत्ती पुरविण्याची जबाबदारी, संपूर्ण राष्ट्र एकदिलाने आपल्या शिरावर घेईल. हे उपक्रम म्हणजे विषमता कमी करणे, प्राथमिक शिक्षण सर्वत्र समान राखणे, प्रौढ साक्षरता, शास्त्रीय आणि तंत्रविज्ञान क्षेत्रातील संशोधन वगैरे होत.

३.११. 'आयुष्यभर अध्ययन' हे ह्या शिक्षणाच्या प्रक्रियेने उराशी बाळगलेले उद्दिष्ट आहे. सार्वत्रिक साक्षरता ही ह्यात गृहीत धरलेली आहे. आपल्याला हवे ते शिक्षण जुळेल त्या कालक्रमानुसार सुरू ठेवता येईल अशा सोयी सवलती तरुणांना, गृहिणींना, शेतकऱ्यांना, कामकऱ्यांना आणि धंदेवाईकांना उपलब्ध करून दिल्या जातील. यापुढे खुल्या आणि दूरशिक्षणाच्या दिशेने धडक योजना आखली जाईल.

३.१२. विद्यापीठ अनुदान मंडळ, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, अखिल भारतीय कृषि संशोधन परिषद आणि भारतीय वैद्यक परिषद ह्यांचे हात अधिक बळकट करण्यात येतील. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय शिक्षण प्रणालीला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडता येईल. ह्या सर्व संस्थांमध्ये त्यांना एका सूत्रात गोवणारे नियोजन केले जाईल. त्यामुळे उपक्रम पार पाडताना त्यांचा दुवा म्हणून उपयोग होईल आणि

संशोधन व उच्च शिक्षण क्षेत्रातील उपक्रम यशस्वी करण्याकरिता अधिक वळ प्राप्त होईल. ह्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात ह्या सर्व संस्था आणि त्यांच्याबरोबरच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था आणि आंतरराष्ट्रीय विज्ञान व तंत्रशिक्षण संस्था ह्याही सहभागी होतील.

## एक अर्थपूर्ण भागीदारी

३.१३. १९७६ मध्ये संविधानात दुरुस्ती झाली आणि त्यात शिक्षण एकाच वेळी केंद्राच्या आणि राज्यांच्याही अखत्यारीत राहील, हे अंतर्भूत केले गेले. हे एक व्यापक पाऊल उचलले गेले. ह्यात हे गृहीत धरले आहे की, प्रशासकीयदृष्टया आणि आर्थिकदृष्टया राष्ट्राचे मर्मस्थान असलेल्या ह्या शिक्षणाबाबत केंद्र आणि राज्ये ह्यांना जबाबदारीचा नवा वाटा उचलावा लागेल. शिक्षणाबाबतची राज्याची भूमिका आणि जबाबदारी ह्यात मुख्यत्वेकरून काही फरक पडणार नाही. शिक्षणाचे राष्ट्रीय आणि एकात्मता साधणारे स्वरूप बळकट करण्याच्या जबाबदारी-तील मोठा वाटा केंद्रशासन उचलील. तसेच गुणवत्ता आणि प्रामाण्य (सर्व स्तरांवरील शिकविण्याच्या व्यवसायातील देखील) अधिकाधिक वाढावे ही जबाबदारी केंद्र शासन स्वीकारील. तसेच एकजिनसी देशाच्या शिक्षणाबाबतच्या गरजांचा अभ्यास करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, विशेषत: विकासासाठी आवश्यक असलेली मानव साधनसामुग्री प्राप्त करण्याच्या दृष्टीने आणि संशोधन व प्रगत अभ्यास ह्यांच्या गरजा भागविणे, तसेच शिक्षण, संस्कृती आणि मानव साधनसामुग्रीचा विकास ह्यांची आंतरराष्ट्रीय बाजू सांभाळणे आणि सर्व सामान्यपणे देशाच्या या शैक्षणिक पिरॅमिडची, सर्व स्तरांवरील अत्याधिक गुणवत्ता वाढविणे, ह्यांची जबाबदारी केंद्र पार पाडेल. एकाच वेळी दोघांच्याही अधिकार क्षेत्रात शिक्षण असणे ही एक वैशिष्ठ्यपूर्ण भागीदारी असून अत्यंत अर्थपूर्ण आहे, ते एक आव्हानही आहे. त्याची सर्वार्थाने परिणामकारक-रीत्या अंमलबजावणी करण्याच्या दिशेने राष्ट्रीय धोरण आखण्यात येईल.

□ □

प्रकरण ४ थे

# समानतेसाठी शिक्षण

**विषमता**

४. १. नवीन धोरण विषमतेच्या बाबी दूर करण्यावर आणि ज्यांना आजवर समानता नाकारली गेली त्यांच्या विशिष्ट गरजांकडे लक्ष देऊन त्यांना शिक्षणाची समान संधी मिळवून देण्यावर विशेष भर देईल.

**स्त्रियांना समानता मिळवून देण्यासाठी शिक्षण**

४.२. स्त्रियांच्या परिस्थितीत मूलभूत परिवर्तन घडवावे यासाठी शिक्षणाचा उपयोग केला जाईल. आजवर स्त्रियांवर जो अन्याय सतत केला गेला, त्याचे परिमार्जन व्हावे म्हणून विचारपूर्वक आखणी करून, स्त्रियांना झुकते माप दिले जाईल. स्त्रियांचे सामर्थ्य वाढविण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणपद्धती परिणामकारकरीत्या मध्यस्थाची भूमिका पार पाडेल. ही शिक्षणपद्धती पुनर्रचित अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षक, निर्णय घेणारे अधिकारी व प्रशासक यांना प्रशिक्षण आणि उचित मार्गदर्शन आणि शैक्षणिक संस्थांचा सक्रीय सहभाग यांच्याद्वारा नवीन मूल्यांची जोपासना करील. यामुळे विश्वास निर्माण करण्याची आणि सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू होईल. स्त्रियांचा उत्तरोत्तर विकास व्हावा यासाठी स्त्रियांसाठी अभ्यासक्रम निर्माण केले जातील. विविध अभ्यासक्रमांचा एक भाग म्हणून स्त्रियांसाठी अध्ययन क्षेत्रे निर्माण केली जातील आणि शैक्षणिक संस्थांना अशा प्रकारचे विधायक कार्यक्रम हाती घेण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

**विशेष पूरक नोकऱ्यांची तरतूद**

४.३. कालमर्यादेची निश्चिती आणि परिणामकारक मार्गदर्शन यांच्याद्वारा स्त्रियांची निरक्षरता आणि त्यांच्या प्राथमिक शिक्षणात

सातत्याने येणारे व्यत्यय दूर करणे, तसेच त्यांच्या प्राथमिक शिक्षणातील सातत्य टिकवणे, यासाठी प्राथमिक शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य दिले जाईल. व्यावसायिक व धंदेवाईक शिक्षणक्रमातील स्त्री-पुरुष भेदावर आधारित साचेबंदपणा घालविण्यासाठी परंपरेने चालत न आलेल्या उद्योगांनी तसेच आजच्या अत्यावश्यक तंत्र विज्ञानात स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी स्त्री-पुरुष असा भेदभाव न करण्याच्या धोरणाचा पाठपुरावा जोरकसपणे केला जाईल.

**वर्गीकृत जातींसाठी शिक्षण**

४.४. सर्व शैक्षणिक पातळयांवर सर्व क्षेत्रांमध्ये आणि ग्रामीण पुरुष, ग्रामीण, स्त्री, नागर पुरुष, नागर स्त्री या सर्वांच्या बाबतीत, वर्गीकृत जातींना, इतर जनतेबरोबर आणणे हे शैक्षणिक विकासाचे प्रमुख लक्ष्य राहील.

४.५. या उद्देशाच्या पूर्तीसाठी पुढील उपाय योजलेले आहेत –

(१) आपली मुले चौदा वर्षांची होईपर्यन्त शाळेत नियमितपणे पाठविण्याची काळजी न घेणाऱ्या कुटुंबांना तसे न करण्याविषयी प्रोत्साहन दिले जाईल.

(२) सफाई, कातडी काढणे व कमावणे अशा प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील मुलांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्यांची योजना पहिल्या वर्गापासूनच करण्यात यईल. उत्पन्नाचा विचार न करता अशा कुटुंबातील सर्वच मुलांना ही योजना लागू केली जाईल आणि त्यांच्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखले जातील.

(३) वर्गीकृत जातीच्या विद्यार्थ्यांनी शाळेत नावे नोंदवावी, मध्येच आपले शिक्षण सोडू नये आणि यशस्वीरीत्या अभ्यासक्रम पूर्ण करावा यासाठी सतत तपशीलवार नियोजन केले जाईल व दक्षतापूर्वक तपासणी केली जाईल. तसेच त्यांचे पुढील शिक्षण व नोकरी याबाबतचे भवितव्य अधिक उज्वल व्हावे यासाठी उपयुक्त ठरणारे अभ्यासक्रम आखले जातील.

(४) वर्गीकृत जातींतून शिक्षकांची भरती केली जाईल.

(५) आखलेल्या कार्यक्रमानुसार टप्प्याटप्प्याने जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या वसतीगृहात वर्गीकृत जातींच्या विद्यार्थ्यांना सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या जातील.

(६) वर्गीकृत जातींचा पूर्ण सहभाग सहजगत्या होईल अशाप्रकारे शाळांच्या इमारती, बालवाड्या, प्रौढशिक्षण केंद्रे यांच्या जागा निश्चित करण्यात येतील.

(७) वर्गीकृत जातींना भरीव शैक्षणिक सवलती उपलब्ध होतील अशाप्रकारे "राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम" आणि "ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम" यांचा निधी वापरण्यात येईल.

(८) वर्गीकृत जातींचा शैक्षणिक प्रक्रियेत सहभाग वाढावा म्हणून सतत नवनवीन पद्धती शोधण्यात येतील.

**वर्गीकृत जमातींसाठी शिक्षण**

४.६. इतरांच्या बरोबरीला आणण्यासाठी वर्गीकृत जमातींबाबत पुढील उपाय त्वरित योजले जातील –

(१) आदिवासी क्षेत्रात प्राथमिक शाळा उघडण्यास प्राधान्य दिले जाईल. शिक्षणासाठी निर्धारित केलेल्या सामान्य निधीतून तसेच राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम, तसेच आदिवासी कल्याण योजना इ. निधीतून या क्षेत्रातील शाळांच्या इमारतींचे बांधकाम अग्रक्रमाने हाती घेतले जाईल.

(२) वर्गीकृत जमातींच्या सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. त्यातच कित्येकांच्या बोलींचाही अंतर्भाव होतो. यातूनच आदिवासींच्या बोलीतून अभ्यासक्रमाची व अध्यापनाच्या साधनांची निर्मिती करण्याची निकड प्राथमिक अवस्थेत महत्त्वाची ठरते. त्याचबरोबर या बोलीतून प्रादेशिक भाषेकडे सहज वळता येईल, अशी व्यवस्था करण्यात येईल.

(३) आदिवासी क्षेत्रात अध्यापन कार्य करण्यासाठी आदिवासी जमातीतील सुशिक्षित व उदयोन्मुख तरुणांना प्रोत्साहन व प्रशिक्षण दिले जाईल.

(४) वसतिगृहे असलेल्या शाळा व आश्रमशाळा मोठ्या प्रमाणावर उघडल्या जातील.

(५) वर्गीकृत जमातींच्या विशिष्ट गरजा व त्यांची जीवनपद्धती लक्षात घेऊन त्यांच्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजना आखल्या जातील. उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्या देताना तांत्रिक, व्यावसायिक व अर्धव्यावसायिक अभ्यासक्रमांवर भर दिला जाईल. विविध प्रकारच्या अभ्यासक्रमातील त्यांची तयारी चांगल्या प्रकारे व्हावी आणि मानसिक तसेच सामाजिक व्यत्यय दूर व्हावेत, यावर उपाय म्हणून अभ्यासक्रम व इतर शैक्षणिक कार्यक्रमही योजले जातील.

(६) वर्गीकृत जमातींचे लोक ज्या विभागात बव्हंशी राहतात, तेथे अंगणवाड्या, अनौपचारिक व प्रौढ शिक्षण केंद्रे अग्रक्रमाने उघडली जातील.

(७) आदिवासींच्या सर्जनशील प्रतिभेची व संपन्न संस्कृतीची जाणीव जागृत करण्याच्या दृष्टीने विविध स्तरातील अभ्यासक्रमांची आखणी करण्यात येईल.

**शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले इतर वर्ग आणि विभाग**

४.७. समाजाच्या शैक्षणिक मागासलेल्या वर्गात विशेषतः ग्रामीण विभागात शिक्षणास प्रोत्साहन मिळेल अशी तरतूद केली जाईल. डोंगराळ व वन्य प्रदेशात तसेच दूरवरच्या दुर्गम क्षेत्रात आणि बेटावरही संस्थात्मक यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

**अल्पसंख्यांक**

४.८. काही अल्पसंख्यांक गट शिक्षणापासून वंचित आहेत किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत. समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून अशा गटांच्या शैक्षणिक गरजांकडे अधिक लक्ष दिले जाईल. स्वतःच्या शैक्षणिक संस्था उघडणे व त्या चालविणे, तसेच त्यांच्या भाषा आणि संस्कृती यांना संरक्षण देणे, इत्यादी; देशाच्या घटनेने त्यांना दिलेल्या आश्वासनांचा यात साहजिकच अंतर्भाव होईल. याचबरोबर पाठ्यपुस्तके तयार करताना हा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन त्यात

प्रतिबिंबित होईल अशी काळजी घेतली जाईल. तसेच एकात्मता वाढीला लागावी म्हणून समान राष्ट्रीय ध्येय आणि आदर्श यावर आधारलेले शक्य ते सर्व उपाय, अनिवार्य अभ्यासक्रमाशी सुसंगत राहतील अशा प्रकारे योजले जातील.

**अपंग**

४.९. शारीरिक व मानसिकदृष्टया अपंग असलेल्यांना इतर सामान्य जनसमूहाच्या बरोबरीने सहकारी म्हणून एकरूप होता यावे, तसेच इतरांप्रमाणेच आपला स्वाभाविक विकास साधण्यासाठी ते समर्थ व्हावे आणि त्यांना जीवनाला आत्मविश्वासाने व धैर्याने सामोरे जाता यावे, हा उद्देश डोळयांपुढे राहील. यासाठी पुढील उपाय योजले जातील-

(१) जेथे शक्य असेल तेथे विकलांग व इतर अपंग मुलांचे शिक्षण इतर सर्वसामान्य मुलांबरोबर होईल.

(२) ज्यांच्या अपंगत्वाचे स्वरूप तीव्र आहे अशा मुलांसाठी शक्य तर जिल्हयाच्या गावी वसतिगृहासहित विशेष प्रकारच्या शाळा उघडण्यात येतील.

(३) अपंगांना व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी पुरेशी व्यवस्था केली जाईल.

(४) अपंग मुलांच्या अडचणी दूर करण्यासाठी, विशेष करून प्राथमिक वर्गांच्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची योजना करण्यात येईल.

(५) अपंगांच्या शिक्षणासाठी सेवाभावी संस्थांच्या प्रयत्नांना सर्वतोपरी उत्तेजन देण्यात येईल.

**प्रौढ शिक्षण**

४.१०. "जे मुक्त करते ते शिक्षण" अशी व्याख्या आपल्या धर्मग्रंथात केली आहे. याचाच अर्थ असा की, अज्ञान आणि जुलूम ह्यापासून मुक्त होण्यासाठी ते साधने पुरविते. आधुनिक जगात लिहिता वाचता येणे ह्या गोष्टींचा साहजिकच त्यात अंतर्भाव होतो ; कारण अध्ययनाचे मुख्य साधन तेच आहे, याठीच प्रौढ शिक्षणाचे निर्णायक महत्त्व आहे. ह्यात प्रौढ साक्षरताही अंतर्भूत आहेच.

४.११. समाजाला आवश्यक त्या प्रकारची व आवश्यक तेवढे मानवबळ निर्माण करण्यासाठी सतत कौशल्ये वृद्धिंगत होणे ही आज विकासातील अत्यंत कठीण समस्या आहे. ज्यांच्यासाठी हे करायचे आहे, त्यांचा विकासाच्या कार्यक्रमात सहभाग असणे, या गोष्टीस फार महत्त्व आहे. त्यासाठी प्रौढ शिक्षणाच्या नियोजनाशी गरिबी हटवणे, राष्ट्रीय एकात्मता साधणे, वातावरणातील समतोल राखणे, लोकांच्या सांस्कृतिक सर्जनशीलतेला अधिक बलशाली करणे, छोट्या कुटुंबव्यवस्थेच्या मूल्यांचा स्वीकार, स्त्री पुरुष समानतेच्या तत्त्वाचा पुरस्कार इत्यादी राष्ट्रीय उद्दिष्टांशी सांगड घालून त्यांची सुसंगत आखणी केली जाईल आणि सध्याच्या कार्यक्रमाचे पुनर्मूल्यांकन करून त्यांना अधिक कार्यक्षम केले जाईल.

४.१२. विशेषत: १५ ते ३५ या वयोगटातील लोकांची निरक्षरता दूर करण्यासाठी संपूर्ण राष्ट्राने प्रतिज्ञा केली पाहिजे. केंद्र सरकार, राज्य सरकारे, राजकीय पक्ष आणि त्यांच्या मोठमोठ्या संघटना, जनसंपर्क माध्यमे आणि शैक्षणिक संस्था यांनी मोठ्या प्रमाणावर साक्षरता प्रसाराचे विविध कार्यक्रम हाती घ्यायला कटिबद्ध झाले पाहिजे. या कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी, तरुण, सेवाभावी संस्था व (नोकऱ्या देणारे) मालक इत्यादींनाही विविध संशोधन संस्थांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घ्यावे. यासाठी प्रौढ साक्षरतेविषयीच्या शिक्षणशास्त्रीय दृष्टीकोनात सुधारणा करण्यासाठी भरीव प्रयत्न करावे लागतील. साक्षरतेबरोबरच काम करण्याचे ज्ञान व कौशल्ये आणि सामाजिक, आर्थिक वास्तवाचे व त्यात परिवर्तन घडवण्याच्या शक्यतेचे भान शिकणाऱ्यात यावे, या गोष्टींचा साक्षरतेच्या कार्यक्रमात अंतर्भाव करण्यात येईल.

४.१३. प्रौढ व निरंतर शिक्षणाचे कार्यक्रम व्यापक प्रमाणावर आयोजित केले जातील व त्यासाठी पुढील उपाय योजले जातील.

(अ) निरंतर शिक्षण केन्द्राची ग्रामीण विभागात स्थापना.

(आ) मालक, कामगार-संघटना आणि कामगारविषयक शासकीय कार्यालये यांच्या सहाय्याने कामगारांना शिक्षण देणे.

(इ) माध्यमिकोत्तर शिक्षण संस्था.

(ई) व्यापक प्रमाणावर पुस्तके, ग्रंथालये व वाचनालये यांची निर्मिती.

(उ) आकाशवाणी, दूरदर्शन आणि चित्रपट या जनसंपर्क माध्यमांचा अध्ययनासाठी उपयोग.

(ऊ) शिकणाऱ्यांचे समूह आणि संघटना यांची निर्मिती.

(ए) दूरशिक्षणाचे कार्यक्रम.

(ऐ) स्वयंअध्ययनासाठी सहाय्यक गोष्टींची निर्मिती.

(ओ) गरजा आणि आवड लक्षात घेऊन व्यावसायिक शिक्षणक्रम आखणे.

□ □

प्रकरण ५ वे

# विविध स्तरांवर शिक्षणाची पुनर्रचना

**बालसंगोपन व शिक्षण**

५.१. राष्ट्रीय धोरणामध्ये बालकांच्या विकासावर फार भर दिला आहे.

५.२. बालकांच्या विकासाचे स्वरूप लक्षात घेऊन पोषण, आरोग्य, सामाजिक, मानसिक, शारीरिक, नैतिक व भावनिक इत्यादी विकासांच्या बाबतीत बालसंगोपन व बालशिक्षण यांना अग्रक्रम दिला जाईल व ते बालविकासाच्या एकात्म कार्यक्रमाशी निगडीत केले जातील. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास पूरक म्हणून संगोपनगृहे स्थापली जातील. त्यात मुलांचा सांभाळ करणाऱ्या मुलींना शिक्षण घेण्यास योग्य संधी मिळेल व कामकरी स्त्रियांना आधार दिला जाईल.

५.३. बालशिक्षणाचे कार्यक्रम बालकांना प्राधान्य देणारे असतील. त्यातून खेळांद्वारा शिक्षण दिले जाईल आणि ते त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर आधारलेले असतील. या स्तरावर औपचारिक शिक्षण पद्धतीचा अवलंब केला जाणार नाही. लिहीणे, वाचणे व गणित शिकविले जाणार नाही. स्थानिक समाजाचा यात पूर्ण सहभाग राहील.

५.४. बालसंगोपन व पूर्वप्राथमिक शिक्षण यातील एकात्मता प्राथमिक शिक्षण व मनुष्यबळ विकास यांना अधिक साहाय्यभूत ठरेल. याचबरोबर शालेय आरोग्य कार्यक्रम अधिक संपन्न केले जातील.

**प्राथमिक शिक्षण**

५.५. प्राथमिक शिक्षणामध्ये नव्याने दोन गोष्टींवर भर दिला जाईल.—

(१) सार्वत्रिक नोंदणी व १४ वर्षापर्यंतच्या मुलांचे शालेय अध्ययन चालू राहील अशी काळजी घेणे.

(२) शिक्षणाच्या स्तरात मौलिक प्रगती होईल अशा प्रकारच्या सुधारणा करणे.

**बालकेंद्रित दृष्टिकोन**

५.६. मुलांनी शाळेत यावे व शिकावे हा या संदर्भात सर्वांचा प्रमुख हेतू असावा. त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्याबद्दल जिव्हाळ्याचा व प्रोत्साहनाचा दृष्टिकोन स्वीकारावयास हवा. यासाठी प्राथमिक स्तरावर कृतिप्रधान शिक्षणपद्धती स्वीकारायला हवी. प्रथमच शिकणाऱ्या पिढीतील मुलांना स्वतःच्या गतीने शिकण्यासाठी व त्यांच्यातील उणिवा दूर करण्यासाठी पूरक शिक्षण द्यायला हवे. मुलांच्या वयाबरोबरच त्यांचे ज्ञान वाढेल व सरावातून त्यांच्यामधील कौशल्ये विकसित होतील. प्राथमिक स्तरावर कोणालाही अनुत्तीर्ण न करण्याचे धोरण तसेच पुढे चालू ठेवले जाईल. त्यानुसार मूल्यमापन केले जाईल. शारीरिक शिक्षा देणे पूर्णपणे बंद केले जाईल आणि शाळांच्या वेळा व सुट्ट्या मुलांच्या जीवनपद्धतीचा विचार करून व त्यांच्या सोयी लक्षात घेऊन ठरविल्या जातील.

**शाळेतील सोयी**

५.७. प्रत्येक प्राथमिक शाळेत किमान सोयी उपलब्ध करून दिल्या जातील. सर्व ऋतूंत वापरण्यास योग्य अशा कमीत कमी दोन मोठ्या खोल्या प्रत्येक शाळेत असतील. तेथे खेळणी, फळे, नकाशे, तक्ते व इतर शैक्षणिक साहित्य असेल. प्रत्येक शाळेत किमान दोन शिक्षक असतील. त्यातील एक शिक्षिका असेल. नंतर लवकरच प्रत्येक वर्गास एक याप्रमाणे शिक्षक दिले जातील. सर्व शाळांना आवश्यक शैक्षणिक साधने पुरविण्यासाठी लवकरच एक देशव्यापी मोहीम (ऑपरेशन ब्लॅकबोर्ड) हाती घेण्यात येईल. शासन, स्थानिक संस्था व इतर सेवाभावी संस्था यांचा यात पूर्ण सहभाग असेल. शाळेच्या इमारतीच्या बांधण्याचा पहिला भार राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन हमी कार्यक्रम या संस्थाच्या निधीतून टाकला जाईल.

## अनौपचारिक शिक्षण

५.८. शाळेत गळती झाल्याने शाळेबाहेर राहिलेल्या मुलांसाठी एक व्यापक व सुव्यवस्थित अनौपचारिक शिक्षण-कार्यक्रम हाती घेण्यात येईल. यात शाळा नसलेल्या वस्त्यांतील काम करणारी मुले व मुली यांचा समावेश केला जाईल. कारण अशा मुलांना दिवसभर शाळेत उपस्थित राहणे शक्य नसते.

५.९. अनौपचारिक शिक्षण केंद्रामधील शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी आधुनिक शैक्षणिक तंत्राचा व साधनांचा वापर केला जाईल. सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेल्या स्थानिक युवक-युवतींची नेमणूक अशा केंद्रांमधून मार्गदर्शक म्हणून केली जाईल व त्यांच्या प्रशिक्षणाकडे विशेष लक्ष दिले जाईल. नंतर त्यांना योग्यते-नुसार औपचारिक शिक्षण देणाऱ्या शाळांमधूनही संधी दिली जाईल. अनौपचारिक शिक्षणाचा दर्जा औपचारिक शिक्षणासारखाच चांगला रहावा यासाठी आवश्यक ते सर्व उपाय योजिले जातील.

५.१०. राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्याबरहुकूम या (अनौपचारिक) अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी परिणामकारक पावले टाकली जातील, पण हे करताना विद्यार्थ्यांच्या गरजा व स्थानिक वातावरण पायाभूत मानले जाईल. यासाठी उच्च दर्जाचे शैक्षणिक साहित्य तयार करून ते विनामूल्य पुरविले जाईल. अनौपचारिक शिक्षण-कार्यक्रमातून खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम व सहली इ. च्या सहाय्याने शैक्षणिक वातावरण निर्माण केले जाईल.

५.११. अनौपचारिक शिक्षण केंद्राचे बहुतेक कार्य सेवाभावी संस्था व पंचायतराज्य इत्यादींच्यामार्फत चालेल. या संस्थांच्या खर्चासाठी वेळीच निधी उपलब्ध करून दिला जाईल, ही महत्त्वाची जबाबदारी शासन स्वीकारील.

## एक संकल्प

५.१२. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शाळा सोडून जाणाऱ्या मुलांची समस्या सोडविण्यास अग्रक्रम दिला जाईल व त्यासाठी विविध

उपायांची योजना प्राथमिक स्तरावर केली जाईल. अगदी ग्रामपातळी-वरही त्याची अंमलबजावणी करून शाळांमधील विद्यार्थी टिकून राहण्याचे प्रमाण वाढविण्याकडे लक्ष दिले जाईल. या प्रयत्नाचा अनौपचारिक शिक्षणक्रमाशी समवाय साधला जाईल. इ. स. १९९० मधील ११ वयाची सर्व मुले शाळेतील किमान ५ वर्षांचे तरी शिक्षण अथवा तत्सम अनौपचारिक शिक्षण पूर्ण करतील याकडे लक्ष दिले जाईल. त्याचप्रमाणे १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना इ. स. १९९५ पर्यन्त मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जाईल.

**माध्यमिक शिक्षण**

५.१३. माध्यमिक शिक्षणात विद्यार्थ्यांना विज्ञान, मानव्यशास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांच्या वेगवेगळ्या कार्यांचा परिचय होतो. याच-वेळी विद्यार्थ्यांना इतिहासाची, राष्ट्रीय दृष्टिकोनाची तसेच नागरिक म्हणून आपल्या घटनात्मक कर्तव्यांची व हक्कांची जाणीव देण्यासाठीही हा स्तर योग्य असतो योग्य अशा अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्तरावर सांस्कृतिक एकता व मानवी मूल्ये यांची जाणीव करून दिली जाईल. विशेष संस्थांतून अथवा माध्यमिक शिक्षणात आवश्यक ते बदल करून व्यावसायिक शिक्षण दिले जाईल व त्याच्या सहाय्याने आर्थिक प्रगतीसाठी योग्य मनुष्यबळ निर्माण केले जाईल. सध्या माध्यमिक शिक्षणापासून वंचित असलेल्यांसाठी माध्यमिक शिक्षणाच्या कक्षांचा विस्तार केला जाईल. इतर क्षेत्रात एकत्रीकरणावर भर राहील

**विशेष प्रज्ञावंतांसाठी विशेष शाळा (स्पेशल स्कूल्स)**

५.१४. विशेष प्रज्ञा असणाऱ्या मुलांसाठी विशेष शाळांतून (स्पेशल स्कूल्स) अधिक द्रुत गतीने शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे, हे तत्त्व सर्वत्र मान्य झाले आहे. अशा विद्यार्थ्यांची अशा शिक्षणासाठी खर्च करण्याची कुवत नसली तरी त्यांना ती संधी मिळायला हवी. हा उद्देश साध्य करण्यासाठी या विशेष शाळांच्या साहाय्याने उत्कृष्टता, समता (अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षण व हितसंरक्षणाच्या संदर्भात) सामाजिक न्याय इत्यादी उद्दिष्टांचे पालन केले जाईल. विशेषतः ग्रामीण भागातील बुद्धिमान विद्यार्थ्यांना

शिकण्याची व एकत्र राहण्याची संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा व्यक्तिमत्त्वविकास आणि राष्ट्रीय एकात्मताही साधली जाईल. शाळा सुधारणेचे देशव्यापी कार्यक्रम हाती घेतले जातील.

५.१५. एका विशिष्ट धर्तीवर अशा विशेष शाळा सर्व देशभर सुरू करण्यात येतील. त्यांना नवनवीन उपक्रम करण्याचे व प्रयोग करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल. अशा शाळा निवासी व निःशुल्क असतील.

**व्यावसायीकरण**

५.१६. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक पुनर्रचनेमध्ये व्यावसायिकरणाचा सुनियोजित, पद्धतशीर व काटेकोरपणे लागू केला जाणारा कार्यक्रम आखला जाईल. यामुळे स्वयंरोजगाराची संधी वाढेल व कौशल्ययुक्त मनुष्यबळाची मागणी व पुरवठा यातील सध्या असलेली तफावत दूर होईल. जे विद्यार्थी विशिष्ट हेतू किंवा आवड नसताना अकारण उच्च शिक्षणाकडे धाव घेतात, त्यांना त्यामुळे एक पर्यायही उपलब्ध होईल.

५.१७. व्यावसायिक शिक्षण हा नव्या शिक्षण-प्रणालीतील एक स्वतंत्र व्यवच्छेदक प्रवाह असेल. विविध क्षेत्रातील व्यवसायासाठी विद्यार्थ्यांना सिद्ध करणे हा त्याचा हेतू असेल. हे अभ्यासक्रम सामान्यतः माध्यमिक स्तरानंतर सुरू होतील. पण त्यात लवचिकपणा आणून आठव्या इयत्तेनंतरही ते सुरू करता येतील. व्यावसायिक शिक्षणात सारखेपणा आणण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रेदेखील त्यांच्याशी अधिकाधिक प्रमाणात एकरूपता साधण्याचा प्रयत्न करतील.

५.१८. शिक्षणाशी आरोग्य-नियोजन, आरोग्यसेवा व्यवस्थापन यांची सांगड घालून आरोग्याशी निगडित असलेले व्यावसायिक शिक्षण दिले जाईल. प्राथमिक व माध्यमिक स्तरावर आरोग्यशिक्षण दिल्याने कुटुंबाच्या व समाजाच्या आरोग्याच्याबाबतीत व्यक्तींची बांधिलकी निर्माण होईल. त्यातून पुढील + २ च्या अभ्यासक्रमातील व्यावसायिक अभ्यासक्रमाशी अनुबंध जोडला जाईल. त्याचप्रमाणे शेती, बाजार, विविध सामाजिक सेवा इत्यादी संदर्भातील व्यावसायिक अभ्यासक्रमही सुरू करण्याचे प्रयत्न केले जातील. उद्योजकता व स्वयंरोजगार यासाठी

आवड उत्पन्न करणे, त्यासाठी आवश्यक ते ज्ञानार्जन व कौशल्ये प्राप्त करणे हा या अभ्यासक्रमाचा निर्मितीहेतू असेल.

५.१९. व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याची जबाबदारी शासन, तसेच सार्वजनिक व खाजगी कारखानदार यांच्यावर राहील. याबाबत स्त्रिया, आदिवासी व वंचित लोकांच्या गरजांकडे शासन लक्ष देईल.

५.२०. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवीधरांना काही पूर्व-नियोजित अटींवर व्यावसायिक अभिवृद्धीसाठी व स्वयंविकासासाठी सामान्य, तांत्रिक व अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी, आवश्यक ते जोड अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रवेश दिला जाईल.

५.२१. नवसाक्षर, प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले युवक, मध्येच शाळा सोडलेले विद्यार्थी, पूर्णवेळ वा अर्धवेळ काम करणारे व बेकार तरुण यांच्यासाठी अनौपचारिक, लवचिक, गरजांनुसार आवश्यक असलेले व्यावसायिक कार्यक्रम उपलब्ध करून दिले जातील. या संदर्भात स्त्रियांकडे विशेष लक्ष दिले जाईल.

५.२२. उच्च माध्यमिकनंतर पदवी घेऊन व व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करण्याची इच्छा असणाऱ्या तरुणांसाठी तिसऱ्या स्तरावरील व्यावसायिक शिक्षणाची सोयही केली जाईल.

५.२३. इ. स. १९९० पर्यन्त १० टक्के विद्यार्थी उच्च माध्यमिकचे व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करतील व २५ टक्के विद्यार्थी इ. स. १९९५ नंतर हे अभ्यासक्रम पूर्ण करतील. त्यांच्यासाठी विशेष प्रयत्न करून त्यांना रोजगार उपलब्ध करून दिले जातील किंवा ते स्वयंरोजगार करण्यास पात्र ठरतील, अशी योजना केली जाईल.

**उच्च शिक्षण**

५.२४. उच्च शिक्षणामुळे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक, नैतिक आणि आध्यात्मिक समस्यांचा विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. त्यातील विशेष ज्ञान व कौशल्ये यांच्या प्रसारामुळे राष्ट्राच्या प्रगतीसही हातभार लागतो. अस्तित्व टिकवण्यासाठीही या गोष्टींचा उपयोग होतो.

उच्च शिक्षण ही शिक्षणप्रणालीच्या अत्युच्च टोकावरील अवस्था असल्याने चांगले शिक्षक तयार करण्याची भूमिका उच्च शिक्षणास पार पाडावी लागते.

५.२५. ज्ञानाच्या अभूतपूर्व व अकल्पित स्फोटामुळे उच्च शिक्षण पूर्वी कधी नव्हते तितके, गतिमान झाले आहे व त्याने नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत.

५.२६. आज भारतात १५० विद्यापीठे व जवळपास ५,००० महाविद्यालये आहेत. या संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी नजीकच्या भविष्यकाळात शैक्षणिक सोयींचे एकत्रीकरण व त्यांचा विस्तार यावर भर दिला जाईल.

५.२७. शिक्षणाचा दर्जा खालावणार नाही यासाठी तात्काळ उपाययोजना केली जाईल.

५.२८. संलग्नीकरण-व्यवस्थेच्या संदर्भात आलेले संमिश्र अनुभव लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर स्वायत्त महाविद्यालयांचा विकास करण्यासाठी साहाय्य दिले जाईल. संलग्नीकरणव्यवस्थेचे रूपांतर क्रमश: या स्वायत्त महाविद्यालयांच्या व्यवस्थेत होईल. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या निवडक विभागांना स्वायत्तता देण्यास प्रोत्साहन दिले जाईल. या संस्थांना स्वयंपूर्णता व स्वायत्तता याबरोबरच उत्तरदायित्वही स्वीकारावे लागेल.

५.२९. विशेषीकरणाच्या गरजा लक्षात घेऊन विविध अभ्यासक्रम व कार्यक्रम यांची पुनर्रचना व आखणी केली जाईल. त्यात भाषिक कौशल्यांवर विशेष भर दिला जाईल. विविध अभ्यासक्रमाचे एकत्रीकरण करताना त्यात अधिक लवचिकपणा येईल, असा प्रयत्न केला जाईल.

५.३०. राज्यस्तरावरील उच्चशिक्षणाचे नियोजन व एकत्रीकरण उच्च शिक्षण मंडळाच्याद्वारा केले जाईल. उच्च शिक्षणाचा दर्जा राखण्याचे कार्य विद्यापीठ अनुदान मंडळ व ही राज्यमंडळे करतील व त्यासाठी आवश्यक ती कार्यपद्धती निश्चित करतील.

५.३१. उच्च शिक्षणासाठी किमान सोयींची व्यवस्था केली जाईल व क्षमतेनुसार ( विद्यार्थ्यांचे ) प्रवेश निश्चित केले जातील.

अध्यापनपद्धतीत सुधारणा करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. दृकश्रवण साधने व इलेक्ट्रॉनिक यंत्रे आदि उपकरणे यांचा वापर अधिक केला जाईल. विज्ञान तंत्रज्ञानविषयक साहित्य व अभ्यासक्रम संशोधन व शिक्षक-प्रशिक्षण या बाबींच्या विकासाकडे लक्ष दिले जाईल. शिक्षकांचे सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण यासाठी व्यवस्था केली जाईल. शिक्षकांच्या कार्यांचे व्यवस्थितपणे मूल्यमापन केले जाईल. सर्व जागा योग्यतेनुसार भरल्या जातील.

५.३२. विद्यापीठीय संशोधनासाठी भरीव साहित्य दिले जाईल व त्याचा दर्जा चांगला ठेवण्यासाठी उपाययोजना केली जाईल. विविध विद्यापीठातील संशोधन व अन्य संस्थांतील संशोधन यात समन्वय साधण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ योग्य अशी यंत्रणा उभारील. राष्ट्रीय पातळीवरील संशोधनाच्या सोयी विद्यापीठांतून उपलब्ध होतील, यासाठीही प्रयत्न केले जातील. या संशोधन संस्थांना व्यवस्थापनासाठी स्वायत्तता दिली जाईल.

५.३३. प्राच्यविद्या. मानव्यशास्त्रे व सामाजिक शास्त्रे यातील संशोधनाला पुरेसे सहाय्य दिले जाईल. ज्ञानाच्या एकत्रीकरणासाठी आंतरक्षेत्रीय संशोधनास उत्तेजन दिले जाईल. प्राचीन भारतातील ज्ञानाचा आधुनिक ज्ञानाशी समवाय साधला जाईल. यासाठी संस्कृत व अन्य प्राचीन भाषांच्या सखोल अभ्यासाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातील.

५.३४. व्यापक प्रमाणात धोरणातील एकसूत्रता व समन्वय साधण्यासाठी सोयींचा (सर्वांना) योग्य रीत्या लाभ मिळावा यासाठी, तसेच आंतरक्षेत्रीय संशोधनाच्या विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षण, शेती, वैद्यक, तंत्रज्ञान, विधी व अन्य व्यावसायिक क्षेत्रे यासाठी एक समिती स्थापन केली जाईल.

**मुक्त विद्यापीठ व दूर अध्ययन**

५.३५. उच्च शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध व्हावी व शिक्षणाचे लोकशाहीकरण व्हावे यासाठी मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे.

५.३६. ही उद्दिष्टे पार पाडण्यासाठी इ. स. १९८५ मध्ये स्थापन झालेले इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अधिक समृद्ध केले जाईल.

५.३७. या समर्थ माध्यमाचा फार दक्षतापूर्वक विकास करावा लागेल.

**पदवी व नोकऱ्या यातील संबंध तोडणे**

५.३८ काही निवडक क्षेत्रात पदवी व नोकऱ्या यांचा संबंध तोडण्याच्या प्रक्रियेची सुरुवात केली जाईल.

५.३९. हे तत्त्व अभियांत्रिकी, वैद्यक, विधी व अध्यापन इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू केले जाणार नाही, मात्र उच्च पदवीधारकांकडून विशिष्ट क्षेत्रातील (उदा. मानव्यशास्त्रे, सामाजिक शास्त्रे, विज्ञान इ.) नोकऱ्यांसाठी सध्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता अपेक्षिली जाईल.

५.४०. ज्या व्यवसायामध्ये पदव्यांची अनिवार्य गरज नाही अशा व्यवसायांच्या संदर्भात नोकरी व पदवी यांचा संबंध तोडला जाईल. हे तत्त्व विशिष्ट (व्यावसायिक) नोकऱ्यांसाठी लागू केले जाईल. त्यामुळे पदवीची गरज नसताना योग्य उमेदवारास डावलले जाणार नाही व त्याला न्याय मिळेल.

५.४१. पदवीचा नोकरीबरोबरचा हा संबंध नाहीसा करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक मूल्यमापन सेवा क्रमशः सुरू केली जाईल. विशिष्ट कामासाठी वा व्यवसायासाठी उमेदवारांची पारख करण्यासाठी ही सेवा काही निकष निश्चित करील व त्यांच्या आधारे काही चाचण्या घेऊन उमेदवारांची योग्यता ठरवील.

**ग्रामीण विद्यापीठ**

५.४२. महात्मा गांधींच्या शिक्षणविषयक क्रांतिकारी कल्पनांच्या आधारे आजच्या युगाची आव्हाने पेलण्यासाठी स्थानिक नियोजनाबर-हुकूम कार्य करण्यासाठी ग्रामीण विद्यापीठांची नवीन रूपरेषा निश्चित केली जाईल व त्यांचा विकास केला जाईल. महात्मा गांधीप्रणित जीवनशिक्षण संस्थांना व कार्यक्रमांना सहाय्य दिले जाईल.

प्रकरण ६ वे

# तांत्रिक व व्यवस्थापनविषयक शिक्षण

६.१. तांत्रिक व व्यवस्थापनविषयक शिक्षणपद्धती स्वतंत्रपणे कार्य करीत आहेत. त्या दोन्ही शिक्षणपद्धतीतील अनुबंध व परस्परपूरकत्व लक्षात घेऊन त्यांचा एकच विचार करायला हवा. या शतकानंतरची आर्थिक व सामाजिक परिस्थिती, निर्मिती व व्यवस्थापन प्रक्रियेतील संभाव्य बदल तसेच विज्ञान व तंत्रज्ञान यात वेगाने होणारी प्रगती लक्षात घेऊन तंत्रशिक्षण व व्यवस्थापनविषयक शिक्षण यांची पुनर्रचना करायला हवी.

६.२. यंत्रणा, विविध सेवा तसेच असंघटित ग्रामीण विभाग यांना सुधारित तंत्रज्ञानाची तसेच कुशल तंत्रज्ञ आणि व्यवस्थापकांची आवश्यकता असल्याने शासन या बाबीकडे लक्ष देईल.

६.३. मानवबलाविषयीची आवश्यक ती माहिती पुरवण्यासाठी अलिकडेच स्थापन केलेली तांत्रिक मानवबलाविषयी माहिती पुरवणारी यंत्रणा अधिक विकसित व समर्थ करण्यात येईल.

६.४. प्रस्थापित व नव्याने होऊ घातलेल्या तंत्रज्ञान शाखांचा अंतर्भाव असलेल्या निरंतर शिक्षणास प्रोत्साहन देण्यात येईल.

६.५. गणकयंत्रे ही महत्त्वाची व सर्वव्यापी साधने झाली आहेत. गणकयंत्रविषयक किमान ज्ञान व त्यांचा उपयोग कसा करावा, याविषयीचे प्रशिक्षण हा या व्यावसायिक शिक्षणाचा एक भाग असेल. अगदी शालेय स्तरापासून गणकयंत्राचे ज्ञान देणारे उपक्रम फार मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जातील

६.६. सध्या औपचारिक अभ्यासक्रमात प्रवेश मिळवण्यासाठी कडक अटींची पूर्तता करावी लागते, त्यामुळे तांत्रिक व व्यवस्थापनविषयक शिक्षणापासून बऱ्याच जणांना वंचित व्हावे लागते. हे लक्षात घेऊन जनसंपर्क माध्यमाच्या साहाय्याने दूर-शिक्षणाचे कार्यक्रम हाती

घेतले जातील. तंत्रनिकेतन तसेच तंत्रज्ञानविषयक व व्यवस्थापनविषयक संस्थांतील शिक्षणात परिवर्तनशील पद्धतीचा अंतर्भाव केला जाईल. ही पद्धती गुणांकन (क्रेडिटस्) आणि बहुमुखी प्रवेश (मल्टीपॉइंट एंट्री) इत्यादी बाबींवर आधारलेली असेल. त्यासाठी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शनही करण्यात येईल.

६.७. भारतीय परिस्थितीच्या संदर्भात व्यवस्थापनविषयक शिक्षणपद्धतीचे परिशीलन करून एतद्विषयक शैक्षणिक कार्यक्रमांची आखणी व निर्मिती करण्यात येईल. या दृष्टीने मान्यता नसलेल्या किंवा चांगल्याप्रकारे व्यवस्थापन होत नसलेल्या कार्यक्षेत्रांचा विशेष विचार केला जाईल.

६.८. स्त्रिया, आर्थिक-सामाजिकदृष्टचा दुर्बल असलेले घटक आणि अपंग यांचे हित लक्षात घेऊन सुयोग्य अशा औपचारिक व अनौपचारिक तंत्रशिक्षण कार्यक्रमांची निर्मिती करण्यात येईल.

६.९. व्यावसायिक शिक्षणावरील भर व त्याचा विकास लक्षात घेऊन व्यावसायिक शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान, अभ्यासक्रमांचा विकास इत्यादी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर शिक्षक व तज्ज्ञ यांचे साहाय्य घेतले जाईल. ही गरज भागविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातील.

६.१०. स्वयंरोजगाराचे जीवनातील महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्या संदर्भात प्रोत्साहन देण्यासाठी पदवी वा पदविका यांच्या प्रमुख वा पर्यायी अभ्यासक्रमात प्रशिक्षणाचा अंतर्भाव केला जाईल.

६.११. अभ्यासक्रमातील उत्तरोत्तर वाढत्या गरजा लक्षात घेऊन त्यातील अनावश्यक भाग क्रमशः वगळण्यात येईल व नवीन तंत्रज्ञानाचा व अभ्यासक्षेत्राचा त्यात समावेश करण्यात येईल.

६.१२. सामूहिक तंत्रनिकेतनांच्या माध्यमाद्वारा काही ग्रामीण विभागात काही तंत्रनिकेतनांनी दुर्बल घटकांसाठी उत्पादक स्वरुपाच्या उद्योगधंद्यांच्या प्रशिक्षणाचे कार्य सुरू केले आहे. सामूहिक तंत्रनिकेतन-पद्धतीचे मूल्यांकन करून गुणवत्ता व व्याप्ती यांच्या संदर्भात ती अधिक समर्थ करण्यात येतील.

## नवमार्गप्रवर्तन, संशोधन आणि विकास

६.१३. शैक्षणिक प्रक्रियातील नूतनीकरणाचे साधन म्हणून सर्व उच्च तंत्रसंस्थांत संशोधन हाती घेतले जाईल. त्याचा प्रमुख हेतू गुणवत्तायुक्त मानवबळाची निर्मिती हा असेल. विकासासाठी केलेले हे संशोधन सध्याच्या तंत्रज्ञानात सुधारणा करण्यावर भर देईल. त्यातून एतद्देशीय तंत्रज्ञानाचा विकास साधण्यात येईल. यामुळे उत्पादन आणि उत्पादकता वृद्धिंगत होण्यासही साहाय्य होईल. भविष्यात तंत्रज्ञानाचे स्वरूप काय राहील, हे काळजीपूर्वक पाहण्यासाठी एक सुयोग्य यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

६.१४. विविध स्तरांवरील संस्था आणि त्यांचा उपयोग करणाऱ्या पद्धती यांच्यामध्ये परस्पर सहकार्य व अनुबंध प्रस्थापित करण्यात येईल. सुयोग्य नूतनीकरण व सुधारणा करण्याच्या प्रवृत्तीस प्रोत्साहन देण्यात येईल.

## सर्व स्तरांवर कार्यप्रवणता व परिणामकारकता यांना प्रोत्साहन

६.१५. तंत्रविषयक व व्यवस्थापनविषयक शिक्षण अत्यंत खर्चाचे असल्याने त्यात खर्च कसा कमी करता येईल व गुणवत्ता कशी वाढवता येईल यासाठी पुढील उपाययोजना केली जाईल :–

(१) जुनाटपणा काढून टाकून आधुनिकीकरणास सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. केवळ आधुनिकीकरणासाठी आधुनिकीकरण किंवा दर्जाचे प्रतीक म्हणून आधुनिकीकरण केले जाणार नाही. कार्यप्रवणतेच्या अभिवृद्धीसाठीच आधुनिकीकरण केले जाईल.

(२) समाज आणि उद्योग यांच्यासाठी सेवा उपलब्ध करून देणाऱ्या साधनांची निर्मिती करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी त्यांना शिक्षणाची साधने, ग्रंथालये आणि गणकयंत्रे यांच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

(३) विशेषत: मुलींसाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध करून देण्यात येईल. खेळ, कलानिर्मिती आणि सांस्कृतिक कार्ये यासाठीही सोयी उपलब्ध करून देण्यात येतील.

(४) सेवकांच्या नियुक्तीच्या संदर्भात अधिक परिणामकारक कार्य-पद्धतीचा अवलंब केला जाईल. व्यवसायातील संधी, सेवाविषयक नियम, (व्यावसायिक) सल्ला देण्याविषयीचे आदर्श आणि इतर सुखसोयींच्या बाबतीत सुधारणा केली जाईल.

(५) शिक्षकांच्या कार्याचे स्वरूप बहुविध असेल. त्यात अध्यापन, संशोधन, अध्ययनसामुग्रीचा विकास, विस्तार आणि संस्थांचे व्यवस्थापन यांचा समावेश असेल. प्रारंभिक व सेवान्तर्गत प्रशिक्षण अनिवार्य केले जाईल. पुरेसे प्रशिक्षित शिक्षकही दिले जातील. शिक्षकवर्गांचे विकासविषयक कार्यक्रम राज्यस्तरावर हाती घेतले जातील व त्यात विभागीय व राष्ट्रीय पातळ्यांवर सुसंवाद साधला जाईल.

(६) उद्योग व उपयोजक यांच्या आजच्या व भावी गरजा भागवण्यास उपयुक्त ठरतील अशा प्रकारचे तांत्रिक व व्यावस्थापनविषयक अभ्यासक्रम आखले जातील. कार्यक्रमांची आखणी व ते प्रत्यक्ष पार पाडणे, सेवकांची देवाण–घेवाण, साधने व प्रशिक्षणाच्या सोयी, संशोधन व सल्ला, त्याचप्रमाणे परस्परांच्या हिताच्या अनेक बाबींच्या संदर्भात तांत्रिक व व्यवस्थापन विषयक संस्था आणि उद्योग यात परिणामकारक सुसंवाद साधला जाईल.

(७) व्यक्ती व संस्था यांच्या कार्यकौशल्यास व गुणवत्तेस मान्यता दिली जाईल व तिचे योग्य ते चीज केले जाईल. निम्न स्वरुपाची प्रतवारी आणि संस्था यांच्या निर्मितीस पायबंद घातला जाईल. कुशलता व निर्मिती यांना पोषक असे वातावरण निर्माण केले जाईल व त्यासाठी सर्वतोपरी साहाय्य केले जाईल.

(८) निवडक संस्थांना शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रात विविध प्रकारची स्वायत्तता देण्यात येईल. तसेच त्यांचे उत्तरदायित्वही निश्चित केले जाईल.

(९) तंत्र–शिक्षण व उद्योग, संशोधन व विकास संस्था, ग्रामीण व सामूहिक विकास विषयक कार्यक्रम व परस्परपूरक असे इतर शिक्षण विभाग यांच्यातील परस्पर सहकार्य निर्माण होईल, अशा पद्धतीचा अवलंब केला जाईल.

**व्यवस्थापन–कार्य व त्यातील बदल**

६.१६. व्यवस्थापनातील संभाव्य बदल लक्षात घेऊन त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना सिद्ध करावयास हवे. या बदलाचे स्वरूप व दिशा लक्षात यावी व त्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये साध्य करता यावीत, यासाठी परिणामकारक यंत्रणा उभारण्यात येईल.

६.१७. या कार्याचे एकसंघ स्वरूप लक्षात घेऊन मनुष्यबळ व विकास मंत्रालय अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापनविषयक शिक्षण तसेच तांत्रिक व उद्योगविषयक शिक्षण यांच्या संतुलित विकासात समवाय साधेल.

६.१८. व्यावसायिक संस्थांना तांत्रिक व व्यवस्थापनविषयक शिक्षणाच्या विकासात आपली भूमिका योग्य रीतीने बजावण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल.

६.१९. नियोजन, निकष व दर्जा निश्चित करणे व तो टिकवणे, दोषनिवारण व मूल्यमापन, प्रमाणीकरण व पारितोषिके यात समानता राखणे या संदर्भात तंत्रशिक्षण व व्यवसायविषयक शिक्षण यांच्या विकासातील समन्वय साधण्यासाठी आखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळास वैधानिक अधिकार देण्यात येतील. वेळोवेळी मूल्यांकन करण्यासाठी मूल्यमापन करणाऱ्या मंडळाचीही स्थापना करण्यात येईल.

६.२०. दर्जा राखण्यासाठी व अन्य योग्य कारणांसाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण यांचे व्यापारीकरण होऊ दिले जाणार नाही. प्रमाण निकष व उद्दिष्टे यांच्या साहाय्याने खाजगी व सेवाभावी संस्थांच्या साहाय्याने पर्यायी शिक्षण पद्धतीची आखणीही करण्यात येईल.

□ □

## प्रकरण ७ वे

# पद्धती कार्यान्वित करण्याबाबत

७.१. ही व इतर अनेक नवीन कर्तव्ये बेशिस्तीच्या वातावरणात पार पाडता येणार नाहीत. उच्च बौद्धिक, हेतूच्या गांभिर्याने परिपूर्ण आणि त्याचवेळी नूतनमार्ग प्रवर्तनासाठी व सर्जनासाठी आवश्यक अशा स्वतंत्र वातावरणात शिक्षण द्यावयाला हवे. गुणवत्ता व श्रेणी यांच्या प्रचलित असलेल्या शिक्षणपद्धतीत याच वेळी शिस्त आणणे आवश्यक आहे.

७.२. राष्ट्राने शिक्षण पद्धतीवर पराकोटीचा विश्वास ठेवला आहे. त्यामुळे या पद्धतीतून काही निश्चित स्वरूपाच्या परिणामांची अपेक्षा करणे हा लोकांचा हक्क आहे. ही पद्धती कार्यान्वित करणे, हे प्रथम कर्तव्य आहे. सर्व शिक्षकांनी अध्यापन करायला हवे व सर्व विद्यार्थ्यांनी अध्ययन करायला हवे.

७.३. यासाठी पुढील कार्यपद्धती आखता येईल –

(अ) शिक्षकांना अधिक चांगली वागणूक देणे व त्यांच्यावर अधिक जबाबदारी टाकणे.

(आ) विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या व सुधारित सेवांची योजना करणे व मान्य होतील अशा आचारमूल्यांच्या पालनावर भर देणे.

(इ) शैक्षणिक संस्थांसाठी अधिक सोयी सवलती उपलब्ध करून देणे.

(ई) राष्ट्रीय व राज्यांच्या पातळ्यांवर या संस्थांच्या कार्यप्रणालीचे मूल्यमापन करण्यासाठी यंत्रणा उभारणे.

□ □

प्रकरण ८ वे

# शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया यांचा पुनर्विचार

**सांस्कृतिक दृष्टिकोन**

८.१, औपचारिक शिक्षणपद्धती व देशातील संपन्न व विविध सांस्कृतिक परंपरा यामध्ये सध्या अस्तित्वात असलेली दरी सांधली जाण्याची आवश्यकता आहे. खोलवर रुजलेल्या भारतीय इतिहासाच्या व संस्कृतीच्या मुळापासून आधुनिक तंत्रज्ञानात मग्न झालेल्या नवीन पिढीला विभक्त होता येणार नाही. असंस्कृतता, अमानुषता व अलिप्ततेची जाणीव या गोष्टी टाळायलाच हव्यात. मग त्यांची कितीही किंमत द्यावी लागली तरी हरकत नाही. बदल घडवून आणणारे तंत्रज्ञान आणि देशातील सांस्कृतिक परंपरेचे सातत्य यात सुसंगता घडवून आणणे शिक्षणाला शक्य आहे व शिक्षणाने ते केलेच पाहिजे.

८.२. अभ्यासक्रम व शैक्षणिक प्रक्रिया सांस्कृतिक आशयाने जितक्या प्रकारे समृद्ध करता येतील तितक्या प्रकारांनी समृद्ध केल्या जातील. विद्यार्थ्यांमध्ये सौंदर्य, एकसंघता व अभिजातता याबाबत संवेदनक्षमता निर्माण केली जाईल व ती विकसित केली जाईल. समाजातील तज्ज्ञांना त्यांच्या औपचारिक शिक्षणातील अर्हतेला विशेष प्राधान्य न देता तोंडी व लेखी पारंपारिक पद्धतींचा वापर करून शिक्षणाच्या विकासात संपन्नता निर्माण करण्यास हातभार लावण्यासाठी निमंत्रित केले जाईल. पूर्वपरंपरेचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना जुन्या पारंपरिक पद्धतीने शिक्षण देणाऱ्या गुरुंच्या भूमिकेला मान्यता व उत्तेजन दिले जाईल.

८.३. विद्यापीठे व कला, पुरातत्त्वशास्त्र, प्राच्यविद्यांचे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था यांच्यामध्ये दुवा प्रस्थापित केला जाईल.

ललितकला, संगीत, लोकसाहित्य इत्यादींच्या विशेष अभ्यासाकडे योग्य ते अवधान दिले जाईल. या शाखांमधील शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन यांना बळकटी आणली जाईल.

**मूल्यांचे शिक्षण**

८.४. आवश्यक मूल्यांच्या ऱ्हासाबाबत वाढती चिंता आणि समाजातील वाढत जाणारी उपहासवृत्ती यामुळे सामाजिक व नैतिक मूल्ये रुजविण्यास शिक्षण हे समर्थ साधन बनावे, यासाठी अभ्यासक्रमाची पुन्हा नव्याने जुळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

८.५. आपल्या सांस्कृतिकदृष्टया बहुविध असणाऱ्या समाजात सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पूर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे. अशा मूल्यशिक्षणाने गूढवाद, धर्मवेड, हिंसा, लोकभ्रम व दैववाद कमी करण्यास मदत केली पाहिजे.

८.६. अशा या सामना देण्याच्या भूमिकेशिवाय मूल्यशिक्षणात ठाम, निश्चित व गाढ असा आशय आहे. हा आशय आपला वारसा, राष्ट्रीय उद्दिष्टे व सर्वव्यापी ज्ञान यावर आधारित असा आहे. मूल्य-शिक्षणाने यावर मुख्यतः भर दिला पाहिजे.

**भाषा**

८.७. इ. स. १९६८ सालच्या शैक्षणिक धोरणात भाषाविषयक प्रश्नाचा तपशीलवार अभ्यास केलेला आहे. त्यातील आवश्यक तरतुदी सुधारणे अवघड आहे. पूर्वी होत्या तितक्याच त्या तरतुदी आजही प्रसंगोचित आहेत. तथापि १९६८ च्या धोरणातील हा भाग कार्यान्वित करणे अवघड होते. आता हे धोरण मोठ्या जोमाने व हेतूपूर्वक कार्यान्वित केले जाईल.

**पुस्तके आणि ग्रंथालये**

८.८. जनतेच्या शिक्षणासाठी अल्प किमतीव पुस्तकांची उपलब्धता असणे अनिवार्य आहे. सर्व विभागातील लोकांना पुस्तके सुलभरीत्या प्राप्त होतील, ह्यासाठी जरूर ते प्रयत्न केले जातील. पुस्तकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी, वाचनाची सवय वाढविण्यासाठी

आणि सृजनात्मक लिखाणास उत्तेजन देण्यासाठी उपाय योजले जातील. लेखकांच्या हितसंबंधांचे रक्षण केले जाईल. विदेशी पुस्तकांचे भारतीय भाषांत चांगले भाषांतर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. मुलांसाठी दर्जेदार पुस्तके, पाठ्यपुस्तके व कार्यपुस्तिका तयार करण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

८.९. पुस्तकांच्या विकासाबरोबरच सर्व राष्ट्रभर अस्तित्वात असलेली ग्रंथालये सुधारण्याची मोहीम हाती घेतली जाईल. त्याबरोबरच नवीन ग्रंथालये स्थापन केली जातील. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत ग्रंथालयाची सुविधा पुरविण्याची तरतूद केली जाईल. तसेच ग्रंथपालांचा दर्जा सुधारला जाईल.

**माध्यमे आणि शैक्षणिक तंत्रज्ञान**

८.१०. विकासाच्या प्रक्रियेत दहा वर्षापूर्वी गाठलेल्या अनेक पायऱ्या आणि क्रम यांना टाळून जाण्याची ताकद आधुनिक दळणवळण विषयक तंत्रज्ञानात आहे. आज वेळ आणि अंतर यामधील अडथळे टाळता येणे शक्य झाले आहे. रचनेतील द्वैत टाळण्यासाठी आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान खूप दूरवर आणि वंचित असलेल्या विभागातील लोकांपर्यंत आणि त्याचवेळी तौलनिकदृष्ट्या समृद्ध आणि सहज उपलब्ध असलेल्या भागातील लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे.

८.११. शैक्षणिक तंत्रज्ञानाचा उपयोग औपचारिक आणि अनौपचारिक विभागात उपयुक्त माहितीच्या प्रसारासाठी, शिक्षकांचे प्रशिक्षण व पुनःप्रशिक्षण यांचा दर्जा उंचावण्यासाठी कला व संस्कृती-बाबतची जाणीव जागृत करण्यासाठी तसेच शाश्वत मूल्ये बिंबवण्यासाठी केला जाईल. समाजातील उपलब्ध साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग केला जाईल. ज्या गावात वीज नाही तेथे हे कार्यक्रम दाखविण्यासाठी बॅटरी अगर सौरघटांचा वापर केला जाईल.

८.१२. प्रसंगोचित व सांस्कृतिकदृष्ट्या मिळतेजुळते शैक्षणिक कार्यक्रम, शैक्षणिक तंत्रज्ञानातील महत्वाचे घटक म्हणून राहतील आणि देशातील उपलब्ध साधनसंपत्तीचा ह्या कामासाठी वापर केला जाईल.

८.१३. विद्यार्थी आणि प्रौढ या दोघांच्या मनावर या माध्यमाचा खोलवर परिणाम होतो. त्यातील काहींचा भोगवाद आणि हिंसाचार इत्यादी गोष्टीत उत्तेजन देण्याकडे कल असतो आणि त्यामुळे अपायकारक परिणाम दिसून येतात. आकाशवाणी व दूरदर्शनवरील जे कार्यक्रम स्पष्टपणे योग्य शैक्षणिक उद्दिष्टांच्या आड येतात त्यांना प्रतिबंध केला जाईल. चित्रपट व इतर माध्यमातील अशा प्रवृत्तींनासुद्धा परावृत्त करण्यासाठी योग्य पावले उचलली जातील. उच्च दर्जाचे व उपयुक्त असे बालचित्रपट निर्माण करण्यासाठी कृतिशील चळवळ सुरू केली जाईल.

## कार्यानुभव

८.१४. हेतुपूर्वक आणि अर्थपूर्णपणे केलेल्या ज्या ज्या श्रममूलक कार्याचा शेवट समाजोपयोगी उत्पादनात किंवा सेवेत होतो, ते कार्य म्हणजे कार्यानुभव होय. अशा रीतीने आखणी केलेला व अध्ययन-प्रक्रियेतील अंगभूत असलेला भाग म्हणून शिक्षणातील सर्व स्तरांवर कार्यानुभव हा मूलभूत घटक मानला जातो. या विषयाची तरतूद सुयोग्य रचना केलेल्या टप्प्याटप्प्याच्या कार्यक्रमाद्वारे केली जाईल. त्यामध्ये विद्यार्थ्यांची अभिरुची, गरजा आणि कुवत यांच्याशी सुसंगत असलेल्या कृती असतील. शिक्षणातील टप्प्यांनुसार कौशल्ये आणि ज्ञानाची पातळी उंचावली जाईल. एकूण व्यावसायविश्वात प्रवेश करताना हा अनुभव त्याला खास उपयोगी पडेल. कनिष्ठ माध्यमिक पातळीवरील व्यवसाय-शिक्षणपूर्व कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसायशिक्षण अभ्यासक्रमाची निवड करणे अधिक सुकर होईल.

## शिक्षण आणि परिसर

८.१५. परिसराबाबतची जाणीव निर्माण करण्याची आज नितान्त गरज आहे. लहान मुलांपासून तो समाजातील सर्व घटकांत व सर्व वयाच्या लोकांत ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. शाळा व महाविद्या-लयातून ह्या जाणीवेने अध्यापन झाले पाहिजे. संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेत हा दृष्टिकोन एकात्म रुपाने राहील.

**गणिताचे अध्यापन**

८.१६. लहान मुलाचे विचाराचे, विवेक शक्तीचा वापर करण्याचे, पृथःकरण करण्याचे आणि तर्कशुद्ध पद्धतीने उच्चारण करण्याचे साधन म्हणून गणिताकडे पाहिले जावे. खास विषय म्हणून असण्यापेक्षा गणिता-कडे ज्या विषयांमध्ये पृथःक्करण आणि युक्तिवाद यांचा संबंध आहे त्यांना जोडणारा दुवा म्हणून बघितले पाहिजे.

८.१७. अगदी अलीकडेच संगणकाच्या शाळेतील प्रवेशाबरोबर शैक्षणिक संगणन व कार्यकारण संबंधाच्या जाणीवेतून उद्‌भवलेले शिक्षण व चलांमधील क्रिया व प्रतिक्रिया या सर्वांबरोबर अद्ययावत तंत्रयोजनेच्या बरोबरीने आणण्यासाठी गणित-अध्यापनाची पुनर्रचना केली जाईल.

**शास्त्राचे अध्यापन**

८.१८. विद्यार्थ्यांमध्ये चौकसबुद्धी, सृजनशीलता, वस्तुनिष्ठता, प्रश्न विचारण्याचे धाडस व सौंदर्यदृष्टीबाबत निश्चित अशा क्षमता आणि मूल्ये यांचा विकास करण्यासाठी विज्ञानाचे शिक्षण मजबूत केले जाईल.

८.१९. विद्यार्थ्याला प्रश्न सोडविणे व निर्णय घेणे याबाबतीत कौशल्य संपादण्याकरिता आणि आरोग्य, शेती, उद्योग आणि जीवना-तील इतर अंगाशी असलेले विज्ञानाचे संबंध शोधण्याकरिता विज्ञान–शिक्षणाचे कार्यक्रम आखले जातील. अफाट संख्येने औपचारिक शिक्षणाच्या सीमेबाहेर असणाऱ्यांपर्यन्त पोहोचण्यासाठी विज्ञान-शिक्षणाच्या विस्ताराकरिता प्रयत्न केले जातील.

**क्रीडा आणि शारीरिक शिक्षण**

८.२०. क्रीडा आणि शारीरिक शिक्षण हे अध्ययन प्रक्रियेतील अविभाज्य घटक आहेत. विद्यार्थ्याने केलेल्या प्रगतीचे मूल्यमापन केले जाईल. शैक्षणिक आकृतिबंधात राष्ट्रीय स्तरावर शारीरिक शिक्षण आणि खेळ यासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यात येईल.

८.२१. या रचनेत शाळासुधार कार्यक्रमांचा भाग म्हणून खेळा-साठी क्रीडांगणे, क्रीडासाहित्य, खेळ शिकविण्यासाठी खास शिक्षण व

शारीरिक शिक्षण विषयाचे शिक्षक असतील. जरूर पडल्यास कायद्याने शहरी विभागात उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागा क्रीडांगणासाठी राखून ठेवण्यात येतील. नियमित शिक्षणाबरोबर क्रीडाविषयक कार्यक्रम व क्रीडेशी संबंधित अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्यासाठी क्रीडासंस्था आणि वसतिगृहे स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जातील. खेळात जे प्राविण्य मिळवतील त्यांना योग्य प्रकारे उत्तेजन दिले जाईल. देशी पारंपारिक खेळांवर योग्यप्रकारे भर दिला जाईल. शरीर व मनाचा एकात्मविकास करण्याची प्रवर्तक यंत्रणा म्हणून योगाकडेही खास लक्ष देण्यात येईल. प्रत्येक शाळेत योगशिक्षण सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या स्तरावर त्याचा समावेश शिक्षण-प्रशिक्षण अभ्यासक्रमात केला जाईल.

## युवकांची भूमिका

८.२२. शैक्षणिक संस्थांमधून आणि संस्थाबाहेरूनही राष्ट्रीय आणि सामाजिक विकास करण्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेण्याची संधी युवकांना प्राप्त करून दिली जाईल. विद्यार्थ्यांना सध्या प्रचलित असलेल्या योजना उदा. राष्ट्रीय सेवायोजना (नॅशनल सर्व्हिस स्कीम) राष्ट्रीय छात्र सेना (नॅशनल कॅडेट कॉर्प्स) इत्यादींमध्ये भाग घेणे आवश्यक राहील. संस्थेबाहेरही विकास सुधारणा आणि विस्तार इत्यादी-विषयककार्यक्रम घेण्यास युवकांना उत्तेजन दिले जाईल. राष्ट्रीय छात्र सेवा योजना (नॅशनल सर्व्हिस व्हॉलंटीयर योजना) मजबूत केली जाईल.

## मूल्यमापन प्रक्रिया आणि परीक्षांतील सुधारणा

८.२३. मूल्यमापन हा अध्ययन व अध्यापन प्रक्रियेचाच एक अंगभूत भाग होय. निकोप शैक्षणिक तंत्राचा भाग म्हणून शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी परीक्षा घेतल्या गेल्या पाहिजेत.

८.२४. अध्ययन व अध्यापन सुधारण्यासाठी समर्थ साधन आणि विद्यार्थीविकासातील सप्रमाण आणि विश्वसनीय अशी मूल्यांकनपद्धती या दृष्टीने परीक्षायंत्रणेची पुनर्रचना करणे हे एक उद्दिष्ट असेल.

व्यवहार्य भाषेत याचा अर्थ असा :–

(१) योगायोग आणि व्यक्तिनिष्ठता यांचा अतिरेक नाहीसा करणे.

(२) पाठांतरावर भर नसणे.

(३) शिक्षणातील शालेय व बहि:शालेय अंगाचा अंतर्भाव असणारे निरंतर व सर्वंकष मूल्यमापन, शिक्षणाचा काळ संपेपर्यन्त चालू ठेवणे.

(४) शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्याकडून मूल्यमापन प्रक्रियेचा परिणामकारक वापर.

(५) परीक्षा घेण्याच्या पद्धतीत सुधारणा.

(६) शैक्षणिक साहित्य आणि अध्यापनतंत्र यात एकाच वेळी बदल.

(७) माध्यमिक स्तरावर टप्प्याटप्प्याने सत्रपद्धती सुरू करणे.

(८) गुणांच्या जागी श्रेणीचा वापर करणे.

८.२५. वरील ध्येये ही बहि:स्थ परीक्षा व शैक्षणिक संस्थांमधील मूल्यमापन यांच्याशी निगडित आहेत. संस्थेच्या स्तरावर मूल्यमापन अधिक कार्यक्षम केले जाईल आणि बहि:स्थ परीक्षांचे वर्चस्व कमी केले जाईल.

□ □

## प्रकरण ९ वे

# शिक्षक

९.१. शिक्षकाच्या दर्जात समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्तराचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. असे म्हणतात की, कुणीही आपल्या शिक्षकांपेक्षा वरचा स्तर गाठू शकत नाही. विधायक आणि नवनिर्माण-क्षम पद्धतीने कार्य करण्यासाठी शिक्षकाला मदत, प्रोत्साहन आणि प्रेरणा देईल असे वातावरण निर्माण करण्यासाठी शासनाने आणि समाजाने प्रयत्नशील रहावे. शिक्षकांना नवेनवे उपक्रम आखण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. समाजाचे व्यवसाय, त्यांच्या गरजा आणि क्षमता वगैरेचा विचार करून ज्ञानदानाच्या पद्धती आणि कार्यक्रम नव्याने आखण्याची मुभा शिक्षकाला दिली पाहिजे.

९.२. शिक्षकांची भरती करण्याच्या पद्धतीची फेररचना केली जाईल. त्यामुळे गुणवत्ता, वस्तुनिष्ठता आणि विशिष्ट काम करण्यासाठी लागणाऱ्या गरजांची पूर्ती होईल. ज्या प्रमाणात त्यांच्यावर सामाजिक व व्यावसायिक जबाबदारी आहे त्या प्रमाणाशी सुसंगत असे वेतन आणि सेवेचे नियम केले पाहिजेत. त्यामुळे बुद्धीमान वर्ग या व्यवसायाकडे आकृष्ट होण्याची निकडही भागेल. संपूर्ण देशात सर्वत्र एकसारखा पगार, एकसारखेच सेवानियम आणि शिक्षकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी यंत्रणा उभारणे इत्यादि इच्छित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी परिश्रम केले जातील. शिक्षकांच्या नेमणुका आणि बदल्या यात वस्तुनिष्ठता यावी म्हणून काही मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जातील. शिक्षकांचे मूल्यमापन करण्याची पद्धती निर्माण केली जाईल. ती खुली तसेच सहभागावर आणि उपलब्ध आकडेवारीवर आधारलेली असेल. वरच्या श्रेणीत पदोन्नती व्हावी म्हणून त्याला रास्त संधी दिली जाईल. उत्तरदायित्वासंबंधीचे काही आदर्श घालून दिले जातील. त्यात उत्तम काम करण्यासाठी उत्तेजन दिले जाईल आणि कामचुकारपणासाठी त्याउलट कार्यवाही केली जाईल. शिक्षक शैक्षणिक उपक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत राहतील.

९.३. व्यवसायातील प्रामाणिकपणा टिकविणे, शिक्षकांचा मानसन्मान राखणे आणि व्यावसायिक दुराचार रोखणे ह्यासाठी शिक्षकांच्या संघटनांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली पाहिजे. शिक्षकांसाठी व्यावसायिक नैतिकतेची नियमावली तयार करणे आणि तिचे पालन करविणे ह्या गोष्टी राष्ट्रीय पातळीवरील शिक्षक संघटना करू शकतात.

**शिक्षकांसाठी शिक्षण**

९.४. शिक्षकांसाठी शिक्षण ही एक अखंड प्रक्रिया आहे. नोकरीत शिरण्यापूर्वी आणि तीत असताना शिक्षणाचे घटक एकमेकांपासून अलग करता येणार नाहीत. याबाबतीत पहिले पाऊल म्हणून शिक्षकांसाठी जे शिक्षण आहे ते घासून-पुसून कार्यक्षम केले जाईल.

९.५. शिक्षकांसाठी असलेल्या शिक्षणाच्या उपक्रमात निरंतर शिक्षणावर भर दिला जाईल. तसेच ह्या धोरणात अनुस्यूत असलेल्या धडक कार्याची पूर्ती करण्यासाठी शिक्षकांची निवड प्रामुख्याने लक्षात ठेवली जाईल.

९.६. प्राथमिक शाळांच्या शिक्षकांसाठी जिल्हानिहाय शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जातील. शिक्षक होण्यासाठी आवश्यक ते शिक्षण आणि शिक्षकाने नोकरीत असताना घ्यावयाचे शिक्षण ह्या दोन्हींची व्यवस्था करण्याची क्षमता त्या संस्थात असेल, अशीच सोय अनौपचारिक आणि प्रौढ शिक्षण देण्याचे काम करणाऱ्यांच्यासाठी केली जाईल. अशा संस्था एकदा स्थापन झाल्या की, हलक्या प्रतीच्या इतर संस्था हळूहळू बंद केल्या जातील. निवडक माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्थांना वरचा दर्जा दिला जाईल आणि त्या राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या कामाला पूरक ठरतील. राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेला आवश्यक ती साधनसंपत्ती पुरवली जाईल आणि इतर शिक्षक प्रशिक्षण संस्थांना दर्जेदार बनविण्याची क्षमता तसेच अभ्यासक्रम आणि पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्याची पात्रताही तिला बहाल केली जाईल. विद्यापीठांनी चालविलेले शिक्षण विभाग आणि शिक्षक प्रशिक्षण संस्था ह्यांचे जाळे तयार करण्याची व्यवस्था केली जाईल.

प्रकरण १० वे

# शिक्षणाचे व्यवस्थापन

१०.१. शिक्षणाची नियोजन व व्यवस्थापनपद्धती सतत कार्यक्षम ठेवण्यास अग्रक्रमाने प्राधान्य देण्यात येईल. यासाठी पुढील बाबी विचारात घेतल्या आहेत.

(अ) शिक्षणाचे दीर्घकालीन नियोजन व व्यवस्थापन विषयक दृष्टिकोन निश्चित करणे आणि देशाच्या विकासविषयक व मनुष्यबळ-विषयक गरजांशी त्यांची सांगड घालणे.

(आ) शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत विकेंद्रीकरण करणे व स्वायत्ततेची भावना निर्माण करणे.

(इ) जनतेच्या सहभागाला–यात अशासकीय व सेवाभावी संस्थांचे प्रयत्न आलेच–प्राधान्य देणे.

(ई) शिक्षणाच्या नियोजनात व व्यवस्थापनात स्त्रियांना अधिकाधिक सहभागी करणे.

(उ) उद्दिष्टे आणि तत्त्वे यांच्या पालनाच्या उत्तरदायित्वाचे निकष निश्चित करणे.

**राष्ट्रीय स्तरावर**

१०.२. शैक्षणिक विकासाचे पुनर्मूल्यांकन करणे. शिक्षणपद्धती सुधारण्यासाठी आवश्यक ते बदल करणे व ते लागू करण्यासाठी पुढाकार घेणे इ. बाबतीत केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ प्रमुख भूमिका बजावेल. त्यासाठी हे मंडळ योग्य त्या समित्या आणि उभारलेली यंत्रणा यांच्या द्वारा मानवबळ विकासाच्या विविध क्षेत्रांशी संपर्क साधेल व त्यात सुसंगती आणील. तज्ज्ञांना सहभागी करून घेऊन केंद्रातील व राज्यातील शिक्षण विभाग अधिक समर्थ केले जातील.

**भारतीय शिक्षण सेवा**

१०.३. शिक्षणक्षेत्रात योग्य व्यवस्थापन यंत्रणा उभारावयाची म्हटली की, भारतीय शिक्षण सेवेचे स्वरूप अखिल भारतीय सेवा असे ठेवावे लागेल. ह्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्राला ह्यामुळे राष्ट्रीय दृष्टि-कोन लाभेल. ह्या सेवेतील जागा भरताना कार्यपद्धती कशी राहील हे राज्यातील शासनाशी विचारविनिमय करून ठरविले जाईल

**राज्य पातळी**

१०.४. राज्य सरकारे केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या धर्तीवर सल्लागार समित्या नेमू शकतील. मनुष्यबळविकास साधणाऱ्या विविध राज्यपातळीवरील यंत्रणेमध्ये एकसूत्रीपणा आणण्याकरिता पावले उचलतील.

१०.५. शिक्षणाच्या नियोजनाकरिता अधिकारी आणि संस्था-प्रमुख यांना प्रशिक्षण देण्याकरिता विशेष लक्ष दिले जाईल. यासाठी टप्प्याटप्प्याने व्यवस्था करावी लागेल.

**राज्य आणि स्थानिक पातळी**

१०.६. उच्च माध्यमिक स्तरापर्यन्तच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याकरिता जिल्हा स्तरावर शिक्षण मंडळे निर्माण केली जातील. राज्य सरकारे या गोष्टींकडे त्वरित लक्ष पुरवतील. शिक्षणाच्या विकासातील आकृतिबंधात केंद्र, राज्य, जिल्हा आणि स्थानिक स्तरा-वरील काम करणाऱ्या संस्था, नियोजन, एकसूत्रीकरण, मूल्यांकन आणि नियंत्रण ठेवण्यात सहभागी होतील.

१०.७. शिक्षणसंस्थांच्या प्रमुखांकडे फार महत्त्वाची भूमिका दिली जाते. असे प्रमुख, विशेष प्रयत्नांनी निवडले जातील आणि त्यांना प्रशिक्षण दिले जाईल. शाळांचे समूह निर्माण केले जातील. त्यांच्या-बाबतीत लवचिकता असेल. तसेच त्यांच्याद्वारे संस्थांचे एक जाळे विणता येईल. मग शिक्षक तज्ज्ञ होतील. अशाप्रकारे त्यांचे एकीकरण साधता येईल. त्यामुळे धोरणाचे पालन होईल. अनुदान व सोयी यांचे आपापसात आदानप्रदान करता येईल. शालासमूहांची पद्धती हळूहळू विकसित होऊन ती योग्यवेळी शाळा निरीक्षणाचे कार्य करू लागेल.

१०.८. स्थानिक संस्थांकडे शाळाविकासाच्या उपक्रमात महत्त्वाची भूमिका दिली जाईल. यासाठी योग्य त्या समित्या निर्माण केल्या जातील.

**सेवाभावी संस्था आणि अनुदानप्राप्त संस्था**

१०.९. व्यवस्थापन नीट असल्यास सेवाभावी कार्य करणाऱ्या संस्था आणि अनुदानप्राप्त अशासकीय संस्था यांना प्रोत्साहन दिले जाईल व त्यांना आर्थिक सहाय्य केले जाईल. सामाजिक कार्य करणारे गट यात अंतर्भूत करता येतील. शिक्षणाचा व्यवसाय करू पाहणाऱ्या संस्था निर्माण होणार नाहीत, यासाठी मात्र परिणामकारक पावले उचलावी लागतील.

□ □

प्रकरण ११ वे

# साधनसंपत्ती आणि आढावा

११.१. सामाजिक आणि राजकीय समानतेची ध्येये व त्यांची कार्यवाही आणि भारतीय समाजव्यवस्थेतील विकाससंबद्ध उद्दिष्टे ही शिक्षणाच्या क्षेत्रात गुंतवणूक करूनच साधता येतील असे इ. स. १९६४–६५ च्या समितीचा अहवाल व इ. स. १९६८ चे राष्ट्रीय शिक्षण धोरण यात आवर्जून सांगितले आहे. शिक्षणक्षेत्राशी संबद्ध लोकांनीही असेच मत व्यक्त केले आहे. ह्या कामगिरीचे स्वरूप आणि व्यापकता डोळयांपुढे ठेऊन ही गुंतवणूक योग्य त्या प्रमाणात करावी लागेल.

११.२. शक्य असेल तेवढया प्रमाणात ही साधनसंपत्ती खालील मार्गांनी उपलब्ध केली जाईल. (१) देणग्या स्वीकारणे, (२) ज्या जमातींना याचा लाभ होणार आहे त्यांना शाळेच्या इमारतींची निगा राखण्यास आणि खाद्यपदार्थ पुरविण्यास सांगणे, (३) शिक्षणाच्या उच्चस्तरावर फीचे उत्पन्न घेणे आणि सोयीसवलतींचा दक्षतेने वापर करून काही रक्कम शिल्लक ठेवणे.

संशोधनकार्य करणाऱ्या आणि विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मनुष्यबळाचा विकास साधणाऱ्या संस्थांनी देखील त्याचा फायदा घेणाऱ्या संस्थांवर काही कर किंवा फी आकारून काही निधी गोळा करावा. अशा संस्थांत, शासकीय खाती आणि नवीन उद्योजकही येतील. ह्या सर्व उपायांनी केवळ राज्य सरकारच्या तिजोरीवरचा ताण कमी होईल असे नव्हे तर एक फार मोठी जबाबदारीची भावनाही निर्माण करता येईल. अर्थात ह्या असल्या उपायांनी एकूण लागणाऱ्या निधीमध्ये फारच थोडी भर पडेल. मुख्यत: शासन आणि सामान्यपणे जनता

खालील उपक्रमांकरिता निधी गोळा करील. प्राथमिक शिक्षण सर्वदूर पसरविणे, निरक्षरता घालविणे संपूर्ण देशात सर्व वर्गांना शिकण्याची संधी प्राप्त करून देणे, सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करणे, शैक्षणिक उपक्रमांची गुणवत्ता आणि कार्यक्रमांची परिणामकारकता वाढविणे, स्वयंपूर्ण आर्थिक विकास साधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असे ज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित करणे आणि राष्ट्र जगविण्यासाठी मूल्यांची आणि कर्तव्याची चोखंदळ जाणीव निर्माण करणे.

११.३. शिक्षकांसाठी भांडवलच न गुंतविणे किंवा अपुरे भांडवल गुंतविणे ह्याचे अत्यंत अपायकारक परिणाम भोगावे लागतील आणि ते खरोखरच फार भयानक ठरतील. तसेच व्यावसायिक व तांत्रिक आणि संशोधन ह्यांची आबाळ करणेही परवडणार नाही. ह्या क्षेत्रातील हीन दर्जाच्या कामगिरीमुळे भारतीय व्यवस्थेची कधीही न भरून निघणारी हानी होऊ शकते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वेळोवेळी स्थापन केलेल्या संस्थांचे जाळे विज्ञान आणि तंत्रविज्ञान ह्यांचा वापर सुकरतेने करायला उपयोगी ठरले होते. पण आता ते सारे जुनाट झाले असल्यामुळे त्याला त्वरेने अत्याधुनिक करण्याची गरज आहे.

११.४. हे सगळे करणे अत्यंत निकडीचे झाल्यामुळे राष्ट्रीय विकासासाठी शिक्षण हे गुंतवणुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र झाले आहे. इ. स. १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असे स्पष्ट नमूद केलेले होते की, शिक्षणातील गुंतवणूक क्रमाक्रमाने वाढवावी आणि शक्य तेवढ्या लवकर ती राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यन्त न्यावी. पण प्रत्यक्ष गुंतवणुकीचे प्रमाण त्या उद्दिष्टांपेक्षा खूपच कमी झालेले आहे. तेव्हा या धोरणात नमूद केलेल्या उपक्रमासाठी निधी संकलित करण्याचा पक्का निर्धार करणे महत्त्वाचे आहे. नियंत्रण आणि परीक्षण करून प्रत्यक्ष गरज किती आहे ते वेळोवेळी गणकयंत्राद्वारे निर्धारित केले जाईल. सातव्या योजनेत या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी गरजेपुरता शिक्षणावरील खर्चाचा आकार निर्धारित करण्यात येईल. पण आठव्या योजनेपासून पुढे मात्र हा खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्क्यांची मर्यादा एकसारखी ओलांडेल ह्याची खातरजमा केली जाईल.

**आढावा**

११.५. ह्या नव्या धोरणाची अंमलबजावणी नीट होते की नाही ह्याचा दर ५ वर्षांनी आढावा घेतलाच पाहिजे. थोड्या थोड्या कालावधीनेदेखील ह्याची तपासणी केली जाईल. ह्यामुळे अंमलबजावणीतील प्रगतीचा आढावा घेता येईल आणि त्यांतून वेळोवेळी निर्माण होणाऱ्या प्रवृत्तींचेही ज्ञान होईल.

□ □ □

**प्रकरण १२ वे**

# भवितव्य

१२.१. भारताच्या शिक्षणाचे भावी स्वरूप इतके जटिल असेल की, ते अगदी काटेकोर दृष्टीपुढे आणणे कठीण आहे. तरीपण आपण उद्दिष्टे साधण्यात निश्चित यशस्वी होऊ. कारण आपल्याला परंपरा लाभलेली आणि तिने नेहमीच बौद्धिक व आध्यत्मिक उद्दिष्टे साध्य करण्यावर अधिक भर दिलेला आहे.

१२.२. हे शतक संपताना देशाची लोकसंख्या सुमारे १०० कोटी असेल. या शैक्षणिक संरचनेचा पाया बळकट करणे हे आजचे प्रमुख कर्तव्य आहे. या संरचनेच्या शिरोभागी असलेले लोक जगातील उत्तमोत्तमांपैकी असतील. याची खात्री करून घेणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. भूतकाळात आपल्या संस्कृति-निर्झरांनी पाया व शिखर या दोहोंची नीट काळजी घेतली होती. मध्यंतरी परकीय वर्चस्वामुळे त्याचा काहीसा तोल गेला होता. तेव्हा आता मानवसाधनसामुग्री विकासासाठी संपूर्ण देशभर प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. त्यात शिक्षण आपली बहुमुखी भूमिका पार पाडील, यात शंका नाही.

□ □ □

भाग ३ रा

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

१९८६

# कृति कार्यक्रम

# प्रस्तावना

लोकसभेने १९८६ च्या अंदाजपत्रकीय अधिवेशनाच्या वेळी चर्चा करून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ला मान्यता दिली.

मनुष्यबळ खात्याच्या मंत्रिमहोदयांनी, पावसाळी अधिवेशनाच्या वेळी या शैक्षणिक धोरणाच्या कार्यवाहीचा 'कृतिकार्यक्रम' सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार अंदाजपत्रकीय अधिवेशन संपताच मंत्रालयाने कृतिकार्यक्रम तयार करण्याचा सघन उपक्रम हाती घेतला.

२) त्याकरिता सुरुवातीलाच एकूण २३ कार्यगट तयार करण्यात आले. त्यामध्ये शिक्षणक्षेत्रातील थोर विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, तसेच केंद्र व राज्य शासनांतील ज्येष्ठ प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आणि प्रत्येक कार्यगटाकडे शैक्षणिक धोरणामधील एकेका विशिष्ट विषयाचे काम सोपविण्यात आले. कार्यगटांकडे देण्यात आलेले विषय पुढीलप्रमाणे होते:-

१. पद्धती कार्यान्वित करणे
२. शालेय शिक्षणाचा आशय व प्रक्रिया
३. स्त्रियांना समानतेचे शिक्षण
४. अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गियांचे शिक्षण
५. अल्पसंख्यांकांचे शिक्षण
६. अपंगांसाठी शिक्षण
७. प्रौढ व निरंतर शिक्षण
८. बालसंगोपन व शिक्षण
९. प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व खडू फळा मोहीम
१०. माध्यमिक शिक्षण व नवोदय विद्यालये
११. शिक्षणाचे व्यावसायीकरण

१२. उच्च शिक्षण

१३. मुक्त विद्यापीठे व निरंतर शिक्षण

१४. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण

१५. संशोधन व विकास

१६. प्रसार माध्यमे व शैक्षणिक तंत्रज्ञान

१७. पदवी व नोकऱ्या यांतील संबंध तोडणे

१८. सांस्कृतिक यथार्थ दर्शन व भाषा विषयक धोरणाची कार्यवाही

१९. खेळ, शारीरिक शिक्षण व युवक

२०. मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा सुधार

२१. शिक्षक व त्यांचे प्रशिक्षण

२२. शिक्षणाचे व्यवस्थापन

२३. ग्रामीण विद्यापीठे/संस्था

३) प्रत्येक कार्यगटाने आपापल्या विषयाच्या संदर्भात सद्य-स्थितीचे अभ्यासपूर्वक अवलोकन करावे आणि त्या विषयाला धरून असलेल्या शैक्षणिक धोरणामधील विशिष्ट विधानांचा तपशील अधिक स्पष्टपणे मांडावा, अशा प्रकारची विनंती सगळ्या कार्यगटांना करण्यात आली होती. त्याचबरोबर त्यांनी आपल्या विषयातील कार्यक्रमांची व्यापक उद्दिष्टे स्तरवार नमूद करावीत, त्यानुसारच्या कार्याची दिशा आणि कार्यवाहीची पद्धत निर्देशित करावी, प्रत्येक स्तरावर कराव्या लागणाऱ्या खर्चाची स्थूल मानाने नोंद करावी, अशा प्रकारची अपेक्षा त्यांच्याकडून करण्यात आली होती.

४). सर्व कार्यगटांनी त्यांना मिळालेल्या मर्यादित कालावधीमध्ये आपले कार्य अत्यंत काळजीपूर्वक पार पाडले. जुलै १९८६ मध्ये त्यांनी आपापल्या गटाचे अहवाल सादर केले. मनुष्यबळ व विकास मंत्रि-महोदयांनी घेतलेल्या विविध बैठकांमध्ये या अहवालांवर चर्चा करण्यात आली. ही चर्चा पूर्ण झाल्यावर राज्याचे शिक्षण सचिव व केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक यांची दि. २० जुलै १९८६ रोजी एक बैठक बोलावण्यात आली. या बैठकीचे वेळी केलेल्या सूचनांची काळजीपूर्वक छाननी करून

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील महत्त्वाच्या कार्यक्षेत्रासाठी कृति कार्यक्रम तयार करण्यात आला.

त्यानंतर दि. १ आणि २ ऑगस्ट १९८६ रोजी मध्यवर्ती शिक्षण सल्लागार समितीची नवी दिल्ली येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये कृति कार्यक्रमावरील प्रलेखावर चर्चा करण्यात आली. या बैठकीत सहभागी झालेल्या राज्याचे शिक्षणमंत्री, केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन अधिकारी आणि शिक्षणतज्ज्ञ यांनी मौलिक अशा बऱ्याच सूचना केल्या. त्या सर्व सूचना विचारात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावरील कृति कार्यक्रम लोकसभेत सादर करण्यात आला.

५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जरूर त्या कृतीचे स्वरूप दाखवून देणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे. या कृति कार्यक्रमातून कार्याची दिशा स्थूल स्वरूपात दिली आहे. त्यावरून तपशीलवार योजना तयार करावयाची आहे. शिक्षणाच्या निरनिराळ्या योजना तयार करून त्या कार्यान्वित करण्यासाठी कोणती पूर्वतयारी करावी लागणार आहे याची कल्पना या कृति कार्यक्रमातून येण्यास मदत होईल. कृति कार्यक्रमात दाखविण्यात आलेली कार्याची दिशा आणि पद्धती यांवर एकदा लोकसभेमध्ये परीक्षण होऊन त्यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर त्यासंबंधीची शिफारस करण्यात आली म्हणजे विविध विभागांकडून ( Departments ) व संस्थांकडून ( Agencies ) तपशीलवार योजना तयार करण्याचे काम सर्व संबंधितांच्या सल्लामसलतीने हाती घेण्यात येईल. या कृति कार्यक्रमातील रचनाबंध (structure) साचेबंद स्वरूपाचा नसून तो फक्त दिशादर्शक असा आहे. या कृति कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना त्यांच्याकडील परिस्थितीच्या विशिष्ट संदर्भात आलेल्या अनुभवावर आधारून जरूर ते फेरफार करण्याइतपत लवचिकता यात गृहीत धरण्यात आलेली आहे. या एकूण कार्यक्रमाची अमलबजावणी मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार यांच्यातील परस्पर सहकार्यातून व प्रयत्नातून केली जाणार असली तरी त्यामध्ये अवश्य समाजाला आणि शिक्षकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे आणि पुढे ही त्यांच्याशी सतत सल्ला मसलत केली जाणार आहे.

६) कार्यगटांनी त्यांच्या अहवालात आर्थिक बाबी स्थूलमानाने दर्शविल्या असल्या तरी, अर्थ मंत्रालय व नियोजन मंडळाशिवाय सह-वर्तमान इतर सर्व संबंधितांशी विचार विनिमय करून एकूण आर्थिक बाबींची छाननी होणे गरजेचे आहे. या कृतिकार्यक्रमातील विविध उपक्रम केवळ सातव्याच नव्हे तर आठव्या व त्याही पुढील पंचवार्षिक योजनाकाळामध्येही चालू राहतील अशा पद्धतीने विकसित केले जातील. त्यांची कार्यवाही करणाऱ्या संस्थांना उपलब्ध साधने व कार्यवाहीची पद्धती यांमध्ये जरुर ते समायोजन बरोबर साधता येईल अशा बेताने कार्यक्रमाच्या स्तरास्तरांवर लवचिकता ठेवण्यात येईल.

७) सार्वजनिक मदतीतून चालणाऱ्या शाळांची गुणवत्ता वाढविणे व शिक्षण योजनेमधील विषमता कमी करणे, यांवर राष्ट्रीय शिक्षण पद्धतीच्या संकल्पनेमध्ये विशेषत्वाने भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे पालकांना आपली मुले जादा फी घेऊन शिकवणाऱ्या खाजगी शाळांमध्ये पाठवावी असे सर्वसामान्यपणे वाटणार नाही. या दिशेने आता आपणास वेगाने आणि निर्धाराने पावले टाकावी लागणार आहेत. ग्रामीण व शहरी विभागातील ज्या शाळांना अपुरी साधन सामुग्री व जागा आहे अशा शाळांना पुरेशी जागा व सर्व सोयी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'ऑपरेशन ब्लॅकबोर्ड' ही राष्ट्रव्यापी मोहीम हाती घेण्यात आली आहे. जिल्हास्तरावर स्थापन होणारी जिल्हा शिक्षण मंडळे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था आणि ग्राम पातळीवरील शिक्षण समित्या ह्या शालेय सुधार कार्यक्रमात आपापला वाटा तर उचलतीलच, पण त्याचबरोबर शिक्षण प्रक्रियेत समाजाचा सहभाग मिळवून एकूण शिक्षण पद्धती विषयीची जबाबदारीची जाणीव समाजामध्ये नव्याने निर्माण करतील. कृति कार्यक्रमात प्रस्तावित केल्यानुसार स्त्री समानता निर्माण करण्यासाठी प्रचलित शिक्षण पद्धतीची पुनर्रचना करणे, अनुसूचित जाती जमाती, शिक्षणाला वंचित झालेले इतर घटक, अल्प-संख्यांक, अपंग आणि विशेष लक्ष देणे आवश्यक असलेली अन्य क्षेत्रे, यां बाबींची अंमलबजावणी संवेदनशील मनाने, उत्साहपूर्वक व सातत्याने केल्यास घटनेत सांगितलेल्या लोकशाही व समाजवादी आदर्शप्रत पोचण्यात आजची शिक्षण पद्धती समर्थ ठरेल. १९६४ ते ६६ च्या शिक्षण

आयोगाने सामान्य शालेय पद्धतीस गती देण्यासाठी ज्या सूचना केल्या होत्या त्या सूचना जरी, दूरगामी अशी ध्येये ठरलेली असली तरी, त्या कृति कार्यक्रमाच्या कार्यवाहीचे निकष मानण्यात आले आहेत.

८) प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रमाची सुरुवात–निधर्मी, वैज्ञानिक, व नैतिक मूल्यांवर भर; विविधतेतून एकसंघ असलेल्या आपल्या संस्कृतीविषयीची आणि पर्यावरणाच्या रक्षणाविषयीची जाणीव, छोट्या कुटुंबाचे महत्त्व; युवकांमध्ये श्रममूलक कार्य व समाजसेवा या विषयीची बांधिलकी; त्यातून राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय मूल्यांविषयीची निष्ठा व कळकळ; या गोष्टी दृष्टीसमोर ठेवून झाली पाहिजे, या विषयीची जाणीव पूर्वी कधीही झाली नव्हती एवढी आज झालेली नाही.

वर नमूद केलेल्या सर्व बाबींच्या कार्यवाहीसाठी, शिक्षणाचा आशय आणि शिक्षण प्रक्रिया या दोहोंच्या पुनर्रचनेविषयीच्या विचारास अग्रक्रमाने प्राधान्य द्यावे लागेल. याशिवाय शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण करणे, निरक्षरतेचे समूळ उच्चाटन करून १५ ते ३५ वयोगटातील प्रौढांमध्ये व्यावसायिक कौशल्ये निर्माण करणे, राष्ट्रीय विकासाच्या गरजेनुरुप मनुष्यबळ निर्मितीसाठी शिक्षणाचे व्यावसायीकरण करणे, शिक्षणाच्या स्तरांवरील गुणवत्ता विकास साधणे, भाषिक, वैज्ञानिक व तांत्रिक संशोधन सुरू करणे या बाबींना देखील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राधान्य दिलेले आहे. कृतिकार्यक्रम पुस्तिकेतील विविध प्रकरणांतून त्वरित प्राधान्य दिलेल्या बाबींचा विचार करून त्यांस अनुरूप कार्यवाहीची ढोबळ पद्धती सुचविलेली आहे.

९) शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या प्रयत्नामध्ये शिक्षण यंत्रणेतील सर्व घटकांनी आपली कार्यक्षमता पूर्णपणे उपयोगात आणावी असे अभिप्रेत आहे. हे साध्य होण्यासाठी सर्व संस्थांना विशिष्ट स्वरूपाचे दैनिक कार्यक्रम प्रत्यक्षात आणून दाखवावे लागतील. परीक्षा नियमितपणे व सुयोग्य पद्धतीने घ्याव्या लागतील. विद्यार्थी–वसतिगृहातील वातावरण सामुदायिक जीवनास व अध्ययनास पोषक असे राखावे लागेल. सर्व संस्थांच्या परिसराची योग्य ती निगा ठेवावी लागेल त्याचप्रमाणे सृजनशीलतेची जाणीव सर्व संस्थांच्या कार्यातून निर्माण होत

आहे असे दिसून आले पाहिजे. या सर्व बाबी आवश्यक असल्या तरी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील आव्हाने पुरी करण्यात त्या पुरेशा पडणार नाहीत. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने कठोर परिश्रम आणि शिस्त, प्रयोगशीलता व नवोपक्रमशीलतेस आवश्यक असलेली स्वायत्तता आवश्यक आहे. अशी व्यवस्था शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील उत्कृष्ठतेस वाव देणारे वातावरण आणि त्याहीपेक्षा राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, पालक, शिक्षक व विद्यार्थी या सर्वांचा, समर्पित वृत्तीने राष्ट्र उभारणीच्या महान कार्यातील सहभाग महत्त्वाचा आहे.

१०) आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या कार्यवाहीची ज्या ज्या ठिकाणी, ज्या ज्या पद्धतीने शक्य आहे तेथे सुरूवात करावी लागेल. ज्या योजना संख्यात्मक व गुणात्मक बाबतीत व्यापक स्वरूपाच्या असतात त्या तयार करण्यास वेळ लागतो. त्याहून जास्त वेळ त्या समजून घेण्यास व प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यास लागतो. अशा स्वरूपाच्या योजना तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून तिचा पाठपुरावा जरूर त्या निकडीने करण्यात येईल. दरम्यान प्रत्येक संस्था, प्रत्येक अनौपचारिक आणि प्रौढ शिक्षण केंद्र, प्रत्येक शिक्षक व विदयार्थी आणि समाजातील प्रत्येक नागरिक यांनी आपण काय करू शकू याबाबत चिंतन करणे आवश्यक आहे. काही सेवानिवृत्त शिक्षकांना, बदली शिक्षक म्हणून याकामी मदत करता येईल. काही गृहीणींना आपल्या निरक्षर भगिनींना साक्षर करता येईल. काही संस्थांना आपल्या शेजारच्या संस्थांना सुविधा पुरविता येतील. काही वृत्तपत्रांना आपल्या वाचकांसाठी 'दैनंदिन विज्ञान' या स्वरूपाचा आठवडयातून एकदा स्तंभालेख देता येतील. इ.

केंद्र व राज्य शासनाने जरी याबाबतीत पूर्ण जबाबदारी स्वीकारून त्याचा तपशील लोकसभा व राज्यसभा यांना, त्यांच्यामार्फत देण्यात येणार असला, तरी शैक्षणिक पुनर्रचनेमध्ये जनतेच्या सहभागातूनच खरा फरक दिसून येणार आहे. आता अशी वेळ आली आहे, की ह्यावेळी आपण योग्य ती कृती केली नाही तर पुन्हा एकदा आपण शैक्षणिक सुधारणा करण्याची संधी गमावून बसू ही संधी केवळ राष्ट्र विकासाच्या संदर्भातच महत्त्वाची नसून, या संधीवर आपले सर्वांचेच अस्तित्व अवलंबून राहणार आहे.

प्रकरण १ ले

# बालसंगोपन व शिक्षण

**सद्य:स्थिती**

कोणत्याही राष्ट्रातील जीवनाचा दर्जा ठरविणारे ज काही महत्त्वाचे निकष आहेत त्यांपैकी बालमृत्यूचे प्रमाण, कुपोषण, रोगराईची स्थिती व साक्षरता प्रमाण हे काही निकष आहेत. १९८४ च्या पाहणी-नुसार सध्याचे बालमृत्यूचे प्रमाण १०४ आहे. ग्रामीण भागातील बालमृत्यूचे प्रमाण ११३ व शहरी विभागातील हे प्रमाण ६६ आहे. ग्रामीण भागातील आणि शहरी विभागातील हा फरक विशेषत्वाने जाणण्या एवढा आहे. श्वासोच्छवासाचे रोग, जंतांचा त्रास, अशक्तपणा, कुपोषण हे मुलांच्या आजारपणात भर घालतात. ८३ टक्के मुलांचे वजन सामान्य प्रमाणाच्या खाली असते. त्यामध्ये ४२ टक्के सामान्य कुपोषित, ३५ टक्के मध्यम कुपोषित ६० टक्के अत्यंत कुपोषित यांचा समावेश होतो. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण अगदीच कमी म्हणजे २४.८८ असल्याने लहानपणी मुलांच्या बौद्धिक विकासाकडे फारच कमी लक्ष दिले जाते. बालकाच्या आरंभीच्या काळातील बौद्धिक विकासास त्याच्या पुढील आयुष्याच्या दृष्टीने फार महत्त्व असते. जरी एकात्म बालविकास प्रकल्पातीच्या क्षेत्रातील बहुतेक वंचित बालकांना सर्वसमावेशक अशा सहा सेवा संचांचा फायदा मिळालेला असला, तरी ढोबळ दृष्टीने पाहता देशातील ० ते ६ वयोगटातील बालकांच्या संख्येपैकी सुमारे १२ टक्के मुलांपर्यन्तच एकात्म बालविकासाच्या सहा सेवासंचांपैकी एक किंवा अधिक सेवा संच पोचले आहेत. इतर कार्यक्रम विचारात घेता बाल-संगोपन व शिक्षणाशी ० ते ६ हा वयोगट निगडित असला, तरी इतर कार्यक्रम विचारात घेऊन देखील एकूण कार्यक्रम ३ ते ६ वयोगटासाठी राबविला जातो असे आढळून येते म्हणजे ० ते ६ वयोगटातील बालक संख्येपैकी फक्त १० टक्के बालकांनाच गर्भावस्थेपासून ६ वर्षांपर्यंत आवश्यक ती सेवा उपलब्ध होते.

२) बालवयात मुलांचा शारीरिक व मानसिक विकास जलद गतीने होतो. हे सत्य ओळखून शासनाने 'बालसंगोपन व शिक्षण' याबाबतचे अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत. १९७४ साली जाहीर झालेल्या बालकांसाठीच्या राष्ट्रीय धोरणात बालकांच्या विकासाविषयीची जबाबदारी शासनाने स्वतःकडे घेतली आहे.

'बालसंगोपन व शिक्षण' या संबंधीच्या सध्याच्या कार्यक्रमात पुढील बाबींचा समावेश केला आहे.

१) एकात्म बालविकास सेवा

२) बालशिक्षण केंद्रे चालविणाऱ्या स्वयंसेवी संघटनांसाठी साहाय्यकारी योजना

३) बालवाडी व बालसंगोपन केंद्रे चालविणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना शासनाची मदत

४) राज्य शासन, महानगरपालिका व इतर संस्थांनी चालविलेली बालक मंदिरे

५) प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रे, उपकेंद्रे व इतर संस्थांमार्फत माता व बालके यांच्यासाठी आरोग्य सेवा

प्रचलित एकात्म बालविकास सेवा प्रकल्प हा बालविकासाचा फार मोठा कार्यक्रम आहे. बालकाच्या विकासासाठी केलेल्या साध्या गुंतवणुकीतून भविष्यातील मानवी साधन संपत्तीचा विकास साधला जातो, हे कित्येक वर्षे चालू असलेल्या कार्यक्रमाने दाखवून दिले आहे.

१९ नोव्हेंबर १९८५ पासून सुरू झालेल्या रोगप्रतिबंधक लस टोचण्याच्या जागतिक पातळीवरील कार्यक्रमाशी एकात्म बालविकास कार्यक्रमाची सांगड घालणे आता आवश्यक झाले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील विधानांचा मतितार्थ**

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये "बालसंगोपन व शिक्षण या विषयाला फार महत्त्व दिले आहे. मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या मार्गात यामुळे भर पडली आहे. प्राथमिक शिक्षणाचा आधारभूत कार्यक्रम व समाजातील आर्थिक दुःस्थितीत असलेल्या स्त्रियांना

अर्थार्जनासाठी मदत यादृष्टीने बालसंगोपन व शिक्षण, याकडे पाहिले जाते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये बालसंगोपन व शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्याप्रमाणे बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यक्रम आखण्याची गरज आहे, असा विचार केलेला असल्याचे दिसून येते. क्रीडा व कृती मार्गाचे महत्त्व ओळखून बालसंगोपन व शिक्षण, प्राथमिक शिक्षण बालकेंद्रित करण्याची गरज, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रतिपादिलेली आहे. त्याचप्रमाणे अध्यापनाच्या साचेबंद पद्धतीतील व लहान वयातच वाचन, लेखन, गणिताचा आरंभ करण्यातील धोकाही त्यात दाखविला आहे. बालसगोपन व शिक्षण आणि एकात्म बालविकास प्रकल्प यांचा समन्वय झाला पाहिजे, हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केले आहे. एकात्म बालविकासातून बालसंगोपन व शिक्षणाचा मूलभूत दर्जा वाढविण्यासाठी नमुनेदार विकास झाला पाहिजे अशी अपेक्षा येथे व्यक्त केली आहे. शिवाय बालसंगोपन केंद्रांचा विकास करण्यासंबंधी हमी देण्यात आली आहे. गरीब मुलांची योग्यप्रकारे काळजी वाहणे व त्यांच्या वाढीला प्रोत्साहन देणे यांवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विशेष भर दिला आहे.

**कार्यवाहीची पद्धती**

४) 'बालसंगोपन व शिक्षण' यांतून बालकाचा सर्वांगीण विकास, म्हणजेच शारीरिक, कारक, ज्ञानात्मक, भावनिक, सामाजिक आणि नैतिक विकास साधावयाचा आहे. बालसंगोपन व शिक्षणाची वयोमर्यादा गर्भावस्थेपासून ६ वर्षांपर्यन्त मानली आहे. या वयातील साध्या विकासाच्या प्रक्रियेत देखील गर्भारपणाच्या कालावधीत मातेची काळजी घेतली पाहिजे. प्रसूतीच्या वेळी आरोग्यदायक वातावरण व कौशल्यपूर्ण सेवा, प्रसूतीनंतर आरोग्याची व्यायामाची काळजी, आरोग्य तपासणी, सकस आहार, अशक्तपणावर नियंत्रण, धर्नुवात प्रतिबंधक लस टोचणे, अंगावर पिणाऱ्या मुलाच्या आईचा आहार, अचूक बालसंगोपन पद्धती, बालकाला रोगप्रतिबंधक लस टोचणे, बालकाची निगा, मातांना बालसंगोपन व बालारोग्य यांविषयी प्रशिक्षण, सकस आहार, या बाबींचा समावेश बालसगोपन व शिक्षणात केला जातो. यावरून बालसंगोपन व शिक्षणाचे कार्य किती विविधांगी व महत्त्वपूर्ण आहे, हे दिसून येते.

यासाठी बालसंगोपन व शिक्षणाचे प्रशिक्षण घेतलेले कार्यकर्ते व बालसंगोपन केंद्रांची आवश्यकता आहे. बालकाच्या निरनिराळ्या गरजा भागविण्यासाठी झटणाऱ्या शासकीय व अशासकीय संघटनांच्या संघटित प्रयत्नातून बालकाच्या वाढीसाठी व शिक्षणाच्या पूर्वतयारीसाठी योग्य प्रकारे सेवा पुरविली जाते हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

५) शिक्षण क्षेत्रात बालसंगोपन व शिक्षण यांचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या बालकांच्या संख्येच्या मानाने अपुरी असणे, ही फार मोठी त्रुटी जाणवते. त्यासाठी बालकांची नुसती काळजी वाहणारे कार्यक्रम अधिक सघन व विकासात्मक करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याकरता कार्यकर्त्यांची संख्या आवश्यकतेनुसार वाढवावी लागेल. बालसंगोपन व शिक्षण केंद्रांची व्याप्ती व त्यातील कार्यकर्त्यांची संख्या अशी राहील, की ज्यामुळे तेथील कार्यकर्ते, त्या भागातील लोकसंख्येनुसार बालसंगोपन व शिक्षणाच्या कार्यक्रमाखाली येणाऱ्या विविध घटकांची काळजी योग्य प्रकारे घेऊ शकतील.

६) तसेच कोणताही कार्यक्रम यशस्वीरीतीने अंमलात आणायचा असेल तर कार्यकर्त्यांना पुरेसे वेतन दिले पाहिजे. बालकेंद्रांवर पूर्ण वेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे वेतन कोणत्याही अकुशल कामगारांपेक्षा कमी असणार नाही याबाबतीत ताबडतोब प्रयत्न केले जातील. या केंद्रांवर पूर्ण वेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्राथमिक शिक्षकाच्या समकक्ष आणणे हे उद्दिष्ट राहील. अर्धवेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांच्या कामाच्या तासांच्या प्रमाणात वेतन दिले जाईल. कमी दिले जाणार नाही. परिणामकारक पर्यवेक्षणासाठी बालकेंद्रे व पर्यवेक्षक संख्या यांच्या प्रमाणात योग्य ती सुधारणा केली जाईल. बालकेंद्रातील माता व सुकुमार बालके यांचा संबंध असतो, म्हणून बालकेंद्रांतील कामाचे स्वरूप विचारात घेऊन बालसंगोपन शिक्षण कार्यकर्ते आणि पर्यवेक्षक सामान्यतः स्त्रियाच राहतील असे पाहिले जाईल.

७) मानवी साधन संपत्तीचा विकास व शिक्षणाच्या सार्वत्रीकरणात साह्य करणारे आधारभूत मदत केंद्र, या नात्याने 'बालसंगोपन व शिक्षण, यांचे महत्त्व असलेले येथे दृष्टीसमोर ठेवण्यात आले आहे. म्हणूनच शालेय शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर असणाऱ्यांसाठी व शिक्षण

संधीपासून वंचित असणाऱ्यांसाठीं प्राधान्याने बालसंगोपन व शिक्षण उपलब्ध करून दिले जाईल. ते खालील व्यक्तींसाठी असेल.

१) शहरी झोपडपट्टीतील अत्यंत गरीब मुले

२) प्रतिकूल परिस्थिती असलेल्या क्षेत्रातील ज्या मुलांना जळण गोळा करणे, चारा आणणे, पाणी आणणे व इतर घरची कामे करावी लागतात अशी मुले

३) ग्रामीण भागातील शेतमजूर व कारागीर

४) समाजाच्या असंघटित विभागातील कामकरी मुले

५) रस्त्याची कामे करणाऱ्या कामगारांप्रमाणे विशिष्ट हंगामात स्थलांतर करणारे कामगार

६) शहर व ग्रामीण भागातील बांधकामावरील कामगार

७) भूमिहीन शेतमजूर

८) भटका समाज व धनगर जमात

९) अतिदूर भागात राहणारे आदिवासी व जंगलनिवासी

१०) भरवस्तीपासून अलग असलेल्या वाड्यावस्त्यांवरील रहिवासी.

या सर्व विभागांतील, त्याचप्रमाणे अत्यंत लहान भागातील मुलींना बालसंगोपन विषयक साहचकारी सेवेची अधिक गरज आहे. तसेच वरील सर्व विभागात असलेल्या अनुसूचित जाती व जमातीतील मुलांकडे या-दृष्टीने विशेष लक्ष पुरविणे जरुरीचे आहे.

८) **लक्ष्य व टप्पे** – नैतिकदृष्टया असे म्हणावे लागेल की, प्रत्येक बालकाला त्याच्या सर्व प्राथमिक गरजा भागविण्याबाबतचे आश्वासन मिळाले पाहिजे. परंतु सर्व सोयी पोहोचविण्यातील अडचणी व त्यांची उपयुक्तता यांचा विचार करता ० ते ६ वयोगटातील ७० टक्के मुलांपर्यन्त इ. स. २००० पर्यन्त बालसंगोपन व शिक्षणविषयक सेवा पोहोचवावी असे सुचविण्यात आले आहे. तसेच आरोग्य व आहार विषयक सेवा सर्व गरजू मुलांपर्यंत शक्य तो लवकर पोचवणे आवश्यक आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस आदिवासी भाग, अनुसूचित जाती व

जमाती बहुसंख्येने असलेला विभाग आणि शहरातील झोपडपट्ट्यांपर्यंत बालसंगोपन व शिक्षण केंद्रांच्या सोयी पोचवणे; १९९० अखेर कमीत कमी दोन लाख पन्नास हजार केंद्रे सुरू करणे; बालक विषयीच्या निरनिराळ्या योजनांमध्ये सुधारणा घडवून त्यांचा विस्तार करणे; ही कामे एकात्म बालविकास प्रकल्पाचा विस्तार करूनच मुख्यत्वेकरून होणार आहे. त्यादृष्टीने १९९५ पर्यंत बालसंगोपन व शिक्षण केंद्रांची संख्या १० लाखांपर्यन्त वाढविण्यात येईल आणि २००० सालात ही संख्या २० लाखांपर्यन्त जाईल आणि एकात्म विकास प्रकल्पाखालील बहुतेक लक्ष्य पूर्ण केले जाईल. परंतु पूर्व प्राथमिक शिक्षणाची निरनिराळी केंद्रे व बालसंगोपन केंद्रे यांनाही मदत देऊन प्रोत्साहन दिले जाईल. तसेच ६ व्या परिच्छेदात नमूद केलेल्या सर्वांसाठीही मदत दिली जाईल.

९) थोडक्यात म्हणजे प्रचलित कार्यक्रम अधिक परिणामकारक व दर्जेदार करून तो विस्तारित करण्यावर भर दिला जाईल. आजपर्यंत ज्या विभागाला या कार्यक्रमाचा लाभ मिळाला नाही अशा विभागापर्यंत कार्यक्रम पसरविण्याचे प्रयत्न केले जातील.

यासंबंधींच्या कृतिकार्यक्रमात पुढील संचांचा पायरी पायरीने विकास केला जाईल.

### (अ) एकात्म बालविकास

एकात्म बालविकास प्रकल्पामधील शैक्षणिक घटक अधिक सघन बनविण्याची गरज आहे. त्यासाठी खालील प्रकारचे उपाय योजावे लागतील.

१) प्रत्येक अंगणवाडी–प्रशिक्षण केंद्रावर किमान २५ अंगणवाड्या चालविण्याची जबाबदारी सोपवणे, जेणेकरून अंगणवाडीचे प्रशिक्षण घेणाऱ्यांना अंगणवाडी क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव पुरेशा प्रमाणात घेता येईल.

२) अंगणवाडीतील प्रशिक्षणामध्ये प्रात्यक्षिकासाठी प्रशिक्षणार्थींना एक महिना अंगणवाडीवर काम करण्याची संधी देणे.

३) अंगणवाडीचे प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांच्याकरिता उपयुक्त अध्यापन साहित्य विकसित करणे.

४) सर्व अंगणवाडीतील मुलांसाठी चित्रयुक्त पुस्तके, चित्रे, भित्तीपत्रके व किमान क्रीडासाहित्य उपलब्ध करून देणं व अधून मधून पुरविणे.

५) एकात्म बालविकास सेवा प्रकल्पातील प्रशिक्षक, पर्यवेक्षक, बालविकास प्रकल्पाधिकारी व मुख्यसेविका यांच्याकरिता बालवाडीतील शैक्षणिक घटकासंबंधीचे प्रशिक्षण देण्यासाठी उजळणी वर्ग व प्रात्यक्षिकाचा अनुभव देण्याची व्यवस्था करणे. त्यामुळे सेवापूर्व व सेवान्तर्गत प्रशिक्षण दर्जेदार होईल.

६) बालविकास प्रकल्पाधिकारी यांचे कार्यालय सर्व अध्ययन अध्यापन साहित्यानी सुसज्ज करून ते मार्गदर्शन केंद्र बनवणे.

त्याचबरोबर एकात्म बालविकास सेवा प्रकल्पाखालील अंगणवाड्याचे समांतर बालसंगोपन केंद्रात करण्याची सुरुवात केली जाईल व प्राथमिक शाळा व अंगणवाडीच्या वेळांमध्ये समन्वय साधला जाईल.

**(ब) बालशिक्षण केंद्र (शिक्षण विभाग)**

सध्याच्या बालशिक्षण योजनेत आरोग्य व आहार हे घटक नाहीत. एवढेच नव्हे तर या संदर्भात शिक्षकाला प्रशिक्षणासाठी काही तरतूद नाही. यासाठी पुढील उपाययोजना त्वरित हाती घेण्यात येईल.

१) आरोग्य व आहार घटकांचा कार्यक्रमात समावेश करणे.

२) प्रशिक्षणासाठीची तरतूद करणे.

३) मुलांसाठी अध्ययन साहित्य पुरविणे.

४) वाचन, लेखन, गणिताच्या अध्यापनाऐवजी क्रीडा मार्गाचा अवलंब करणे.

५) अनुदान पद्धतीत बदल व पर्यवेक्षणाच्या पद्धतीत सुधारणा करून या दोहोंचा सांधा जोडणे.

**(क) स्वयंसेवी संघटनांनी चालविलेल्या बालवाड्या**

स्वयंसेवी संघटनेच्या वतीने विविध प्रकारच्या बालवाड्या चालविल्या जातात. प्रत्येकास स्वतःचा इतिहास व पार्श्वभूमी असते. स्वयंसेवी संघटनांमार्फत सुरू असलेल्या बालवाड्यांमधून बालविकासाचा कार्यक्रम कार्यवाहीत आणला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणात अध्ययन संच हवेत. त्यातील कार्यक्रमांची द्विरुक्ती टाळायला हवी. ज्या ठिकाणी हे शक्य होणार नाही तिथे सध्या चालू असलेला कार्यक्रम एकात्म आणि सर्वसमावेशक कार्यक्रमाशी जोडला गेला पाहिजे. स्वयंसेवी संघटनांमार्फत राबविल्या जाणाऱ्या बहुतेक कार्यक्रमात आरोग्य, आहार व शिक्षण हे घटक दिसून येत नाहीत. अशा केंद्राच्या कार्यक्रमाचे रूपांतर बालकाच्या सर्वांगीण विकास केंद्रात करण्याची गरज आहे.

**ड) शासन व नगरपालिकेच्या बालवाड्या**

या बालवाड्यांमध्ये केवळ शिक्षणविषयक घटकांवर भर दिला जातो म्हणून या बालवाड्यांच्या कार्यक्रमात खालील बाबींचा समावेश केला पाहिजे.

१) आरोग्य व आहार हे घटक समाविष्ट करणे.

२) वाचन, लेखन व गणिताच्या अध्यापनाचा प्रारंभ न करण्या-बाबत सूचना देणे.

३) क्रीडा पद्धतींचा वापर व उपयोग करणे.

४) घर व समाज यांमधील संपर्क वाढविणे.

**इ) बालसंगोपन केंद्रे**

एन. एस. डब्ल्यू. के. च्या साहाय्याने सुरू असलेल्या पाळणाघरांची व बालकेंद्रांची कार्यक्षमता लवकरात लवकर वाढविण्याची आता गरज आहे. त्याकरिता खालील बाबी विचारात घ्याव्या लागतील.

१) शाळेची वेळ व मातांच्या कामाच्या वेळा यांचा समन्वय

२) सुरक्षित, निरोगी आणि पुरेशी जागा

३) बालक संख्येच्या प्रमाणात कार्यकर्त्यांची नियुक्ती

४) पिण्याच्या पाण्याची सोय

५) पूरक आहाराची योजना.

६) वैद्यकीय साहाय्य व वैद्यकीय तपासणी यांची सुविधा

७) पाळणे व घरगुती वस्तूंचा पुरवठा

८) खेळणी व इतर साधने

९) कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व पर्यवेक्षण.

१०) सातव्या व आठव्या पंचवार्षिक योजनांमध्ये बालकेंद्रास उपयुक्त असे, कमी खर्चाचे व त्या संदर्भास उपयुक्त नमुने (केंद्रे) निर्माण करण्यावर भर देण्यात येईल. तसेच सध्या प्रयोगावस्थेत असलेल्या सध्याच्या केंद्रांच्या वाढीला आणि विकासाला व्यापक प्रमाणावरील प्रोत्साहन दिले जाईल. एखाद्या योग्य संस्थेमार्फत या नमुन्यांची पाहणी केली जाईल.

ज्या नमुन्याचे प्रयोगकार्य पूर्ण झाले आहे व जे विश्वसनीय मानले जातात असे काही नमुने पुढे दिले आहेत.

**अ) गृहशिक्षण केंद्र (गर्भावस्थेपासून ६ वर्षापर्यंत)**

बालकाच्या विकासासाठी पालक अगर घरातील इतर व्यक्ती यांनी बालकांना कसे शिकवावे व प्रोत्साहन द्यावे यांसंबंधीचे तंत्र शिकविले पाहिजे. गृहभेटी घेऊन मुलांच्या विकास कार्यक्रमाबाबत पालकांना उत्तेजन देणाऱ्या व स्थानिक पातळीवर नेतृत्व करणाऱ्या स्त्रियांना प्रशिक्षण दिले पाहिजे.

२) कुटुंबातील लोकांना वापरता येतील अशी कमी खर्चाची साधने विकसित केली पाहिजेत.

३) दृक्श्राव्य साधनांची निर्मिती करून समाजामध्ये मोठ्या प्रमाणात त्याची कार्यवाही करण्यास मदत केली पाहिजे.

४) बालकेंद्रावरील पर्यवेक्षणासाठी फिरते पथक नेमले पाहिजे.

**(ब) बालसंगोपन केंद्र (जन्मापासून ६ वर्षापर्यन्त)**

काम करणाऱ्या स्त्रिया व लहान मुलांना सांभाळणारी मोठी मुले यांना मोकळीक मिळावी यासाठी अशी केंद्रे असतात. अशा प्रकारची केंद्रे काही स्वयंसेवी संघटना यशस्वी रीतीने चालवितात. जेथे

बांधकाम चालू आहे व कामगार वर्गामध्ये स्त्रियांची संख्या अधिक आहे तेथे अशी केंद्रे स्थापन झाली पाहिजेत. स्वयंसेवी संघटनांनी अशा स्त्रियांची संघटना केली पाहिजे तसेच बांधकामाचे ठिकाणी कामगाराच्या मुलांच्या शिक्षणासाठी होणाऱ्या खर्चाची जबाबदारी मालकावर सोपवली पाहिजे.

### (क) कौटुंबिक बालसंगोपन केंद्रे

ज्या ठिकाणी बालकांची संख्या अत्यंत कमी असून बालसंगोपन केंद्राची सोय उपलब्ध नाही तेथे अशाप्रकारचे केंद्र सुरू ठेवणे योग्य ठरेल. या प्रकारात त्याच समुदायातील एखाद्या स्त्रीला कार्यकर्ती म्हणून संबोधण्यात येईल. तसेच तिला सर्व साधने, प्रशिक्षण, आहाराविषयीचे साहय व इतर मदत देण्यात येईल आणि तिच्या स्वतःच्या घरीच ५ ते ६ बालकांचे संगोपन कार्य करता येईल. अशा १० कौटुंबिक बालसंगोपन केंद्रांवर एक पर्यवेक्षक नेमला पाहिजे. हे पर्यवेक्षक योग्य मार्गदर्शन करून केंद्रांना मदत करण्यास समर्थ असले पाहिजेत.

### ११) प्रशिक्षण

वरील सर्व प्रकारच्या बालसंगोपन व शिक्षणाच्या कार्यक्रमात प्रशिक्षणाचा घटक बळकट करण्यात येईल. प्रशिक्षणात प्रामुख्याने केंद्रावरील प्रत्यक्ष अनुभवाचा समावेश केला पाहिजे. बालसंगोपन व शिक्षणाच्या कार्यक्रमात पुढील २० वर्षांत मोठ्या प्रमाणात प्रसार होणार असल्याने सर्वस्तरावर प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातील. बालसंगोपन व शिक्षण विषयक प्रशिक्षणाची गरज भागविण्याच्या दृष्टीने पुढील महत्वाच्या निकषांचा विचार केला जाईल.

१) बालसंगोपन प्रशिक्षणातील २ वर्षांचा व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग वरच्या पातळीवर सुरू करणे.

पुढील प्रशिक्षणात विशिष्ट परिस्थितीत उपयुक्त होतील अशी प्राथमिक कौशल्ये निर्माण करणे हा या वर्गांचा उद्देश राहील.

२) योग्य प्रशिक्षण, साधने व मार्गदर्शनातून एकात्म बालविकास सेवा-प्रकल्पातील शैक्षणिक घटक मजबूत करणे व शक्य तितक्या बाल केंद्रांपर्यन्त त्यांचा विस्तार करणे.

३) एकात्म बालविकास सेवा प्रकल्पातील वरिष्ठ प्रशिक्षक, पर्यवेक्षक व कार्यकर्त्यासाठी बालसंगोपन व शिक्षणाच्या वरच्या दर्जाचा प्रशिक्षण वर्ग तयार तयार करण्यासाठी योजना तयार करणे.

४) बालसंगोपन व शिक्षणाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना अधिकृत मान्यता देण्याची पद्धती ठरविणे व सध्या चालू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाची छाननी करणे.

५) ग्रामीण भागासाठी लवचिक व विशिष्ट कार्यावर भर देणारी अशी बालसंगोपन केंद्रे निर्माण करणे.

१२) बालसंगोपन व शिक्षणाचा कार्यक्रम पालक व समाजापर्यंत पोहोचविण्याचे दृष्टीने परिणामकारक माध्यम आवश्यक आहे. बाल-संगोपन व शिक्षणाचे कार्य करणाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. प्रौढांसाठी अर्थपूर्ण कार्यक्रम विकसित करीत असतानाच बालक विषयक कार्यक्रमाच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. आकाशवाणी, दूरदर्शन राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व इतर संस्थांमार्फत याकरिता संघटित प्रयत्न केले पाहिजेत.

**देखरेख व मूल्यमापन**

केंद्रावरील देखरेख व मूल्यमापनास पुढीलप्रमाणे बळकटी आणता येईल.

१) बालसंगोपन व शिक्षण विषयक कार्यक्रमावरील देखरेखीसाठी व्यवस्थापनाची माहिती मिळविण्यासाठी विशिष्ट पद्धती शोधली जाईल. स्थानिक व गटपातळीवर ही माहिती जमा करून एकत्रित केली जाईल व तिचे पृथःकरण करून कार्यान्वित करावी लागेल. केंद्र, राज्य, जिल्हा पातळीवरील विविध स्तरांवरील माहितीचा ओघ अशा पद्धतीने नियंत्रित केला जाईल की जेणेकरून सर्व स्तरांवरील कार्यावर परिणामकारक व विनाविलंब नियंत्रण करता येईल.

२) व्यावसायिक संस्था व तज्ज्ञांचे सहकार्य घेऊन बालकाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या विविध प्रकारच्या केंद्रांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले जाईल व त्यातून आढळणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना केली जाईल. सर्व प्रकारच्या कार्यक्रमाचे एखाद्या स्वतंत्र

संस्थेमार्फत पाच वर्षातून एकदा मूल्यमापन करून कार्यक्रमाचा दर्जा सुधारण्यासाठी मूल्यमापन अहवाल तयार करावा लागेल व अनुधावनासाठी अहवालानुसार बालसंगोपन शिक्षण केंद्राच्या कार्यात सुधारणा घडवून आणली जाईल.

बालसंगोपन व शिक्षणामार्फत झालेल्या कार्याची अधून मधून छाननी करण्यासाठी मानवी विकासाचा निर्देशक निश्चित करावा लागेल. या निर्देशकात खालील बाबी असतील.

अ) बालमृत्यूचे प्रमाण.

ब) बालकाच्या दुसऱ्या वर्षात कुपोषणामुळे झालेला रोगांचा विस्तार.

क) बालविकासाबावत उत्तेजन आणि शिक्षण यांसंबंधीच्या सोयी

ड) स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण.

□ □

प्रकरण २ रे

# प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व खडू फळा मोहीम

## १. सद्य:स्थिती

चौदा वर्षांपावेतो सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण हे भारतीय राज्य घटनेमधील मार्गदर्शक तत्त्व आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे ईप्सित साध्य करण्यासाठी निश्चित प्रयत्न केले गेलेले आहेत. १९५०–५१ ते १९८४–८५ या कालावधीत प्राथमिक शाळांची संख्या अंदाजे २,१०,००० वरून अंदाजे ५,२०,००० पर्यन्त वाढली आणि उच्च प्राथमिक शाळांची संख्या अंदाजे ३०,६०० वरून अंदाजे १,३०,००० पर्यंत वाढली आहे. असे असले तरी अनेक वस्त्यांवर अद्याप शाळा नाहीत आणि जवळ जवळ १/३ ग्रामीण शाळांतून फक्त एकच शिक्षक अध्यापन करतो. आजतागायत बालकांची शाळेमधील नोंद महत्त्वाची मानली गेली. अशा तऱ्हेने अंदाजे ६ ते ११ वयोगटातील ९५ टक्के व ११ ते १४ गटातील ५० टक्के बालकांनी शाळेत प्रवेश घेतल्याची नोंद आढळते. मुलींची शाळांतील प्रवेश नोंदसंख्या अनुक्रमे ७० टक्के व ३६ टक्के आढळते. परंतु यापैकी जवळ जवळ ६० टक्के बालके इयत्ता १ ते ५ व ७५ टक्के बालके इयत्ता १ ते ८ दरम्यान शाळा सोडतात. शहरी भागात शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी झालेली आहे. पण शाळांना इमारत, फर्निचर व इतर साहित्याची उणीव देशातील बहुधा सर्व ठिकाणी आढळते. पुरेशा आर्थिक गुंतवणुकीअभावी आणि वेगाने झालेल्या वाढीमुळे शालेय वर्गाचा दर्जा खालावलेला आढळतो. अनौपचारिक शिक्षणाच्या कार्यक्रमाचा प्रारंभ झालेला आहे, परंतु त्याचा प्रसार व दर्जा काहीसा असमाधानकारक आहे.

## २. धोरण आणि लक्ष्ये

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाला अग्रक्रम देण्यात आलेला आहे प्राथमिक शिक्षणाच्या संकल्पनेमध्ये खालील गोष्टींवर भर देण्यात आलेला आहे. (i) बालकांची सार्वत्रिक नोंद करणे व १४ वर्षांपावेतो त्यांना टिकविणे आणि (ii) शैक्षणिक दर्जा मोठ्या प्रमाणात सुधारणे.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय शिक्षण व उपक्रम बालकाभोवती केंद्रित करण्याचा प्रयत्न करायचा आहे. या धोरणामध्ये अनाकर्षक शालेय परिसर, इमारतींची असमाधानकारक स्थिती आणि शैक्षणिक साहित्याची अपूर्तता ह्या बालक व पालक यांना नाउमेद करणाऱ्या बाबी आहेत, ही जाणीव व्यक्त केली आहे हे राष्ट्रीय धोरण अशा तऱ्हेच्या प्राथमिक शाळांतून आमूलाग्र सुधारणा व्हाव्यात, तसेच या शाळांना साहचभूत आधारसेवा असाव्यात असे सुचविते. अनुसूचित जाती जमाती, शैक्षणिकदृष्टचा मागासलेले विभाग आणि अल्पसंख्यांक यांच्या तसेच मुलींच्या सहभागासाठी निरनिराळ्या उपाययोजना नव्या धोरणात करण्यात आल्या आहेत.

४. काम करणाऱ्या मुलांचा निश्चित आकडा उपलब्ध नाही. परंतु असे गृहीत धरण्यात येते की, शाळेबाहेर असणाऱ्या बऱ्याच मुलांना त्यांच्या कुटुंबाकरिता किंवा कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्याकरिता काम करावे लागत असल्याने ती शालेय शिक्षणापासून वंचित राहिली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अशा मुलांसाठी आणि ज्या वस्त्यांवर शाळा नाहीत अशा मुलांसाठी पद्धतशीर अनौपचारिक शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय धोरण अशा विद्यार्थ्यांसाठी लवचिक व दर्जेदार शैक्षणिक कार्यक्रमाचे नियोजन करू इच्छिते. या शिक्षणाचा दर्जा औपचारिक शिक्षणातील त्या त्या स्तरांशी सुसंगत राहील.

५. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी खालील उपाय सुचविलेले आहेत. विषयज्ञान व शैक्षणिक प्रक्रिया सुधारणे, शालेय इमारत व इतर सुविधा सुधारणे, अधिक शिक्षक पुरविणे व त्यांचे

सर्वंकष प्रशिक्षण घेणे. तसेच प्रत्येक पायरीमध्ये छात्रयाचे ज्ञान प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरासाठी निश्चित करणे.

६) शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शालेय शिक्षणाचा साधारण आराखडा प्रस्तावित करते १०+२+३ आकृतिबंध देशातील सर्व विभागामध्ये कार्यान्वित झालेला असल्याने असे सुचविण्यात आलेले आहे की, प्राथमिक शिक्षण ५ वर्षांचे व उच्च प्राथमिक शिक्षण ३ वर्षांचे असावे.

७) यापूर्वी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची साध्ये व त्यासाठी आर्थिक तरतूद यात तफावत होती किंवा त्यामुळे कार्यक्रमाला गती मिळत नव्हती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याबाबतीत अधिक व्यवहार्य धोरण स्वीकारते. सर्व मुले ११ वर्षांपर्यन्त ५ वर्षांचे प्राथमिक शिक्षण किंवा अनौपचारिक शिक्षण घेतील आणि सर्व विद्यार्थ्यांना १४ वर्षांपर्यन्त मोफत व सक्तीचे शिक्षण १९९५ पर्यंत दिले जाईल.

## ८. कार्यवाहीबाबत धोरणे

कार्यवाहीच्या नियोजनातील मध्यवर्ती कल्पना म्हणजे हे नियोजन परिसर केंद्रित व लोकसंख्या केंद्रित असेल. पुढील राज्यांत असे दिसून आले आहे, की जवळजवळ ९५% मुले शाळेबाहेर आहेत. आंध्र, आसाम, बिहार, जम्मू व काश्मीर, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल हीं ती राज्ये आहेत. ह्या शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या राज्यांकडे ज्याप्रमाणे दुर्लक्ष झाले त्याप्रमाणे शैक्षणिकदृष्टया इतर राज्यांतील मागासलेल्या मुलांकडेपण दुर्लक्ष झालेले आहे. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या राज्यांतून पण खूप विषमता असल्याने त्याकडे विशेष लक्ष पुरवावयास हवे. मागास राज्यांतील शैक्षणिक पद्धतीची पुनर्रचना करून त्यात चैतन्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच सर्व मागास विभाग आणि लोक इतर राज्यांबरोबर प्रगती करतात की नाही याकडे लक्ष पुरविले पाहिजे. या उपाययोजनेतील इतर बाबी खालीलप्रमाणे रहातील.

अ) देशातील सर्व कुटुंबियांच्या मुलास चांगल्या दर्जाचे प्राथमिक शिक्षण दिले जाईल.

ब) विषमता दूर करण्यामध्ये शिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेता बालकांची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमि कोणतीही असली तरी अशा बालकांना समाजातील तुलनात्मकदृष्टचा उच्चस्तरीय बालकांच्या बरोबरीचे यश संपादन करण्याची संधी मिळेल याबाबत विशेष प्रयत्न केले जातील आणि १९६८ च्या धोरणामध्ये विशद केल्याप्रमाणे देशात सर्व बालकांना एकसारखी शाळापद्धती निर्माण करण्याच्यादृष्टीने प्रगती साधली जाईल.

क) विविध स्तरांवर नियोजित असा शाळा सुधारणेचा देशव्यापी कार्यक्रम हाती घेण्यात येऊन सध्याच्या शिक्षण संस्थातील मरगळ आणि सामाजिक उपेक्षा नाहीशी करण्याचा प्रयत्न होईल. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या आवश्यकतेचा अन्य ठिकाणी उल्लेख केलेला आहेच.

ड) प्राथमिक शिक्षणामध्ये राष्ट्रीय उद्दिष्टे आणि भावी पिढ्यांना आदर्श यांना बालकेंद्री धोरणातूनच गती दिली जाईल.

इ) बालकांचा सुयोग्य विकास घडावा व त्यांना स्वातंत्र्य व प्रतिष्ठा उपभोगता यावी म्हणून चागल्या दर्जाच्या पूर्ण वेळ शाळा उपलब्ध करून देण्याचा शिक्षण पद्धतीचा प्रयत्न राहील आणि हे जोपर्यंत शक्य नाही तोपर्यंत बालकांना अंशकालीन अनौपचारिक शिक्षणाची संधी देण्यात येईल.

फ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे विशिष्ट शैक्षणिक अवस्था पूर्ण करणारी बालके विशिष्ट कौशल्ये व क्षमता आत्मसात करतील असे अभिप्रेत असल्याने पूर्वीप्रमाणे केवळ बालकांच्या प्रवेश नोंदीला महत्त्व न राहाता बालकांना शाळेत टिकविण्याला व शैक्षणिक दर्जाला महत्त्व राहील.

ग) प्राथमिक शिक्षणाचे स्वरूप देशामध्ये ठिकठिकाणी—एवढेच काय पण एका जिल्ह्यात एका गटात देखील निरनिराळं असल्याने नियोजनाची प्रक्रिया विकेंद्रित करावी लागेल व शिक्षकांप्रमाणेच स्थानिक समाजाला देखील विचारात घ्यावे लागेल.

**प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण –गतीमानतेतील आवश्यक बाबी– दृढीकरण यशाचे एक कारण –**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची फलिते व अपयश यांची मीमांसा केली असता असे आढळते की, आपण मोठ्या प्रमाणावर शालेय व्यवस्था, शिक्षकांच्या नेमणुका आणि बालकांच्या प्रवेशनोंदी यावरच जास्त भर दिलेला आहे. वर उल्लेखिलेल्या उपाययोजनांचा अवलंब केल्यास प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमात काही वर्षांत दर्जात्मक बदल घडून येईल. जर शिक्षक व समाज यांच्या पुरेशा सहभागावर आधारित दृढीकरण केले असेल तरच ही उपाययोजना यशस्वी होईल. थोडक्यात, प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

i ) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण संबंधित सर्व लोकांच्या सहभागावर अवलंबून आहे. राजकीय पक्ष विशेषत: त्यांच्या स्थानिक पातळीवरील विधायक कार्यकर्त्यांनी या बाबतीत महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे.

ii ) नियोजनातील सर्व थरांवर नवीन उपाययोजनेच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांचे सहकार्य निश्चितपणे घेतले जाईल. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या लहानसहान स्तरावरील नियोजनासाठी त्यांच्या संघटना आणि संस्था यांच्या बरोबर विचारविनिमय करणे असे त्याचे स्वरूप असेल

iii) शिक्षणाचे व्यवस्थापन या विभागात स्पष्ट केल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील सर्व स्तरांवर स्थानिक समाजाचा सहभाग राहील. सर्व आवश्यक बाबींमध्ये प्राथमिक शाळा व अनौपचारिक शैक्षणिक केंद्रे यांचा उपयोग केला जाईल. स्त्रिया, युवक आणि शैक्षणिकदृष्ट्या उपेक्षित समाज यांना त्यात महत्त्वाचे स्थान राहील.

iv) ज्यांनी समाजाचा विश्वास संपादन केलेला आहे अशा सर्व संस्थांना, व्यक्तींना तसेच जे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास भरीव मदत करू शकतील अशा सर्वांना यात महत्त्वाचे स्थान राहील. यांमध्ये युवक मंडळे, महिला मंडळे, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था

स्थानिक विकास कार्यकर्ते, निवृत्त शिक्षक, निवृत्त लष्करी सेवक इत्यादींचा समावेश असेल.

v) संकलिपत यंत्रणा कार्यान्वित करणे हे खरे महत्त्वाचे काम आहे. शाळा आणि अनौपचारिक शिक्षण केंद्रे यांचे कार्य सुरळीतपणे चालल्याविना, शिक्षकांनी योग्यप्रकारे अध्यापन केल्याविना, आणि अन्य शैक्षणिक प्रक्रिया पूर्ण झाल्याविना कोणताही बदल होऊ शकणार नाही.

## १०) सुविधांची सार्वत्रिक उपलब्धता

चौथ्या राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षणाप्रमाणे (१९७८–७९) अद्याप १,९०,००० वस्त्यांवर शाळेची सुविधा उपलब्ध नाही. तेव्हापासून अनेक नवीन शाळा उघडण्यात आलेल्या आहेत. परंतु त्याचबरोबर नवीन वस्त्यापण वाढलेल्या आहेत. परिस्थितीचा सर्वंकष विचार करता शाळा नसणाऱ्या वस्त्यांची संख्या भरपूर असून त्यांपैकी अनेक वस्त्या तुलनात्मक दृष्टया मोठया वस्त्या आहेत. सर्व राज्यशासने ७ व्या योजनेमध्ये, ३०० लोकसंख्या असणाऱ्या गावी (आदिवासी, डोंगराळ व तुरळक वस्ती विभागासाठी २००) प्राथमिक शाळा असेल याकडे लक्ष देतील. बांधकामावरील कामगारांच्या वा अन्य तात्पुरत्या निवासी कामगारांच्या मुलांसाठी विशिष्ठ कालावधीकरिता फिरत्या शाळेसारखी तात्पुरती सोय करण्याचा प्रयत्न केला जाईल.

११. यापुढे १९८७-८८ पूर्वी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध असणाऱ्या ठिकाणांची माहिती देणारे नकाशे तयार करण्यात येऊन त्यावरून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबाबत एक मास्टर प्लॅन तयार करण्यात येईल. 'नीपा' या संस्थेने याबाबत यापूर्वीच कार्यवाही सुरू केलेली आहे. या नियोजन आराखडयाप्रमाणे ५० विद्यार्थी असणाऱ्या प्रत्येक प्राथमिक शाळेला एक उच्च प्राथमिक शाळा दिली जाईल. अनुसूचित जाती व जमाती आणि शिक्षणापासून वंचित बालकांसाठी मोठया प्रमाणात वसतीगृहात्मक शाळा व वसतीगृहे उघडली जातील. आश्रमशाळांचा कार्यक्रम पण सुधारला व वाढवला जाईल. शाळेच्या इमारतीचा उपयोग करून आणि स्वयंपाकासाठी एक खोली उपलब्ध केली जाऊन तेथे स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने स्वयंपाक करणे व देखरेख ठेवणे

ही कामे केली जातील. अशी कमी खर्चाची वसतीगृहे यापुढे निर्माण केली जातील. वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी, देशातील धान्यकोठांरातून विना मोबदला धान्य देण्याच्या शक्यतेचा विचार करण्यात येईल.

## १२. प्रवेश नोंदी व शाळेत बालक टिकविणे

प्लॅनिंग कमिशनने नेमलेल्या लोकसंख्याविषयक तज्ज्ञांच्या समितीच्या अहवालाप्रमाणे १९८९-९० मध्ये ६-११ वयोगटातील संभाव्य बालकसंख्या सुमारे ९.६१ कोटी असेल. १९८४-८५ मध्ये ही संख्या ८.५४ कोटी आहे. प्रवेशनोंदीचे मुलामुलींचे प्रमाण ११० व ७४ टक्के आहे. तथापि प्रवेश नोंदीपैकी २२ टक्के बालके ६-११ या वयोगटा-बाहेरची आहेत. सार्वत्रिकीकरणाच्या नवीन कार्यक्रमानुसार पहिली काही वर्षे मुलांनी, ५ वर्षे कालावधीपर्यन्तचे औपचारिक शिक्षण किंवा त्या दर्जाचे शिक्षण १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत, अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून घेण्यास आक्षेप नसावा.

१३. बालकाने शाळा १ वर्षानंतर सोडली तर त्या प्रवेश नोंदीला काही अर्थ नाही, त्यांपैकी कित्येकांनी तर शाळेचे तोंड देखील काही दिवस पाहिलेले नसते. तेव्हा आता प्रवेशनोंदीपेक्षा बालकांना शाळेत टिकवणे आणि त्यांचे ५ वर्षाचे शिक्षण पूर्ण करून घेणे -याला अधिक महत्त्व राहील. प्रवेशनोंदमोहिमेच्या जागी आता गावकऱ्यांच्या सहकार्याने शिक्षकांनी गावातील घरोघरी जाऊन शाळेत जाण्याचे महत्त्व व नियमित उपस्थिती याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. ज्या बालकांना पूर्ण वेळ शाळेत उपस्थित राहणे शक्य नसेल अशा बालकांसाठी अनौपचारिक शिक्षणाच्या केंद्रामध्ये प्रवेश दिला जाईल. परंतु प्रत्येक कुटुंबातले प्रत्येक बालक शिक्षण घेत आहे हे पाहिले जाईल. तसेच सर्व बालके नियमित-पणे शाळा किंवा अनौपचारिक शिक्षण केंद्रामध्ये जातात हे महत्त्वाचे आहे. जर एखादे बालक २/३ दिवस अनुपस्थित असेल तर शिक्षकाने किंवा ग्रामशिक्षण समिती सदस्याने त्याचे घरी जाऊन त्याचे कुटुंबियाचे मन वळवून पुनः त्या बालकाला शाळेत आणले पाहिजे. बालकाने शाळेत वा अनौपचारिक केंद्रात येण्यासाठी कुटुंबाशी व बालकांशी ठेवल्या जाणाऱ्या संपर्कामुळे बालक शाळेला वा अनौपचारिक केंद्राला जाणे चालू

ठेवतील व ५ वर्षाचे शिक्षण त्यांच्या गतीने पूर्ण करतील अशी अपेक्षा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये परिच्छेद ५.१२ मध्ये व्यक्त केली आहे.

१४. प्राथमिक शिक्षण बालकेंद्री करून आपण शिक्षण पद्धतीमध्ये बराच काळ न झालेला एक बदल घडवून आणीत आहोत. या सुधारणे-मधील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रुक्ष, निरुत्साही आणि लादलेल्या शिक्षण पद्धतीपेक्षा शिक्षण आनंददायी, प्रयोगशील व अध्ययनप्रक्रियेला चालना देणारे असेल. अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांच्या सुधारणेवर ज्याचा उल्लेख दुसऱ्या विभागात आलेला आहे. त्यावर बरेचसे यश अवलंबून राहील. हे स्पष्ट केले पाहिजे की, ग्रामीण प्राथमिक शाळेतील बालकांना शारीरिक श्रम करावे लागतात. त्या श्रम कार्याचे शैक्षणिक प्रक्रियेत रूपांतर करून घ्यावे लागेल. प्रत्यक्षात बहुतेक सर्व राज्यांनी शारीरिक, शिक्षा देण्यास बंदी घातलेली आहे. परंतु अद्याप बऱ्याच मोठ्या प्रमाणात ती अस्तित्वात आहे. शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमामधून याबाबत जरूर त्या सूचना मिळल्यास आणि या प्रकारावर कडक नियंत्रण ठेवल्यास त्याला परिणामकारकरित्या आळा घालता येईल. प्रत्येक जिल्हा शिक्षण समितीला सुट्ट्या ठरवण्याचा अधिकार राहील. सुट्ट्या शेतीचा हंगाम पाहून ठरवाव्या आणि त्याचबरोबर एकूण कामाचे दिवस २२० पेक्षा कमी असू नयेत, असे समितीला सुचविण्यात येईल. विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करण्याचे धोरण तत्त्व म्हणून काही काळ मान्य करण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात मात्र बऱ्याच विद्यार्थ्यांना त्याच वर्गात या ना त्या कारणासाठी ठेवले जाते. अनुत्तीर्ण न करण्याचे धोरण इयत्ता ८ वी पर्यंत चांगल्या प्रकारे राबविता येईल मात्र विद्यार्थ्यांनी किमान अध्ययनक्षमता गाठलेली असायला हवी. यासाठी परीक्षा सुधारणा विभागात सुचविलेले निरनिराळे उपाय उपयोगात आणावे लागतील.

१५. समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलामुलींसाठी व्यापक प्रमाणावर मदत केंद्रे निर्माण करण्यात येतील व पारितोषिके ठेवली जातील. याचा उल्लेख अनुसूचित जाती जमाती, अल्पसंख्यांक, स्त्री समतेसाठी शिक्षण इत्यादी विभागात आलेला आहे. नवीन बालकांना शाळेत टिकवण्याशी खालील मुद्यांचा विशेष संबंध आहे.

अ) एकात्म बालविकास योजनेला पुष्टी म्हणून शाळापूर्वकाळातील बालकांसाठी देखभाल केंद्रे स्थापन करणे. अशा तऱ्हेच्या चालू कार्यक्रमांना पुरेसा पाठिंबा देणे, आणि नवीन केंद्राचे जाळे निर्माण करणे.

ब) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या मुलींना युनिफॉर्मचे दोन संच, क्रमिक पुस्तके, स्टेशनरी व उपस्थितीसाठी बक्षिसे यांची तरतूद करणे.

क) प्राथमिक शाळेत जाणाऱ्या बालकांना राज्य परिवहन गाड्यातून मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करून देणे.

१६. ज्या व्यक्ती व संस्था बालकांना शाळेत किंवा औपचारिक केंद्रात टिकविण्यासाठी चांगल्या प्रकारे कार्य करतात अशांसाठी बक्षिसे आणि मान्यता देण्याची व्यापक योजना तयार केली जाईल. ही बक्षिसे खेडी, शाळा, अनौपचारिक केंद्रे तसेच शिक्षक यांना दिली जावीत. सदरहू बक्षिसांची रक्कम कार्याला चालना देण्यास पुरेशी असावी. असे या योजनेबावत अपेक्षित आहे.

**१७) ११ ते १४ वयोगटातील प्रवेश नोंद**

उच्च प्राथमिक मधून प्राथमिकमध्ये होणाऱ्या मोठ्या प्रमाणातल्या स्थित्यंतराचा विचार करता ११–१४ वयोगटातील प्रवेश नोंद प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणानंतर आपोआपच वाढेल. तसेच उच्च प्राथमिक शाळांच्या ८ व्या योजनेतील तरतुदीमुळे व अनौपचारिक शिक्षणातील बालकांच्या चाचणी यंत्रणेमुळे त्यांच्या औपचारिक पद्धती मध्ये होणारा प्रवेश गृहीत धरल्यामुळे प्रवेश नोंद आणखी वाढेल. हे उपाय सक्तीच्या शिक्षण योजनेसबंधी कायद्याने आणखी परिणामकारक होतील. ज्या राज्यांनी असे कायदे केलेले नाहीत त्यांना ते करण्याबद्दल सुचविले जाईल आणि प्रचलित कायदे खालील प्रकारे सुधारले जातील.

अ) कामकरी मुलांच्या मालकांनी मुलांना विश्रांती, पोषक आहार आणि चांगल्या दर्जाचे अंशकालीन शिक्षण यांची तरतूद करावी. याची अंमलबजावणी न केल्यास मालकांवर कारवाई करण्यात येईल.

ब) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करताना आणि शैक्षणिक सवलती देताना स्थानिक समाजाच्या व पालकांच्या सहभागाला व त्यांच्या मान्यतेला महत्त्व राहील.

क) शाळा व अनौपचारिक शिक्षण केंद्रे चांगल्या दर्जाची व सर्व बालकांना सहज जाता येतील अशा ठिकाणी असतील.

ड) कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षात्मक कार्यवाही ऐवजी सोयींचा विचार करून यंत्रणा निर्माण केली जाईल.

## १८. समान आराखडा

मध्यवर्ती शिक्षण सल्लागार समिती आणि राष्ट्रीय विकास समितीच्या मे १९८६ मध्ये झालेल्या बैठकीत शाळेतील पहिल्या १० वर्षातील कार्यपद्धतीच्या समान आराखड्याबाबत एकवाक्यता झालेली आहे.

१९. ज्या राज्यांमधून पहिल्या १० वर्षाची विभागणी प्राथमिक ४, उच्च प्राथमिक ३ व माध्यमिकसाठी ३ याप्रमाणे आहे त्यांना १९९५ पर्यंत ५ + ३ + २ या आकृतिबंधाचा स्वीकार करावा लागेल. या राज्यांना जादा प्राथमिक वर्ग खोल्या बांधाव्या लागतील व जादा शिक्षक नेमावे लागतील. अर्थात हे सर्व अंशतः माध्यमिक शाळांमधील जागा व शिक्षकांच्या होणाऱ्या बचतीतून भागवता येईल. या राज्यांनी/केंद्रशासित प्रदेशांनी याबाबत सविस्तर अभ्यास करून वर्ग खोल्या, शिक्षक व आर्थिक गरज याचे परीक्षण केले पाहिजे. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम, शैक्षणिक साहित्य आणि शालेय सुविधा यांची पुनः जुळवाजुळव केली पाहिजे आणि परीक्षापद्धतीचे पण पुर्ननियोजन केले पाहिजे.

## २०. खडू फळा मोहीम

खडू फळा मोहिमेचा उद्देश प्राथमिक शाळेला किमान आवश्यक सुविधा, शैक्षणिक साहित्य त्याचप्रमाणे अध्ययन साहित्य-उपलब्ध करून देणे हा आहे. ' मोहीम ' या शब्दाचा उपयोग या कार्यक्रमातील वेळेची निकड दर्शवितो, यातील साध्ये निश्चित व स्पष्ट आहेत. शासन व जनता यांनी ह्या गोष्टी विशिष्ट वेळात साध्य करण्याचे ठरविले पाहिजे.

२१. खडूफळा मोहीमेत खालील बाबींची पूर्तता अपेक्षित आहे. १) कोणत्याही हवामानात उपयोगात येतील अशा दोन प्रशस्त खोल्या, २) आवश्यक ती खेळणी आणि क्रीडा साहित्य, ३) फळे, ४) नकाशे ५) तक्ते आणि ६) इतर अध्ययन साहित्य. प्रत्येक शाळेला पुरवावयाच्या विशिष्ट साहित्याची यादी परिशिष्टामध्ये दिलेली आहे. इमारतींच्या बांधकामाबाबत खालील बाबींचा विचार करावा.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना यांच्या आर्थिक तरतूदीतून प्राथमिक शाळांची आवश्यक ती बांधकामे करणे याला अग्रक्रम दिला जाईल या आर्थिक तरतूदीला इतर संबंधीत योजनांतून साह्य केले जाईल.

ग्रामीण शिक्षण समित्यांकडून या इमारतींची देखभाल आणि व्यवस्था करण्याबाबत लिहून घेतले जाईल. पद्धतशीर नियोजनासाठी प्राथमिक शाळावार बांधकामांच्या याद्या केल्या जातील.

शेतीप्रधान, हवामानांची परिस्थिती आणि स्थानिक उपलब्ध साहित्य यांचा विचार करून अल्पखर्चातल्या इमारतींचा आराखडा तयार करण्यात येईल.

क्रीडांगणे उपलब्ध करून देण्यासाठी पावले उचलली जातील.

२२. समाज विकास गट/नगरपालिका विभाग हा एक गट गृहीत धरून या सुविधांच्या प्रत्येक शाळेतील उपलब्धतेबाबत एक कार्यक्रम हाती घेण्यात यावा. असेही याबाबत सुचविण्यात आले आहे की जरी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ५ वे शैक्षणिक सर्वेक्षण हाती घेण्यात येणार असले तरी त्याचे निष्कर्ष काही महिने उपलब्ध होऊ शकणार नाहीत आणि त्यांच्या एकत्रीकरण व विश्लेषणासाठी आणखी काही काळ लागेल. १९८६-८७ च्या कार्यक्रमातील किमान १० टक्के गट व शहरी शाळा समप्रमाणात घेऊन आणि १९८७-८८ मधील २० टक्के घेऊन विशिष्ट सोप्या तक्त्यांच्या आधारे एक पहाणी दिनांक ३० सप्टेंबर १९८६ पूर्वी तातडीने करून निष्कर्षाचे एकत्रीकरण करून अहवाल ३०-११-८६ पूर्वी तयार करावा आणि त्यास ३१-१२-८६ पूर्वी मान्यता घ्यावी. जिल्ह्याच्या पातळीवर अधिकृत समित्या नेमून

त्यांनी गट/नगरपालिका विभागातील कार्यक्रमांना मान्यता द्यावी. खडू-फळा मोहीमेसाठी आर्थिक तरतूद केंद्रशासनाने राज्य सरकारांना अगाऊ रक्कम वा भरपाई देण्याच्या तत्त्वावर करावी. पाचव्या शैक्षणिक सर्वेक्षणाचे निष्कर्ष हे राहिलेल्या ३० टक्के गट/नगरपालिका ८८-८९ मधील कार्यक्रमासाठी आणि ४० टक्के गट/नगरपालिका ८९-९० मधील कार्यक्रमासाठी आधारभूत राहातील.

२३. साहित्याची खरेदी, पुरवठा व वापर याबाबतची पद्धती खडू फळा मोहिमेमध्ये ठरवलेली असेल आणि प्राथमिक शाळांच्या विशेष गरजा विचारात घेऊन आणि त्यांच्या किंमती कमीत कमी राहातील याचा विचार करून त्यात फेरफार होईल, यासाठी विशिष्ट तत्त्वे ठरवली जातील. दर्जा ठरविण्यासाठी काही बाबी सर्वप्रथम विचारात घेतल्या जातील. हे काम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद राज्यातील संस्थांच्या मदतीने करील. खरेदीपद्धतीकडे विशेष लक्ष पुरविले जाईल कारण निविदा पद्धतीने खरेदी करण्यात हलके साहित्य घेतले जाण्याची शक्यता संभवते. पॉलिटेक्निक, आय. टी. आय, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांची उत्पादन क्षमता विचारात घेऊन शाळांना विशेषतः खडूफळा मोहिमेला आवश्यक ते साहित्य तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. अव्यवहार्य व काटेकोर ऑडिट आणि नियंत्रणामुळे शिक्षकांकडून साधनांचा वापर केला जात नाही असे आढळते. तेव्हा अकौंटस् पद्धतीमध्ये सुधारणा करावी लागेल आणि शिक्षकांना प्रशिक्षण देऊन ही साधने दैनंदिन अध्यापनात वापरण्यास त्यांना उत्तेजन द्यावे लागेल. १९८७ व १९८८ च्या उन्हाळ्यात, शिक्षकांना मोठ्या प्रमाणात दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमात याचा समावेश असेल. जिल्हा शिक्षण समित्या व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या नियंत्रणाखाली हे काम पद्धतशीर होईल.

२४. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात एकशिक्षकी शाळा आहेत. अर्थात, गुणवत्ता विकास कार्यक्रमासाठी अशा शाळांतून आणखी एका शिक्षकाची तरतूद करणे आवश्यक आहे. अशा तऱ्हेचा प्रयत्न सातव्या योजनेत राहील आणि एक तपशीलवार कार्यक्रम तयार करून प्रत्येक वर्गाला शिक्षक देण्याची तरतूद ८ व्या योजनेत केली जाईल. प्रत्येक

शाळेतील दोन शिक्षकांपैकी एक स्त्री असावी, या दृष्टीने प्रयत्न केले जातील आणि त्यासाठी स्थानिक परिस्थितीचा विचार करून विशेष प्रशिक्षण आणि पुढील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून, स्थानिक सुशिक्षित स्त्रियांची निवड करण्यात येईल. दूरवरच्या ग्रामीण भागात काम करणाऱ्या पुरुष शिक्षकांसाठी देखील अशा पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक होईल.

**अनौपचारिक शिक्षणाचा नवीन कार्यक्रम**

२५. अनौपचारिक माध्यमातून औपचारिक शिक्षणाच्या दर्जाचे शिक्षण देणे शक्य होईल असे या कार्यक्रमात गृहीत धरले आहे. आधुनिक तांत्रिक साधने उदा. अनौपचारिक शिक्षण केंद्राला शक्ती पुरवणारी औष्णिक ऊर्जा साधने, दृकश्राव्य साधने, रेडिओ, कॅसेटस्, प्लेयर यांचा वापर अनौपचारिक शिक्षण केंद्राचे शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी केला जाईल. तसेच बालकाच्या विविध क्षमतांचा विचार करून उच्च दर्जाचे शैक्षणिक साहित्य निर्माण केले जाईल. व्यवस्थापनातील लवचिकपणा, विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्ययन उपक्रमांची विविधता आणि व्यवस्थापनातील विकेंद्रीकरण या अनौपचारिक शिक्षणातील आवश्यक बाबी आहेत. अनौपचारिक शिक्षणाचे निरनिराळे नमुने निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल आणि आवश्यक लक्ष्ये साध्य करण्याच्या दृष्टीने जास्त योग्य नमुन्यांची निर्मिती आणि त्यांचा अवलंब करणाऱ्या संस्थांच्या कार्यक्रमांना उत्तेजन दिले जाईल.

२६. अनौपचारिक शिक्षणाची वैशिष्टये यावर उल्लेखिलेल्या वैशिष्ट्यांशिवाय अनौपचारिक शिक्षणाच्या आणखी काही बाबी अशा असतील, की ज्यांची कार्यक्रमाचा दर्जा सुधारण्यासाठी मदत होऊ शकेल. त्या बाबींमध्ये खालील गोष्टी येतील.

अ) योजनेची सर्वांगीण अंमलबजावणी करणाऱ्या शिक्षकाचा विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन.

ब) शिकविण्यापेक्षा शिकण्यावर भर आणि यासाठी एकमेकापासून शिकण्याच्या बालकांच्या क्षमतेला महत्त्व.

क) विद्यार्थी स्वतःच्या कुवतीनुसार प्रगती करतील अशा प्रकारच्या उपक्रमांचे नियोजन.

ड) अध्ययनाची गती वाढावी यासाठी प्रभावी माध्यमांचा वापर आणि अनौपचारिक शिक्षण केंद्रामध्ये आवश्यक प्रकाश योजना आणि इतर साहित्याची उपलब्धता.

इ) विद्यार्थ्यांचे सातत्याने मूल्यमापन; मूल्यमापन केंद्राची स्थापना आणि विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण.

फ) शालेय प्रगतीबाबत (विशेषतः भाषा आणि गणित) औपचारिक पद्धतीच्या ठरविलेल्या उद्दिष्टांचा (त्यांच्या आवश्यकतेमुळे व शाळेत शिक्षकास प्रवेश देण्याच्या दृष्टीने) अवलंब करणे.

ग) अध्यापनात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होण्याच्या दृष्टीने वातावरण निर्मिती. उत्पादक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या कामातील योग्यतेनुसार वागणूक.

ह) गायन, नृत्य, नाटय, एकांकिका, खेळ आणि सहली इ. चा समावेश असणाऱ्या अभ्यासक्रमामधील आनंददायी उपक्रमांचे नियोजन.

ड़) औपचारिक शिक्षणामध्ये अनुसूचित जाती व जमातींना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती आर्थिक प्रोत्साहनपर सहाय्य अनौपचारिक पद्धतीत देखील दिले जातात हे पहाणे. शिवाय मोफत क्रमिक पुस्तके व स्टेशनरी सर्व विद्यार्थ्यांना दिली जातात हे पाहणे.

**मार्गदर्शक व त्यांचे शिक्षण**

२७. अनौपचारिक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये मार्गदर्शक हा महत्त्वाचा घटक आहे. मार्गदर्शकाची निवड करताना खालील तत्त्वांचा विचार व्हावा. मार्गदर्शक–

१) स्थानिक असावा.

२) मूळातच प्रेरणा मिळालेला असावा.

३) समाजाला मान्य असावा.

४) प्रामुख्याने समाजातील कमकुवत गटातील असावा.

५) उल्लेखनिय सामाजिक कार्य केलेला असावा.

२८. मुलींच्या प्रवेश नोंदीचे महत्त्व लक्षात घेता आणि अनौपचारिक शिक्षणामध्ये स्त्री ही विकासाच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाची शक्ती आहे हे लक्षात घेऊन शक्य तेथे मार्गदर्शक म्हणून स्त्रियांची नेमणूक करावी.

२९. अनौपचारिक शिक्षणातील सेवकांचे प्रशिक्षण, विशेषत: मार्गदर्शकांचे प्रशिक्षण ही कार्यक्रमाच्या यशाची गुरुकिल्ली आहे. सेवा-पूर्व प्रशिक्षण तसेच आवर्ती स्वरूपाचे सेवांतर्गत प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे पहिल्या वर्षी मार्गदर्शकांना ३० दिवसांचे प्रशिक्षण व पुढील प्रत्येक वर्षी २० दिवसांचे प्रशिक्षण असावे. सहभागी होणारांचे प्रशिक्षण जे त्यांच्या अनुभवावर आधारित असावे, अशा प्रकारच्या प्रशिक्षणाला आता मान्यता मिळालेली आहे. असे प्रशिक्षण प्रत्यक्षात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात नियोजन व खर्च आवश्यक आहे. निर-निराळ्या संस्थांचा यात संबंध येईल आणि निरनिराळ्या शैक्षणिक साधनांची व शैक्षणिक तंत्रज्ञानाची – उदा. टी. व्ही. व्हिडिओ, कॅसेट–रेकॉर्डर यांची मदत घेतली जाईल.

**देखरेख यंत्रणा**

३०. व्यवस्थापकीय यंत्रणेमध्ये सर्वात महत्त्वाची जागा पर्यवेक्षकाची आहे. त्यांच्यावरच प्रामुख्याने कार्यक्रमाचा दर्जा अवलंबून आहे. ज्या पर्यवेक्षकाकडे २० ते २५ केंद्रे असतील त्याजकडे किंवा पूर्व प्रशिक्षित अशा स्थानिक युवा व्यक्तीकडे पूर्णवेळ पद्धतीने अनौपचारिक शिक्षण केंद्राच्या पर्यवेक्षणाचे काम सोपवावे.

३१. एका स्वयंपूर्ण विभागात, शक्यतो समाज विकास गटात १०० अनौपचारिक केंद्रांचा एक प्रकल्प असावा. प्रकल्प पातळीवर प्रमुख कामे खालीलप्रमाणे असतील. १) पर्यवेक्षकांची निवड. २) कार्यक्रमावरील सर्वसाधारण देखरेख. ३) कार्यकर्त्यांना विकासात्मक प्रशिक्षण देण्या-करिता प्रातिनिधिक संस्थांचे संबंध निर्माण करणे. ४) कार्यक्रमावर लक्ष ठेवणे. ५) साहित्य पुरवठा निश्चित करणे इत्यादी. जिल्हा व राज्य पातळीवर सुद्धा या कार्यक्रमास बळकटी आणणे जरूर आहे. शक्य असेल तेथे अनौपचारिक शिक्षणाची व प्रौढ शिक्षणाची प्रशासकीय व

देखरेख करणारी यंत्रणा यांचे एकत्रीकरण करावे. यात पंचायत राज्य समित्या व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा पण समावेश असावा.

**स्वयंसेवी संस्था, आणि पंचायत राज्यामार्फतच्या संस्था यांचा सहभाग**

३२. अनेक स्वयंसेवी संस्थांनी यापूर्वी अनौपचारिक शिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविलेला आहे. बऱ्याच वेळा स्वयंसेवी संस्थांजवळ अशा कार्याला वाहिलेल्या कार्यकर्त्यांचे गट असतात. त्यांचा स्थानिक समाजाशी निकटचा संबंध असतो आणि ते आवश्यकतेप्रमाणे आणि गतीने काम करू शकतात. स्वयंसेवी संस्था व पंचायत राज्यामार्फतच्या संस्था यांना या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने पावले उचलावी. अनौपचारिक शिक्षण हा कार्यक्रम अशा संस्था राबवतील असे सुचविण्यात आले आहे. स्वयंसेवी संस्थांना मदत करण्याच्या दृष्टीने प्रचलित प्रशासकीय व्यवस्था सुधारण्यात यावी असे पण नमूद करण्यात आले आहे. अनुदान समितीकडून सर्व प्रस्तावांची छाननी होईल आणि आवश्यक असल्यास समितीशी चर्चा करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना बोलवण्यात येईल. स्वयंसेवी संस्थांच्या प्रकल्पास ३–४ वर्षांसाठी मान्यता देण्यात येईल. प्रारंभी त्यांचे प्रस्ताव राज्य सरकारामार्फत पाठवावे लागतील, परंतु नंतर स्वयंसेवी संस्था मंत्रिमंडळाकडे अनुदानासाठी सरळ जाऊ शकतील. अर्थात राज्य शासनाने स्वयंसेवी संस्थांच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर देखरेख करावी अशी अपेक्षा आहे.

**निरंतर शिक्षण**

३३. शिकणाऱ्या सर्वच व्यक्तींसाठी निरंतर शिक्षण ही फार महत्त्वाची अशी एक बाब आहे. अनौपचारिक शिक्षणाच्या प्रारंभिक कार्यक्रमाचा निरंतर शिक्षणाबरोबर संबंध जुळवण्यातच अनौपचारिक शिक्षणाचे सामर्थ्य अवलंबून आहे. अनौपचारिक शिक्षणाच्या दृष्टीने याचा खालीलप्रकारे अनेक बाबींशी संबंध येतो. (अ) अनौपचारिक शिक्षण पद्धतीमधील विद्यार्थ्यांची, औपचारिक शिक्षण पद्धतीतील समकक्ष वर्गाबरोबरील दर्जा असणारी चाचणी घेतली जाईल आणि अनौपचारिक शिक्षण पद्धतीमधील विद्यार्थ्यांना औपचारिक पद्धतीत प्रवेश सुलभ व्हावा

याबद्दल आदेश काढण्यात येतील. (ब) अनौपचारिक केंद्रांमध्ये ५ व्या इयत्तेपर्यंत शिक्षण पूर्ण करण्यावर भर देण्यात येईल व आवश्यक तेथे ८ वी पर्यंत अनौपचारिक शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल. अनौपचारिक अभ्यासक्रमाचा शाळेतील अभ्यासक्रमाबरोबर सहसंबंध ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. (क) गरजू विद्यार्थ्यांनी — विशेषत: कामकरी मुलांनी औपचारिक पद्धतीमध्ये शिक्षण पुढे चालू ठेवावे म्हणून त्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातील. (ड) अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमाचा सार्वजनिक वाचनालये, जनशिक्षण इत्यादींशी सबंध जोडला जाईल. (ए) अनौपचारिक शिक्षण पद्धतीमधून बाहेर पडणाऱ्या बालकांना व युवकांना विविध औद्योगिक व तांत्रिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येतील.

**अंमलबजावणीविषयक आर्थिक नियोजन व लवचिकता**

३४. सहाव्या योजनेप्रमाणे ७ व्या योजनेत देखील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नऊ राज्यांतून उपयोगात आणावयाच्या खालील तरतुदी असतील.

अ) अनौपचारिक शिक्षण केंद्रे (मुले, मुली दोन्ही) ५०:५० प्रमाणात स्थापन करण्यासाठी व चालवण्यासाठी राज्य सरकारांना मदत.

ब) मुलींसाठी अनौपचारिक केंद्रे स्थापन करण्यासाठी आणि चालवण्यासाठी राज्य शासनाला ९०:१० या प्रमाणात सहाय्य.

क) स्वयंसेवी संस्थांना अनौपचारिक केंद्रे स्थापन करण्यासाठी व चालवण्यासाठी १०० टक्के तत्त्वावर सहाय्य.

ड) अनौपचारिक शिक्षणाबाबत नवोपक्रम प्रकल्प, संशोधन आणि मूल्यमापन करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना १०० टक्के तत्त्वावर मदत.

शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्यांतून सुद्धा बरेच भाग आणि गट असे आहेत की ज्यांना विशेष मदत आवश्यक आहे. त्यामध्ये डोंगराळ पट्टे, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आदिवासी विभाग, शहरी झोपडपट्ट्यांचा भाग; कामकरी मुले इत्यादींसाठी शैक्षणिक प्रकल्प इत्यादींचा समावेश होतो.

ह्या योजना या विभागांना पण लागू करण्यात याव्यात असे सुचविण्यात आले आहे. या योजनांचा अन्य विभागांसाठी व गटांसाठी अवलंब करणे याचा पण विचार केला जावा.

**मूल्यमापन आणि संनियंत्रण**

३५.प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबाबतच्या नवीन तंत्राबावत उपाययोजनेसाठी सध्याची मूल्यमापन व नियंत्रण पद्धती तोकडी पडेल. याकरिता नवीन मूल्यमापन व नियंत्रण पद्धती यांबाबतची प्रमुख वैशिष्ठ्ये खालीलप्रमाणे असतील.

अ) शिक्षण पद्धतीमध्ये मूल्यमापनाबावत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांची प्रगती. म्हणून या विभागात इतरत्र उल्लेख केल्याप्रमाणे, तसेच परीक्षा विषयक सुधारणा या विभागात उल्लेख केल्याप्रमाणे शैक्षणिक कार्यक्रमातील सुधारणेचा पाया आणि प्राथमिक शिक्षण पद्धतीच्या दर्जाचे मोजमाप घेण्याचे साधन म्हणून विद्यार्थ्यांचे मूल्यपापन करण्यासाठी एक शास्त्रीय मूल्यमापन पद्धती निर्माण करण्याबावत विशेष लक्ष दिले जाईल.

ब) प्राथमिक/उच्च प्राथमिक शालेय पद्धती व अनौपचारिक कार्यक्रम ह्यांचा संबंध स्थानिक समाजाशी आहे. त्यामुळे स्थानिक लोकच ह्या कार्यक्रमाचे नियंत्रण करतील व आवश्यक त्या सुधारणा करण्याची तरतूद करतील.

क) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे नियोजन व अंमलबजावणी यांमध्ये शिक्षक/अनौपचारिक शिक्षणातील संघटक यांचा संबंध आहे तसेच त्यांचा संबंध संयुक्त व वैयक्तिक मूल्यमापनामध्ये पण येईल.

ड) नियंत्रण पद्धतीतील भर प्रवेशनोंदीबाबत माहितीच्या संकलनावरून बालकांना टिकविणे, त्यांच्या उपस्थितीतील सातत्य आणि साध्यातील दर्जा, यां बाबींवर दिला जाईल.

ट) खडूफळा मोहिमेच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हा शिक्षण समितीवर राहील. त्याचप्रमाणे नियंत्रण आणि मूल्यमापन याची जबाबदारी पण त्यांच्याकडेच राहील. यासाठी जिल्हा शिक्षण समिती, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे साहच घेईल.

फ) मूल्यमापन हे अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख अंग राहील आणि संघटक व पर्यवेक्षक हे प्रात्यक्षिक कामाचा सराव सतत चालू ठेवतील. म्हणजे अनौपचारिक शिक्षणकार्यक्रमातील महत्त्वाची माहिती गोळा करण्याबाबत मूलभूत घटकसंस्था ही राहील.

ग) राज्य शैक्षणिक सल्लागार समित्या आणि मध्यवर्ती शैक्षणिक सल्लागार समिती या प्राथमिक शिक्षण सार्वत्रिकीकरणाच्या प्रगतीचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र समित्या स्थापन करतील. या कामामध्ये त्यांना राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, संबंधित राष्ट्रीय व राज्यातील शैक्षणिक आणि सामाजिक विज्ञान संशोधन संस्था साहय करतील.

## परिशिष्ट

**प्राथमिक स्तरावर आवश्यक सुविधा**

**(१) शिक्षकांसाठी साहित्य**

१. अभ्यासक्रम

२. पाठ्यपुस्तके

३. शिक्षक मार्गदर्शिका

**(२) वर्ग अध्यापनोपयोगी साहित्य**

१. जिल्हा–राज्य–भारत नकाशे

२. पृथ्वीचा गोल

३. शैक्षणिक तक्ते

**(३) खेळ साहित्य व खेळणी**

१. चित्रांचे ठोकळे

२. पक्षी व प्राणी यांविषयी कोडीयुक्त खेळ

३. प्राणीजगत

४. तराजू व वजने

५. बृहत दर्शक भिंगे

६. चुंबक

७. मोजपट्ट्या–टेप

८. स्वच्छता, आहार, भाषा आणि अंकविषयक तक्ते

**(४) खेळ साहित्य**

१. उड्या मारायची दोरी

२. विविध चेंडू–फूटबॉल, व्हॉलीबॉल, रबरी चेंडू

३. हवा भरण्याचा पंप

४. रिंग

५. टायरचा झोपाळा

**(५) प्राथमिक विज्ञान संच पेटी**

**(६) सर्वसामान्य हत्यारांची पेटी**

**(७) दृक्‌श्रवण साहित्य**

टेपरेकॉर्डर व प्लेअर

**(८) वाचनालयासाठी पुस्तके**

संदर्भ ग्रंथ, मुलांसाठी पुस्तके किमान २००

**(९) संगीताची वाद्ये**

तबला, पेटी, खंजिरी

**(१०) सादिल खर्चासाठी रक्कम**

**(११) शाळेची घंटा**

**(१२) सर्व हंगामांना योग्य अशा वर्गखोल्या**

१. मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे

२. बसण्यासाठी बाके व सतरंज्या

३. फळा

४. डस्टर–खडू

५. पिण्याच्या पाण्याच्या सोयी

६. कचरा पेटी

प्रकरण ३ रे

# माध्यमिक शिक्षण आणि नवोदय विद्यालये

**सद्य:स्थिती**

१९८३ मध्ये ५६३२३ माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा आणि १,२३,००० उच्च प्राथमिक शाळा होत्या. याचे प्रमाण १ : २.५ पडते. सन १९८३ मध्ये माध्यमिक स्तरांवरील पटनोंदणी ९७,४५,५१९ आणि उच्चमाध्यमिक स्तरांवरील पटनोंदणी ५१,०१,४३५ एवढी होती. देशामध्ये, आदिवासी भाग, वाळवंटी किंवा डोंगराळ भाग यांसारखे, असे वंचित भाग आहेत, ज्या भागांत १० ते २० किलोमीटरच्या परिसरात एकही शाळा नाही, अशा भागांतील विरळ लोकसंख्येमुळे मुलांच्या पटनोंदणीस प्रतिबंध होतो. काही भाग शाळा जवळ असूनही नदी किंवा टेकडीसारख्या भौतिक अडथळ्यांमुळे अलग झाल्यामुळेही वंचित राहिले आहेत.

**पूर्वतयारी आणि विचारात्मक कार्यपद्धतीचे स्थूल निकष**

१. उपजीविकेच्या कामाच्या जगात प्रवेश करणाऱ्यांसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण हे एका दृष्टीने अंतिम टोक आहे. अशा लोकांसाठीच्या धोरणाचा मुख्य गाभा मजबूत अशा एका व्यावसायिक योजनेवर अधिष्ठित असणे आवश्यक आहे. इतरांसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण ही उच्चशिक्षणाची पूर्वतयारी असल्यामुळे अध्ययनाच्या उद्बोधनाबरोबर विषयाचा पाया पक्का करण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. शाळासमूह योजना आणि सुधारित पर्यवेक्षण-पद्धती ही बहुधा ज्याची प्रमुख अंगे असतील अशा प्रकारे व्यवस्थापन पद्धतीमध्ये सुधारणा करणे, हा ७ व्या पंचवार्षिक योजना कालखंडात प्रमुख कार्यक्रम असणे जरूरीचे आहे. त्यानंतरही तो प्रमुख कार्यक्रम म्हणून चालू राहीलच. लवचिक व आंतरक्रियायुक्त अध्यापनकार्यक्रम आणि या कार्यक्रमात साहाय्यक असा प्रयोगशाळा व ग्रंथालयाचा पुरेसा

वापर, ही अध्ययनानुवर्ती शिक्षणासाठी सर्वप्रथम स्वरूपाची गरज राहील. अभ्यासक्रम सुधार कार्यक्रम व परीक्षा / मूल्यमापन प्रक्रियासुधार कार्यक्रम हे कार्यक्रम विषयाचा पाया पक्का करण्याजोगी परिस्थिती निर्माण करतील.

वंचित विभागामध्ये शाळा पद्धतीचा विस्तार करणे, हे माध्यमिक शिक्षणाशी संबंधित धोरणाचे सार आहे. सांप्रत सुविधांचे दृढीकरण करणे आणि प्रज्ञावंत व उच्च संपादनपातळी असणाऱ्या मुलांसाठी विशेष व्यवस्था करणे या बाबींच्या परिपूर्तीसाठी खालील कार्यक्रम आखावे लागतील.

अ) माध्यमिक शिक्षण प्रवेश कार्यक्रमात वंचित भागाचा समावेश होईल अशारीतीने त्या कार्यक्रमाचा विस्तार करणे.

ब) इतर भागांमध्ये/शाळांमध्ये असलेल्या सुविधांचे दृढीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेणे.

क) नवोदय विद्यालये सुरू करण्याचा कार्यक्रम चालू करणे.

**कार्यक्रम आणि अंमलबजावणी**

२. अल्पमुदतीचा उपाय म्हणून राज्य सरकारांना वंचित भागांमध्ये माध्यमिक शाळा उघडण्यासाठी प्रवृत्त केले जाईल. असे करताना विकास गट हे परिमाण मानून १:२.५ पेक्षा कमी प्रमाण असलेले विकास गट निवडले जातील. याचवेळी वस्तीपासून सध्याच्या सर्वात नजिकच्या माध्यमिक शाळेचे अंतर, तसेच वंचित भागांची लोकसंख्या याही बाबींचा योग्य विचार केला जाईल. राज्यातील सर्व भागांचा समावेश करण्याच्या दृष्टीने, प्रत्येक राज्यातील शाळांचा स्थलनिदर्शक नकाशा तयार करण्याचा कार्यक्रम दीर्घ मुदतीचा उपाय म्हणून हाती घेतला जाईल. सुस्पष्टपणे निश्चित केलेल्या प्रमाणांच्या आणि निकषांच्या आधारे माध्यमिक शाळा उघडण्याच्या जागा ठरविण्यासाठी करावयाचे नियोजन व कार्यवाही, या दोन्ही कामांसाठी शाळांचा नकाशा तयार करण्याचे तंत्र अनुसरले जाईल. या अभ्यासात मागास विभाग, अनुसूचित जाती जमाती बहुसंख्य असणारे भाग आणि मुलींसाठी शालेय सुविधा यांवर विशेष भर देण्यात येईल. नेतृत्व करण्यासाठी माध्यमिक शाळा व

तिच्या परिसरातील उच्च प्राथमिक शाळा यांचे समूह स्थापन केले जातील. कोठारी आयोगाने शिफारस केल्यानुसार उच्च प्राथमिक शाळांचे प्राथमिक शाळांशी प्रमाण १:३ असे ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. हा कार्यक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदाच्या सहकार्याने राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेतर्फे हाती घेतला जाईल. हे काम १९८८ पर्यन्त पूर्ण करता येईल. १९८९ नंतर प्रत्यक्ष कार्यक्रम अंमलात आणता येईल. इ. स. २००० पर्यन्त सर्व वंचित विभागांना पूर्णपणे त्याचा लाभ मिळू शकेल. या कामासाठी लागणारा खर्च (ज्याचा अंदाज या घडीस देता येणार नाही) पूर्णतया राज्य सरकारेच करतील.

३. प्राथमिक स्तरावर ज्या व्यक्ती अनौपचारिक शिक्षणाद्वारा शिकल्या आहेत व ज्यांना पूर्णवेळ शाळेत उपस्थित राहणे कठीण वाटत आहे अशा व्यक्तींसाठी, तसेच माध्यमिक शाळेपासून वंचित झालेल्या काम करणाऱ्या व्यक्तींसाठी, तसेच अशाप्रकारे अडचण सोसणाऱ्या इतर व्यक्तींसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर लवचिक व अनौपचारिक व्यवस्था आवश्यक आहे.

मुक्त शाळांद्वारा ही गरज पूर्ण करण्याचा प्रस्ताव आहे. १९९० पर्यन्त प्रत्येक जिल्ह्यात एक साधत केंद्र आणि साधनकेंद्रासह मुक्तशाळा टप्प्याटप्प्याने स्थापिल्या जातील. ही साधनकेंद्रे निवडक माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्था किंवा जिल्हा शिक्षणशास्त्र संस्था येथे ठेवाव्या किंवा जोडाव्या लागतील.

४. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, विशेषतः ग्रामीण भागात इमारती, शिक्षक व शालेय सुविधा यांबाबत अपेक्षेहून कमी सुसज्ज आहेत, हे आपल्याला माहित आहेच. परंतु या उणिवांचे सर्वेक्षण सर्व दृष्टिकोनांतून झालेले नाही. या धोरणात अपेक्षिलेल्या दृढीकरणाच्या कार्यक्रमाची अंगे खालीलप्रमाणे आहेत व त्यासाठीच्या खर्चाचा निश्चित अंदाज करणे शक्य नाही.

अ) आवश्यक तेथे खेळाच्या मैदानासंबंधी पुरेशा सुविधा, आसपासची मोकळी जागा उपलब्ध करून देऊन व अन्य ठिकाणी अशी सुविधा नजीकच्या शाळेसमवेत समाईक वापरण्याची व्यवस्था करून

आणि हा प्रधान कार्यक्रम मानून सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पुरवावी लागेल.

ब) पुरेशा वर्ग खोल्या बांधण्यासाठी आणि प्रयोगशाळा सुविधातील अपुरेपणा भरून काढण्यासाठीही कार्यक्रम हाती घेतला जाईल. शालेय शिक्षणाची देखभाल मुख्यत: स्थानिक संस्था व राज्य सरकारे करतात. शक्य झाल्यास केंद्रशासन पण देखभालीबाबतच्या साधनात भर टाकण्याचा विचार करील.

क) ज्या शाळा माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास संलग्न आहेत अशा प्रत्येक शाळेत प्रयोगशाळा व इतर सुविधा मंडळाने निर्देशिलेल्या अटीबरहुकूम असणे आवश्यक आहे. अशी प्रमाणे (Norms) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, तसेच के. व्ही. एस. या संस्थांनी देखील विकसित केली आहेत. एकदा दिलेली साहित्य-सामग्री पुन: बदलली जात नाही हा भूतकाळातील अनुभव लक्षात घेऊन मुली व फीमाफी असणारे विद्यार्थी वगळता, दरमहा १० ते १५ रुपये या दराने विद्यार्थी वर्गणी घेऊन त्याद्वारे सामाजिक सहभाग मिळवावा असे सुचविण्यात येत आहे.

ड) धोरणामध्ये अपेक्षिल्याप्रमाणे अधिकाधिक पात्र लोकांना व्यवसायाकडे आकर्षून, तसेच समर्थ अशा माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्थांद्वारा सेवापूर्व व सेवान्तर्गत कार्यक्रमात सुधारणा करून शिक्षकांच्या क्षमता वाढविता येतील. शिक्षकांच्या क्षमतांचा दर्जा सातत्याने वाढविण्यासाठी ही प्रक्रिया तात्काळ सुरू करावी लागेल आणि ती पुढेही चालूच ठेवावी लागेल.

इ) धोरणामध्ये अपेक्षिल्याप्रमाणे गाभाभूत अभ्यासक्रम शैक्षणिक एकत्रीकरणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यानंतर अभ्यासक्रम, पाठ्यसाहित्य, अध्यापन पद्धती, परीक्षा/मूल्यमापन पद्धती यांमध्ये सर्वसाधारण सुधारणा केली जाईल.

फ) कोठारी आयोगाने उच्च माध्यमिक शाळांचे माध्यमिक शाळांशी प्रमाण १:३ असे सुचविले आहे. ते कटाक्षाने तेवढे ठेवले पाहिजे. बऱ्याच उच्च माध्यमिक शाळात कला, विज्ञान व व्यापार यांपैकी एक

किंवा दोनच शाखा असतात; तर बहुतेक शाळांत व्यावसायिक शिक्षण शाखा नसतेच. एकत्रीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणून शाळांत तिन्ही शिक्षणशाखा चालविण्यासाठी व काही निवडक शाळांतून व्यावसायिक शिक्षणशाखा सुरू करण्यास सहाय्य केले पाहिजे. संबंधित राज्य सरकारांवर याची जबाबदारी राहील. केंद्र सरकारने ठरविल्यास केंद्र सरकारच्या मदतीने व्यावसायिक शिक्षण शाखा सुरू करता येईल.

५. बुद्धिमान मुलांसाठीच्या कार्यक्रमाचे दोन भाग पडतात. एक कार्यक्रम, विशेष करून सांप्रत पद्धतीमध्ये जे विभाग दुर्लक्षित राहिले आहेत अशा विभागातील उच्च संपादनक्षम मुलांसाठी व दुसरा कार्यक्रम योग्यरीतीने बौद्धिक संगोपन केल्यास त्यांच्या त्यांच्या विषयात ज्यांच्या कडून मूलभूत योगदान होण्याची अपेक्षा आहे अशा विद्यार्थ्यां-साठी असेल.

उच्च संपादनक्षम वर्गातील विद्यार्थ्यांची गरज पूर्ण करण्यासाठी, नवोदय विद्यालयांच्या योजनेखाली, सातव्या पंचवार्षिक योजना कालखंडात, प्रत्येक जिल्ह्यात एका नवोदय विद्यालयाची स्थापना केली जाईल. पालकांची पैसे देण्याची क्षमता आणि त्यांची सामाजिक, व आर्थिक क्षमता यांचा विचार न करता या शाळा चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देतील. या शाळांत ग्रामीण भागातील मुलां-साठी ७५% आरक्षण राहील. अनुसूचित जाती व जमातीसाठी त्यांच्या त्या जिल्ह्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात, परंतु अनुक्रमे १५ व ७.५ या किमान राष्ट्रीयविहित प्रमाणात आरक्षण राहील. शाळेमध्ये मुलींचे प्रमाण एक तृतियांश एवढे ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. या शाळांत निवास भोजनव्यवस्थेसह शिक्षण मोफत राहील. या शाळा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न राहतील.

बुद्धिमान विद्यार्थी बऱ्याच वेळा एखाद्या विषयाच्या मर्यादित भागात विशेष गती दाखवितात; पण त्याचवेळी इतर भागात विशेष गती दाखवीत नाहीत. म्हणून नेहमीच्या पाठ्यक्रमात अशा विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करता येत नाही. अशा मुलांच्यासाठी विशेष व्यवस्था करून, प्रत्येक छोट्या विद्यार्थी गटातील विद्यार्थ्यांना, त्यांना रस असलेल्या मर्यादित

विषयांसाठी त्या विषयांच्या अध्ययन मालांच्या (modular) स्वरूपात अध्ययन-अध्यापनाची तरतूद करावी लागेल. या व्यवस्थेमध्ये, मोठ्या प्रमाणावर सुविधा, उच्चतम शिक्षक–विद्यार्थी प्रमाण, त्याचप्रमाणे अध्यापन कार्यक्रमात तज्ज्ञ व्यावसायिकांचा नियमित सहभाग, ही वैशिष्ट्ये राहतील. हा उद्देश साधण्याच्या दृष्टीने प्रकल्पाची तपशीलवार आखणी विशेष निर्मित गटाने एका वर्षात करावी. अशा विद्यार्थ्यांसाठी प्रचलित पद्धतीमध्ये कार्यवाही करता यावी अशा रीतीनेही व्यवस्था केली जाईल.

□ □

## प्रकरण ४ थे

# शिक्षणाचे व्यावसायीकरण सद्यःस्थिती

**प्रस्तावना–**

१. १९७६ मध्ये राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून "उच्च माध्यमिक शिक्षण व त्याचे व्यावसायीकरण" हा दस्तऐवज व अंमलबजावणीसाठी एक आदर्श संकल्पनात्मक आराखडा म्हणून देशापुढे मांडण्यात आला. उच्च माध्यमिक शिक्षणाच्या व्यावसायीकरणाचा कार्यक्रम १९७६ मध्ये सुरू झाला. तेव्हापासून तो दहा घटक राज्ये आणि पांच केंद्रशासित प्रदेशात अंमलात आला आहे. इतर बहुसंख्य राज्यांतही तो १९८६–८७ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे. व्यवसाय शिक्षणशाखातील प्रचलित प्रवेश क्षमता ७२००० आहे. आतापर्यंत उच्च माध्यमिक पातळीवर प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे फक्त २.५ टक्के विद्यार्थी व्यावसायिकरणात समाविष्ट झाले आहेत.

२. भिन्न प्रकारचे माध्यमिक शिक्षण व त्यांचे व्यावसायीकरण यांचे महत्त्व आणि गरज, यांच्या जाणीवेमुळे मनुष्यबळ आणि विकास मंत्रालय, भारत सरकार आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी पुष्कळ कार्यवाही केली आणि अनेक प्रस्ताव केले. मूल्यमापनाचे निष्कर्ष संबंधित राज्यांना कळविले. त्यादृष्टीने पुढे अंमलबजावणीत सुधारणा करण्याच्या हेतूने व्यवसाय कार्यक्रमांचा मूल्यमापनात्मक अभ्यास बहुतेक राज्यांतून सुरू झाला.

३. इतके प्रयत्न होत असताना देखील शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची योजना अद्याप गतिशील झालेली नाही. मंदगतीला पुष्कळ घटक कारणीभूत आहेत. ते म्हणजे सुयोग्य समन्वय साधणाऱ्या व्यवस्थापकीय पद्धती, व्यवसाय शिक्षण घेतलेल्यांची बेरोजगारी, मागणी व पुरवठा यांमध्ये मेळ नसणे, संकल्पना स्वीकारण्या बाबतची समाजाची

नाखुषी, व्यवसाय शिक्षण पूर्ण करणाऱ्यांसाठी व्यावसायिक वाढ आणि धंद्याची प्रगती यांबाबतच्या योग्य तरतुदींचा अभाव इत्यादी. या बाबतीतील प्रगती अधिक गतिमान करण्यासाठी बऱ्याच राज्यांतून नव्याने प्रयत्न केले जात आहेत. म्हणून व्यवसाय शिक्षण पद्धती मजबूत करण्यासाठी त्वरेने पावले उचलली पाहिजेत.

**व्यवसाय शिक्षणाचे व्यवस्थापन**

४. व्यावसायीकरणाच्या आघाडीवर असमाधानकारक प्रगतीला अनेक घटक कारणीभूत असले, तरी एकमेव महत्त्वाचे कारण म्हणजे या कामासाठी अपुरी संघटनात्मक यंत्रणा आणि त्याचा परिणाम म्हणजे स्वीकारलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीतील असमर्थता.

५. सध्या विविध विभागातील व्यवसाय शिक्षणाच्या व्यवस्थापन-यंत्रणा अलगपणे काम करीत आहेत. त्यांच्या कार्यात राष्ट्रीय, विभागीय किंवा राज्य स्तरावर क्वचितच समन्वय दिसून येतो.

६. राष्ट्रीय स्तरावर, माध्यमिक शिक्षणोत्तर व्यवसाय शिक्षण (व्यावसायीकरण) आणि शाळेबाहेरील लोकसंख्येच्या व्यवसाय शिक्षणाची, कृषी, आरोग्य, ग्रामीण, विकास, मनुष्यबळ विकास इत्यादी विविध मंत्रालयाखालील विविध विभागांमार्फत देखभाल चालू आहे. मात्र योग्य समन्वय आणि सुसूत्रता न साधता ही देखभाल केली जाते. व्यवसाय शिक्षणाच्या कार्यक्रमात ज्या विविध प्रकारच्या शिक्षणशाखांचा समावेश होतो, त्या म्हणजे कृषी, व्यवसाय आणि व्यापार, अभियांत्रिकी आणि तंत्रविज्ञान, आरोग्य आणि निमवैद्यकीय सेवा, गृहशास्त्र, मानव्य आणि इतर.

७. राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षणाचे व्यवस्थापन विस्कळित आणि अपुरे आहे. काही राज्यांत पूर्णवेळ संचालनालये आहेत. तर काही राज्यांत आपल्यावरील इतर जबाबदाऱ्यांबरोबर व्यवसाय शिक्षण कार्यक्रमाची देखभाल करण्यासाठी मध्यम स्तरावरील अधिकारी आहेत. गरजेवर आधारित व्यवसाय शिक्षणक्रम विकसित करण्यासाठी मनुष्य-बळाच्या गरजा निश्चित करण्यासाठी जिल्हा पातळीवर सर्वेक्षणासारखे कार्यक्रम हाती घेण्यासाठी, जिल्हा स्तरावर व्यवसाय कार्यक्रमांचा

समन्वय साधण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नाही. शिवाय अभ्यासक्रम, रचना, साधन सामुग्रीची तयारी, व्यवसाय शिक्षकांचे प्रशिक्षण इत्यादी बाबतची तरतूद, या कामाचे व्यापक स्वरूप विचारात घेता अपुरी आहे.

८. व्यवसाय शिक्षणाच्या कार्यक्रमाचे नियोजन आणि कार्यवाहीची विविधता, तसेच प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणानंतरच्या स्तरावर अपेक्षित बदल्यांच्या प्रमाणात कार्याचे मोजमाप लक्षात घेऊन, परिणामकारक व्यवस्थापन पद्धतीचे संघटन होणे आवश्यक आहे.

**व्यवसाय शिक्षणाचे कार्यक्रम, सामान्य शिक्षणातील कार्यानुभव**

९. अनेक राज्यांत इयत्ता १ ते ५ या प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर समाजोपयोगी उत्पादक कार्य/कार्यानुभव हा अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनला आहे. त्यापाठीमागील सुयोग्य असा दृष्टिकोन निर्माण करण्याचा उद्देश चांगला असला, तरी प्रत्यक्ष कार्यवाहीमध्ये समावेशकता आणि दर्जा या दृष्टीने अपेक्षा करावयाला बराच वाव आहे-

१०. माध्यमिक स्तरावरील समाजोपयोगी उत्पादक कार्य/कार्यानुभव कार्यक्रमाचा हेतू, आत्मविश्वास आणि पुरेसे कार्यात्मक कौशल्य विद्यार्थ्यांत विकसित होऊन त्यांना थेट किंवा काही ठराविक व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर व्यावसायिक जगात प्रवेश करता यावा असा आहे.

**माध्यमिकस्तर (इयत्ता ९–१०)**

११. माध्यमिक स्तरावरील समाजोपयोगी उत्पादककार्य/ कार्यानुभवाचे कार्यक्रम हे मधल्या पायरीवरच्या कार्यक्रमांचे विस्तारित रूप आहे. माध्यमिक स्तरावरील या कार्यक्रमांतून + २ पातळीवरील व्यवसाय कार्यक्रमांचा पर्याय आवडीने, आत्मविश्वासाने निवडण्यास विद्यार्थ्यांना समर्थ करणे ही गोष्ट अपेक्षित आहे. या स्तरानंतर विद्यार्थी मोठ्या संख्येने गळतात याचा येथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. शाळा सोडण्यापूर्वी व्यवसायाची निवड करण्यास विद्यार्थ्यांना समर्थ बनवायचे तर समाजोपयोगी उत्पादक कार्य / कार्यानुभवाच्या कार्यक्रमातून त्यांची जरूर तेवढी तयारी होणे अपेक्षित आहे. अशा प्रकारचे व्यवसायपूर्व

शिक्षणक्रम विशिष्ट कौशल्य आणि क्षमता असलेल्या शिक्षकांनी हाताळावयाचे आहेत. या शिक्षणक्रमासाठी शाळेत योग्य साधन सामुग्रीची गरज आहे.

**उच्च माध्यमिक स्तर**

१२. उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय शिक्षणक्रम महाविद्यालयीन तयारीसाठी नसून, जीवनातील विविध व्यवसायांसाठी वाढत्या मोठ्या संख्येने शाळा सोडणाऱ्यांच्या व्यावसायिक तयारी करिता जरूर ते शिक्षण घेण्याचा, तो काल आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची गरज सर्वांनी मान्य केली आहे. मात्र त्यांच्या अंमलबजावणीतील समस्यांचे आकलन, गेल्या नऊ वर्षांत (१९७६–८५) व्यवसाय शिक्षणात समाविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या अत्यल्प टक्केवारीवरून होण्यासारखे आहे. १९८५ मध्ये + २ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या २५ लाख आहे. यांपैकी जर १० टक्के संख्या व्यवसाय शिक्षणाकडे वळविली तर ती २.५० लाखाच्यावर होईल. सध्याची प्रवेश क्षमता ७२ हजार आहे. कोठारी कमिशनच्या शिफारशींच्या संदर्भात ह्या गृहीतकाचा विचार केला तर व्यवसायशिक्षणासाठी १० + विद्यार्थ्यांच्या पैकी ५० टक्के विद्यार्थी वळविता आले तर या प्रश्नाची आणखी सुस्पष्ट कल्पना येईल.

**व्यवसाय शिक्षण व इतर औपचारिक कार्यक्रम**

१३. गेल्या नऊ वर्षात देशात व्यवसाय शिक्षणाच्या शाळा, व्यवसाय शिक्षण संस्था आणि तंत्रनिकेतने यांचे जाळे विकसित झाले आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी जवळ जवळ २ ते ३ टक्के विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कनिष्ठ तांत्रिक शाळा इत्यादी संस्थांत प्रवेश घेतात. या संस्था प्राधान्याने जे संघटित क्षेत्राची गरज भागवू शकतात अशा पूर्णवेळ विद्यार्थ्यांना शिकवतात. त्यांची वार्षिक प्रवेश क्षमता सुमारे ५ लाख आहे.

१४. कोठारी कमिशनने ८ + मधील सुमारे २० टक्के विद्यार्थी सामान्य शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाऊन व्यवसाय शिक्षणाच्या शाळांत प्रवेश घेतील असे द्रष्टाच्या भूमिकेतून यथार्थ असे अनुमान

वर्तविले आहे. तसेच १०+मधील विद्यार्थ्यांची मोठी टक्केवारी व्यवसाय शिक्षण संस्थेकडे वळत्रायची आहे ; तथापि सध्याच्या व्यवसाय शिक्षणाच्या संस्था ८+आणि१०+स्तरांवरील विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येस पुऱ्या पडणे अशक्य असल्याने आणखी संस्था उघडणे आणि व्यवसाय शिक्षणाची नवीन क्षेत्रे उपलब्ध करून देणे यासाठी व्यवसाय शिक्षणाच्या नियमित्र कार्यक्रमांचा विस्तार करण्याची आज गरज आहे.

## तृतीय स्तरावरील व्यवसाय शिक्षण

१५. माध्यमिक शिक्षणाच्या व्यावसायीकरणाच्या संथ प्रगतीस जबाबदार असणाऱ्या घटकांपैकी एक घटक म्हणजे व्यवसाय शिक्षण घेऊन उत्तीर्ण होणाऱ्यांना त्यांच्या पुढील व्यावसायिक वाढीसाठी आणि व्यावसायिक कारकीर्दीच्या प्रगतीसाठी संधिचा अभाव असणे हा आहे.

१६. व्यवसाय शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावर नोकरीची योग्य संधी किंवा व्यवसायात अगर शिक्षणाच्या सामान्य कार्यक्रमात पुढे जाण्याचा लाभ मिळाल्याशिवाय व्यवसाय शिक्षणा-बद्दलचा सध्याचा पूर्वग्रह नाहीसा होणार नाही.

१७. अशा कार्यक्रमात पदविका, विशेष पदवी शिक्षणक्रम, सामान्य पदवी शिक्षणक्रम, धंदेविषयक पदवी शिक्षणक्रम यांचा अंत-र्भाव होऊ शकेल. सध्या + २ वरील व्यवसाय शिक्षण शाखांतील विद्यार्थ्यांकरिता पुढील शिक्षणासाठी संधि अस्तित्वातच नाहीत म्हणून व्यवसाय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी तिसऱ्या स्तरावरील कार्यक्रमात प्रवेश घेता यावा यासाठी संधि उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योग्य प्रकरची यंत्रणा उभी करावी लागेल.

## उमेदवारी प्रशिक्षण

१८. कारागीर आणि तंत्रज्ञ उमेदवारीप्रशिक्षणयोजनेखाली समाविष्ट झालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रविद्यानिकेतने यांतील विद्यार्थ्यांपेक्षा + २ स्तरावरील व्यवसाय – शिक्षण शाखेतील विद्यार्थी वेगळे आहेत. व्यवसाय – शिक्षणाच्या उन्नतीसाठी, व्यवसाय शिक्षणार्थी संबंधित अनेक समित्यांनी दृढपणे शिफारस केली आहे, की + २ स्तरावरील व्यवसाय शिक्षणाच्या विद्यार्थ्यांना एक महत्त्वाचा

दुवा म्हणून उमेदवारी योजनेखाली आणावे लागेल. मनुष्यबळ विकसन मंत्रालयाने सुरू केलेल्या खास व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण योजनेसाठी + २ स्तरावर, देशात असलेल्या १२० व्यवसाय शिक्षणक्रमांपैकी काहींची निवड सध्या झाली आहे. आवश्यकता असलेल्या व्यवसाय–शिक्षणक्रमात अशी उमेदवारी योजना सुरू करण्यासाठी योग्य कार्यवाही करावी लागेल.

**इतर व्यवसाय–शिक्षणाचे कार्यक्रम**

१९. उच्च माध्यमिक शाळांतील आणि व्यावसायिक तसेच तांत्रिक प्रशिक्षण शाळा / संस्थांमधील शिक्षणक्रम फक्त अर्थोत्पादनाच्या संघटित क्षेत्राच्या गरजा भागवितात. तथापि असंघटित क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात कार्यशक्ती सामावून घेतली जात असते. त्याचबरोबर आपण एका बाजूला वाढत्या प्रमाणात सुशिक्षितांतील बेकारी अनुभवतो तर दुसऱ्या बाजूला नळारी, मोटार यंत्रज्ञ, विद्युत तंत्रज्ञ, सुतार आणि अशा अनेक इतर धंद्यातील मनुष्यबळ यांचीही टंचाई पाहतो.

२०. विद्यार्थीसंख्येपैकी सुमारे ८० टक्के विद्यार्थी १० वी इयत्तेच्या पुढे जात नाहीत असे आढळून येते. प्रत्येक वर्षी ८ वी इयत्तेपर्यंतची (८ वीचा समावेश करून) गळती १२० लाखावर आहे. ढोबळ मानाने २० लाख मुले आणि मुली ८ वी इयत्ता ओलांडतात. परंतु ती १० वी इयत्तेच्या पुढे जात नाहीत. अकुशल कामगारांचा मोठा भरणा यांच्यातूनच होत असतो. कौशल्याचा किंवा किफायतशीर असा धंदा मिळवण्याच्या दृष्टीने त्यांना समर्थ करायचे झाले तर त्यांना त्यांच्या पारंपारिक धंद्यातील किंवा नवीन क्षेत्रातील कौशल्य–प्रशिक्षणाची संधी मिळण्याची गरज आहे.

२१. याशिवाय ज्यांनी शालेय वय ओलांडलेले आहे आणि जे अर्धकुशल आणि कुशल कामगार म्हणून काम करतात अशांमध्ये शाळेतून गळती झालेल्या विद्यार्थ्यांचा अनुशेष ( Backlog ) आहे. देशातील १५ ते ५९ वयोगटातील कामगारशक्ती या सर्व गटांची बनलेली आहे. ती २३.७० कोटी आहे. (मार्च १९८०) यांपैकी सुमारे फक्त १० टक्के संघटित क्षेत्रात आहेत. उर्वरित प्रशिक्षणाविना अंशकाल नोकरीत आहेत किंवा बेकार तरी आहेत.

२२. मोठ्या प्रमाणातील या लोकांसाठी योजनाबद्ध असे शैक्षणिक कार्यक्रम नाहीत. समाज, तंत्रनिकेतने, ट्रायसेम, कृषी विज्ञान केंद्रे, नेहरू युवक केंद्रे, के. व्ही. आय. सी., समाज कल्याण केंद्रे, अखिल भारतीय हस्त कौशल्य मंडळे, ग्रामीण तंत्रज्ञान प्रगती मंडळे इत्यादी अनेक अनौपचारिक कार्यक्रमांना काही प्रमाणात हातभार लावत नाहीत. हे काम करण्यासाठी सखोल व सुसमन्वयित प्रयत्नांची नितांत आवश्यकता आहे.

**व्यवसाय शिक्षण : विशेष गट**

२३. आदिवासी आणि ग्रामीण लोकांच्या शालेय शिक्षण, शाळेतील व्यवसाय शिक्षणक्रम किंवा व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण शाळा/संस्था काहीशा आवाक्याबाहेर आहेत. ज्यामुळे व्यवसाय शिक्षण प्रशिक्षणातून स्त्रियांची अर्थार्जन शक्ती वाढवता येऊ शकेल अशा स्त्रियांच्यासाठीच्या व्यावसायिक शिक्षणक्रमांची/संस्थांची कमतरता आहे. शारीरिकदृष्टया अपंग आणि दुर्बल व्यक्ती ह्या समाजाचा दुसरा ठळक असा भाग आहे. उत्पादक कौशल्ये संपादन करून आपले जीवन अधिक अर्थपूर्ण व स्वावलंबी करण्याचे मार्ग सध्या त्यांच्यासाठी जवळ जवळ उपलब्ध नाहीत.

**कार्यक्रम**

२४. व्यावसायिकीकरणासाठीच्या व्यवस्थापनाविषयीची धोरणात्मक निवेदने, उद्दिष्टे, प्राधान्यक्रम आणि कार्यक्रम या संदर्भात मुख्य चार क्षेत्रात एकत्रित झाली आहेत. ज्यायोगे कार्यक्रमांच्या कार्यवाहीचा विकास तर्कशुद्ध होण्याची खात्री आहे. ह्या क्षेत्रात 'व्यवस्थापनाचा विकास', 'व्यवसाय शिक्षण कार्यक्रम,' 'विशेष गटासाठी कार्यक्रम', 'शाळांबाहेरील लोकसंख्या' आणि 'विकासासाठी लक्ष्ये आणि तयारी' यांचा समावेश होतो.

**प्राथमिक गरजा, प्राधान्यक्रम व मार्गदर्शक तत्त्वे**

२५. उच्च माध्यमिक स्तरावर व्यावसायीकरणाचा कार्यक्रम सर्व शालेय शिक्षणाचा महत्त्वाचा घटक म्हणून आणि तसेच उच्च माध्यमिक शिक्षणानंतर सामान्य आणि धंदे शिक्षणाचा पूरक म्हणून या दोन्ही

दृष्टीने विचारात घेणे महत्त्वाचे आहे. पुढील परिच्छेदात व्यवसाय शिक्षणासाठी प्रस्तावित केलेली व्यवस्थापन पद्धती ही शालेय शिक्षणाच्या व्यवस्थापनाच्या प्रचलित पद्धतीला पोषक आणि पूरक आहे. व्यवसाय शिक्षणाची कृतिकार्यक्रम योजना अमलात आणण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्त्वे उपयुक्त ठरतील.

i) धोरणात असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, +२ स्तरावरील किमान १० टक्के विद्यार्थी व्यवसाय शाखेकडे सातव्या पंचवार्षिक योजनेअखेर वळवावेत. अस्तित्वात असलेली प्रशासकीय यंत्रणा, संशोधनाची तरतूद आणि विकासात्मक पाठिंबा तसेच व्यवसाय कार्यक्रमांचे प्रमाणिकरण यांचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात ही गोष्ट साध्य करता येईल. त्यासाठी अस्तित्वात असलेले व्यवस्थापन योग्यप्रकारे बळकट करावे लागेल. ज्यायोगे ७ व्या पंचवार्षिक योजनेतील कामाच्या व्यापाशी कार्यात्मकदृष्टचा पुरेसा मुकाबला करता येईल आणि पुढील योजनांतील मोठ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक असलेली अधिक मेहनतपूर्वक तयार केलेली यंत्रणा त्यातून निर्माण होऊ शकेल.

ii) सातव्या पंचवार्षिक योजनेत, अपेक्षित नवीन आराखडा प्रस्थापित करण्यास सुरूवात करावी लागेल. कारण पुढील कार्यासाठी हे आराखडे अस्तित्वात येण्यास आणि व्यावसायिक क्षमता आणि नैपुण्य विकसित करण्यास काही वेळ लागेल. डॉ कुलंडायस्वामी यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय कार्यगटाने आराखड्याचा योग्य नमुना दिला आहे. संबंधित राज्यांच्या गरजानुरूप लवचिकतेचे तत्त्व त्यासाठी अनुसरले जाईल. नियोजित समावेशकता, कार्यक्रमांची अंमलबजावणीची पायरी आणि विशिष्ट स्थानिक संदर्भ लक्षात घेऊन त्यानुरुप संघटनात्मक आराखडा तयार करण्यास राज्यांना मुभा दिली जाईल. व्यवसाय शिक्षण आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी लक्ष्य निश्चित केलेल्या शाळांच्या परिसरातील उच्च शिक्षणसंस्थांचा समावेश करून घेणे इष्ट ठरेल.

iii) +२ स्तराच्या संदर्भात लक्ष्यपूर्ती केली जाईल आणि लक्ष्य ओलांडण्याचे प्रयत्न केले जातील या योजनाकाळात अनौपचारिक

व्यवसाय शिक्षण क्षेत्रात गळती झालेल्या लक्ष्य गटासाठी आणि इतर लक्ष्य गटांसाठी आरंभ केला जाईल. याचा उपयोग ८ व्या आणि त्यापुढील पंचवार्षिक योजना कार्यक्रमाचा विस्तार मोठ्या प्रमाणात करण्याचे काम हाती घेण्यापूर्वी भरपूर अनुभव आणि नैपुण्य संपादन करण्यासाठी होईल चालू योजनेत + २ कार्यक्रमावर अधिक भर दिला तर त्यामुळे औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रात व्यवसाय शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असणारी मानवी साधनसामुग्री निर्माण करण्यात होईल.

vi) सातव्या पंचवार्षिक योजनेत नमूद केलेले लक्ष्य विचारात घेता, असे निःसंदिग्धपणे सांगता येईल की, आवश्यक निधी उपलब्ध करून दिल्याशिवाय व्यावसायिकरणाची प्रक्रिया योग्य तऱ्हेने राबविता येणार नाही. या आवश्यक निधीच्या पातळीपेक्षा कमी निधी उपलब्ध झाल्यास व्यावसायिकरणाचे दृश्य पण मिळू शकणार नाही आणि अनुत्पादक बाबी निर्माण केल्या जाऊन व्यावसायिकरणाचे मूळ कल्पनेलाच अपयश येईल.

v) व्यवसाय शिक्षणाला मान्यता मिळणे आणि तत्संबंधीची आत्मीयता निर्माण होणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. यासाठी (१) अर्थोत्पादन क्षेत्रात, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. व्यावसायिक कौशल्य लागणारे धंदे, संघटना आणि क्षेत्रे शोधावी लागतील आणि त्यांसाठीची भरती करताना व्यवसाय शिक्षण कार्यक्रमाच्या पदवीधरांना पसंती द्यावी लागेल. हे लक्षात घेतले पाहिजे की, या धंद्यांशी संपर्क असलेल्या अशा उच्च शैक्षणिक पात्रताधारक परंतु व्यवसाय शिक्षणाच्या दृष्टीने विसंगत असलेले पदवीधर पूर्वी व्यवसाय शिक्षणाच्या प्रयत्नांमधील अडथळे ठरत. (२) व्यवसायाशी शिक्षणक्रम निगडीत करणे, प्रचलित शैक्षणिक कार्यक्रम त्यास अनुरूप करून आणि इतर उपाय योजून व्यवसायातील पदवीधरांच्या व्यावसायिक उन्नतीसाठी योग्य परिस्थिती निर्माण करून त्यांच्या उच्च शिक्षणासाठी, निरंतर शिक्षणासाठी आणि प्रशिक्षणासाठी संधि निर्माण करून द्याव्या लागतील.

vi) + २ स्तराची शाळांतील, तसेच तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे आणि इतर प्रमाणपत्र पातळीवरील संस्थांतील व्यावसायिक संधि पुरविण्याच्या भूमिकेची रूपरेषा तयार करावी लागेल. औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे आणि तंत्र विद्यानिकेतने संघटित औद्योगिक क्षेत्रासाठी व्यावसायिक संधि पुरवतात. तर शालेय कार्यक्रमाचा भर, उद्योग विरहित क्षेत्रावर सामर्थ्याच्या दृष्टीने मोठ्या क्षेत्राकडे आहे. शालेय व्यवस्थापन, शेती, कृषी उद्योग, उद्योग आणि व्यापार, गृहशास्त्र, आरोग्य, आणि पशु वैद्यक यांकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. तथापि या विभक्तीकरणाचा असा अर्थ नाही, की जर गरज असेल आणि इतर संस्थेतील यंत्रणा उपलब्ध नसेल तर इतर क्षेत्रातील व्यावसायिक शिक्षणाचे कार्यक्रम घेण्यापासून त्यांना वगळावे.

vii) + २ स्तरावर किमान ४० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असलेल्या १० जादा शाळा प्रत्येक जिल्ह्यातून ७ व्या पंचवार्षिक योजनेअखेर व्यवसाय शिक्षणाच्या योजनेसाठी घेतल्या जातील.

पूर्वी उल्लेख केलेल्या चार क्षेत्रांच्या कार्यवाहीचा आराखडा खाली दिला आहे.

**(अ) व्यवस्थापन विकसन**

**संघटनात्मक आकृतिबंध विकसित करणे**

२६. राष्ट्रीय पातळीवर मानवी साधनविकास मंत्रालयाकडून सर्वोच्च संस्था आणि व्यवसाय शिक्षणाचे धोरण, नियोजन आणि समन्वय यासाठी जॉईंट कौन्सिल फॉर व्होकेशनल एज्युकेशन स्थापन केले जाईल. याशिवाय व्यवसाय शिक्षण मंडळ, मानवी साधन विकास मंत्रालयामध्ये स्थापन करण्यात येईल.

२७. राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या अधिपत्याखाली संशोधन आणि विकास करण्यासाठी त्याचप्रमाणे संनियंत्रण आणि मूल्यमापन कार्ये करण्याकरिता व्यवसाय शिक्षणाची केंद्रीय संस्था स्थापन केली जाईल.

२८. राज्य सरकारे, आपल्या गरजा आणि आवश्यकता विचारात घेऊन राज्य व्यवसाय शिक्षण परिषद, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, व्यवसाय शिक्षण विभाग आणि जिल्हा स्तरावर समन्वय समित्या यांसारख्या योग्य त्या संस्था/संघटना आपापल्या राज्यात स्थापन करतील.

२९. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, मध्यवर्ती व्यवसाय शिक्षण संस्था, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, तांत्रिक अध्यापक प्रशिक्षण संस्था इत्यादी संस्थांची निम्न स्तरावरील अतिरिक्त संस्थांची आणि शाखांची पूरक योजना करून व्यावसायिकरणाच्या विकासासाठी प्रभावीपणे कार्य करण्याच्या दृष्टीने मजबूती करण्याची गरज आहे.

३०. राज्य व्यवसाय शिक्षण मंडळे, जिल्हानिहाय क्षेत्र व्यवसाय, सर्वेक्षणातून व्यवसाय शिक्षण, मनुष्यबळाच्या गरजांची छाननी करतील आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य शिक्षणशास्त्र संस्था, क्षेत्रीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय. तांत्रिक अध्यापन-प्रशिक्षण संस्था, उद्योग आणि तांत्रिक संस्था यासारख्या संघटनांच्या सहकार्याने योजना तयार करतील.

## साधन सामुग्री/सुविधा विकसित करणे

३१. छाननी केलेल्या गरजा पुऱ्या करण्यासाठी आणि अभ्यासक्रम विकसनासाठी व्यवसायशिक्षणाचे कार्यक्रम तयार करण्यासाठी विभाग/केंद्रे राज्य व्यवसाय शिक्षण संस्था/राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि इतर विशेष क्षेत्रातील निवडक व्यवसाय शिक्षण संस्था यांमध्ये अभ्यासक्रम विकसन विभाग/केंद्रे स्थापन केली जातील. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नमुन्याचे अभ्यासक्रम आणि मार्गदर्शक तत्त्वे विकसित करील.

३२. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, तांत्रिक अध्यापन प्रशिक्षण संस्था, क्षेत्रीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये, अभ्यासक्रम विकसन विभाग यांचेकडून अध्यापन मार्गदर्शन विकसनासाठी शिक्षक-वृंदाचे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातील.

३३. विविध व्यवसायांतील व्यवसाय शिक्षणाच्या विद्यार्थ्यांना, कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी पुरेशा सुविधांनी युक्त अशी जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे, मानवी साधन विकास मंत्रालयाकडून स्थापन केली जातील. अशा प्रशिक्षण केंद्रांत उच्च प्रशिक्षित आणि कुशल शिक्षक असतील. या केंद्रातील सोयी आणि शाखा-सुविधांचा लाभ त्या त्या क्षेत्रातील अनेक शाळांमधील व्यवसाय शिक्षणाचे विद्यार्थी समन्वयित योजनेप्रमाणे घेतील.

**दुवा विकसित करणे**

३४. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद / केंद्रीय व्यवसाय शिक्षण संस्था, राज्य आणि जिल्हा पातळीवरील सुयोग्य दुवा विकसित करण्यासाठी विविध संघटना / अस्थापना यांच्या राष्ट्रीय/राज्य/ जिल्हा पातळीवर कामांचे आणि जबाबदाऱ्यांचे स्वरूप व्यापकपणे, सूचित करून एक मार्गदर्शक पुस्तिका तयार करील.

३५. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद / मध्यवर्ती व्यवसाय शिक्षण संस्था, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, राज्य शैक्षणिक संशोधन परिषद यांच्या सहकार्याने मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारे, संचनालये, जिल्हापातळीवरील अधिकारी आणि संस्था, सहभागी झालेल्या मालक संघटना यांच्यामधील सतत दळणवळण राहाण्याची खात्री असावी याकरिता व्यवसाय शिक्षणासाठी माहिती व्यवस्थापन निर्माण करतील.

३६. मानवी साधन विकास मंत्रालय, धोरण आखणाऱ्या संस्थात समाविष्ट होणारी व्यवसाय शिक्षण संयुक्त मंडळे, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, व्यवसाय शिक्षण संस्था, क्षेत्रीय शिक्षण-शास्त्र महाविद्यालये, तांत्रिक अध्यापक प्रशिक्षण संस्था, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, जिल्हा समन्वय समित्या, शिक्षण प्रशिक्षणातील संशोधन आणि विकास संघटना, जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे, तसेच मानवी साधन विकास मंत्रालये, उमेदवारी प्रशिक्षण मंडळ, परीक्षा आणि विविध प्रमाणपत्र संस्था, परीक्षा मंडळ या संस्थांमधील दुव्यांचे स्वरूप आणि

कार्ये सूचित करणारी मार्गदर्शक पत्रिका तयार करण्यासाठी पाऊल उचलील.

३७. व्यवसाय शिक्षण संस्थांना शाळा, मालक आणि समाजातील स्वयंसेवी संघटनांतील दुवे विकसिक करण्यासाठी, जास्तीत जास्त साधन सुविधांचा उपयोग करून व्यवसाय शिक्षण कार्यक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीला चालना देण्याकरिता राज्य व्यवसाय शिक्षण विभाग आदेश आणि मार्गदर्शक तत्त्वे घालून देईल आणि त्याकरिताची योजना तयार करील.

**(ब) व्यवसाय शिक्षण कार्यक्रम**

३८. विविध राज्यात व्यवसाय शिक्षण विभाग, प्रायोगिक तत्त्वावर मर्यादित स्वरूपात ८+ विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय शिक्षण कार्यक्रम सुरू करतील. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद / राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, व्यवसाय शिक्षण संयुक्त मंडळ आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना धरून नमुने विकसित करतील. पुढील विस्तारासाठी प्रचलित असलेल्या नमुन्यांचा अभ्यास केन्द्रीय व्यवसाय शिक्षण संस्था/राष्ट्रीय संशोधन प्रशिक्षण परिषद यांच्याकडून त्यांची गरज व योजना ठरविण्यासाठी केला जाईल. तथापि अभियांत्रिकी व्यवसायात औद्योगिक प्रशिक्षण संस्था जेथे जेथे आवश्यक गणल्या गेल्या तेथे तेथे त्या ८+ विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण कार्यक्रम देऊ शकतात.

३९. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार १०+ स्तरावरील कार्यक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद/राज्य व्यवसाय शिक्षण संस्था यांच्याकडून तयार केला जाईल. क्षेत्र व्यवसाय शिक्षण सर्वेक्षणाच्या निर्णयाच्या आधारावर राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ, हे कार्यक्रम निवडक शाळांत टप्प्याटप्प्याने, राष्ट्रीय लक्ष्ये विचारात घेऊन सुरू करण्यास चालना देईल.

४०. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान यांच्या १०+ व्यवसाय शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांना अधिक संधि उपलब्ध करून देण्याकरिता आणखी १०० व्यवसाय शिक्षण संस्था स्थापन केल्या जातील.

४१. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषद टप्प्याटप्प्याने, उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण शाखेतील ७० टक्के पदवीधरांना योग्य कारखान्यात पगारी उमेदवारी करण्यासाठी विद्यावेतनाची तरतूद करतील. क्षेत्रीय उमेदवारी प्रशिक्षण मंडळ व्यवसाय शिक्षणाच्या विभागाच्या आणि इतर संबंधित आस्थापनाच्या सहकार्याने त्याची अंमलबजावणी करील.

४२. व्यवसाय शिक्षण विषयातील पदविका, प्रगत पदविका कार्यक्रम आणि पदवी कार्यक्रम यासारखे माध्यमिक नंतरच्या स्तरावरील कार्यक्रम, निवडक तंत्रनिकेतने, संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठे, तसेच या हेतूने स्थापन केलेल्या खास संस्था यांमध्ये सुरू केले जातील. उच्च माध्यमिक नंतरच्या स्तरावरील व्यवसाय शिक्षण सोयी विद्यापीठांतर्गत संस्थांत निर्माण करण्यासाठी मध्यवर्ती व्यवसाय शिक्षण परिषद, राज्य व्यवसाय शिक्षण परिषद योजना विकसित करतील. विद्यापीठ स्तरावरील शिक्षणक्रमासाठी विद्यापीठे, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमध्ये व्यवसाय शिक्षण परिषद यांच्या सहकार्याने विद्यापीठ विभागात आणि संलग्न महाविद्यालयात व्यवसाय शिक्षणाचे कार्यक्रम सुरू करण्यासाठी आदर्श अभ्यासक्रम विकसित करतील.

४३. अभ्यासक्रम, विशेष प्रशिक्षण कार्यक्रम तसेच पगारी उमेदवारी सोयी याद्वारे व्यवसाय शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांत उत्पादक मध्यस्थी/स्वयंरोजगाराची कौशल्ये विकसित केली जातील.

४४. यासाठी राज्य व्यवसाय शिक्षण विभाग आणि राज्य व्यवसाय शिक्षण संस्था आवश्यक त्या योजना तयार करतील.

४५. राज्य व्यवसाय शिक्षण संचालनालये जिल्हा पातळीवर करिअर मार्गदर्शन विभाग सुरू करतील. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, मध्यवर्ती व्यवसाय शिक्षण संस्था त्यासाठी योग्य निकष तयार करतील..

४६. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

मध्यवर्ती व्यवसाय शिक्षण संस्था, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, क्षत्रीय शिक्षणशास्त्र महाविद्यालये, सी. डी. सी, तांत्रिक अध्यापक प्रशिक्षण संस्था आणि इतर संस्था मूळ/बदली शिक्षणक्रम विकसित करतील.

**क) विशेष गट आणि शाळेबाहेरील लोकसंख्या यांच्यासाठी कार्यक्रम**

कारखाने/समाज समाविष्ट असणारे :

४७. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषद योग्य प्रेरके आणि पारितोषिके यांद्वारे व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील कारखान्यांना समाविष्ट करून घेण्यासाठी योजना विकसित करील.

४८. स्त्रिया, आदिवासी, अपंग आणि दुर्बल इत्यादी विशेष गटांच्या व्यवसाय शिक्षणात व्यग्र असलेल्या स्वयंसेवी संघटना—संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषद/राज्य व्यवसाय शिक्षण परिषद/राज्य व्यवसाय शिक्षण विभाग त्यांना पाठिंबा देतील. यासाठी योग्य अशी योजना संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेकडून तयार केली जाईल.

**अनौपचारिक कार्यक्रम**

४९. सर्व तंत्रनिकेतन संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इतर व्यवसाय शिक्षण आणि तांत्रिक प्रशिक्षण संस्था, निवडक उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि खास संस्था टप्प्याटप्प्याने अनौपचारिक कार्यक्रमांतून ग्रामीण आणि असंघटित क्षेत्रातील व्यवसाय शिक्षण देण्यात स्वतः व्यग्र राहतील. यासाठी समाज तंत्रनिकेतन यासारख्या योग्य योजना संबंधित संवर्गातील संस्थांसाठी संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेकडून तयार केल्या जातील.

५०. निवडक अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच इतर व्यवसाय आणि तांत्रिक प्रशिक्षण शाळा/संस्था विशेष गटांच्या आणि नोकरीत असलेल्यांच्या लाभासाठी अंशकालीन व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम आयोजित करण्यात स्वतःस सहभागी करून घेतील. राज्य व्यवसाय शिक्षण विभाग यासाठी योजना तयार

करील आणि त्यांच्या अंमलबजावणीला उत्तेजन देईल. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेकडून निवडक संस्थांमध्ये असे कार्यक्रम हाती घेण्यासाठी योग्य योजना तयार केली जाईल.

**विशेष संस्था स्थापन करणे**

५१. स्त्रिया, आदिवासी आणि समाजाच्या इतर कमकुवत गटांसाठी हेरलेल्या गरजा भागविण्याकरिता खास व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संस्था राज्य व्यवसाय शिक्षण विभागाकडून प्रस्थापित केल्या जातील.

५२. सुसंबद्ध/उपयुक्त तंत्रज्ञानाच्या संस्था, जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रनिकेतने यांसारख्या संस्थांत समाजाच्या या गटाला योग्य रोजगार मिळण्यासाठी, आवश्यक अशा कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे, अपंगांच्या व्यावसायिक प्रशिक्षणासाठी स्थापन केली जातील. राज्य व्यवस्थापन शिक्षण विभाग या दृष्टीने आवश्यक योजना तयार करील आणि त्यांच्या मार्फत आणि/किंवा इतर संबंधीत खात्यामार्फत त्यांच्या अंमलबजावणीला उत्तेजन देईल. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषद अशा प्रकारचे पथक स्थापन करण्यासाठी मध्यवर्ती योजना तयार करील.

**ड) लक्ष्ये आणि विकासासाठी तयारी**

५३. १९९० पर्यंत १० टक्के विद्यार्थी व्यवसाय शिक्षणाकडे वळविण्यासाठी २.५ लाखांची तरतूद करावी लागेल. झालेल्या कार्यवाहीच्या दृष्टीने २.५ लाख विद्यार्थ्यांसाठीची जादा गरज खालच्या स्तरातील संस्थांच्या काठावर विस्ताराने भागविता येऊ शकेल. परंतु १९९५ पर्यंत २५ टक्के विद्यार्थी व्यवसाय शिक्षणाकडे वळविण्यासाठी, राज्य आणि केंद्रशासनाला खालच्या स्तरातील संस्था आणि सोयी यांची आवश्यक पातळी बांधण्यासाठी अगाऊ कार्यवाही करावी लागेल.

**शिक्षकांचे प्रशिक्षण**

५४. व्यवसाय शिक्षणातील शिक्षक, प्राचार्य आणि मुख्य अधिकारी यांच्या प्रशिक्षणासाठी टप्प्याटप्प्यांचा आणि समन्वयित कार्यक्रम, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, क्षेत्रीय शिक्षणशास्त्र

महाविद्यालय, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था, सी. डी. सी. राज्य शिक्षण संस्था यांसारख्या संघटनांतील खालच्या स्तरातील उपलब्ध संस्थांचा उपयोग करून हाती घेतला जाईल.

संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार संबंधित संस्थांकडून योजना आखली जाईल. त्वरित गरजा भागविण्यासाठी संबंधित संस्थांकडून धडक कार्यक्रम सुद्धा संघटित केले जातील. त्यासाठी संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेकडून योजना तयार केली जाईल.

५५. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद/मध्यवर्ती व्यवसाय शिक्षण संस्था, विविध व्यवसाय शिक्षण कार्यक्रमाच्या विविध गरजा भागविण्यासाठी तसेच प्रयत्नांची शक्य त्या प्रमाणात पुनरावृत्ती टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर क्रमिक पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य निर्माण करील आणि टप्प्याने ती योजना अंमलात आणील. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषद/राज्य व्यवसाय शिक्षण परिषद, यासाठी चार मार्गदर्शक तत्त्वे तयार करील.

५६. राज्य व्यवसाय शिक्षण विभाग. समाज साधन सामुग्रीचा उपयोग करण्यासाठी, अंशकालीन शिक्षक आणि कारखाने के. व्ही. आय. सी, के आर. के, फार्म इत्यादीतील प्रशिक्षण सुविधांच्या मार्गाने शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याकरिता योजना विकसित करील.

**नोकरी, सेवा–सुविधा–सौदार्य**

५७. व्यवसाय शिक्षण शाखेतील पदवीधरांना त्यांच्या व्यवसायानुरूप जागा देता याव्या म्हणूनच त्यांना योग्य स्थान–महत्त्व देण्यासाठी शासकीय विभागात, केंद्र आणि राज्य स्तरावर आणि सार्वजनिक क्षेत्रात निवड करण्यासाठी, भरतीचे नियम बदलण्यासाठी जरूर ती पाऊले उचलली जातील.

५८. अंमलबजावणीसाठी चालना देण्यात अंतर्भूत असलेल्या केंद्रीय व्यवसाय शिक्षण संस्था / राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था / राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद / केंद्रीय व्यवसाय संस्था आणि राज्य शैक्षणिक संशोधन

व प्रशिक्षण परिषद आणि इतर आस्थापना यांच्याशी योग्य दुवा साधून, संनियंत्रण आणि मूल्यमापन विभाग व्यवसाय शिक्षण मंडळ स्थापन करील.

५९. संयुक्त व्यवसाय शिक्षण परिषदेने घालून दिलेल्या सामान्य मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद केंद्रीय व्यवसाय शिक्षण संस्था, राज्य व्यवसाय शिक्षण संस्था ठराविक कालाने व्यवसाय शिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी योजना तयार करील.

□ □

## प्रकरण ५ वे

# उच्च शिक्षण

### सद्य:स्थिती

१. उच्च शिक्षणाची मोठी यंत्रणा आपल्याजवळ उपलब्ध आहे. परंतु या क्षेत्रातील विकास आत्यंतिक विषम आहे. विद्यापीठे व महाविद्यालये यांत पुरविण्यात आलेल्या सुविधांत विषमता आहे. विद्यापीठातील संशोधनास पैशाचा तुटवडा भासतो. मात्र विद्यापीठाबहेरील प्रयोगशाळांत मोठी गुंतवणूक केली जाते. काळाची गरज लक्षात घेऊन विद्यापीठातील अभ्यासक्रमांची पुनर्रचना झालेली नाही. त्यांची व्यवहार्यता व उपयुक्तता याबावत सतत शंका व्यक्त केली जात आहे, आणि मूल्यमापन पद्धतीतील विश्वसनीयतेला तडा गेला आहे.

२. अध्यापन व संशोधन यात, नवाचार/नवोपक्रम आणण्याचे स्वातंत्र्य व विविध विभाग यांच्या स्वायत्ततेवर भर, संस्था व अर्थसहाय्य करणारी यंत्रणा यांची संस्थेच्या कक्षेबाहेर जाऊन सहकार्य करण्याची वृत्ती, चांगली संरचना, संशोधनासाठी अधिक तारतम्याने तरतूद करण्याची गरज, अध्यापन संशोधन व मूल्यमापन यातील एकात्मता असे अनेक प्रश्न आज प्रतिबिंबित होतात. विद्यापीठीय पद्धती केंद्रस्थानी Centre Staged राहून या प्रश्नांची उकल करू शकेल याकरिता तिला समर्थ करण्याची गरज आहे.

### धोरण, कार्यक्रम आणि कार्यवाहीसाठी कार्यपद्धती

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, उच्च शिक्षणात पूर्वी कधीही नव्हती अशी गतिमानता अपेक्षित करते. उच्च शिक्षण पद्धतीत अधिक गतिमानता आणण्यासाठी, कार्यक्रम व कार्यपद्धतीबाबतच्या खालील मुख्य बाबी विशेष आवश्यक आहेत.

१) संस्थांचे पुनर्गठन व विस्तार.

२) स्वायत्त महाविद्यालये व विभाग यांचा विकास.

३) अभ्यासक्रमाची पुनर्रचना.

४) शिक्षकांचे प्रशिक्षण.

५) संशोधनास बळकटी आणणे.

६) कार्यक्षमतेत सुधारणा करणे.

७) राष्ट्रीय व राज्यपातळीवर समन्वयासाठी आकृतिबंध निर्माण करणे.

८) गतिमानता.

**पुनर्गठण व विस्तार (परिच्छेद ५.२६)**

४. १५० विद्यापीठे व ५००० महाविद्यालयांत अनेक ठिकाणी गुणवत्ता व दर्जा टिकविण्यासाठी आवश्यक असलेली किमान यंत्रणा पुरविलेली नाही. उच्च शिक्षण पद्धती मोडकळीस येऊ नये म्हणून या किमान सुविधा पुरविणे जरूर आहे.

५. साचून राहिलेल्या सर्व त्रुटी ताबडतोब दूर करणे शक्य होणार नाही. संस्थेतील या त्रुटी दूर करण्याची सुरवात सातव्या पंचवार्षिक योजनेपासून करण्याचे सुचविले आहे. आठव्या व त्यानंतरच्या योजनेत हे प्रयत्न चालू राहातील. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी असे सुचविण्यात आले आहे की–

अ) विशिष्ट अभ्यासक्रम व त्यातील प्रवेश विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान मंडळाने ठरविलेल्या नियमानुसार विद्यापीठे व महाविद्यालये यांना योग्य पैसा उपलब्ध करून द्यावा.

ब) सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांना ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार क्रमशः समृद्ध करण्यासाठी योजना करण्यात यावी.

क) विद्यापीठाच्या अंतर्गत अशा तऱ्हेच्या संस्था निर्माण करावयाच्या, की त्यांचा राष्ट्रीय प्रयोगशाळांशी आणि इतर यंत्रणांशी निकटचा संपर्क राहील. विद्यापीठांतर्गत स्थापन होणाऱ्या संस्था कशा पद्धतीने स्थापन कराव्यात, त्यांचे व्यवस्थापन कसे असावे याबाबत

मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे कार्यगट नेमण्यात येईल.

ड) विद्यापीठ अनुदान मंडळ, आर्थिक साहय, उत्तेजनार्थ अनुदान देण्यासंबंधी विद्यापीठांतर्गत स्वायत्त संस्थांच्या उभारणीबाबत योजना तयार करील.

इ) नवीन विद्यापीठ प्रणालीच्या नव्या गरजांनुसार व्यवस्थापनाच्या आकृतिबंधाचा पुर्नविचार करून विद्यापीठांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विद्यापीठ अनुदान मंडळ ठरवील. विद्यापीठ अनुदान मंडळ, तत्पर व परिणामकारक व्यवस्थापन पद्धती विकसित करील व त्यावर व्यापक चर्चा घडवून नवीन कायदे करण्याची पार्श्वभूमि तयार करील.

फ) काळजीपूर्वक नियोजन व आवश्यक भौतिक सुविधा याशिवाय नवीन संस्था स्थापन केल्या जाणार नाहीत. याबाबत परिणामकारक उपाययोजना होईल.

ग) नवीन महाविद्यालयांना मान्यता प्रदान करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविली जातील, त्यात इतर तत्त्वांबरोबरच, संगणक, दृकश्रवण साधने, ध्वनीचित्रफीत मुद्रक आदि आवश्यक शैक्षणिक साधनांचा आग्रह धरला जाईल.

ढ) संस्थेतील उपलब्ध भौतिक सुविधांनुसार संस्थेतील प्रवेश मर्यादित केला जाईल व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेत प्रवेशासाठी योग्य प्रवेश परीक्षा विकसित केल्या जातील.

६. उच्च शिक्षणाची राज्य मंडळे उच्च शिक्षणाचा कार्यक्रम विकसित करण्यासाठी समन्वित कार्यक्रम ठरवतील. त्यात सध्या अस्तित्वात असलेल्या संस्था बळकट करणे, त्यांची पुर्नबांधणी करणे याखेरीज अनुपयुक्त ठरलेल्या महाविद्यालयांची उपयुक्तता वाढविणे, अभ्यासक्रम विकेंद्रित करणे अगर त्यांचे व्यावसायिकरण करणे, इत्यादि बाबींचा समावेश असेल. ग्रामीण भागातील महाविद्यालये सक्षम करण्यासाठी खास कार्यक्रमही सुचविले जातील. राज्यस्तरीय योजना सक्षम करण्याच्या दृष्टीने आणि त्यांची कार्यवाही सुधारण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ पर्यवेक्षण करील

**स्वायत्त महाविद्यालयांचा विकास (परिच्छेद ५.२८)**

७. संलग्न महाविद्यालयांच्या पद्धतीमध्ये सक्षम महाविद्यालयास अभ्यासक्रम ठरविणे, पाठ्यक्रम ठरविणे, मूल्यमापनाची स्वतःची पद्धती तयार करणे याबाबत स्वायत्तता मिळू शकत नाही. जरी विद्यापीठ अनुदान मंडळाने या कार्यक्रमास पाठिंबा दिला असला तरीही फक्त २१ महाविद्यालयांना आतापर्यंत स्वायत्ततेचा दर्जा मिळाला आहे.

८. सातव्या पंचवार्षिक योजनेत ५०० महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा द्यावा आणि सध्याची संलग्न महाविद्यालय पद्धतीची जागा स्वायत्त महाविद्यालयांनी घ्यावी असे अपेक्षित आहे. स्वायत्त महाविद्यालये अस्तित्वात आणण्यासाठी योग्य आराखडा तयार करण्याची काळजी घेण्यात येईल.

९. स्वायत्त महाविद्यालयांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी असे सुचविण्यात येत आहे की –

अ) महाविद्यालयांना स्वायत्त होता यावे यासाठी विद्यापीठ कायद्यात आवश्यक तेथे तरतूद करण्यात येईल.

आ) स्वायत्त महाविद्यालयांना अभ्यास विषयक, प्रशासन विषयक व आर्थिक स्वातंत्र्य देण्याबाबत आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनात योग्य बदल करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात येतील. अर्थात त्यात शिक्षकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याची काळजी घेण्यात येईल.

इ) निवडक महाविद्यालयांना प्रोत्साहन आणि विशेष सहाय्य देण्यासाठी एक योजना तयार करण्यात येईल. योजनेत स्वायत्त होणाऱ्या महाविद्यालयांसाठी प्राध्यापक व प्रपाठक यांच्या जागा निर्माण करणे, विकासासाठी उच्च दराने अनुदानाची सोय करणे या बाबींचाही समावेश असेल.

ई) आदिवासी/मागास विभागातील महाविद्यालयांना ती स्वायत्त करण्याच्या विकासात्मक प्रक्रियेसाठी खास अनुदानाची सोय करावी.

य) जरूरी भासल्यास स्वायत्त महाविद्यालयांना स्वतःची पदवी प्रदान करण्याचा हक्क, त्यांना निमविद्यापीठाचा दर्जा देणे आणि अभ्यासक्रमात सुधारणा, अभ्यासक्रमांची रचना, अध्यापन व मूल्यमापन सुधारणा या प्रक्रियांना गती येण्यासाठी स्वातंत्र्य देण्याबाबत कायदेशीर तरतूद करावी.

र) ठराविक कालावधीनंतर नियमितपणे स्वायत्त महाविद्यालय पद्धतीचे पुनर्विलोकन करून आढावा घेण्यासाठी योग्य यंत्रणा उभारावी.

ल) दीर्घ कालावधीत संलग्न महाविद्यालय पद्धतीला पर्याय शोधण्यासाठी आणि विद्यापीठ व महाविद्यालये यांतील संबंधांना सविस्तर अभ्यास करण्याची योजना कार्यान्वित करावी.

१०. स्वायत्त महाविद्यालय कार्यक्रमासाठी केंद्र शासन पहिली ५ वर्षे पूर्णपणे आर्थिक सहाय्य करील. विद्यापीठ अनुदान मंडळाला यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. मात्र या महाविद्यालयांचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी सध्या जी साधने उपयोगात येतील तीच रहातील.

**अभ्यासक्रमांची रचना** (परिच्छेद ५.२९)

११. विशिष्ट क्षेत्रातील विशेषतेची (specialization) वाढती मागणी, अभ्यासक्रमाचे एकत्रीकरण करण्यासाठी आवश्यक असणारी लवचिकता, अभ्यासक्रमात, कार्यक्रमात आणि संस्थांमधून गतिमानता आणणे, अभ्यासक्रम अद्ययावत व आधुनिक बनविणे, अध्ययन प्रक्रियेशी काम व प्रात्यक्षिक कार्य यांची सांगड घालणे आणि सुधारणा घडवून आणणे, यासाठी उच्च शिक्षण कार्यक्रमाची पुनरआखणी करणे जरूर आहे. मूल्यमापनाच्या पद्धतीत सुधारणा करण्यासाठीही अभ्यास-क्रमाची पुनर्रचना आवश्यक आहे. सध्याची अपरिवर्तनीय कार्यक्रमाची चौकट अशा बदलांना वाव देत नाही.

१२. हे उद्दिष्ट साधण्यासाठी असे सुचविण्यात येते की :–

अ) उच्च शिक्षण अभ्यासक्रमाचे पुनर्मूल्यांकन व पुनर्रचना यासाठी विद्यापीठे व त्यातील विविध विद्याशाखा यांना पूर्ण वाव द्यावा

आ) विद्यापीठ अनुदान मंडळाने, अभ्यासक्रमाची आखणी करण्यासाठी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा सर्वंकष आढावा घेऊन धोरणात नमूद केल्याप्रमाणे अभ्यासक्रमाची बांधणी व आशय आणि आराखडा याबाबत नवीन संबोध स्पष्ट करावा.

इ) विद्यापीठ अनुदान मंडळाने तयार केलेली पायाभूत अभ्यासक्रमाची योजना पदवीपूर्व पातळीवर एक महत्त्वाचा घटक राहील. भारताची सांस्कृतिक विविधता व देशाचे ऐक्य व अखंडता जोपासली जाईल यावर खास भर देण्यात येईल. महिलांसाठी अभ्यासक्रम हा पायाभूत अभ्यासक्रमाचा एक घटक राहील. विविध शाखांच्या अभ्यासक्रमात स्त्रियांचे स्थान, दर्जा व विकास याबाबतचे मुद्दे प्रतिबिंबित होतील.

(ई) निरनिराळ्या अभ्यासक्रमांची पुनरबांधणी करणे, आंतरशाखीय कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करणे सुकर व्हावे यासाठी विद्यापीठातील अभ्यासमंडळांची पुनर्रचना करावी.

(य) राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेवा, खेळ आणि क्रीडा यातील सहभागाला अभ्यासविषयक बाबीत मान्यता व श्रेय ( credit ) जमेची बाब समजली जावी.

(र) अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, त्यांच्या एकत्रीकरणात लवचिकता आणणे, घटकवार आराखडा तयार करणे, गुण संपादणीची साठवण करणे याबाबत उत्साह वाढविण्यासाठी व जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय व विभागीय पातळीवर परिसंवाद घडवून आणावेत.

(ल) अभ्यासक्रमाची पुनर्रचना आणि नवोपक्रमाची वचनबद्धता यांबाबत विद्यापीठाची उत्सुकता व पुढाकार यांचेशी विकास अनुदान संबद्ध करावे.

१३. सातव्या पंचवार्षिक योजनेत विद्यापीठ अनुदान मंडळाने २४ अभ्यासक्रम विकसन केंद्रे स्थापन केली आहेत. त्यांची संख्या वाढविण्यात येईल आणि त्यांचे कार्य धोरणात दर्शविल्याप्रमाणे बदलण्यात येईल.

विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राबरोबर समन्वय साधून त्याचा उपयोग करून घेण्यात येईल. सुरवात करण्यासाठी पुढील तीन वर्षांत १५ विषयांतील नमुनेदार अभ्यासक्रमाचे साहित्य, उपलब्ध असलेल्या तज्ज्ञ शिक्षकांच्या मदतीने ध्वनी अगर ध्वनीचित्रफितींच्या माध्यमातून तयार केले जाईल. या साहित्याचा वापर स्वयं-अध्ययनासाठी, आकाशवाणी व दूरदर्शन प्रक्षेपणासाठी केला जाईल. असे साहित्य बहुविध प्रसार माध्यमे म्हणून उपलब्ध करून दिले जाईल.

१४. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी, स्वायत्त महाविद्यालये व स्वायत्त विभाग यांचा प्रामुख्याने वापर केला जाईल. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी आणि विशेषतः त्यांची उपयोजकता व परस्पर संबंध बळकट करण्यासाठी महाविद्यालयात विकास मंडळे स्थापन करण्यास उत्तेजन दिले जाईल. राज्यस्तर व उच्चशिक्षण मंडळे या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत खात्री करून घेतील व अंमलबजावणीच्या प्रगतीवर पर्यवेक्षण करतील.

**शिक्षकांचे प्रशिक्षण (परिच्छेद ५.३१)**

१५. सध्याच्या पद्धतीत शिक्षकाला योग्य आर्थिक व सामाजिक दर्जा मिळत नाही तसेच शैक्षणिक गुणवत्ता व व्यावसायिक विकास; नवोपक्रम व सृजनशील कार्य यात पुढाकार घेण्याची वृत्ती यासाठी संधी मिळत नाही, त्याचबरोबर त्याला, त्याची भूमिका व जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले संबोध तंत्रे व नीतीमूल्ये यांचे उद्बोधनही मिळत नाही. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांना प्रेरित करणे महत्त्वाचे आहे.

१६. हे साध्य करण्यासाठी असे सुचविण्यात येते की,

(अ) अध्यापन पद्धती, शिक्षणशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र इत्यादी बाबींचे उद्बोधन करण्यासाठी, सर्व अधिव्याख्याता स्तरावरील नवागत शिक्षकांसाठी खास उद्बोधन कार्यक्रम आयोजित करावेत.

(आ) सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी प्रत्येकाला किमान ५ वर्षांतून एकदा संधी मिळेल, अशा तऱ्हेने उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम आखावा.

(इ) विद्यापीठांतर्गत साधने वापरून आणि अनेक महाविद्यालये एकत्र आणून उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित करावेत.

(ई) परिसंवाद, चर्चासत्रे यांत सहभागी होण्यास शिक्षकांना उत्तेजन द्यावे.

१७. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, शिक्षकांतील स्वयं-अध्ययन प्रवृत्ती वाढीला लागावी यासाठी खास कार्यक्रम राबवील. विद्यापीठे आणि महाविद्यालये यातील शिक्षकांची वेतनश्रेणी सुचविण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशी अंमलबजावणी करण्यासाठी तपासल्या जातील. शिक्षकांची भरती करण्यासाठी समान स्वरुपाची चाचणी घेण्यात येईल व तिचा तपशील विद्यापीठ अनुदान मंडळ निश्चित करील. स्वयंमूल्यमापनातून शिक्षकाच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याची पद्धती विकसित केली जाईल. तसेच बरोबरीचा गट व विद्यार्थी यातूनही शिक्षकाच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याची पद्धती विकसित करता येईल. शिक्षकाच्या गुणवत्तेचा विकास, त्याची व्यावसायिक क्षमता व कामगिरी याचेबरोबर निगडीत केली जाईल. विद्यापीठाची व्यवस्थापकीय रचना अशा तऱ्हेने बदलण्यात येईल, की ज्यायोगे अभ्यासविषयक प्रशासनात सर्व स्तरावर शिक्षकांना अधिक सहभागी होण्याची संधी मिळेल.

**विद्यापीठातील संशोधन (परिच्छेद ५.३२ व ५.३३)**

१८. विद्यापीठ क्षेत्राबाहेर मोठ्या संख्येने संशोधन संस्थांची उभारणी झाली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, मानवशास्त्रे व सामाजिकशास्त्रे या आघाडीच्या क्षेत्रातील पहिल्या दर्जाच्या संशोधनाशी उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेशी घनिष्ठ संबंध विकसित होणे जरूर आहे. उच्च शिक्षण अर्थपूर्ण व्हावे व उच्च शिक्षणाने सर्वात अवघड प्रश्न सुटावेत यासाठी विद्यापीठांनी अग्रभागी राहिले पाहिजे. देशातील उद्योग व राष्ट्रीय संस्था यांच्या विज्ञान विषयक समस्यांची उकल त्यांनी करणे जरूर आहे.

१९. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी असे सुचविण्यात येते की,–

अ) विद्यापीठांची संरचना सक्षम करून विद्यापीठातील संशोधनासाठी अधिक पैसा उपलब्ध करून दिला जावा.

आ) विद्यापीठात सहकारी स्वरूपाची संशोधन सुविधा उपलब्ध करावी.

इ) भविष्यकालात बहुतांश संशोधन संस्थांची उभारणी विद्यापीठ क्षेत्रातच करावी आणि त्यासाठी योग्य अशी स्वायत्त व्यवस्थापन यंत्रणा उभारावी.

ई) उद्योगांना विद्यापीठ क्षेत्रातच संशोधन कार्य उभारण्यास प्रोत्साहन द्यावे.

य) संशोधन आणि शिक्षण यांची सांगड घालण्यासाठी आणि विद्यापीठ क्षेत्रात कोणते संशोधनात्मक कार्य हाती घेता येईल हे पाहण्यासाठी संशोधन संस्थांबरोबर औपचारिक संबंध प्रस्थापित करावेत.

र) योग्य संशोधन आणि विकास यातून अध्ययन पद्धती व अभ्यासक्रम यात सुधारणा करावी. अशा अभ्यासक्रमातून समस्या सोडविणे, उपक्रमशीलता व अर्थपूर्णता यांचा समावेश असावा.

ल) पदवीपूर्व व पदव्युत्तर पातळीवर प्रज्ञा शोध परीक्षा आणि शिष्यवृत्ती परीक्षा घ्याव्यात आणि अखिल भारतीय पातळीवर, संशोधन कार्यक्रमात प्रवेश घेण्यासाठी आणि अधिछात्रवृत्तीबाबत नियतकालिक आढावा घेण्यासाठी चाचणी घेण्यात यावी.

२७. सध्या अनेक संस्थांमार्फत, संशोधन प्रकल्पांना अर्थपुरवठा होतो. जरी प्रायोजित संशोधन आणि उद्दिष्टाभिमुख प्रकल्प यांना विविध मार्गाने होणारे आर्थिक साहाय्य चालूच राहिले तरीही चांगल्या तऱ्हेने समन्वय साधण्यासाठी, आढावा घेण्यासाठी आणि गुणवत्ता नियंत्रण राखण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान उभारावे असे सुचविण्यात येते. सध्या केंद्रशासन करीत असलेल्या सर्व संशोधन प्रकल्पांना हे प्रतिष्ठान आर्थिक मदत करील. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांची कार्ये त्यातून वगळावी. राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान ही स्वतंत्र संस्था असावी व तिची उभारणी कालांतराने सध्या विविध संस्था वापरत असलेल्या साधन संपत्तीतून व्हावी. अशा प्रतिष्ठानाची रचना व कार्यपद्धती ठरविण्यासाठी एका कार्यकारी गटाची स्थापना करण्यात येईल.

**कार्यक्षमतेत सुधारणा**

२१. विद्यापीठाच्या कार्यक्षमतेत सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी असे सुचविण्यात येते की–

अ) प्रत्येक विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या नोंदी, हिशोब व प्रशासन आणि व्यवस्थापन या करिताची आवश्यक सांख्यिकी माहिती ठेवण्यासाठी संगणक पुरवावा.

आ) माहितीची साठवण करण्यासाठी, देवाण घेवाण करण्यासाठी, ग्रंथालय व संगणना साधण्यासाठी, सल्लाविषयक कामासाठी आणि शिक्षणतज्ञ व संशोधक यांमधील विचार विनिमयासाठी, संगणकाचे जाळे देशभर विणण्यात यावे व सर्व विद्यापीठे संगणकाद्वारा एकमेकांना जोडण्यात यावीत.

इ) माहिती मिळविण्यासाठी व साधन साहित्य उपलब्ध करून संशोधनात पुरविण्यासाठी विभागीय ग्रंथालयांचे जाळे निर्माण करून माहिती साठविण्यासाठी, संशोधनातील चुकीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी, माहिती साठविणे यासाठी अशा ग्रंथालयांचा उपयोग आधुनिक सुविधांच्या साहृयाने व्हावा.

**(अ) समन्वयित विकासासाठी यंत्रणेची उभारणी. उच्च शिक्षणासाठी राज्यस्तरीय परिषद (परिच्छेद ५.३०)**

२२. सध्या राज्यस्तरावर उच्च शिक्षणात नियोजन करण्यासाठी व समन्वय साधण्यासाठी परिणामकारक यंत्रणा अस्तित्वात नाही. तसेच विद्यापीठ अनुदान मंडळ व राज्यस्तरीय कार्यक्रम यातही समन्वय साधणारी यंत्रणा नाही. ही पोकळी भरून काढण्यासाठी असे सुचविण्यात येते की,

(अ) उच्च शिक्षणासाठी राज्यस्तरावर स्वायत्त मंडळे स्थापन व्हावीत. (आ) अशा मंडळांची रचना आणि त्यांचे अधिकार निश्चित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने आदर्श मार्गदर्शक तत्त्वे राज्य शासनाच्या मार्गदर्शनासाठी तयार करावीत. (इ) अशा मंडळांच्या महत्वाच्या कामात खालील बाबींचा समावेश असेल.

(१) राज्यासाठी उच्च शिक्षणाचा एकत्रित कार्यक्रम तयार करणे.

(२) दर्जा टिकविण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाला मदत व सल्ला देणे.

(३) विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या विकासात्मक कार्यक्रमाची प्रारंभिक छाननी करणे.

(४) निर्वाह अनुदानाची रक्कम निश्चित करण्यासाठी राज्य शासनास मदत करणे.

(५) स्वायत्त महाविद्यालयांच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.

(६) कार्यक्रमांच्या कार्यवाहीतील प्रगतीवर आणि संस्थांच्या कामगिरीवर देखरेख करणे.

(७) नवीन संस्था स्थापन करण्याबाबत राज्य शासनाला सल्ल देणे.

(आ) राष्ट्रीय शिखर परिषद (परिच्छेद ५.३४)

२३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, सर्वसामान्य उच्च शिक्षण, तसेच शेती, वैद्यक, तांत्रिक कायदा आणि अन्य व्यावसायिक शाखांसाठी राष्ट्रीय परिषदेचे गठन करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अधिक प्रमाणातील समन्वय, धोरणातील सातत्य, सुविधांची वाटणी आणि आंतरशाखीय संशोधन यास चालना मिळेल.

२४. सध्या उच्च शिक्षण विषयक जबाबदारी अनेक संस्थांमध्ये वाटली गेली आहे. शेती, अभियांत्रिकी, वैद्यक या प्रत्येकासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. या विभागणीमुळे निर्णय घेणे व अर्थपुरवठा करणे यात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. विकासाच्या गरजेनुरुप विविध विद्या शाखा व नवीन अभ्यासक्रम विकसित करणे अडचणीचे झाले आहे.

२५. या प्रश्नावर उपाय करण्यासाठी उच्च शिक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावर शिखर परिषद स्थापन करावी असे सुचविण्यात आले आहे. ही परिषद उच्च शिक्षण विषयक धोरण, एकात्म नियोजन, पदव्युत्तर शिक्षण कार्यक्रम आणि संशोधन कार्यक्रम बळकट करू शकेल.

२६. शेती, वैद्यक, अभियांत्रिकी, दूरशिक्षण या क्षेत्रासाठी निराळी मंडळे अस्तित्वात आणली जातील. या मंडळांची रचना विद्यापीठ अनुदान मंडळाच्या धर्तीवर असेल. विद्यापीठ अनुदान मंडळाप्रमाणेच ही मंडळे उच्च शिक्षणाचे नियंत्रण करतील. या मंडळांच्या स्थापनेबाबत आवश्यक तो कायदा करण्यासाठी व त्यांना सुविधा प्राप्त करून देण्यासाठी तपशील ठरविला जाईल. शिखर परिषदेची प्रमुख कामे खालीलप्रमाणे रहातील.

अ) धोरणाबाबत शासनाला सल्ला देणे.

आ) विविध क्षेत्रातील विविध संस्थांच्या कार्यक्रमात समन्वय साधणे.

इ) शाखांतर्गत व आंतरशाखीय क्षेत्रातील सहकार्यास उत्तेजन देणे.

ई) साधनसंपत्तीचे वाटप करणे.

य) सामान्य यंत्रणा व संस्था यांची स्थापना व व्यवस्थापन करणे.

र) बाह्य शैक्षणिक संबंधाबाबतीच्या धोरणात समन्वय साधणे.

ल) अधिकृत मान्यता व मूल्यांकन यंत्रणा.

२७. उच्च शिक्षणाच्या संस्थेची सर्वोत्कृष्टता अनेक बाबींवर ठरत असते. त्यात स्वयंमूल्यांकन व स्वयंसुधारणा या बाबी महत्वाच्या आहेत. संस्थांतर्गत स्यंयमूल्यमापनास प्रोत्साहन आणि संस्था ज्या परिषदेच्या सदस्य आहेत त्या परिषदांमार्फत संस्थांना मूल्यांकन व अधिकृत मान्यता देण्यास उत्तेजन देणारी यंत्रणा उभारली, तर कामकाजातील, सहभागातील व यशस्वीतेतील गुणवत्ता यावर नियंत्रण राहून त्यात सुधारणा होईल.

२८. उच्च शिक्षणाच्या संस्थांची गुणवत्ता टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी अधिकृत मान्यता व मूल्यांकन करणे यासाठी यंत्रणा विकसित करण्यास सुचविले आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी व वाढविण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, आपल्यावरील जबाबदारीचा

एक भाग म्हणून, अधिकृत मान्यता व मूल्यांकन करणारी स्वायत्त परिषद स्थापन करण्यात पुढाकार घेईल. ही परिषद अधिकृत मान्यता व मूल्यांकन करण्यासाठी स्वतःचे निकष आणि कार्यपद्धती ठरवील. तिचे प्रमुख कार्य सहाय्यक म्हणून राहील व ती स्वतःचे निकष आणि दर्जा लादणार नाही. संस्थांच्या कामगिरीचे विश्लेषण व मूल्यांकन करून ती स्वयंसुधारणेस वाव देईल. या परिषदेला स्वतःचे कार्य करण्यास व्यावसायिक सचिवालयांची मदत मिळेल.

गतिमानता

२९. योग्य गुणवत्ता असलेल्या प्रत्येक भारतीयास त्याचे मूळ ध्यानात न घेता समान संधि देणे हा विद्यापीठांचा सर्वमान्य गुणविशेष असावा यावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भर दिला आहे. त्यादृष्टीने आंतरविभागीय गतिमानतेतून अशी संधी प्राप्त करून देण्यासाठी उपाय योजणे धोरणात अभिप्रेत आहे. हे उद्दिष्ट साधण्यासाठी राज्यशासने आणि विद्यापीठे यांनी प्रादेशिकता व मूळ ठिकाण यांचा विचार न करता केवळ गुणवत्तेवर विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. याबाबत त्यांना उत्तेजन दिले जाईल. गुणवत्तेनुसार संस्थांनी इतर राज्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. यासाठी त्यांना मदत व मार्गदर्शन करण्याची योजना आखली जाईल. विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे अखिल भारतीय स्वरूप व त्यांची एकूण संख्या विचारात घेऊन, वसतिगृहे, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने यांची बांधणी आणि शिष्यवृत्त्या यांना प्राधान्य दिले जाईल. या उद्दिष्टाप्रत जाण्यासाठी, राज्य शासनांशी सल्लामसलत करून अखिल भारतीय पातळीवर शिक्षकांची भरती करण्याचा प्रयत्न केला जाईल.

३० सर्व विद्यापीठांच्या कार्यक्रमाचा, विस्तार सेवा व निरंतर शिक्षण हा एक आवश्यक घटक राहील. विस्तार सेवेसाठी विद्यापीठातील शिक्षक व विद्यार्थी यांचा अधिक सहभाग मिळविण्यासाठी तरतूद केली जाईल. विद्यापीठातील अध्यापन व संशोधन यातील कामाचा, विस्तार–सेवा हा महत्त्वाचा घटक राहील. या कामाला वळकटी आणण्यासाठी शैक्षणिक मान्यता आणि मूल्यांकन यासाठी अभ्यासक्रमातील ती आवश्यक बाब म्हणून मानली जाईल.

प्रकरण ६ वे

# मुक्त विद्यापीठे आणि दूरशिक्षण

१. मुक्त विद्यापीठ पद्धती सर्वांना उच्च शिक्षणासाठी संधी निर्माण करून देते. ही शिक्षण पद्धती सर्वांना खुली असते. कमी खर्चाची असते. ती एक लवचिक व नावीन्यपूर्ण अशी शिक्षण–प्रणाली आहे.

२. ही उद्दिष्टे समोर ठेवून इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. सप्टेंबर १९८५ मध्ये ते प्रत्यक्ष अस्तित्वात आले. देशात दूरशिक्षण पद्धतीचा समन्वय करणे आणि त्या पद्धतीचा दर्जा ठरविणे ही जबाबदारी या विद्यापीठावर सोपविली आहे. मुक्त विद्यापीठ प्रणाली विकसित करून बळकट करण्यासाठी :

i) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक कार्यास आरंभ केला आहे. प्रथमत: हा कार्यक्रम पदवीपूर्व, शिक्षण व पदविका एवढ्यापुरता मर्यादित असेल. हे मुक्त विद्यापीठ १९८७ च्या आरंभी दूरशिक्षण आणि व्यवस्थापन याबाबतच्या पदविका स्तरावरील अभ्यासक्रमांची सोय करील. त्यानंतर ग्रामीण विकास आणि संगणक शास्त्र यांच्या पदविका स्तरावरील अभ्यासक्रमांची सोय १९८७ च्या उत्तरार्धात होईल. सृजनशील लिखाणाची पदविका ही विचाराधीन आहे. पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या पूर्वतयारीची प्रगती चालू असून १९८८ च्या प्रारंभी हे अभ्यासक्रम कार्यान्वित होतील. महिला व शिक्षक प्रशिक्षण विषयक गरजांशी संबंधित अभ्यासक्रम हे विद्यापीठ तयार करील.

ii) या अभ्यासक्रमांची रचना घटक पद्धतीनुसार होईल व त्यात गुण संपादन करण्याची सोय असेल. औपचारिक पद्धतीतून अनौपचारिक पद्धतीकडे अगर उलट गुणसंपादन प्रत्यावर्तित करण्याची सोय केली जाईल. विद्यापीठ अनुदान मंडळ व मुक्त विद्यापीठ याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे तयार करील.

iii) अध्ययनाच्या प्रत्येक पायरीवर किमान अध्ययन क्षमता ठरविण्यासाठी मापदंड ठरविले जातील. आणि उद्दिष्टांनुसार प्रगतीची पातळी ठरविण्यासाठी निकष ठरविले जातील. त्यामुळे गृहिणी, शेती व उद्योगधंदे यातील कामकरी आणि व्यावसायिक यांना शिक्षण चालू ठेवण्याची संधी प्राप्त करून दिली जाईल.

iv) मुक्त विद्यापीठाच्या विनिमय पद्धतीला बळकटी आणण्यासाठी व त्यांच्या कार्यक्रमांना प्रसार माध्यमाची मदत होण्यासाठी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाशी चर्चा करून स्वतंत्र आकाशवाणी व दूरदर्शनच्या वाहिन्या देण्याची सोय करता येईल.

v) दूरशिक्षणाचा समन्वय साधणे व त्याचा दर्जा राखणे ह्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ नियम तयार करील. तसेच जी राज्यें स्वतःची मुक्त विद्यापीठे स्थापन करू इच्छित असतील अगर त्या राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने दिलेल्या सुविधांचा उपयोग करू इच्छित असतील तर त्या राज्यांना राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ मार्गदर्शन व कार्यवाहीसाठी मदत करील.

vi) मुक्त विद्यापीठे पद्धतीत विविध अभ्यासक्रमांचे जाळे विकसित करण्यात येईल. याचाच अर्थ एका मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतलेला विद्यार्थी, दुसऱ्या मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रमही पुरा करू शकेल. म्हणून अशी पद्धती अभ्यासक्रमांची व्यापक विविधता देऊ शकेल.

vii) मुक्त विद्यापीठांचा कार्यक्रम व कार्यवाहीची पद्धती गुणवत्तापूर्ण असणे जरूर आहे. या क्षेत्रात पुरेसे तज्ज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ मर्यादित असल्याने मुक्त विद्यापीठांनी, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या निकट सहकार्याने काम करणे आवश्यक आहे.

viii) मुक्त विद्यापीठांची स्थापना करताना राज्य शासनाने काळजीपूर्वक नियोजन करणे जरूर आहे आणि त्याचबरोबर विद्यापीठाला आवश्यक साधनसामग्री व सुविधा पुरविणे आवश्यक आहे. विकासासाठी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ राज्याच्या मुक्त विद्यापीठांना व पत्रद्वारा अभ्यासक्रम चालविणाऱ्या विभागांना आर्थिक सहाय्य देईल.

प्रकरण ८ वे

# तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षण

**सद्य:स्थिती**

१. मनुष्यबळ विकास कार्यक्रमामध्ये निर्मिती व सेवांचे मूल्य वाढविण्याची, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत भर टाकण्याची आणि सर्वसामान्य जनतेच्या रहाणीमानाचा दर्जा उंचावण्याची भरीव क्षमता असून तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षण हे त्या कार्यक्रमाच्या प्रमुख घटकांपैकी एक आहे. ह्या बाबीचे महत्त्व जाणून सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाच्या विकासावर खूपच भर देण्यात आला आहे. त्यामुळे तांत्रिक शिक्षणाचा पदवी आणि पदविका ह्या दोन्ही स्तरांवर झालेला विस्तार, कार्यक्रम क्षेत्राचे विस्तृतीकरण आणि वार्षिक प्रवेश क्षमतेत झालेली वाढ जगात अन्यत्र यापूर्वी झालेली नाही. वर्ष १९४७–४८ मध्ये पदवी स्तरावरील तांत्रिक संस्थांची संख्या ३८ आणि पदविका स्तरावरील संस्थांची संख्या ५३ होती व त्यांची वार्षिक प्रवेश क्षमता अनुक्रमे २९४० आणि ३९६० विद्यार्थी इतकी होती. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विषयक पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सोय उपलब्धच नव्हती. आज अभियांत्रिकी महाविद्यालये आणि पदवी स्तरावरील तांत्रिक संस्थांची संख्या १५० पर्यंत वाढली आहे आणि तंत्रनिकेतनांची संख्या ४५० झाली असून त्यांची वार्षिक प्रवेश क्षमता अनुक्रमे ३०,००० व ७०,००० विद्यार्थ्यांची आहे. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विषयक पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सोय ८० हून अधिक संस्थांमध्ये असून त्यांची वार्षिक प्रवेश क्षमता ६००० विद्यार्थ्यांची आहे.

तथापि तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाच्या क्षेत्रात अशी भरीव वाढ झाली असली तरी हे क्षेत्र अधिक व्यापक करणे आणि विविध स्तरातील लोकांना ते उपलब्ध करून देऊन त्याद्वारे उत्पादकतेत वाढ करण्याच्या दृष्टीने बराच मोठा पल्ला अजून गाठावयाचा आहे.

सुनियोजित कार्यक्रम आखणे जरूर आहे. ग्रामीण संस्था म्हणजे नुसती पारंपारिक संस्था नाही, की जी प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता ठरविणे, अभ्यासक्रम निश्चित करणे व परीक्षा घेऊन पदविका अगर पदव्या वाटणे एवढीच कामे करते. याउलट संस्थेची रचना अशी हवी की जी शिक्षणाची सर्व अंगे एकसंध करू शकेल. उत्पादक व रचनात्मक कार्यक्रमांचे प्रशिक्षण देऊ शकेल आणि विज्ञान, तंत्रज्ञान, मानवशास्त्रे व समाजशास्त्रे या सर्व समांतर स्वरूपाच्या शाखांचे शिक्षण प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत देऊ शकेल.

**कार्ययोजना**

४. वरील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अनेक उपाय योजनांचा पाठपुरावा केला जाईल. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत–

अ) सध्या अस्तित्वात असलेली ग्रामीण विद्यापीठे सक्षम बनवणे, दुसऱ्या योजनेत ग्रामीण उच्च शिक्षणासाठी चालू केलेल्या ग्रामीण संस्थांची पुनर्रचना करणे.

आ) ग्रामीण भागातील अस्तित्वात असलेल्या अन्य शिक्षण संस्था व स्वयंसेवी संस्था यांना गांधीवादी शैक्षणिक तत्त्वज्ञान, ग्रामीण पुनर्रचनेसाठी विकसित करण्यास प्रोत्साहन देणे.

इ) ग्रामीण भागातील निवडक संस्थांचा स्वायत्त महाविद्यालयाच्या स्वरूपात विकास करणे आणि ग्रामीण उन्नतीसाठी शैक्षणिक कार्यक्रमांना बळकटी आणण्यासाठी त्याचा उपयोग करणे.

ई) नवी तालीम या मूलभूत संबोधावर आधारलेल्या प्राथमिक माध्यमिक व पदव्युत्तर संस्थांना मान्यता व पाठिंबा देणे.

उ) या सर्व संस्थांचा आशय, विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर भर देऊन मजबूत करणे.

ऊ) प्रादेशिक पातळीवर ग्रामीण उद्योगधंदे विचारात घेऊन बहुविध अभ्यासक्रमांची आखणी करणे.

य) म. गांधी प्रणीत मूलोद्योग शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांना बळकटी आणणे.

र) क्षेत्रकार्यावर आधारित अशा ग्रामीण संस्थांतील अभ्यासक्रमांना मान्यता व प्रोत्साहन देऊन सेवाभरतीसाठी लागणाऱ्या शैक्षणिक अर्हतेचा पुनर्विचार करणे.

**ग्रामीण संस्थांची मध्यवर्ती परिषद**

५. वरील कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासन पुढाकार घेईल. अशा कार्यक्रमांसाठी लागणाऱ्या तांत्रिक सल्ल्याबाबत कार्यक्रमाची रचना ठरविण्यासाठी साह्य दिले जाईल. शिवाय अशा कार्यक्रमाचे संबोध, पद्धती, अध्ययन–अध्यापनासाठी लागणारे साहित्य, मूल्यमापनाची पद्धत याबाबतही सहाय्य करील. यासाठी केंद्र शासन ग्रामीण संस्थांची मध्यवर्ती परिषद स्थापन करील. वर नमूद केलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी ही परिषद जबाबदार राहील. पुढील विकासासाठी योग्य संस्था निवडणे व मूलोद्योग शिक्षणाबाबत त्यांना मदत करणे यासाठी परिषदेत एक स्थायी समिती निर्माण केली जाईल. मानवी साधन संपत्ती व विकास या विभागाचे मंत्रालय, ग्रामीण संस्थांचा आणि म. गांधी प्रणीत मूलोद्योग शिक्षण यांचा विकास करण्यासाठी आणि सविस्तर कार्यक्रम ठरविण्यासाठी एका कार्यगटाची नियुक्ती करील.

□ □

प्रकरण ७ वे

# ग्रामीण विद्यापीठे व संस्था

**सद्यःस्थिती**

१. स्वातंत्र्याची चळवळ ऐन भरात आल्यानंतर ग्रामीण उच्च शिक्षणाला खूपच उठाव मिळाला. इतर अनेक विचारवंतांबरोबरच गुरुदेव रविंद्रनाथ टागोर आणि महात्मा गांधी यांनी ग्रामीण जनतेसाठी सर्वंकष स्वरूपाच्या संस्था स्थापन करण्याकडे विशेष लक्ष दिले. लहान बालकांच्या स्तरावर सुरूवात करून उच्चतम शिक्षणाकडे त्यांनी वाटचाल केली. अनेक अडचणींना तोंड देऊनही गांधी प्रणीत मूलोद्योग शिक्षण देशात टिकून आहे आणि आपल्या शिक्षण पद्धतीत तो आवश्यक असा घटक आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत संस्थांची स्थापना झाली. परंतु गेली अनेक वर्षे ग्रामीण भागासाठी असलेले गांधीप्रणीत मूलोद्योग शिक्षण, ग्रामीण संस्था व इतर संस्था यांना पुरेसा पाठिंबा व प्रोत्साहन मिळाले नाही.

**धोरण आणि कार्यवाहीच्या पद्धती**

२. ग्रामीण जनतेच्या गरजांनुसार शिक्षण पद्धती विकसित करणे आणि म. गांधी प्रणीत मूलोद्योग शिक्षणाला पाठिंबा देणे ही बाब नवीन धोरणाच्या कार्यक्रमात अंतर्भूत आहे. ज्या शिक्षण संस्था अगर स्वयंसेवी संघटना, समाजोपयोगी उत्पादक कार्य व समाजसेवा यांच्याशी निगडीत असे शैक्षणिक कार्यक्रम हाती घेतील त्यांना प्रोत्साहन द्यावे असे धोरणात नमूद केले आहे.

३. ग्रामीण शिक्षणाबाबतीतल्या धोरणातील आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी संयुक्त स्वरूपाच्या संस्था अगर संघटना — यांनी प्राथमिक, माध्यमिक किंवा पदविका आणि पदवी स्तरापर्यंत जे शैक्षणिक कार्यक्रम हाती घेतले असतील त्यांना प्रोत्साहन देणारा

या व्यतिरिक्त या शैक्षणिक पद्धतीचा कार्यभाग अधिक सुसंगत आणि अर्थपूर्ण होण्यासाठी आगामी शतकात सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होणाऱ्या बदलांची पार्श्वभूमी विचारात घेणे आवश्यक आहे. या पद्धतीची सध्याची स्थिती आणि तिच्यापुढील प्रमुख आव्हाने यांचे थोडक्यात विवेचन खालीलप्रमाणे:

## १. पद्धतीचे व्यवस्थापन

### रचनात्मक बाबी

२. तांत्रिक शिक्षणाची सुसूत्रपणे वाढ होण्यासाठी आणि त्याचा विहीत दर्जा टिकवून ठेवण्याची जबाबदारी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च संस्थेवर आणि तिच्या विभागीय समित्या, अभ्यास मंडळे यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. याबाबत आतापर्यंत मंडळाने भरीव कार्य केले असले तरी गेल्या काही काळापासून सदर परिषद आपली ही जबाबदारी पूर्वीइतक्या प्रभावीपणे पार पाडू शकत नाही. यास अनेक बाबी कारणीभूत असून त्यांत तांत्रिक शिक्षणाची अनिर्बंध वाढ, आणि तीही कांही वेळा एकूण अर्थव्यवस्थेशी सुसंगत नसणारी, याचा अंतर्भाव आहे.

### मनुष्यबळाचे नियोजन

३. तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाचे नियोजन आतापर्यंत मनुष्यबळाच्या गरजेच्या मर्यादित असलेल्या माहितीवर आधारलेले होते. तथापि नुकतेच १९८३-८४ मध्ये एक राष्ट्रीय तांत्रिक मनुष्यबळ पद्धतीची स्थापना करण्यात आली. या पद्धतीचे प्रमुख केंद्र इन्स्टिटयूट ऑफ मॅनपॉवर रीसर्च येथे असून त्यासाठी २१ नोडल केंद्रे निरनिराळया राज्यातील विविध तंत्रज्ञविषयक आणि इतर संबंधीत संस्थेमधून आहेत. मंत्रालयात एक मनुष्यबळ विकास विभाग ठेवण्यात आला आहे. अर्थातच ही पद्धत पूर्णपणे आणि परिणामकारकरीत्या कार्यान्वीत व्हावयाची असून या कामात वेग आणणे जरूरीचे आहे.

## २. दिशा आणि भर

४. गेल्या लागोपाठच्या ३ पंचवार्षिक योजनांमध्ये तांत्रिक शिक्षण पद्धतीद्वारा अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन यांचे मजबूतीकरण करून दर्जा व पातळी वाढविणे यावर प्रामुख्याने भर देण्यात आला होता.

सहाव्या पंचवार्षिक योजनेत संगणकांचा उपयोग, नवीन तंत्रज्ञानचा उदय, शास्त्र व तंत्रज्ञानाचा ग्रामीण विकासासाठी उपयोग आणि निरंतर शिक्षण या नव्या क्षेत्रावर भर देण्यात येत आहे.

### कार्यक्रम आणि त्याचा विकास

५. तंत्रज्ञानाने लोकांच्या शिक्षणाच्या बाबतीत सातत्याने प्रगती झाली असून राष्ट्रीय विकासासाठी लागणाऱ्या विविध विभागातील मध्यम पातळीवरच्या तांत्रिक मनुष्यबळाची गरज त्याने भागविली जाते. गेल्या पाठोपाठच्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये तंत्रज्ञ लोकांच्या शिक्षणाकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. ही कमतरता भरून काढण्यासाठी आणि तंत्रज्ञ तयार करणारे शिक्षण योग्य पातळीवर आणण्यासाठी त्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे

### पदवीपूर्व शिक्षण

६. देशामध्ये ५ भारतीय तंत्रविज्ञान संस्था (आय. आय. टी) आणि बेंगलोर येथील भारतीय शास्त्र संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स) असून त्या व्यतिरिक्त आपल्याकडे १३५ इतर अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रज्ञान विषयक संस्था, राज्य शासनाची अभियांत्रिकी महाविद्यालये, राज्य शासनाने अनुदान दिलेली अभियांत्रिकी महाविद्यालये, विद्यापीठांचे संबंधीत विभाग आणि आभियांत्रिकी तंत्रज्ञान विषयक संस्था आहेत भारतीय तंत्रविज्ञाम संस्था (आय. आय. टी.), विभागीय अभियांत्रिकी महाविद्यालये आणि अन्य अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच काही तंत्रज्ञान विषयक संस्थांच्या दर्जावर भर देण्यात आल्यामुळे या पदवी स्तरावरील संस्थांच्या शिक्षणाचा दर्जा खूपच चांगला आणि जागतिक दर्जाच्या तोडीचा राहिला आहे. त्याशिवाय झपाट्याने बदलणाऱ्या आणि विकास होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या गरजांना अनुरूप पदवीपूर्व अभ्यासक्रमाची योजना तयार करण्यात आली आहे.

**पदव्युत्तर शिक्षण**

७. देशातील सर्व भारतीय तंत्रविज्ञान संस्था, भारतीय शास्त्र संस्था, इतर विद्यापीठांची विद्यालये व काही विकसित अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधनाचे कार्यक्रम घेण्यात येतात. या संस्थांचे कार्य सर्वसाधारणपणे समाधानकारक आहे. तथापि त्यांचे शैक्षणिक महत्त्व आणि संशोधनात्मक प्रयत्न पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच त्यांचे कार्याला भक्कमपणा येण्यासाठी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान-विषयक पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या संस्थांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**व्यवस्थापकीय शिक्षण**

८. देशातील चार भारतीय व्यवस्थापन संस्था (इंडियन इन्स्टिट्यूटस् ऑफ मॅनेजमेंट) आणि अन्य काही मान्यवर संस्था तसेच विद्यापीठांचे व्यवस्थापन विभाग हे उच्च प्रतीचे व्यवस्थापकीय शिक्षण देत आहेत आणि त्यातून उच्च प्रतीचे व्यवस्थापकीय मनुष्यबळ निर्माण होत आहे. या संस्थेतून बाहेर पडलेल्या उमेदवारांना महामंडळ इ. संघटित क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. तथापि असंघटित आणि ग्रामीण स्तरची यथायोग्य व्यवस्थापकीय शिक्षण असलेल्या माणसांची गरज मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिली आहे आणि तिच्याकडे लक्ष देण्यासाठी योग्य पावले उचलण्याची गरज आहे. सध्याच्या भारतीय व्यवस्थापन संस्था आणि इतर व्यवस्थापकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या व्यवस्थापकीय शिक्षण घेतलेल्या मनुष्यबळाच्या गरजेच्या तुलनेत पुरेशी नाही.

**इतर मध्यवर्ती संस्थांमधील विशेष कार्यक्रम**

९. वर उल्लेख केलेल्या संस्था व्यतिरिक्त राष्ट्रीय पातळीवरील काही संस्था आहेत. उदा. मुंबई येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनियरिंग, रांची येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फौन्ड्री ॲन्ड फोर्जिंग टेक्नॉलॉजी, दिल्ली येथील स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर आणि धनबाद येथील इंडियन स्कूल ऑफ माईन्स् या संस्था त्या त्या विशिष्ट क्षेत्रातील तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण, सल्लामसलत्

व संशोधन याची गरज पुरविण्याची जबाबदारी पार पाडीत आहेत. या संस्थेमधील आधारभूत सुविधा फार पूर्वी निर्माण करण्यात आल्या असून त्यांचे अपेक्षित कार्य पार पाडण्याच्या दृष्टीने त्या आज अपुऱ्या पडत आहेत. या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**तांत्रिक शिक्षकांचे शिक्षण आणि प्रशिक्षण**

१०. तंत्रनिकेतनांमधील शिक्षकांना सेवा अंतर्गत वेगवेगळ्या प्रकारचे अल्प मुदतीचे आणि दीर्घ मुदतीचे अभ्यासक्रम देशातील चार तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण केंद्रामधून दिले जाते. त्या व्यतिरिक्त या संस्थांमधून अभ्यासक्रमाचा विकास, विस्तार सेवा, सल्ला देणे, संशोधन करणे आणि शिक्षणाचे व्यवस्थापन ही कार्ये करण्यात येतात. तांत्रिक शिक्षणाच्या दृष्टीने या संस्था उपयुक्त ठरल्या असून त्यांचा विस्तार करण्यासाठी आणि त्यांची बदलती भूमिका पार पाडण्यासाठी त्यांच्या आधारभूत सुविधांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.

**निरंतर शिक्षण आणि दूर शिक्षण**

११. नोकरीत असलेले कुशल कारागीर, तंत्रज्ञ आणि अभियंते यांचेसाठी रात्रीचे/संध्याकाळचे अभ्यासक्रम काही अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रनिकेतने यांच्यामध्ये उपलब्ध करून देऊन निरंतर शिक्षणाची सुविधा पुरविण्यात आलेली आहे. तथापि अशा शिक्षणाची गरज त्याचप्रमाणे नोकरीतील व्यक्तींची, संघटित तसेच असंघटित ग्रामीण क्षेत्रातून काम करणाऱ्या लोकांची मागणी याचा विचार करता निरंतर शिक्षणाची ही सुविधा खूपच अपुरी आहे.

**नवीन तंत्रज्ञान**

१२. नवीन तंत्रज्ञान, सामान्यपणे देशाच्या विकासासाठी आणि मुख्यत्वे करून तंत्रज्ञानाच्या विकासासाठी फारच महत्त्वाचे असते. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात धोरणात्मक तंत्रज्ञानाची १४ क्षेत्रे, उदा. १) मायक्रो प्रोसेसर, २) अभियांत्रिकी, ३) लेसर टेक्नॉलॉजी, ४) जल व्यवस्थापन इ. निश्चित करण्यात आली आणि त्यांचा विकास करण्यासाठी काही निवडक संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली. तथापि अद्यापही तंत्रज्ञानाच्या बऱ्याच नवीन क्षेत्रात भारताला पुरेशी सुरुवात करायची आहे.

**संगणकीकरण**

१३. संगणक हे सर्व व्यवसायांचा आणि सामान्य जीवनाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे साधन बनले आहे. या क्षेत्रात विविध स्तरावर शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी बऱ्याच मोठ्या प्रणालीची आवश्यकता आहे. हे लक्षात घेऊन बऱ्याच शिक्षण संस्थांना संगणकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तथापि सर्व संस्थांना ही सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**उद्योजकतेचा विकास**

१४. विद्यार्थ्यांनी पुढे स्वयंरोजगार घ्यावा म्हणून त्यांच्यात तो कल निर्माण होण्यासाठी आणि त्यादृष्टीने त्यांना योग्य ते कसब प्राप्त करून देण्यासाठी त्यांना योग्य तसे शिक्षण देणे ह्या बाबीला आता वाढते महत्त्व प्राप्त होत आहे. तथापि या दिशेने भरीव प्रगती अद्याप व्हावयाची आहे.

**महिलांचे शिक्षण**

१५. सर्व राज्यांमध्ये महिलांसाठी खास तंत्र-निकेतने उभारण्यात आली आहेत. तथापि महिलांच्या शिक्षणाकडे पुरेसे लक्ष देण्यासाठी अशी अधिक तंत्रनिकेतने स्थापावी लागतील. त्याशिवाय या तांत्रिक शिक्षणाच्या सुविधांचा त्यांना उपयोग होण्यासाठी महिला वसतीगृहाच्या सुविधांमध्ये वाढ करावी लागेल.

## ३. परस्पर-संबंध जाळे

१६. तांत्रिक निकेतनाची स्थापना सन १९७८–७९ मध्ये ग्रामीण विकास शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आली. या योजनेखाली तंत्रज्ञान ग्रामीण भागामध्ये पोहोचविण्यासाठी आणि तंत्रनिकेतनाचा परस्पराशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी काही निवडक तांत्रिक निकेतने निवडण्यात आली. आतापर्यंत या योजनेखाली १०७ तंत्रनिकेतने घेण्यात आली आहेत. या दिशेने ठोस प्रगती होण्यासाठी अधिकाधिक तंत्र-निकेतने या योजनेखाली घ्यायला सुरूवात झाली असून या क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संघटनांमध्ये एकसूत्रीपणा

आणून ही तंत्रनिकेतने प्रगतीचे साधन होण्यासाठी त्यांना आवश्यक तो धोरणात्मक पाठिंबा देणे आवश्यक आहे.

**जाळे**

१७. भारतीय तंत्रविज्ञान संस्था (आय. आय. टी.) आणि राज्यांमधील विभागीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांच्यात परस्पर संबंधाची योजना आधीच कार्यान्वीत झालेली आहे. याचा पुरेसा प्रभाव पडण्याच्या दृष्टीने अन्य संस्थाही या परस्पर संबंधाच्या योजनेत आणणे आवश्यक आहे. निरनिराळ्या स्तरावरील सर्व तांत्रिक संस्थांमध्ये परस्पर संबंध विकसित करायला हवेत. तसेच तांत्रिक संस्था आणि इतर शैक्षणिक संस्था यामध्ये त्याचप्रमाणे शिक्षक संस्था आणि संशोधन व विकास संस्था यांमध्ये परस्पर संबंध विकसित होणे आवश्यक आहे.

## ४. आधारभूत सुविधांचा विकास

१८. बहुसंख्य तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्था २ ते ३ दशकांपूर्वी स्थापन झालेल्या आहेत. त्यांना पुरविण्यात आलेली उपकरणे व यंत्रसामुग्री आणि इतर सुविधा यांचे आयुष्य संपत आलेले आहे. या सुविधा एकतर कालबाह्य झालेल्या आहेत अथवा निरुपयोगी झालेल्या आहेत. त्यांची शिक्षण देण्याची क्षमताही अत्यंत मर्यादित राहिलेली आहे. सध्याची झपाट्याने होणारी शास्त्रीय तंत्रज्ञानांतील प्रगती विचारात घेता या प्रयोगशाळांचे आणि कार्यशाळांचे आधुनिकीकरण करण्याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

**ग्रंथालय व अन्य शैक्षणिक सुविधा**

१९. बऱ्याचशा संस्थांमध्ये ग्रंथालयाची सोय व संबंधीत कर्मचारी वर्ग पुरेसा नाही. तसेच ग्रंथालयाचा विद्यार्थ्यांकडून होणारा उपयोग समाधानकारक नाही. संस्थेमधील ही सुविधा सक्षम करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या अद्यावत् सुधारणांमध्ये शिक्षण अधिक समृद्ध करण्याची खूपच क्षमता आहे. त्यामुळे अशा संस्थांचे कार्य शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचे दृष्टीने महत्त्वाचे आहे आणि त्यामुळेच अशी शैक्षणिक केंद्रे अधिक संख्येने स्थापन करण्याकडे योग्य ते लक्ष देणे आवश्यक आहे.

**इमारतींची सुविधा**

२०. गेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये पुरेशी तरतूद न झाल्यामुळे इमारती बांधकाम आणि अनुषंगिक सुविधा यांचा मोठा अनुशेष साचलेला आहे. वसतीगृहे अत्यंत अपुरी आहेत. ही परिस्थिती सुधारण्याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

**कर्मचारी विकास**

२१. शिक्षकांसाठी असलेली एम्. टेक्. ही शैक्षणिक अर्हता शिथील करून आवश्यक तेथे बी. टेक्. ही पदवी धारण केलेल्या उमेदवारांना नेमण्याची परवानगी देऊनसुद्धा शिक्षकांच्या सरासरी ३० टक्के जागा रिकाम्या आहेत. चांगले बुद्धिमंत लोक शिक्षकी पेशाकडे आकर्षित न होण्याची प्रमुख कारणे म्हणजे तुलनेने कमी वेतन श्रेणी, बढतीची शक्यता कमी आणि अनाकर्षक सेवाशर्ती ही आहेत. शिक्षकांच्या ह्या कमतरतेमुळे तांत्रिक शिक्षणाच्या प्रतीवर आणि दर्जावर प्रतिकूल परिणाम होत आहे. ह्या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालून वेतनश्रेणी, सेवाशर्ती व अन्य तद्नुषंगीक गोष्टी यांबाबत योग्य त्या शिफारसी करण्यासाठी एका राष्ट्रीय पातळी-वर तज्ञांची समिती नुकतीच नियुक्त करण्यात आली आहे.

## ६. नवे पायंडे, संशोधन आणि विकास

२२. बऱ्याच तांत्रिक तसेच व्यवस्थापकीय संस्थांमधून, विद्यापीठां-मधून आणि अन्य संशोधन संस्थांमधून संशोधन व विकासाचे कार्यक्रम सुरू आहेत. मात्र उपलब्ध ज्ञान, उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्या-साठी कारणी लावण्याऐवजी ह्या कार्यक्रमांचा मुख्य भर नवीन ज्ञान विकसित करण्यासाठी शोध घेण्यावर आहे. उद्योगधंद्यांच्या बदलत्या गरजांना अनुरूप असे संशोधन कार्यक्रम पुरेशा प्रमाणात हाती घेण्यात येत नाहीत.

२३. वर नमूद केलेला असमतोल दूर करण्यासाठी संस्थांमधील संशोधन व विकास कार्यक्रमाच्या सुविधा आणि आर्थिक तरतूद यात वाढ करावी लागेल. जेणेकरून भारतातील परिस्थितीशी अनुरूप आणि सातत्याने पुढे जाणारी स्वयं नवीकरण क्षमता असलेली अशी ही पद्धत होणे शक्य होईल.

**कार्यक्रम**

२४. तांत्रिक आणि व्यवस्थापकोय शिक्षणाशी संबंधीत सदरच्या धोरण निवेदनाची परस्पर संबंधीत ध्येये, अग्रक्रम आणि कार्यक्रम यांना अनुसरून सहा प्रमुख कार्यकारी गटात विभागणी केली आहे. सदर सहा गट म्हणजे व्याप्ती व व्यवस्थापन, कार्यक्रम व सुधारणा, परस्पर अभिक्रिया व जाळे (इन्टरअॅक्शन व नेटवर्क) आधारभूत सुविधांचा विकास, कर्मचारी विकास, नवे पायंडे, संशोधन आणि विकास असे आहेत. धोरण निवेदनातून पुढे येणाऱ्या ह्या प्रमुख गटाशी संबंधीत असलेले कार्यक्रम पुढे दिले आहेत.

## अ) प्रणालीचे व्यवस्थापन व व्याप्ती

### अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद व तिच्या मंडळांचे मजबूतीकरण

### अभ्यास मंडळांचे मजबूतीकरण

२५. अर्थव्यवस्था, उद्योगधंदे आणि सामाजिक परिस्थिती यातील संभाव्य बदलामुळे निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन त्या भागविण्याच्या दृष्टीने अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेची अभ्यास मंडळे योग्य रीतीने मजबूत करण्यात येतील. ह्यासाठी निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करण्यात येईल. उदा. उद्योगखाते, रेल्वेखाते इत्यादी संबंधीत खात्याचे त्याचप्रमाणे धंदेवाईक मंडळे आणि ह्या प्रणालीचे वापरदार यांना ह्या अभ्यास मंडळात पुरेसे प्रतिनिधित्व देणे, संबंधीत आकडेवारी सतत मिळवीत रहाणे, माहिती पुरविणाऱ्या प्रणालींशी चांगला संपर्क ठेवणे आणि कार्यक्रम ठरविण्यासाठी व विकासासाठी मार्गदर्शन करण्याकरिता अभ्यास मंडळांच्या वारंवार बैठका घेणे इ.

**नवीन मंडळांची स्थापना**

२६. उदयास येणाऱ्या नवीन तंत्र शाखांसाठी, तसेच निरंतर शिक्षण, दूरशिक्षण, शिक्षणशास्त्र आणि शिक्षक प्रशिक्षण यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेची नवीन अभ्यास मंडळे स्थापन करण्यात येतील.

### समन्वय समितीची पुनर्रचना

२७. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेच्या समन्वय समितीची पुनर्रचना करण्यात येऊन ती अधिक मजबूत करण्यात येईल जेणेकरून निरनिराळ्या अभ्यास मंडळांमध्ये परिणामकारक समन्वय साधला जाऊन तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षण प्रणाली अधिक एकसंघ होईल.

### शिल्प कारागीर प्रशिक्षणाचे एकसंघीकरण

२८. तांत्रिक, व्यावसायिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाचा सर्व स्तरांवर समतोल व एकमेकांना पूरक असा विकास होण्यासाठी व्यवसाय शिक्षण आणि कुशल कारागीर प्रशिक्षण एकसंघ करण्यात येईल.

### अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेला कायदेशीर अधिकार

२९. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेवर ह्या राष्ट्रीय धोरणाने सोपविलेली कामगिरी तिला प्रभावीपणे पार पाडता येणे शक्य व्हावे म्हणून ह्या परिषदेला काही कायदेशीर अधिकार देणारा कायदा, योग्य त्या सल्ला मसलतीनंतर केंद्र सरकार रूजू करणार आहे.

### उत्कृष्टतेची अभिवृद्धी आणि वृद्धी

३०. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेद्वारा एक अभिवृद्धी मंडळ स्थापन करण्यात येईल. हे मंडळ निरनिराळे कार्यक्रम व संस्थांची अभिवृद्धी घेऊन परिषदेला योग्य शिफारशी करील. हे मंडळ केंद्र व राज्य स्तरावर असलेल्या निरनिराळ्या धंदेवाईक मंडळांशी सक्रीय सहभाग घेऊन मार्गदर्शक तत्त्वे व प्रमाणके विहीत करील. ह्या विहीत केलेल्या प्रमाणकांचे आधारे विविध स्तरावरील तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणासाठी ह्या मंडळांकडून राज्य स्तरावर काही अभिवृद्धी गट स्थापन करण्यात येतील.

## प्रशासकीय मंडळांचे मजबूतीकरण

### तांत्रिक शिक्षण मंडळ आणि त्यांची विभागीय कार्यालये

३१. तांत्रिक शिक्षण मंडळावर अधिक संख्येने आणि त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती घेण्यात येतील. याचप्रकारे मंडळाच्या विभागीय कार्यालयांचेही मजबूतीकरण करण्यात येईल.

**रा  स्तरीय मंडळे आणि तंत्रशिक्षण संचालनालये**

३२. नवीन धोरणावर आधारलेले आराखडे आणि विकास कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी राज्य स्तरीय मंडळे आणि तंत्र शिक्षण संचालनालये मजबूत करण्यात येतील. प्रत्येक संचालनालयात धोरणाच्या अंमलबजावणीबाबत एक विभाग असेल. ह्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात येतील.

**संगणकीय माहिती पद्धत**

३३. केन्द्र सरकारचा तंत्र शिक्षण विभाग आणि राज्य सरकारांची तंत्रशिक्षण संचालनालये एकमेकांशी संगणकांच्या सहाय्याने जोडली जातील आणि त्याद्वारा तांत्रिक मनुष्यबळावरील माहितीची पद्धतशीर देवाणघेवाण करण्यात येईल. ह्या तांत्रिक मनुष्यबळ माहिती पद्धतीचे प्रमुख मध्यवर्ती केंद्र उपयोजित मनुष्यबळ संशोधन संस्था (आय. ए. एम. आर.) येथे असेल व जोड केंद्रे राज्य स्तरावर असतील. ह्या व्यवस्थेमुळे धोरण आखणे, त्यांचे नियोजन करणे, निर्णय घेणे व होत असलेल्या बदलांचे व्यवस्थापन करण्यात खूप मदत होईल.

**राष्ट्रीय मनुष्यबळ माहिती पद्धत**

३४. प्रत्येक राज्यातील मनुष्यबळ नियोजन मंडळे, तांत्रिक मनुष्यबळ माहिती पद्धत व तिची विभागीय जोड केन्द्रे हे एकत्रितपणे पहाणी करतील व ह्या पहाणीद्वारे असंघटित ग्रामीण भाग, सेवा विभाग यांना आवश्यक असलेले तंत्रज्ञान व मनुष्यबळाच्या गरजांची पहाणी करण्यात येईल.

३५. प्रत्येक राज्यातील प्रदेशांचे नीट भाग पाडून त्या त्या राज्यातील तंत्रशिक्षण खाती त्या प्रत्येक भागाकरिता तांत्रिक संस्था निवडतील. त्या संस्था नियमित कालांतराने खालील गोष्टी करतील.

वर निर्देश केल्याप्रमाणे त्या त्या प्रदेशाच्या गरजा निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण घेणे.

त्या त्या विभागातील उद्योगधंदे आणि तांत्रिक/व्यवस्थापकीय संस्था यांच्याकडून तांत्रिक मनुष्यबळ माहिती पद्धतीकरिता माहिती/आकडेवारी

गोळा करणे आणि ती राज्यस्तरीय जोड केन्द्रांना पुरविणे. या कामाकरिता ह्या निवडलेल्या संस्थांमध्ये एक माहिती विभाग उघडण्यात येईल.

३६. तांत्रिक शिक्षण संस्थांमध्ये अथवा विभागीय स्तराच्या अन्य उचित संस्थेमध्ये विभागीय मनुष्यबळ माहिती केन्द्रे स्थापन करण्यात येतील. ही विभागीय केन्द्रे कार्यक्रम तयार करणे, राज्यातील जोड केंद्रामध्ये समन्वय साधणे आणि उपयोजित मनुष्यबळ संशोधन संस्था (आय. ए. एम. आर.) च्या तांत्रिक मनुष्यबळ माहिती पद्धतीच्या प्रमुख केंद्रांशी संपर्क ठेवणे इ. कार्ये करतील.

३७. वर निर्देश केलेल्या संस्थांमधील माहिती विभागांना तसेच राज्यस्तरीय जोड केंद्रांना उद्योगधंदे आणि अन्य संबंधीत आस्थापनांनी त्यांच्या तांत्रिक/व्यवस्थापकीय मनुष्यबळाची माहिती पुरविणे अनिवार्य करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारे योग्य ते कायदे अंमलात आणतील.

**तांत्रिक / व्यवस्थापकीय संस्थांना स्वायत्तता**

३८. तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्थांना शैक्षणिक, प्रशासकीय आणि आर्थिक स्वायत्तता देण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या कामी आखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद पुढाकार घेईल आणि जबाबदारी निश्चितीसाठी प्रमाणके विहीत करील.

३९. भारतीय तंत्रविज्ञान संस्था (आय. आय. टी), तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था (टी. टी. टी. आय), भारतीय व्यवस्थापन संस्था (आय. आय. एम) आणि अशा तऱ्हेच्या संस्था वर निर्देश केलेल्या संस्थांना स्वायत्त होण्यासाठी आपली मदत व सहकार्य देतील. ह्याकरिता योग्य योजना तयार करण्यात येईल.

४०. राज्यसरकारे, विद्यापीठ अनुदान मंडळ आणि इतर अनुदान देणाऱ्या संस्था वर निर्देशलेल्या स्वायत्त संस्थांना ढोवळ मानाने अनुदान देतील आणि आर्थिक व्यवहाराची सुलभ पद्धत ठेवतील. ह्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्यात येतील.

**विद्यार्थ्यांचे आंतर विभागीय चलनवलन (मोबिलिटी)**

४१. तांत्रिक शिक्षणाच्या उच्च संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार प्रवेश मिळावा, मग ते कोणत्याही ठिकाणचे रहिवासी असोत. ह्यासाठी राज्य सरकारांना केंद्र सरकारकडून प्रोत्साहन मिळेल. ह्यासाठीं योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी योजना केल्या जातील. तसेच अशा तऱ्हेने अन्य राज्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणाऱ्या संस्थांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे शिक्षकांच्या चलनवलनास (मोबिलिटी) प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांनाही आर्थिक मदत आणि धोरणात्मक पाठिंबा देण्यात येईल.

## ब. कार्यक्रम आणि त्यातील बदल

**संगणकाचे शिक्षण**

४२. सगणकाचे शिक्षण देण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवरील अभ्यासक्रम आणि कार्यक्रम हाती घेण्यासाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था ( आय. आय. टी ), भारतीय व्यवस्थापन संस्था (आय. आय. एम), तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था (टी. टी. टी. आय) आणि अन्य केन्द्र व राज्य शासनाच्या संस्थांना सहाय्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे शिक्षकांचे प्रशिक्षण आणि सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठीही सहाय्य देण्यात येईल. योग्य त्या पातळीवरील संगणकाची सुविधा सातव्या योजना काळात देशातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तांत्रिक संस्थांना उपलब्ध करून देण्याविषयी पाऊले उचलण्यात येतील. निरनिराळ्या केन्द्रात असलेल्या संगणकांच्या सुविधा मजबूत करण्याच्या योजना आखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद / मनुष्यबळ विकास खाते यांच्याकडून तयार करण्यात येतील आणि त्यांचे परस्पर सहकार्य परिणामकारकपणे होण्यासाठी योजना आखण्यात येतील. या संगणक कार्यक्रमाबाबत करावयाच्या कृतीचा तपशील ठरविण्यासाठी माध्यम आणि तंत्रज्ञान विषयाच्या विभागात चर्चा करण्यात आली.

## उपक्रमशीलतेचा विकास

### व्यवस्थापकीय शिक्षण

४३. भारतीय व्यवस्थापन संस्था (आय. आय. एम), विश्वविद्यालयांचे व्यवस्थापन विभाग आणि इतर तांत्रिक संस्थांकडून विविध संशोधनात्मक कार्यक्रम हाती घेण्यात येतील, ह्या कार्यक्रमांद्वारा असंघटित आणि लघु उद्योगातील भारतीय पारंपारिक अनुभवाचा आढावा घेण्यात येईल. या संशोधनामुळे अभ्यासक्रमाचा विस्तृतपणे प्रसार करण्यात येईल व त्याद्वारे व्यवस्थापन शिक्षणाच्या नियोजनासाठी एक पाया उपलब्ध होईल.

४४. उपरोक्त उद्दिष्टांसाठी अखिल भारतीय व्यवस्थापन अभ्यास मंडळ योग्य योजना तयार करेल. त्यासाठी ते त्या त्या क्षेत्रातील धंदेवाईक संस्थांची मदत घेईल.

### असंघटित आणि लघु उद्योगधंद्यांसाठी व्यवस्थापनक कार्यक्रम

४५. लघु उद्योग, ग्रामीण विकास, सेवा इ. लघु आणि असंघटित क्षेत्रातील योग्य स्तरावरील व्यवस्थापकीय काम करणाऱ्या व्यक्तीच्या विकासासाठी निरंतर शिक्षणासारखे कार्यक्रम व्यवस्थापन क्षेत्रात देण्याचे काम काही निवडक संस्था करतील. अशा तऱ्हेचे कार्यक्रम राबविणाऱ्या संस्था मजबूत/विकसित करण्यात येतील अखिल भारतीय व्यवसाय शिक्षण मंडळ आणि अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद ह्या करिता योग्य योजना तयार करतील.

## अभ्यासक्रम विकास विभाग

### राज्यस्तरीय अभ्यासक्रम विकास विभाग

४६. राज्य शासनाची तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाशी संबंधीत खाती अभ्यासक्रमाच्या विकासासाठी एक विभाग स्थापन करतील अथवा असलेला विभाग मजबूत करतील. ह्या विभागाद्वारा झपाट्याने प्रगती होत असलेल्या शास्त्राच्या व तंत्रज्ञानाच्या गरजांचा सतत आढावा घेण्यात येईल व उद्योगधंदे व अन्य संबंधीत वापरदारांच्या संभाव्य गरजा जाणून घेण्यात येतील.

**असलेल्या विभागांचे मजबूतीकरण**

४७. भारतीय तंत्रविज्ञान संस्था (आय. आय. टी) आणि तांत्रिक शिक्षण प्रशिक्षण संस्था. (टी.टी.टी.आय) यामधून असलेले अभ्यासक्रम विभाग सध्या अभ्यासक्रमांशी संबंधीत साधने व साहित्य आणि सॉफ्टवेअर विकसित करण्याचे काम करीत आहेत. ते आता निरनिराळ्या नमुन्याचे अभ्यासक्रम विकसित करण्याचे आणि नवीन केंद्रांना लागणाऱ्या तज्ञांच्या विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रमसुद्धा चालवतील. त्याचबरोबर ते त्यांच्या कार्यक्षेत्रातील नव्या अभ्यासक्रम विकास विभागांच्या कामात परस्पर समन्वय साधतील. जेणेकरून त्यांचे कामाचा जास्तीत जास्त व अधिक परिणामकारक उपयोग करून घेण्यात येईल. हे साध्य होण्यासाठी पदवी आणि पदविका अशा दोन्ही स्तरांवर असलेले अभ्यासक्रम विकास विभाग मजबूत करण्यात येतील व त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करण्यात येईल.

**नवीन आणि सुधारीत तंत्रविज्ञानातील कार्यक्रम**

४८. नवीन आणि सुधारीत तंत्रविज्ञानातील अभ्यासक्रम/कार्यक्रम राबविणाऱ्या निरनिराळ्या स्तरांवरील संस्थांमध्ये ह्या कामासाठी नवीन विभाग/प्रयोगशाळा स्थापन करण्यात येतील आणि त्यासाठी नवीन कर्मचारीवर्ग नेमण्यात येईल. या संस्थांची निवड करण्यासाठी आणि नवीन विभाग/प्रयोगशाळा यांचा विकास करण्यासाठी, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद मार्गदर्शक तत्वे तयार करील. ही तयार करताना संबंधीत प्रतिनिधी कार्यालये, धंदेवाईक संस्था, उद्योगधंदे यांचेशी सल्लामसलत करण्यात येईल. स्थानिक गरजांशी अनुरूप होण्यासाठी या मार्गदर्शक तत्त्वामध्ये पुरेसा लवचिकपणा असेल आणि अन्य संस्थांच्या शोधक प्रवृत्तीस प्रोत्साहन देण्याची तरतूद असेल.

**१) अभ्यासक्रम निवडीमधील लवचिकपणा**

४९. पदवी व पदविका स्तरावरील तांत्रिक आणि व्यावस्थापकीय शिक्षणाची पुनर्बांधणी करण्यात येईल व हे अभ्यासक्रम गुणपद्धतीवर आधारलेले (क्रेडिट सिस्टीम) लवचिक अशा संच पद्धतीचे (मोड्यूलर पॅटर्न) असेल व त्यात सदर अभ्यासक्रमाला अनेक ठिकाणी प्रवेश

करण्यासाठी तरतूद करण्यात येईल. यासाठी योग्य ती मार्गदर्शक तत्त्वे आणि पद्धती अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेकडून तयार करण्यात येतील.

५०. अशा तऱ्हेचा लवचिक शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्याची क्षमता असलेल्या पदवी आणि पदविका स्तरावरील संस्था प्रत्येक राज्यात निश्चित करण्यात येतील. या संस्थेमधील कर्मचारीवर्गाला अशा तऱ्हेचा कार्यक्रम आखणे आणि अमलात आणणे शक्य व्हावे म्हणून त्यांच्यासाठी भारतीय तंत्रविज्ञान संस्था (आय. आय. टी) आणि तांत्रिक शिक्षक प्रशिक्षक संस्था (टी. टी. टी. आय) आणि अन्य निवडक संस्थेमधून प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात येतील. या कामी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करण्याकरिता अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, सी. डी. सी. यांचा सहभाग घेण्यात येईल.

५१. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि समुपदेश करण्याच्या बाबींच्या सेवेचे मजबूतीकरण करण्यात येईल आणि सेवेचा विस्तार करण्यासाठी संस्थांना अधिक मदत देण्यात येईल.

**महिलांसाठी तांत्रिक शिक्षण**

५२. महिलांसाठी असलेल्या सर्व स्तरांवरील तांत्रिक शिक्षणाच्या सुविधांमध्ये बरीच वाढ करण्यात येईल. महिलांना अधिक संख्येने तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले जाईल व त्यासाठी अधिक दर्जेदार प्रयत्न करण्यात येतील. राज्य सरकारांकडून अधिक महिला तंत्रनिकेतने स्थापण्यात येतील, तर मोठी व निवासी महिला तंत्रनिकेतने केंद्र शासनाकडून स्थापण्यात येतील. सर्व प्रकारच्या तांत्रिक शिक्षण संस्थांमधून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र/पदविका/पदवी स्तरांवर महिलांना देऊ करण्यात येणारे अभ्यासक्रम / विद्याशाखा ह्या स्त्री-समानता आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून निवडण्यात येतील. काही व्यवसाय किंवा विशिष्ट प्रकारची कामे महिलांना "योग्य" अथवा "अनुरूप" आहेत हाच केवळ निकष यापुढे विषयाच्या निवडीसाठी रहाणार नाही. मग ती संस्था खास महिलांची असो अथवा अन्य असो. विषयाच्या निवडीचा निकष रोजगारक्षमता हा राहील. नवीन नवीन विषय घेण्याचे

दृष्टीने महिलांना समुपदेश देण्याची व्यवस्था करण्यात येईल. महिलांसाठी चाकोरीतील नवे कार्यक्रम सुरू करण्यासाठी तांत्रिक शिक्षण संस्थांना प्रोत्साहन देण्यात येईल. महिलांची प्रवेश संख्या वाढण्यासाठी त्यांना वसतीगृह, नादारी, विद्यावेतन, शिष्यवृत्ती इ. सवलती देण्यात येतील. ह्या सवलती विशेषत: ज्या क्षेत्रात आतापर्यंत महिलांचा सहभाग पुरेसा नाही अशा क्षेत्रातील व्यवसाय उदा. नव्याने पुढे येणाऱ्या तंत्रशाखेतील व्यवसाय कार्यक्रम इ. साठी देण्यात येतील. ह्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याचे काम अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद करेल.

**अपंगांसाठी तांत्रिक शिक्षण**

५३. अपंगांना खास प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम देण्यासाठी काही निवडक संस्थांना पुरेसा निधी देण्यात येईल.

**निरंतर शिक्षण**

५४. निरंतर शिक्षण आणि दूरशिक्षणासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद एका अभ्यास मंडळाची स्थापना करेल. ह्या पद्धतीद्वारा शिक्षणाची आवश्यकता असलेल्या संघटित/असंघटित ग्रामीण शहरी क्षेत्रातील लोकांसाठी योग्य कार्यक्रमांचे नियोजन, गरज, तपासणी, अंमलबजावणी आणि प्रमाणपत्र देणे इ. साठी मार्गदर्शन करण्याचे काम हे अभ्यास मंडळ करेल व त्यासाठी ते मंडळ व्यावसायिक संस्था व उद्योगधंद्याचे सहकार्य घेईल.

५५. निरनिराळ्या विभागातील/जिल्ह्यातील तांत्रिक मनुष्यबळाच्या निरंतर शिक्षणाची गरज अभ्यासून ह्या कार्यक्रमाची पद्धत, प्रकार व कार्यक्षेत्र ठरविण्यासाठी राज्यामधील तंत्रशिक्षण संचालनालये योजना आखतील.

५६. उद्योगधंद्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना निरंतर शिक्षणासाठी पुरेशी संधी उपलब्ध करून द्यावी म्हणून केंद्र व राज्य सरकारे त्यांना प्रोत्साहन देतील. यासाठी मनुष्यबळ विकास खाते/आखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद आणि राज्य सरकारे उद्योगधंद्यांशी सल्लामसलत करून योग्य योजना तयार करतील.

५७. ज्यांच्यासाठी योजना तयार करावयाची ते लोक आणि त्यांच्या गरजा ठरविण्याचे काम ह्यासाठी निवडलेल्या संस्था करतील. तसेच मुख्यत: अंशकालीन पद्धतीने आणि संच पद्धतीने शिक्षण देणारे अनुरूप कार्यक्रम तयार करण्याचे आणि राबविण्याचे काम करतील. ह्याकामी सदर संस्था वापरदारांशी आणि व्यावसायिक संस्थांशी सल्लामसलत करतील. ह्या कार्यक्रमाची परिणीती अभियांत्रिकी व तंत्रविज्ञानातील विशिष्ट क्षेत्रातील पदवी देण्यात व्हावी. मनुष्यबळ विकास खाते/अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद ह्यासाठी योग्य योजना तयार करतील.

५८. केंद्र शासनाचे तांत्रिक शिक्षण मंडळ आणि राज्य सरकारांची तांत्रिक शिक्षण खाती निरंतर शिक्षणासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना करतील आणि हा विभाग निरंतर शिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी, नियंत्रण ठेवणे व सिंहावलोकन करील.

५९. प्रत्येक राज्यातील कांही निवडक तंत्रनिकेतने, तांत्रिक महाविद्यालये आणि व्यवस्थापन संस्थांमध्ये निरंतर शिक्षण विभाग स्थापण्यात येईल. ह्या संस्था पूर्णत: अथवा अंशत: त्या त्या संस्थांतून चालणारे औपचारिक अथवा अनौपचारिक कार्यक्रम चालवतील. ह्या कार्यक्रममांधून अभियांत्रिकी क्षेत्रातील पदविका, उच्च पदविका, पदवी तसेच उपयोजित तंत्रज्ञानातील तंत्रज्ञ पदवी प्रदान करण्यात येईल.

**दूरशिक्षण**

६०. वर नमूद केलेले निरंतर शिक्षण विभाग मुख्यत: अनौपचारिक स्वरूपाचे असलेले दूर शिक्षणाचे कार्यक्रमही चालवतील. या कार्यक्रमांत संपर्क शिक्षण व दूरशिक्षणाचे योग्य मिश्रण असेल. त्यामुळे ज्याना पुरेसे आधीचे शिक्षण नसल्यामुळे अथवा अन्य कारणाने शक्य न झाल्यमुळे नेहमीच्या पद्धतीने शिक्षण घेणे शक्य झाले नाही त्यांची गरज भागविली जाईल. ह्या कार्यक्रमामध्ये पत्रव्यवहाराद्वारा अभ्यासक्रम तसेच रेडिओ आणि दूरदर्शन सारख्या माध्यमांचा उपयोग करून शिक्षण दिले जाईल.

### उपक्रम विकास केंद्रे

६१. वरील सर्व कार्यक्रमांच्या शिक्षण उपक्रमांचा विकास करण्यासाठी सध्याच्या दर्जासुधार कार्यक्रमांच्या केंद्रामध्येच निरंतर शिक्षणाकरिता उपक्रम विकास केंद्रे स्थापन करण्यात येतील. ह्या केंद्रांचा इंदिरा गांधी राष्ट्रीय खुले विद्यापीठ, राज्यातील अन्य खुली विद्यापीठे आणि निरंतर शिक्षण केंद्रांशी संबंध राहील. जेणेकरून उपक्रम आणि माहितीची देवाण घेवाण होऊन द्विरूक्ती टाळता येईल.

## परस्पर संबंध आणि जाळे (नेटवर्क)

### समाज तंत्रनिकेतने

### समीक्षण

६२. सध्याच्या समाज तंत्रनिकेतन पद्धतीची एखाद्या योग्य अशा संस्थेकडून समीक्षा करण्यात येईल जेणेकरून ही पद्धत अधिक मजबूत व विस्तृत करता येईल आणि त्याशिवाय तिचा दर्जा व आवाकाही वाढेल. तिचा विस्तार करण्याची योजना आखीत असताना मागासलेले भाग तसेच अनुसूचित जाती/जमाती, स्त्रिया आणि अल्पसंख्य यासारख्या समाजाच्या दुर्बल घटकांच्या गरजांकडे योग्य लक्ष दिले जाईल.

### विकासासाठी नियोजन

६३. समाज तंत्रनिकेतने अधिक मजबूत करून त्यांचा दर्जा आणि आवाका वाढवून ह्या चळवळीस हातभार लावण्यासाठी राज्य सरकारे निरनिराळ्या योजना आखतील.

६४. प्रत्येक राज्यात योग्य/उपयोगी तंत्रज्ञानासाठी आणि ग्रामीण विकासासाठी एक स्वतंत्र संस्था स्थापण्यात येईल. ही संस्था संशोधन व विकास कार्यक्रमास उत्तेजन देणे, तंत्रज्ञानाचा विकास करणे, ग्रामीण विकासाशी विविध संबंधीत कार्यक्रम आयोजित करणे, आणि समाज तंत्र निकेतने व ग्रामीण समाज विकास तथा तंत्रविज्ञानाचा प्रसार करणाऱ्या अन्य संस्थांना पाठिंबा देणाऱ्या संस्थेचे काम करील तसेच ह्या संस्था शक्य तेथे प्रस्तावित ग्रामीण विद्यापीठांशी मिळून काम करतील. ह्यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योजना तयार करेल.

**सघन ग्रामीण विकास प्रकल्प**

६५. सघन ग्रामीण विकासाचे विशिष्ट प्रकल्प काही निवडक संस्था हाती घेतील. राज्य सरकारांची तंत्र शिक्षण संचालनालये अशा प्रकल्पांसाठी योजना आखतील व त्यासाठी ते तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था, ग्रामीण संस्था आणि अन्य संबंधित संघटनांशी सल्लामसलत करतील.

**प्रकल्प आणि कार्यक्रमांना उत्तेजन**

६६. ग्रामीण/समाज विकासाशी संबंधीत केंद्र व राज्य सरकारांची खाती/विभाग समाज तंत्रनिकेतनाकडे पारंपारिक कार्यभार सोपवतील. ह्यात ग्रामीण विकासात गुंतलेल्या अन्य संस्थांचे सहयोगाने ग्रामीण विकास प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी व पुनर्विलोकन करणे ह्याचा समावेश असेल.

६७. प्रत्येक समाज तंत्रनिकेतनात एक उपक्रम व माहिती केंद्र असेल. हे केंद्र सुयोग्य तंत्रविज्ञान, तंत्रविज्ञानाचे संक्रमण, संशोधनाची धोरणे याबाबत माहिती पुरवील. अशी केंद्रे स्थापन करण्यासंबंधी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योग्य मार्गदर्शक तत्त्वे व योजना तयार करेल.

६८. काही निवडक समाज तंत्रनिकेतनांकडून ग्रामीण विकासासाठी शास्त्र व तंत्रविज्ञानाचा वापर करणारे प्रकल्प हाती घेतील. ह्यातून प्रत्यक्ष संशोधनातून ग्रामीण विकासाची प्रक्रिया व तत्संबंधीचे प्रश्न लक्षात येतील व पुन्हा अंगिकारता येणारे नमुने तयार होतील.

६९. समाज तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतरही तांत्रिक व व्यवस्थापकीय संस्था ग्रामीण विकासासाठी शास्त्र व तंत्रविज्ञानाचा उपयोग करणारे प्रकल्प कार्यक्रम हाती घेतील. ह्यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षक परिषद योग्य योजना तयार करील.

**प्रशासकीय संस्थांची मजबूती**

७०. प्रणालीचे व्यवस्थापन ह्या सदराखाली प्रशासकीय संस्थांच्या मजबूतीसाठी सुचविलेल्या तरतुदी ह्या योजनेसाठीही लावता येतील.

## उद्योगधंदे व संस्था यांचे परस्परसंबंध

### नियोजन

७१. उद्योगधंदे व संस्था यांच्यात परस्परसंबंध घडून यावेत व ते वाढावेत म्हणून अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद मार्गदर्शक तत्त्वे तयार करील. ह्या परस्पर संबंधाची क्षेत्रे म्हणजे अभ्यासक्रम विकास, सुविधांचा समाईक उपयोग, संयुक्त प्रकल्प, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण तज्ञ व्यक्ती, उद्योगातील व्यक्तींचे निरंतर शिक्षण इ.

७२. ह्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून प्रत्येक तांत्रिक/व्यवस्थापकीय संस्था उद्योगधंद्यांशी परस्पर संबंधाचे सर्वसमावेशक प्रकल्प हाती घेतील. राज्य सरकारांची तांत्रिक शिक्षण खाती/मनुष्यबळ विकास खाती असे प्रकल्प असलेल्या योजना तयार करतील.

### व्यक्तींचे विनिमय

७३. संस्था आणि उद्योगधंदे यातील व्यक्ती देवाण घेवाण (विनिमय) असलेल्या योजना अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद तयार करील, ज्यात असा विनिमय सुकर होणारी नियमावली असेल आणि ह्या योजना राज्य सरकारांची तांत्रिक शिक्षण खाती व तांत्रिक/व्यवस्थापकीय संस्था सहकार्याने अंमलात आणतील.

### संस्थांना दत्तक घेणे

७४. राज्य सरकारे त्यांच्या तांत्रिक शिक्षण विभागामार्फत परिसरातील प्रमुख उद्योगांनी दत्तक घेण्यायोग्य संस्था निवडतील. अशा दत्तक विधानासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योजना तयार करील.

### प्रशासकीय केंद्र

७५. केंद्रातील तांत्रिक शिक्षण विभाग आणि राज्य सरकारांची तांत्रिक शिक्षण खाती यामध्ये उद्योग-संस्था परस्परसंबंध वाढविण्यासाठी केंद्र असेल. असेच केंद्र प्रत्येक तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्थांमध्ये असेल. हे केंद्र स्थापन करण्यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योजना तयार करील.

जाळे

**शिक्षणाच्या निरनिराळ्या विभागातील दुवे**

७६. तांत्रिक शिक्षण आणि सामान्य शिक्षण यांच्या विभागांमध्ये परिणामकारक दुवा प्रस्थापित करण्यात येईल. त्यामुळे अभ्यासक्रमाची 'परिणामकारक फेररचना, निरंतर शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी दुसऱ्या विभागाकडे असलेल्या सुविधांचा वापर आणि समृद्ध व पुरेपूर वापराच्या दृष्टीने महत्त्वाच्या व संबंधित अन्य आंतरविभागीय बाबींचा विचार करता येईल. उच्च शिक्षणासाठी ठरविलेल्या विस्तृत सुविधांचे व्यासपीठ हे दुवे/संबंध हमखासपणे प्रस्थापित होण्यासाठी वापरले जाईल. ह्या संबंधांचे सविस्तर स्वरूप व त्याची कार्यपद्धती ठरविण्यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर संस्थांचे सल्लामसलतीने योग्य योजना तयार करील.

**संशोधन व विकास संघटना आणि उद्योगांशी दुवे**

७७. विविध स्तरावरील तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्थांचे परस्परांशी तसेच उद्योगांशी व विविध संशोधन व विकास संघटनांशी परस्पर संबंधाचे जाळे विणण्याच्या व कार्यान्वीत करण्याच्या दृष्टीने मनुष्यबळ विकास खाते मार्गदर्शक तत्त्वे तयार करील. त्यामुळे माहितीची देवाणघेवाण, तिचा फैलाव सुविधांचा एकमेकांकडून वापर, संयुक्त प्रकल्प हाती घेणे, शिक्षकवर्गाचा विकास इ. कार्ये करता येतील.

## आधारभूत सुविधांचा विकास

**कालबाह्य सुविधांचे आधुनिकीकरण**

७८. सर्व प्रकारच्या तांत्रिक व व्यवस्थापकीय संस्थांमधील आधारभूत सुविधांचा त्यातील कमतरता अथवा कालबाह्यतेच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येईल. अशा तऱ्हेच्या दिसून आलेल्या खालील बाबींबाबत अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योग्य योजना तयार करेल.

उपकरणे, यंत्रसामुग्री, प्रयोगशाळा आणि कर्मशाळा यातील कालबाह्यता काढून टाकणे व आधुनिकीकरण करणे

कालबाह्य आणि निरुपयोगी झालेल्या उपकरणांची त्वरीत विल्हेवाट लावणे, नवीन सामुग्री मिळविणे आणि नवीन तसेच जुनी सामुग्री पुरेपूर उपयोगात आणणे ह्यासाठी पाऊले उचलणे.

ग्रंथालये व त्यातील सुविधांची कालबाह्यता काढून टाकून आधुनिकीकरण करणे.

संगणक व संबंधित उपकरणे शिक्षक/कर्मचारी वर्ग व अन्य आधारभूत सुविधांनी युक्त अशा शैक्षणिक केंद्रांची स्थापना करणे.

कालबाह्यता दूर करण्याची क्रिया सातत्याने चालू रहाण्यासाठी प्रत्येक संस्थेकरिता योजनाबाह्य अंदाजपत्रकामध्ये घसारा निधीची तरतूद करणे.

नव्याने येणाऱ्या तंत्र शाखांसाठी खास प्रयोगशाळा स्थापन करणे ज्यांचा उपयोग त्या विभागातील/उप–विभागातील संस्थांच्या गटाकडून केला जाईल.

७९. राज्य सरकारांकडून अशाच योजना आखल्या जातील व राज्याच्या योजनांतर्गत तसेच योजनाबाह्य अंदाजपत्रकामध्ये काल-बाह्य सामुग्री बदलण्यासाठी तरतूद केली जाईल.

### साधनसामुग्री वाढविण्यासाठी जादाची क्षमता वापरणे

८०. संस्था त्यांच्याकडे असलेल्या जादाच्या क्षमतांची–जसे जागा, उपकरणे व यंत्रसामुग्री यांचा वेळ, कर्मचाऱ्यांचे अनुभवक्षेत्र इ. निश्चिती करून ह्या जादांच्या क्षमतांचा उपयोग उद्योगधंदे व समाजाला सल्ला व अन्य सेवा देण्यासाठी करतील व स्वतःची साधनसामुग्री वाढवतील. असा सल्ला व सेवा द्वारे आलेला पैसा त्या संस्थांनी स्वतःच्या विकासा-साठी ठेवून घेण्याची परवानगी केंद्र/राज्य सरकारांकडून देण्यात येईल आणि त्याचबरोबर योग्य ते अनुदान देण्यात येईल.

### देखभाल

८१. विशिष्ट क्षेत्रातील दुरूस्ती व देखभालीसाठी प्रत्येक राज्यात स्थापन करण्यात यावयाच्या केंद्रांची संख्या ठरविण्यासाठी तपासणी करण्यात येईल. ही केंद्रे ज्या संस्थांमध्ये उघडावयाची आहेत त्या संस्था

त्यांचे प्राविण्य व उपलब्ध सुविधा या निकषावर ठरविण्यात येतील त्या त्या राज्यातील सर्व तांत्रिक संस्थांची दुरुस्ती व देखभालीची गरज ह्या केंद्राकडून भागविली जाईल. ह्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे व तपशील अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद ठरवील.

८२. अभ्यासक्रम, विद्यार्थी आणि कर्मचारीवर्ग यांच्या बदलत्या गरजांना अनुरूप असे बदल इमारत, विद्युत पुरवठा व इतर सुविधांमध्ये करण्यासाठी तसेच संस्थेचा परिसर, इमारती व इतर सुविधांची देखभाल करण्यासाठी त्या संस्थांना पुरेसा निधी केंद्र व राज्य सरकारे उपलब्ध करून देतील.

**शिक्षण सुविधा केंद्रे**

८३. भारतीय तंत्रविज्ञान संस्था, तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था व अन्य निवडलेल्या संस्थांमधून शिक्षण सुविधा विकास केंद्रे स्थापन करण्यात येतील. ही केंद्रे खालील कार्ये करतील.

निरनिराळ्या क्षमता असलेल्या गटांच्या गरजा भागविण्यासाठी योग्य अशी छापील साधने (पाठ्यपुस्तके, कार्याभ्यास पुस्तके, स्वयं-शिक्षण पद्धती (मोड्यूल्स), प्रयोगशाळा प्रयोग पुस्तिका इ.) तसेच, अन्य साधने (दृष्यफिती, ध्वनीफिती, ओव्हरहेड प्रोजेक्टरच्या पारदर्शिका इ. ) विकसित करणे.

शिक्षण सुविधांचा प्रसार व वाटप करणे.

कामाची द्विरूक्ती टाळण्यासाठी आपापसात कार्यक्षेत्र वाटून घेणे व त्यात सुसूत्रता राखणे.

**संगणक सुविधा पुरविणे**

८४. संगणकावरील प्रशिक्षण, संशोधन, विद्यार्थ्यांची चाचणी, प्रगती अहवाल, व्यवस्थापन, माहिती पद्धत इ. साठी सर्व तांत्रिक व व्यवस्थापकीय संस्थांना योग्य अशा संगणक सुविधा पुरविण्यात येतील. यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योग्य योजना आखील.

८५. त्या त्या विभागात अथवा उपविभागात उपलब्ध असलेल्या संगणक सुविधांचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने अशा संगणक सुविधांचे जाळे विणण्याची योग्य अशी योजना हाती घेण्यात येईल.

### वसतिगृह सुविधा

८६. प्रत्येक तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्था तिच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी आवश्यक असलेल्या वसतिगृहांची तसेच त्यातील फर्निचर व अन्य सोयींच्या गरजा जाणून घेईल. विद्यार्थिनींसाठी १०० टक्के गरज भागविण्यासाठी तर विद्यार्थ्यांसाठी किमान ५० टक्के गरज भागविण्याच्या दृष्टीने वसतिगृहे बांधण्यात येतील. याशिवाय राज्य सरकारे व त्या त्या संस्था अन्य संस्थांकडे उपलब्ध सोयींचा उपयोग करून घेऊन वसतिगृह क्षमता वाढविण्याची शक्यता पडताळून पहातील राज्य सरकारांच्या योजनेमध्ये वसतिगृहांसाठी तरतूद करण्यात येईल. यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदही योग्य योजना तयार करील.

### अन्य सोयी

८७. सर्व तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्थांमध्ये खेळ, करमणूक, छंद आणि सांस्कृतिक कार्यासाठी सोयी उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी राज्य सरकारे/अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योग्य प्रमाणके विहीत करेल.

## कर्मचारी विकास

### कर्मचाऱ्यांची भरती

८८. कर्मचाऱ्यांच्या भरतीचे काम वेगाने धंदेवाईकपणे होण्यासाठी राज्य सरकारे स्वतंत्र तांत्रिक शिक्षक सेवा आयोग स्थापन करतील.

८९. अल्पकालीन गरजा भागविण्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालये आणि त्या त्या तांत्रिक संस्थांना पुरेसे अधिकार राज्य सरकारे प्रदान करतील.

### शिक्षकाची बहुविध भूमिका

९०. शिकविणे, संशोधन करणे, सल्ला देणे, शिक्षण सुविधांचा विकास करणे आणि संस्थेच्या व्यवस्थापनात सहभागी होणे इ.

शिक्षकांच्या बहुविध भूमिका लक्षात घेऊन शिक्षकाच्या कामाचे स्वरूप ठरविण्याचे काम राज्य सरकारातील व स्वायत्त संस्थांतील संबंधीत अधिकारी करतील व विविध गटाच्या शिक्षक वर्गासाठी त्या भूमिकांचे अधिक्य निश्चित करतील.

**सेवाशर्ती**

९१. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षक परिषदेने ठरविलेल्या राष्ट्रीय तज्ञ समिताने ठरवावयाच्या खालील बाबींवरील शिफारशींच्या परीक्षणाच्या व त्या अंमलात आणावयाच्या कामास मनुष्यबळ विकास खाते गती देईल.

तांत्रिक व व्यवस्थापकीय संस्थांमधील शिक्षकांच्या वेतन श्रेणीत सुधारणा.

दर्जास्तराची बांधणी.

कारकीर्दीच्या वाढीसाठी बढतीच्या संधी.

गुणवत्तेवर आधारीत बढतीच्या योजना.

निवासस्थाने, विश्रांती आणि रजा यासारख्या अतिरिक्त सवलती.

उत्तम कामाकरीता प्रोत्साहन.

सल्लामसलतीच्या कामासंबंधी व अन्य संबंधीत बाबींसंबंधी प्रमाणचे ठरविणे.

**कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन**

९२. कर्मचाऱ्यांच्या मूल्यमापनाची जबाबदारी निश्चित करणारी आवश्यक ती प्रमाणके ज्यात असतील अशी पद्धत अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद तयार करील. ही पद्धत निश्चित करताना राज्य सरकारे, तंत्रशिक्षण संचालनालये, संस्था, धंदेवाईक मंडळे आणि शिक्षकांचे प्रतिनिधी यांच्याशी विस्तृत चर्चा करण्यात येईल.

**कर्मचाऱ्यांचा विकास**

९३. राज्य सरकारे आणि संबंधित संस्था चालक शिक्षकांचे प्रारंभिक आणि सेवांतर्गत प्रशिक्षण अनिवार्य करतील. ह्या कामासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद योग्य ती सुरूवात करेल.

९४. राज्य सरकारे आणि संबंधित संस्था कर्मचाऱ्यांच्या विकासाच्या योजना ह्या त्यांच्या वार्षिक योजनांचा अंगभूत भाग करतील. ते प्रत्येक संस्थेत कर्मचारी विकास विभाग सुरू करण्यास उत्तेजन देतील. यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद मार्गदर्शक तत्त्वे तयार करील.

९५. प्रत्येक राज्यातील संस्थांच्या त्यांच्या आपापल्या कर्मचाऱ्यांच्या विकास योजनांचे राज्य स्तरावर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून आणि अन्य संबधित मंडळांकडून एकत्रिकरण करण्यात येईल.

९६. शिक्षकांच्या निरंतर शिक्षणासह कर्मचाऱ्यांच्या विकास कार्यक्रमासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद निरनिराळ्या संस्था व केन्द्रे निश्चित करील व आवश्यकता वाटल्यास त्यासाठी स्वतंत्र केन्द्राची उभारणी करील, भारतीय तंत्रविज्ञान संस्था, गुणवत्ता सुधार कार्यक्रम संस्था, तंत्रशिक्षक प्रशिक्षण संस्था आणि अन्य निवडक तांत्रिक संस्था कर्मचाऱ्यांच्या विकासाचे कार्यक्रम आयोजित करतील. हे कार्यक्रम निरनिराळ्या क्षेत्रातील उदा. विषयभाग अद्यावत करणे, शिकविण्याच्या पद्धती, औद्योगिक प्रशिक्षण शिकवण्याच्या साधनांचा विकास आणि संशोधन यामधील असतील.

९७. राज्य सरकारे आणि इतर संस्थांचे चालक सर्व तांत्रिक आणि व्यवस्थापकीय संस्थांमध्ये राखीव शिक्षक पदे निर्माण करून भरतील; जेणेकरून कर्मचारी विकासाचे कार्यक्रम सातत्याने सुरू ठेवता येतील. यासाठी मनुष्यबळ विकास खात्याचे सहकार्य होईल.

**व्यावसायिक शिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण**

९८. व्यवसाय अभ्यासक्रम आणि व्यवसाय शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी शैक्षणिक साहित्य आणि माध्यम तसेच शिक्षणक्रम यांचा विकास करणे यासाठी प्रत्येक राज्यात एक याप्रमाणे शिक्षणक्रम विकास केन्द्रे

स्थापन करण्यात येतील. ह्या केंद्रांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कामी व सुरूवातीच्या काळात शिक्षणक्रमांचा आणि शैक्षणिक साहित्याचा विकास करण्याचे कामी राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान प्रशिक्षण परिषद, तांत्रिक शिक्षण प्रशिक्षण संस्था आणि विभागीय महाविद्यालये यांची भूमिका स्पष्ट करणारी योजना मनुष्यबळ विकास खाते/अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद/राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान प्रशिक्षण परिषद तयार करील. ही योजना व्यावसायिकरणासाठी आखलेल्या अशाच तऱ्हेच्या इतर योजना व्यतिरिक्त असेल.

## शोध, संशोधन आणि विकास

### संशोधन आणि विकासाची उन्नती

९९. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन व विकासासाठी स्वतंत्र विभाग असतो. त्याने सुचविलेले कार्यक्रम हाती घेण्यात येतील. त्या व्यतिरिक्त अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद खास करून राज्य सरकारांच्या सल्ल्याने संशोधन आणि विकास कार्यक्रम पद्धतशीरपणे होण्यासाठी सक्षम अशा तांत्रिक संस्थांची निवड करील. ह्या संस्थांमध्ये खालील बाबींवरील संशोधनपर कामासाठी आवश्यक त्या आधारभूत सुविधा पुरविल्या जातील.

प्रस्थापित तंत्रज्ञानात सुधारणा करणे.

स्थानिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने नव्याने आलेले तंत्रज्ञान स्वीकारणे किंवा ते अनुरूप करून घेणे अथवा नवीन निर्माण करणे आणि अद्यावत सुधारणांचे आव्हान स्वीकारणे.

ग्रामीण विकासासाठी यथायोग्य तंत्रज्ञान विकसित करणे.

सर्व स्तरावरील तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणाची उत्पादकता वाढविणे.

व्यवस्थापनाची तंत्रे.

१००. या व्यतिरिक्त त्या संस्था लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी योग्य कार्यक्रम तयार करतील व राबवतील. ठरविलेल्या क्षेत्रातील संशोधन आणि विकास कार्यक्रम हाती घेण्यास पुरेशी क्षमता ह्या

प्रशिक्षणामुळे त्यांच्यात निर्माण होईल. ह्यासाठी मनुष्यबळ विकास खाते आवश्यक ती मार्गदर्शक तत्त्वे तयार करेल.

### तंत्रज्ञान टेहेळणी गट

१०१. प्रत्येक राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये एक टेहेळणी गट केंद्र सरकार स्थापन करेल. ह्या गटामध्ये संशोधन संघटना, उद्योगधंदे आणि तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या अन्य मंडळांमधील नामवंत शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि शिक्षणतज्ञ यांचा समावेश असेल. ही मंडळी नवीन असलेल्या आणि उदयास येत असलेल्या तंत्रज्ञानाचा सतत शोध घेत रहातील आणि आपल्या राष्ट्रीय धोरणाशी त्यांची सुसंगतता आणि जुळवून घेण्याची क्षमता ह्या निकषांवर त्यांचे मूल्यमापन करतील.

### शिक्षण प्रक्रिया सुधारण्यासाठी संशोधन

१०२. शिक्षणक्रम विकास, सूचना पद्धत ठरविणे, शिक्षणक्रम राबविणे आणि मूल्यमापन करणे इ. शिक्षण प्रक्रियांची उत्पादकता वाढविण्याचे उद्दिष्ट असलेल्या क्षेत्रात आणि शिक्षणाचे व्यवस्थापन ह्यावर भारतीय तंत्र संस्था, तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था, भारतीय व्यवस्थापन संस्था तसेच अन्य निवडक तांत्रिक व व्यवस्थापकीय संस्था, निरनिराळे संशोधन प्रकल्प हाती घेतील आणि त्यांच्या निष्कर्षांच्या माहितीसाठी आणि योग्य सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्व संस्थांपर्यन्त प्रसार करतील. मनुष्यबळ विकास खाते/अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद यासाठी योग्य योजना तयार करेल.

□ □

प्रकरण ९ वे

# पद्धती कार्यान्वित करणे

**सद्य:स्थिती**

१. आमच्या शिक्षण व अध्ययन पद्धतीने संस्कृतीची मुळे जोपासली आहेत व आपल्या सहिष्णु सुसंस्कृत समाजाचा पाया जतन केला आहे. या शिक्षण पद्धतीत काही दोष व कमतरता असल्या तरी आपल्या शिक्षण पद्धतीमुळे मोठी प्रगती झाली आहे. प्रचलित शिक्षणामुळे लोकशाही संस्था व शासन व्यवस्था टिकून आहेत. केवळ शेती व उद्योग क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगतीसाठी, या शिक्षणाने मनुष्यबळ पुरविले आहे असे नसून, उगवत्या काळातील विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रासाठीही मनुष्यबळ पुरवले आहे.

२. असे असले तरी शिक्षण पद्धतीचे चित्र असमान व परस्परविरोधी आहे. मोठ्या संस्थांतील विद्यापीठात व महाविद्यालयात, विद्याविषयक नियमांची पायमल्ली होताना दिसते. हजारो शाळांमधून विद्यार्थी व शिक्षक आपल्या भूमिका पार पडताना व उत्कृष्टाकडे वाटचाल करताना दिसतात. तरीपण कित्येक शाळा वेळेवर न सुरू होणे, त्या व्यवस्थित न ठेवणे, अध्ययन अध्यापनातून फलनिष्पत्ती अंकुरित न होणे, अशा बाबीही दिसतात. जेथे विद्यार्थ्यांना प्रभावित करणारे व ज्ञानाच्या क्षेत्रात ख्याति प्राप्त शिक्षक आहेत, तेथेच स्वतःच्या जबाबदाऱ्यांकडे अविचारीपणे दुर्लक्ष करणारे व शाळेत गैरहजर रहाणारे शिक्षकसुद्धा आहेत. अद्ययावत मूल्यमापन तंत्राचा अवलंब करणारे व विश्वासार्हता गमावणाऱ्या परीक्षापद्धतीत कार्य करणारे शिक्षक आहेत, तसेच प्रौढशिक्षण व अनौपचारिक वर्गाचे कठीण काम करणारे सुद्धा शिक्षक आहेत; त्याचबरोबर बरेच शैक्षणिक प्रकल्प योग्य कार्यवाही नसल्यामुळे ठप्प झाले आहेत असे दिसून येते.

३. हे सहजस्पष्ट आहे की, अशा या परस्पर विरूद्ध परिस्थितीत स्त्रिया, शहरी निर्धन लोक आणि ग्रामीण जनता यांचेच नुकसान होते. शिक्षण क्षेत्रातील गैरशिस्तीमुळे शिक्षणापासून अपेक्षित फायदे, त्यातील प्रचंड गुंतवणुकीच्या प्रमाणात मिळत नाहीत व त्यामुळे व्यापक प्रमाणात देशाच्या भवितव्याबद्दल निराशा व औदासिन्य निर्माण होते.

४. देशातील सर्व भागात शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील शिक्षण-पद्धतींनी व्यवस्थित काम केल्याशिवाय महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यशस्वी होणार नाही. ऑगस्ट ८५ मध्ये केंद्र शासनाच्याद्वारे प्रकाशित "शैक्षणिक आव्हान" यामध्ये निर्देशिल्याप्रमाणे शिक्षणपद्धती राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक प्रणालीचा एकात्मभाग आहे व त्यातील विवेचनात्मक बदल हे इतर क्षेत्रातील बदलांबरोबरच झाले पाहिजेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये ही कल्पना मान्य आहे. त्याचप्रमाणे शिक्षणामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सामुदायिक प्रयत्नांतून व इच्छा शक्तीमधून एक नवजीवन व नवीन सृजनशीलता निर्माण होईल, याही बाबी मान्य केल्या आहेत.

**धोरणाचा ध्वन्यर्थ, कार्यपद्धती व कार्यात्मक गृहीते**

५. शिक्षणपद्धतीत सुधारणा करण्यासाठी तीन परिच्छेद (७.१ ते ७.३) पूर्व गृहीते म्हणून दिली आहेत. त्यानुसार लोकशाही संस्थांमध्ये ज्याप्रमाणे मूलभूत अधिकार भोगण्यासाठी नागरी कर्तव्याचे पालन व स्वयंशिस्त अभिप्रेत असते, त्याचप्रमाणे स्वातंत्र्याचे, नवीनक्रमांचे व क्रीयाशीलतेचे वातावरण, प्रखर बुद्धीमत्ता परस्पर सौहार्दता, व कामांच्या नव्या नीती यांवर शिक्षणातील सुधारणा अवलंबून असते.

६. या दृष्टिकोनातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात, शैक्षणिक पद्धतीत शिस्तीचा उल्लेख केला आहे. चालू असलेल्या शिक्षणात ही शिस्त कशी आणता येईल या संबंधी पुढील बाबींचा विचार करता येईल. शिक्षकांना अधिक सुखसोयींबरोबरच अधिक जबाबदारी, विद्यार्थ्यांना सुधारित सेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्याकडून योग्य वागणुकीची अपेक्षा ; तसेच शाळांना अधिक सोयी पुरविण्या

बरोबरच त्यांच्याकडून राज्य व राष्ट्रपातळीवर ठरविलेल्या अपेक्षापूर्तीची गरज इत्यादी बाबींची अपेक्षा आहे. निर्जीव शिस्त अथवा एकसारखेपणा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अपेक्षित नाही. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सहकार्याचे व सहभागाचे तत्त्व आणि देशाच्या उज्वल भवितव्याबद्दल आशादायक दृष्टिकोन यांचा समावेश आहे, या महत्त्वाच्या कार्यासाठी खालील आवश्यक बाबी आम्ही सर्वांनी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

अ) या कार्यासाठी शिक्षकांनी, शासनाने, अथवा शिक्षणसंस्थांनी पालन करावेत असे प्रगतीचे काही निकष ठरविले पाहिजेत. हे निकष कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाहीत. अथवा त्याच्या पूर्ततेसाठी इतर व्यवस्थापनाच्या अथवा व्यक्तीच्या अटी बंधनकारक राहणार नाहीत.

ब) या अपेक्षित निकषांचे पालन न केल्यास त्याचे निश्चित काही परिणाम होतील आणि त्यात भीती अथवा व्यक्तीगत पक्षपात यांचा अवलंब करता येणार नाही.

क) शिक्षकांच्या सेवाशर्तीमध्ये सुधारणा होणे जरूर आहे. तसेच विद्यार्थी ज्या परिस्थितीमध्ये राहतात व अध्यापन करतात त्यातही सुधारणा झाली पाहिजे. तसेच शाळांचा सहभाग उत्तम होण्यासाठी आवश्यक बाबींचींची पूर्तता केली गेली पाहिजे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या बाबतीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिपूर्तीसाठी, राष्ट्राने त्याच्याबाबतीत दाखविलेल्या विश्वासातून अंमलबजावणीच्या विविध स्तरांवर शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मतांना किंमत राहील. त्यांच्याशी विचार विनिमय केला जाईल. वस्तुतः या संदर्भातील बरीच मोठी जबाबदारी शिक्षक व विद्यार्थ्यांवरच राहील.

ड) शिक्षणक्षेत्रातील नेहमीची एक तक्रार म्हणजे त्यात होणारा राजकीय अथवा व्यवस्थापनाचा असमर्थनीय हस्तक्षेप. सामाजिक, राजकीय अथवा आर्थिक हस्तक्षेपांपासून हे क्षेत्र पूर्णपणे अलग करता येणार नसले तरी त्यात नोकरशाहीच्या किंवा समाजविघातक तत्त्वातून बाहेरून अथवा अंतर्गतद्वारे अथवा राजकीय हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

**शिक्षक**

७. शिक्षकांच्या सेवाशर्तीत अथवा इतर सुधारणेच्या बाबतीत उपाययोजनांबाबत अन्यत्र स्पष्टीकरण करण्यात आले आहे. या संदर्भात तात्कालिक स्वरूपाच्या खाली दर्शविलेल्या बाबी पूर्ण केल्या पाहिजेत.

१) शिक्षकांच्या विभागात दर्शविल्याप्रमाणे शिक्षकांच्या योग्य तक्रारीच्या निवारणासाठी एक यंत्रणा स्थापन करण्यात येईल व त्याद्वारे त्यांच्या योग्य मागण्यांची तात्काळ दखल घेऊन त्या पूर्ण होतील याची खात्री केली पाहिजे.

२) अनुदानित अथवा खाजगी संस्थेतील शिक्षकांना बहुतेक योग्य वागणूक मिळत नाही. अपमानित केले जाते. कमी पगार दिला जातो व पिळवणूक होते, हे सहन केले जाणार नाही व याबाबतीत योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

३) शिक्षकांच्या नेमणुका व बदल्यांच्या बाबत राज्यशासनाकडून मार्गदर्शक सूचना व नियम तयार करण्यात येतील. केंद्रशासन याबाबतीत सर्वसाधारण सल्ला देईल. या मार्गदर्शक तत्त्वांच्या व नियमांच्या अंतिम निर्णयापूर्वी शिक्षक प्रतिनिधींचा सल्ला घेतला जाईल.

४) शिक्षकांनी नेमणुकीच्या/बदलीच्या जागी आपापल्या संस्थात काम करावे अशी अपेक्षा आहे. त्यांनी उपस्थित राहून ठरल्याप्रमाणे नियमितपणे वर्ग घ्यावेत. देशात अथवा परदेशात होणाऱ्या सभा–बैठकांमुळे अध्यापन कार्यक्रमात व्यत्यय येणार नाही हे त्यांनी पाहिले पाहिजे.

हे पाहण्यासाठी व पडताळणी करण्यासाठी योग्य अशी यंत्रणा निर्माण केली जाईल. यात संस्थाप्रमुख/विभागामार्फत विद्यार्थ्यांची उपस्थिती घेणे व एकत्रित नोंदी पाहणे याचा समावेश राहील. जे शिक्षक लोकसभेत प्रतिनिधी म्हणून नियुक्त होतील, निवडून येतील. त्यांना त्यांच्या सदस्यत्वांच्या कालावधीत रजा घ्यावी लागेल. मात्र यामुळे त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर अथवा वेतनवाढीवर कोणताही परिणाम होणार नाही

५) एक व्यापक, खुली, सर्वांचा सहभाग असलेली व आकडेवारीवर आधारित शिक्षण मूल्यमापन यंत्रणा निर्माण केली जाईल. शिक्षकांनी संशोधन व नवोपक्रमांच्या बाबतीत केलेले काम विचारात घेतले जाईल तसेच अध्यापनातील नियमितपणा व दक्षता, समाजसेवा व विस्तार कार्यक्रमांचाही विचार केला जाईल. प्रत्येक राज्यशासन, विद्यापीठ अथवा व्यवस्थापन योग्य 'शिक्षक–मूल्यमापन' यंत्रणा निर्माण करील. सर्वसाधारणपणे त्यात स्वयंमूल्यमापन, बरोबरीच्या गटाने केलेले मूल्यमापन अथवा संस्थाप्रमुख/विभाग अथवा विद्यार्थ्यांद्वारा केलेल्या मूल्यमापनाचा समावेश राहील, अशी मूल्यमापन यंत्रणा नसेल तर शिक्षक स्वयंमूल्यमापन करणार नाहीत असे होणार नाही. बढती व पदोन्नतीच्या वेळी अशा मूल्यमापन साधनांचा उपयोग आवश्यक राहील काही थोडे निष्क्रीय अथवा निष्काळजी शिक्षक यांना वेगळे काढले जाऊन जरूर तेथे त्यांच्या विरुद्ध योग्य ती दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

६) व्यवसायात साजेसे वर्तन न करणारे शिक्षक आढळतात. काही अपवादात्मक बाबतीत, शाळेत नशेत येणे, विद्यार्थ्यांशी अपशब्द वापरणे, विद्यार्थिनींशी गैरवर्तन करणे, अनावश्यक घरकाम करण्यास विद्यार्थ्यांस भाग पाडणे, तसेच विद्यार्थ्यांना खाजगी शिकवण्या लावण्यास प्रवृत्त करणे इत्यादी प्रकार आढळून येतात. विचलित वर्तन सहन केले जाणार नाही. व्यवस्थापनाने व शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या आखत्यारीत असणारे हरप्रयत्न करून, असे गैरप्रकार थांबविले पाहिजेत.

**विद्यार्थी**

८. विद्यापीठात, महाविद्यालयात, शाळांमधून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुखसोयींची स्थिती लक्षणीय प्रमाणात खालावली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी, सायकल शेडसाठी, क्रमिक पुस्तकांचा वेळीच पुरवठा होण्यासाठी व चांगले शिजविलेले अन्न वसतिगृहातून मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना आंदोलन करावे लागल्याच्या घटनाही कमी नाहीत. जवळ जवळ सर्व संस्थांमधून स्वस्त उपहारगृहे, क्रमिक पुस्तके, लेखनसाहित्य इ. पुरविणाऱ्या चांगल्या सहकारी संस्था, मनोरंजन केंद्रे व खेळांच्या सोयी इत्यादींची योग्य गरज आहे. विद्यार्थ्यांना सुखसोयी

पुरविणारे जोमदार कार्यक्रम सर्व प्रकारच्या संस्थांमधून सुरू केले जातील. दरम्यान तात्काळ स्वरूपात खालील कार्यवाही केली जाईल.

१) विद्यार्थ्यांच्या सुखसोयी मधील महत्त्वाच्या उणीवा तात्काळ दूर करण्यासाठी तसेच विद्यार्थी-तक्रार-निवारणार्थ यंत्रणा निर्माण केली जाईल.

२) शिष्यवृत्त्या, उत्तेजनपर बक्षिसे, इत्यादीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या वेळेवर वितरित केल्या जातील. या बाबतीत हयगय करणाऱ्यांना योग्य शिक्षा दिली जाईल.

३) विद्यार्थ्यांना योग्य रीतीने वागविले जाईल व शिक्षणपद्धती अंमलात आणण्यासाठी त्यांचा सहभाग मिळावा यासाठी योग्य ती पावले उचलली जातील.

४) १९६४-६६ च्या शिक्षण आयोगातील मार्गदर्शक तत्त्वां-प्रमाणे प्रत्येक राज्य, विद्यापीठ व महाविद्यालय विद्यार्थी संघटनाच्या बाबतीत निर्णय घेतील. विद्यार्थी संघटनांच्या निवडणुकांमध्ये पैशाचा वापर होणार नाही, गैरवर्तन होणार नाही व इमारतींची खराबी होणार नाही इकडे लक्ष दिले जाईल व यात विद्यार्थ्यांचे सहकार्य घेतले जाईल. विद्यार्थी संघटनांनी लोकशाही पद्धतीने कार्य करावे असा सल्ला त्यांना दिला जाईल व त्यांचे फंड विद्यापीठ हिशोब-तपासनीसांकडून तपासले जातील.

५) बहुसंख्य विद्यार्थी शांततेने, योग्य इतमानाने, शैक्षणिक बाबी, अभ्यास इ. पूर्ण करतात. तथापि काही उपद्रवी गट शैक्षणिक वातावरणात अकारण अशांती निर्माण करतात. शिक्षणक्षेत्रात हिंसा, जुलूम, जबरदस्ती व दहशतीचे वातावरण यांना स्थान नाही. म्हणून विद्यार्थ्यांसाठी आचार-संहिता तयार करून योग्य कायदे, अध्यादेश तयार केले जातील. त्यांचे उल्लंघन करणारास कायद्याप्रमाणे शिक्षा दिली जाईल व गैरशिस्तीचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. शिक्षेपासून कोणालाही सूट मिळणार नाही.

६) काही वेळा विद्यार्थी वसतिगृहे समाजविरोधी तत्त्वांचे आश्रयस्थान बनतात व तेथे राहण्यास पात्र नसलेले लोक तेथे अनधिकृतरीत्या राहतात. इतरत्र हवी असलेली शिस्त येथेही पाहिजे व ती मोडणारा विरूद्ध दखल घेऊन कार्यवाही केली जावी.

**संस्था**

९. संस्थांमध्ये सुधारणा करण्यासाठी विविध कार्यवाहीच्या कार्यक्रमात वेळोवेळी अनेक ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. संस्थांची आंतरिक कार्यक्षमता जसजशी वाढीला लागेल, त्याचप्रमाणात शिक्षक व विद्यार्थ्यांच्या कार्यात सुधारणा होईल. कार्यक्रमात दाखविलेले सर्व उपाय अंमलात येण्याची वाट न बघता काही उपाय संस्थांच्या कार्यात सुधारणा करण्यासाठी तात्काळ योजावे लागतील. या संदर्भात राज्य सरकारे, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा शिक्षण मंडळे व ग्रामशिक्षण समित्या सविस्तर योजना तयार करतील. तथापि खाली दर्शविल्याप्रमाणे काही पाऊले तात्काळ उचलावी लागतील.

१) प्रारंभीच्या काही किमान सोयी सर्व शैक्षणिक संस्थांना उपलब्ध करून दिल्या जातील. त्यात प्रामुख्याने पूर्वी बव्हंशी दुर्लक्षिलेल्या प्राथमिक शाळांना प्राधान्य दिले जाईल.

२) ज्या काही भौतिक सुखसोयी व सुविधा सध्या संस्थांमधून उपलब्ध आहेत. त्या नीटनेटक्या करून योग्य तेथे दुरुस्त्या करून त्यांचा अधिकात अधिक वापर केला जाईल.

३) शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांच्या विभागातील लोकशाही सहभागास कमी न लेखता व्यवस्थापनाची जबाबदारी असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी योग्य ते अधिकार दिले जातील, जेथे शक्य असेल तेथे जबाबदारी पार न पाडणाऱ्या अकार्यक्षम अधिकाऱ्यांना दूर करून त्यांच्या जागी अधिक लायक अधिकारी नेमले जातील.

४) शालेय संस्थांच्या मूल्यमापनासाठी केन्द्रीय आणि राज्यस्तरीय संस्था, उदाहरणार्थ विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय

तंत्र शिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा, राज्य विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा इ. निकष ठरवितील. त्यात खालील बाबींचा समावेश असेल. वर्षातील शैक्षणिक कामाच्या दिवसांची संख्या, कामबंद (अनध्याय) दिवसांची संख्या, परीक्षा आयोजित करण्याच्या कार्यातील नियमितपणा, निकाल जाहीर करण्यासंबंधीचा नियमितपणा, विद्याविषयक सत्रातील नियमितपणा, संशोधनांची संख्या व दर्जा, कामाच्या संदर्भातील दिवसांच्या संबंधात अनुपस्थित राहणाऱ्या शिक्षकांची संख्या हे संस्थानिहाय मूल्यमापन योग्य त्या संस्थेच्या वार्षिक अहवालाच्या रूपाने प्रसिद्ध होतील.

**कार्यपद्धती**

१०. घेतलेले निर्णय व त्यांची अंमलबजावणी करण्यात सर्वांचा वास्तवपूर्ण सहभाग मिळणे याला फार महत्त्व आहे. याला गती देण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, अध्यापक व विद्यार्थी यांचा समावेश असलेली सल्ला देणारी अशी एक योजना राहील. शिक्षक व विद्यार्थी यांच्या तक्रारी निवारण करणारी एक यंत्रणा त्वरित निर्माण केली जाईल. शिक्षकी-पेशाच्या व्यवसाय नीति–निर्धाराचे काम राष्ट्रीय पातळीवरील शिक्षकांच्या, संघटनांद्वारे संयुक्तपणे केले जाईल. मध्यवर्ती शिक्षण सल्लागार मंडळ व राज्य शिक्षण सल्लागार मंडळ यांच्याद्वारे ' पद्धतीच्या अंमलबजावणी ' च्या संदर्भात विशेष समित्या स्थापन करून मूल्यमापन केले जाईल. याच समित्यांमार्फत सुरुवातीच्या स्तरावर प्रत्येक तीन महिन्यानंतर लक्ष ठेवून अहवाल देण्याचे काम केले जाईल ; व विविध स्तरांवरील प्रगतीचे टप्पे कार्यान्वित होत आहेत हे पाहिले जाईल.

□ □ □

प्रकरण १० वे

# पदवी व नोकऱ्या यांतील संबंध तोडणे व मनुष्यबळाचे नियोजन

१. ह्या धोरणामध्ये विद्यापीठांच्या पदव्या व नोकरभरती यातील संबंध तोडण्याचा मानस दिसून येतो. त्यानुसार नोकरभरती करताना विद्यापीठाची पदवी ही आवश्यक गुणवत्ता असण्याची गरज नाही. धोरणात या बाबींवर भर दिला आहे. त्यामुळे विशिष्ट उदयोगलक्षी अभ्यासांचे पाठ्यक्रम निर्माण करण्याचा विचार करावा लागेल.

**कार्यवाहीची पद्धती**

२. निरनिराळ्या नोकऱ्या / व्यवसायासाठी विविध प्रकारचे ज्ञान, कौशल्य व वृत्ती यांची आवश्यकता असते. म्हणून एखाद्या बौद्धिक परीक्षेत संपादन केलेले यश नोकरीसाठी उमेदवाराची निवड करण्यास योग्य साधन ठरणार नाही. कारण श्रेणी/गुण देण्याच्या बाबतीत निरनिराळी विद्यापीठे निरनिराळ्या पद्धती अवलंबितात त्यामुळे निरनिराळ्या विद्यापीठांनी दिलेल्या श्रेणींची तुलना करणे ही आणखी एक समस्या आहे.

३. उपलब्ध असलेल्या नोकरीविषयक संधीच्या दृष्टीने शिक्षणाचा नोकऱ्यांशी मेळ घालण्यासाठी, त्यांच्याशी सुसंगत शिक्षण व प्रशिक्षण यांचे कार्यक्रम आयोजित करणे ही महत्वाची पहिली पायरी होय ह्यासाठी विविध नोकऱ्यांसाठी कोणकोणती कामे करावी लागतात त्याचे शास्त्रीय पृथक्करण करणे आवश्यक आहे तसेच जागांसाठी आवश्यक असलेले नेमके ज्ञान, कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून योग्य असे शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्यक्रम आखावे लागतील.

४. एकदा नोकरीच्या जागांशी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले की विशिष्ट जागांसाठी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण करणारांनाच त्या जागांसाठी पात्र समजले जाईल. यासाठी, कोणत्या जागांसाठी कोणती प्रमाणपत्रे अगर पदविका आवश्यक आहेत हे निश्चित करावे लागेल. व्यवसायाभिमुख शिक्षणास गती देण्यासाठी हा उपाय आवश्यक आहे.

५. ज्या ठिकाणी नोकरभरतीसाठी सर्व समावेशक स्वरूपाच्या प्रवेश परीक्षा नोकरभरती केंद्रे/यंत्रणा यांमार्फत घेतल्या जातात, त्या ठिकाणी पदव्यांखेरीज वरील प्रमाणपत्र/पदविकांचा देखील विचार करावा लागेल.

पदवी व नोकरी यांचा संबंध तोडल्याने पदवी पाठीमागे धावण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल व उच्च शिक्षणावरील भार कमी होईल अशी खात्री वाटते.

६. वरील उपायांची सुरूवात म्हणून डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेलमध्ये एक लहान विभाग उघडावा असे ठरविण्यात आले आहे. वर निर्देशिलेल्या आराखड्याप्रमाणे नोकरभरतीच्या गरजेनुसार व्यवसायांची पाहणी केली जाईल. अशा प्रकारचे सिंहावलोकन करण्यास संबंधीत मंत्रालये/खाती यांच्याशी चर्चा करून आरंभ केला जाईल.

७. तसेच राज्य सरकार, सार्वजनिक संस्था, खाजगी उद्योगधंदे या इतर नोकरभरती करणाऱ्या यंत्रणांना देखील अशाच स्वरूपाची पाहणी करण्यास प्रवृत्त केले जाईल.

८. या धोरणानुसार राष्ट्रीय स्तरावर एक राष्ट्रीय चाचणी सेवा स्थापण्यात येईल. या सेवेमार्फत उमेदवारांची विशिष्ट कामाकरिता पात्रता ठरविण्यासाठी चाचण्या घेण्यात येतील. या चाचण्यांतून देशातील तुलनात्मक क्षमतांचे निकष ठरविण्यास अवसर मिळेल. राष्ट्रीय चाचणी सेवा ही यंत्रणा लवकरात लवकर सुरू करण्याचे योजले आहे. या सेवेमार्फत १९८७ च्या वर्षअखेरीपूर्वी पहिली चाचणी घेण्याचे ठरले आहे.

९. या धोरणाला आकार देण्यासाठी राष्ट्रीय चाचणी सेवा ही यंत्रणा लवकरात लवकर सुरू करण्याचे योजिले आहे. या सेवेमार्फत १९८७ च्या वर्षाखेरीपूर्वी पहिली चाचणी घेण्याचे ठरले आहे. परंपरागत पद्धतीने ज्या नोकऱ्या फक्त पदवीधरांनाच मर्यादित होत्या अशा विविध उद्योगांसाठी चाचण्या घेऊन नोकर भरती करण्याचा प्राथमिक हेतू, लोकांना पदव्या असोत वा नसोत, सर्वांना आपणही विविध जागांसाठी पात्र आहोत, हे या चाचणीतून दाखवून देण्याची संधी देणे हा आहे. अशा प्रकारच्या चाचण्यांची नोकरीत असणाऱ्यांना बढतीसाठी आवश्यक कार्यक्षमता संपादण्याच्या कामी मदत होण्याची शक्यता आहे.

१०. विविध पातळयांवर शैक्षणिक संस्थांत प्रवेशासाठी मुद्दाम आयोजित केलेल्या विशेष चाचण्यांची अंमलबजावणी राष्ट्रीय पातळीवर शक्य आहे. उदा. राष्ट्रीय पातळीवर घेतली गेलेली एक साधी + २ पातळीची चाचणी, विद्यापीठ, कॉलेज यात प्रवेश घेण्यासाठी घेण्यात येणाऱ्या पुष्कळशा प्रवेश परीक्षांची जागा घेऊ शकेल. विशेषत: अभियांत्रिकी, वैद्यकीय इ. व्यावसायिक पाठ्यक्रम, त्याचप्रमाणे पदवी पातळीवर घेतल्या गेलेल्या चाचणीवरून संबंधित विद्यापीठांनी पदवी परीक्षेचे निकाल जाहीर करण्यापूर्वीदेखील उमेदवारांचो पदव्युत्तर प्रवेशास पात्रता आहे किंवा नाही हे ठरविणे शक्य होईल.

११. वर दर्शविलेली कार्ये करण्यासाठी व चाचणी सेवेचा लाभ ऐच्छिकरीत्या घेता यावा म्हणून राष्ट्रीय चाचणी सेवांची वाढ करावयाचे ठरविले आहे. चाचण्या अतिशय काळजीपूर्वक तयार केलेल्या असतील व तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या अनुभवांवर आधारलेल्या असतील. राष्ट्रीय चाचणी सेवा मानवी साधनसंपत्ती मंत्रालयाच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात येईल. मानवी साधनसंपत्ती मंत्रालयातील शिक्षण विभागाने चाचणी सेवांच्या कार्यालयाच्या स्थापनेसाठी प्रकल्पाचा तपशीलवार अहवाल तयार करण्यास त्वरित पावले उचलावीत.

□ □

प्रकरण ११ वे

# संशोधन व विकास

## विभाग–१

**सद्य:स्थिती**

१. संशोधन व विकासाचा संबंध निसर्ग व समाजविज्ञान, मानव्यशास्त्र, तंत्रज्ञान, कृषि व वैद्यक शास्त्रातील विविध शाखा यांच्याशी आहे. यातील काही समस्यांचा गोषवारा खाली दिला आहे.

**विज्ञान व तंत्रज्ञान रचना**

२. स्वातंत्र्यानंतर विविध ज्ञान शाखांतील कौशल्य क्षमता वाढविण्याचा बहुमोल प्रयत्न करण्यात आला. ठळक असा गुणात्मक विकास शिक्षण क्षेत्रात झाल्याचे दिसून येत आहे. यांत्रिको आणि तंत्रज्ञान क्षत्रात सन १९४७ पासून प्रवेश संख्या ३००० पासून ४०००० पर्यंत वाढली. सध्या देशात १०८ विद्यापीठे, सहा तंत्रज्ञान संस्था, १११ वैद्यकोय महाविद्यालये आणि ५००० हून अधिक विविध प्रकारची कृषि महाविद्यालये, पशु वैद्यकीय महाविद्यालये, यांत्रिकी महाविद्यालये, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालये आहेत. देशात ३२० विज्ञान व तंत्रज्ञान संस्था आहेत. त्यांपैकी २५० मोठ्या विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थांचा वार्षिक खर्च २.५ कोटी इतका आहे. वरील २४० मोठ्या संस्थांपैकी २१६ संस्था अणुशक्ती विभाग, पर्यावरण विभाग, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद, भारतीय कृषि संशोधन परिषद, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, सुरक्षा संशोधन व व्यवस्थापन संघटना, अणुशक्ती विभाग व विद्युत विभाग अशा प्रकारच्या होत. देशात शासकीय आणि खाजगी क्षेत्रात संशोधन व विकास यांवर काम करणाऱ्या अंदाजे ९०० प्रयोगशाळा आहेत.

संशोधन व विकास क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांची संख्या ३० लाखाच्या जवळपास आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत संशोधन व विकास यांवर वार्षिक योजनेत २० कोटी रुपये खर्च मान्य केला होता. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी हा खर्च ३४०६ कोटी रुपये पर्यंत करण्यात आला.

३. याच काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान यासाठी मोठ्या प्रमाणावर रचनेत बदल झाला आहे. याच काळात अनेक विशेष विषयांवर आधारित विज्ञान व तंत्रज्ञानासाठी वेगवेगळे विभाग उच्च पातळीवर उघडण्यात आले आहेत. नजीकच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून कृषि क्षेत्राचे व्यावसायीकरण झाले आहे. कृषि क्षेत्रातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कृषि क्षेत्रात झालेली प्रगती, संशोधन आणि विकास पुढील संशोधनासाठी उपलब्ध आहे. वैद्यकीय क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे असाध्य रोगांवर मात करण्यात आली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाचे जाळे दूरवर पसरले आहे. अणुशक्तीच्या क्षेत्रात ऊर्जा उत्पादनात लक्षणीय वाढ झालेली आहे. ऊर्जानिर्मितीसाठी यंत्रसामुग्री तयार करणे, ऊर्जा शक्तीचे वितरण इत्यादी क्षेत्रात तर प्रगतीचा एक विशिष्ट टप्पा गाठला आहे. पर्यावरण तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे राष्ट्राची सामाजिक व आर्थिक उन्नती साध्य झाली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दूरसंचार आणि विजकशास्त्र यांच्या कार्यक्षमतेचा विकास पर्याप्त प्रमाणात झाला आहे. याचप्रमाणे सागरविषयक तंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान आणि पर्यावरण संशोधन या क्षेत्रात पण लक्षणीय प्रगती झाली आहे. १८ राज्ये व ४ केन्द्रशासित प्रदेशात विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषदांची स्थापन करण्यात आली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषदांतर्गत विज्ञान आणि औद्योगिक संशोधन क्षेत्रात पूरक योजना प्रारंभ करण्यात आली आहे. गेल्या १० वर्षात औद्योगिक क्षेत्राचा विविध प्रकारे विस्तार झाला आहे. औद्योगिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचे अद्यावत आधुनिकीकरण करण्यात आले आहे. इतर क्षेत्रांचाही येथे उल्लेख करणे योग्य होईल. सुस्पष्ट उद्दिष्टये व कार्यपद्धती यांचा विचार करून भारतीय शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांनी राष्ट्राच्या

आशाआकांक्षा पूर्ण केल्या आहेत. अशाच प्रकारच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून इतर क्षेत्रातही प्रगती साध्य केली आहे.

४. जगातील विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील झालेल्या प्रगतीच्या संदर्भात राष्ट्रीय प्रगतीच्या स्वरूपात व आकारमानात, वर्तमान समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे. तरी पण विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताने केलेली प्रगती इतर प्रगत देशांच्या तुलनेत फारच कमी दिसून येत आहे. याकरिता विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तफावत दूर करण्याची नितांत गरज आहे. तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञानकौशल्य विकसित करण्यावर विशेष भर देणे गरजेचे आहे. औद्योगिक क्षेत्रात देशांतर्गत कार्यपद्धतीत विविधता दिसून येते. ही विविधता देशातील विविध वैज्ञानिक संस्था, राष्ट्रीय प्रयोगशाळा, औद्योगिक संस्था तसेच शिक्षण क्षेत्रातील साधन--सुविधा व क्षमता यात विशेषकरून आढळते. विशेषकरून उर्वरित क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती साध्य करता आली नाही. या प्रगतीतील उणीवांचे मूळ जर शिक्षण क्षेत्रात असेल तर यावर उपाययोजना त्वरित हाती घेण्यात यावी व राष्ट्रीय संशोधन व उत्पादन पद्धतीत सुधारणा करण्यात यावी. काही संस्थांतून मर्यादित संख्येतच तज्ज्ञ बाहेर पडतात, पण विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात आज तज्ज्ञांच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या कार्यपद्धती व उत्पादन पद्धती यांच्यात ताळमेळ दिसून येत नाही. प्रोत्साहनाच्या अभावामुळे विद्यापीठे, राष्ट्रीय प्रयोगशाळा, वैज्ञानिक संस्था व उच्च शिक्षण या क्षेत्रात मरगळ आल्याचे दिसून येते. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात तज्ज्ञांची संख्या आणि समोर उभी असलेली आव्हाने यांचा विचार केला तर जगातील कोणत्याही क्षेत्रात हीच स्थिती दिसून येते. तज्ज्ञांच्या गुणवत्ता विकासात वरीच तफावत दिसून येते. यापुढे असेही म्हणता येईल की अशा तज्ज्ञ व्यक्ती मोठ्या प्रमाणात विज्ञान किंवा तंत्रज्ञान कार्यात गुंतलेल्या दिसून येत नाहीत. देशाच्या गरजांचा विचार केला तर असे दिसून येईल की, संशोधन आणि विकास या क्षेत्रात संख्यात्मक व गुणात्मक अभाव दिसून येतो. त्यांचा ताळमेळ बसत नाही. विज्ञान

आणि तंत्रज्ञान उपक्रमासाठी विशेष सवलती देण्यात आल्या असल्या तरी या क्षेत्रातील मनुष्यबळावर फार कमी जोर देण्यात आला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात ज्यांना पुढाकार घेता येईल असे तंत्रज्ञ संधीच्या अभावाने देशाबाहेर जातात किंवा देशातच इतर क्षेत्रात संधीच्या शोधात आपली शक्ती वाया घालवितात. आज या क्षेत्रात अशा श्रेष्ठ बुद्धिवंत तंत्रज्ञ विद्यार्थ्यांनी संशोधन हा व्यवसाय म्हणून स्वीकारण्याची आवश्यकता आहे. अशा तंत्रज्ञांनी बाहेर जाऊ नये, याच क्षेत्रात काम करावे याकरिता त्यांना विविध सोयी उपलब्ध करून देण्याच्या तंत्रबद्ध प्रयत्नांची गरज आहे. उदा. वेतन व भत्ते, प्रोत्साहनपर आर्थिक लाभ, बढती, स्वयंव्यवसाय, विकासाची संधी, समतोल औद्योगिक पर्यावरण, विशेष करून निवासाची सोय आजची महत्त्वाची गरज होय. अशा तज्ञ व्यक्तींना या क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी आजच्या शिक्षण पद्धतीत तरतूद असली पाहिजे.

५. तथापि आज विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मनुष्यबळ पर्याप्त प्रमाणात आवश्यक आहे. संशोधन क्षेत्रात एकूण पटसंख्या अंदाजे ४५००० इतकी आहे, आणि त्यापैकी दरवर्षी फक्त ६५०० व्यक्ती पदवी घेऊन बाहेर पडतात. या पदवीचे शेकडा प्रमाण पुढीलप्रमाणे आहे. विज्ञान ४५ टक्के, तंत्रज्ञान २.४ टक्के व वैद्यक क्षेत्रात हे प्रमाण १ टक्का एवढेच आहे. संशोधन संस्थांत प्रवेश क्षमता फारच कमी आहे. विद्यापीठ अनुदान मंडळ किंवा भारतीय तंत्रज्ञान परिषद यांनी उच्च-शिक्षण क्षेत्रात विशेष सहाय्यता विभाग किंवा गुणवत्ता केंद्र यांची स्थापना केली आहे; पण यांच्यात ५ टक्के संस्था किंवा विभागांचा समावेश पण करता आलेला नाही. अनेक अडचणी असतानाही विद्यापीठातील संशोधनाने या संस्थांचे प्रयत्न चालू ठेवण्यासाठी महत्त्वाचे योगदान केले आहे. आजही अनेक संशोधन संस्थांत असे दिसून येते की, संशोधनाचा दर्जा वाढलेला नाही. अशा संस्थेत अनेक वरिष्ठ आणि तरूण तज्ञ काम करीत आहेत पण तरीही अनेक संस्थात संशोधन सुविधांची स्थिती समाधानकारक नाही. अनेक प्रकल्पांना परदेशातून अर्थसहाय्य मिळत आहे पण या संस्थांतील सदोष कार्यपद्धतीमुळे या सोयीचा अनेक संस्थांना लाभ मिळत नाही. अर्थ सहाय्याच्या अभावामुळे

कार्यपद्धतीतील सुधारणा, तसेच इतर अनेक बाबींवर होणारा खर्च मोठ्या प्रकल्पात संपुष्टात येतो. थोडा फार शिल्लक पैसा आणि सोयीही अशाप्रकारच्या संस्थेत हळूहळू बंद होत आहेत. येथे एक महत्त्वाची उल्लेखनीय बाब म्हणजे या क्षेत्रात विद्यावाचस्पतिंची संख्या विशिष्ट प्रमाणात दिसून येते. तरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काही महत्त्वाच्या क्षेत्रात तज्ञांची उणीव दिसून येते. असेही लक्षात आले आहे की, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात उपलब्ध साधन–सोयींचा उपयोग केला जातो पण त्यांचा आपसात समन्वय दिसून येत नाही.

## समाज विज्ञान आणि कला

६. समाज विज्ञान आणि कला क्षेत्रात संशोधन व प्रशिक्षण संस्थांची वाढ झपाट्याने झाली. आज देशात २०० संशोधन संस्था आहेत, त्यांपैकी २० टक्के संस्थांना शासकीय सहाय्य उपलब्ध आहे. राष्ट्रीय समाज विज्ञान संशोधन परिषद, राष्ट्रीय इतिहास संशोधन आणि राष्ट्रीय संशोधन परिषद यांना संशोधन कार्याला सहाय्य दिले आहे. तसेच राष्ट्रीय समाज विज्ञान संशोधन परिषदेने राज्य सरकारच्या सहाय्याने २० संस्था उभ्या केल्या आहेत. अनेक विद्यापीठांच्या उच्च-शिक्षण केंद्रे, विशेष सहायता विभाग इत्यादींमध्ये मानववंश शास्त्र, भाषा, पुराणवस्तु संशोधन, शास्त्र, संगीत आणि संगीतशास्त्र या विषयांचे अध्यापन कार्य होत आहे. दरवर्षी विविध विषयांत अंदाजे २४०० विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पति पदवी देण्यात येते. ही एकूण संख्येच्या ३८ टक्के आहे. व्यावसायिक क्षमता वाढविण्याचा बराच प्रयत्न करण्यात आला आहे. तरीपण अनेक संस्थांत संशोधनात्मक गुणवत्ता उपक्रमाचा असमतोल दिसून येतो. या संस्थांत संशोधन करण्यासाठी हाती घेतलेले विषय राष्ट्रीय विकासाशी सहसा निगडित दिसून येत नाहीत, पण शैक्षणिक संदर्भाशी संबंधित दिसून येतात, तसेच रचनात्मक निर्णयांशी त्यांचा फारसा संबंध दिसून येत नाही. मूलभूत संशोधनाचे महत्त्व कमी न करता विद्यार्थ्यांनी सामाजिक विज्ञान संशोधनात रचनात्मक निर्णयाशी निगडित ज्ञान देणारे संशोधन-कार्य केले पाहिजे. असे झाले तर त्यांचा विकास क्षेत्रात उपयोग करता येईल. अभ्यासक्रम आणि संशोधनातील निष्कर्ष यांच्यातील संबंध जुळलेले दिसून येत नाहीत. तसेच सामाजिक

विज्ञानातील केलेले संशोधन आणि दुसऱ्या क्षेत्रात केलेल्या संशोधनांबाबत थोडे फार धागे जुळलेले दिसून येतात. या सह-संबंधांच्या अभावामुळे एकाच प्रकारच्या मानव स्वभावाची निर्मिती होणाचा धोका संभवतो.

**मुख्य समस्या व उणीवा**

७. संशोधन क्षेत्रात काही महत्त्वाच्या समस्या उच्च शिक्षण संस्थात दिसून येतात त्यांचा खाली निर्देश केला आहे.

१) संशोधन व संशोधनासाठी केलेले प्रयत्न यांची असमतोल विभागणी, अनेक संस्थांत एकाच विषयावर भर दिला जातो त्यामुळे त्या क्षेत्रात असमतोल निर्माण होतो. संशोधन आणि विकास क्षेत्रातील गरजांनुसार सर्व संस्थांमधून एकाचवेळी उत्कृष्टता निर्माण करण्याची व त्यावर भर देण्याची मोहीम हाती घेतली पाहिजे.

२) संशोधनात योग्य वातावरण व गती टिकवून ठेवण्यात, अघघड कायदे व कार्यात्मक पद्धती, तसेच माहिती पुरविण्यासाठी अपुरी साधने, यांचा प्रभाव दिसून येतो.

३) तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनात योग्य अशा सहसंबंधांचा अभाव दिसून येतो. विशेषकरून औद्योगिक क्षेत्रात गरजेनुसार उत्पादन, आणि मूलभूत संशोधनात पूरक माहिती पुरविणारे तंत्रज्ञान यांचा अभाव जाणवतो. तंत्रज्ञानातील संशोधन झपाट्याने पुढे न जाण्याचे कारण म्हणजे तांत्रिक क्षेत्रातील उच्च प्रतीचे ज्ञान संपादन केलेले तज्ज्ञ लोक इतर क्षेत्रातील नोकरी अधिक फायद्याची समजतात व ती स्वीकारतात.

४) वर्तमान तंत्रज्ञान क्षेत्रात सुधारणा करण्याच्या दृष्टीने फारच थोडे संशोधन कार्य झाले आहे, तसेच ग्रामीण व शहरी भागातील गरजांवर आधारित संशोधनाचा उपयोग फारच थोड्या प्रमाणात झालेला दिसून येतो. उत्पादन वाढविणारे तंत्रज्ञान, तसेच कार्यपद्धतीत सुधारणा करणाऱ्या संशोधनाचा विकास झालेला दिसून येत नाही. आयात केलेल्या तंत्रज्ञानांचा पण स्थानीय संदर्भात यथायोग्य उपयोग केलेला दिसून येत नाही.

५) शिक्षण क्षेत्रात प्रयोग करणाऱ्या वैज्ञानिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. शिक्षण क्षेत्रात अध्यापन कार्यापेक्षा प्रयोग करणाऱ्यांना अनेक अडचणींशी सामना करावा लागत आहे. शिक्षणात प्रयोग चालू ठेवण्यास लागणारा खर्च आणि तंत्रसहाय्य यांचा समाधानकारक पुरवठा होत नाही.

६) संशोधनातील विकास व नवोपक्रम हे सुसंघटित संस्थांच्या गरजांवर आधारित दिसून येतात. खाजगी संस्थांना, लघुउद्योगांना तसेच ग्रामीण भागातील विविध संस्थांना संशोधनाचा पर्याप्त फायदा मिळत नाही.

७) विद्यापीठातील संशोधन केन्द्र किंवा संशोधन आणि विकास विभागांच्या औद्योगिक क्षेत्रातील प्रयोगशाळा यांच्यात सहकार्य व सहसंबंधाच अभाव दिसून येतो.

८) वैयक्तिकरीत्या विकसित केलेल्या संशोधनाचा वापर व विस्तार करण्याकडे पण फारसे लक्ष दिले जात नाही. संशोधन आणि विकास यांस अनुकूल असणारी व्यवस्थापन पद्धती अभावानेच आढळते.

९) संशोधन आणि विकास या क्षेत्रात गुणवत्ता आणि उत्कृष्टता यांवर फारच थोडा भर देण्यात येत आहे. उत्कृष्टता, संपादन क्षमता आणि कार्यक्षमता यांना सतत प्रोत्साहन देण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. तो केला जात नाही.

१०) संशोधनात समस्या निवडीमध्ये सहसा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रकाशित होणाऱ्या मासिकांचा उपयोग केला जातो.

११) संशोधनात फारशी गुणवत्ता आली आहे किंवा फारच उणीवा भासत आहेत असे निश्चितपणे म्हणता येणार नाही. संशोधनात परंपरागत पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. विविध विषयांतील आंतरप्रक्रियेने अद्याप मूळ धरलेले दिसून येत नाही.

१२) अनेक संशोधन संस्थांतील उपलब्ध साधन सोयींचा उपयोग इतर संशोधन संस्थांत क्वचितच करण्यात येतो. अशा साधनसोयी विशिष्ट संस्थांच्या किंवा व्यक्तींच्या मालकीच्या समजण्यात येतात.

१३) संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या सुसज्ज प्रयोगशाळांत सुद्धा सुटया भागांची, वारंवार उपयोगात येणाऱ्या वस्तूंची, अल्पकाळ उपयोगी पडणाऱ्या साधनसाहित्याची उपलब्धता असत नाही. तसेच या प्रयोगशाळा चालवणाऱ्या संस्थांना अधिक खर्चासाठी आर्थिक साहाय्य दिले जात नाही..

१४) तंत्रज्ञानाचे निरीक्षण करणे, त्याचे मूल्यमापन करणे व आलेल्या निष्कर्षांचे पुढील संशोधनासाठी संशोधकांना मार्गदर्शन करणे या बाबींसाठी कोणतीही यंत्रणा सध्या उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे झालेल्या संशोधनाचा विकासासाठी उपयोग करून घेणाऱ्या संस्थाही संशोधन कार्याला पुरेशी आर्थिक किंवा प्रशासकीय मदत देऊ शकत नाहीत.

१५) अपूर्ण ग्रंथालय, असमाधानकारक सूचना पद्धती, संगणक सोयींचा अभाव तसेच रेखाटन सोयींचा अभाव अनेक संस्थांतून दिसून येतो. अनेक संशोधन संस्थांत जुनाट संशोधन पद्धतीच चालू आहेत. आधुनिक पद्धतीने संशोधन करणे व जुनाट पद्धतीचे उच्चाटन करणे ह्या आजच्या गरजा आहेत.

१६) विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थांना मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता आहे. संशोधन आणि विकास यांच्यासाठी मनुष्यबळ वाढविणे तसेच अभ्यासक्रमावर आधारित संशोधनासाठी अर्थसहाय्य आणि इतर सहाय्य मिळविणे आवश्यक आहे.

१७) काही मंत्रालयांना या विभागांना संशोधन कार्यासाठी अर्थसहाय्य देण्यात आले आहे पण त्यांची संख्या फारच थोडी आहे. तसेच त्यांच्या प्रयत्नात एकरूपता किंवा समन्वय दिसून येत नाही.

१८) ज्या ठिकाणी परदेशातून विशेष उपकरणे वा रसायने मागविण्याची गरज आहे तेथे आज आयात करमाफी देणे किंवा ना हरकत प्रमाणपत्र मिळविणे हे गुंतागुंतीचे व वेळेचा अपव्यय करणारे झाले आहे.

१९) विद्यापीठात आजची नोकरभरतीची पद्धती गैरव्यवहाराला जन्म देणारी आहे.

२०) भारतात संशोधन आणि विकास क्षेत्रात अनेक वैज्ञानिक कार्यरत आहेत. पण त्यांच्या गुणवत्ता विकासावर विशेष भर दिला पाहिजे.

२१) संशोधनातील विविध उपक्रम आणि शिक्षण पद्धतीतील विकास यांच्यातील परस्पर संबंध फारच दुरावलेले आहेत. संशोधनाचा उपयोग शिक्षणात नवोपक्रम पद्धतीतील विकास व अभ्यासक्रमाचे नूतनीकरण करण्यासाठी झाला पाहिजे. आज शिक्षण क्षेत्रात संशोधन आणि विकास साध्य करण्यासाठी व्यवस्थापनाच्या मुख्य सूत्राचा अभाव दिसून येतो. तसेच व्यवस्थापन व कार्यपद्धतीतही सुसूत्रता दिसून येत नाही.

२२) समाज विज्ञानातील संशोधनाचा संबंध विकासातील विविध समस्यांशी निगडित झालेला दिसून येत नाही, किंवा संशोधनातील उपलब्ध निष्कर्ष ध्येय धोरणे तयार करणारांना देखील फारसे उपयोगी पडत नाहीत. अभ्यासक्रम आणि संशोधन यांच्यात परस्पर सहसंबंध देखील मजबूत असलेले दिसून येत नाहीत.

२३) समाज विज्ञानातील केलेले संशोधन कार्य एकाच क्षेत्रात दिसून येते. आंतरविद्याशाखा वा दुसऱ्या शाखेत भरपूर प्रकल्प हाती घेतले आहेत असे दिसून येत नाही. (मानव विद्या शाखा) कलाक्षेत्र आणि सामाजिक विज्ञानात परस्पर सहसंबंध दर्शविणारे संशोधन आणि विकास यांची नितांत गरज आहे.

# विभाग – २

## उच्च शिक्षण व संशोधन यांचा परस्परपूरक संबंध

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षण व संशोधन यांबाबत दिलेली आश्वासने

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणातील संशोधनावर, तो एक महत्त्वाचा घटक समजून विशेष भर देण्यात आला आहे. ज्यामुळे शिक्षणपद्धतीला नवीन ज्ञान, प्रेरणा, उत्तेजन व गतिशीलता मिळेल. उच्च शिक्षण आणि संशोधन यात फारच जवळचे नाते आहे. उच्च शिक्षणास मोठ्या प्रमाणात सहाय्य दिल्याशिवाय संशोधनाची कल्पना करणे शक्य नाही. तसेच कृतिशीलता व संधी यांशिवाय उच्च शिक्षण गतिहीन व निर्जीव वाटण्याची शक्यता आहे. विशेष करून राष्ट्रीय प्रगती साध्य करण्यात विज्ञान आणि तंत्रज्ञान, सांस्कृतिक, आर्थिक व राजनैतिक पद्धती व समस्या, यांवर जे विविध संस्थांतून संशोधन होते त्यांनी राष्ट्राची प्रगति साध्य करण्यात मोठा हातभार लावला आहे. यातून आत्मविश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. औद्योगिक क्षेत्रात सतत स्पर्धा टिकवून ठेवण्याचे काम जगातील विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेतील केलेल्या संशोधन-कार्यांनी केले आहे. याचा उल्लेख राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (परिच्छेद २.३ मध्ये) केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सहजरीत्या अनेक परिच्छेदांतून संशोधन विषयक उल्लेख केलेला आहे. (उदा. परिच्छेद २.३, ३.९, ५.३२, ६.१३ आणि ८.३).

२. आज ज्ञानाच्या . वध क्षेत्रात होत असलेल्या संशोधन कार्यास प्रेरणा दिली गेली पाहिजे. उदा. विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक-विज्ञान, मानवशास्त्र, संस्कृती, कला आणि भाषा विषयातील विविध शाखा यांना संशोधनासाठी उत्तेजन मिळाले पाहिजे. तद्नुसार उच्च शिक्षणातील प्रत्येक संस्थेने संशोधनात सक्रिय भाग घेतला पाहिजे आणि संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या प्रगतीचे मोजमाप संशोधनातील केलेल्या प्रगतीवरून झाले पाहिजे.

### संशोधनाचा अर्थ आणि व्याप्ती

३. संशोधन म्हणजे फक्त विद्यावाचस्पति पदवी मिळविणे नाही. ही कल्पना संशोधन करणाऱ्या संस्थांनी सोडून दिली पाहिजे. संशोधन

म्हणज नवनवीन कार्यपद्धतीचा अवलंब करणे, कार्यातील प्रगति साध्य करणे, वस्तुस्थितीतील संबंध शोधणे होय. संशोधन म्हणजे अवलोकनातून अज्ञाताचा शोध घेणे, चौकशीच्या विविध पद्धतीतून प्रयोग करणे, तसेच वस्तुनिष्ठपणे अचूक विश्लेषण करणे आणि निर्णय तयार करणे होय. संशोधन क्षेत्रात पदवी घेणाऱ्या आणि पदव्युत्तर संशोधन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण करणे, प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणे, वैज्ञानिक, तांत्रिक, समाजविज्ञानातील अंतर्भूत समस्या वा अशा स्वरूपाच्या समस्या यांच्याशी संबंधित प्रकल्प हाती घेणे इत्यादि संशोधनपर कार्य करणे आवश्यक आहे. असे संशोधन करून त्यांनी राष्ट्रीय समस्या सोडविण्यात रचनात्मक हातभार लावावा. सामाजिक आणि सांस्कृतिक अवशेषांचा अभ्यास करावा. विज्ञानातील फायद्यांचा अभ्यास करावा. उदा. पर्यावरणातून निरामय नद्या, लहान कुटुंब, अशा समस्यांचा विशिष्ट भागात जाऊन अभ्यास करावा आणि अडथळे कसे दूर करता येतील याविषयी आपले विचार मांडावे. तसेच परंपरागत विचारसरणीचा त्याग करून उत्कृष्टतेकडे वाटचाल करणाऱ्या संस्कृतीचा विचार करणारी माणसे संशोधन क्षेत्रात व्यावहारिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतील. अभ्यासक्रमांतर्गत उपक्रम, अध्यापन पद्धतीतील बदल, मूल्यमापन पद्धतीतील सुधारणा इत्यादी क्षेत्रात संशोधन केले पाहिजे आणि उपलब्ध साधन-सोयींच्या संदर्भात विविध संस्थांनी छोटे छोटे संशोधन प्रकल्प हाती घेतले पाहिजेत. असे संशोधन अतिशय उपयुक्त होईल.

### मूलभूत व संबंधित संशोधन

४. संपूर्ण जगातील विद्यापीठे आणि उच्चशिक्षण संस्था मूलभूत संशोधन क्षेत्रात मोलाची कामगिरी करीत असल्यामुळे त्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आजच्या या विज्ञानावर आधारित उद्योगक्षेत्रात व सुरक्षा यंत्रणेत लक्ष्यवेधी संशोधनाला मूलभूत संशोधनाचे स्वरूप देऊन पुढे येणाऱ्या व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी या ज्ञानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करता येईल. (आज राष्ट्रीय अंदाजपत्रकात सुरक्षा व्यवस्थेवर जास्त खर्च करण्यात येतो.) या संशोधनातून उपलब्ध ज्ञानाच्या आधारे वर्तमान राष्ट्रीय समस्या सोडविण्यास सहाय्य होईल मूलभूत संशोधन करणे हे विद्यापीठाचे एक मोठे वैशिष्ट्य आहे आणि

कृति संशोधनही अंशतः महत्त्वपूर्ण आहे. विद्यापीठातील संशोधन क्षेत्रात कार्य करण्यास योग्य असे वातावरण निर्माण करणे शक्य झाल्यास, तसेच तरूण पिढीला सतत या क्षेत्रात प्रवेश मिळाल्यास विद्यापीठातील संशोधनातील विविध ज्ञान शाखांचा यथायोग्य विकास होईल. देशाला प्रगतिपथावर वाटचाल करण्यासाठी संस्थेतील चालू संशोधनास योग्य दिशा दिली गेली. अनेक क्षेत्रांतील विविध समस्या त्वरित सोडविण्याची क्षमता निर्माण केली तर, तंत्रज्ञान विकसित होण्यास व सामाजिक व आर्थिक विकासाकडे वाटचाल करण्यास सहाय्य होईल. राष्ट्राला या संशोधनातून समाजाचा चिकित्सात्मक अभ्यास करण्यास, वाढ आणि विकास यांचे सांस्कृतिक स्वरूप निश्चित करण्यास, सहाय्य होईल. यातूनच राष्ट्राची चांगली प्रगति साध्य करता येईल.

**संशोधनातील गुणवत्ता**

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात संशोधनाच्या वैशिष्ठ्यांचा विचार करण्यात आला आहे. त्याच्या संदर्भात संशोधनातील महत्त्वाच्या सूचनांचा उपयोग करता येईल. संशोधनात गुणवत्ता असावी यावर दुमत होणार नाही. परिच्छेद ५.३२ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे उच्च गुणवत्ता येण्याची आवश्यकता आहेच. ज्यात गुणवत्ता नाही; जे समाजास उपयोगी नाही, किंवा ज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात जे महत्त्वपूर्ण योगदान करणार नाही असे संशोधन कमीत कमी असेल याची दक्षता घेतली पाहिजे. ज्या संशोधनाचा ज्ञानाच्या कोणत्याही शाखेशी संबंध नाही किंवा ज्याची गुणवत्ता तपासणे कठीण होईल अशा संशोधनास फारसा वाव देता येणार नाही.

**अनुबंध, प्रसार, नियोजन आणि धोरण**

६. संशोधन क्षेत्राला वाढीव सहाय्य देणे आवश्यक आहे. यात संशोधनातील आर्थिक आणि ज्ञानात्मक उपलब्धीचा विचार झाला पाहिजे. संस्थांना भक्कम आधार दिला पाहिजे, तसेच विविध कार्यक्षेत्रातील होणारा खर्च मान्य झाला पाहिजे. (परिच्छेद ५.३२) या करिता उच्च शिक्षण संस्था, संशोधन संस्था आणि विशेष करून शासनाने स्थापित केलेल्या संस्था, तसेच औद्योगिक उत्पादन क्षेत्र

यांच्याशी सहकार्य व सामंजस्य स्थापित झाले पाहिजे. या सर्वांचा सहसंबंध उत्पादन क्षेत्राशी जोडण्यात आला पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील विविध ठिकाणी या संदर्भात उल्लेख केला आहे. (परिच्छेद ३.९, ३.१२, ५.३०, ५.३४, ६.१४ आणि ८.३) उच्च शिक्षणातील संस्थांच्या पसरलेल्या जाळयांत विविध प्रकारचे संशोधन हातो घेतलेले आहे. त्यात काहींनी दुसऱ्याच्या सहकार्याने कार्य सुरू केले आहे. या अशा प्रकारच्या उपक्रमांना अधिक अर्थ व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे अर्थसहाय्य सतत चालू ठेवले पाहिजे. उत्तम प्रकारचे, अधिकाधिक निष्कर्ष मिळावे, या करिता गुणवत्ता टिकविण्यावर भर देणे, आपसात समन्वय व मूल्यमापन करण्यासाठी योग्य असे नियोजन करणे आवश्यक आहे. संशोधन क्षेत्रात प्रगति साध्य करण्यासाठी दूरदृष्टीची आवश्यकता आहे. उच्च शिक्षण संस्थांतील होणाऱ्या संशोधनास राष्ट्रीय पातळीवर प्रोत्साहन आवश्यक आहे उच्च शिक्षण संस्थांना राष्ट्रव्यापी संशोधन करण्याकरिता साधनसोयी उपलब्ध करून देण्यासाठी एक यंत्रणा उभारणे आवश्यक आहे, यात कोणतीही शंका नाही वा दुमत नाही. विविध संशोधन संस्थांना स्वायत्तता देणे आवश्यक आहे. स्वायत्त व्यवस्था म्हणजे अडचणी कमी करणे आणि अधिकाधिक सोयी उपलब्ध करून देणे. गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील आंतरप्रक्रिया सहज होण्यासाठी विद्यापीठावर स्थानीय दबाव कमी झाला पाहिजे आणि गुणवत्ता वाढीत कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता आणि कार्यवाही यांचा खालील प्रमाणे संक्षिप्त निर्देश केला आहे.

**अ) उच्च शिक्षण संस्थांतील संशोधन : एक अंतर्भूत घटक**

१) अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धती यात मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला पाहिजे. विशेषतः समस्या सोडविण्याचे तत्त्व, कृतिशीलता व सामाजिक संदर्भ यात बदल होणे आवश्यक आहे. याकरिता मोठ्या प्रमाणावर शिक्षकाचे उद्बोधन झाले पाहिजे तरच संशोधन आणि विकास यात समान वितरण दिसून येईल.

२) अनेक संस्थांतून विविध विषयात संशोधन करण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. त्याला निवडक व वाढता आधार दिला पाहिजे. अध्यापन कार्यास आवश्यक, कमीतकमी सोयी व्यतिरिक्त संशोधन करण्याच्या क्षमता विकसित झाल्या पाहिजेत. या संस्थेतील आंतर कार्यपद्धती, विशेषकरून यांत्रिकीकरणाच्या सोयी मोठ्या प्रमाणात वाढविण्यात याव्यात, याचबरोवर निगा व दुरूस्ती यांवरही भर देण्यात यावा.

३) संशोधन करणारांना स्वातंत्र्य मिळण्याकरता व्यवस्थापन-पद्धती आणि नियम यात बदल झाला पाहिजे. कामास वाहून घेणारे, जबाबदारी समजणारे आणि गुणवत्ता ओळखणाऱ्या अधिकाऱ्यांची या क्षेत्रात आवश्यता आहे

४) शिक्षक किंवा विद्यार्थी यांना संशोधन करण्यास विविध प्रकारे उत्तेजन दिले पाहिजे. (उदा. शिक्षण काळातील रजा) गुणवत्ता विकास कार्यक्रमात सस्थांनी विविध प्रकारचे उद्‌बोधन कृति–सत्रे आयोजित करावीत व त्यात यांना सहभागी करून घ्यावे. आंतरराष्ट्रीय कृतिसत्रांतून अशा विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्यात यावे, त्यामुळे नव्या-नव्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेण्यास उत्तेजन मिळेल.

५) उच्च शिक्षण क्षेत्रात वरच्या जागेवर नेमणूक करतान संशोधन क्षेत्रात अनुभव असलेल्या शिक्षकांचाच विचार करावा. सस्थांचे मूल्यमापन करताना संशोधन क्षेत्रात किती काम केले आहे, याचा विचार करण्यात यावा

६) विषयसभा सारख्या पातळीवर विद्यापीठातील विभागांत संशोधन समित्यांची रचना करण्यात यावी. विद्यापीठ आणि विषय विभाग स्तरांवर संशोधन समित्यांची स्थापना करण्यात यावी. यामुळे विविध संशोधन संस्थांना प्रेरणा मिळेल. गुणवत्ता टिकून ठेवण्यावर निर्बंध राहील. तसेच संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांशी त्यांचा परस्पर संबंध राहील.

**ब) संशोधनात उत्कृष्टतेची हमी**

मुद्दा क्र. १ आणि २ यातून याबाबतीत भर देण्यात आला आहे. उदा. ग्रंथालय कागदपत्रांचे पुनर्मुद्रण आणि प्रयोग करण्याच्या सोयी,

संगणक आणि इतर कार्यपद्धतीतील सोयी तसेच जुन्या यंत्रांच्या निगा आणि आधुनिक यंत्रांची खरेदी.

७. संशोधनास प्रज्ञावान व्यक्तींचा पद्धतीशीर आधार मिळवून दिला पाहिजे. स्नात आणि स्नातकोतर स्तरांवर मोठ्या प्रमाणात गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात यावी. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या संस्थात प्रवेश मिळविण्यास सहाय्य करावे. प्रथम श्रेणीची गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी काही महाविद्यालये उघडण्यात यावीत किंवा काही स्वायत्त महाविद्यालये निवडावीत. निवड करताना ज्या महाविद्यालयात विज्ञान आणि गणित यासंबंधी प्रयोग करण्यास प्रयोगशाळांची पुरेशी सोय आहे त्यांची निवड करावी. याचे कारण असे की, अशा सोयी क्वचितच उपलब्ध होतात. प्रज्ञावान शिक्षकांसाठी उन्हाळी, हिवाळी उद्बोधन वर्ग घेण्यात यावेत. तसेच या वर्गांना पर्याप्त अर्थसहाय्य देण्यात यावे. केन्द्रशासनाच्या अर्थसहाय्यातून भेट देणाऱ्या प्राध्यापकांची संघटना तयार करावी. अशा संघटनांत भारताबाहेरील असणारा व भारतात काम करू इच्छिणाऱ्या प्राध्यापकांना अगर तज्ञांना या योजनेत समाविष्ट करून घेण्यात यावे. ही योजना विद्यापीठे आणि इतर संस्थांना लागू करण्यात यावी. या संस्थांतील प्रवेशाकरिता गुणवत्तेवर आधारित परीक्षा घेण्यात यावी. शिक्षण आणि प्रशिक्षणातील स्नातकोतर परीक्षांकरिता अशा संशोधन संस्थेतील आवश्यक मनुष्यबळ व विषयातील गरजा यांचा आधार घेण्यात यावा. आज संगणक शिक्षण, सूचना, विज्ञान, सामाजिक विज्ञान, अभियांत्रिकी विज्ञान यात प्रायोगिकतेचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे उपयोजित गणित या क्षेत्राकडे विशेष अवधान देण्याची आवश्यकता आहे. आज संशोधन क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात उच्च अभ्यासक्रमावर आधारित वर्गांची उच्च स्तरावर स्थापना करणे नितांत आवश्यक आहे जे कोणी शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च पदवी धारण करतील अशांना या क्षेत्रात प्रवेशाची संधी देण्यात यावी. यामुळे अनेक प्रज्ञावान विद्यार्थी संशोधन क्षेत्राकडे आकर्षित होतील. संशोधन क्षेत्रात संशोधन करणाऱ्या ८० टक्के संशोधकांना संशोधन शिष्यवृत्त्या देण्यात याव्यात. त्यामुळे नोकरीत भरती होताना त्या व्यक्तीस कमीत कमी तेवढे वेतन

मिळण्याची हमी असली पाहिजे. कनिष्ट संशोधन शिष्यवृत्ती धारकांना वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेत 'ब' श्रेणी वैज्ञानिकास जेवढे वेतन मिळते तेवढी शिष्यवृत्ती देण्यात यावी. अशा कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती धारकांना मोफत निवासाची सोय, घरभाडे आणि वैद्यकीय सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

८. संशोधन कार्याचे पर्यवेक्षण, तसेच नियतकालिक व वार्षिक मूल्यमापन काळजीपूर्वक नियमानुसार केले पाहिजे. केलेल्या कार्याची नोंद आणि प्रगति या सर्वांची व्यवस्थित मांडणी केली पाहिजे. संशोधन क्षेत्रातील समस्यांचा शोध काळजीपूर्वक केला पाहिजे. उथळ किंवा नित्याच्या कामातील संशोधन करण्याची आवश्यकता नाही. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था किंवा विद्यापीठे विद्यावाचस्पति पदव्या देतात. त्या पदव्या घेणाऱ्यांनी सादर केलेल्या प्रबंधांच्या परीक्षकांचा अहवाल यूजीसीच्या कार्यालयात किंवा संबंधित उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या कार्यालयात उपलब्ध असणे जरूर आहे. अशा अहवालांचे गोपनीय समालोचन गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून करता येईल.

९. विद्यावाचस्पति, पदव्युत्तर संशोधन करण्यासाठी उच्च स्तरावरील जागा निर्माण करण्यात याव्यात. त्यातून संशोधन हा व्यवसाय म्हणून स्वीकारता येईल अशी हमी असावी. राष्ट्रीय पातळीवर इच्छूक विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. या पाच वर्षांच्या काळात मूल्यमापन करताना त्या संशोधकाने उत्कृष्ट संशोधन केले असेल तर अशांना वरच्या पदावर बढती देण्यात यावी विद्यापीठ अनुदान मंडळाने अशा संशोधन तज्ञांना 'अ' 'ब' आणि 'क' दर्जा दिला आहे. इतर संस्थांनी पण अशाच प्रकारच्या पद्धतीचा अवलंब करावा.

१०. उत्कृष्टता व व्यावहारिक उपयोग हे हातात हात घालून पुढे जात असतात. म्हणून समस्या आणि कल्पना, संशोधक आणि संशोधनाच्या निष्कर्षाचा वापर करणारे यांचा परस्पर संबंध असणे महत्त्वाचे आहे. असे संबंध जपले पाहिजेत व वाढवले पाहिजेत. या संबंधिचे विचार 'ड' विभागात सविस्तर स्पष्ट केले आहेत.

११. संशोधनासाठी परदेशी यंत्रसामुग्री बोलविताना सामान्य परवाना असावा. तसेच संबंधित संस्थेच्या प्रमाणपत्रावर विद्यापीठ

अनुदान मंडळ वा राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची स्वाक्षरी असावी. या प्रमाणपत्रावरून त्या यंत्रसामुग्रीवर कर माफ करून आयात करण्याची परवानगी देण्यात यावी.

**क) संशोधनासाठी वाढीव सहाय्य**

१२. वरील प्रमाणे निर्देशित सहाय्य करण्यासाठी पैशांची गरज आहे. त्याचबरोबर नवीन व्यवस्थापनाची पण आवश्यकता आहे. आज केवळ १० टक्के संस्था, विद्यापीठ विभाग स्वतंत्ररीत्या चांगल्या प्रकारचे संशोधन करण्यास सक्षम आहेत. काही ठिकाणी तर हे प्रमाण याहूनही खाली आहे असे म्हणतात. सातव्या पंचवार्षिक योजनेत संशोधनासाठी ही रक्कम दुप्पट करून देण्यात यावी. यातूनच गुणवत्तापूर्ण संशोधन करण्याची पर्याप्त संधी मिळेल. मूलभूत संशोधन कार्यपद्धतीतील संशोधन वा कृति संशोधन यांना उत्तेजन दिले पाहिजे. उच्च शिक्षण केन्द्र, विशेष सहाय्य केन्द्र आणि इतर मोठ्या केन्द्रांना सहाय्य करून यांची संख्या वाढविली पाहिजे. आवडीच्या विषयांना प्रत्यक्ष अर्थसहाय्य देऊन संशोधन संस्थांनी विविध क्षेत्रात संशोधन कार्य हाती घ्यावे.

१३. संशोधन क्षेत्रात गुणवत्ता टिकविण्यासाठी कार्यक्षमता वाढविणे, आपसात समन्वय असणे व पूर्वनियोजन करणे तसेच अनावश्यक खर्च कमी करणे सोयीचे होईल. आज संशोधन क्षेत्रात अनेक बाबींवर माहिती उपलब्ध होत नाही. उदा. संशोधनावर होणारा खर्च, विद्यावाचस्पति पदवी मिळविण्याकरिता लागणारा वेळ, उपलब्ध साधन सोयींची माहिती, कार्यातील गुणवत्ता इत्यादी. संशोधन साधनांवर आधारित माहिती आणि त्यासाठी लागणारी यंत्रणा यांच्याकरिता केलेले प्रयत्न नियोजित आणि पद्धतीबद्ध असावेत. संशोधन परिषदेकडे अशा प्रकारची माहिती उपलब्ध असावी.

१४. उच्च शिक्षण संस्थांत अत्यंत प्रभावी अशा संशोधन सहकार्य यंत्रणेची उभारणी करून विविध संस्थांत आपसातील संबंध सुधारणे व वाढविणे आवश्यक आहे, अशा प्रकारचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उल्लेख करण्यात आला आहे. स्वायत्त व्यवस्थापनाची स्थापना करून

राष्ट्रीय पातळीवर संशोधन क्षेत्रात विविध प्रकारच्या सोयी संशोधन संस्थांतून उपलब्ध करण्यात याव्यात. सहकार्यावर आधारित विविध संस्था, विविध व्यवस्थापन पद्धतींवर संशोधन क्षेत्रात उभारलेल्या आहेत या व्यतिरिक्त इतर काही व्यवस्था असल्यास त्यांचा शोध घेतला पाहिजे आणि अशा सोयींवर आधारित संस्थांची स्थापना झाली पाहिजे.

१५. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात, संशोधन संस्था स्थापन कराव्यात आणि उच्च शिक्षण संस्थांनी आपल्या परिसरात संशोधन व विकास विषयक उपक्रम हाती घेण्याऱ्या संस्थांची स्थापना करावी. या उपक्रमांचा शासनाने पाठपुरावा करावा. उदाहरणच द्यावयाचे झाले तर राष्ट्रीय वैज्ञानिक व औद्योगिक परिषद, वायु आणि तेल मंडळ, नागरी हवाई वाहतूक, उत्पादन वाढ महामंडळ यांनी मोठमोठ्या प्रयोगशाळा उभारल्या आहेत. अशा प्रकारच्या प्रयोगशाळा शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्राला उपयोगी पडतील. यांतूनच परिणामकारक निष्कर्ष मिळण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या मोठ्या औद्योगिक संघटनांनी आपसात सहकार्य वाढवावे, तसेच एक वा दोन संस्थांशी संबंध स्थापित करावेत, त्यामुळे संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात यांचा पुरेपूर उपयोग करता येईल.

**ड) तांत्रिक सहकार्य, परस्पर संबंध समन्वय, धोरण आणि नियोजन**

१६. विविध गटांतील सर्व स्तरांवर सहकार्य घडवून आणायचे असल्यास संशोधन संस्था, औद्योगिक क्षेत्रे, संशोधनाच्या निष्कर्षाबाबत उत्सुकता दर्शविणाऱ्या संस्था, तसेच भौगोलिकदृष्ट्या सर्वदूर पसरलेले कार्यपद्धतीचे जाळे, आणि विविध विद्याशाखांतील विविधता, यांचा विचार करून उच्च शिक्षण संस्थांत अशा प्रकारच्या विशिष्ट कार्य-पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. विद्यापीठातील विविध विषय-विभाग यांनी संशोधन समित्यांची स्थापना करावी. याचबरोबर विभागीय स्तरावर संशोधन समितीची स्थापना करण्यात यावी. लहान संस्थांना यात समाविष्ट करून घेण्यात यावे. यातूनच विविध विद्याशाखांतील संशोधनास उत्तेजन मिळेल. तसेच शेजारच्या संशोधन संस्थेशी संबंध जोडण्यात यावेत त्यामुळे संशोधन करताना येणाऱ्या अडचणींवर मात

करता येईल; आपसात सहकार्य साध्य करता येईल; विचारांचे अदान-प्रदान होईल; व संशोधनाचा उपयोग, समस्या सोडविण्यासाठी करणे शक्य होईल. आपसात सहकार्य निर्माण होण्याची शक्यता अशा व्यवस्थेत दिसून येते. विद्यापीठ स्तरावर उच्चस्तरीय, शक्तिशाली समिती स्थापन केल्यास सहसंबंध सुधारणा, कामातील एकसूत्रता, जीवघेण्या स्पर्धेचे उच्चाटन, हाती घेतलेल्या संशोधनाचे पर्यवेक्षण व गुणवत्ता आणि संशोधनातील संदर्भ साध्य करता येतील. हे सर्व उच्च शैक्षणिक परिवर्तनाच्या अंतर्गत असलेल्या 'संशोधन मंडळाची' स्थापना करून साध्य करता येईल. संशोधन मंडळाशी संबंध स्थापित करण्यासाठी या मंडळाची सदस्यता मिळविल्यास, इतर संस्थांतील शासकीय क्षेत्रात आणि विविध विभागात, आपआपसात सामंजस्याने कामे होतील. या संशोधन मंडळाचे कार्य राज्यातील शैक्षणिक परिषद आणि इतर राज्यातील संस्थांत चालू झालेले संशोधन आणि विकास, यांस उत्तेजन देणारे व संबंध जोडणारे असेल. संपूर्ण देशात संशोधनाचे जाळे पसरल्यास बाहेरील संशोधक आणि संस्था महत्त्वाच्या ठळक अशा समस्यांवर संशोधन कार्य हाती घेतील. हे संशोधन विविध विभागांतील समस्यांवर आधारित असेल. संपूर्ण देशात संशोधनाचे जाळे पसरविण्यासाठी वैयक्तिक बाबतीत पण आवश्यक तो बदल करता येईल.

१७. उच्च शिक्षण संस्थांत सहकार्याने आणि एकजुटीने काम केल्यामुळे, नियोजन, उत्पादनाचे मूल्यमापन, आणि संशोधनासाठी कार्यक्षेत्राच्या मर्यादेत राहून संशोधनावर होणारा खर्च व निर्णय घेण्याची योजना इत्यादी बाबी सहजरीत्या कार्यान्वित करता येतील. उच्च शिक्षण संस्था वा विद्यापीठात आधारभूत माहितीवर चाललेले संशोधन कार्य राष्ट्रीय पातळीवर केंव्हाही महत्त्वाचेच असेल. त्यांचा स्वीकार करावाच लागेल. उच्च शिक्षण संस्थांतील अशा प्रकारची संशोधन परिषद उच्च बिंदू गाठू शकेल; त्याचे कारण असे की, संघटनांच्या छत्राखाली अशा संस्था संशोधन कार्यात स्वयंपूर्ण होतील. स्वतःकरिता लागणारे साहित्य तयार करतील (माहितीचे विश्लेषण करणे, अभ्यास हाती घेणे, नीति निर्धारण अग्रहक्क ठरविणे आणि कांहीसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे) अशा प्रकारचे साहित्य राज्यातील शैक्षणिक परिषदांना,

संशोधन मंडळांना व विद्यापीठांना उपयोगी पडेल. दुसऱ्या शब्दात म्हणवयाचे झाले तर ही उच्चस्तरीय परिषद संशोधन कार्यात संलग्न असलेल्या संस्थांना संरक्षण देणे, पाठपुरावा करणे., संशोधन क्षेत्रात रस घेणाऱ्यांना उत्तेजन देणे आणि हाती घेतलेल्या संशोधनाचा राष्ट्रीय समस्यांशी संदर्भ लावणे, याकरिता जबाबदार म्हणून काम करेल. या परिषदेची भूमिका महत्त्वाची असणार आहे. उच्चशिक्षण संस्थांत संशोधनास उत्तेजन देणे, संशोधनाचा इतर संस्थांशी, औद्योगिक क्षेत्रांशी संबंध जोडणे, भविष्याकरिता कामाचे नियोजन करणे, तसेच संशोधनाच्या विविध बाबींवर योग्य अशी नीती निर्धारित करणे, अशा प्रकारची भूमिका घेणाऱ्या उच्चस्तरीय परिषदेचे काम होय. उच्च शिक्षण संस्थेतील संशोधनात गुणवत्ता राखून ठेवणे, योग्य माहिती गोळा करणे, साहित्याचे विश्लेषण करणे आणि संशोधनाच्या विकासाचा अभ्यास करणे, याकडे ही परिषद लक्ष पुरवील. अशा प्रकारच्या मांडलेल्या प्रस्तावामुळे १) लाभार्थी आणि संशोधन संस्था यांच्या गरजा विद्यापीठ अभ्यासक्रमात दिसून येतील, आणि त्यांमुळे उत्तम प्रकारचे मनुष्यबळ तयार होईल. २) समस्यांचे निदान करण्यासाठी तत्त्वचिंतक व तत्त्वे, तसेच कार्य आणि कार्यवाही, यांच्या समोर वास्तविक समस्या असतील ; त्यामुळे पद्धती आणि कार्यवाही यांच्यात सुसूत्रता दिसून येईल. अशा स्थितीत लाभार्थी आणि संशोधन संस्था यांचा निश्चितपणे लाभ होईल. यामुळे विद्यापीठांना साधनसोयी उपलब्ध होतील आणि त्यातून ते स्वतःला सहाय्य करू शकतील.

१८. सहकार्य आणि पसरलेल्या कामाचे जाळे यांचा जर मानव-स्तराशी संबंध लावला तर या संकल्पनास गतिमानता मिळेल. एखाद्या केंद्रीय शासनाचा कर्मचारी दुसऱ्या संस्थेत गेल्यास अधिक लाभ होत असेल, तर अशा केंद्रीय शासनाने अर्थसहाय्य दिलेल्या संस्थेत त्याची निवड झाली तर त्याला तेथे जाण्याची मुभा दयावी. अशा प्रकारची सोय असणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अशा प्रकारची सोय केल्याचे निर्देश दिसून येतात. प्रत्येक राज्याने अशाच प्रकारची सोय करावी हे अभिप्रेत आहे. याचबरोबर राज्य आणि केंद्रीय शासन यांच्यात आदान प्रदानाची

सोय करण्यात यावी. उच्चशिक्षण संस्थेत ३ ते ६ महिन्यांच्या अल्प कालावधीचे अभ्यासक्रम असावेत. संशोधन संस्था व औद्योगिक संस्था यांनी आपल्या येथील सेवक वर्गातील १% टक्के लोकांना दुसऱ्या मान्य संस्थेत ३ ते ६ महिने काम करण्याची संधी देण्यात यावी. अशा व्यक्तिसाठी प्रवास, सर्व सोयींनेयुक्त असे निवासगृह, यजमान संस्थेने उपलब्ध करून द्यावेत. विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधन संस्थेतील तज्ञ वा औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ यांना योग्य असा दर्जा देऊन या कार्यासाठी नियुक्त करता येईल. अशा प्रकारच्या बदल्या करण्याचे काम करण्यासाठी उच्चस्तरीय संघटनेने एखादे कायमचे मंडळ स्थापित करावे.

१९. संशोधनाच्या क्षेत्रात अग्रक्रमाचा प्रश्न अवश्य निर्माण होणार; कारण सहकार्याच्या आणि नियोजनाच्या बाबतीत विचार करावा लागेल. अशा प्रकारची समस्या सोडविणे निश्चितच कठीण होय. तंत्रज्ञान अवलोकन आणि निष्कर्षाविषयीचे अंदाज यांच्या विविध पैलूंचा विचार करावा लागेल. जोपर्यंत अशा प्रकारचे प्रयत्न होत नाहीत तो पर्यंत ही समस्या आव्हानात्मक राहण्याची शक्यता आहे. भविष्यातील संशोधन क्षेत्रात कोणत्या क्षेत्रांवर विशेष भर दिल्यावर अधिकाधिक फायदा होईल, यावावत प्रश्नचिन्हच राहील. अशा प्रकारच्या समस्या हे एक आव्हानच होय अनेक प्रगत राष्ट्रांनी या क्षेत्रात विविध कार्यपद्धतींचा अभ्यास केला आहे. त्यातील अमेरिका, जपान, फ्रान्स आणि इंग्लंड हे अग्रगण्य देश होत. आता, संशोधन परिषदेने एक विभाग उघडावा व त्यात काही तज्ञांचा समावेश असावा. ते या क्षेत्रात काम करतील. ते इतर संशोधन संस्थाना प्रकल्प तयार करून देतील. अशाप्रकारे तीन वर्षात या संस्था आपला अभ्यासक्रम स्थापित करून पुढे येतील. अशा प्रकारच्या संशोधनांचे इतर संस्थांना वाटप करण्यातच येईल. त्याचे मूल्यमापन करून ह्या संस्था या कामाचा विकास करण्यासाठी नियोजन करतील.

# विभाग-३

## कार्यवाहीचे मुद्दे आणि कालावधीचा विचार

१. नव्या दृष्टिकोनातून अभ्यासक्रमाची रचना करण्यासाठी; नव्या अध्ययन पद्धतीचा विकास करण्यासाठी; आणि विशेषे करून शिक्षण क्षेत्रात सृजनशीलता व सामाजिक संदर्भ आणण्यासाठी तसेच संशोधनाचे व विकासाचे कार्य हाती घेण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

i) संशोधन क्षेत्रात होणाऱ्या ज्ञानाचा विस्तार करण्यासाठी जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी, प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रम विकसन केंद्र सुरू करण्याणाठी तसेच संशोधन पत्रिकांचे प्रकाशन करण्यासाठी, विद्यापीठ अनुदान मंडळ/राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद आणि इतर संस्था यांनी योग्य स्वरूपाच्या योजना पुरस्कृत कराव्यात.

ii) आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान केंद्र, उच्च शिक्षण संस्थांतील अशा प्रकारचे संशोधनात्मक उपक्रम हाती घेण्यास उत्तेजन देतील. तसेच विद्यापीठ अनुदान मंडळ, राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद आणि इतर संस्था प्राप्त अनुभवाची देवाणघेवाण, साधन सोयींचा वाटून उपयोग, तसेच प्रत्यक्ष उपयोगात असलेले साहित्य आणि विस्तार, यांचा संशोधन कार्यासाठी प्रत्यक्षपणे उपयोग करतील.

याची कार्यवाही १९८६-८७ सालात होईल.

काही संस्थातील रचनापद्धतीचा विकास करण्यासाठी, व संशोधन संस्थांच्या संख्येत वाढ करण्यासाठो विद्यापीठ अनुदान मंडळ, राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद यांनी संशोधन संस्थांत वा विद्या विभागात चालू असलेल्या कार्याचा आढावा घ्यावा आणि विकासाचा योजनाबद्ध कार्यक्रम आखावा. या संशोधन संस्थात अध्यापनाच्या किमान सोयी उपलब्ध असाव्यात आणि त्या संस्थांचा दर्जाही चांगला असावा. त्या संस्थाकडे असलेल्या साधनसामुग्रीत, उपकरणात, आणि मनुष्यबळांत

भर टाकावी. त्या संस्थांचा योगक्षेम नीट चालावा यासाठी योग्य त्या खर्चाची तरतूद केली जावी. झालेल्या खर्चाचा अहवाल अशा संस्थांनी प्रतिवर्षी पाठवावा.

२ वर नमूद केलेल्या संस्थांच्या व्यतिरिक्त अधिक उच्चशिक्षण केंद्राचा व राज्य स्तर शिक्षण केंद्राचा विस्तार करण्यात येईल; तसेच यांना अधिक अर्थसहाय्य देण्यात येईल. नवोदित तंत्रज्ञान क्षेत्र आणि गणित यांच्या संशोधनावर होणारा खर्च वाढवून देण्यात येईल.

संपूर्ण शिक्षण क्षेत्रात COSIST प्रकारच्या उपक्रमाचा उपयोग करण्यात येईल; यातूनच ज्या संशोधन संस्थांनी उच्च प्रतीचे संशोधन आणि विकासात्मक प्रगति दर्शविली आहे आणि या क्षेत्रात त्या अग्रगण्य आहेत, अशा संस्थांतील कार्यपद्धती मजबूत करण्यास उत्तेजन दिले जाईल.

अशा प्रकारची क्रमबद्ध योजना सन १९८७-८८ सालअखेर पर्यंत पूर्णपणे आखण्यात येईल. याचबरोबर एकाच वेळी यातील विविध कामे हाती घेऊन ती चालू ठेवण्यात येतील.

३. संशोधन कार्यास गती देण्यासाठी सर्व स्तरांवर नियम आणि पद्धती नेहमी सहाय्यकारी होत नाहीत. उच्चतम पातळी आणि संस्था-पातळी वरून अशा नियमांचा आणि पद्धतीचा आढावा घेण्यात येईल: सशोधन नियमांनुसार अधिकार क्षेत्राचे पुनर्मूल्यांकन करण्यात येईल आणि प्रत्येक स्तरावर आवश्यकतेनुसार नियमांत बदल करण्यात येईल. उच्च पातळीवरील संस्था हाताखालील संस्थांचा सल्ला घेऊन नियमात बदल करण्यासाठी त्वरित कार्यवाही करतील.

या कार्याला १९८६–८७ साली सुरुवात करण्यात येईल आणि दोन वर्षांच्या कालावधीत सुधारित पद्धती अवलंबिली जाईल.

४. शिक्षकांनी संशोधन कार्य हाती घ्यावे, यासाठी त्यांना उच्च-शिक्षण संस्थांच्या माध्यमातून व इतर संस्थांद्वारे संधी उपलब्ध करून देण्यात येईल. याकरिता उन्हाळीवर्ग, चर्चासत्र इत्यादी योजनाबद्ध कार्यक्रम राबविण्यात येतील. याचबरोबर संस्थांच्या नियमात योग्य तो बदल करण्यात येईल. 'याकरिता उपाययोजना म्हणून संशोधनातील

विविध क्षेत्रात उद्‌बोधन व चर्चासत्रे आयोजित करण्यात येतील. या सत्रास मार्गदर्शन करण्यासाठी भारतातील आणि भारताबाहेरील उत्तम प्रतीचे तज्ज्ञ बोलविण्यात येतील, इतकेच नव्हे अशा प्रकारची अधिकाधिक चर्चासत्रे वारंवार आयोजित करण्यात येतील. भारताबाहेरील संशोधन क्षेत्रात झालेल्या कामगिरीचा शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यात येईल.

उच्च पातळीवरील संस्थांना या बाबतीत त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येतील.

५. शिक्षकांच्या व संस्थांच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी संशोधनाच्या निष्कर्षांचा उपयोग करण्यात येईल. शिक्षकांचे मूल्यमापन करताना, त्यांचे अध्यापन कार्य, जबाबदाऱ्या पार पाडण्याची कुवत, विस्तारकार्य यांचे मापन करता येईल. संस्थांच्या कामाचे मूल्यमापन करताना, त्यांच्या एकूण ध्येय धोरणांचा विचार करावा लागणार असल्यामुळे, त्यासाठी करावे लागणारे मापनदंड यु.जी.सी, ए.आय.सी.टी.ए. इत्यादी उच्चपदस्थ संस्थांनी करणे योग्य ठरेल.

संस्थांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी योग्य असे मापनदंड तयार करण्याची कार्यवाही १९८६–८७ सालात करावी.

६. विविध संशोधन संस्थांत विविध स्तरांवर संशोधन समित्यांची स्थापना करण्यात यावी त्यांतून संशोधन क्षेत्रातील विविध ज्ञानशाखांतील संशोधन कार्य हाती घेण्यात येईल. इतर लाभार्थी संस्था आणि संशोधन संस्था यांच्यात सहसंबंध स्थापित होतील. अनेक संस्थांत विविध प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच या संस्थांतील चाललेल्या कामाचा पाठपुरावा करता येईल. आवश्यकता वाटल्यास वैधानिक परिवर्तन पण करण्यात येईल. अशा संशोधन संस्थांतून संशोधन समित्या स्थापित करण्यास राष्ट्राची सर्वोच्च संशोधन संस्था आदेश देईल. अशा समित्या १९८६–८७ अखेर पर्यंत स्थापित करण्यात याव्यात.

७. देशात प्रज्ञाशोध परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळास आदेश देण्यात येतील ही परीक्षा, पदवी आणि पदव्युत्तर स्तरांवर

राष्ट्रीय विकासास पोषक, अशा विषयांत घेण्यात येईल: उदा. विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, या विषयांची प्रज्ञाशोध परीक्षा घेण्यात येईल. इतर महत्त्वाचे विषय, उदा. कला, पुरातत्व शास्त्र इत्यादी विषयांची प्रज्ञाशोध परीक्षा घेण्यात येईल. राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या परीक्षेच्या गुणवत्तेवर आधारित प्रवेश देण्यात येईल. शिष्यवृत्तींत वेळोवेळी बदल करण्यात येईल. त्यामुळे संशोधन करण्यास विद्यार्थी आकर्षित होतील. प्रारंभी काही संस्थांतून विवाहित विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची सोय करण्यात येईल.

मानवसाधनसंपत्ती विकास मंत्रालय अशा सर्वश्रेष्ठ संस्थांना विचारणा करून योग्य असे धोरण निर्धारित करण्यास त्वरित सूचना देईल. हे कार्य सन १९८६-८७ अखेर पूर्ण करण्यात येईल. राष्ट्रीय चाचणी समितीची स्थापना करण्यात येईल. त्यामुळे प्रज्ञाशोध पद्धतीत सुधारणा होईल.

८. संशोधन कार्यातील गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी, तसेच विद्यार्थी–पर्यवेक्षक यांच्यातील आंतरक्रिया मजबूत करण्यासाठी उपलब्ध सोयींचा व वेळेचा अत्यंत काटेकोरपणे परिणामकारक उपयोग करण्यात येईल. केलेल्या संशोधन कार्याचा आढावा संशोधन कार्य चालू असताना आणि शेवटी घेण्याचे काम ‘संशोधन परिषद’ करील

विद्यापीठ अनुदान मंडळाने या दिशेने पावले उचलली आहेत. विद्यापीठ मंडळाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्वरित कार्यवाही करण्या येईल. इतर सर्वोच्च स्तरीय संस्थांना अशाप्रकारची कार्यवाही सन १९८६–८७ अखेर करण्यास सूचना देण्यात येतील.

९. विद्यापीठ अनुदान मंडळातील ‘संशोधन वैज्ञानिक पद्धती’ विद्यापीठात सशोधन हा व्यवसाय म्हणून स्वीकारण्यास अनेकांना प्रेरित करेल असे अभिप्रेत आहे. विद्यापीठात सेवक भरती करताना नियुक्त नियमांचे कठोरतेने पालन करण्यात येईल. करारनामा व वेळोवेळी पुर्नविचार, अशा प्रकारचा विचार निवड समिती करेल. अशाच प्रकारची मर्यादा इतर संशोधन संस्थांवर पण घालण्यात येईल.

मानव साधनसंपत्ति विकास मंत्रालय देशातील अशा सर्वोच्च संस्थांना या दिशेने त्वरित योग्य कार्यवाही करण्याचे आदेश देणार आहे.

१०. संशोधन कामाचे जाळे देशात पसरविण्याची संकल्पना कशी असावी याचा उल्लेख १६ मध्ये केला आहे.

११. खुल्या सामान्य परवान्यासंबंधीच्या (open general licence (OGL) सोयी उच्च शिक्षण संस्थांना, त्यांच्या संशोधनातील उपक्रमांसंबंधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. यामुळे कामाला चांगली गती मिळेल. मानवसाधनसंपत्ति विकास मंत्रालयास, वित्त मंत्रालयाशी चर्चा करून, हे काम सन १९८६–८७ साली हाती घेता येईल.

१२. संशोधनास आर्थिक सहाय्य वाढवून देणे आणि झालेले काम हातावेगळे करण्यासंबंधीची यंत्रणा या संबंधीचे विवेचन 'अर्थव्यवस्था' या प्रकरणात दिले आहे.

१३. ध्येय धोरणे आखण्यासाठी, नियोजन करण्यासाठी, संशोधन कार्याचे नियंत्रण व नियमन करण्यासाठी, आणि कार्याशी निगडित असलेल्या खर्चाचा ताळमेळ पाहाण्यासाठी आधारभूत माहिती संकलित करणे महत्त्वाचे आहे. ही आधारभूत माहिती संकलित करणे, कार्य-पद्धतीचे नियमन करणे, इत्यादी कामे संशोधन परिषदेमार्फत केली जातील. संबंधित माहिती संकलित करणे, त्यांचे पृथक्करण करणे आणि या कार्याची पार्श्वभूमी समजावून देणारे साहित्य तयार करणे ही कामे संशोधन परिषदेमार्फत केली जातील. अशा प्रकारे संकलित केलेली माहिती राष्ट्रीय संशोधन व विकास यांना उपयुक्त होईल.

या संबंधाची मूलभूत कार्यवाही मानव साधनसंपत्ति विकास मंत्रालयामार्फत करण्यात येईल. या कार्यात विद्यापीठ अनुदान मंडळ व राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद यांचा सल्ला घेण्यात येईल. या गोळा केलेल्या आधारभूत माहितीवरच संशोधनाचे कामास आरंभ होईल. सन १९८७–८८ पर्यंत प्रारंभीची कार्यवाही करण्यात येईल आणि सन १९८८–८९ मध्ये ही यंत्रणा पूर्णपणे कामास सज्ज राहील.

१४. विद्यापीठ कार्यक्षेत्रातच राष्ट्रीय संशोधनांच्या सोयी राहातील आणि त्याकरिता योग्य अशी स्वायत्त व्यवस्थापन–रचना उभारण्यात येईल. तसेच इतर काही क्षेत्रांत अशा प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देणे सहज शक्य झाल्यास त्याचाही विचार करण्यात येईल काही अपवादात्मक परिस्थितीत स्वतंत्र व्यवस्थाही करण्यात येईल. ती करताना आवश्यक त्या सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या जातील. या बाबतीत शासनाने संशोधन परिषदेचा सल्ला घेऊन निर्णय घ्यावयाचा आहे.

अशा प्रकारे नियोजित धोरणांचे पालन करण्यात येईल. ही ध्येय धोरणे इतर संबंधित संस्थांच्या लक्षात आणून देण्याचे काम सन १९८६–८७ पर्यंत 'मानवसाधनसंपत्ति विकास' मंत्रालयतर्फे करण्यात येईल.

१५. उच्चशिक्षण पद्धतीत मोठ्या प्रमाणावर संशोधनाच्या साधन सोयी उपलब्ध करून देण्यासाठी संशोधन आणि विकास संस्था स्थापित करण्यात येतील. त्यांनी अशा प्रकारच्या कार्याला उत्तेजन द्यावयाचे आहे. विद्यापीठ कार्यपद्धतीत सामान्य सोयी उपलब्ध करून देण्यासाठी काही विभागात अशा प्रकारचे केंद्र स्थापित करण्यात येईल. अशा प्रकारचे व्यवस्थापन स्थानीय संस्थांसाठीच उपलब्ध राहील असे नाही पण संशोधन कार्यात सक्रिय भाग घेणाऱ्या कोणत्याही स्वायत्त संस्थेस मिळू शकेल.

सन १९८६-८७ अखेर पर्यंत अशा प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मानवसाधनसंपत्ती विकास मंत्रालय आदेश देईल. योग्य अशी स्वायत्त व्यवस्थापन संस्था यांच्यात सहभागी होतील अशा प्रकारची कार्यपद्धती आखण्यात येईल.

१६. 'राज्य उच्च शैक्षणिक परिषदा' ज्याचे कार्य संशोधन कार्यात सहकार्य करणे, संपूर्ण राज्यासाठी नियोजन करणे – आहे, अशा या परिषदेमार्फत उच्च शिक्षण संस्थांकरिता 'राज्य संशोधन मंडळे' स्थापित करतील. अशा परिषदेमार्फत राज्यातील इतर उच्च शिक्षण सस्था संशोधन कार्यासाठी आपसात जोडण्यात येतील. राज्यातील

विविध कामातील संशोधनावर आधारित गरजा लक्षात घेऊन संशोधन संस्था उभारण्यात येतील. समस्या आणि क्षमता यांचा समतोल साध्य करून एका मोठ्या विस्तारित आकाराची योजना आखण्यात येईल. आवश्यकता भासल्यास वैधानिक परिवर्तन करण्यात येईल; तसेच विविध उपक्रमांना चालना देण्यासाठी केंद्रीय सहाय्य देण्यात येईल. राज्य संशोधन मंडळांना प्रत्यक्ष सहकार्य देण्यासाठी केंद्रीय संशोधन परिषदेचे प्रतिनिधी, आणि राज्यस्तरावर राज्य संशोधन व विकास परिषदा, आणि इतर राज्यस्तरीय संस्था सहभागी होतील. प्रत्येक राज्यस्तरीय संशोधन मंडळ आपले वार्षिक अहवाल राष्ट्रीय संशोधन परिषदेस सादर करतील.

(उच्च शिक्षण संस्थांच्या कारभाराचा राज्य परिषदा वेगळा विचार करीत आहेत.)

मानवसाधनसंपत्ती विकास मंत्रालय सर्व प्रस्ताव राज्य शासनास कळवील. याचा उद्देश असा आहे की, राज्यात येत्या दोन वर्षात संशोधन मंडळाची स्थापना करण्यात यावी.

१६. १) हे संबंध प्रत्यक्ष सहभागाच्या स्वरूपात असावेत. विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांचा राष्ट्रीय विकास योजनेत हमखास सहभाग असेल याची हमी घेण्यात यावी. या योजनेत परिणामकारकरीत्या सहभागी होण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद, राष्ट्रीय वैद्यकीय संशोधन परिषद, राष्ट्रीय कृषि संशोधन परिषद आणि शिक्षण विभाग यांनी मिळून एक विशिष्ट कार्यसमूहाची स्थापना करावी. विशेष करून सामूहिकरीत्या, परिणामकारकरीत्या सहकार्याने काम केल्यास ही कामे विशेष ध्येय गाठण्यासाठी प्रेरित होतील.

मानवसाधनसंपत्ती विकास मंत्रालयामार्फत अशा प्रकारच्या कार्यगट समूहांची काही निवडक क्षेत्रात स्थापना करण्यात यावी.

२) संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक शक्तिशाली संशोधन मंडळ आणि विस्तार सेवा मंडळ स्थापन करण्यात यावे. विद्यावाचस्पति प्रवेशाचे व परीक्षक नेमण्याचे काम संशोधन मंडळ पाहणार नाही पण

याबरोबरच इतर संस्थांतील हाती घेतलेल्या संशोधन कार्यात परस्पर संबंध कसा प्रस्थापित करावा, साधन सोयींचा कसा वापर करावा, संशोधनातील गुणवत्ता कशी कायम ठेवावी, उत्पादनाच्या गुणवत्ता वाढीसाठी कोणत्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात, संशोधनाचा संदर्भ कसा लावावा व खर्चाची सोय कोणत्या प्रकारे करावी इत्यादि कामे हाती घेईल. संशोधनाचा बाहृच जगाशी संबंध जोडण्याचे काम, तसेच संस्थांच्या बाहेरील व्यक्तिसाठी सदस्यत्व उपलब्ध करून देण्याचे काम संशोधन मंडळाने करावयाचे आहे. बाहेरील संस्था म्हणजे, औद्योगिक क्षेत्र, इतर उत्पादन क्षेत्र आणि नामवंत व्यावसायिक यांना संशोधनाच्या कामात सदस्यत्व देऊन समाविष्ट करून घेण्यात येईल. अशाप्रकारे राज्यातील विभागीय, सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक समस्या हाताळण्यासाठी अनेक संशोधन संस्था पुढे येतील.

मानवसाधनसंपत्ती विकास मंत्रालय वा संशोधन विकास संस्था, यांच्या आदेशानुसार संशोधन मंडळे आणि विस्तार सेवा मंडळे यांनी सध्याच्या विद्यमान संस्थांशी संबंध स्थापित करावा व वरील मंडळांची स्थापना करण्यात यावी. याकरिता आवश्यक असल्यास शासनाने कायद्यात बदल करावा.

हे काम सन १९८७-८८ अखेर पूर्ण करावयाचे आहे.

३) संशोधन आणि विकास क्षेत्रातील गरजा भागविण्यासाठी शासकीय क्षेत्रातील कारखान्यांनी इतर संस्थांशी विशेष आणि सखोल संबंध स्थापित करावेत. सर्व संस्थांनी एकत्र येऊन आंतरक्रियांचे स्वरूप ठरविणे, कोणते विशेष कार्य हाती घ्यावयाचे याची निश्चिती करणे, इतर जबाबदाऱ्या आणि विशिष्ट प्रसंगी घ्यावयाची भूमिका कोणती असावी यांची सखोल चर्चा करून कार्यवाहिची दिशा ठरवावी. शासन केंद्रास/राज्यातील उद्योगास अशा प्रकारचे संबंध स्थापित करण्यास विविध संस्थांची निवड करील. केंद्रसरकार व राज्यसरकारे यांच्या आखत्यारीत असणाऱ्या औद्योगिक संस्थांना शैक्षणिक संघटनांची निवड व निश्चिती करण्यासंबंधी शासन आदेश देईल. औद्योगिक संस्था व शैक्षणिक संस्था यांच्यातील परस्पर संबंध दृढ करण्यासाठी, व्यवस्थापनाच्या व आर्थिक सोयी उपलब्ध करून देण्यात येतील.

४) अशा संशोधन संस्थांना कराव्या लागणाऱ्या ज्यादा खर्चाची तरतूद करण्यात येईल. ही तरतूद १०% ते ५०% इतकी असेल. संशोधन प्रकल्प ज्या स्वरूपाचा असेल त्यानुसार आर्थिक सहाय्याची तरतूद असेल. आरंभी प्रत्येक संशोधन संस्थेस एकूण खर्चाच्या १० ते १५ टक्के संशोधनास आवश्यक असणारे साहित्य विकत घेण्यासाठी देण्यात येईल.

सुटे भाग, वापरण्यात आलेले व निकामी होणारे साहित्य तसेच त्यांच्या ऐवजी नवीन साहित्य विकत घेण्यासाठी होणाऱ्या खर्चाची वेगळी तरतूद करण्यात येईल व प्रत्येक संस्थेत मोठी यंत्रसामुग्री बसविण्यात आल्यास त्यांची निगा व दुरुस्ती यांवर होणाऱ्या खर्चाबाबत करार करण्यात येईल आणि हा खर्च सामग्री विकत घेण्यासाठी ठेवलेल्या रकमेतून करण्यात येईल.

आर्थिक तरतूद करणाऱ्या संस्थांना अशा प्रकारची सूचना देण्यात येईल.

१७. देशातील संपूर्ण विद्यापीठातील संशोधन संस्था, उच्च शिक्षण संस्था, तांत्रिक, वैद्यकीय, कृषि विद्यापीठे यांचा समावेश असणारी राष्ट्रीय स्तरावरील संशोधन परिषद स्थापन करण्यात येईल. या संशोधन परिषदेची प्रमुख कामे म्हणजे इतर संस्थांतील सहसंबंध स्थापित करणे, संशोधनातील एकूण प्रगति व कार्यपद्धतीची माहिती मिळविणे व पुरविणे, या क्षेत्रात होणाऱ्या प्रगतीची सर्व संस्थांना माहिती पुरविणे, कामाची नीति निर्धारित करणे, अग्रक्रम ठरविणे, शिक्षण क्षेत्राला सतत आर्थिक सहाय्य पुरविण्यासाठी पैशाची व्यवस्था करणे आणि अशा संशोधन संस्थांना आर्थिक व्यवस्था विषयक मार्गदर्शक तत्त्वे दाखवून देण्याचे काम करणे इत्यादि असतील. एवढेच नाही तर संशोधन क्षेत्रात सामान्य वा सहकारी उपक्रम हाती घेईल आणि संशोधन क्षेत्रात विशेष जबाबदारीच्या वा महत्त्वाच्या बाबींवर आर्थिक साहाय्य देईल. या परिषदेच्या रचनेत विविध उच्च शिक्षण संस्थांतील मान्यवर विद्वतजन, इतर संस्थांतील विद्वान आणि औद्योगिक संस्थातील अर्थ साहाय्य पुरविणाऱ्या संस्थांतील प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात येईल.

या परिषदेत तंत्रज्ञानाचे एक कार्यालय उघडण्यात येईल.त्यामुळे या परिषदेला आपली भूमिका योग्य प्रकारे बजावता येईल आणि विविध उपक्रम हाती घेण्यासाठी विविध प्रकारच्या कार्यपद्धतीचा अवलंब करता येईल. ही संशोधन परिषद उच्च शिक्षणासाठी नेमलेल्या उच्च पातळीच्या संस्थांतर्गत काम करील.

मानवसाधनसंपत्ति विकास मंत्रालय उच्च शिक्षणातील काही प्रमुख संस्थांच्या विचारविनिमयाने राष्ट्रीय संशोधन परिषदेची स्थापना करील. या कार्यात वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षण संस्था आणि इतर लाभार्थी संस्थांचा पण सल्ला घेण्यात येईल. जोपर्यंत अशा प्रकारची उच्चस्तरीय संशोधन संस्थेची रचना होत नाही तोपर्यंत विद्यापीठ अनुदान मंडळ हे काम पाहील.

अशा प्रकारच्या कार्याचा आरंभ सन १९८६–८७ साली करण्यात येईल आणि सन १९८७–८८ साली प्रत्यक्षात कामाचा आरंभ करण्यात येईल.

१८. संशोधन कार्याचे जाळे पसरविताना उच्चशिक्षण संस्थातील विद्वानांना व तज्ञांना एका शिक्षण संस्थेतून दुसऱ्या शिक्षण संस्थेत जाण्याची वा काम करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येईल आणि शेवटी तेथून संशोधन संस्थेत काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचप्रमाणे संशोधन संस्थेतून मूळच्या संस्थेत परत जाण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात येईल. बदली करण्याची आणि इतर सोयी उपलब्ध करण्याची पद्धत शासन त्वरित अमलात आणील.

औद्योगिक क्षेत्रातून शिक्षण संस्थांत जाऊन काम करण्यासाठी सोय करण्यात येईल. अशाप्रकारच्या नियुक्तीकरिता चांगल्या प्रकारच्या सेवाशर्ती घालून देण्यात येतील व या प्रक्रियेस उत्तेजन देण्यात येईल. अशा प्रकारच्या पद्धती करता राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर एक यंत्रणा उभी करण्यात येईल. यातूनच अनेक सहकारी व्यवसाय निर्माण करण्यात येतील. यातून काम करणाऱ्या व्यक्तीची निवड करण्यात येईल. अशा गतिमान व्यक्तीच्या मुलांच्या शिक्षणाची सोय, त्यांच्या निवासाची सोय इत्यादि विविध सोयी उपलब्ध करून देण्यात येतील.

अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमासाठी उच्चशिक्षण संस्थेतील, संशोधन संस्थेतील वा औद्योगिक क्षत्रातील व्यवस्थापनेत आपल्या संस्थेतील १ टक्का व्यक्तिना ३ वा ६ महिन्यांच्या अवधिकरिता दुसऱ्या संशोधन संस्थेत अनुभव घेण्यास आवश्यक तर पाठवण्यात येईल. अशा प्रकारच्या व्यक्तींना योग्य [illegible] येतील.

१) संशोधन संस्था आणि औद्योगिक संस्था यांना, अशा प्रकारची एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेत जाण्याची सोय करावी अशी, सूचना देण्यात येईल.

२) सार्वजनिक उद्योग क्षेत्र आणि संशोधन संस्था यांनी प्रत्येक संस्थेत कमीतकमी किती व्यक्तींना पाठवावे याविषयी स्पष्ट सूचना देण्यात येतील.

३) याकरिता निवासाची सोय काही प्रमाणात राखून ठेवता येईल का, याचा विचार करता येईल.

सातव्या पंचवार्षिक योजनेत ही कार्यपद्धती अंमलात आणण्यास प्रारंभ करण्यात येईल.

१९. तंत्रज्ञानाचे मूल्यमापन आणि संभाव्य कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी, राष्ट्रीय पातळीवरील यंत्रणा उभी करावी लागेल. ही यंत्रणा संशोधन आणि विकास कार्यासाठी, भविष्यातील गतिमान कार्यवाहीचा आराखडा तयार करील. ही कार्यपद्धती पर्याप्त रूपाने विस्तारित करण्यात येईल. त्यामुळे, तंत्रज्ञान क्षेत्राचा व्यवस्थित विकास आणि विस्तार होईल. तसेच ही संस्था मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची माहिती नियमित रूपाने इतर संस्थांना पुरविण्याचे काम करील. याचबरोबर ही प्रस्तावित 'संशोधन परिषद', संशोधन आणि विकास क्षमता, आणि बाजारात उत्पादनाची आवक व त्यानुसार मागणी यांचा विचार करून एक समिती स्थापित करेल. ह्या समितीने विकासाच्या संभावनेचा विचार करावयाचा आहे. संशोधनातील निष्कर्षरूपी उत्पादन आणि बाजारातील मागणी, यांचा अभ्यास करावयाचा आहे आणि त्यानुसार तंत्रज्ञांचे प्रशिक्षण व संशोधन कार्यपद्धती प्रस्थापित करावयाची आहे.

१) असे समजले की, तंत्रज्ञानाचा भविष्यवेध घेण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र गट कार्य करत आहे. या गटाने दिलेले प्रस्ताव व सूचना यांच्या आधारावर मानवसाधनसंपत्ति विकास पुढील कार्यवाही-साठी सूचना देत आहे. इतर संशोधन संस्था त्यानुसार कार्यवाही करतील.

२) केंद्रीय अभ्यास केंद्रावर काही अभ्यास गट निर्माण करण्यात येतील, तसेच इतर चांगल्या संस्थांना संशोधन आणि विकास या कार्यक्रमाची रूपरेषा तयार करण्यासंबंधी सूचना देण्यात येतील.

# विभाग–४

## वित्त व्यवस्था

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असे नमूद करण्यात आले आहे की, भारतातील विद्यापीठांना संशोधनासाठी वाढीव अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. त्यामुळे संशोधन कार्यात गुणवत्ता टिकून राहण्याकरता योग्य कार्यवाही करण्यात येणार आहे. याचा अर्थ असा की, शासन आणि समाज अशा प्रकारच्या योजनांना वाढीव अर्थ सहाय्य करील. ज्ञानवाढीसाठी व तंत्रज्ञान विकासासाठी वैज्ञानिक क्षेत्रांना स्वयंपूर्ण असा आर्थिक विकासाचा आधार घेण्यात येईल. अशा प्रकारच्या प्रयत्नांतूनच तंत्रज्ञान नीति निर्धारण, विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षणातील उच्च प्रशिक्षण, यांना एक मानाचे स्थान प्राप्त होईल. यातून मूलभूत संशोधन केंद्रे आणि उच्च गुणवत्ता शिक्षण केंद्रे उघडण्यास उत्तेजन मिळेल.

असे निदर्शनास येते की, भारतात संशोधनकार्यावर राष्ट्रीय उत्पादनाच्या एक टक्कापण खर्च करण्यात येत नाही. इतर प्रगतशील देशात संशोधन आणि विकास यांवर होणारा खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ ते ३ टक्के आहे. काही प्रगत देशांत तर हा खर्च एकूण उत्पन्नाच्या ६ टक्के संशोधन व विकास यांवर करण्यात येतो. या समस्येबाबत दुसऱ्या दृष्टिकोनातूनही पाहता येईल. उच्च शिक्षणात संशोधन आणि विकास यांवर होणारा खर्च एकूण राष्ट्रीय खर्चाच्या किती टक्के आहे आणि इतर देशात किती आहे याचाही विचार केला पाहिजे. असे दिसून येते की प्रगत देशांत हा खर्च ३० टक्के आहे आणि इतर प्रगतिशील देशात हा खर्च १५ टक्के आहे. आजच्या आधुनिक औद्योगिक क्षेत्रात आणि सुरक्षा उद्योगात संशोधन आणि विकास यांवर होणारा खर्च वाढतच आहे. हा खर्च वाढवत जाण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. पण याच काळात भारतात हा आकडा फारच कमी आहे. प्रत्यक्ष आकडेवारी उपलब्ध नाही आणि ही शेकडेवारी कशी काढावी याविषयी सदैव दुमत झालेले आहे. तरीपण ही खर्चाची आकडेवारी ५ ते ६

टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. एवढे असून या संशोधन कार्यावर खर्च करावा याविषयी कोणाचेही दुमत नाही. शिक्षणक्षेत्रात संशोधन आणि विकास उपक्रमावर प्रस्तावित रकमेपेक्षा जास्त खर्च झाला पाहिजे असे सर्वांना वाटते. हा खर्च विज्ञान क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात आणि आर्थिक क्षेत्रात वाढत जाणारा आहे.

प्रत्येक विज्ञान आणि तांत्रिक संस्था, तसेच संशोधन व विकास संघटना यांनी संशोधन व विकास कार्यास वेगळी आर्थिक तरतूद करावी अशी सूचना देण्यात येईल, अशा प्रकारची निर्धारित केलेली तरतूद फक्त संशोधन आणि विकासाच्या कार्यावरच खर्च केली पाहिजे अन्य बाबींवर हा खर्च वळविण्यात येऊ नये. प्रत्येक उच्चशिक्षण संस्थेने संशोधन आणि विकास यावर विशिष्ट रक्कम वेगळी काढून ठेवावी, आणि फक्त संशोधन व विकास कार्यास उत्तेजन देण्यासाठी, संशोधना-संबंधी उपक्रम हाती घेण्यासाठी, प्रत्येक संस्थेने कमीतकमी पैशाची तरतूद करावी. विद्यापीठांनी आपल्या एकूण तरतूदीच्या ७ टक्के खर्च संशोधन करणाऱ्या संस्थांवरच केला पाहिजे. अशा प्रकारची तरतूद ८ व्या पंचवार्षिक योजनेपर्यन्त ७ टक्केपेक्षा कमी नसावी. उलट या होणाऱ्या खर्चाची टक्केवारी वाढत जावी अशी अपेक्षा आहे. ही वाढ १० ते १५ टक्क्यांपर्यंन्त वाढत गेली पाहिजे. अशा प्रकारची वाढ ही सन २००० पर्यंत होत गेली पाहिजे. याचबरोबर प्रत्येक संस्थेने अशा खर्चाकरिता उत्तम प्रतिसाद दिला पाहिजे. तसेच संशोधन करणारे विविध उपक्रम व प्रकल्प स्वतःच्या प्रगतीच्या उद्दिष्टांनुसार हाती घेतले पाहिजेत. हाती घेतलेल्या संशोधन क्षेत्रात सतत प्रगति होत आहे याकडे लक्ष पुरविले पाहिजे, पाठपुरावा केला पाहिजे, गुणवत्ता वाढीस वाव दिला पाहिजे. अशा प्रकारच्या प्रकल्पातील व उपक्रमांतील प्रगति अधिकाधिक उत्तम प्रकारे होत आहे, गुणवत्ता वाढत आहे. प्रत्येक संशोधन संस्थेत ठरलेल्या निकषाप्रमाणे काम होत आहे, या सर्व बाबींची पाहणी करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर 'संशोधन परिषदेची' स्थापना करण्यात येईल. अशा प्रकारची उच्च पातळीवर संशोधन संस्था उभारण्यात यावी याची या अहवालात शिफारस करण्यात आली आहे.

२. आज शिक्षणक्षेत्रातील महत्वाची गरज म्हणजे अनेक संस्था व विभाग चालत असलेल्या कार्यपद्धतीत यात व क्षेत्रांत संशोधनाचा विकास करणे ही आहे. याचवेळी संशोधन आणि विकास क्षेत्रांत ज्या अनेक संस्थांनी संशोधनाचे काम हाती घेतले आहे आणि त्या क्षेत्रात ज्या क्षमतांचा विकास केला आहे, अशा क्षमतांना सहाय्य करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात निर्देशित केल्याप्रमाणे अशा-प्रकारचे सहाय्य केल्यास तंत्रज्ञानाचा पाया विस्तारित होईल. तसेच उच्च शिक्षणात चालू असलेल्या संशोधन कार्याचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास सहाय्य होईल. आज भारतात २००० विद्यापीठ विभाग, पदव्युत्तर विज्ञान महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रज्ञान संस्था यांपैकी अनेक संस्था प्रारंभिक अवस्थेत संघर्षाच्या भोवऱ्यात सापडलेल्या आहेत. यांपैकी ५ ते १० टक्के संस्था अशा आहेत की ज्यांनी संशोधन क्षेत्रांत विविध क्षमतांचा विकास केला आहे. याकरिता एकच करावे लागेल, ते म्हणजे, अशा संस्थांत जे संशोधन कार्य चालू आहे त्यांच्या संशोधन कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणली पाहिजे, उत्पादनक्षमता वाढविली पाहिजे, आणि या संस्थेत जे प्रशिक्षित मनुष्यबळ काम करीत आहे, त्यांची गुणवत्ता टिकवून ठेवली पाहिजे. हे कार्य एका विशिष्ट निवडक पद्धतीने केले पाहिजे. त्याकरिता संस्थांच्या गरजा आणि कार्यक्षमतांची चाचणी घेण्यात यावी याचवेळी या आधारभूत विकासाचा पण विचार करण्यात यावा. अशा या सशोधन संस्थांचे मूल्यमापन करण्याचे काम त्वरित हाती घेण्यात यावे आणि याचबरोबर या सस्थांच्या कार्यपद्धतीची रूपरेषा या संदर्भात तयार करण्यात यावी.

थोडक्यात असेही म्हणता येईल की, सातव्या पंचवार्षिक योजनेत सन १९९० पर्यंत संशोधन संस्थांना, विद्यापीठे आणि त्याचे विभाग यांना, तंत्रज्ञान संस्थांना, विभागीय अभियांत्रिक महाविद्यालये यांना कमीत कमी दुप्पट किंवा तिप्पट पर्याप्त अर्थसहाय्य द्यावे लागेल. त्यामुळे अशा संस्थाना संशोधन आणि विकासात्मक उपक्रम हाती घेता येतील. ही सख्या पुढील पंचवार्षिक योजनेत वाढविण्यात यावी. या संस्थांच्या गरजांची पूर्ती करत असताना यांनी घालून दिलेल्या

कार्यपद्धती नष्टप्राय होणार नाहीत, तसेच यांची व्यवस्थित निगा राखली जाईल आणि अंतर्गत कार्यपद्धती व सोयी यांचे सतत आधुनिकीकरण होत राहील, याची काळजी घ्यावी लागेल.

३. शिक्षण क्षेत्रात संशोधन उपक्रमांना गती देण्याचे, विविध संस्थांतून आजपर्यंत जे प्रयत्न झाले आहेत, ते फारच मर्यादित स्वरूपाचे होते. सातव्या पंचवार्षिक योजनेत संशोधनाच्या क्षेत्रात विकासात्मक कार्यक्रम हाती घ्यावयाचे आहेत. त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने अनेक सोयी उपलब्ध करून द्याव्यात, सोयींची देवाण–घेवाण करण्यात यावी, प्रकल्पांना सहाय्य देण्यात यावे, अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आला आहे. पण संशोधन संस्थांवर पाच वर्षात खर्च करण्यासाठी जी ७५ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे ती फारशी पुरेशी नाही असे वाटते. यातूनच अनेक संस्थांना साधन-सोयी उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. देशातील अद्याप सर्व संस्थांना सामान्य सोयी उपलब्ध करून देणे शक्य झालेले नाही. अद्यापही विविध विद्याशाखांतून सामान्य सोयींचा अभाव दिसून येतो.

अशा स्थितीत असे सांगावेसे वाटते की, केंद्रीय शासनाच्या पंचवार्षिक योजनेतील तरतूदीतून ज्या सस्थांत प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध आहे, ज्या संशोधन सस्थांत आधारभूत क्षमतांचा चांगला विकास झालेला आहे, ज्यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे, अशा सस्थांचाच प्रथम विचार करण्यात यावा.

४. संशोधन आणि विकासाकरिता केलेल्या अर्थ व्यवस्थेचा लाभ संशोधन संस्थांनी केलेल्या कार्यभारास पूरकरीत्या सहाय्यभूत झाला पाहिजे. त्यामुळे या वैज्ञानिक संस्था स्वतःच्या संस्थेतील अंतर्गत कार्यपद्धतीतील विकासाची कामे हाती घेतील, विविध प्रकारच्या सोयी निर्माण होतील व संशोधन व विकास कार्यास गती मिळेल. काही साधन सोयी उपलब्ध करून देणे किंवा सध्याच्या उपलब्ध सोयीत किरकोळ बदल करणे, इमारती उभारणे इत्यादि कामे करणे शक्य होईल. काही संस्थांत मनुष्यबळ प्रशिक्षणाची आवश्यकता असेल तर काही संस्थांना पुस्तके वा संदर्भित मासिके यांची वाढ करणे आवश्यक असेल. विविध शिक्षण संस्थांत आणि संशोधन व विकास पद्धतीत दृढता

निर्माण करण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे. अर्थातच हे संशोधनाचे एक अविभाज्य अंग होय. संशोधन आणि विकास कार्यक्रमांतर्गत अशा-प्रकारच्या कार्याचा आरंभ झाला आहे. उच्च शिक्षण क्षेत्रांतील विविध संस्था, उदा. कृषि विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये, समाज विज्ञान संशोधन संस्था, आणि विविध विषयांतील उच्च शिक्षण संस्था यांना स्वतःची व्याप्ती आणि मर्यादा वाढविता येतील. विकास कार्यांत गतिमान असणाऱ्या योग्य संस्थांना आपली व्याप्ती आणि मर्यादा वाढविण्याची संधी मिळेल.

थोडक्यात असेही म्हणता येईल की, सातव्या पंचवार्षिक योजनेत संशोधन व विकास यांवर निर्धारित रकमेपेक्षा दरवर्षी थोडा थोडा खर्च संशोधनाच्या सोयी वाढविण्यासाठी करण्यात यावा लागणार आहे किंवा अशा प्रकारची खर्च वाढीची सोय करावी लागणार आहे. याचा उल्लेख यापूर्वीच करण्यात आला आहे. संशोधन व विकास कार्यक्रमावर प्रदीर्घ काळांत होणारा खर्च संशोधन परिषदेतील अशा प्रकारच्या कार्यक्रमावर होणारा खर्च, हा या संशोधन क्षेत्राची एक अंतर्गत बाब म्हणून ओळखण्यात येईल. संशोधन कार्य हे या संस्थेचे एक उपयुक्त साधन म्हणून सिद्ध होईल. म्हणजे संशोधन परिषदेचीही एक महत्त्वाची कार्यपद्धती होईल आणि शिक्षण क्षेत्रात झालेला खर्च अर्थपूर्ण आहे असे वाटेल.

सध्याचे संशोधन आणि विकास उपक्रम, आणि संशोधनास आधारभूत संस्था (उच्चशिक्षण केंद्र, विशेष सहायता केंद्र) यांना भक्कम आधार देऊन यांचा विकास केला पाहिजे. त्यांचा मूलभूत पाया मजबूत केला पाहिजे. अशा प्रकारच्या संशोधन व विकास कार्यक्रमाची वाढ करण्यासाठी आवश्यक खर्च करावयाचा आणि याच काळात अशा प्रकारची संशोधनाची योजना वृद्धिंगत करावयाची, असा या अहवालात निर्देश केला आहे. त्याकरिता राष्ट्रीय संशोधन सहाय्य निधी उभारण्यासाठी अनेक खाजगी उद्योगांकडून देणगी स्वीकारावी लागेल. अर्थसहाय्य करण्यास पुढाकार घेणाऱ्या संस्थांचा शोध घ्यावा लागेल. या संशोधन परिषदेकरिता योग्य असा निधी उभा करावा लागेल आणि त्यातूनच विविध क्षमता विकसित करणाऱ्या विद्यापीठा-तील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना किंवा राष्ट्रीय सोयी उपलब्ध करून देणाऱ्या संशोधनाच्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्थांना, धर्मादाय संस्थानी देणगी देण्यासाठी, सहाय्य करण्यासाठी प्रेरित करावे लागेल.

## विभाग – ५

# कार्यसंचालन आणि मूल्यमापन यंत्रणा

१. यापूर्वी सूचित केल्याप्रमाणे संशोधन आणि विकास यंत्रणेसाठी अंतर्गत शक्तिशाली योजना, परिणामकारक कार्यवाही आणि जबाबदार व्यवस्था आवश्यक आहे. सतत कार्यसंचालन करणारी एक यंत्रणा यासाठी उभारणे आवश्यक आहे. अशा प्रकारची यंत्रणा संशोधन परिषदेत निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सशोधन क्षेत्रात गतिमान वाटचाल टिकून राहील; तसेच निर्धारित कार्यसंचालन होईल आणि त्यामुळे संशोधन क्षेत्रात सहकार्यातून निर्माण झालेली यंत्रणा गतिमान राहील. संशोधन आणि विकास क्षेत्रातील विविध कार्यक्रमांस गति देणाऱ्या विविध संशोधान सस्था, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था, या व्यवस्थेमुळे उपयुक्त होतील, आणि सशोधान आणि विकास या कार्यातून उच्च शिक्षणातील प्रगति साध्य होईल. या अहवालात अन्यत्र उल्लेख केल्या प्रमाणे सशोधान कार्यास सहाय्य करणाऱ्या संस्था आपल्या संशोधान कार्याचे प्रकल्प आपल्या निर्धारित उद्दिष्टानुसार कार्यरत ठेवतील, संशोधान परिषदेच्या आदेशान्तर्गत अशा संशोधान संस्था कार्यरत राहतील, स्वतःची अर्थव्यवस्था नियंत्रित ठेवतील आणि त्याचबरोबर संशोधान परिषद त्यांना पूरक रूपाने स्वतःचे कार्य चालू ठेवण्यास सहाय्य करील. राष्ट्रीय आणि राज्यपातळीवर, संशोधान परिषद प्रमुख सस्था म्हणून काम करील. तसेच इतर राज्यातील संस्थांच्या अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याचे काम पण करील. अद्यावत व उपयुक्त माहिती पुरविण्याचे काम एका स्तरावरून वरच्या स्तराकडे पाठविण्याचे काम या सस्था करतील. त्यामुळे उच्चशिक्षण संस्थांना विस्तारित स्वरूपात त्या माहितीचा विचार करावा लागेल, आणि त्याचबरोबर प्रत्येक सशोधान संस्थेला अचूक आणि अद्यावत माहिती पुरविण्याचे काम करता येईल. कार्यसंचालनाची मर्यादा निश्चित करणे, कायसंचालनाच्या

खर्चावर नियंत्रण ठेवणे, अशा प्रकारच्या बाबींची एक यंत्रणा उभी करण्याचे काम विद्यापीठ अनुदान मंडळ, राष्ट्रीय समाज विज्ञान परिषद, राष्ट्रीय कृषि विज्ञान परिषद आणि राष्ट्रीय तंत्रज्ञान परिषद यांच्या हाती राहील.

२. रचनात्मक आणि समाकलनात्मक मूल्यमापन निश्चित केलेल्या वेळी करण्यात येईल आणि त्याची माहिती राष्ट्रीय शिक्षण परिषदेस दिली जाईल. त्या संस्थेमार्फत अशा माहितीचा उपयोग विविध संस्था व यंत्रणा, हाती घेतलेल्या कार्यात बदल करण्यासाठी, लक्ष्य बदलण्यासाठी, अगर कार्यपद्धती बदलण्यासाठी, किंवा कार्यक्रमांचा क्रम बदलण्यासाठी करतील.

३. कार्यपद्धतीचा आराखडा करतानाच आरंभापासून त्यात नियंत्रण व्यवस्थेचा समावेश केला जाईल.

□ □ □

## प्रकरण १२ वे

# स्त्रियांच्या समानतेसाठी शिक्षण

**सद्य:स्थिती**

१. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हा एकच महत्त्वाचा कार्यक्रम शिक्षण विभागात होता. १९५१ ते १९८१ च्या दरम्यान स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ७.९३ टक्क्यांवरून २४.८२ टक्क्यांपर्यंत वाढले होते. तथापि संख्येचा विचार केला तर निरक्षर स्त्रियांची सख्या १५८.७ लक्षावरून २४१.७ लक्षापर्यंत (आसाम सोडून) वाढली होती. एकूण निरक्षर लोकसख्येत ५७ टक्के स्त्रिया आहेत. तर शाळेत नाव न नोंदविलेल्या मुलांपैकी ७० टक्के मुळी आहेत. आतापर्यन्त याबाबतीत प्रयत्न करून सुद्धा स्त्रियांच्या समानतेबाबत पुरेसा सहभाग घेण्यात शिक्षणपद्धती असमर्थ ठरली आहे.

**२. लक्ष्य**

अ) १९९० पर्यंत मुलींना, विशेषत: प्राथमिक शिक्षण देणारा, टप्प्याटप्प्याचा पण कालबद्ध कार्यक्रम व १९९५ पर्यंत उच्च प्राथमिक शिक्षण देणारा कार्यक्रम.

ब) १९९५ पर्यंत १५ ते ३५ वयोवटातील स्त्रियांना (ज्यांची संख्या अंदाजे ६.८ कोटी आहे.) प्रौढ शिक्षण देणारा टप्प्याटप्प्याचा व कालबद्ध कार्यक्रम.

क) स्त्रियांचा व्यावसायिक, तांत्रिक, धंदेवाईक, तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या व उदयोन्मुख तंत्रज्ञानाकडे वाढता प्रवेश.

ड) स्त्रियांच्या समानतेबाबत भरीव मदत होईल, अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे सिंहावलोकन व पुनर्रचना आणि उचित अशा विभागाची निर्मिती.

### धोरणात्मक निकष व कार्यपद्धती

३. स्त्रियांच्या दर्जात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा उपयोग केला जाईल, असा विचार राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक प्रणालीने (१) स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देण्यात विधायक मध्यस्थाची भूमिका घ्यावी. (२) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यांमध्ये सुधारणा करून नवमूल्यांच्या विकासासाठी मदत करावी. ३) विविध अभ्यासक्रमातील भाग म्हणून स्त्रियांबाबतच्या अभ्यासाला उत्तेजन द्यावे. लक्ष्य आणि कार्यपद्धतीची अंमलबजावणी यांमध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टी असतील.

१) संपूर्ण शिक्षण प्रणालीत स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देण्यासाठी विधायक स्वरूपाची मध्यस्थाची भूमिका वठविण्यास नियोजन करण्याच्या कामास गती देणे.

२) विविध अभ्यासक्रमातील भाग म्हणून स्त्री शिक्षणास उत्तेजन देणे व स्त्रियांच्या विकासास मदत करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना निरनिराळे कृतियुक्त कार्यक्रम घेण्यासाठी उत्तेजन देणे.

३) व्यावसायिक, तांत्रिक व धंदे शिक्षणात स्त्रियांच्या प्रवेशास अधिक संधी देणे.

४. अपेक्षित लक्ष्य गाठण्यासाठी गतिमान व्यवस्थापनाचा आकृतिबंध निर्माण करणे.

## कार्यपद्धतीचे प्रतिपादन व कार्ययोजना

### स्त्रियांचे अधिकार

सामूहिक विचार मंथन व सामूहिक निर्णय घेणे, यातूनच स्त्रियांना अधिकार प्राप्त होतात. अधिकार प्राप्तीचे निकष पुढीलप्रमाणे.

व्यवहारशुद्ध आत्मप्रतिमा व आत्मविश्वास निर्मिती;

सम्यक् विचार करणाऱ्या क्षमतांचा विकास;

समूहात्मक भावनेची निर्मिती व निर्णय घेऊन कृती करण्यास उत्तेजन.

सामाजिक बदल घडविण्याच्या प्रक्रियेत समान सहभागाची खात्री.

समाजात बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने गटाच्या कृतीला उत्तेजन.

आर्थिक स्वातंत्र्यासाठी लागणाऱ्या पैशाची (तजवीज) तरतूद.

५. वरील निकर्षाच्या प्राप्तीसाठी पुढील उपाय योजावे लागतील.

अ) १९९५ पर्यंत स्त्रियांची संघटना निर्माण करणारे, त्यांच्यात परस्पर आदान प्रदान विषयक वाढ करणारे तसेच स्त्रियांच्या बिकट अवस्थेची जाणीव व त्याचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन देणारे व प्रत्यक्ष कृतीत आणणारे कार्यक्रम प्रत्येक शैक्षणिक संस्थेने हाती घ्यावेत.

ब) सर्व शिक्षक, अनौपचारिक प्रौढ शिक्षण देणारे मार्गदर्शक यांना स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देणारा प्रतिनिधी म्हणून प्रशिक्षण दिले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, प्रौढ शिक्षण संचालनालय, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा, राज्यस्तरीय साधन संपत्ती केन्द्रे (SRCS) विश्वविद्यालयीन विद्यापीठ अनुदान केन्द्र VGC या संस्था खास प्रशिक्षण कार्यक्रम तयार करतील. शिक्षकांच्या व अनौपचारिक/प्रौढ शिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकांच्या प्रशिक्षणात अशा घटकांचा समावेश केला जाईल की, ज्यायोगे स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देण्याचे काम करण्याची प्रेरणा त्यांना मिळेल. अशा प्रशिक्षण कार्यक्रमात सेवाभावी संस्था, स्त्रियांच्या विकासासाठी काम करणाऱ्या कार्यकारी गटांचा समावेश केला जाईल.

क) स्त्री शिक्षिका व अनौपचारिक/प्रौढ शिक्षण देणाऱ्या स्त्री–मार्गदर्शिका यांना स्त्रियांच्या समानतेसाठी क्रियाशील भूमिका घेऊ शकतील अशा प्रकारचे खास उद्बोधन केले जाईल.

ड) संशोधन संस्थांनी, सेवाभावी संस्थांनी आणि कलावंतांच्या व्यावसायिक समूहांनी चर्चासत्रे, नाटके, प्रवचने, भित्तीचित्रे, कळसूत्री बाहुलीनाटय, इत्यादि उपक्रमांच्या द्वारा स्त्रियांमध्ये सर्वसामान्य जाणीव व आत्मप्रतिमा निर्माण करण्यासाठी खास कार्यक्रम केले पाहिजेत.

इ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उद्धृत केलेल्या या उद्दिष्टपूर्ती-साठी समाजातील जवळ जवळ सर्व घटकांनी एकत्र येऊन काम करावे यासाठी त्यास योग्य असलेले वातावरण निर्माण केले पाहिजे. या क्षेत्रात (रेडिओ, टी. व्ही. इत्यादि) माध्यमांनी केलेली महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन १९८६–८७ सालासाठी (रेडिओ) आकाशवाणी व (टी. व्ही.) दूरदर्शन यांनी धोरणाबाबत स्पष्ट रूपरेषा तयार करावी आणि त्या धोरणानुसार अनुकूल काम करण्यासाठी चित्रपट इत्यादि व इतर माध्यमांना वळविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत

फ) शालेय स्तरांपर्यंत शिक्षकांच्या भरतीमध्ये स्त्रियांना प्राधान्य दिले जावे. ग्रामीण भागात यामुळे पालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल व आपल्या मुलींना शाळेत पाठविण्यासाठी प्रेरणा मिळेल.

ग) स्त्रियांना मिळणाऱ्या नव्या दर्जाचा विचार करताना स्त्रियांना अधिकार प्रदान करण्याचे प्रभावी साधन समान पायाभूत अभ्यासक्रम उपयुक्त होईल. राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषदेतील स्त्रियांसाठी असणारा विभाग पुन्हा चालू करण्यात येईल व त्या विभागाकडे स्त्री–समानतेशी निगडित असे अभ्यासक्रमातील पायाभूत घटक तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात येईल. हा विभाग शालेय पाठ्यपुस्तकातील पुरुषांचे श्रेष्ठत्व व स्त्रियांचे कनिष्ठत्व व्यक्त करणारे पाठ वगळण्याचे किंवा काढून टाकण्याचे काम जलद गतीने करील. नेमून दिलेली भूमिका पार पाडण्यासाठी ह्या विभागाने इतर व्यक्तींचे सक्रीय सहाय्य घ्यावे.

ह) 'राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था' योग्य अशा राज्यस्तरीय संस्था, शिक्षक, प्रशिक्षक, नियोजनकार व प्रशासक हे स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जाणीव निर्माण करण्याचे अधिक महत्त्वाचे कार्यक्रम प्रशिक्षण, सेवांतर्गत प्रशिक्षण व प्रबोधन देणारे अभ्यासक्रम, या द्वारा करतील. राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थांमध्ये सुद्धा एक महत्त्वाचा विभाग ह्या कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी असेल.

**स्त्री विषयक अभ्यास**

६. स्त्रीविषयक अभ्यासात चार बाजू असतील. अध्यापन, संशोधन, प्रशिक्षण व विस्तार. अध्यापनात पुढील कार्यक्रमांचा समावेश असेल.

१.) पदवी न मिळविलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने सुरू करावयाच्या आधारभूत कार्यक्रमात स्त्रियांचा दर्जा व त्याची भूमिका या विषयांशी निगडित असणाऱ्या महत्वाच्या समस्यांचा समावेश असेल.

२) निरनिराळया शाखांच्या अभ्यासक्रमात स्त्रीविषयक विविधांगांचा समावेश असेल.

३) स्त्रीपुरुषवाचक ठराविक साच्याचे पाठ, पुरुषांचे श्रेष्ठत्व व स्त्रियांचे कनिष्ठत्व व्यक्त करणारे पाठ्यपुस्तकातील पाठ वगळले जातील.

७. संशोधन क्षेत्रात पुढील उपाययोजना केली जाईल.

१) ह्या क्षेत्रातील ज्ञानाच्या प्रगतीसाठी व माहितीचा पाया विस्तृत करण्यासाठी महत्त्वपूर्ण अशी निवडलेली क्षेत्रे व विषय, यांमध्ये संशोधन करण्यास उत्तेजन दिले जाईल.

२) अपायकारक होण्यास कारणीभूत झालेली, अस्तित्वात असलेली तंत्रे व साधने यांचे सम्यक मूल्यमापन केले जाईल. जरूर वाटल्यास संशोधन पद्धतीत सुधारणा केली जाईल.

८. प्रशिक्षण क्षेत्रात पुढील उपाय योजिले जातील.

१) स्त्रीविषयक अभ्यासाची गरज व विद्यापीठीय शिक्षणातील वा विषयाची भूमिका, यांबाबतची माहिती व प्रतिक्रिया, यांचा कृतिसत्रे/ शिबिरे यांच्या द्वारा प्रसार केला जाईल.

२) स्त्रियांच्या संदर्भात येणारे घटक हाताळणे व सर्वसामान्य घटकात स्त्रियांबाबतच्या विविधांगी बाबींचा समावेश करणे, यांसाठी शिक्षकांचे व संशोधकांचे उद्बोधन केले जाईल.

३) अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी कृतिसत्रे घेतली जातील.

९. विस्ताराच्या संदर्भात –

ज्या कार्यक्रमांनी समाजाचा प्रत्यक्ष फायदा होईल; व स्त्रियांना अधिकार प्राप्त होतील, असे कार्यक्रम घेण्यास शैक्षणिक संस्थांना उत्तेजन देण्याबाबत सुचवले आहे.

१०. स्त्रियांचे अधिकार हेच ज्यांचे सरळ लक्ष्य आहे अशा विकासात्मक कार्यक्रमांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येईल. असे विकासात्मक कार्यक्रम म्हणजे, प्रौढशिक्षण, जाणीव जागृती, साक्षरता, कायद्यांचे प्राथमिक ज्ञान, इत्यादि होत.

**प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व प्रौढशिक्षण**

११. देशातील शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या भागात सध्या अस्तित्वात असलेल्या मुलींच्यासाठी ९०:१० प्रमाणात असलेल्या अनौपचारिक शिक्षण केंद्रांची विस्तार केला जाईल. अनौपचारिक शिक्षणकेंद्रे समाजाधिष्ठित असली पाहिजेत. नियोजनाची जबाबदारी, मार्गदर्शकांची निवड व नियंत्रण, इत्यादि बाबी पालकांसह समाजाकडे असाव्यात. सेवाभावी संस्थांना मुलींसाठी अनौपचारिक शिक्षण केंद्रे चालविण्याकरिता अधिक सहाय्य दिले पाहिजे.

१२. ग्रामीण भागात मुलींना घरातच गुंतवून ठेवले जाते. मुलांना सांभाळणे, घरगुती कामे करणे. इंधन गोळा करणे, चारा पाणी आणणे, किंवा एक दिवसाची कमाई करणे, इत्यादि कामे मुलींना करावी लागतात. ही कामे करण्यासाठी म्हणुन १९९५ पर्यंत शैक्षणिक धोरणात उल्लेखिलेल्या 'विशेष सहाय्य सेवांचा' (Special support services) विस्तार ह्या सर्व विभागापर्यन्त झाला पाहिजे. शाळांमधून मुलींची पटनोंदणी वाढविणे व ती संख्या टिकवून धरणे, यांसाठी बालशिक्षण केंद्रे ही महत्त्वाची सहाय्य सेवा आहे. सामाजिक वनीकरण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, दुपारचे जेवण व इतर पोषणविषयक कार्यक्रम, बिनधुराच्या चुली, यांसारखे इतर उपाय मंत्रिमंडळांनी व संघटनांनी १९९० पर्यंत योजिले पाहिजेत. या उपायांनी स्त्रियांच्या जीवनातील काबाडकष्टांची कामे कमी होतील व प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी-करणाचे उद्दिष्ट साध्य होईल.

१३. खेड्यात अथवा स्थानिक भागात व्यवसायांशी अथवा कामाच्या संधीशी निगडित कौशल्यांच्या विकासात, इतर गोष्टी बाजूला सारून, प्राधान्य दिले जावे. त्यामुळे पालकांना आपल्या मुलींना शिकविण्यासाठी प्रेरणा मिळेल.

१४. १९९५ पर्यंत स्त्रियांमधील निरक्षरता निर्मूलनासाठी १५ ते ३५ वयोगटातील स्त्रियांना शिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रौढ शिक्षण वर्ग सुरू केले पाहिजेत. या वयोगटातील बहुतांश स्त्रिया कामगार असल्याने निव्वळ साक्षरतेशी त्यांचा संबंध असत नाही, म्हणून प्रौढशिक्षण कार्यक्रम हा त्यांची कौशल्ये विकसित होणे व त्यांच्या कमाईस पोषक होणाऱ्या कृतींशी संबंधित असणे जरूर आहे.

१५. मुली व स्त्रियांमधील कौशल्य विकासाचा कार्यक्रम हा अनौपचारिक शिक्षण केंद्रांपासून प्रौढशिक्षण केंद्रापर्यंत सातत्याने चालला पाहिजे. निरंतर शिक्षण केंद्रांची स्थापना टप्प्याटप्प्याने व्हावी. त्या केंद्रांनी व्यवसाय शिक्षणाचे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. त्यांची साक्षरता टिकवून धरण्यासाठी संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तसेच आपले जीवनमान उंचावण्यासाठी शिकविलेल्या सर्व कौशल्यांचा उपयोग करण्याची संधी दिली पाहिजे.

१६. तंत्रनिकेतने, सामाजिक तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रमिक विद्यापीठे, केंद्रीय समाज कल्याण मंडळे, राज्यस्तरीय समाजकल्याण सल्लागार मंडळे, सेवाभावी संस्था व कृषि, विज्ञान केंद्रे, शेती व गृहविज्ञान, महाविद्यालयातील स्त्रियांची केंद्र, यांनी आपल्या विस्तार कार्यक्रमातील भाग म्हणून आयोजित अनौपचारिक व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकास इत्यादि कार्यक्रम शिक्षण केंद्रांद्वारा मिळालेल्या कौशल्य विकासास उपकारक ठरतील. याशिवाय ज्या उद्योगधंद्यात स्त्रियांना नोकरी दिली जाते त्यांनी स्वतःच अनौपचारिक, व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविले पाहिजेत. परिणामकारक अध्ययनासाठी व नियंत्रणासाठी शिक्षणखात्यात स्त्रीमंडळे असली पाहिजेत.

स्त्रियांच्या व्यावसायिक, तांत्रिक व धंदे शिक्षणात, तसेच अस्तित्वात असलेल्या व उदयोन्मुख तंत्रज्ञानात स्त्रियांना प्रवेश मिळावा.

१७. शालेय शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर, अगर कार्यानुभवाचा वा व्यावसायिकरणाचा एक भाग म्हणून, मुलींना विविध प्रकारच्या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमांबाबत माहिती दिली पाहिजे. औपचारिक तसेच अनौपचारिक पद्धतीने व्यावसायिक प्रशिक्षण दिले पाहिजे. जी कौशल्ये शिकवावयाची त्यांची निवड तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती, पारंपारिक उद्योगधंदे, व शासनाकडून अथवा खाजगी संस्थांकडून स्वीकारलेले नवीन कार्यक्रम, यांवर अवलंबून राहील.

१८. १०४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था केवळ स्त्रियांसाठी काम करीत असून, सामान्य औद्योगिक प्रशिक्षण सं‍ ांमधून ९७ विभाग स्त्रियांसाठी राखून ठेवलेले आहेत. १९८७-९० या कालावधीत या संस्थांमध्ये पुढील प्रकारची सुधारणा केली जाईल.

१) व्यवसाय व अभ्यासक्रम यात विविधता आणली जाईल. त्या क्षेत्रातील कामाचे सामर्थ्य, महत्त्व लक्षात घेऊन संस्थाचालकांना मालकांशी सातत्याने सुसवाद करता येतील, अशी परिणामकारक रचनापद्धती ठरविली जाईल. अभ्यासक्रमात विविधता आणण्यामागची कल्पना अशी की, ज्या व्यवसायात (अध्यापन व शुश्रूषा करणे) स्त्रिया प्रामुख्याने योग्य ठरल्या जातात. त्या व्यवसायात जरी मुलींना खास प्राधान्य मिळणे चालूच राहीले तरी पण ही गोष्ट उच्च दर्जाच्या तांत्रिक व धंदेशिक्षणात भाग घेताना अडसर ठरणार नाही. व्यावसायिक, तांत्रिक व धंदेशिक्षणाच्या अभ्यासक्रमासाठी स्त्रिया व पुरुष यांना समानसंधी उपलब्ध करून दिली जाईल.

२) प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्था / विभागीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था / राष्ट्रीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था व तंत्रनिकेतन यांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन हा प्रभावी घटक असेल. अपारंपारिक अभ्यासक्रम निवड करण्यात प्रेरणा देण्याची पूर्वतयारी म्हणून मुलींना शाळांतून योग्य असे उद्बोधन उपलब्ध करून दिले जाईल.

३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था/विभागीय/राष्ट्रीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था/तंत्रनिकेतने/सामाजिक तंत्रनिकेतने ह्या संस्था प्रत्यक्ष धंद्याबाबतच्या प्रशिक्षणाबरोबर पतपेढ्या, बँकांचे व्यवहार, व्यवस्थापकीय प्रगती यांबाबत माहिती देतील. स्त्रियांचे प्रमाण

वाढविण्यासाठी उमेदवारी योजनांची (यंत्रणा) कार्यवाही अधिक मजबूत व सामर्थ्यवान करण्यात येईल.

४) कुशल कारागिरीचे प्रशिक्षण घेण्याकरिता स्त्रियांना संधी उपलब्ध करून देण्यात लक्षणीय वाढ करण्यासाठी, सध्याच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात दुबार पद्धत सुरू करण्यात येईल. एक सत्र सकाळी व दुसरे दुपारी.

५) DGE & T कार्यालयात स्त्रियांचे स्वतंत्र व्यावसायिक प्रशिक्षण संचालनालय असावे.

६) तांत्रिक शिक्षणातील स्त्रियांच्या प्रवेशाच्या प्रमाणात दर्जा व संख्येच्या दृष्टीने सुधारणा केली जाईल. सर्व प्रकारच्या तंत्र शिक्षण संस्थांतील प्रमाणपत्र/पदविका/पदवीसाठी धंदा अथवा शाखांची निवड करतांना स्त्रियांना समानता मिळवून देणे या उद्दिष्टांचा विचार केला जाईल. तंत्रशिक्षण विभागात उद्धृत केलेल्या सर्व प्रेरक गोष्टी पुरविल्या जातील.

**केंद्रातील व राज्यातील व्यवस्थापनाचा आराखडा**

१९. केंद्रीय व राज्यपातळीवर दोन्हीकडे वर उल्लेखिलेल्या कार्यक्रमांचे नियोजन, समन्वय, नियंत्रण व मूल्यमापन सातत्याने केले जाईल. सर्व कार्यक्रमांना जबावदार असणाऱ्या सर्व संबंधित संघटना मजबूत केल्या जातील. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतील स्त्रियांच्या विभागाचे पुनरूज्जीवन केले जाईल. व तो मजबूत केला जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था व प्रौढशिक्षण संचालनालयांमध्ये स्त्रियांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी प्रभावी विभाग असतील. उच्च शिक्षण पातळीवरील निरनिराळ्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी व नियंत्रण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळातील स्त्रियांचा विभाग मजबूत केला जाईल.

२०. सर्व राज्यात राज्यपातळीवर स्त्रियांचा विभाग स्थापन करण्यात यावा. त्या विभागाला आवश्यक असा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा व त्यावर प्रमुख म्हणून किमान सहसंचालकाच्या दर्जाचा एक अधिकारी असावा.

प्रकरण १३ वे

# अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास वर्गीयांचे शिक्षण

**सद्य:स्थिती**

१. सन १९८१ च्या जनगणनेनुसार भारतातील सर्व मागासवर्गीय जाती आणि जमातींचे साक्षरतेचे शेकडा प्रमाण अनुक्रमे २१.३८ व १६.३५ आहे. मात्र याचवेळी मागास वर्गेतर लोकसंख्येमध्ये हे प्रमाण शेकडा ४१.२० असे होते. मागासवर्गीय जाती, जमाती व मागास वर्गेतर जनता या वर्गांमध्ये स्त्रीसाक्षरतेचे शे. प्रमाण अनुक्रमे १०.९३, ८.०४ व २९.४३ असे आहे. सर्व शैक्षणिक पातळ्यांवर वर्गीकृत जाती व जमातींच्या मुलांच्या एकूण संख्येच्या प्रमाणांत त्यांचे पटनोंदणीचे प्रमाण अत्यल्प राहिले असून, गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. या वर्गामधील मुलींच्या बाबतीत तर ही समस्या फार गंभीर स्वरूपाची आहे. अशा परिस्थितीत मागासवर्गीय जाती व जमातींच्या शैक्षणिक विकासासाठी पद्धतशीरपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**धोरण, लक्ष्य आणि पद्धतीचा सूचित अर्थ**

२. शैक्षणिक विकासाचे मध्यवर्ती केंद्रस्थान म्हणजे वर्गीकृत जाती जमातींना जनसामान्यांबरोबर सर्व थरांतून, सर्व शैक्षणिक पातळीतून शिक्षण देणे होय.

३. यासाठी ६ ते ११ वयोगटातील (वर्ग १ ते ५) मागासवर्गीय जाती/जमातींतील मुलांची १०० टक्के पटनोंदणी करून, आणि त्यांना शाळेत टिकवून ठेवण्याचे खात्रीलायक प्रयत्न करून, प्राथमिक शिक्षण किंवा अनौपचारिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करून, त्यांचे शिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सन १९९० पर्यंत साध्य केले गेले पाहिजे. म्हणजेच, १९९० पर्यंत ६ ते ११ वयोगटातील अनुसूचित

जातींची सुमारे १ कोटी ५५ लाख मुले, अनुसूचित जमातीतील सुमारे ७५ लाख मुले यांची पटनोंदणी व्हायला हवी.

४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये निश्चित केली गेलेली धोरणात्मक ध्येये साध्य करण्यासाठी ११ ते १४ (वर्ग ६ ते ८) वयोगटातील मुलांचे इ. ८ वी पर्यंतचे शिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण होण्यासाठी त्यांची कमीत कमी ७५ टक्के पटनोंदणी केली गेली पाहिजे आणि त्यांना शाळेत टिकविले पाहिजे.

५. उपरोल्लेखित ध्यैयं साध्य करण्याकरिता व उद्दिष्टांप्रत वाटचालीसाठी पुढीलप्रमाणे कृतिशील मार्गाचा अवलंब केला जाईल.

अ) गरजू/गरीब कुटुंबांना, त्यांची मुले १ ० वर्षे वयाची होईपर्यंत नियमित शाळेत पाठविण्याकरिता उत्तेजन.

गरजू/गरीब, वर्गीकृत जाती/जमातीच्या कुटुंबाना उत्तेजन/मदत देण्यासाठी राज्यसरकारांच्या मदतीने या उत्तेजनात्मक योजनांचा तपशीलवार आराखडा तयार केला जाईल.

१) राज्य सरकारच्या अखत्यारीतील व त्यांच्या निधीतून दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्यांचे नियमित वाटप होण्यासाठी (केंद्रशासन पुरस्कृत, तथाकथित 'गलीच्छ धंदे' करणाऱ्या लोकांच्या मुलांना केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या ५०.५० टक्के निधीतून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या वगळता) संबंधितांना निरंतर शिष्यवृत्त्यांच्या रकमांचे वाटप प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस झालेच पाहिजे. विलंब टाळण्यासाठी उमेदवारांच्या पालकाने स्वतः सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे नवीन शिष्यवृत्त्या मंजूर केल्या जातील.

२) शिष्यवृत्त्यांच्या वितरणासाठी एकमेव अशा प्रमुख प्रातिनिधिक संस्थेची निवड केली जाईल. शिष्यवृत्त्यांच्या वितरणाची सविस्तर आखणी करण्यासाठी व शिष्यवृत्त्या प्रदान करण्यामध्ये तत्परता निर्माण व्हावी, यांसाठी राज्य सरकारांना एक महिन्याच्या आत, योजना तयार करण्याची विनंती केली जाईल.

३) पतपेढया, डाक कार्यालये यांच्यामार्फत शिष्यवृत्त्या दिल्या जाव्यात किंवा जिल्हा ग्रामोण विकास मंडळ (डी. आर. डी. ए.) मागासवर्गीय महामंडळे यांचासुद्धा या कामासाठी शोध घेतला जाईल.

४) अनुसूचित जाती/जमातींच्या मुलांची पूर्णत: पटनोंदणी होण्यास मदत व्हावी हा दृष्टिकोन लक्षात घेऊन पुरेशा प्रमाणात शिष्यवृत्त्यांचे दर आणि रक्कम वाढविली जाईल.

५) अनुसूचित जाती/जमातींच्या सर्व पात्र मुलांचे शाळेत दाखल होण्याचे प्रमाण शंभर टक्के ठेवले जाईल.

६) भारत सरकार तर्फे (समाज कल्याण खाते) दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्त्या लवकर दिल्या जाव्यात यासाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्त्या देण्याबाबत वर सांगितलेल्या धर्तीवर उपाय योजना केली जाईल.

७) शिष्यवृत्त्यांच्या दरांची पुनर्रचना करण्यासाठी समाजकल्याण खात्याने नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने अंतिम निर्णय घेतल्यानंतर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्त्यांबाबतच्या आर्थिक अंदाजपत्रकाची आखणी केली जाईल.

८) गणवेश वाटप, पुस्तके व शालोपयोगी साहित्य वाटप, यांसारख्या उत्तेजनात्मक योजनांच्या बाबतीत राज्यसरकारे सविस्तर अशी अंदाजपत्रके तयार करतील आणि त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल.

ब) सफाईकाम, कातडी काढणे आणि कमावणे यासारख्या व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबातील मुलांना मॅट्रीक–पूर्व शिष्यवृत्त्या.

१) सध्या इयत्ता ६ वी ते १० वी च्या मुलांसाठीच लागू असणारी ही शिष्यवृत्ती योजना अशाप्रकारे मर्यादित न ठेवता सन १९८६–८७ या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीपासूनच इ. १ ली च्या मुलांपासून सर्वच मुलांना लागू करण्याकरिता समाज कल्याण खात्याने आवश्यक ती पावले उचलावीत. उत्पन्नाची मर्यादा रद्द केली जावी.

२) बिगर निवासी शिष्यवृत्ती धारकांनाही या योजनेचा फायदा दिला जाईल.

क) कोणत्याही स्तरावर वर्गीकृत जाती/जमातीच्या मुलांची पटनोंदणी, त्यांचे शाळेत टिकून राहणे, व यशस्वीरीत्या अभ्यासक्रम पूर्ण करणे (हे घसरले जाऊव) ह्यांत खंड पडू नये म्हणून सातत्याने सूक्ष्म नियोजन आणि पुर्नविलोकन केले जाईल.

१) सूक्ष्म नियोजनामध्ये ठराविक कालमर्यादेच्या ग्राम व गट पातळीवरील योजना तयार करणे. शिक्षण संरचनेचा आराखडा तयार करणे, व त्यातील सदोषता दूर करणे, शिक्षक, पालक, स्थानिक नेते, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींना सहभागी करून घेऊन मुले शाळेत पाठविण्यास पालकांना प्रवृत्त करण्यासाठी ग्राम पातळीवर विशेष भर देणे आणि व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी वर्गीकृत जाती/जमातींची मुले तयार व्हावीत म्हणून इ. ९ वी ते १२ वी मध्ये खास मार्गदर्शनाची व इतर सर्व स्तरावर उपचारात्मक मार्गदर्शनाची तरतूद करणे, या सर्व बाबी समाविष्ट असतील.

ड) १) अनुसूचित जाती जमातींमधून शिक्षक भरती.

सध्या अस्तित्वात असलेली गाबावतची तफावत नाहीशी करण्यासाठी आणि एकशिक्षकी शाळांची गरज भागविण्यासाठी, अनुसूचित जाती/जमातींतील शिक्षक भरतीचा धडक कार्यक्रम हाती घेतला जाईल. शैक्षणिक गुणवत्ता, मुख्यत्वे स्त्री शिक्षकांसाठी शिथिल केली जावी. भरती केलेल्या शिक्षकांच्या निरंतर शिक्षणाकरिता त्यांचा व्यावसायिक दर्जा उंचावला जाण्याकरता पुरेशी तरतूद केली जाईल.

ई) जिल्ह्याच्या ठिकाणी अनुसूचित जाती/जमातीतील मुलांसाठी वसतिगृह व्यवस्था.

१) ज्या जिल्ह्यांच्या ठिकाणी वर्गीकृत जाती/जमातींच्या मुलांसाठी वसतिगृहाची सोय नाही ती उपलब्ध करून देण्यासाठी १९८६–८७ या वर्षामध्ये आखीव कार्यक्रम हाती घेतला जाईल.

२) समाजकल्याण खाते ही योजना केंद्रशासन पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत हाती घेईल.

फ) अनुसूचित जातींच्या वस्त्या–मोहल्ले व आदिवासी खेडी, यांमध्ये शालेय इमारती, बालवाड्या आणि प्रौढशिक्षण केन्द्रांची स्थापना.

शालेय इमारतींची स्थापना अनुसूचित जातींच्या वस्त्या/मोहल्ले, आदिवासी खेडी/तांडे या ठिकाणी करण्यास प्राधान्य दिले जाईल.

ग) अनुसूचित जाती जमातींना शैक्षणिक सवलती उपलब्ध करून देण्यासाठी ' राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम ' आणि 'ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम ' यांपासून मिळणाऱ्या निधीचा वापर.

१) शैक्षणिक यंत्रणेतील उणीवा लक्षात घेऊन ' राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम ' या कार्यक्रमांमधून उपलब्ध झालेल्या निधीतून आदिवासी खेड्यांमधून आणि मागासवर्गीय जातींच्या वस्त्यांमधून शैक्षणिक संस्था विकसित करण्यासाठी एक गतिमान कार्यक्रम हाती घेतला जाईल.

ह) आदिवासी जमातींच्या संदर्भात पाठ्यक्रमाचा आशय व मूल्याभिमुखता.

१) एक लाखापेक्षा जास्त लोकांची बोली असणाऱ्या आदिवासी भाषांची इ. १ ली व २ री ची प्राथमिक पुस्तके तयार करण्याचे काम सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत पूर्ण केले पाहिजे.

२) एकजिनसी समाजाच्या स्थापनेप्रत घेऊन जाणाऱ्या राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात जात आणि इतर पूर्वग्रहदूषित संकल्पनांचा अडथळा येऊ नये म्हणून पाठ्यक्रमाच्या आशयाचे पुनर्मूल्यांकन करण्याकरिता केन्द्र सरकार आणि राज्यसरकारे योग्य त्या पातळ्यांवर समित्या स्थापन करतील.

य) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले (क्षेत्र) प्रदेश –

१) सन १९८६–८७ या वर्षामध्ये दूरवरच्या दुर्गम क्षेत्रात असलेल्या, तसेच बेटे, डोंगराळ व वाळवंटी प्रदेशांतील शैक्षणिक यंत्रणेमध्ये असलेल्या उणिवा पाहिल्या जातील आणि सातव्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या वर्षांमध्ये त्या उणिवा भरून काढण्यासाठी योजना अंमलात आणल्या जातील.

ज) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले विभाग.

१) शिष्यवृत्त्या, गणवेश वाटप, पुस्तके, शालोपयोगी साहित्य वाटप, यांसारख्या उत्तेजनात्मक योजना गरीबातील गरीब जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक प्रमाणात उपाय योजना केली जाईल.

२) भटक्या, निमभटक्या व विमुक्त जमातींच्या मुख्य गरजांवर जास्त भर दिला जाईल.

६. कार्यक्रमांचे नियोजन व व्यवस्थापन –

कार्यक्रमांच्या दर्जेदार अंमलबजावणीसाठी केन्द्रीय व राज्य-पातळ्यांवर सविस्तर अशी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली जातील. अंमलबजावणीतील अपेक्षित क्षमता साध्य करण्याकरिता तिचा दर्जा ठरविला जाईल व कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या प्रातिनिधीक संस्थांची स्वायत्तता अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने सर्व स्तरांवर त्यांच्या उत्तरदायित्वाचे निकष निश्चित केले जातील.

७. अनुसूचित जाती/जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी उपयुक्त अशा सर्व कार्यक्रमांचा योग्य समन्वय साधण्यासाठी केंद्रीय आणि राज्य पातळीवर प्रमुख अशी प्रातिनिधिक संस्था विकसित केली जावी असे सुचविण्यात येते की, अनुसूचित जाती/जमाती आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांकरिता असणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांची पुढाकार घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी केंद्रीय पातळीवर मानवी साधनसंपत्ती व मनुष्यबळ खात्याच्या मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली केन्द्रीय शिक्षण सल्लागार मंडळाची एक स्थायी समिती स्थापन करण्यात यावी. या समितीप्रमाणेच राज्य शिक्षण सल्लागार मंडळाच्या अधिपत्याखाली राज्यस्तरावर एक समिती स्थापण्यात यावी.

८. शैक्षणिक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे सातत्याने मूल्यमापन करणाऱ्या अंतर्गत यंत्रणेच्या जोडीस बाह्य प्रातिनिधिक संस्थांमार्फत शिष्यवृत्त्या, वसतिगृह व्यवस्था आणि प्रस्तावित उत्तेजनात्मक योजना यांसारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्याचे काम हाती घ्यावे.

प्रकरण १४ वे

# अल्पसंख्यांकांचे शिक्षण

**सद्यःस्थिती**

भारतीय संविधानाच्या कलम २९ व ३० अन्वये अल्पसंख्यांक समाजास त्यांची भाषा, लिपी आणि संस्कृती यांचे जतन करण्याच्या अधिकाराबाबत हमी दिली आहे. तसेच धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याकांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याच्या अधिकाराबाबत हमी देण्यात आली आहे. संविधानाच्या भाग-३ मध्ये मूलभूत हक्कांसंबंधी असलेल्या कलमाखेरीज भाषिक अल्पसंख्यांकांना पुढील जादा हक्कांची हमी दिलेली आहे.

१. कलम २९ : अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांचे संरक्षण.

अ) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा अधिकार असेल.

ब) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा, या किंवा यांपैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

२. कलम ३० : अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार–

अ) धर्म किंवा भाषा यावर अधिष्ठित अल्पसंख्यांकांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

ब) शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषांनुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या

समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे राज्यसरकार भेदभाव करणार नाही.

३. कलम ३५० अ. प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाच्या सोयी.

अ) प्रत्येक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरण भाषिक अल्पसंख्यांक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील, आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे यासाठी राष्ट्रपती स्वतःला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही राज्याला देऊ शकतील.

भाषिक अल्पसंख्यांक समाजाचे शिक्षण या विषयाला विशेष महत्त्व देण्यात यावे, अशा आशयाची १९५६ मध्य भारत सरकारची निवेदन पत्रिका प्रसिद्ध झाली. या विषयाचे महत्त्व प्रतिपादन करणारे भाषाविषयक निवेदन १९५८ साली प्रसिद्ध झाले. शिक्षणमंत्र्यांच्या अनेक परिषदांमधून या विषयास महत्त्वाचे स्थान देण्यात आले, तरी देखील अल्पसंख्यांक समाजाच्या बाबतीत संविधानाद्वारे वर उल्लेखिलेली जी हमी देण्यात आली तिच्या कार्यवाहीमध्ये विषमता दिसून येते.

२. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे एकूण लोकसंख्येच्या १७.४ टक्के लोकसंख्या धर्माच्या निकषावर आधारित अल्पसंख्याकांची असून त्यापैकी ११.४ टक्के मुस्लीम, २.४ टक्के ख्रिस्ती, २ टक्के शीख, ०.७ टक्के बौद्ध, ०.५ टक्के जैन लोक आहेत.

गृहखात्याच्या असे निदर्शनास आले आहे की, राष्ट्रीय स्तरावर मुस्लीम व नवबौद्ध समाज हे शैक्षणिकदृष्टया अधिक मागासलेले आहेत. राज्यशासनांनी देखील समाजातील शैक्षणिकदृष्टया मागासलेले गट शोधून निश्चित करावेत, याबद्दल एकमत झाले होते. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांना इतरांच्या बरोबर आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या अल्पसंख्यांकांना राष्ट्रीय विकासात्मक कार्यक्रमामध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे.

३. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिच्छेद ४.८ मध्ये अल्पसंख्यांकांच्या शिक्षणाविषयी खालीलप्रमाणे विचार मांडले आहेत.

"काही अल्पसंख्यांक घट हे शिक्षणापासून वंचित आहेत किंवा शैक्षणिकदृष्टचा मागासलेले आहेत. अल्पसंख्यांक समाजातील या गटास शैक्षणिक संधींची समानता प्राप्त करून देऊन सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले जाईल. त्यामुळे अल्पसंख्यांक समाजास भारतीय घटनेद्वारा भाषा, लिपी व संस्कृतीचे जतन करण्याच्या आणि त्यांच्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याच्या अधिकाराबाबत देण्यात आलेल्या हमीचा यात साहजिकच अंतर्भाव होईल. त्याचबरोबर पाठचपुस्तक निर्मिती व सर्व शालेय उपक्रमांचे आयोजन यामध्ये वस्तुनिष्ठ दृष्टिकोन प्रतिबिंबीत होईल. तसेच राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हावी म्हणून गाभाभूत अभ्यासक्रमाशी सुसंगत राहतील अशी समान राष्ट्रीय ध्येये व आदर्श यावर आधारलेले शक्य ते सर्व उपाय योजले जातील.

## लक्ष्य गाठण्यातील टप्पे, कार्यपद्धतीचा विचार आणि प्राधान्याने योजावयाचे उपाय

### अ) १९८६–८७ साठी कार्यक्रम

शिक्षण विभागामार्फत राबविले जाणारे जे कार्यक्रम १९८६–८७ साली देखील चालू ठेवले जातील. ते खालील प्रमाणे आहेत.

१) ज्या ठिकाणी अल्पसंख्यांकाचे प्रमाण जास्त आहे अशा (प्रमुख) ठिकाणी स्थापन केलेल्या १० सामूहिक तंत्रनिकेतनांच्या द्वारा तांत्रिक कौशल्ये प्राप्त करून देण्याची सुविधा.

२) राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून पाठचपुस्तकांचे मूल्य-मापन हा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने नुकताच हाती घेतलेला कार्यक्रम.

३) प्राचार्य/व्यवस्थापक यांच्यासाठी उद्बोधन वर्गाचा आणि अल्पसंख्यांक समाजाच्या शाळांतील शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गाचा

कार्यक्रम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत टप्प्या-टप्प्याने हाती घेतला जावा.

४. अल्पसंख्यांक समाजातील शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर वर्ग सुरू करण्यासाठी विद्यापीठे/महाविद्यालये यांना आर्थिक साहाय्य करण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा कार्यक्रम

ब) सातव्या पंचवार्षिक योजनेमधील १९८७-८८ ते १९८९-९० या उर्वरित ३ वर्षांमध्ये कार्यवाहीत आणण्यात येणारे कार्यक्रम.

वर उल्लेखिलेल्या योजनांसाठी पर्याप्त अनुदानाची तरतूद करून सातव्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या कालावधीत त्यांची व्याप्ती वाढविण्यात येईल. परिसरामध्ये असलेल्या अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे व मार्गदर्शन करणे, या उद्दिष्टांना अनुसरून काम करणारी मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यासंबंधी "राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद", समाज कल्याण विभाग व शिक्षण विभाग, यांची अलीगढ, जमिया मिलीया इसलामिया, काश्मीर, मराठवाडा व उस्मानिया विद्यापीठांच्या कुलगुरुंशी बोलणी चालू आहेत. अशाप्रकारची मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्याची योजना सध्या मंत्रालयाच्या विचाराधीन आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये ही मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यासाठी रु. ६५ लाख इतक्या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अल्पसंख्यांक लोकांचे प्रमाण जास्त असलेल्या भागामध्ये सामूहिक तंत्रनिकेतन योजनेची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने आणखी ५ सामूहिक तंत्र-निकेतने स्थापन केली जातील.

**क) दीर्घ मुदतीचे कार्यक्रम**

**बालशिक्षण आणि पारंपारिक शालेय शिक्षण**

पारंपारिक शालेय शिक्षण देणाऱ्या शाळांमधून शास्त्र, गणित आणि इंग्रजी हे विषय ऐच्छिक ठेवण्यात येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यतील. शैक्षणिकदृष्टया मागासलेला समाज प्रामख्याने ज्या भागात आहे त्या भागात बालसंगोपन शिक्षण केंद्रे उघडण्यात येतील.

त्याचप्रमाणे शक्य असेल त्या ठिकाणी देखील पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळांना जोडून बालवाड्या उघडण्यात येतील. समाजोपयोगी उत्पादक कार्य या विषयाचा देखील समावेश या संस्थांमधून करण्यात येईल. आणि त्यासाठी केंद्रसरकारचे साहाय्य असलेली योजना शिक्षण विभागाकडून तयार करण्यात येईल.

**प्राथमिक शिक्षण**

१) आयुक्तांना आवश्यक असलेली भाषिक अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक सोयींबावतची संस्थानिहाय सांख्यिकी माहिती संकलित करण्याचे काम राज्यशासनास करावे लागेल.

२) अल्पसंख्यांक समाजाच्या भाषा विषयाच्या शिक्षकांच्या जागा मंजूर करणे आणि त्यांच्या नियुक्त्या करणे, यास लागणारा विलंब टाळण्यासाठी, याबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्याबावतची कार्यवाही राज्यशासनातर्फे करण्यात येईल.

३) अल्पसंख्यांकांच्या भाषांमधील उपलब्ध पाठ्यपुस्तकांचे सर्वेक्षण करणे आणि या भाषांमधील पुस्तके मुद्रित करण्यासाठी मुद्रण सुविधांची व्यवस्था करणे, याबाबतची कार्यवाही राज्यशासन करेल.

४) अल्पसंख्यांक भाषा विषयाच्या शिक्षकांसाठी योजनेत येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे सर्वेक्षण करून आवश्यक तेथे त्याची व्याप्ती वाढविण्यासाठी उपाय योजण्याची कार्यवाही राज्यशासन करेल.

५) अध्यापनासाठी असलेल्या वेळांमधील १५ टक्के वेळ स्थानिक कला व व्यवसाय यांचे शिक्षण देण्यासाठी उपयोगात आणणे आणि कारागीर व शेतकरी यांच्या मुलांसाठी संध्याकाळचे वर्ग सुरू करणे यासाठी राज्यशासनातर्फे प्रयत्न केले जातील.

**माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण**

१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, इतर मार्गदर्शन केंद्रे आणि राज्यस्तरीय व्यवसाय मार्गदर्शन संस्था, यांच्यामार्फत अल्पसंख्यांक समाजाच्या संस्थांमधील शिक्षकांना शास्त्र, गणित, समाजशास्त्र, इंग्रजी, व्यवसाय मार्गदर्शन इत्यादि विषयांमध्ये सेवांतर्गत प्रशिक्षण देणे

यासाठी सध्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेजवळ अशा प्रशिक्षण कार्यक्रमाची योजना आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि इतर संस्था यांच्यामार्फत या योजनेची व्याप्ती वाढविण्याचे प्रस्तावित आहे.

२) अल्पसंख्यांक संस्थांचे व्यवस्थापक व प्राचार्य यांचे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत आधुनिक शैक्षणिक तंत्रांबाबत उद्बोधन करण्याची योजना—

सध्या ही योजना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत मर्यादित प्रमाणावर चालू आहे.

३) राष्ट्रीय एकात्मतेच्या वृद्धीसाठी आणि त्रिभाषासूत्र कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी अल्पसंख्यांक समाजाच्या संस्थामधून प्रादेशिक भाषा शिक्षकांची नियुक्ती करण्याचे काम राज्य शासनामार्फत करण्यात येईल.

४) अल्पसंख्यांकांच्या व्यवस्थापनाखाली असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये उपचारात्मक ( Remedial ) वर्ग सुरू करण्याची योजना-

हे काम राज्यशासन करेल.

५) शालेय शिक्षणामध्ये संगणक साक्षरता—

या योजनेमध्ये अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक संस्थांना योग्य प्रतिनिधित्व देण्यात येईल.

**व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण**

१) विशेषत्वे शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांची गरज पुरविण्यासाठी त्यांच्या उच्च माध्यमिक शाळांमधून विविध प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करून देणे.

२) धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सर्व कार्यक्रमांचा पूर्णांशाने लाभ अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक संस्थांना मिळेल अशी व्यवस्था करणे.

३) अल्पसंख्यांक समाजातील कारागीरांचे प्रमाण जास्त असलेल्या भागांमध्ये हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करणे व त्यामध्ये ८० टक्के जागा या कारागीरांच्या मुलांसाठी राखून ठेवणे.

**स्त्रियांचे शिक्षण**

१) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अल्पसंख्यांक समाजाच्या स्त्रियांमधील साक्षरतेचे व मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण सर्वात कमी असल्याने मुलींच्या शाळा सुरू करणे, स्त्री शिक्षिकांची नेमणूक करणे, मुलींसाठी वसतिगृहे सुरू करणे आणि मधल्या वेळचे जेवण, कपडे इ. गोष्टी पुरविणे, अशा स्वरूपाच्या प्रोत्साहन योजना सुरू करून अल्पसंख्यांक समाजाच्या गरजा पूर्ण करणे.

२) हस्तव्यवसायासाठी उत्पादन तथा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना :

अल्पसंख्यांक समाजाचे प्रमाण जास्त असलेल्या जिल्ह्यात विशेष करून मुलींसाठी हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्याद्वारे उत्पादन देणारी केंद्रे स्थापन करणे. या केंद्रांमधून प्रामुख्याने स्त्रीशिक्षका नेमणे. याबाबतची कार्यवाही राज्यशासन करेल.

**प्रौढ शिक्षण व बाल शिक्षणासाठी स्वयंसेवी प्रयत्न**

या योजना राबविण्यात अधिक परिणामकारकता यावी व समाजातील इतर घटकांनी स्वयंस्फूर्तीने प्रयत्न करावेत यादृष्टीने अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांच्यासाठी उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे.

या योजनांबाबत समाजामध्ये जागृति निर्माण व्हावी, या हेतूने काम करणारे एक केंद्र अल्पसंख्यांक समाजाच्या प्रत्येक संस्थेत जोडणे, त्याचप्रमाणे या केंद्रामार्फत पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देऊन योजनांची अंमलबजावणीची परिणामकारकता अनेक पटींनी वाढविणे, याबाबतची कार्यवाही राज्यशासन करेल.

**ग्रंथालये, वाचनालये आणि विस्तार कार्य**

अल्पसंख्यांक समाज असलेल्या भागात ग्रंथालये आणि वाचनालये स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची योजना, प्रायोगिक तत्त्वावर काही भागांमध्ये शैक्षणिक विस्तार कार्याचा प्रकल्प हाती घेण्याची योजना.

या योजनांसाठी राज्यशासन पर्याप्त अनुदान देऊन याबाबतची कार्यवाही करेल.

**अल्पसंख्यांक समाजाच्या व्यवस्थापनाखालील शैक्षणिक संस्था**

१) शाळांच्या मान्यतेबाबतची व त्यासंदर्भात आलेल्या अर्जाचा वेळीच निपटारा करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे राज्यशासनांनी निश्चित केली पाहिजेत. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्यशासनाने शाळांच्या मान्यतेबाबतचे धोरण निश्चित करून त्यास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी दिली पाहिजे.

२) कार्यक्रमांची योग्य अंमलबजावणी होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी परिणामकारक पर्यवेक्षण व्यवस्था केली पाहिजे.

३) शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी योजण्यात आलेल्या उपायांच्या परिणामकारक अंमलबजाणीसाठी अल्पसंख्यांक समाजाच्या संस्थांचे सहकार्य मिळविण्यास मदत करणे, किमान भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची हमी देणे, शैक्षणिक दर्जा राखण्यासाठी आणि शिक्षकांची आपल्या पेशाविषयी आवड टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे, इत्यादि विविध हेतूंनी काम करणाऱ्या अल्पसंख्यांक समाजाच्या संस्थांचे राज्यवार स्वायत्त गट (Federation) स्थापन करणे.

हे गट मान्यताप्राप्त असले पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांना आर्थिक साहाय्य मिळाले पाहिजे.

**स्थान निश्चिती** (Area Approach)

अल्पसंख्याकांची दाट वस्ती असलेल्या जिल्ह्याकडे विशेष लक्ष पुरवून, अल्पसंख्यांक समाजातील मुलांना प्रवेश देण्याच्या बाबतीत सोईचे होईल अशा प्रकारे शाळांसाठी ठिकाण निश्चित करावे. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला समाज ज्या भागामध्ये जास्त आहे असे जिल्हेदेखील राज्यशासन यामध्ये समाविष्ट करू शकेल. (परिशिष्ट पान ३४४ पहा)

**शिष्यवृत्ती योजना**

चांगल्या दर्जाच्या संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मागास भागांतील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता तथा आर्थिक परिस्थिती या निकषांवर आधारित शिष्यवृत्ती योजना कारागीर व इतर मागास गटाच्या मुलांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून

देण्यासाठी शालेय शुल्कामध्ये सूट देण्याची/सवलत देण्याची/भरपाई करण्याची योजना ;

अशा प्रकारचे सहाय्य भारतातील नामांकित स्वयंसेवी संस्थांनी द्यावे. याची कार्यवाही राज्यशासन करेल.

**संघटनात्मक व व्यवस्थापनात्मक मुद्दे** (Organisational and Management Issues)

**१) प्रत्यक्ष गणन पद्धतीने सर्वेक्षण** (Bench Mark Survey) **आणि संशोधनात्मक अभ्यास**

साक्षरता व शैक्षणिक संपादन यांतील वाढींची प्रत्यक्ष गणन पद्धतीने (Bench Mark Survey) पाहणी करणे व उपचारात्मक उपायांची परिणामकारता, विशेष करून अल्पसंख्यांकांची दाट वस्ती असलेल्या भागातील शाळांच्या उपलब्धतेच्या संदर्भात नियतकालिक संशोधनात्मक अभ्यास करणे, ही कार्यवाही राज्यशासन करेल.

**२) शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांक समाजाची शिक्षण मंडळे व इतर सल्लागार मंडळे यांच्याशी साहचर्य.**

शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांचे, केंद्र पातळीवर आणि राज्य पातळीवर कार्य करण्याच्या विविध शिक्षण मंडळांशी आणि सल्लागार समित्यांशी संबंध प्रस्थापित करणे.

**३) पर्यवेक्षण व्यवस्था**

शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी योजण्यात आलेल्या उपायांची परिणामकारक अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी केंद्र व राज्य पातळीवर शिक्षण विभागात एक नवीन कक्ष सुरू करणे.

**४) पुनर्विलोकन**

अल्पसंख्यांक समाजासाठी योजण्यात आलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाचे दरवर्षी पुनर्विलोकन करावे लागेल.

## परिशिष्ट

| राज्ये | जिल्हे |
|---|---|
| उत्तरप्रदेश | १. रामपूर २. बिजनोर ३. मुरादाबाद ४. सहारानपूर ५. मुज्जफरनगर ६. मेरठ ७. बाहरीच ८. गोंदा ९. गाझियाबाद १०. पिलीभित ११. देवरी १२. बाराबंकी १३. बस्ती |
| पश्चिम बंगाल | १४. मुर्शिदाबाद १५. मालदा १६. पश्चिम दीनाजपूर १७. बीरभूम १८. नादीया १९. चोवीस परगणे २०. कूच बिहार २१. हावरा |
| केरळ | २२. मलाप्पूरम २३. कोझीकोड २४. कन्नानोर २५. पालघाट २६. व्यानाड |
| बिहार | २७. पूर्णिया २८. काटीहार २९. दरभंगा |
| कर्नाटक | ३०. बिदर ३१. गुलबर्गा ३२. विजापूर |
| महाराष्ट्र | ३३. बृहन्मुंबई ३४. औरंगाबाद |
| आंध्रप्रदेश | ३५. हैद्राबाद ३६. कर्नूल |
| हरियाना | ३७. गुरगाव |
| मध्यप्रदेश | ३८. भोपाळ |
| राजस्थान | ३९. जैसलमेर |
| गुजराथ | ४०. कच्छ |

□ □ □

प्रकरण १५ वे

# अपंगांचे शिक्षण

**सद्य:स्थिती**

१. एक कोटी २० लाख अपंगांपैकी २६ लाख (१२ लाख चलन-शीलता व्यंग असलेली, ७ लाख ४० हजार चेतास्नायूघाताने पीडीत (मूक) ५ लाख ३० हजार श्रवणदोष असलेली, १ लाख २० हजार दृष्टीदोष असलेली व शेकडा १० टक्के एक पेक्षा अधिक प्रकारचे व्यंग असलेली) मुले ४ ते १५ वयोगटात मोडतात. यांमध्ये १७ लाख मति-मंदांचा समावेश केलेला नाही. असे 'राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण संस्थेने' १९८६ मध्ये केलेल्या पाहणीवरून दिसते. अशा तऱ्हेने शिक्षणाच्या सार्वत्रीकरण कार्यक्रमातील ४ ते १५ वयोगटात मोडणाऱ्या अपंग मुलांची संख्या ४३ लाख होईल.

२. वरील लोकसंख्येपैकी १४ लाख मुले ० ते ४ ह्या वयोगटातील असून, त्यांचे प्राथमिक अवस्थेतच सर्वेक्षण करून, निदान करून, तपासणी करून त्यांना शिक्षणासाठी तयार करणे सहज शक्य आहे. अपंगांना नुसते शिक्षण देऊन चालणार नाही तर शिक्षणाबरोबर त्यांच्या व्यावसायिक पुनर्वसनाचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. (ह्या बाबतचे आकडे प्रकरणाच्या शेवटी परिशिष्टात दिले आहेत.)

३. शिक्षकांसाठी नेमलेल्या राष्ट्रीय आयोगाने आपल्या अहवालात स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे की, 'भारतात ज्या ८०० ते १००० विशेष शाळा आहेत त्या शाळांतून केवळ ५ टक्के पेक्षा काही जास्त अंध व मूकबधीर मुले शिक्षण घेत आहेत व ०.५० टक्के मतिमंद शिकत आहेत. ह्या शाळांपैकी बहुतांश शाळा मोठ्या शहरांतून व शहरी विभागात असल्यामुळे ग्रामीण भागात असणाऱ्या ८० टक्के अपंगांना त्यांचा शिक्षणासाठी काहीच उपयोग होत नाही. अपंग एकात्म शिक्षण

योजनेखाली शिकणाऱ्या ७००० विद्यार्थ्यांची संख्या पाहता ती अगदीच नगण्य म्हणावी लागेल. अपंग व्यक्तीच्या समावेशाचा विचार करता फारच थोडी मुले त्याचा लाभ घेत असून त्यांचे प्रमाण अत्यल्प असेच आहे.

४. अपंगांच्या शिक्षणातील संख्यात्मक पोकळी भरून काढण्यासाठी त्याच्या विस्ताराबरोबर गुणात्मक बाबतीतही सुधारणा आवश्यक आहे. अपंगांच्या शिक्षणाचे काम करणाऱ्या बहुतांश संस्था स्वयंसेवी (Voluntary) संघटना चालवित असून त्यापैकी फारच थोड्या संस्था. ह्या चांगल्या प्रकारे कार्य करतात. पण बहुतांश शाळांतून आवश्यक ते पुरेशे शैक्षणिक साहित्य, साधने, प्रशिक्षित शिक्षक, भरपूर पुरेशी जागा, यांचा पूर्णतः अभाव असतो. ह्या सस्थांपैकी काही संस्था ह्या शैक्षणिक सस्था नसून केवळ निराश्रित मुलांची आश्रयस्थाने झालेली आढळून येतात.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अपंगांच्या शिक्षणाबाबतच्या सूचना

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रतिपादन केले आहे की, विकलांग व सौम्य प्रकारच्या अपंगांना सामान्य मुलांच्या बरोबर सामान्य शाळांतून शिक्षण देण्यात यावे. ज्यांचे अपंगत्व गंभीर स्वरूपाचे आहे अशा मुलांना जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या निवासी, विशेष शाळांतून शिक्षण देण्यात यावे. अपंगांच्या पूर्वप्राथमिक शिक्षणाचीही योग्य सोय करणे, सामान्य मुलांना देण्यात येणारे व्यावसायिक प्रशिक्षण देणे आणि त्यासाठी विशेष प्रकारची व्यावसायिक केंद्रेही उघडणे आवश्यक आहे, असे सुचविले आहे.

६. अपंग मुलांना सामान्य मुलांच्या शाळांत घालण्यापूर्वी त्या मुलांचा शोध घेऊन त्यांचे योग्य निदान करून योग्य ते निर्धारण करण्याच्या दृष्टीने एक पद्धती असणे आवश्यक आहे. अपंग मुलांना त्यांच्या लहानपणीच बाल संगोपन केन्द्रातून व शिक्षण केन्द्रांतून योग्य प्रकारचे शिक्षण देण्यात येईल. ह्यासाठी अपंगांच्या निरनिराळ्या व्याख्या व त्यांच्या क्षमतेची माहिती असणे आवश्यक आहे. ह्याकरिता आरोग्य मंत्रालयाने तयार केलेल्या व्याख्यांचा उपयोग करण्यात येईल.

त्यांच्या लहान वयातच बालसंगोपन व शिक्षणाची व्यवस्था अपंग मुलांसाठी करण्यात येईल. त्यामुळे ती मुले पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी तयार होऊ शकतील.

**कार्यप्रणालीची पद्धती**

७. अंदाजे २० लाख अपंग मुलांना विशेष प्रकारच्या संस्थांतून शिक्षण द्यावे लगेल व आरोग्य सेवेतील सुधारणा, सकस आहार, माता बालसंगोपन केंद्रे व अपंगत्वाला आळा बसू शकेल अशी परिणामकारक उपाययोजना यांमुळे अपंगांच्या संख्येत घट होईल. याचा परिणाम असा होईल की, त्यामुळे अपंगांच्या संख्येत विशेष वाढ दिसून येणार नाही.

प्रत्येक शाळेत १५० ते २०० मुले याप्रमाणे २० लाख अपंग मुलांसाठी १०,००० विशेष शाळांची गरज आहे. विशेष शाळा ह्या अधिक खर्चाची बाब असल्यामुळे जी मुले सामान्य शाळेत सामावून घेतली जावू शकत नाहीत अशा मुलांनाच विशेष शाळांतून प्रवेश दिला जावा. विशेष शाळांत समाविष्ट केलेली मुले जेव्हा चलनशीलतेचे तंत्र व अभ्यासाचे तंत्र अवगत करतील त्यावेळी त्यांना 'अपंग एकात्म शिक्षण योजने अंतर्गत' सामान्य शाळेत दाखल करावे. १९८६ च्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे सामान्य शाळांची कार्यक्षमता सुधारेल असे गृहीत धरले आहे. त्यामुळे सामान्य शाळांतून अपंगांच्या जास्तीत जास्त गरजा अधिक चांगल्या प्रकारे पुरविल्या जातील.

८. अपंगांच्या शिक्षणाच्या दृष्टीने चांगले आदर्श चित्र म्हणजे १९९० पर्यंत ६ ते ११ वयोगटातील सर्व मुले व १९९५ पर्यंत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुले (अपंगासह) ही प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या कार्यक्रमात दाखल होतील. परंतु सध्या अपंग शिक्षणाची व्याप्ति ५ टक्के पेक्षा अधिक नाही. याशिवाय विशेष शाळांमधून शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता फार मोठ्या प्रमाणावर साधनसंपत्तीची गरज भासणार आहे. त्याचबरोबर विशेष प्रकारचे प्रशिक्षित शिक्षक व तज्ज्ञ यांच्या तयारीसाठी त्याला बराच कालावधी लागेल. तरीही युद्धपातळीवर कार्यक्रमाची अंमलबजावणी कसोशीने केल्यास विकलांग व सौम्य प्रकारचे अपंगांच्या बाबतीत ही कालमर्यादा

पाळता येईल. बरेचसे अपंग विद्यार्थी हे सामान्य शाळांत प्रवेश घेतात परंतु त्या शाळांमधून त्यांच्या गरजा पूर्ण होऊ न शकल्यामुळे ते मधूनच शाळा सोडून बाहेर पडतात. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या ध्येयाचा तो एक भाग होईल. इ. स. २००० पर्यंत सर्वांना आरोग्य या ध्येयानुसार तीव्र स्वरूपाच्या अपंग विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरणात समाविष्ट करणे हे पर्यायी चित्र आहे; आणि १९९० ते १९९५ पर्यंत इतर मुलांबरोबर विकलांग व सौम्य अपंगत्व असणाऱ्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण पूर्ण करावयाचे आहे.

९. निरनिराळ्या भागात विखुरलेली अपंगांची संख्या व त्या संख्येत वारंवार होणारे चढउतार ह्यांमुळे अपंगांच्या शिक्षणाचे नियोजन हे अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे, चालू योजनेच्या प्रत्येक वर्षात चलनशीलतेचे व्यंग असलेल्या व सौम्य अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांचे सामान्य शाळांत टिकून राहण्याच्या प्रमाणात २५ टक्के वाढ खालील गोष्टींमुळे होईल.

अ) सामान्य शाळेतील शिक्षक व प्रशासक यांचेसाठी प्रचारात्मक कार्यक्रम आखणे.

ब) व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अपंगांच्या शिक्षणाचा समावेश करून त्यानुसार सेवांतर्गत वर्गातून प्रशिक्षण देणे.

क) प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी उद्बोधन वर्ग व दूरशिक्षणाच्या माध्यमातून पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

ड) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, जिल्हा स्तरावरील शिक्षण व प्रशिक्षण संस्था, विभागीय व गट पातळीवरील शिक्षण संस्था यातून तज्ज्ञ व्यक्तींची संख्या वाढवावी त्यामुळे अपंग मुलांना शिकवण्याऱ्या शिक्षकांच्या कामावर योग्य देखरेख व मार्गदर्शन शक्य होईल.

इ) अपंग मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी शिक्षक हस्तपुस्तिका व मार्गदर्शन पुस्तिका तयार करून पर्यायी असे साहित्य तयार करावे.

ई) जादा उपकरणे उपयोगात आणून सामान्य शाळांतून अपंग मुलांसाठी उपलब्ध असलेल्या व्यवसायपूर्व व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या जादा सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

ग) अपंगांचे अचूक निदान होण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावर मनोविकार तज्ज्ञांच्या सेवेत वाढ करण्यात यावी.

ह) कामाला गती येण्याच्या दृष्टीने, आवश्यक तेथे, आरोग्य व समाज कल्याण खात्याची मदत घेत जावी.

यासाठी राज्य पातळीवर काम करणाऱ्या संस्थांमधील (राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद) ३ व्यक्तींना, जिल्हा स्तरावर काम करणाऱ्या ३ व्यक्तींना व विभागीय आणि गट पातळीवर काम करणाऱ्या प्रत्येक गटातील किमान एका व्यक्तीला याबाबतचे पुरेसे प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण द्यावयाचे झाले तर गटपातळीवर काम करणाऱ्या ६०००/– शिक्षण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे लागेल. व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सदरहू शिक्षकांना राहिलेल्या ३ वर्षाच्या कालावधीत प्रशिक्षण द्यावे लागेल. मनुष्यबळ व मानवीसाधनसंपत्ती मंत्रालय हे आपल्या अधिपत्त्याखाली असलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, क्षेत्रीय महाविद्यालये, राज्यस्तरीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा यांच्यामार्फत प्रशिक्षण वर्ग आयोजित करतील. याचबरोबर राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत, ज्या सामान्य शाळांतून अपंग मुले शिकत आहेत तेथील शिक्षकांसाठी व शिक्षण अधिकाऱ्यांसाठी, योग्य त्या हस्तपुस्तिका तयार कराव्यात. तसेच औद्योगिक तंत्रज्ञान संस्थांमधून जी अपंग मुले शिकत आहेत त्यांच्यासाठी उपयोगात येणाऱ्या यंत्रसामुग्रीमध्ये कोणते फेरबदल करता येणे शक्य आहे ते मजूर मंत्रालयाने करावेत. समाज कल्याण मंत्रालय व आरोग्य खाते यांनी जिल्हा पुनर्वसन केंद्राच्या सहाय्याने अपंग मुलांचे निदान करून त्यांना पुरविण्यात येणाऱ्या कृत्रिम अवयवांची सोय करावी व सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

१०. खालील गोष्टी उत्तेजनार्थ उपाय म्हणून सुचविल्या आहेत.

१) ज्या विभागात कार्यक्रमांची अंमलबजावणी करायची आहे तेथे पुरेसे साहित्य व उपकरणे यांची तरतूद.

२) वाहतूक व्यवस्थेसाठी पुरेशी आर्थिक तरतूद (रुपये ५०/– दरमहा)

३) ग्रामीण भागातील ज्या शाळेत कमीत कमी १० अपंग मुले आहेत अशा शाळांना रीक्षा खरेदीसाठी भांडवली खर्चाची तरतूद.

४) ज्या शाळांतून कमीत कमी १० अपंग मुले आहेत अशा शाळा चालकांनी आपल्या शालेय इमारतीमधील वास्तुरचनेतील अडथळे दूर करणे.

५) अनुसूचित जाती व जमातीच्या मुलांना ज्याप्रमाणे शालेय गणवेष व पुस्तके मोफत देण्यात येतात त्याप्रमाणे अपंग मुलांनाही पुस्तके व गणवेष यांचा मोफत पुरवठा.

६) अनुसूचित जाती जमातीच्या मुलामुलींना शाळेतून उपस्थित राहण्याबद्दल जसे उत्तेजनात्मक बक्षीस देण्यात येते त्याप्रमाणे अपंग मुलांनाही देण्यात यावे.

७) बालसंगोपन शिक्षण केंद्रांतून अपंग मुलांना पुढे शाळेत शिक्षण घेण्याच्या दृष्टीने लहान वयातच योग्य प्रकारे शिक्षण देण्याची व्यवस्था.

८) अपंग मुलांच्या प्रवेशाच्या वयाचे बाबतीत दुरुस्ती करून ६ वयाचे ऐवजी ८ ते ९ वयोगटाची मुले प्रवेशपात्र मानण्याची तरतूद करावी. संक्रमण अवस्थेत अशा प्रकारची तरतूद आवश्यक आहे. शाळांतून करून घेतल्या जाणाऱ्या तयारीसाठी ही तरतूद आवश्यक आहे.

११. केंद्रशासनाकडून सहाय्य मिळत असलेल्या 'अपंग एकात्म शिक्षण योजनेला' राज्य शासनाकडून मिळणारा प्रतिसाद हा फारसा उत्साहवर्धक नाही. ज्या राज्यांनी सदर योजनेचा स्वीकार केला नाही त्यांनी ही योजना स्वीकारावी असे प्रयत्न मनुष्यबळ व साधन संपत्ती विकास मंत्रालयामार्फत केले जावे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे ध्येय

अपंग मुलांच्या समावेशाशिवाय पूर्ण होऊच शकणार नाही., यासाठी सामान्य मुलांबरोबर त्यांनाही शिक्षण देण्यात यावे.

१२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सध्याच्या अपंग एकात्म शिक्षण योजनेत सुधारणा करणे आवश्यक आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाने यासाठी एक समिती तातडीने स्थापन करावी व त्या समितीने योजनेचा आढावा घेऊन योजनेत योग्य फेरफार करून नवीन योजना तयार करावी. नवीन योजना तयार होईपर्यंत सध्याची अस्तित्वात असलेली योजना चालू ठेवण्यात यावी.

१३. सामान्य शाळांतून + २ अभ्यासक्रमानुसार किंवा औद्योगिक शिक्षण संस्थांमधून अपंग मुलांसाठी व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात. यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने यंत्रात आवश्यक असे बदल करून ज्यादा यंत्रांची तरतूद करण्यात यावी.

१४. मनोविकार तज्ज्ञांनी अपंगांचे निर्धारण करण्यासाठी उपयोगात आणावयाची साधने व अपंगांच्या शैक्षणिक समस्यांसाठी उपयोगात येणारी साधने यांचा अभाव जाणवतो. शिक्षणाचे नियोजन अधिक चांगल्याप्रकारे व्हावे म्हणून ही साधने प्रादेशिक भाषांतून तयार करण्यात यावीत. हे काम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने महत्त्वाचे समजून प्राधान्याने त्वरित अंगिकारावे असे या गटाचे मत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन परिषदेने केवळ हे कार्य हाती न घेता त्याचबरोबर इतर संघटनांना प्रादेशिक भाषांत साधने तयार करण्याच्या व भाषांतराच्या कामात प्रोत्साहन द्यावे. मानसशास्त्रीय शिक्षण सुविधा केंद्राची स्थापना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेत करावी. हे केन्द्र नवीन शोधून काढलेल्या विभागासाठी कोणत्या चाचण्या उपयुक्त ठरणार आहेत ते पाहील व त्या विकसित करण्यात येतील. अपंगांसाठी राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या संस्थांचेही या कामात साहाय्य घेण्यात येईल.

१५. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने नवीन व यशस्वी अशा शैक्षणिक प्रकल्पांच्या एकत्रिकरणाचे काम करावे व ते नवोपक्रम प्रकल्प प्रसिद्ध करून इतर शैक्षणिक संस्थांपर्यंत पोहोचवावेत.

१६. चलनशीलतेचे व्यंग (विकलांग) असलेल्या व सौम्य अपंगत्व असलेल्या मुलांच्या पटसंख्येत सामान्य शाळेत वाढ होईल, असे प्रयत्न करावेत. 'अपंग एकात्म शिक्षण' योजनेत जास्तीत जास्त मुले समाविष्ट होतील असे पहावे.

**विशेष शाळांमधील शिक्षण**

१७. जिल्हा आणि तालुका पातळीवर विशेष शाळांची स्थापना करण्यात येईल. सुरवातीला संयुक्त विशेष शाळा स्थापन केल्या जातील. अपंग मुलांची एकूण संख्या; निरनिराळ्या अंतरावर असणाऱ्या शाळांमध्ये मुलांना पाठवण्याबाबत पालकांची अनास्था, तज्ज्ञकर्मचारी वर्गाचा सहयोग, उदा. मनोविकार तज्ज्ञांचा शैक्षणिक प्रयत्नांना पाठिंबा असणे, शाळेतील मुलांसाठी व्यवसाय केन्द्रांचा व्यवसायपूर्व व शिक्षणोत्तर व्यवसाय अभ्यासक्रमासाठी उपयोग करणे, त्याचप्रमाणे शिक्षणोत्तर पुनर्वसनाच्या संदर्भात उपयोग करून घेणे, विविध प्रकारच्या अपंगांच्या गरजा पुरविणे आणि आर्थिक व्यवहार्यतेचे निकष ठरवणे इत्यादी गोष्टींवर हा निर्णय आधारलेला आहे. तथापि काही विशिष्ट जिल्ह्यांमध्ये जर विशिष्ट प्रकारच्या अपंगांची संख्या मोठी व पुरेशी (६० ते ७०) असेल तर त्या विशिष्ट जिल्ह्यासाठी स्वतंत्र विशेष शाळा काढणे शक्य होईल. विविध प्रकारचे अपंगत्व आढळणाऱ्या मुलांना संयुक्त विशेष शाळांमध्ये विविध विभागात/विविध वर्गात विविध गटांतून शिक्षण देण्यात येईल.

१८. प्रत्येक जिल्ह्यामध्ये जेथे विशेष शाळा सुस्थापित झाल्या आहेत तेथे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र हे शाळेचाच एक भाग म्हणून किंवा शाळेचा एक पूरक विभाग म्हणून विकसित केले जाईल. ही संस्था विशेष शाळांतील विद्यार्थ्यांसाठी अथवा तीव्र/गंभीर अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही व्यवसायपूर्व शिक्षणाचे केन्द्र म्हणून उपयुक्त ठरेल. स्थानिकरीत्या उपलब्ध असलेल्या व्यवसायास उपयुक्त असे प्रशिक्षण कारागीरांना देण्यावर या केन्द्रात भर दिला जाईल. पुनर्वसन परिषदेने ह्या प्रशिक्षण कार्यक्रमांना मान्यता द्यावी. जेणेकरून तेथून प्रशिक्षण घेतलेल्या अपंगांना संपूर्ण देशात कोठेही नोकरी मिळू शकेल.

जेथे आवश्यकता असेल तेथे राष्ट्रीय तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण परिषद आणि राष्ट्रीय तंत्रशिक्षण परिषदेकडून सुद्धा मान्यता मिळू शकेल.

१९. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय उपलब्ध होईल. मुलांच्या वसतिगृहाची क्षमता ४० आणि मुलींच्या बाबतीत २० असावी. ही वसतिगृहे शाळांना किंवा व्यावसायिक प्रशिक्षण केन्द्रांना जोडलेली असावीत.

२०. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ५००० विशेष शाळा जिल्हयातील उपभागात नव्याने उघडल्या जातील. त्यामुळे शाळांची एकूण संख्या सुमारे ७५०० इतकी होईल. अशा रीतीने नवव्या पंच-वार्षिक योजनेमध्ये शाळांची संख्या १०,००० पर्यंत वाढविली जाईल.

२१. विशेष शाळांची स्थापना ही केंद्र शासनाची योजना राहील व तिची अंमलबजावणी राज्यशासनामार्फत अथवा स्वयंसेवी संघटनां-मार्फत केली जाईल. ४०० नवीन विशेष शाळा सातव्या पंचवार्षिक योजनेत स्थापन केल्या जातील. प्रथमत: ज्या जिल्हयांच्या ठिकाणी एकही विशेष शाळा नाही अशा जिल्हयात अशा प्रकारच्या विशेष शाळा उघडल्या जातील. ह्या शाळांमधून सर्व प्रकारच्या किमान ६० अपंग मुलांची सोय होऊ शकेल.

२२. प्रत्येक विशेष शाळेला ८-१० विशेष शिक्षकांची गरज आहे असे गृहीत धरल्यास अंदाजे ३५०० ते ४००० विशेष शिक्षक सध्याच्या योजनेत लागतील. अपंगत्वाच्या प्रकारानुसार जिल्हयाच्या ठिकाणी स्थापन होणाऱ्या विशेष शाळांतील विशेष शिक्षकांना अपंग-त्वाच्या प्रकारानुसार प्रशिक्षण देण्यासाठी त्वरित पावले उचलावी लागतील. तरच या कार्यक्रमास अपेक्षित गति मिळू शकेल. हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम मनुष्यबळ विकास व मानवी साधनसंपत्ती, मंत्रालय व समाज कल्याण मंत्रालय यांना विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय अपंग संस्था आणि काही निवडक विद्यापीठातील विशेष शिक्षणाचे विभाग यांच्या मार्फत पार पाडता येईल. विशेष शाळांतील शिक्षकांच्या प्रशिक्षणातील अनुशेष भरून काढण्याच्या कार्यक्रमाखेरीज हा कार्यक्रम असेल. राष्ट्रीय

संस्था त्यांच्या विभागीय संस्थांमार्फत व क्षेत्रीय महाविद्यालये, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या सहकार्याने हा सेवांतर्गत कार्यक्रम आयोजित करतील.

२३. स्वायत्त संस्था अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यास तयार नसतात असे दिसून आले आहे. प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक केली असल्यास किंवा अप्रशिक्षित शिक्षकांस नेमले असल्यापासून तीन वर्षांच्या आत ते प्रशिक्षित होणार असल्यासच अनुदान दिले जावे. यामध्ये विलंब झाल्यास त्या प्रमाणात दिल्या जाणाऱ्या अनुदानात कपात करण्यात यावी. गुणात्मक कार्य व देण्यात येणारे अनुदान यांची योग्य सांगड घातली जावी.

२४. प्रशिक्षणाबरोबरच दुसरी गोष्ट म्हणजे प्रशिक्षण घेतलेले शिक्षक विशेष शाळांतून टिकून राहाण्यासाठी योजावयाच्या उपायांचाही या गटाने विचार केला आहे. कारण अपंग मुलांना शिकवताना शिक्षकांना फार मेहनत घ्यावी लागते. या गटास असे वाटते की, विशेष शिक्षक आणि व्यवसाय शिक्षक यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या २० टक्के जादा वेतन दिले जावे.

२५ शिक्षकांखेरीज विशेष प्रशिक्षण घेतलेले आणि अपंगांची तपासणी, निवड व पुनर्वसन करण्यास मदत करणारे ४०० मनोविकार-तज्ज्ञ, किमान २ डॉक्टर्स प्रत्येक जिल्ह्यासाठी आवश्यक आहेत व त्यांचे उद्बोधन आवश्यक आहे. अपंगांची तपासणी करण्यासाठी सध्याच्या संवर्गातील उपलब्ध असलेल्या समुपदेशकांना ४ ते ६ आठवड्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिले जावे असे सूचित केले आहे. त्याचप्रमाणे आरोग्य खात्याच्या कर्मचाऱ्यांसाठीही २ आठवड्यांचे उद्बोधन वर्ग आयोजित केले जावेत. इतर कर्मचारी वृंदामध्ये 'शरीर क्रिया उपचारक' (Physio Therapist), व्यवसाय उपचारक (Occupational Therapist) वाचासुधारतज्ज्ञ, यांचीही अधिक आवश्यकता भासू लागेल. कमीत कमी प्रत्येक प्रकारच्या ४०० उपचारकांची गरज आहे. आरोग्य मंत्रालय आणि समाज कल्याण मंत्रालय ह्यांनी ह्या व्यावसायिकांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम विकसित व समन्वयित करावेत अशा प्रकारच्या सहकार्याच्या प्रयत्नांचा समन्वय भारताच्या पुनर्वसन मंडळाकडून होणे आवश्यक आहे.

२६. त्या त्या विभागातून क्षेत्रीय शिक्षण महाविद्यालये आणि राष्ट्रीय पातळीवरील संस्थेमार्फत व्यावसायिक शिक्षकांना व्यवसायपूर्व शिक्षण दिले जावे. चालू योजनेच्या काळात ३००० ते ४००० शिक्षकांना प्रशिक्षित करावे लागेल. हे प्रशिक्षण दोन आठवड्यांचे असेल.

२७. विशेष प्रकारच्या अपंगत्वामुळे निर्माण होणाऱ्या शिक्षणातील समस्यांचा विचार करून त्या सोडविण्याबाबतचा विचार विशेष शाळांतील सुधारित अभ्यासक्रमात केला जावा. उदा. विज्ञानाचे प्रयोग करण्यामध्ये अंध मुलांची मर्यादा विचारात घ्यावी, एकापेक्षा अधिक भाषा शिकण्याबाबत मुक्या व बहिऱ्या मुलांची मर्यादा विचारात घ्यावी. ह्या गोष्टी सुधारित अभ्यासक्रम तयार करताना लक्षात घ्याव्यात. तथापि, ह्या अपंग मुलांचे अभ्यासक्रमातील, ते पूर्ण करू शकणारे घटक सुटणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय स्तरावरील अपंगांच्या संस्था आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी विशेष शाळांचा अभ्यासक्रम तयार करावा आणि अभ्यासक्रम मार्गदर्शिका, न शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका उपलब्ध करून द्याव्यात.

२८. गंभीर अथवा तीव्र स्वरूपाच्या अपंगांसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये लवचिकता असणे अतिशय जरूरीचे आहे. मूल्यमापन मार्गदर्शिका व मूल्यमापनाची साधने विशेष शाळांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, जेथे मूल्यमापनाच्या प्रगत तंत्रज्ञानामध्ये निष्णात असलेली मंडळी आहेत; आणि अपंगत्वाच्या विशेष तज्ज्ञ व्यक्ती असणाऱ्या राष्ट्रीय अपग संस्था ; या दोहोंनी सहकार्याने वरील प्रकारचे साहित्य तयार केले जावे.

२९. विशेष शाळांमध्ये नवीन तंत्रज्ञानाच्या उपयोगाकडे लक्ष दिले जावे. हे करीत असताना अध्ययन केंद्रात वापरल्या जाणाऱ्या साहित्यात आवश्यक बदल, तडजोड या गोष्टी संभवतात. अपंगांना मिळणाऱ्या अध्ययन संधीत सुधारणा घडवून आणण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक्स विभाग, मनुष्यबळ व साधन संपत्ती विकास मंत्रालय आणि समाज कल्याण मंत्रालय यांनी सहकार्याने असे साहित्य तयार करावे. उदा. संगणकाबाबत संस्करण व त्यात भर टाकणे, दूरदर्शन, व्हिडिओसेट

यांचा बहिऱ्या मुलांसाठी उपयोग, इत्यादींची अपंगांना गरज आहे. अशा सुधारणा केल्याने इतर मुलांना हे साहित्य वापरण्याची संधी जशी मिळते तशी ती अपंगांना देखील मिळणे शक्य होईल.

३०. जेथे शक्य असेल तेथे सध्या अस्तित्वात असणाऱ्या विशेष शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढविली जाईल आणि परिणामकारक सुधारणाही दिसून येईल. (८००–१००० शाळा) शिक्षकांच्या राष्ट्रीय आयोगाच्या गटानेही "विशेष शाळांना सामान्य शाळेप्रमाणे अनुदान मिळावे आणि अपंग मुलांच्या विशेष गरजांची पूर्तता होईल इतकी तरतूद केलेली असावी" ही गोष्ट मान्य केली आहे.

३१. सुयोग्य अंतर्गत व्यवस्थापनेच्या अभावामुळे विशेष शाळांतून पर्यवेक्षणाचा अभाव दिसून येतो. याचा परिणाम विशेष शाळांतील अपंगांच्या शैक्षणिक दर्जावर होतो. समाज कल्याण मंत्रालय आणि मनुष्यबळ व साधनसंपत्ती मंत्रालय, यांनी सहकार्याने विशेष शाळांतील पर्यवेक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी सुयोग्य अंतर्गत व्यवस्थापन यंत्रणा विकसित करावी पर्यवेक्षणाच्या कामासाठी एक शिष्टमंडळ नेमले जावे. ज्यांनी अपंगांच्या शिक्षणाबाबत उद्बोधन घेतले आहे अशा जिल्हा पातळीवरील तीन सदस्यांमार्फत, ज्ञान आणि कार्यक्षमतेची अट पूर्ण करून पर्यवेक्षणाचे काम करवून घेता येईल. जिल्हा पुनर्वसन केंद्रातील कर्मचाऱ्यांना देखील या कार्यात सहभागी करून घेता येईल.

३२. भारतीय सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातील अपंगांच्या शिक्षणामध्ये त्वरित संशोधन करण्याचे काम हाती घेतले पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान मंडळ, राष्ट्रीय पातळीवरील अपंग संस्था आणि भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषद यांनी संशोधनाच्या कामात पुढाकार घ्यावा. या क्षेत्रातील संशोधनाच्या अभावाचे एक कारण म्हणजे विद्यापीठांचा अतिशय थोडा सहभाग आणि या क्षेत्रातील संशोधन करू शकतील व पर्यवेक्षण करू शकतील अशा सक्षम व्यक्तींची कमतरता हे होय. संशोधनाचे काम करणाऱ्यांचे प्रशिक्षण आणि राष्ट्रीय पातळीवरील संस्थांकडून मिळणारे उत्तेजन व निधी या सर्वांचा उपयोग करून ह्या कामाला योग्य ती गति मिळाली पाहिजे.

**पर्यवेक्षण व मूल्यमापन**

३३ अपगांच्या शिक्षणाबाबतची मूलभूत माहिती फारच तोकडी आहे. माहिती गोळा करण्याची पद्धती अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील. समाज कल्याण मंत्रालय आणि मनुष्यबळ विकास मंत्रालय, विशेष शाळांतील व सामान्य शाळांतील अपगांच्या शिक्षणावर आणि त्यांच्या प्रगतीवर देखरेख ठेवतील. मनुष्यबळ विकास मंत्रालयात एकात्म पद्धतीने माहिती ठेवण्यात येईल. अपंगांच्या शिक्षणसंस्थांबाबतची माहिती मनुष्यबळ विकास व साधन संपत्ती मंत्रालयाच्या सांख्यिकीय अहवालात अंतर्भूत करावी लागेल. समाज कल्याण मंत्रालयानेही विशेष शाळांबाबतची माहिती मनुष्यबळ विकास व साधनसंपत्ती मंत्रालयाला पुरविली पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने घतलेल्या शिक्षण विषयक नियतकालिक सर्वेक्षणामध्येही अपंगांचे शिक्षणाबाबतची माहिती समाविष्ट होऊ शकेल. मनुष्यबळ विकास मत्रालय आणि समाज कल्याण मंत्रालय यांनी राष्ट्रीय पातळीवरील संस्था, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, विद्यापीठाचे शिक्षण व विशेष शिक्षण विभाग यांचेमार्फत विविध पातळीवरील विविध मुद्द्यांवर मूल्यमापनात्मक पाहणी करू शकेल. दर्जा विषयक अभ्यासही एक उपक्रम म्हणून हाती घेता येईल. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व राष्ट्रीय अपंग संस्था गुणात्मक आणि संख्यात्मक बाबींचा समावेश करणारा मूल्यमापनाचा आराखडा तयार करतील.

□ □

## 'परिशिष्ट'

वयानुसार आणि अपंगत्वाच्या प्रकारानुसार

| | वयोगट ०–४ | | ५–१४ | | १५–५९ | |
|---|---|---|---|---|---|---|
| अपंगत्वाचा प्रकार | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| अंध | २३५५९ | ४५५४ | ९२३५१ | ३४२६८ | ६९३१८२ | १७१५०० |
| मूकबधिर | सर्वेक्षण नाही. | | ४३९३६८ | ९६१०७ | १४६२४५० | २४४६८० |
| चेतास्नायु घात-पीडीत | सर्वेक्षण नाही. | | ५७५०९६ | १६८९ ५ | ६८८३८७ | १९९१४२ |
| चलनशीलता | २३५०७७ | ९८३६६ | ९४५९०० | २८२८०६ | २०९४४३२ | ५००७१४ |
| एकूण | ३१०८३६ | १०२९२० | २०५२७१५ | ५८२१५६ | ४९३८४५१ | १११६०३६ |

**विशेष सूचना – १९ व २८ च्या राष्ट्रीय सर्वेक्षणातील प्रमाण आणि**

## 'परिशिष्ट'

१९८१ मधील अपंगांची लोकसंख्या.

| ६० व ६० वयाहून अधिक | | एकूण | | |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी | एकूण |
| ८ | ९ | १० | ११ | १२ |
| २०४५४८३ | ३५५८३७ | २८५६५७५ | ५६६१५९ | ३४२२७३४ |
| ९१६८५७ | २०२५७७ | २८१८६७५ | ५४३३६४ | ३३६२०३९ |
| ९९४३१ | २४१४५ | १३६२९१४ | ३९२२६२ | १७५५१७६ |
| ९१३०१९ | १९२३०२ | ४२३८४२८ | १०७४१३८ | ५३१२६१६ |
| ३९७४७९० | ७७४८६१ | ११२७६५९१ | २५७५९७३ | १३८५२५६५ |

१९८३ मधील सांख्यिकी पत्र २ मधील लोकसंख्येच्या आकड्यांवर आधारित.

## प्रकरण १६ वे

# प्रौढशिक्षण

### सद्य:स्थिती

१. स्वातंत्र्य प्राप्तीपासून साक्षरता प्रसार हा एक महत्त्वाचा कार्यक्रम ठरला आहे. १९५१ ते १९८१ या काळात साक्षरतेचे प्रमाण १६.६७ टक्क्यांवरून ३६.२७ टक्क्यांपर्यंत वाढले. असे असले तरी निरक्षरतेचे प्रत्यक्ष आकडे पाहता या काळात निरक्षरांची संख्या मात्र ३०० लाखावरून ४३७ लाखापर्यंत वाढली आहे: या निरक्षर लोकसंख्ये-पैकी स्त्रियांचे प्रमाण ५७ टक्के आहे आणि आदिवासी आणि अनुसूचित जातीत हे प्रमाण फारच गंभीर आहे. गल्या दहा वर्षात प्रौढसाक्षरतेच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्यात आले. यासाठी तांत्रिक आणि प्रशासकीय संरचना निर्माण करण्यात आली आहे. तसेच स्वयंसेवी संस्था मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेण्यात आल्या. तथापि, ज्यांना साक्षर समजण्यात येते त्यांच्या साक्षरतेची खाली गलेली पातळी, निरक्षतेत ज्यांचे नेहमी पर्यवसन होते, अशा साक्षरता तंत्राचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर निरंतर शिक्षणासाठी आणि ज्ञानप्राप्तीसाठी मिळणारी अपुरी संधी असे या परिस्थितीचे वैशिष्टयपूर्ण चित्र रेखाटता येईल. कारण साक्षरता कार्यक्रमाला शास्त्र, तंत्रज्ञान आणि आधुनिक संशोधन यांची जोड देण्यात आली नाही. तसेच कार्यक्षम युवक आणि सामान्य जनता या कार्यक्रमापासून अलिप्त राहिले.

### धोरण, लक्ष्य आणि धोरणात्मक तरतूदी

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असे मान्य केले आहे की, प्रौढ शिक्षण आर्थिक, सामाजिक आणि लैंगिक भेदाभेदांची दरी कमी करण्याचे साधन बनेल.

नव्या राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमात १५ ते ३५ वयोगटाच्या अंदाजे १०० लाख लोकांना साक्षरतेबरोबरच शिक्षणही द्यावयाचे आहे. साक्षरता कार्यक्रम जर अर्थपूर्ण करावयाचा असेल तर त्यात शिकण्यासाठी सहभागी होणाऱ्या लोकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित अशा व्यावहारिक माहितीच्या व कौशल्यांच्या संचाचा समावेश करणे आवश्यक आहे, असे या आधीच्या अनुभवावरून लक्षात येते. म्हणून राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमात कौशल्यांचा विकास करण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच प्रौढांमध्ये विकास कार्यक्रमातील राष्ट्रीय उद्दिष्टांविषयी जाणीव निर्माण करणे, व जुलुमापासून मुक्त होण्याची जागरूकता निर्माण करणे यावर भर दिला जाईल. राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम हा टप्प्या-टप्प्याने पूर्ण होणारा कालमर्यादित कार्यक्रम राहील. हा कार्यक्रम १९९० ला ४० लाख लोकापर्यंत तर १९९५ ला आणखी ६० लाख लोकांपर्यंत पोहोचेल.

३. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची मुख्य सूत्रे पुढील प्रमाणे राहतील.

अ) लवचिकता व अधिक परिणामकारकतेसाठी इतर साधने यांची सध्याच्या कार्यक्रमांच्या संदर्भात पुनर्रचना करणे.

ब) शिक्षणाची गती सुधारण्यासाठी व योग्य वातावरणनिर्मिती करण्याकरिता शास्त्र, तंत्रज्ञान आणि शैक्षणिक संशोधनाची कार्यक्रमास जोड देणे.

क) प्रौढ शिक्षण व इतर विकास कार्यक्रम यामध्ये संबंध प्रस्थापित करणे.

ड) सामूहिक कार्यात्मक साक्षरतेचा प्रारंभ.

इ) अध्ययनशील समाज निर्मितीसाठी साधन होईल असा (अनेक मिती असलेला) निरंतर शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेणे.

ई) प्रौढ शिक्षणाचे लक्ष्य गाठण्यासाठी कृतिशील व्यवस्थापकीय यंत्रणा निर्माण करणे.

फ) स्त्रियांच्या समानतेवर भर असलेला कार्यक्रम तयार करणे व या दृढनिश्चयाचा पाठपुरावा करण्याचे दृष्टीने सर्व प्रकारचे प्रयत्न करणे.

**वातावरण निर्मिती**

४. निरक्षरता निर्मूलनासाठी पूर्वतयारी.

यापूर्वीचा कार्यक्रम व्यवस्थापकीय यंत्रणेवर अधिक अवलंबून असल्याने व त्यांत सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्थांच्या सहभागाचा अभाव असल्याने यशस्वी झाला नाही. हा असमतोल दूर करण्यासाठीं खालील उपाय सुचविण्यात येत आहेत.

अ) राजकीय पक्ष, कामगार, किसान व युवक संघटना, महिला मंडळे, विद्यार्थी संघटना यांचे क्रियाशील सहकार्य मिळविण्यात येईल.

ब) जनसंपर्काच्या विविध माध्यमांतून परिणामकारक पाठबळ उभे केले जाईल.

क) विकास कार्यक्रमात सहभागी असलेल्या इतर सर्व विभागांना त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचा उपयोग करण्यास उद्युक्त केले जाईल.

ड) संपूर्ण शिक्षण यंत्रणा या कार्यक्रमासाठी कटीबद्ध राहील.

इ) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमात जाणीव जागृतीसाठी जिल्हा तहसील, ठाणे पातळीवर प्रशासकीय यंत्रणेचा सहभाग असेल.

**सध्याच्या कार्यक्रमाची पुनर्रचना**

५. ग्रामीण कार्यात्मक साक्षरता प्रकल्प हा सध्याचा मुख्य कार्यक्रम आहे, आर्थिक पातळीवर व कार्यक्रमाच्या निकषांवर ग्रामीण कार्यात्मक साक्षरता कार्यक्रमाने राज्य प्रौढशिक्षण कार्यक्रम व स्वयंसेवी संघटनांना मिळणारे आर्थिक सहाय्य योजनेवर आपले वर्चस्व कायम केले आहे. ग्रामीण कार्यात्मक साक्षरता कार्यक्रम व राज्य प्रौढ शिक्षण कार्यक्रम यांना बळकटी आणण्यासाठी —

१) प्रकल्प रचनेत लवचिकता आणणे.

२) शिक्षणात त्या विभागातील बोलीभाषा वापरणे (आदिवासी विभागात तेथील बोलीभाषेचा उपयोग करणे.)

३) योजनेत काम करणाऱ्यांचे प्रशिक्षण

४) पर्यवेक्षण यंत्रणेचे विकेंद्रीकरण

५) स्त्री शिक्षिकांच्या संख्येत वाढ करणे. त्यासाठी नेमणुकीच्या प्राथमिक अटी शिथील करून त्यांच्यासाठी निरंतर शिक्षणाची सोय करणे.

६) योजनेच्या कालावधीत सातत्य राखणे.

७) प्रशिक्षण केंद्राच्या वातावरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी शास्त्रीय व तंत्रज्ञानाचा वापर करून प्रौढ शिक्षण पद्धतीत शैक्षणिक तंत्रज्ञान व शैक्षणिक संशोधन यांचा उपयोग करणे.

८) प्राथमिक साक्षरता शिक्षण प्रौढ शिक्षणोत्तर शिक्षण व निरंतर शिक्षण यांचा समन्वय साधणे.

६. समाजसेवा संस्था व सामाजिक चळवळी करणारे गट यांचा सहभाग घेताना त्यांची निवड करण्याच्याच्या पद्धतीत सुधारणा, त्यांच्या कामात सातत्य, पद्धतीत सोपेपणा याची खात्री करून या संघटनांना कार्यक्रम निवडीचे स्वातंत्र्य दिले तरी ते कार्यक्रम राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाशी जुळणारे राहतील याची खात्री केली जाईल.

७. कामगारांना शिक्षण देण्याच्या सध्याच्या योजनांचे पुनरावलोकन होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने मध्यवर्ती कामगार शिक्षण मंडळ कामगारांसाठी साक्षरतेचे व कामगार शिक्षणाचे वर्ग परिणामकारक रीतीने आयोजित करतील. व्यावसायिक संघटनांना अधिक प्रमाणात सहभागी केले जाईल व त्यांना व्यापक प्रमाणावर कार्यक्रम हाती घेण्यास प्रोत्साहन दिले जाईल व सुसंवाद साधण्यात येईल. ग्रामीण कामगार, स्त्री कामगार, बालकामगार यांची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी, श्रमिक विद्यापीठे अधिक लक्ष पुरवतील.

**प्रौढ शिक्षण आणि विकास कार्यक्रम**

८. शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजातील घटकांसाठी प्रौढ-शिक्षण अशी एक प्रक्रिया आहे, की जिच्याद्वारे एक प्रभावी यंत्रणा पुरविली जाते, तसेच प्रौढ शिक्षणाचे एक व्यासपीठ तयार होते. ज्या द्वारे समाजातील या घटकांस विकास कार्यक्रमाची व प्रगतीची माहिती

दिली जाते. म्हणून प्रौढ शिक्षण आणि विकासाचे कार्यक्रम यांच्यात परिणामकारक दुवा सांधला जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा दुवा सांधण्याचे काही महत्त्वाचे मार्ग खालीलप्रमाणे :–

अ) साक्षरतेसाठी खास प्राथमिक पुस्तकांची व वाचन-साहित्याची निर्मिती करणे, ज्याचा लाभ ग्रामीण विकास सजन कार्यक्रम व राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण कार्यक्रमातील लाभार्थींनाही घेता येईल व त्यायोगे त्यांना त्यांचे हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव होईल.

ब) स्त्रियांच्या कार्यात्मक ग्रामीण साक्षरतेचा कार्यक्रम बंद पडल्यामुळे एकात्मिक बालविकास सेवा (ICDS) योजनेच्या कार्यक्रमावर विपरीत परिणाम झाला आहे. हा कार्यक्रम पुन्हा सुरू करण्यात येईल व एकात्मिक बालविकास कार्यक्रमाचा तो भाग असेल.

क) अनुसूचित जाती व जमातींसाठी जे विकास कार्यक्रम आयोजित करण्यात येतात त्यामध्ये शक्य त्या ठिकाणी साक्षरता कार्यक्रमांचा समावेश केला जाईल.

ड) कामगार कल्याण कार्यक्रमात साक्षरता व प्रौढ शिक्षणावर विशेष लक्ष दिले जाईल व गरज भासल्यास मालकांना त्यांच्या नोकरवर्गासाठी साक्षरता वर्ग व व्यावसायिक कौशल्य विकासासाठी वर्ग कायद्याने घ्यावे लागतील.

विविध प्रकारच्या कामगारांसाठी असलेल्या कामगारनिधीचा उपयोग साक्षरता वर्ग व प्रौढ शिक्षणासाठी केला जाईल. असंघटित कामगारांसाठी असलेल्या निरनिराळ्या योजनांवर आवश्यक ते लक्ष दिले जाईल.

इ) स्त्रियांच्या विकासाच्या विविध कार्यक्रमात साक्षरता व प्रौढ शिक्षण यांना अतिशय महत्त्वाचे स्थान राहील.

फ) १९८६-८७ मध्ये ५० नेहरू युवक केंद्रे सुरू करण्यात येतील. ही केंद्रे त्यांच्या जिल्ह्यात प्रत्येक गटपातळीवर १०० कार्यात्मक साक्षरतेची केंद्रे सुरू करतील.

**सार्वत्रिक कार्यात्मक साक्षरता कार्यक्रम**

९. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देशातील तरूणवर्ग शिक्षक आणि शेतकरी– कामगार यांच्यावर संपूर्ण निष्ठा व्यक्त केली आहे. राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाच्या सध्याच्या अतिशय निवडक मर्यादित कार्यक्रमा-ऐवजी तरुणवर्ग, शिक्षक, शेतकरी–कामगार यांना सहभागी करून घेणारा एक सामूहिक–व्यापक कार्यक्रम बनावा अशी अपेक्षा आहे. अशा कार्यक्रमाची महत्त्वाची वैशिष्ठे खालील प्रमाणे असतील.

अ) साक्षरतेचे काम विद्यार्थी 'अभ्यास–सेवा' (study service) म्हणून मोठ्या संख्येने करतील. उदा. कार्यानुभव व समाज/राष्ट्रीय सेवा म्हणून विशिष्ट काम हाती घेतील. त्याची नोंद त्यांच्या वार्षिक प्रगतिपुस्तकात होईल.

ब) निरक्षरता निर्मूलनासाठी विद्यापीठे, महाविद्यालये, उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालये यांना भरघोस उत्तेजन दिले जाईल.

क) कामगार संघटना, पंचायत राज्यसंस्था आणि जनतेच्या प्रातिनिधिक संस्थांना कार्यात्मक साक्षरतेचा कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी साक्षरता पुस्तकांचे संच व वर्ग चालविण्यासाठी आर्थिक तरतूद केली जाईल.

ड) समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना साक्षरता वर्गावर देखरेख करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. अशाप्रकारे स्त्रियांच्या प्रौढ शिक्षणाच्या वर्गावर देखरेख करण्यासाठी विशेषतः स्त्रियांना निरलस सेवा करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. तसेच यात स्वयंसेवी संस्थांनाही सहभागी केले जाईल.

**निरंतर शिक्षण**

१०. मानवी विकास साधनांबाबतचे धोरण व शिक्षित समाज निर्मितीचे ध्येय हे साध्य करण्यासाठी निरंतर शिक्षण अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे साधन आहे. निरंतर शिक्षणात नवसाक्षरांसाठी साक्षरोतर शिक्षण चालू ठेवणे आणि मध्येच शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांची प्राथमिक कौशल्ये टिकविणे, प्राथमिक कौशल्ये ग्रहण केल्यानंतर

शैक्षणिक प्रक्रिया चालू ठेवणे व या शिक्षणाचा उपयोग त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी करणे. या सर्व बाबींचा समावेश आहे. परंतु निरंतर शिक्षण हे केवळ साक्षरतेच्या कार्यक्रमांपर्यंत थांबत नाही तर त्यात खालील कार्यक्रमांचा समावेश आहे.

१) ५००० लोकसंख्या असलेल्या खेड्यांच्या समूहासाठी एक जन शिक्षण निलायम स्थापन करणे. जनशिक्षण निलायमचे प्रौढ शिक्षण व अनौपचारिक शिक्षण हे अविभाज्य घटक राहतील. यासाठी समाजमंदीर व शाळांचा उपयोग केला जाईल. याठिकाणी वाचनालय, ग्रंथालय, चर्चा-मंडळे, सांस्कृतिक उपक्रम, दूरचित्रवाणी संच या सर्व सोयी उपलब्ध केल्या जातील.

२) मालक, कामगार संघटना व संबंधित शासकीय संस्था यांनी मजुरांच्या शिक्षणासाठी नियोजनबद्ध असा कार्यक्रम आखावा. याद्वारे त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढवावा, त्याचे उत्पादन वाढावे या दृष्टिने व्यावसायिक कौशल्याचा विकास, त्याची वेतनवाढ आणि एकूण कल्याण साधले जाईल.

३) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, तंत्रनिकेतने यातून अभ्यासा-इतकेच महत्त्व, इतकेच प्राधान्य या विस्तार कार्यक्रमाला दिले जाईल. विस्तार कार्यक्रमात लोकशिक्षणाचा अंतर्भाव असेल.

तसेच व्यावसायिकांसाठी व कामगारांसाठी नियोजनबद्ध अभ्यास-क्रम निरंतर शिक्षणवर्गाचा समावेश यात राहील आणि यासाठी दूर-शिक्षण तंत्राचा अवलंब केला जाईल.

४) शैक्षणिक धोरणात समाविष्ट केल्याप्रमाणे ग्रंथप्रसाराचा कार्यक्रम घेण्यात येईल. शैक्षणिक संस्थांना विशेष अनुदान देऊन लोकां-साठी वाचनालय व ग्रंथालयाची सोय केली जाईल. स्वयंसेवी संस्थांनी ग्रंथालये व वाचनालये स्थापावी यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

५) शैक्षणिक तंत्रज्ञान आणि साधने या विभागात सुचविल्या-प्रमाणे रेडिओ, दूरदर्शनसंच, चित्रपट यांचा उपयोग शिक्षण आणि करमणूक यांच्यासाठी केला जाईल.

६) अनौपचारिक शिक्षणातील तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या कार्यक्रमात प्रौढांच्या गरजा व आवडीनिवडी लक्षात घेऊन कार्यक्रमाचे नियोजन केले जाईल. यात पुरुषांच्या बरोबरच स्त्रियांचाही सहभाग राहील, यांकडे विशेष लक्ष दिले जाईल. सध्याच्या ट्रायसेम, कृषिविज्ञान केंद्र, शेतकरी प्रशिक्षण केन्द्र इत्यादि मार्फत काम करीत असलेल्या संस्थांसाठी पूरक म्हणून शैक्षणिक व तांत्रिक संस्थांमार्फत अंशकालिन वर्ग चालविण्यात येतील.

**तांत्रिक सुविधा यंत्रणा**

११. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमास आवश्यक असलेल्या तांत्रिक व शैक्षणिक सुविधा बळकट कराव्या लागतील. कार्यक्रमाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विकेंद्रीकरण व शैक्षणिक तंत्रज्ञानाची सेवा उपलब्ध करून घेण्यावर भर दिला जाईल.

खालील विशिष्ट उपाययोजना केली जाईल.

अ) शिक्षकांचे प्रशिक्षण, शिक्षक मार्गदर्शक आणि उत्कृष्ट शैक्षणिक साहित्याची निर्मिती यांना प्राधान्य देऊन लक्ष पुरविले जाईल. यासाठी साक्षरोत्तर प्रौढ व निरंतर शिक्षणासाठी अध्ययन साहित्य निर्मितीकरिता अद्यावत मुद्रण तंत्र व संपर्क माध्यमांचा उपयोग करण्यात येईल. हे काम करीत असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांचे पुनरावलोकन करून त्यांची पुनर्रचना करण्यात येईल.

ब) प्रत्येक राज्याच्या राज्य–मार्गदर्शन–केन्द्राचे पुनरावलोकन केले जाईल. जी केन्द्रे समाधानकारकपणे काम करीत नाहीत त्यांच्यात सुधारणा केली जाईल. किंवा इतर संस्थेकडे ती हस्तांतरीत करण्यात येतील. राज्य मार्गदर्शन केन्द्राच्या अंतर्गत रचना व कमचारी यांच्यात सुधारणेसाठी तरतूद केली जाईल.

क) प्रौढ शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण यासाठी असलेली राज्य मार्गदर्शक केन्द्रे ही जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची अविभाज्य घटक राहतील. प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या प्राथमिक व निरंतर शिक्षण प्रशिक्षणाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा कर्मचारी वर्ग, जिल्ह्यातील इतर तज्ञ मार्गदर्शक व जिल्हा मार्गदर्शक केन्द्रे यांची राहील. प्रौढ

शिक्षणाच्या मूल्यमापनासाठी काही पद्धतीं सुद्धा ते तयार करतील व त्यांचे पर्यवेक्षण करतील.

**निरक्षरता निर्मूलनासाठी तंत्रज्ञान सेवा**

१२. निरक्षरता निर्मूलन मोहीम ही तंत्रज्ञान व समाजसेवा संदेश देणारी मोहीम म्हणून सुरू करण्यात येईल. अशा प्रकारे सेवेतून प्रचार कार्य म्हणजे एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे आधुनिक शास्त्रीय, तंत्रज्ञान विषयक व अध्यापन तंत्रविषयक ज्ञानामुळे देवाण-घेवाणीचा उच्चस्तर गाठला जाऊन त्यामुळे साक्षर होण्याची प्रक्रिया सुलभ व गतीशील होईल. हे सेवाकार्य साधण्यासाठी खालील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१) स्थानिक सोयी उपलब्ध करणे, भौतिक परिसर सुधारणे, वीज पुरवठा व दिवाबत्तीची सोय ह्या किमान सोयी प्रौढ शिक्षण वर्गास मिळाव्या.

२) विकेंन्द्रीत व्यवस्थेत अभ्यासाला आवश्यक ती प्राथमिक पुस्तके, वाचन साहित्य, शैक्षणिक तक्ते व इतर साधने त्वरेने तयार करून घेऊन पुरविणे.

३) शिकविण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी व शिक्षणाची पातळी वाढावी म्हणून दूरचित्रवाणी व रेडिओचा वापर आवश्यक अशी स्वस्त आणि टिकावू साधने तयार करणे.

४) शैक्षणिक संशोधनातून हाती आलेल्या निर्णयाचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेस वापर करण्यास लागणारा विलंब कमी करणे.

५) प्रौढ शिक्षण वर्गास येणाऱ्या प्रौढांना शिकविण्यासाठी वापरण्यात येणारी इलेक्ट्रॉनिक साधने योग्यरीतीने वापरता येतील असे कृतीशील वातावरण निर्माण करणे.

**राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे व्यवस्थापन**

१३. राष्ट्रीय प्रौढशिक्षण कार्यक्रम व्यवस्थापनाच्या धोरणानुसार परिच्छेद दोन व त्यानंतरच्या धोरणाप्रमाणे अध्ययन अनुभव लाभधारकापर्यंत पोहोचविणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. याकरिता व्यवस्थापन पद्धती ठरविण्यासाठी पुढील प्रमुख बाबींचा विचार करणे योग्य होईल.

१) राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रमातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियोजन आणि व्यवस्थापन करणे.

२) मध्यवर्ती धोरणाची चौकट ठरविण्याची गरज आणि योजना व अंमलबजावणी पद्धति व कार्यात्मक स्वातंत्र्याच्या विकेंद्रीकरणाबाबत सूचना देणे.

३) विकास घटक आणि राष्ट्रीय प्रौढशिक्षण कार्यक्रमात परिणामकारक सुसूत्रता स्थापन करणे.

४) राजकीय पक्ष, सामूहिक संघटना, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना इत्यादींची कार्यक्रमात बांधीलकी सांधणे.

५) सहज वापरात घेऊ शकेल अशी हिशोबाची पद्धत अंमलात आणणे.

६) प्रौढशिक्षणाचे नियोजन व दररोजचे कार्यक्रम तळगाळापर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी प्रौढशिक्षण कार्यक्रमाच्या कार्यकर्त्यांचा सहभाग साधणे, त्यात नियोजित लाभार्थींचा सहभाग आणि समाजाचा सहभाग आवश्यक आहे.

**प्रकल्प दृष्टिकोन**

१४. राष्ट्रीय प्रौढशिक्षण कार्यक्रमातील सुरूवातीचा प्रकल्प व टप्पा हा महत्त्वाचा असतो. प्रौढशिक्षण प्रकल्पाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल :— प्रकल्प म्हणजे व्यवस्थापनाच्या दृष्टीने व्यवहार्य आणि कार्यरत अशी स्वायत्त संस्था होय. तिच्यावर निरक्षरता निर्मूलनाची संपूर्ण जबाबदारी राहील, व त्या विभागात निरंतर शिक्षणाच्या आयोजनाचीही जबाबदारी राहील. हा प्रकल्प एका मंडळाच्या सल्ल्याने कार्य करील. या मंडळाचे सल्लागार म्हणून या संस्थेतील कार्यकर्ते, स्थानिक समाजसंस्थांचे प्रतिनिधी, जनतेच्या संघटना, विकास कार्यकरम राबविणाऱ्या कार्यालयाचे अधिकारी प्रतिनिधीत्व करतील. या सल्लागार मंडळाचे कार्य पुढील प्रमाणे राहील :—

१) कार्यक्रमाचे नियोजन. २) पर्यवेक्षक व शिक्षकांचे प्रशिक्षण. ३) विकास कार्यक्रम घेणारी सर्व कार्यालये व सामाजिक संस्था यांच्यात

समन्वय व सहकार्य ठेवणे. ४) साहित्य पुरविण्यासाठी तरतूद करणे. ५) उद्दिष्टांनुसार कार्यक्रम राबविला जात आहे की, याची खात्री करणे ६) प्रभावी संनियंत्रण व पर्यवेक्षणाची योजना.

१५ ग्राम पातळीवर अथवा मोहल्ला पातळीवरील प्रौढ शिक्षण केंद्र हेच प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे क्रियाशोल एकक म्हणून चालू राहील. प्रौढशिक्षण केंद्राचा संघटक हा एक क्रियाशील कार्यकर्ता राहील. तोच प्रौढशिक्षण केंद्र चालवीत. परिच्छेद २ मध्ये नोंदविल्याप्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करणे व त्याची कार्यवाही करणे हे त्याचे काम राहील.

८ ते १० प्रौढशिक्षण केंद्रांचे काम पर्यवेक्षक पाहतील. स्थानिक खेडयांतून त्याची निवड केली जाईल. एखादया अनुभवी व यशस्वी संघटकाचीच पर्यवेक्षक म्हणून निवड केली जाईल. पर्यवेक्षकाच्या कर्तव्यात जनशिक्षण निलायम माध्यमातून प्रौढशिक्षणोत्तर वर्ग व निरंतर शिक्षणाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे यांचा समावेश करण्यांत येईल.

१६ सध्याच्या सर्व प्रौढ शिक्षण प्रकल्पांच्या कार्यांचा आढावा घेऊन त्याची पुनर्रचना केली जाईल. परिणामकारकता वाढावी आणि संशोधन वृत्तीस प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने सर्व मूलभूत वैशिष्टये आणि वित्तोय मानक मग ती केंद्र शासनाच्या आर्थिक मदतीने चालणारी असोत किंवा राज्यशासन यंत्रणे मार्फत चालविली जात असोत किंवा स्वयंसेवी संघटनांनी चालविलेली असोत, ती सर्व सारखीच असतील. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत परिणामकारकता वाढविण्यासाठी आणि नवोपक्रमास गती देण्यासाठी कार्यक्रमात लवचिकता आणि विविधता ठेवण्याची मुभा राहील.

## जिल्हा पातळीवरील नियोजन

१७. जिल्हा पातळीवरील निरक्षरता निर्मूलनासाठी सविस्तर नियोजन करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण मंडळाची राहील. जिल्हा मार्गदर्शन केंद्रे परिच्छेद ११ मध्ये सदर्भ दिल्याप्रमाणे जिल्हा शिक्षण मंडळास तांत्रिक सहाय्य करतील. जिल्हा शिक्षण मंडळाचे कार्य पुढील प्रमाणे राहील.

कार्यक्रम राबविणाऱ्या विविध यंत्रणांना जबाबदाऱ्यांचे सुयोग्य वाटप.

जिल्हा ग्रामीण पथकांना संपूर्ण मार्गदर्शन करणे.

परिच्छेद ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सामूहिक कार्यक्रमाशी संपर्क साधणे.

मालक इ. नी चालविलेल्या प्रौढशिक्षण कार्यक्रमास मार्गदर्शन करणे व समन्वय साधणे.

**राज्य आणि राष्ट्रीय पातळी**

१८. राज्य पातळीवर व राष्ट्रीय पातळीवर अनुक्रमे मुख्यमंत्री व मानव साधन विकास मंत्री यांचे अध्यक्षतेखाली समित्या राहतील. राष्ट्रीय पातळीवरील राजकीय पक्षाचे ज्येष्ठ पुढारी या समित्यांचे सदस्य राहतील. ह्या समित्या स्वायत्त असतील व राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणीची जबाबदारी त्यांच्यावर राहील. त्यांचे कार्य खालीलप्रमाणे राहील.

कार्यक्रमाचे नियोजन व आर्थिक तरतूद करणे.

साधनांच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांसाठी बहुस्तरीय संस्था निर्माण करणे.

मूल्यमापन, योजनेची कार्यवाही तपासणे, पुनरावलोकन व संशोधन

निरंतर शिक्षण कार्यक्रम

माध्यम साधने पुरविणे आणि

इतर विकास विभागांशी संपर्क स्थापित करणे.

राज्य व राष्ट्रीय मंडळाच्या कार्यकारी समितीची जबाबदारी प्रौढ शिक्षणाचा दैनदिन कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक वित्तीय व प्रशासकीय अधिकार देण्याची राहील. राज्य कार्यकारी समितीचे प्रमुख राज्याचे मुख्य सचिव, व शिक्षण सचिव राहतील, तर राष्ट्रीय कार्यकारी समितीचे प्रमुख केंद्र शिक्षण सचिव राहतील.

**मूल्यमापन आणि व्यवस्थापकीय माहिती यंत्रणा**

१९ प्रौढशिक्षण वर्गातील प्रौढांच्या मूल्यमापनाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाईल. शिक्षण घेणारे प्रौढ आपले शिक्षण स्वतःच पुढे चालू ठेवतील, एवढे साक्षर होतील व अंकज्ञानही प्राप्त करतील हे पाहणे या मूल्यमापनांचे उद्दिष्ट राहील. उदा. या खेरीज मूल्यमापनात राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाच्या इतर घटकांचाही समावेश राहील. उदा. कौशल्य संपादन, जाणीव जागृती इ. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतर्गत मूल्यमापन कक्ष कार्यरत राहील व याकडे प्रौढ शिक्षण केंद्रातील सर्व संघटक पर्यवेक्षक आणि व्यवस्थापकीय यंत्रणा एकत्रपणे सहभागी होऊन कार्यक्रमाच्या सध्याच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्याचे काम राहील. कार्यक्रमाच्या वाह्य मूल्यमापनाचे काम उच्चशिक्षण संस्था आणि सामाजिक शास्त्र संशोधन यांच्याकडे राहील, व यात कार्यक्रमाची गुणवत्ता संख्यात्मक साध्य आणि व्यवस्थापन पद्धतीचा समावेश राहील. या मूल्यमापनाच्या आधारे वेळोवेळी सूचना सुचविल्या जातील.

२०. व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेला कालानुरूप माहितीचा ओघ सतत मिळत रहावा म्हणून एक व्यवस्थापकीय माहिती यंत्रणा स्थापन केली जाईल.

□ □

प्रकरण १७ वे

# शालेय शिक्षणाचा आशय व प्रक्रिया

**सद्य:स्थिती**

१. ज्ञानाधिष्ठित समाजामध्ये शिक्षणाचा आशय आणि प्रक्रिया यांची सातत्याने पुनर्रचना करावी लागते. त्यांचा स्तर उंचवावा लागतो. १०+२ या शालेय शिक्षणाच्या आकृतिबंधाची सुरूवात करून अभ्यासक्रमातील प्रमुख पुनर्रचनेची सुरूवात १९७५ मध्ये झाली. आतापर्यंत तत्वत: बहुतेक सर्व राज्यांनी या आकृतिबंधाचा स्वीकार केला आहे. परंतु अंमलबजावणीच्या बाबतीत विशेषत: आशय आणि प्रक्रिया यांच्या पुनर्विवादाच्या बाबतीत उदासीनता आणि असमानता आहे. अभ्यासक्रमातील बदल आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, शिक्षक प्रशिक्षण व परीक्षेतील सुधारणा यांचा सांधा जोडण्याकरिता एखाद्या व्यापक योजनेची उणीव हा एक प्रमुख दोष पूर्वीच्या अभ्यासक्रम सुधारणेच्या प्रयत्नात दिसून येतो. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून पाहिले असता बऱ्याच मोठया संख्येची क्रमिक पुस्तके इतिहास व भाषा या विषयांतील क्रमिक पुस्तके असमाधानकारक असल्याचे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने केलेल्या पाहणीवरून दिसून येते. याशिवाय एन. सी. ई. आर. टी. च्या दुसऱ्या एका पाहणीवरून असेही दिसून आले आहे की, या पुस्तकांची आकलनक्षमता अगदीच कमी आहे. याशिवाय असेही दिसून आले आहे की आशय आणि मूल्यविचार यांची रचना व मांडणी करण्याच्या बाबतीत क्रमिक पुस्तकांमध्ये सुधारणा करण्यास बराच वाव आहे. क्रमिक पुस्तकांचा आराखडा, नकाशा, उदाहरणे आणि बांधणी यांच्या बाबतीत विशेषत: त्या क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा विकास लक्षात घेता बरीचशी सुधारणा होणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम विकसन आणि प्रशिक्षण पद्धति यांच्यामध्ये होणारे नवीन प्रयोग आणि संशोधन हे बहुतांशी विशेष सहाय्य मिळणारे प्रकल्प आणि लहान गट

यांच्यापुरतेच मर्यादित असतात. शैक्षणिक तंत्रज्ञान संस्थेचा प्रकल्प सोडला तर सध्या अस्तित्वात असलेली तांत्रिक आधारभूत संरचना ही नवनवीन प्रयोगांना संस्थात्मव रूप देण्याच्या प्रक्रियेला आधार पुरविण्यासाठी पुरेशी सुसज्ज नाही. राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान आणि व्यापक माध्यमांचा आधार हा शैक्षणिक पुनर्रचनेच्या बाबतीत दुर्लक्षित राहिला आहे. सध्या व्यापक प्रमाणावर दिसणारी विविध सामाजिक, आर्थिक गटातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या शालेय सुविधां-मधील तफावत ही शैक्षणिक दर्जाची तुलना करण्याच्या बाबतीत अडथळा निर्माण करते.

**धोरण आणि त्याचे परिणाम**

२. शिक्षणाचा आशय व प्रक्रिया यांच्या पुर्नविचाराच्या बाबतीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात दर्शविलेले निकष पुढीलप्रमाणे आहेत.

१) जाती जमाती, स्थान वा लिंग यांचा विचार न करता सर्वांना तुलनेने गुणवत्तायुक्त शिक्षणासाठी प्रवेश.

२) विविध स्तरांकरिता अध्ययनाच्या किमान स्तराचे.(अध्ययन अध्यापन सुविधा) निकष ठरविणे आणि सुविधा उंबऱ्यापर्यंत पोचविणे की ज्या योगे मंदगतीने शिकणाऱ्यांनीही अध्ययन हा आनंदमय अनुभव होऊ शकेल.

३) राष्ट्रीय शिक्षण पद्धती आणि सामान्य महत्त्वाचा भाग असणारा राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा यांचा सांधा जोडणे.

४) अध्ययन अध्यापनामध्ये विकास होण्याच्या दृष्टीने परीक्षा सुधारणा आणि सतत चालणारी प्रक्रिया म्हणून शाळांमध्ये मूल्यमापनाची सुरूवात करणे.

५) सांस्कृतिक वैशिष्टये असलेल्या अभ्यासक्रमांचे विकसन आणि आदिवासी व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांकरिता त्यांचा समृद्ध सांस्कृतिक वारसा लक्षात घेऊन शैक्षणिक साहित्य तयार करणे.

६) शिक्षक प्रशिक्षण पद्धतीमध्ये संपूर्ण दुरूस्ती करणे आणि जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांसहित सर्व तांत्रिक आणि साधन-सुविधा संरचना अधिक सक्षम बनविणे.

७) शैक्षणिक प्रशासनाचे विकेंद्रीकरण करणे, शिक्षकांमध्ये व्यवसायाभिमुखता वाढविणे, संस्थाप्रमुखांना व्यापक भूमिका देऊन शैक्षणिक संस्थांमध्ये स्वायत्ततेची भावना निर्माण करणे.

८) साधने एकत्र जमविण्यासाठी व नवोपक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून अशासकीय आणि स्वयंसेवी प्रयत्नांना आणि लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन देणे.

९) शैक्षणिक कार्यक्रमांचा प्रसार, प्रशिक्षण साहित्याच्या संचाची निर्मिती आणि जाणीव जागृती यांच्यासाठी आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर करणे.

**साधनभूत कार्यक्रम**

२. अभ्यासक्रमाच्या विविध भागांचा विचार, सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण, आधार पद्धती, प्रेरणा व देखरेख यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग इ. गोष्टींचा समावेश साधनभूत कार्यक्रमांमध्ये होतो.

धोरणातून निष्पन्न होणारे साधनांच प्रकार आणि त्यांच्याशी संबंधित कार्यक्रम पुढीलप्रमाणे –

अ) आशय पुनर्विचार –

१) राष्ट्रीय गाभाभूत अभ्यासक्रम.

२) सुधारित कार्यानुभव कार्यक्रम.

३) राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा, पाठ्यक्रम आणि मार्गदर्शक संच.

ब) प्रक्रिया पुनर्विचार –

४) सेवान्तर्गत शिक्षकांचे पुनर्‌उद्‌बोधन

५) सेवान्तर्गत शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम.
अ) कार्यानुभव ब) कलाशिक्षण क) शारीरिक शिक्षण

६) परीक्षा – सुधारणा

अ) विशेष कार्यक्रमाद्वारे कार्यकर्ते व शिक्षक यांचे पुनर्‌उद्‌बोधन.

ब) शैक्षणिक चाचणी सेवेची स्थापना.

क) आशय आणि प्रक्रिया –

७) तांत्रिक आधार पद्धति बळकट करणे.

अ) सध्याच्या संस्थांची.

ब) सांधा जुळणी व परस्पर संबद्धता.

क) जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांची स्थापना.

ड) एकत्रीकरण आणि प्रेरणा

८) बळणवळणाविषयी तंत्रज्ञान. –

अ) पृथ्वीवरील, आकाशवाणी व दूरदर्शन.

ब) दृकश्राव्य फितींची सेवा.

क) मायक्रो कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक सूचनाफलक व टेलिटेक्स्ट (दूरसंहिता)

९) अपारंपारिक केंद्रांचे, स्वयंसेवी संस्थांचे, सामाजिक कार्यक्रमांचे जाळे निर्माण करणे.

इ) पूर्व तयारी आणि देखरेख.

१०) नियोजन, आर्थिक तरतूद, समन्वय व देखरेख

**कार्यपद्धती**

४. अ) पूर्वी सुचविल्याप्रमाणे आशयाचा पुनर्विचार एकाच वेळी तीन कार्यक्रमांची सुरूवात करून करावा लागेल. शैक्षणिक मार्गदर्शन सामुग्री तयार करण्यामागचा दृष्टिकोन हा राष्ट्रीय अभ्यासक्रमामध्ये शिफारस केलेली अध्यापन पद्धती, अध्ययन व मूल्यमापन या पद्धतीशी जोडलेला आहे. त्याचप्रमाणे व्यवस्थापन आणि देखरेख यांना जबाबदार असणाऱ्या अधिकारी वर्गाचे पुनरउद्बोधन करण्याची आणि तांत्रिक व न्याय्य मदतीची तरतूद करण्याची गरज आहे. म्हणून राष्ट्रीय अभ्यास-क्रमाची अंमलबजावणी करण्याची कार्यपद्धती पुढील गोष्टींशी जोडली आहे.

१. शिक्षक आणि शिक्षणाशी संबंधित इतर अधिकारी वर्गाचे पुनरउद्बोधन.

२. सर्व स्तरांवर व्यावसायिक क्षमतांचा विकास

३. टप्प्याटप्प्याने क्रमिक पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याची तयारी, निर्मिती व वाटप.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तांत्रिक आधार पद्धतीचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक होईल. तसेच योग्य लवचिकपणा ठेवून कार्यक्रमांचा प्रसार होण्यासाठी पद्धति प्रमाणित करावी लागेल. शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेल्या खालील मार्गदर्शक तत्त्वांची तयारी व प्रसार या प्रक्रियेला उपयुक्त ठरू शकेल.

१) अभ्यासक्रम मार्गदर्शक तत्त्वे.

२) शिक्षकांसाठी अध्यापन मार्गदर्शक हस्तपुस्तिका.

३) क्रमिक पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे मूल्यमापन करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी हस्तपुस्तिका.

४) क्रमिक पुस्तकांच्या लेखकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

५) क्रमिक पुस्तकांचा आराखडा व उदाहरणे तयार करणारांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

६) शैक्षणिक संच व दृकश्राव्य साहित्य तयार करणारांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

७) दृकश्राव्य कार्यक्रम निर्मात्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

८) प्राचार्य व मुख्याध्यापकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

९) शिक्षणाशी संबंधित प्रशासक व अधीक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे.

१०) शिक्षक, प्रशिक्षक व तज्ज्ञ व्यक्तींसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

११) विद्यार्थी प्रगतीचे मूल्यमापन करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

राष्ट्रीय कार्यक्रमाच्या आराखड्यावर आधारित क्रमिक पुस्तकांसह सुधारित शैक्षणिक साहित्याच्या संचाची तयारी, विकसन, निर्मिती, या सर्वांचे वेळापत्रक शेवटी तक्त्यात दिले आहे.

ब) शिक्षणाशी संबंधित अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्याची पद्धतशीर मार्गाने कार्यवाही करावयाची आहे. ही कार्यवाही बऱ्याच प्रमाणात शिक्षणपद्धतीमधील व सामाजिक स्तरावरील अनुकूल वातावरणाच्या निर्मितीवर अवलंबून आहे. कार्यानुभव कार्यक्रमांची गुणवत्ता वाढविण्याकरिता आदर्श शैक्षणिक संचांची निर्मिती आणि राष्ट्रीय अभ्यासक्रमावर आधारित अशा आदर्श साहित्याची तयारी यांच्या सहाय्याने असे वातावरण चालू वर्षापासूनच निर्माण केले जावे अशी अपेक्षा आहे.

क) योग्य प्रशासकीय उपाय, साधे व सोपे नियम आणि पद्धती यांच्यामार्फत शैक्षणिक कार्यक्रमांच्या कार्यवाहीकरिता सध्याची संघटनात्मक रचना अधिक कार्यक्षम बनविता येईल. शिवाय सध्या अस्तित्वात असणाऱ्या नवीन प्रकल्पांशी (शासकीय व अशासकीय संघटनांनी चालविलेले) नवीन कल्पनांचा हेतूपूर्वक सांधा न जुळवताही सध्याची पद्धती स्वतःच्या बळावर चालू शकेल. संपर्क माध्यमे आणि स्थानिक नवोपक्रम गट यांना एकत्रित करणे हाही धोरणाच्या अंमलबजावणीच्या प्रकियेत एक नवीन उपक्रम ठरू शकेल.

ड) साधनात्मक कार्यक्रमांची ( Interrention programmes ) परिणामकारकता ही बऱ्याच प्रमाणात ते कार्यक्रम अंमलबजावणीच्या स्तरावर, व्यावसायिक मार्गदर्शन करण्याकरिता जबाबदार असणाऱ्या समर्पित गटांकडून कसे आखले गेले आहेत, कोणत्या विशिष्ट कार्यक्रमांपुरते मर्यादित केले आहेत, कोणत्या क्रमाने लावले आहेत आणि कसे समन्वित केले आहेत यावर अवलंबून राहील. या कामाकरिता विविध स्तरांवर शोधून काढलेल्या विशेष कक्षांकडे (Cells) नियोजन व देखरेखीचे काम दिले पाहिजे.

इ) विशेष स्वरूपाची तांत्रिक मदत पुरविण्यासाठी राज्य, जिल्हा व स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात संस्था, शोधून काढायच्या असल्यामुळे जादा अधिकारीवर्ग आणि भांडवली साहित्य पुरविणे शक्य होणार नाही. प्रस्तावित कार्यक्रमांच्या संघटनेसाठी यांच्यापैकी बऱ्याच संस्था त्यांच्या स्वतःच्या भौतिक सुविधा आणि तज्ज्ञ व्यक्ती पुरवू

शकतील. शिवाय, त्यांच्यापैकी कांही संस्था लवकरच अतिशय परिणामकारक ठरतील आणि प्रदीर्घ कालापर्यंत साधन केंद्राची भूमिका पार पाडायला तयार होतील. अशा तऱ्हेची संभाव्य कार्यक्षम साधनकेंद्रे एकत्र आणण्यासाठी सर्व अल्पकालीन साधनीभूत कार्यक्रमात, दीर्घकालीन नियोजन अंतर्भूत करावे लागेल. त्यामुळे ठराविक कालात या नवीन पद्धतींना संस्थात्मक रूप देण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ शकेल.

**संस्थात्मक जबाबदाऱ्या**

५. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य शिक्षण संचालनालये, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदा/राज्य शिक्षणशास्त्र संस्था आणि शिक्षण मंडळे ही प्रदीर्घ कालापासून इतरांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमांची कार्यवाही करीत आहेत. त्यामुळे शिक्षणाचा आशय व प्रक्रिया यांच्या पुनर्विचाराच्या संपूर्ण कार्याचे नियोजन राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व संबंधीत राज्य संघटनांनी संयुक्तपणे करावे लागेल. राज्य सरकारांच्या सहकार्याने आणि मानवी साधनसामुग्री विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ऑक्टोबर १९८६ पर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची कार्यवाही या दस्तऐवजावर आधारित अशी एक सविस्तर राज्यनिहाय कार्ययोजना तयार करेल. एकूण आराखड्यास मूर्त स्वरूप देत असतानाच राज्य शासनांनी १९८६ मध्ये कार्यान्वित करण्यासाठी योजलेल्या प्रधान कार्यक्रमांच्या कार्यवाहीस सुरवात करावी.

कार्ययोजनेचा आरंभ पुढील प्रमाणे होईल. मार्गदर्शक पद्धतींना अंतिम स्वरूप देणे. त्यांचे प्रादेशिक भाषांतून भाषांतर करणे आणि त्याचा विस्तृत प्रमाणावर प्रसार करणे या कामात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व इतर राष्ट्रीय स्तरावरच्या संस्था राज्यस्तरावरील संस्थांना सक्रीय सहभागी करून घेतील.

अ) ज्या कार्यक्रमांना अंतिम स्वरूप देण्याचे काम शिल्लक आहे अशा कार्यक्रमांकरता लागणारे अनुदान व आवश्यक तो पैसा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महत्त्वाच्या राज्यातील संस्थांना

त्या कार्यक्रमांच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध करून देईल आणि त्याकरता त्या संस्थांना प्रत्यक्षपणे जबाबदार धरण्यात येईल.

ब) शैक्षणिक मार्गदर्शक साहित्याचे संच तयार करण्यासाठी आणि स्थानिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी किंवा तज्ज्ञ व्यक्ती आणि स्वीकार केंद्रे शोधून काढणे तसेच राज्यस्तरावरचे नियोजन, समन्वय आणि देखरेख करणारी केंद्रे स्थापन करणे या कामांची जबाबदारी राज्यस्तरीय संस्थांवर राहील.

क) प्रमुख तज्ज्ञ व्यक्तींचे उद्बोधन आणि व्यापक माध्यमासाठी (Mass Media) कार्यक्रम तयार करणे आणि त्यांच्याशी संबंधित सर्व कार्यक्रमांचा समन्वय साधणे या कामांची जबाबदारी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर राहील.

ड) निधीच्या संरक्षणासाठी व्यापक आराखड्याचा धोरणात्मक भाग म्हणून साधनीभूत कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी शिक्षणक्षेत्रातील स्थानिक, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय अधिकाऱ्यांना योग्य ती साधनभूत मदत करण्यासाठी कार्यक्षम व्यावसायिक व हौशी संस्था, स्थानिक उद्योगशील गट आणि विकसनशील संस्था यांचा शोध घेण्याचे काम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद हाती घेईल.

इ) कार्यक्रमांवर देखरेख करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्याबाबत अहवाल देणे तसेच सातत्याने सुधारणात्मक उपायांचा शोध घेणे या कामाकरता राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि कांही प्रमुख राज्यातील संस्था संयुक्तपणे जबाबदार राहतील.

फ) सुधारित पाठ्यपुस्तकांचे संच आणि विविध प्रकारची साधने साधन केंद्रांना आणि शाळांना पुरविण्याची गरज असल्यामुळे, अशा साहित्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्याच्या व त्यांचे वाटप करण्याच्या कामाचे नियोजन करावे लागेल. त्यासाठी सध्या कार्यान्वित असलेल्या रचनेच्या निर्मितीक्षमतांची पाहणी, केंद्र आणि राज्य सरकारच्या शिक्षण विभागांना करावी लागेल. तांत्रिक दर्जा उचावणे, मालाच्या आणि सेवेच्या किंमतीबाबत संरक्षण देणे आणि गुणवत्तेचे प्रमाणीकरण करणे

या गोष्टींवर भर देऊन सार्वजनिक, खाजगी आणि स्वयंसेवी किंवा ना नफा तत्त्वावर काम करणारे विभाग यांच्यासाठी कामाचे योग्य विभाग निश्चित करण्यात येतील.

**तातडीने करावयाचे कामे**

६. जरी सविस्तर संयुक्तिक उद्दिष्टे आणि अभ्यासक्रमातील बदलाबाबतची मार्गदर्शक तत्त्वे यांची तरतूद राष्ट्रीय अभ्यासक्रमांचा आराखडा आणि सर्वसाधारण महत्त्वाचा भाग (common core) यात केलेली असली तरी नवीन शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात त्यांची अंमलबजावणी व योग्य अध्यापन होण्यासाठी अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन यासंबंधीचे निष्कर्ष शक्य तितक्या कमी वेळात ठरवून देणे ही कामे राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि शिक्षणाशी संबंधित इतर अधिकाऱ्यांना करावी लागणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून जो अभ्यासक्रमाचा मार्गदर्शक मसुदा, आदर्श अभ्यासक्रम आणि जे आदर्श साहित्य तयार केले जात आहे त्याचा उपयोग शिक्षण विभागाने नेमलेल्या आणि शिफारस केलेल्या पाठ्यपुस्तकांचा आढावा घेण्यास होऊ शकेल.

चालू शैक्षणिक वर्षातच अभ्यासक्रमात बदल करण्याची प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने खालील दहा महत्त्वाच्या अभ्यासक्रमाच्या विभागांवर आदर्श पाठ्यक्रम आणि नमुनेदार शैक्षणिक संच तयार करण्याची जबाबदारी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर सोपविण्यात आलीआहे.

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.

२) घटनात्मक कर्तव्ये.

३) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक असणारा आशय.

४) भारताचा सर्वसामान्य सांस्कृतिक वारसा.

५) समानतावाद, लोकशाही आणि धर्मातीतवाद.

६) लिंगसमानता

७) परिसराचे संरक्षण.

८) सामाजिक अडथळयांचा निरास.

९) लहान कुटुंबाच्या निकषांचे पालन.

१०) विज्ञानवृत्तीची जोपासना.

या संचाच्या बरोबरच कार्यानुभवाच्या अभ्यासक्रमातील आदर्श कार्यक्रम म्हणून शाळांना आयोजित करता येतील अशा २० उपक्रमांवर नमुनेदार संच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद तयार करील.

महत्त्वाचा अभ्यासक्रम आणि नमुनेदार कार्यानुभव उपक्रम काही निवडक शाळांतून त्यांच्या संबंधित विषयांच्या तासाच्या वेळी फारशी काही अडचण न येता १९८६ पासूनच सुरू करता येईल. ह्या संचांमधून केवळ अभ्यासक्रमातील आशयच असेल असे नाही तर अध्यापनाच्या न सुचविलेल्या पद्धतीही असतील.

**राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखडयावर आधारित पाठयपुस्तकांसह सुधारित शैक्षणिक साहित्याच्या संचांचा विकास, निर्मिती आणि कार्यवाही**

| उपक्रम | कालावधी |
| --- | --- |
| १) पाठयक्रम तयार करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे. | जुलै–ऑगस्ट १९८६ |
| २) १ ते १२ इयत्तांसाठी रा. शै. सं. व प्रशिक्षण परिषदेतर्फे पाठयक्रमाचा विकास. | ऑगस्ट–ऑक्टोबर ८६ |
| ३) रा. शै. सं. व प्रशिक्षण परिषदेतर्फे पाठयपुस्तकासहित शैक्षणिक संचांचा विकास. | ऑक्टोबर ८६–मार्च ८७ |
| १. ३, ६ वर्गासाठी | |

| उपक्रम | कालावधी |
|---|---|
| ४) राज्ये व केंद्रशासित प्रदेशातर्फे पाठ्य-पुस्तकांसहित शैक्षणिक संचांचा विकास. १, ३, ६ वी | ऑक्टोबर ८६–मार्च ८८ |
| ५) सुधारित शैक्षणिक संचांची वर्ग १, ३, ६ मध्ये सुरूवात. | जुलै ८७ व जुलै ८८ |
| ६) रा. शै. सं. व प्रशिक्षण परिषदेतर्फे पाठ्य-पुस्तकांसहित शैक्षणिक संचांचा विकास. २, ४, ७, ९ आणि ११ वर्गासाठी. | एप्रिल ८७–मार्च ८८ |
| ७) राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतर्फे पाठ्य-पुस्तकांसहित शैक्षणिक संचांचा विकास. २, ४, ७, ९ आणि ११ वर्गासाठी | एप्रिल ८७ – मार्च ८९ |
| ८) सुधारित शैक्षणिक संचांची २, ४, ७, ९, ११ वर्गासाठी सुरूवात. | जुलै ८८ व जुलै ८९ |
| ९) रा. शै. सं. व प्र. परिषदेतर्फे पाठ्य-पुस्तकांसहित शैक्षणिक संचाचा वर्ग ५, ८, १० आणि १२ साठी विकास. | एप्रिल ८८ – मार्च ८९ |
| १०) राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतर्फे पाठ्य-पुस्तकांसहित शैक्षणिक संचांचा वर्ग ५, ८, १० आणि १२ साठी विकास. | एप्रिल ८८ – मार्च ९० |
| ११) सुधारित शैक्षणिक संचांची ५, ८, १०, १२ वर्गासाठी सुरूवात. | जुलै ८९ व जुलै ९० |

□ □ □

प्रकरण १८ वे

# मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा सुधार

१. परीक्षा पद्धतीतील सुधारणा हा बराच काळ फार गंभीर चर्चेचा विषय बनला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (N.C.E.R.T.) आणि विद्यापीठ अनुदान मंडळ (U.G.C.) यांच्या पुढाकाराने अनुक्रमे शाळांमधील आणि विद्यापीठातील परीक्षां-मध्ये अल्पशा बदलास प्रारंभ झाला आहे. तथापि, सर्वसाधरणपणे या बदलांचा फारसा परिणाम झालेला दिसून येत नाही.

**धोरण आणि त्याच्या कार्यवाहीची पद्धती**

२. अध्ययन वा अध्यापन प्रक्रियांच्या केलेल्या कामाच्या संदर्भात एकत्रितपणे तपासणी व्हावी आणि मूल्यमापन प्रक्रियेचा उपयोग शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व्हावा अशी अपेक्षा परिच्छेद ८.२३ मध्ये दाखविली आहे. विद्यार्थ्यांच्या कामाचे यथार्थ व विश्वासार्ह मूल्यमापन व्हावे, म्हणून मूल्यमापन पद्धतीमध्ये खालील अल्प मुदतीचे काही उपाय सुचविले आहेत.–

**अ) शालेय स्तरावर**

१. सार्वजनिक परीक्षा पूर्वीप्रमाणे इ. १० वी व इ. १२ वीच्या स्तरावर घेण्याचे चालू राहील.

२) परीक्षा पद्धती अधिक परिणामकारक व्हावी म्हणून परीक्षा-पद्धतीचे विकेंद्रीकरण केले जाईल.

३) काही राज्यांमध्ये (माध्यमिक) शिक्षण मंडळांनी परीक्षा पद्धतीच्या विकेंद्रीकरणासाठी उपकेन्द्रे स्थापन केली आहेत. इतर राज्यांनी त्यांचे अनुकरण करावे म्हणून प्रयत्न करण्यात येतील.

४) विकेंद्रीकरणार्थ वर उल्लेखिलेल्या शिक्षण मंडळांच्या संदर्भात शिक्षण मंडळाने प्रश्नपत्रिका तयार करून घेणे, त्या मुद्रित करणे व परीक्षांच्या निकालांचे एकत्रिकरण करणे हें काम चालू ठेवावे व त्याचबरोबर उपकेन्द्रांच्या स्थापनेबरोबरच नमुना पद्धतीने परीक्षेचे पूर्वमूल्यांकन करण्याचे काम हाती घ्यावे.

५) उत्तरपत्रिकांचे त्या त्या ठिकाणीच मूल्यमापन व्हावे.

**ब) विद्यापीठ स्तरावर**

१) पदव्युत्तर स्तरावर संस्थेतच सतत मूल्यमापन होईल अशी पद्धती अंमलात आणली जाईल. यांची सुरवात युनिटरी विद्यापीठ व विद्यापीठाचा दर्जा असलेली विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांपासून केली जाईल.

२) विद्यार्थ्यांची प्रगति अक्षरश्रेणी पद्धतीने दाखविली जाईल आणि सर्वसाधारण प्रगतिचा अहवाल संकलित अक्षर श्रेण्यांवर अवलंबून असेल.

३) विद्यार्थ्यांचा कोणत्याही प्रकारचा तोटा होऊ न देता विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अधिक प्रगति व्हावी म्हणून त्यानंतर त्यास पुन्हा परीक्षेस बसण्यासाठी वेगळी तरतूद केली जाईल.

४) ज्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या अधिक आहे ती विद्यापीठे पूर्वीप्रमाणे बहि:स्थ परीक्षापद्धती चालूच ठेवतील आणि शालेय पातळीवर पूर्वी दर्शविल्याप्रमाणे परीक्षा पद्धतीचे विकेंद्रीकरण केले जाईल. म्हणून प्रयत्न करण्यात येतील.

५) विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यातील प्रवेश पात्रतेबाबतच्या नियमांची अशा पद्धतीने तपासणी करण्यात येईल की, ज्यामुळे शालेय पातळीवरील परीक्षांमध्ये बदलांना गती मिळावी.

**क) परीक्षांचे संचलन**

१) परीक्षेत वापरल्या जाणाऱ्या अनिष्ट प्रकारांच्या व्याख्या करून असे गुन्हे दखलपात्र व जातमुचकाऱ्यावर सुटण्याची शक्यता नसलेला कायदा करण्याबाबत विचार करण्यात येईल.

२) या कायद्याचा जेव्हा वापर सुरू केला जाईल तेव्हा त्यावर या कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांसंबंधी केल्या जाणाऱ्या शिक्षेचे स्वरूप व प्रकार ठरविण्यात येतील, तसेच त्याच्या आवाक्यात परीक्षा-प्रक्रियेतील संबंधित व्यक्तींना संरक्षण देण्याची तरतूद केली जाईल.

३) परीक्षा केन्द्रावर नक्कल (कॉपी) करणे अशक्य व्हावे म्हणून प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रम वेगवेगळा छापून त्या प्रश्नपत्रिका विशिष्ट क्रमाने वाटणे हा होय. अशा प्रकारचे प्रयोग आणि नाविन्य-पूर्ण गोष्टी परीक्षा पद्धतीत अंतर्भूत केल्या जातील.

४) अध्ययन आणि अध्यापनाच्या मूल्यमापनाची एकात्म कार्य-पद्धती साध्य करण्यासाठी दूरगामी सुधारणा होणे आवश्यक आहे. याकरिता खालील कार्यक्रमांचा विचार करता येईल.

### अ) शालेय स्तरावर

१) शिक्षण मडळ ५ वी, ८ वी, १० वी आणि १२ वी या वर्गांसाठी संपादन पातळ्या ठरवून देईल.

२) संपादन पातळ्यांच्या या संदर्भात ज्ञान, आकलन, परस्पर संवाद, उपयोजनात्मक कौशल्ये आणि शिकण्याची क्षमता यांच्याशी संबंधित असलेली शैक्षणिक उद्दिष्टे शिक्षण मडळ ठरवून देईल.

३) औपचारिक परीक्षा पद्धतींमधून शिक्षणाचे दृष्टिकोन (उद्दिष्टये) तपासता येतील आणि अशा प्रकारच्या पद्धतींमधून जी उद्दिष्टे (दृष्टिकोन) तपासता येणार नाहीत त्यांकरताही मूल्यमापन पद्धतीत योजना केल्या जातील. क्षमता आणि कौशल्ये ज्यांचे मूल्यमापन संस्थेमार्फत केले जाऊ शकते, त्यांचा शोध घेऊन त्यांच्या मूल्यमापनाची पद्धति ठरविली जाईल.

४) मूल्यमापन पद्धतीचा विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेस व्यावसायिक आधार मिळावा म्हणून शिक्षण मंडळाने संशोधन व विकास या प्रक्रियेस चालना मिळावी म्हणून इतर संस्थांच्या सहाय्याने एकत्रित तात्पुरत्या स्वरूपाची मंडळे स्थापन करावीत.

५) ही कामगिरी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात निर्माण केलेले मंडळ (Consortium) काही निवडक शाळा प्रयोग केंद्रे म्हणून निवडील. तेथे परीक्षा घेऊन त्या शाळांतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करील.

६) प्रत्येक घटकासाठी किती भारांक असेल, तसेच अध्ययन अध्यापनाची उद्दिष्टचे, प्रश्नप्रकार यांचा सविस्तर तपशील असलेला आराखडा प्रश्नपत्रिका काढण्यापूर्वी तयार केला जाईल.

७) बहिःस्थ परीक्षेबरोबरच संस्थेमार्फत केल्या जाणाऱ्या शालेय व शालेयेतर ज्ञानसंपादन पैलूंच्या मूल्यमापनाच्या पद्धतीचा समावेश केला जाईल.

८) विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन संकलित श्रेणी पद्धतीने केले जाईल.

९) मोठ्या राज्यात एकापेक्षा अधिक शिक्षणमंडळांची स्थापना करण्याचा विचार केला जाईल. त्यामुळे एका शिक्षण मंडळाच्या परीक्षार्थींची संख्या एक लाखापेक्षा अधिक असणार नाही.

१०) जनमानसात शिक्षण मंडळांची विश्वसनीयता वाढावी म्हणून शिक्षण मंडळाचा अध्यक्ष, सचिव तसेच परीक्षा नियंत्रकांच्या नेमणुकीच्या पद्धती विकसित केल्या जातील.

**ब) विद्यापीठ स्तरावर**

१) विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांसाठी बहिःस्थ परीक्षांऐवजी एक पर्यायी परीक्षापद्धती विकसित करण्याची शक्यता शोधावी लागेल.

२) जी विद्यापीठे अनेक महाविद्यालयांसाठी फक्त परीक्षा घेतात त्यांची कार्यपद्धती तपासली जाईल.

३) निरनिराळया अभ्यासक्रमांच्या संयुक्तीकरणातील लवचिकता घटक रचना, मापन पद्धती, श्रेणीच्या संकलनाची तरतूद, अभ्यासक्रमाची पुनर्पदनामनिश्चिती, इत्यादि गोष्टी या धोरणाने शैक्षणिक सुधारणे मध्ये अपेक्षिल्या आहेत आणि त्यांयोगे परीक्षापद्धतीच्या विकेंद्रीकरणात

विचारात घेण्याइतपत बदल होईल. आशय व आराखडा यांमध्ये बदल होत असतानाच स्थित्यंतराच्या अनुषगाने मूल्यमापन पद्धती ठरविण्यासाठी सविस्तर योजना तयार केल्या जातील.

४) मूल्यमापन पद्धतीमध्ये सातत्याने संशोधन व्हावे व विकास व्हावा म्हणून एक यंत्रणा स्थापन केली जाईल ही "AIN" चा भाग असेल अथवा स्वतंत्र असेल.

**संकीर्ण**

१. परीक्षकाची सचोटी आणि विश्वासार्हता ही परीक्षापद्धतीमध्ये महत्त्वाची मानली जाते. ही विश्वासार्हता परीक्षेच्या मोकळेपणातून प्रस्थापित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तरपत्रिकांची छाननी करून केलेल्या मूल्यमापनाची इतरांच्या उत्तरपत्रिकेशी तुलना करणे हा काढून घेता न येणारा असा हक्क असला तरी त्यास मान्यता द्यावीच लागेल.

२. सध्या परीक्षांचा निकाल जाहीर करताना त्यामध्ये सर्व विषयांच्या गुणांची बेरीज करून त्यानुसार श्रेणी देऊन (विद्यार्थ्यांना) उत्तीर्ण/अनुत्तीर्ण ठरविले जाते. या पद्धतीची पाहणी करून तिच्याऐवजी परीक्षांचा निकाल जाहीर करताना विषयवार गुण/श्रेणी देण्याच्या पद्धतिचा अवलंब करावा.

३. पुन्हा परीक्षेस बसून विद्यार्थ्यांना त्यांच्या मिळालेल्या श्रेणीत प्रगति करण्याची संधी असावी.

४. परीक्षेस असलेल्या एकूण विषयांपैकी टप्प्याटप्प्याने काही विषय सोडण्याची तरतूद असावी.

५. श्रेणी ठरवत असताना सध्या निरनिराळ्या विषयांसंबंधी असलेली गुणदान पद्धति विचारात घ्यावी.

६. प्राश्निकांच्या करिता अतिदक्ष असा प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेतला जाईल.

७. प्राश्निकांना मदत व्हावी यासाठी प्रश्नपेढ्या तयार करण्यात येतील.

८. गुणदानात वस्तुनिष्ठता येण्यासाठी, उत्तरे तपासण्याकरिता सविस्तर गुणदान पद्धति विकसित केली जाईल.

९. 'पुस्तकांसह परीक्षा' अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण कल्पना, 'नैदानिक मूल्यमापन' अशा प्रकारचे प्रयोग केले जातील.

१०. बहि:स्थ परीक्षा आणि संस्थेने घेतलेल्या परीक्षा, यासाठी स्वतंत्र प्रमाणपत्रे दिली जातील.

११ संस्थांनी केलेल्या मूल्यमापनामध्ये शालेय विषयातील तसेच शाळेबाहेर उपक्रमातील प्रगतीचा अंतर्भाव असेल.

१२. जे शिकवतात त्यांनीच आपल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करावे या दिशेने वाटचाल करण्याचे प्रयत्न केले जातील.

१३. अध्ययन पद्धतीबरोबरच मूल्यमापनाची सांगड घातल्यामुळे अध्ययन अध्यापनातील कमतरता आणि विद्यार्थ्यांना आकलन न झालेल्या भागाचे निदान करण्यास मदत होईल. हा नैदानिक दृष्टिकोन (कमकुवत घटकांसाठी) उपायात्मक कार्यक्रम योजण्यासाठी उपयुक्त ठरेल.

१४. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचे संकलित माहितीपत्र ठेवून त्याच्या मूल्यमापनासंबंधीच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातील.

## ब) राष्ट्रीय चाचणी सेवा

'राष्ट्रीय-चाचणी-सेवा' प्रस्थापित करून तिचा विकास असा केला जावा की, ज्यायोगे गुणवत्तेचे निकष ठरविणारी यंत्रणा निर्माण होईल. त्या यंत्रणेमार्फत सर्व देशभर ऐच्छिक चाचण्यांद्वारा या सेवेस सुव्यवस्थित रूप देता येईल. शिवाय त्यातून गुणवत्तेची तुलना करणे तसेच स्वतंत्रपणे चाचण्या देणे आणि मानके तयार करणे शक्य होईल.

□ □

प्रकरण १९ वे

# युवक आणि क्रीडा

**सद्य:स्थिती**

१. निरनिराळी राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेशांमध्ये शालेय अभ्यासक्रमात आरोग्य, योग आणि शारीरिक शिक्षण यांसंबंधी सध्या काय परिस्थिती आहे, याची माहिती उपलब्ध नाही. तथापि सध्यातरी वरच्या वर्गात बढती देण्यासाठी इतर शालेय विषयांप्रमाणे खेळ व शारीरिक शिक्षण या विषयामध्ये पुरेसा सहभाग व समाधानकारक प्रगति असणे, ह्या बाबी विचारात घेतल्या जात नाहीत.

२. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण स्तरावर राष्ट्रीय अभ्यासक्रमांचा आराखडा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी डिसेंबर १९८५ मध्ये तयार केला. शालेय शिक्षणात शरीरिक शिक्षण व आरोग्य शिक्षणास खालील प्रमाणे वेळ देण्यास सुचविले आहे.

अ) कनिष्ठ प्राथमिक स्तर (वर्ग १ ते ५) १० टक्के
ब) वरिष्ठ प्राथमिक स्तर (वर्ग ६ ते ८) १० टक्के
क) माध्यमिक स्तर (वर्ग ९ ते १०) ८ टक्के

उच्च माध्यमिक स्तरावर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने अभ्यासाची जी योजना सुचविलेली आहे ती इतकी लवचिक आहे कीं विद्यार्थी शारीरिक शिक्षण बगळून त्यांचे विषय निवडू शकतात.

३. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन ब प्रशिक्षण परिषदेने अखिल भारतीय पातळीवर ३० सप्टेंबर १९८७ मध्ये केलेल्या शैक्षणिक सर्वेक्षणानुसार प्राथमिक स्तरावर क्रीडांगणे व खेळाच्या साहित्याची उपलब्धता यासंबंधीची विश्वासार्ह माहिती ही संदर्भ माहिती म्हणून घेतली आहे. त्यासंबंधीची खालीलप्रमाणे माहिती आढळून आलेली आहे.

अ) क्रीडांगणांची उपलब्धता

| | |
|---|---|
| कनिष्ठ प्राथमिक स्तर | ४६.५४% |
| वरिष्ठ प्राथमिक स्तर | ६६.०९% |
| उच्च आणि उच्च माध्यमिक शाळा | ८३.४१% |

ब) क्रीडा आणि खेळाचे साहित्य

| | |
|---|---|
| कनिष्ठ प्राथमिक शाळा | १५.४२% |
| वरिष्ठ प्राथमिक शाळा | ६४.९१% |
| उच्च आणि उच्च माध्यमिक शाळा | ९२.८९% |

४. १० राज्यातील फक्त २९ विद्यापीठांत उच्च शिक्षणाच्या स्तरावर शारीरिक शिक्षणाची पदवी, पदव्युत्तर आणि पदविका / प्रमाणपत्र पातळीवर शिक्षणाची संधी उपलब्ध आहे उच्च स्तरावरील शिक्षणामध्ये क्रीडा व खेळ यांसाठी लागणाऱ्या सुविधांची सांख्यिकीय माहिती उपलब्ध नाही. तथापि असे निःसंकोचपणे म्हणता येईल की, विद्यापीठे व महाविद्यालये यांतून खेळ व क्रीडा ही दुर्लक्षित क्षेत्रे आहेत.

५. राष्ट्रीय आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रांत तसेच खेळ आणि क्रीडा यांच्या विभागात आणि विशेषत: शिक्षण संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेत सुमारे ७ लाख विद्यार्थी यापूर्वीच समाविष्ट झालेले आहेत. समाजसेवा, हा या युवकाचा मुख्य कार्यक्रम आहे. याशिवाय उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणात राष्ट्रीय छात्रसेनामध्ये १० लाख विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी उच्च शिक्षण स्तरावर ४ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे थोड्या प्रमाणात का होईना नवपदवीधारकाना राष्ट्रातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी संधी उपलब्ध करून दिली जाते. तथापि सध्या चालू असलेल्या योजनांमध्ये उच्च शिक्षण घेत असलेल्या ३० लक्ष विद्यार्थ्यांचा कोणत्याही स्वरूपात सहभाग नाही.

६. ५४० केंद्रीय विद्यालयांपैकी ३६६ विद्यालयांतून योगाचे शिक्षण दिले जाते. हा स्वतंत्र विषय म्हणून शैक्षणिक वर्ष १९८१–८२

पासून प्रायोगिक स्वरूपात शिकविला जातो. ही विद्यालये देशभर पसरलेली आहेत. दिल्ली प्रशासनाच्या शाळांमधून देखील योग हा विषय शिकविला जातो. या बाबतीत घटक राज्याबद्दलची माहिती उपलब्ध नाही.

**२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महत्वाची क्षेत्रे निश्चित करणे**

७. या संदर्भात दोन महत्वाची क्षेत्रे डोळयासमोर येतात उदा.,

१) अध्ययन प्रक्रियेमध्ये खेळ आणि शारीरिक शिक्षण हा आवश्यक असा भाग असावा आणि त्यातील प्रगतीचे मूल्यमापन केले जावे.

२) उच्च शिक्षणाच्या पातळीवर विशेषतः शिक्षण संस्थांमधून युवकांचा राष्ट्रीय व सामाजिक विकासामध्ये क्रीडा आणि खेळ यांमध्ये सहभाग असावा.

**३) कार्यक्रम**

८. स्थूल कार्यक्रमात कोणत्या गोष्टींची अंमलबजावणी करावयाची त्या खालीलप्रमाणे.

**पाठ्यक्रम**

३.१ (१) कनिष्ठ प्राथमिक स्तरावरील मुलांचे वय लक्षात घेता ती शाळेत असताना मोठ्या प्रमाणावर शारीरिक हालचालींचा समावेश असणे जरूर आहे. त्यासाठी खेळांच्या साहित्याची आवश्यकता लागणार नाही. ह्या स्तरावर शारीरिक शिक्षण व खेळ हे फक्त हालचाली व त्यात सहभाग अशा स्वरूपाचे असावे. त्यात पाठ्यपुस्तके व वाचन साहित्य यांचा समावेश नसावा. कमीत कमी एका आठवड्यात १० तासिका शारीरिक शिक्षण व खेळ यांसाठी दिल्या जाव्यात.

२) वरिष्ठ प्राथमिक स्तरावर खेळ आणि क्रीडा यांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा व त्यादृष्टीने हे शारीरिक शिक्षण व खेळ हे शिक्षणाचे मुख्य अंग असावे, तथापि थोड्या प्रमाणात पाठ्यपुस्तके व वाचन साहित्य यांचा समावेश त्यात करता येईल. या स्तरावर दररोज कमीत कमी एक तासिका शारीरिक शिक्षण व खेळ यांना दिलेली असावी.

३) माध्यमिक स्तरावर पुन्हा दररोज एक तासिका शारीरिक शिक्षण व खेळ याना दिली जावी.

४) उच्च माध्यमिक स्तरावर खेळ व क्रीडा या क्षेत्रात राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या मर्यादित स्वरूपाच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध असतात. तरीसुद्धा ज्या विद्यार्थ्यांना वरील प्रकारात सहभागी होता येत नाही त्यांच्यासाठी शारीरिक शिक्षणाशी ज्यांचा संबंध आहे अशी संघटित साहसाची कामे सक्तीची करण्यात यावीत. उदा:– बालवीर व वीरबाला, खेळाव्यतिरिक्त साहसाची कामे.

५) उच्च शिक्षणाच्या पातळीवरील कमीत कमी प्रथम पदवी-पर्यंत अभ्यासक्रमात खेळ व क्रीडा यामध्ये सहभाग सक्तीचा असावा. उदा. खेळव क्रीडा, शारीरिक शिक्षण, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, बालवीर व वीरबाला आणि इतर योग्य अशा कृती.

६) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी, राज्य शासनाने स्थापन केलेल्या संबंधित संस्था व लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय आणि नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्था यांच्या मदतीने शाळांतील विविध टप्पे व उच्च शिक्षण यांना उपयुक्त होईल असा शारीरिक शिक्षणाचा योग व क्रीडा यांसह नमुनेदार अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करावा. शारीरिक शिक्षण, खेळ आणि योग यांचा समावेश असलेली पाठ्यपुस्तके राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे ने तयार करावीत.

७) शिक्षणाच्या निरनिराळ्या टप्प्यांवर प्रगतीचे मूल्यमापन करताना शारीरिक शिक्षण व क्रीडा यांचा समावेश असावा.

**मूल्यमापन**

अ) शालेय शिक्षणाच्या पातळीवर शारीरिक शिक्षण व खेळ यांमधील सहभाग व प्रगति यांचे मूल्यमापन सातत्याने श्रेणीच्या स्वरूपात करावे. तथापि शारीरिक शिक्षण व क्रीडा यामध्ये मिळालेली श्रेणी ही

इतर विषयांत विद्यार्थ्याला मिळालेल्या गुण व श्रेणीशीं सममूल्य असावी. विद्यार्थी पास किंवा नापास हे ठरविताना शारीरिक शिक्षणातील श्रेणीही विचारात घेतली जाईल, असे स्पष्ट नमूद केले जावे.

ब) वरच्या वर्गात बढती देताना लागणारी पात्रता किंवा पदवी प्रदान करताना शारीरिक शिक्षण, खेळ तसेच एन. एस. एस. व नेमलेले तत्सम कार्यक्रम यामध्ये नियमित सहभागी होणे, ही पदवीपूर्व अभ्यासक्रमात आवश्यक बाब असावी. शारीरिक शिक्षणामध्ये नियमित सहभागासाठी लागणारी उपस्थिती किती टक्के असावी हे नमूद केलेले असावे.

क) ज्या विद्यार्थ्यांनी क्रीडा व खेळ यांमध्ये विशेष नैपुण्य दाखविले आहे व ज्यांना खेळ व क्रीडा यांमधील स्पर्धा व प्रशिक्षण वर्गात दाखल झाल्यामुळे परीक्षेस बसता येणे शक्य होणार नाही अशा विद्यार्थ्यांची परीक्षा नंतर घेण्यासाठी प्रयत्न केले जातील.

**मूलभूत आराखडा**

८) शालेय स्तरावर व उच्च शिक्षणात वर उल्लेख केलेल्या ज्या कृतींचा अभ्यासक्रमात समावेश केलेला व ज्या मूल्यमापनाचा अविभाज्य भाग झालेल्या आहेत त्या अंमलात आणणे शक्य व्हावे यासाठी अशा संस्थांतून व शाळांतून एक मूलभूत आराखडा तयार करणे व असलेल्या आराखड्यात भर घालणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील उपाययोजना केली जावी.

अ) शारीरिक शिक्षण व खेळ या क्षेत्रांत प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता अजमावण्यासाठी तातडीचे सर्वेक्षण मध्यवर्ती किंवा राज्य सरकारांनी हाती घ्यावे. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण संस्थांमध्य शारीरिक शिक्षण विषयक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी कोणती यंत्रणा उपलब्ध आहे याचा शोध घ्यावा.

ब) मध्यवर्ती व राज्य पातळीवरील संस्थांनी, या सर्वेक्षणाच्या निष्कर्षावर आधारित आवश्यक यंत्रणा उभारण्यासाठी योजना आखाव्यात. हे काम शक्यतो आठव्या पंचवार्षिक योजनेअखेर व्हावे.

क) सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये विद्यापीठे व् महाविद्यालयांसाठी क्रीडा व खेळ यांच्या उत्तेजनार्थ राष्ट्रीय क्रीडा संघटनेखाली जो पैसा पुरविण्यात आलेला आहे त्याचा पुरेपूर विनियोग होईल याची खात्री करून घ्यावी. आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये शारीरिक शिक्षणाची आवश्यक ती मूलभूत यंत्रणा उभी करण्यासाठी प्रत्यक्ष किती पैसा लागेल याचा शोध घेण्याच्या दृष्टीने विद्यापीठ अनुदान मंडळाने पुढील एका वर्षात तपशीलवार सर्वेक्षण करून घ्यावे.

ड) कनिष्ठ प्राथमिक शाळांसाठी कमीत कमी एक एकर व वरिष्ठ प्राथमिक शाळांसाठी २.५ एकर जमीन क्रीडांगणे म्हणून खेडयांतील स्थानिक संस्थांनी उपलब्ध करून द्यावी. ग्रामीण विकासाच्या योजना स्थानिक जनतेला जमिनीचा विकास क्रीडांगण म्हणून करण्यास उत्तेजन द्यावे.

इ) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना योग्य त्या प्रमाणात क्रीडांगण असावे ही गोष्ट संबंधित मध्यवर्ती किंवा राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य नियम म्हणून मान्यता देताना बंधनकारक अट समजावी. तथापि ज्या ठिकाणी अपरिहार्य कारणामुळे जमीन उपलब्ध होऊ शकत नाही तेथे काही पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. उदा:– दोन किंवा अनेक शाळांनी एकाच क्रीडांगणाचा उपयोग करणे किंवा सार्वजनिक जमीन असल्यास तिचा उपयोग करण्याची परवानगी घेणे इ.

फ) चौथ्या अखिल भारतीय शैक्षणिक सर्वेक्षणातून मिळालेली माहिती व ८३-८४ या वर्षातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या पाहता ज्यांना क्रीडांगण मुळीच उपलब्ध नाही अशा माध्यमिक व वरिष्ठ माध्यमिक शाळांची संख्या सुमारे १०,००० आहे. त्यांना प्राधान्याने क्रीडांगणे पुरविण्याची व्यवस्था व्हावी.

ग) १९८४ चे राष्ट्रीय क्रीडाविषयक धोरण व सन १९८६ चे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांच्या संदर्भात उपलब्ध असलेली मैदाने, क्रीडांगणे यांचे ग्रामीण व नागरी विभागात संरक्षण व आरक्षण करून ती उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक ते कायदे मध्यवर्ती व राज्य

सरकारांनी करावेत आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण यांचे कार्यक्रम पार पडतील असे पहावे.

ह) शहर, गाव आणि स्थानिक विकासाचे आराखडे तयार करताना चार ते पाच एकर जमीन सर्वसामान्य क्रीडांगणासाठी राखून ठेवावी.

य) पुरेसे क्रीडाक्षेत्र उपलब्ध नसल्यास कोणतेही सर्वसाधारण किंवा तांत्रिक महाविद्यालय उघडण्यास नियमानुसार परवानगी देऊ नये.

९) ज्या शाळांमध्ये क्रीडांगण अथवा इतर सुविधा उपलब्ध नाहीत अशा संस्थांनी खेळ व शारीरिक शिक्षणाचा असा पाठ्यक्रम तयार करावा की, मूल्यमापनाच्या दृष्टीने ज्यांच्याकडे सुविधा आहेत अशा संस्थांकडून साधनसामुग्री व सहकार्य घेऊन त्याचा समतोल साधता येईल.

१०) खेळ आणि क्रीडेसाठी जी साधन सामुग्री लागते ती बाजाराचे भाव पहाता फार महाग असते. कच्च्या अंदाजपत्रकाप्रमाणे वेगवेगळ्या स्तरांवरील संस्थांना वार्षिक खर्चासाठी रक्कम पुरविली जाईल.

| | |
|---|---|
| कनिष्ठ प्राथमिक शाळा | रु. १,०००/– |
| वरिष्ठ प्राथमिक शाळा | रु. ५,०००/– |
| माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा | रु. १५,०००/– |
| महाविद्यालये | रु. २५,०००/– |
| विद्यापीठे | रु. १००,०००/– |

वरील रक्कमेच्या दुप्पट रक्कम अनावर्ती रक्कम म्हणून संबधित संस्थांना देण्यात यावी.

११) अध्ययन प्रक्रियेमध्ये शारीरिक शिक्षण व खेळ यांचे संमीलन करण्यासाठी निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांमधील शारीरिक शिक्षण शिक्षकांचे उद्‌बोधन करण्याची सोय असणे आवश्यक आहे. वरिष्ठ

माध्यमिक शाळांत आणि काही वरिष्ठ प्राथमिक शाळांत या शारीरिक शिक्षणाचे शिक्षक सेवेत आहेत. तथापि कनिष्ठ प्राथमिक शाळांत विषयाचे शिक्षक उपलब्ध नाहीत. ही पोकळी भरून काढावी.

**शिक्षक**

अ) अध्यापक महाविद्यालये आणि अध्यापक विद्यालयांच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाचा समावेश करावा.

ब) सन १९८७ च्या उन्हाळी सुट्टीमध्ये प्रत्येक प्राथमिक शाळेतील किमान एका शिक्षकाला शारीरिक शिक्षणाचे उद्बोधन व्हावे. सुरुवातीस जवळच्या माध्यमिक शाळांतील शारीरिक शिक्षक शिक्षण तज्ज्ञ म्हणून काम पाहतील. जवळ जवळ ६ लाख शिक्षकांचे उद्बोधन करावे लागेल. हे काम प्रतिवर्षी २ लाख शिक्षकांचे उद्बोधन करून साध्य होईल. अशा प्रकारे सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस प्रत्येक कनिष्ठ व वरिष्ठ प्राथमिक शाळेत किमान एक शिक्षक तरी शारीरिक शिक्षण या विषयाचे उध्बोधन झालेला असेल.

१२. माध्यमिक व वरिष्ठ माध्यमिक शाळांत शारीरिक शिक्षणाचे शिक्षक उपलब्ध असल्याने त्यांना खेळ व क्रीडा यांमध्ये विशेष उद्बोधन देता येईल. अशा शाळा ६० हजार असून त्यामध्ये १ लाख असे शिक्षक उपलब्ध आहेत. १९८७ सालातील उन्हाळी सुट्ट्यांमध्ये त्यांचे उद्बोधन करणे सुरू केल्यास ८ व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सर्व शिक्षकांचे उद्बोधन पूर्ण होईल.

१३. उच्च शिक्षणाच्या पातळीवर लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्था व संबंधित महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने शारीरिक शिक्षण संचालकांचा प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेता येईल. या संस्थांनी त्यांच्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून प्रशिक्षण कार्यक्रमाचा खर्च करावा.

**युवक**

१४. १५ ते ३५ वयोगटातील युवक भारताच्या लोकसंख्येच्या ३० टक्के आहेत आणि ते राष्ट्राची चैतन्य व जोषपूर्ण मानवी संपत्ती

आहे. राष्ट्राच्या कारभारात आणि विशेषत: विकासात सहभागी होणे हा त्यांचा हक्क आणि कर्तव्य आहे. युवकांना त्यांच्या विकासाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या कार्यात्मक क्षमता वरच्या पातळीवर नेणे, त्यांना अर्थोत्पादक बनविणे आणि पर्यायाने सामाजिकदृष्टचा उपयुक्त करणे ही एक मोठी गरज आहे, हे सर्वमान्य आहे. केंद्र व राज्य शासनांनी अशा संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

१५. राष्ट्रीय सेवायोजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग सातव्या योजनेच्या सुरूवातीस ६ लाखापर्यंत असून तो सातव्या योजनेच्या शेवटी १० लाखांपर्यंत वाढत जाईल. आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थी संख्या १६ लाख होण्याच्या उद्दिष्टाकरिता संख्या वाढीचा दर प्रतिवर्षी १० टक्के असणे आवश्यक आहे.

१६. ग्रामीण विकास कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेमार्फत शिक्षित युवकांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये या कार्यक्रमाला बळकटी आणणे आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक बनू इच्छिणाऱ्या तरूणांसाठी प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला जाईल आणि त्यांना युवक संघटना आणि तत्सम संघटना यामध्ये काम करण्याची संधी दिली जाईल.

**योग**

१७. उच्च माध्यमिक स्तरापर्यंत योगाचे शिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल.

१८. शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये योगाचा अंतर्भाव केला जावा. याशिवाय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी देशातील योग शिक्षण देणाऱ्या विविध संस्थांकडे हे काम सोपवावे. योग शिक्षणाचे स्वरूप पाहता ही प्रक्रिया सावकाश चालेल आणि त्यासाठी कालमर्यादा निश्चित घालता येणार नाही.

**सामान्य**

१९. काही राज्यांनी क्रीडा विषयातील प्रज्ञावान् व कुशल विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहयुक्त क्रीडा शाळा स्थापन केलेल्या आहेत. तसेच

क्रीडा वसतीगृहे चालू करण्याची केंद्रीय योजना आहे. या कार्यक्रमाला उत्तेजन देणे आवश्यक आहे व त्यासाठी राज्य व केंद्र यांनी अंदाजपत्रकीय तरतूद करणे आवश्यक आहे.

२०. विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वीकारलेला, शारीरिक शिक्षणाचा आरोग्य, शिक्षण व क्रीडा या विषयांनी युक्त असा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम प्रत्येक विद्यापीठाने प्रत्येक जिल्ह्यातील एका अध्यापक महाविद्यालयात चालू करावा. ही त्यांच्या समितीने केलेली शिफारस मान्य केलेली आहे. अशी महाविद्यालये जिथे क्रीडा व खेळ यांना सक्रीय प्रोत्साहन दिले जाते तिथे चालू करावीत. विद्यापीठ अनुदान आयोगाने सातवी पंचवार्षिक योजना व तदनंतरच्या काळातील अशा महाविद्यालयांची संख्या निश्चित करावी.

२१. शालेय विषयांप्रमाणेच शारीरिक शिक्षणाला तेच महत्त्व तत्त्वत: मान्य केलेले आहे. त्याचप्रमाणे शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकालाही इतर विषयांच्या शिक्षकाप्रमाणे महत्त्व दिले जावे. उच्च शिक्षण पातळीवर शारीरिक शिक्षण हा काही संस्थांत निवडक विषय असावा.

२२. उपरोक्त कार्यक्रमांच्या प्रभावी कार्यवाहीसाठी राज्यांमध्ये प्रशासकीय एकसंघता असणे आवश्यक आहे. शिक्षण संचालनालयात खेळ व क्रीडा यासाठी सहसंचालक या दर्जाचा अधिकारी केवळ शारीरिक शिक्षणासाठी असणे आवश्यक आहे.

**लक्ष्य आणि टप्पे**

९. १) जवळ जवळ ८०% माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना क्रीडांगणे उपलब्ध असल्याने व त्यापैकी ९२% मध्ये खेळाची साधने उपलब्ध असल्याने शारीरिक शिक्षण आणि खेळ यांचे अध्ययन प्रक्रियेतील एकात्मीकरण व मूल्यमापन यांची सुरूवात या स्तराकरिता नमुना अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार होताच सुरू करता येईल. सन १९८७–८८ च्या शैक्षणिक वर्षापासून याची सुरवात करता येईल.

२) प्रत्येक शाळेतील किमान एका शिक्षकाचे शारीरिक शिक्षणात उद्बोधन पूर्ण झाल्यावर कनिष्ठ व वरिष्ठ प्राथमिक शाळांत एकात्मीकरण व मूल्यमापन होऊ शकेल. ह्या प्रक्रियेस आधीच

सांगितल्याप्रमाणे अंदाजे तीन वर्षांचा कालावधी लागेल आणि त्याचे एकात्मीकरण व मूल्यमापन हे आठव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षी करणे शक्य होईल.

३) खेळ आणि क्रीडा, समाजसेवा, छात्रसेवा, बालवीर, वीरबाला आणि तत्सम कार्यक्रम यामध्ये सहभाग प्रथम पदवी परीक्षेत आवश्यक करता येईल. यासाठी विविध क्रियांचा उपयोग करून या कार्यक्रमाचे मूल्यमापन एकात्मीकरण १९८८ च्या पासून करणे शक्य होईल. यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने विशेष लक्ष दिले पाहिजे.

४) राज्यांना आपल्या अंदाजपत्रकात यासाठी सोय करावी लागणार असल्याने सर्व संस्थांमध्ये खेळाची साधने व ती वरच्या पातळी-वर नेणे यासाठी काही कालावधी लागेल. आठव्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमाखाली सर्व कनिष्ठ व वरिष्ठ प्राथमिक शाळा तत्त्वत: आलेल्या असतील. क्रीडांगणाची सोय उपलब्ध नसलेल्या शाळांना सातव्या पंचवार्षिक योजनेत २५% लाभ मिळालेला असेल. तरतूद उपलब्ध झाल्यास सातव्या पंचवार्षिक योजनेअखेर ५०% माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना क्रीडांगणे मिळू शकतील व उरलेल्या ५०% शाळांना आठव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी मिळू शकतील.

## संनियंत्रण व मूल्यमापन

१०. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शारीरिक शिक्षण, क्रीडा व समाजसेवा ही अध्ययन प्रक्रियेची अविभाज्य अंगे आहेत. म्हणून राज्यातील सर्वसामान्य शिक्षणाचे संनियंत्रण करणाऱ्या संस्थानी शालेय व उच्च शिक्षण पातळीवरही यांचे संनियंत्रण करावे.

□ □

प्रकरण २० वे

# भाषा विकास

## धोरण

१९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भाषाविषयक जे धोरण ठाशीवपणे सांगितले होते. त्याचाच पुनरुच्चार १९८६ मधील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आलेला आहे. त्या धोरणानुसार विद्यापीठात शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रांतिक भाषांचा वापर करण्यात यावा या मुद्यांवर भर देण्यात आलेला आहे. त्रिभाषासूत्र कार्यान्वित करण्यासाठी जोरदार प्रयत्न विविध शैक्षणिक स्तरांवर विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांमध्ये सुधारणा, इंग्रजी भाषेचा अभ्यास करण्यासाठी आणि इतर परदेशी भाषा शिकण्यासाठी सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. भाषांना सांधणारा दुवा म्हणून हिंदीचा विकास घटनेच्या ३५१ व्या कलमात केलेल्या तरतुदीप्रमाणे विद्यापीठ स्तरावर संस्कृत शिकविणे, ज्याप्रमाणे एखाद्या निश्चित अभ्यासक्रमातील काही भाग जसे भारतीय तत्वज्ञान, भारतीय इतिहास, पुराणवस्तु संशोधन, शास्त्र इ. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत पुस्तकांचे काळजीपूर्वक भाषांतर करणे आणि दोन भाषांतील आणि अनेक भाषांतील शब्दकोश तयार करणे यांचाही विचार करण्यात आलेला आहे.

## विद्यापीठ स्तरावर शिक्षणाचे माध्यम

### सद्य:स्थिती

आधुनिक भारतीय भाषांना शिक्षणाचे माध्यम म्हणून विद्यापीठ स्तरावर स्वीकारण्याचे धोरणावर जोर देण्यात आला आहे. शालेय स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याची गरज, जी आधुनिक भारतीय भाषेपेक्षा वेगळी आहे, ८ व्या परिशिष्टांत समाविष्ट करण्यात आली.

अल्पसंख्यांकांच्या भाषेसंबंधी, त्यांच्या मातृभाषेतून पहिली ५ वर्षे शिक्षण देण्याची तरतूद भारतीय घटनेमध्ये केलेली आहे (कलम ३५०अ) त्यासाठी अनेक अडचणी आल्या तरी प्रयत्नपूर्वक काम करण्यास आपण बांधले गेले आहोत. त्यासाठी शासकीय आणि आर्थिक सुविधांची तरतूद केली पाहिजे. त्यांतून निरनिराळ्या मातृभाषातून शैक्षणिक सोयी उपलब्ध होऊ शकतील. काही आदिवासी भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरण्यास अडचण असली तरी त्या अडचणीवरही मात केली पाहिजे. घटनेच्या ८ व्या परिशिष्टात अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्यात यावे. तसेच विविध अडचणी लक्षात घेता अशी शिफारस करण्यात आली की, माध्यमिक स्तरावर अल्पसंख्यांकाना मातृभाषेतून शिक्षण देण्यात यावे. आधुनिक भारतीय भाषा आणि इंग्रजीचा माध्यम म्हणून वापर करण्यात यावा.

३ शालेय स्तरावर आधुनिक भारतीय भाषेचा उपयोग अगोदरच शिक्षणाचे माध्यम म्हणून करण्यात आलेला आहे. त्यांचा विद्यापीठ स्तरावर विकास करण्यासाठी माध्यम म्हणून स्वीकारण्याची गरज आहे. हे सोपे करण्यासाठी राज्यांच्या प्रतिनिधींकडून, तसेच काही विद्यापीठांनी भारतीय शासनाच्या मदतीने विद्यापीठ स्तरांवरील सात हजार पाठ्य-पुस्तकांची निर्मिती केली ह्या पुस्तकांची उपलब्धता समाधानकारक नाही. परिणामी विकल्या न गलेल्या पुस्तकांचा साठा राज्यांमध्ये पडून राहिला त्याची मुख्य कारणे—

अ) आधुनिक भारतीय भाषेकडे वळण्याचा विद्यापीठांचा निर्णय आणि या पुस्तकांची तयारी व उत्पादन यांबाबत मेळ नव्हता.

ब) विद्यापीठीय शिक्षकांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाल्याने भारतीय भाषांतून शिकविणे त्यांना अवघड जाते.

क) शालेय स्तरांप्रमाणे पाठ्यपुस्तकांना मजुरी देण्याची पद्धति अतिशय काटेकोर नसल्याने खाजगी प्रकाशकांनी प्रकाशित केलेली पुस्तके सर्वसाधारण मान्य केली जातात.

ड) भारतीय भाषा माध्यमातील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांत लोक-प्रिय झाला नाही. कारण व्यवसायातील क्षमता कमी पडते आणि व्यवसायांची उणीव भासते.

४. सर्व विषय व सर्व स्तरावर आधुनिक भारतीय भाषांचा अध्यापनाचे माध्यम म्हणून क्रमाक्रमाने अवलंब करणे याबाबत राज्य शासनाने विद्यापीठाशी विचार विनिमय करून घेतलेला विशिष्ट निर्णय ही प्राथमिक गरज असेल.

५. विद्यापीठ स्तरावर पाठ्यपुस्तकांच्या अनुभवांचे, कार्यक्रमांचे, निर्मितीचे दोष दाखविणारे परीक्षण करणे जरूरीचे आहे. अशा स्वरूपाच्या परीक्षण समितीची रचना करण्याचा निर्णय आधीच घेण्यात आला आहे. समितीचा अभ्यास आणि शिफारसी यांचा उपयोग कार्यक्रमाची अंमल–बजावणी अधिक चांगल्या व व्यवहार्य पद्धतीने करण्यासाठी होऊ शकेल. परीक्षण लवकर पूर्ण करण्यात यावे असे ठरविण्यात आले आहे.

**निश्चित–कृति**

६. मुख्य कृतींमध्ये खालील मुद्दे समाविष्ट करण्यात येतील.

अ) पाठ्यपुस्तकांची तयारी आणि उत्पादन/आजपर्यंत हाती घेतलेल्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर आधुनिक भारतीय भाषेमध्ये संदर्भ ग्रंथ तयार करणे.

ब) विद्यापीठातील शिक्षकांसाठी उद्बोधन.

क) पाठ्यपुस्तके व संदर्भ ग्रंथ यांचे इंग्रजीमधून भारतीय भाषांत भाषांतर.

ड) नियमित परीक्षणाला आणि प्रयत्नाला योग्य दिशा देणे.

**साधनांची भूमिका**

७. राज्य सरकारांना विद्यापीठाशी आणि विद्यापीठ अनुदान मंडळाशी विचार विनिमय करून आधुनिक भारतीय भाषांचा अध्यापनाचे माध्यम म्हणून कसा अवलंब करावयाचा हे निश्चित करावे लागेल. अधिक प्रभावी संस्थांच्या सहाय्याने योग्य, करण्याजोग्या आणि कालमर्यादित कार्यक्रमांची रूपरेषा ठरवावी लागेल. भारत सरकारच्या सहाय्याने विद्यापीठ स्तरीय पुस्तके प्रांतिक भाषांमध्ये तयार करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्य स्तरावरील प्रातिनिधिक संस्थांकडून त्याला गती देण्यात येईल. त्याचवेळी तशा तयार केलेल्या पुस्तकांचा वापर शिक्षण पद्धतीमध्ये कसा केला जावा हे निश्चित केले जाईल.

८. राज्य सरकारे केंद्रीय शासनास चक्रीय पद्धतीचा निधी निर्माण करण्यासाठी १.३ कोटी रुपयांपेक्षा जास्त सहाय्य देण्यासंबंधी विनंती करत आहे. सहभागी होणाऱ्या काही राज्यांच्या बाबतीत संपूर्ण रक्कम देण्यात आलेली नाही. ज्या राज्यांनी अद्याप मंजूर शिलकी रकमेचा उपयोग केलेला नाही अशा राज्यांना सदरहू रक्कम देण्यापेक्षा ज्या राज्यानी मंजूर रकमेचा उपयोग केलेला आहे अशा राज्यांना अधिक मदत देण्याच्या गरजेचा विचार व्हावा.

**अर्थ विषयक**

९. केंद्रीय पातळीवर शास्त्रीय आणि तांत्रिक परिभाषेसाठी नेमलेल्या मंडळाने कार्यक्रमाची व्यवस्थित मांडणीची गरज वाढवून जास्त परिणामकारक कार्यक्रम आणि शिक्षकांसाठी वेगवेगळया पातळीवर उद्‌बोधन वर्ग, विद्यापीठ अनुदान मंडळात एक छोटा कक्ष सुरू करून प्रांतिक भाषांचा शिक्षणाचे माध्यम म्हणून अवलंब करणाऱ्यांसाठी आर्थिक तरतूद केली पाहिजे. प्रत्येक विद्यापीठात एक कक्ष प्रांतिक भाषेकडे वळवण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे.

**त्रिभाषा सूत्रांचा अवलंब**

१०. त्रिभाषा सूत्रामध्ये आधुनिक भारतीय भाषा, दक्षिणेकडील एक भाषा (हिंदी भाषिक सोडून) आणि इंग्रजी भाषा ह्या भाषा शिकविल्या पाहिजेत. हिंदी भाषिक राज्यामध्ये हिंदीबरोबर एक प्रांतिक भाषा आणि जिथे हिंदी भाषा बोलली जात नाही तेथे इंग्रजी शिकविली गेली पाहिजे.

**सद्यःपरिस्थिती**

११ कार्यान्वित केलेली त्रिभाषा सूत्री असमाधानकारक आहे. प्रमुख त्रुटींचा समावेश खालीलप्रमाणे आहे.

अ) माध्यमिक स्तरावर सर्व भाषा शिकविणे अनिवार्य केलेले नाही.

ब) काही राज्यात प्राचीन भाषा आधुनिक भारतीय भाषेऐवजी शिकविली जाते.

क) हिंदी भाषिक राज्यात दक्षिण भारतीय भाषा शिकविण्याची काहीच सोय केलेली दिसत नाही.

ड) अनिवार्य तीन भाषा शिकविण्याचा कालावधी वेगवेगळा आहे.

इ) प्रत्येक भाषेच्या संदर्भात विद्यार्थ्यांनी त्या भाषेवर प्रभुत्व मिळविण्याची पातळी किती असावी हे स्पष्ट केले गेले नाही.

**प्राथमिक गरज**

१२. त्रिभाषा सूत्री परिणामकारक रीतीने अंमलात आणण्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत.

अ) राज्याच्या माध्यमिक शिक्षण स्तरावर तीन भाषा अनिवार्य करण्याबाबतचा निर्णय

ब) तीन भाषा केव्हापासून व केवढ्या कालावधीसाठी वर्गांना शिकवाव्यात याची माहिती.

क) निरनिराळ्या भाषा शिकविण्याची निश्चित उद्दिष्टे.

ड) प्रत्येक भाषेतील निरनिराळ्या स्तरांवर प्राप्त करावयांच्या प्राविण्याबाबतचा तपशील.

**निश्चित कृती**

१३. कृतीस लागणाऱ्या बाबींचा समावेश खालीलप्रमाणे आहे.

१) केंद्र सरकार अहिंदी भाषिक राज्यांना हिंदी शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी सहाय्य करणे चालू ठेवेल.

२) १९७८–७९ पर्यंत जे साहाय्य चालू होते ते साहाय्य १०० टक्के करण्याबाबत विचार करण्यात येईल.

३) हिंदी शिक्षकांची अहिंदी भाषा राज्यात नेमणूक करण्याच्या योजनेचा नमुना तयार केला जाईल.

हिंदी भाषी राज्यांना १०० टक्के सहाय्य, आधुनिक भारतीय भाषेच्या शिक्षकांची नेमणूक त्रिभाषा सूत्रीत सुचविल्याप्रमाणे दक्षिण भारतीय भाषा शिक्षकांना अग्रक्रम दिला जाईल.

४) राज्यातील हिंदीच्या, तसेच आधुनिक भारतीय भाषेच्या शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षण संस्था निर्माण करणे यांव्यतिरिक्त भाषेच्या शिक्षकासाठी प्रशिक्षणाची सोय करण्याची गरज जास्त आहे, आणि सध्याच्या शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात सुधारणा करणे जरूर आहे.

५) मंत्रिमंडळाच्या भाषा संस्थांमध्ये वाढ करणे. भाषा शिकवण्याचा कार्यक्रम हाती घेण्यासाठी मुख्यत: भाषा शिकवण्याच्या पद्धती मध्ये संशोधन आणि संगणकाचा वापर आणि नवीन दळणवळणाचे तंत्र प्रयोग म्हणून करणे.

१४. शाळा, विद्यार्थी, माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रम यांच्यावर भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांच्या नेमणुकीचा आकडा अवलंबून असेल. राज्यमंडळ/राज्याने तीन भाषा शिकणे अनिवार्य करण्याच्या निर्णयावर लागणाऱ्या शिक्षकांची संख्या आणि त्यांना देण्यात येणारा पगार यांचा विचार करून राज्याच्या अंदाजपत्रकात तरतूद करणे. बहुतांश भाषा शिक्षणासाठी बरेच कार्यक्रम आवश्यक आहेत. त्यांची पूर्तता केली जाईल. सामान्यपणे राज्यांच्या तरतुदीनुसार उपलब्ध असलेल्या सुविधांचा उपयोग करून घेतला जाईलच शिवाय हे काम अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने भारत सरकार काही आर्थिक मदत देईल.

१५. हिंदी भाषिक राज्यांना मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची नेमणूक करणे सोपे जाईल. आधुनिक भारतीय भाषा शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी हिंदी भाषिक राज्यांना सहाय्य करण्याचा प्रस्ताव सातव्या योजनेत मांडला आहे.

१६. कार्यक्रम राबविण्यासाठी व आर्थिक बाबतीत राज्य सरकार आणि माध्यमिक शिक्षण मंडळ प्रामुख्याने जबाबदार असतील. तीन भाषांच्या अनिवार्य अभ्यासाला मंजुरी देण्यासाठी त्यांना निर्णय घ्यावयाचा आहे. परीक्षेच्या योजनेला मंजुरी आणि स्पर्धात्मक स्तरांचे निरनिराळ्या भाषांमध्ये मूल्यमापन पूर्ण करणे आवश्यक आहे.

**अर्थविषयक**

१७. केंद्रीय हिंदी संस्था आग्रा, भारतीय भाषांसाठी केंद्रीय संस्था म्हैसूर, केंद्रीय इंग्रजी संस्था आणि परदेशी भाषा संस्था, हैद्राबाद आणि शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, कार्यक्रमासाठी अर्थविषयक कक्ष उभारतील. राज्य मंडळ आणि शैक्षणिक संस्थांना शालेय तांत्रिक सहाय्य देण्यासाठी या संस्था जबाबदार असताल.

**विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतेत वाढ**

**सद्य:स्थिती**

१८. विद्यार्थ्यांचे भाषा वापरण्याचे प्रभुत्व गेल्या काही वर्षात खालावलेले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी निरनिराळे शैक्षणिक स्तर पूर्ण केले, ते विद्यार्थी भाषेच्या वापरात कमी कुशल आहेत. पुढील अभ्यासासाठी विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांमध्ये सुधारणा करणे महत्त्वाचे आहे.

**प्राथमिक गरज**

१९. बाकीच्या गोष्टींबरोबर इतर काही बाबींची आवश्यकता भासते.

अ) भाषिक प्रभुत्व मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची जबाबदारी घेणे.

ब) विशेषकरून शालेय स्तरावर जेथे तीन भाषा शिकविणे अनिवार्य आहे तेथे निरनिराळ्या भाषा शिकविण्याची उद्दिष्ट सांगणे.

क) काही उद्दिष्टांच्यां पूर्ततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना काही भाषा-कौशल्ये प्राप्त होणे आवश्यक आहे.

२०. केंद्रीय हिंदी संस्था, राष्ट्रीय अनुसंधान व प्रशिक्षण परिषद, भारतीय मध्यवर्ती भाषा संस्था, मध्यवर्ती इंग्रजी आणि परदेशी भाषा संस्था, विभागीय इंग्रजी संस्था बंगलोर आणि एच एम. पटेल इंग्रजी संस्था, वल्लभ विद्यानगर इत्यादी संस्थांना विनंती करण्यात आली की,

१) विद्यार्थ्यांच्या सहकार्याने भाषेचा अभ्यास व्यवस्थित करून त्यांच्या भाषिक संपादनाचा आढावा एकत्र करणे.

२) विविध भाषांच्या उद्दिष्टांनुसार व उद्देशांनुसार काही अभ्यासक्रम हाती घेणे.

३) विद्यार्थ्यांचा इंग्रजीचा वापर, विद्यार्थ्यांच्या प्रभुत्वाबाबत राष्ट्रीय अनुसंधान व प्रशिक्षण परिषद, विभागीय इंग्रजी संस्था बंगलोर, केंद्रीय इंग्रजी आणि परदेशी भाषा संस्था, हैद्राबाद आणि एच. एम. पटेल इंग्रजी संस्था वल्लभ विद्यानगर यांनी वेळोवेळी केलेले परीक्षण, विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयक पातळी व १२ वी चा अभ्यासक्रम पूर्ण करत असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षण इत्यादींचा अभ्यास करणे. मध्यवर्ती भाषा संस्था, केंद्रीय हिंदी संस्था आणि दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा यांनी ब्रिटीश आकाशवाणी केंद्राच्या मदतीने सूक्ष्म संगणक शैक्षणिक साधन म्हणून प्रायोगिक तत्वावर भाषा शिकण्यासाठी वापरले आहे. केंद्रीय इंग्रजी भाषा आणि परदेशी भाषा या संस्थेने इंग्रजी भाषेचे संशोधन आणि प्रशिक्षण सुरू केले आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने इंग्रजी भाषा अधिक चांगली होण्याच्या दृष्टीने काही विद्यापीठांना खास अनुदान दिले आहे. विद्यापीठामध्ये उन्हाळी वर्ग त्याचप्रमाणे शिक्षक प्रशिक्षकांसाठी सुद्धा असे इंग्रजीचे वर्ग घेण्यात आले आहेत.

**निश्चित कार्यवाही**

२१. या कार्यक्रमांतर्गत वरील कार्यक्रमांशिवाय अशाच प्रकारचे काही विशेष कार्यक्रम हाती घेऊन कार्यवाही केली जाईल.

अ) विशेष भाषिक कौशल्य मिळविण्यासाठी क्रमिक साहित्याचा विकास करणे.

ब) सेवापूर्व व सेवांतर्गत भाषा विषयाच्या अध्यापन पद्धतीबाबत प्रशिक्षण देणे.

क) प्रभावी अध्ययन व अध्यापन पद्धतीवर संशोधन करणे. संगणक आणि इतर ज्ञान प्रसाराच्या साधनांच्या उपयोगावर विशेष भर देणे

ड) शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी आणि संगणक प्रधान अध्यापन व नवीन ज्ञान प्रसाराच्या तंत्राच्या वापरासाठी भाषा विषयक आणि इतर प्रशिक्षण संस्थांच्या रचनात्मक सोयींचा वापर करणे.

इ) शाळा आणि विद्यापीठे यातील विद्यार्थ्यांसाठी विशेष/जोडणारा/उपचारात्मक अभ्यासक्रम तयार करणे.

२२. काही कार्यक्रम प्रभावी करण्याच्या दृष्टीने ७ व्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात यापूर्वीच समाविष्ट केलेले आहेत. योजनांतर्गत इंग्रजीचे सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी आणि क्रमिक अध्यापन साहित्य तयार करण्यासाठी राज्यांना आणि राज्य पातळीवरील संस्थांना सहाय्य दिले जाईल. या योजनेचा विकास यापूर्वीच झालेला आहे. राज्य शासनाला इंग्रजी भाषा अध्यापनासाठी जिल्हा केन्द्रासाठी आर्थिक सहाय्य दिले जाईल. कारण कार्यक्रम वाढविण्याच्या दृष्टीने या संस्थांना तरतूद करणे आवश्यक होईल.

**भूमिका**

२३. शैक्षणिक आणि तांत्रिक सामुग्री क्रमिक साहित्याच्या मूळ नमुन्याच्या स्वरूपात मंत्रालयाची भाषा संस्था आणि राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद यांना पुरवेल. शिक्षकांच्या सेवा ंगत प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे, महत्त्वाच्या कर्मचारी वृंदाला प्रशिक्षण, संगणकासाठी साधनसामग्री, आकाशवाणी आणि दूरदर्शन या माफत प्रसारणाची व्यवस्था इत्यादि बाबीही त्यात अंतर्भूत असतील.

या योजनेची कार्यवाही मोठ्या प्रमाणावर करण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त संस्थांना समाविष्ट करण्याची जवाबदारी राज्यसरकार आणि राज्य शिक्षण मंडळ, माध्यमिक शिक्षण मंडळ आणि विद्यापीठे यांच्यावर राहील. उदा. एकदा भाषा शिक्षणाची उद्दिष्टचे आणि भाषा कौशल्यांचा खुलासेवार तपशील निश्चित केल्यानंतर त्यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता वाटत असेल तर अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके आणि परीक्षा पद्धत यांचा एकत्रित विचार करून योग्य तो बदल केला जाईल. विद्यापीठांसंबंधी विद्यापीठ अनुदान मडळ आणि विद्यापीठे वरील सर्व कार्यक्रमाची जवाबदारी घेतील.

**अर्थविषयक**

२४. केन्द्रीय हिंदी संस्था, तसेच केन्द्रीय इंग्रजी भाषा व परदेशी भाषा संस्था, इंग्रजीसाठी आणि आधुनिक भारतीय भाषेसाठी इतर संस्था

यांना संशोधनाचे व प्रशिक्षण देण्यासाठी लागणारे साहित्य पुरविण्याची जबाबदारी या संस्थांची राहील. विद्यापीठ अनुदान मंडळ विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मदत करेल. योजना राबविण्यासाठी आर्थिक बाबींची ह्या संस्था पूर्तता करतील.

पुस्तकांचे भाषांतर आणि द्विभाषी आणि बहुभाषी शब्दकोश तयार करणे.

**सद्य:स्थिती**

२५. शासकीय आणि अशासकीय संस्थांनी आणि नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अॅकेडमी, राज्यातील प्रबोधिनी, खाजगी प्रशासक यांनी योग्य पुस्तकांचे भाषांतर आणि उत्पादन याबाबतचे काम हाती घेतले आहे. तरीसुद्धा विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतरीत पुस्तकांची उपलब्धता असमाधानकारक आहे. चांगल्या भाषांतरकारांची उणीव असल्यामुळे भाषांतराचा दर्जा कमी होत आहे असे मत व्यक्त केले जाते.

२६. शब्दकोशांच्या बाबतीत केंद्रीय हिंदी संचालनालयांनी यापूर्वीच १९ शब्दकोश तयार केले आहेत. आणखी ४१ शद्बकोशांची हस्तलिखिते छपाईसाठी निरनिराळ्या स्तरांवर तयार आहेत. कमिशनने शास्त्रीय आणि तांत्रिक परिभाषेसाठी जे कमिशन नेमले त्यांनी २३ शब्दकोश शास्त्र आणि समाजशास्त्र विषयक शाखांचे तयार केलेले आहेत. उर्दू भाषा प्रोत्साहन मंडळाने उर्दू विषयाला प्रोत्साहन देण्यासाठी ७ शद्बकोश टीपेसह प्रकाशित केले आहेत. तसेच ८ शब्दकोश तयार करण्याचे काम चालू आहे. राज्यस्तरीय प्रतिनिधींनी अशाच तऱ्हेचे काम हाती घेतले आहे. केंद्रीय सरकारही संस्कृत शद्बकोश तयार करण्याच्या कामी मदत करत आहे. शासकीय प्रतिनिधींकडून प्रभावी काम होऊ शकत नाही. खाजगी प्रकाशकांना द्विभाषीक शद्बकोश तयार करावे लागत आहेत.

२७. चालू असलेल्या प्रयत्नांची माहिती अपुरी असल्यामुळे पुढील बाबींचे सर्वेक्षण करण्याची गरज आहे. अ) सध्या करण्यात येणारे शासकीय आणि अशासकीय प्रयत्न. ब) उचित भाषांतर करण्याची प्रतिनिधींची क्षमता. क) भाषांतरकारांना प्रशिक्षण देण्याची सोय.

२८. भाषांतराबाबत जी परिस्थिती आहे तीच परिस्थिती शब्दकोशांबद्दल आहे. शब्दकोशांबाबत केलेले संपूर्ण प्रयत्न व त्यांची गुणवत्ता यासंबंधी माहिती उपलब्ध नाही. उपलब्ध शब्दकोशांचे दर्जेदार अहवाल, त्यांची गुणवत्ता आणि शब्दकोश तयार करण्याच्या सोयी यांच्या माहितीची निरनिराळ्या स्तरांवर आवश्यकता आहे. केंद्रीय हिंदी संचालनालय आणि केंद्रीय भाषा संस्था राज्य प्रतिनिधींच्या सहकार्याने हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी पार पाडतील.

२९. अभ्यास चालू असताना भाषांतर करणे, आणि प्रत्येक भाषेत प्रकाशन करणे तसेच त्यांचे प्रत्येक भाषेत आणि इतर भारतीय भाषांत भाषांतर नॅशनल बुक ट्रस्ट आणि साहित्य ॲकेडमी यांच्या मदतीने करता येईल. या पुस्तकांची ओळख साहित्य ॲकेडमी आणि राज्याच्या प्रबोधिकांच्या सहकार्याने होईल.

३०. भाषांतराचे प्रयत्न उच्चस्तरीय, पद्धतशीर, गुणात्मक आणि योग्य शब्दार्थ टीपांसह असतील. भाषांतर करण्याच्या विविध कार्यक्रमांचे समन्वय करण्याची व भाषांतरकारांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. वरील काम अधिक प्रभावी होण्यासाठी केंद्रीय भाषांतर मंडळ सहाय्य करू शकतील. भाषांतर मंडळापेक्षा या मंडळाचे काम वेगळे असेल. हे मंडळ मंत्रालयातील गृहखात्यातील कार्यालयीन भाषेचा विभाग यांचे देखरेखीखाली काम करत आहे.

**अर्थविषयक**

३१. केंद्रीय हिंदी संचालनालय, उर्दू उन्नतीसाठी मंडळ, वैज्ञानिक व तांत्रिक परिभाषांसाठी कमिशन, केंद्रीय भारतीय भाषांची संस्था, आणि केंद्रीय भाषांतर मंडळ इत्यादि संस्था केंद्रीय स्तरांवर असाव्यात असे सुचविले आहे. द्विभाषिक आणि बहुभाषिक शब्दकोश तयार करण्यासाठी सहाय्य करण्याची जबाबदारी त्यांचेवर राहील.

**भाषेतील दुवा म्हणून हिंदी भाषा सुधारणा**

**सद्य:स्थिती**

३२. शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणात हिंदीचा भाषा दुवा म्हणून वाढ करण्यासाठी जोर देण्यात आला आहे. सध्या केंद्रीय हिंदी

संस्था, केंद्रीय हिंदी संचालनालय आणि शास्त्रीय आणि तांत्रिक परिभाषा तयार करणारे कमिशन, यांनी अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत.

**पूर्वतयारी**

३३. भाषेचा दुवा म्हणून हिंदी वापरण्याची गरज आहे याबाबत सर्व राज्यांचे मतैक्य आहे. त्रिभाषा सूत्री तयार करण्याची गरज असल्यामुळे लोकांनी हिंदीचा वापर कुशलतेने करणे आवश्यक आहे.

**निश्चित कृति**

३४. निरनिराळया कार्यक्रमांच्या उठावाची माहिती घटनेच्या ३५१ व्या कलमान्वये उपलब्ध नाही. त्याचा पध्दतशीर अभ्यास करण्याची गरज आहे.

इतर गोष्टींचा अंतर्भाव त्यात होईल.

अ) सामान्य वापरासाठी महत्वपूर्ण शब्दसंग्रह तयार करणे.

ब) शब्दसंग्रह, शब्दकोश आणि संभाषण शिकण्यासाठी मार्गदर्शक यांच्यात वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.

क) इतर भारतीय भाषांमध्ये हिंदी शिकविण्यासाठी पत्रद्वारा अभ्यासक्रम तयार करण्याची सोय करणे.

ड) हिंदी शिकविणाऱ्या ऐच्छिक संस्थांना मदत करणे.

इ) स्वतःचे शिक्षण स्वतः तयार करणे आणि इतर आधुनिक तंत्रांचा माध्यम म्हणून वापर करणे.

फ) इतर अहिंदी भाषिक राज्यांमध्ये हिंदीचा वापर

ग) संपूर्ण राज्यांत मोफत पुस्तकांचे वाटप करणे.

**भूमिका**

३५. घटनेच्या ३५१ व्या कलमान्वये ही जबाबदारी केंद्र सरकारची नाही. राज्यांनी हिंदीचे ज्ञान देण्यासाठी त्यांच्या प्रांतात हिंदीचा उपयोग केला पाहिजे. केंद्रीय हिंदी संस्था आणि हिंदी भाषा संचालनालय यांनी हिंदीची प्रसिद्धी आणि वाढ होण्यासाठी शालेय आणि तांत्रिक शिक्षणाची सोय करणे जरूर आहे. विविध विभाग आर्थिक व्यवहारासाठी सुरू करण्यात येतील.

३६. शैक्षणिक राष्ट्रीय धोरणाने संशोधन करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. भारतीय प्राचीन ज्ञानाचे संशोधन आणि त्याच्या समकालीन वस्तुस्थितीची सांगड घालणे, यांवर जोर दिला आहे. संस्कृतचा सखोल अभ्यास आणि इतर प्राचीन भाषांच्या वाढीसाठी जास्त प्रयत्न करण्यात येतील.

**सद्य:स्थिती**

३७. मानवीशास्त्र आणि उच्च शिक्षण संस्था यांनी समाजशास्त्र व मानवीशास्त्र, यांवर गुणात्मक संशोधन करण्याची गरज आहे. भारतात संस्कृत, पाली, प्राकृत, जुने तामिळ, इतर प्राचीन भाषा या भाषांमधील हस्तलिखिते साहित्य उपलब्ध असून त्यांचा गंभीरपणे उपयोग केलेला नाही. विशेषत: ज्ञानाची तर्कशुद्धता आणि ज्ञानाचा संबंध आणि अनुभव, यांचा उपयोग भाषेचा समकालीन शास्त्रीय विचार आणि तांत्रिक वाढ यांच्याशी करावयाचा आहे.

३८. ७ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्याचे सुचविलेले आहे. भारतीय आणि परदेशी प्राचीन साहित्य आणि मूळ संस्कृतीची उद्दिष्टे त्यांचा उपयोग तज्ज्ञांना करून घेता येईल. प्राचीन भाषा, जसे ग्रीक, लॅटिन, जुने तामीळ, संस्कृत यांच्यामध्ये अनेक बाबींमध्ये साम्य आहे आणि यांच्या अभ्यासाने फक्त भारतीय संस्कृतीचे नव्हे तर इतर कल्पना आणि संबोध समृद्ध होतील.

**निश्चित कृती**

३९. प्राचीन वाङ्मय आदर्श करण्याच्या दृष्टीने एक राष्ट्रीय संस्था स्थापन करण्यासाठी १९८६ च्या राष्ट्रीय धोरणामध्ये काही शिफारशी मांडण्यात आल्या आहेत, त्याचा पाठपुरावा करण्यात येईल. यांसाठीं निश्चित कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) संस्था स्थापन करण्यासाठी मंत्रालयाकडून निर्णय घेण्यात येईल.

ब) स्थापनेच्या आराखड्यासाठी तरतूद केली जाईल.

क) १९६० च्या सोसायटी नोंदणी कायद्यानुसार स्वायत्त संस्था स्थापन करण्यात येईल.

ड) घटना व नियमावली तयार करण्यात येईल.

इ) संस्थेसाठी आवश्यक असलेला आणि सहकार्य देणारा कर्मचारी वर्ग नेमण्यात येईल.

**सरकारी भूमिका**

४०. या नियोजित संस्थेसाठी या संस्थेची उभारणी अधिक चांगल्या प्रकारे होण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या थरातील तज्ज्ञ एकत्र करून त्यांचा छोटासा गट तयार करणे, याबाबत अभ्यास लवकरात लवकर केला जाईल.

**भाषा विकासाच्या दृष्टीने धोरणाचे नियोजन**

४१. भाषाविषयक धोरण व भाषांचा विकास यांबाबतचे निर्णय ज्यात विविध स्तरांवर घेण्यात येतात त्यात केंद्र व राज्य सरकारे, विद्यापीठे, माध्यमिक शिक्षण मंडळे यांचा समावेश करता येईल. परिणामी शिक्षणात अनुसरलेली समानता भाषेच्या धोरणात आढळत नाही. सततच्या आर्थिक तरतूदी अभावी भाषाविषयक धोरणे ही परिणामकारक होत नाहीत. जरी एक वाक्यतेने त्रिभाषा सूत्री राबविण्यात आली आणि सामाजिक व राजकीय विचारातून मान्यता पावली तरी खऱ्या अर्थाने सूत्री लागू करताना भरपूर बदल करण्यात आले.

हा असमाधानकारक विकास पाहता खालील सूचना कराव्याशा वाटतात.

अ) वेगवेगळ्या स्तरांवर भाषेची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने भाषा विषयी टीकायुक्त समालोचनाची जबाबदारी घेण्यात यावी.

ब) भाषाविकास आणि भाषाशिक्षण यांना समानता येण्याच्या दृष्टीने निश्चित धोरण सुचविले जाणे.

क) भाषा विकासाची दिशा निश्चित करण्याच्या दृष्टीने निश्चित मार्ग ठरविण्यात यावा. त्या दृष्टीने मध्यवर्ती शिक्षण सल्लागार समिती स्थापन करण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. मंत्रालयीन भाषामंडळे हे भाषेचे सचिवालय म्हणून काम करील.

प्रकरण २१ वे

# सांस्कृतिक यथार्थदर्शन

**कार्यपद्धतीची ठळक वैशिष्ट्ये**

शिक्षण आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध जोडण्यासाठी बालकांच्या ठिकाणी असलेल्या सुप्त प्रज्ञेचा शोध घेऊन त्यांच्या सृजनात्मक उपयोजनातून बालकाचा सर्वांगीण विकास साधण्यावर मूलभूत भर दिला आहे. पूर्व प्राथमिक स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंतच्या विकासाची प्रगती एकूण कृतिकार्यक्रमात अभिप्रेत आहे. या नियोजनाच्या कार्यवाहीतील ठळक विशेष खालीलप्रमाणे सांगता येतील.

अ) उपक्रमांत सहभागी होण्याच्या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांनी शिकावे असे अपेक्षिले जाईल.

ब) सांस्कृतिक वारशाचा परिचय घडवून आणण्यासाठी वापरावयाचे साधन हे कमी खर्चाचे आणि नजिकच्या परीसराशी संबंधित असे असावे.

क) काही काळानंतर सांस्कृतिक शेजारधर्माची संकल्पना विकसित झालेली असेल व त्यामध्ये समाजाची मदत अथवा क्रियाशील सहकार्य निरनिराळ्या स्वरूपात अपेक्षित असेल आणि त्यादृष्टीने समाजाला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल.

ड) सेवापूर्व व सेवान्तर्गत प्रशिक्षणाच्या वर्गातून शिक्षकाने अभ्यासक्रमाच्या संदर्भात उद्‌बोधन करणे व शिक्षक विद्यार्थ्यांमधील अंतक्रियेबाबत शिक्षकांना प्रेरणा देणे यांवर विशेष भर दिला जाईल.

इ) विद्यार्थी आणि युवक यांना सांस्कृतिक आणि तत्सम अनुषंगिक कार्यक्रमांना उत्तेजन देताना अशी दृष्टी असावी, की त्यांची या बाबतीतील आवड नेमकी त्यांच्या निकालपत्रकावर परावर्तित होईल.

२. ह्या कार्यक्रमाची कार्यवाही ७ व्या आणि ८ व्या पंचवर्षिक योजनांच्या कालावधीत स्वरूपाला यावयाची आहे. अभ्यासक्रमातील घटक स्थानिक साहित्याचा उपयोग आणि सामाजिक प्रक्रीया, यांतून भारतीय सांस्कृतिक वारशाची व्यापक जाणीव निर्माण करणे ह्यावर भर दिला जाईल.

## पूर्वप्राथमिक शालेय स्तर

### उद्दिष्टे

३. या स्तराबरील मुख्य उद्दिष्टे म्हणजे –

अ) बालकामध्ये भौतिक परिसराबद्दल संवेदना जागृत करणे

ब) मातीचा चिखल, वाळू, पानेफुले या सारख्या नैसर्गिक साहित्याशी खेळताना त्यांना शिकण्यास प्रवृत्त करणे.

क) निसर्गाच्या सान्निध्यात राहून रंगांचा व निरनिराळ्या आकारांचा (forms) आणि लय तालांचा आस्वाद घेऊन त्या आनंदात सहभागी होऊन हालचाल, नाच, गाणी यांच्या मदतीने बालकांना शिकण्यास मदत करणे.

### कार्यक्रमाची कार्यवाही

४. या कार्यक्रमाचा मुख्य भर खालीलप्रमाणे असेल.

अ) पूर्वप्राथमिक स्तरावर बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांतील सेवक व शिक्षक यांच्यासाठी "सांस्कृतिक कार्यपुस्तिका" हस्त-पुस्तिकांचे स्वरूपात तयार करणे. या संस्थात पूर्वप्राथमिक नर्सरी, अंगणवाडी आणि तशाच प्रकारच्या इतर संस्थांच्या समूहाचा अंतर्भाव असेल.

ब) क्रिडांगणे, सांस्कृतिक उद्दिष्टे ज्यात चित्रित केलेली आहेत अशा प्रकारची पोस्टर्स (भित्तीचित्रे) चित्रे, खेळणी यांसारख्या खर्चिक साहित्याच्या वस्तू उपलब्ध करून देण्यासाठी समाजातील पचायत समिती आणि अन्य नागरी समित्या यांना प्रेरणा द्यावी लागेल.

**अनुषंगिक कार्यक्रम**

५. ज्या बालकांकडे कोणतीही संस्था अथवा कोणतेही खाते लक्ष देत नाही अशांचा अंतर्भाव होण्यासाठी त्यांची काळजी घेण्याच्या दृष्टिकोनातून काही मूलभूत सोयींचा विकास करण्याबाबत कार्यवाही केली जाईल. ही कार्यवाही खालील प्रमाणे असेल.

अ) या स्तरावरील बालकांसाठी प्रत्येक खेड्यात आणि शहरी विभागातील प्रत्येक भागात खेळण्यासाठी किमान मोकळी जागा किंवा बाग यांची सोय करणे.

ब) सांस्कृतिक कार्यक्रम आणि पूर्व प्राथमिक अध्ययन कार्यक्रम यांची एकात्मता साधण्यासाठी पूर्वप्राथमिक स्तरावरील शिक्षकांचे प्रशिक्षण घेणे.

क) पूर्वप्राथमिक स्तरावरील बालकांसाठी शैक्षणिक खेळणी व देशी स्वरूपाचे, सौंदर्य गुणसपन्न व लहान मुलांना वापरण्यास सुरक्षित वाटतील असे शैक्षणिक लहान लहान खेळ व खेळणी तयार करणे.

## प्राथमिक शालेय स्तर

**उद्दिष्टच**

६ अ) बालकाला भारताच्या सांस्कृतिक वारशातील मूलभूत अशा अत्यंत महत्त्वाच्या गाभ्याबद्दलची वस्तुस्थिती समजावून देणे.

ब) विद्यार्थ्यांच्या शारीरिक व ज्ञानात्मक कौशल्यांत एकात्मता आणणे आणि त्यांचा विकास करणे.

क) मुलांच्या मनात जागृति (जाणीव) निर्माण करून भारताच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाबद्दल प्रेमभाव निर्माण करणे.

ड) सृजनशील व अर्थपूर्ण अशा कार्यक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागास उत्तेजन देणे आणि सामुदायिक गायन आणि इतर कला यांची ओळख करून देणे.

**कार्यक्रमाची कार्यवाही**

७. या कालावधीतील कार्यक्रमाच्या कार्यवाहीतील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे—

अ) शालेय अभ्यासक्रमातील एक भाग म्हणून सांस्कृतिक जागरूकता ज्या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेली आहे अशा पाठ्य-पुस्तकांची व्यापक पुर्नरचना करणे.

ब) शिक्षकामध्ये सांस्कृतिक अध्यापनाबाबत तात्त्विक व नमुनेदार शैक्षणिक अध्यापम पद्धतीची क्षमता आणण्यासाठी शिक्षकांचे उद्बोधन विषयक कार्यक्रम आयोजित करणे.

क) प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तज्ञ व्यक्तींच्या साहाय्याने काही ठराविक कालावधीचे शिक्षकांचे सेवान्तिर्गत प्रशिक्षण कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणात घेणे.

ड) सामुदायिक गीत गायन आणि सांस्कृतिक कल ज्यामधून अविष्कृत होईल अशा प्रकारच्या चित्रकला, नृत्य इत्यादि कलांमध्ये सहभाग घेण्यास लावून विद्यार्थ्यांना शिकण्यास प्रोत्साहित करणे सांस्कृतिक कार्यक्रमातील आणि इतर कलांतील त्यांची बुद्धिमत्ता याच ठिकाणी पारखता येईल.

इ) स्थानिक कलाकार आणि कारागीर यांना बोलावून नमुन्याचे कसब दाखवून, त्यातील कला शिकविणे, यामध्ये मातकाम, भितीवरील रंगकाम, सुनारकाम, बाहुलीकाम, लोकनृत्य व गायन वगैरेंचा समावेश करता यईल.

फ) स्वत: मुलांनी जमविलेल्या वस्तूंच्या स्वरूपात उदा. दगड, पिसे, पाने वगैरेच्या साहाय्याने शाळेच्या वस्तुसग्रहालयाच्या जागा संपन्न करणे.

ग) ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टया महत्त्व असलेल्या जवळ-पासच्या ऐतिहासिक स्थळांना व स्मारकांना भेटी देण्याचे आयोजन करणे.

८. पुढील काही वर्षात वरील कार्यक्रमांना पुढे एक पद्धत प्राप्त होईल आणि जास्त विकसित सोयींची उपलब्धता करून देण्यावर आणि

शिक्षकांच्या सेवांतर्गत व सेवापूर्व प्रशिक्षणाच्या विशेष प्राविण्यावर भर देणे.

अ) प्राथमिक शाळांसाठी खास पुस्तके तयार करणे. शैक्षणिक साहित्य आणि दृक्श्राव्य सोयी उपलब्ध करून देणे.

ब) सांस्कृतिक कार्यक्रमातील वस्तुसंग्रहालयासाठी, संगीत साहित्यासाठी, विद्यार्थ्यांच्या चित्रांसाठी, भित्तीचित्रांसाठी स्वतंत्र अशा निराळ्या खोल्या असणे.

क) स्थानिक कलाकार आणि कारागीर व अशा प्रकारच्या नियोजित सघटना, की ज्यामध्ये नृत्य संगीत आदि कलांचा अंतर्भाव आहे, अशांना मानधन, प्रोत्साहनपर अनुदान, फी देऊन त्यांची मदत घेऊन समाजाची त्या संस्थांबाबतची प्रक्रिया अजमाविणे.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा**

९. या ठिकाणी सांस्कृतिक शिक्षणातील मुख्य उद्दिष्टे म्हणजे –

अ) भारताच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाबद्दल असलेली समजून व प्रेम मुलांच्या मनात वाढविणे व अधिक दृढ करणे.

ब) सौंदर्याच्या आकलनशक्तीवर आधारित असा सौंदर्यग्राही दृष्टिकोन विद्यार्थ्यांत विकसित करणे आणि तात्काळ भावनेच्या व इतर मनोविकार यांच्या पलीकडे जाऊन पाहाण्याची आकलनशक्ती विद्यार्थ्यांत वाढविणे.

क) निधर्मीयता, राष्ट्रीयत्व आणि सद्सद्विवेकबुद्धी इत्यादी मूल्ये ज्यामध्ये प्रतिबिंबित झालेली आहेत असा विद्यार्थ्यांचा व्यापक व्यक्तिमत्त्वविकास घडविणे की ज्यामुळे त्या विद्यार्थ्यांना भारताच्या भवितव्याच्या निर्मितीत आपल्या विधायक भूमिकेची जाणीव होईल.

**कार्यक्रमाची कार्यवाही**

शिक्षणाच्या सुरुवातीच्या काळात विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या सहभागातून समाजाची मदत घेऊन आणि काही मूलभूत अशा सुविधांतून सांस्कृतिक कार्यक्रमांची वाढ करण्याचा दृष्टिकोन होता. भविष्यकाळात पुढील बाबींकडे लक्ष द्यावे लागेल.

अ) महत्त्वाच्या / तज्ञ अशा एका व्यक्तीची सोय सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रत्येक शाळेत असावी.

ब) नैसर्गिक व सांस्कृतिक वारशाची प्रतिबिंबे शालेय अभ्यास-क्रमांत उमटलेली असावीत.

क) विशेषत: समाजशास्त्र आणि इतिहास यांच्यातील ऐतिहासिक माहितीतील अतिशयोक्त्या दुरुस्त करून आणि भारतीय वारशातून व मोठमोठ्या ग्रंथातून जे पाठ (धडे) निवडले असतील त्यांतील योग्य मूल्यांचे उद्‌बोधन लक्षात घेऊन स्वतंत्र दृष्टिकोनातून अभ्यासक्रम शिकविणे.

ड) ऐतिहासिक वास्तु वस्तुसंग्रहालये आणि पवित्र ठिकाणांना (तीर्थक्षेत्रांना) द्यावयाच्या भेटींचे पद्धतशीर नियोजन करणे.

इ) समाजोपयोगी उत्पादक कार्यानुभवाचा भाग म्हणून उत्पादक कार्यात प्रशिक्षण देणे आणि स्थानिक कलाकारांच्या मदतीने सांस्कृतिक कार्यक्रमाच्या दिग्दर्शनाचा एक भाग म्हणून तो कार्यक्रम सादर करणे.

फ) विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या मदतीने ऐतिहासिक वास्तूंचा स्वीकार करून ऐतिहासिक वास्तू स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यास मदत करणे.

ग) श्रमनिष्ठेच्या मूल्यांवर विशेष भर देऊन, सर्वेक्षण करून, विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव वृत्ती वाढवून त्यांना स्वच्छतेच्या कामात सहभागी करून घेऊन त्यांच्यामध्ये या कामाबद्दल प्रेरणा निर्माण करणे.

ह) विद्यार्थ्यांनी शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून जमविलेल्या स्थानिक कलावस्तू-पाने, फुले, पिसे व इतर वस्तू नमुनाकृती (models) नमुनाचित्रे, जाहिराती (भित्तीपत्रे) तक्ते, पुस्तके, यांनी वस्तुसंग्रहालये सज्ज करणे.

१० पुढील काळात ही सांस्कृतिक वाह्यांगे सहभागाच्या विशाल पायावर आणि तंत्रज्ञानाच्या प्रवाहातून वाढविली जातील.

अ) नवोदय विद्यालयांचे समूह (जाळे) हे प्रत्येक जिल्ह्यातील मार्गदर्शक केंद्राच्या विकासासाठी, तसेच जवळपासच्या शाळातील कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी उपयोगात आणले जातील.

ब) व्यापक सांस्कृतिक सम्मेलने, आंतरशालेय, आंतरराज्य आणि आतरप्रांतीय मेळावे निर्मितीक्षम बुद्धिचा शोध घेण्यासाठी आयोजित केले जातील. ह्या पाठीमागील कल्पना, निर्मितीक्षम बुद्धिची निवड करण्याची आणि सेवाभावीवृत्तीस प्रोत्साहन देऊन सन्मानित करण्याची असेल.

क) राज्य व केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाने जतन करून ठेवलेली विविध संग्रहालये, ग्रंथालये, चित्रदालने आणि स्मारके यांच्या भेटीसाठी विविध शाळांची मालिका तयार केली जाईल.

ड) दृक्‌श्राव्य साधनांचा व भारतीय संस्कृतीवर आधारलेल्या शैक्षणिक साहित्याचा ज्यात समावेश करण्यात आलेला आहे, अशा संचाला केंद्र व राज्य शासनामार्फत सर्व उच्च व माध्यमिक शाळेत पुरवठा करणे.

इ) अध्यापनाच्या सांस्कृतिक पुनरुद्‌बोधनासाठी आणि शैक्षणिक संस्थांशी संबंधित अशा प्रशासकीय कार्यकारी मंडळासाठी खास वर्ग चालविणे.

फ) भारताच्या नैसर्गिक व सांस्कृतिक मालमत्तेबरोबरच निर्मिती-क्षमतेचे विषय आणि मूल्यांची जोपासना यांचा विशेष करून संदर्भ घेऊन उपग्रहांबाबतच्या कार्यक्रमासाठी सॉफ्टवेअर साधनांचा विकास घडवून आणणे.

ग) शिक्षकांच्या आणि प्रशिक्षणार्थ्यांच्या सांस्कृतिक सृजन-शीलतेच्या आविष्कारासाठी आणि त्याची वाढ करण्याच्या कार्याबद्दल सन्मानित करण्यासाठी बक्षिसे आणि प्रोत्साहन यांद्वारा सांस्कृतिक उत्थान कार्याची उभारणी करणे.

## विद्यापीठीय स्तर

### उद्दिष्टे

११. महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय स्तरांवर खालील गोष्टींवर मुख्यत:.भर असेल.

अ) संगीत, अंगभूत कला, कलानिर्मिती यांसारख्या सांस्कृतिक वर्गांना विशालभूत आधार देऊन त्याचे वेगळेपण दर्शविणे.

ब) समाजशास्त्र, मानवी व्यवहारशास्त्र, (Humanities) भाषा, या अस्तित्वात असलेल्या शाखांच्या आशयाचे सटीक समीक्षण करून ऐतिहासिक आणि सांस्कृतिक निर्णयास यांची दुरूस्ती करणे

क) खास अत्युच्चविज्ञान (Highly Specialised Science) किंवा तांत्रिक शिक्षण वर्गात गुंतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी सांस्कृतिक शिक्षण देणे.

ड) उत्खनन, अभियांत्रिकी, भारतीय शिल्पशास्त्रीय वारशाशी संबंधित ऐतिहासिक स्मारकांचे जतन करणे, वस्तुसंग्रहालये, संगीताशी निगडीत संस्थांतील खास वर्गांचा विकास घडवून आणणे.

**कार्यक्रमाची कार्यवाही**

१२. खालील कार्यवाही त्यात अंतर्भूत आहे.

अ) विद्यापीठातून संगीतादि अंगभूत कलांचे खाते उघडणे.

ब) सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमात व पाठ्यपुस्तकांच्या पुनरावलोकनात सांस्कृतिक जोर (Thrust) अजमावण्यासाठी खास तपासणी अभ्यास करणे.

क) कलादालनातील रंगकाम, छायाचित्रांच्या सोयीसाठी, शिल्पकलेसाठी स्वतंत्र निराळी जागा ठेवणे.

ड) नाट्य, नृत्य, संगीत, वाङ्मय इत्यादि कलांना वाहून घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संघटना गट असणाऱ्या महाविद्यालयांना उत्तेजन देणे, विद्यार्थ्यांच्या या अशा ऐच्छिक कार्यक्रमांना उत्तेजन देण्यासाठी मदत देणे.

इ) हलती प्रदर्शने किंवा सांस्कृतिक देखावे असणाऱ्या खास खोल्या, दालने यांना शालेय विद्यार्थ्यांनी भेटी देण्यासाठी जवळपासच्या ठिकाणी असणाऱ्या शाळांचे समूह (जाळे) तयार करणे.

१३. नंतरच्या भागात संस्कृतीशी संबंधित तंत्रज्ञानाचे चर्चात्मक स्वरूपात असणाऱ्या वर्गाच्या पायाचा विस्तार करण्यावर भर देणे. उत्खननाचे स्थापत्यशास्त्र, परंपरागत भारतीय शिल्पशास्त्र आणि त्यांचा समकालीन संदर्भाशी असलेला संबंध, इमारतीसाठी लागणारे स्वस्त

स्थानिक साहित्य इत्यादि सारख्या असलेल्या खास वर्गाचा विकास करणे, स्थापत्यशास्त्रामध्ये विशेष करून विभागीय अभियांत्रिकी महाविद्यालये, भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि शिल्पशास्त्र यांसारख्या संस्था यांचा अंतर्भाव असणे.

ब) बहुविध तंत्र संस्था व भारतीय तंत्रज्ञान संस्था या प्रकारच्या संस्थांतून या विषयाचे कोशात्मक (Capsule) संपृक्त वर्ग असणे

क) खास सभासदत्व, (Fellowship) शिष्यवृत्ती, प्रोत्साहनपर बक्षिसे. ही निर्मितीक्षम आणि अशाच प्रकारच्या कृतीशील कला यांकरिता आयोजित केलेल्या राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या स्पर्धांसाठी दिली जातील.

**संस्थानिहाय रचनेसाठी (Infrastructure) आवश्यक गरजा**

१४. कार्यक्रमाची कार्यवाही अंमलात आणण्यासाठी आणि मार्गदर्शनात्मक मूल्यमापन करण्यासाठी कार्यक्रमाला त्याचे स्वतःचे रचनाकार्य अथवा मूर्तस्वरूप (Infrastructure) असणे आवश्यक आहे.

या गोष्टींसाठी काही मापनदंड आहेत आणि ते खालीलप्रमाणे प्रतिपादित करता येतील.

अ) अस्तित्वात असलेली रचानापद्धती दृढ करणे.

ब) सांस्कृतिक प्रसाराच्या परिमाणाच्या माध्यमातून राज्यस्तरीय व केंद्रीय संस्थांची परस्पर जुळणी साधून जवळपासच्या संस्थांचे जाळे (समूह) निर्माण करण्याची एक संघटित पद्धत निर्माण करणे.

क) सद्यःस्थितीत असलेली सांस्कृतिक पोकळी भरून काढण्यासाठी नवीन संस्थांत फेरफार करणे.

## कार्यक्रमाची कार्यवाही

### अस्तित्वात असलेल्या संस्थांचे दृढीकरण–राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान संशोधन व प्रशिक्षण

शालेय स्तरावरील अभ्यासक्रमाचे पुनरुद्बोधन व उजळणी करण्यासाठी या संस्थेस निर्णायक भूमिका घ्यावी लागेल. या संस्थेच्या कार्यक्रमाचा समन्वय राज्यस्तरीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि

राज्यस्तरीय खात्याच्या कार्यक्रमांशी करावा लागेल. योजनांचा पुरवठा करणारी संस्था व मार्गदर्शक संस्था म्हणून या संस्थेचा उपयोग होऊ शकेल.

**सांस्कृतिक मार्गदर्शनाचे, प्रशिक्षणाचे केन्द्र**

राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषदेस अभ्यासक्रम तयार करण्याच्या संदर्भात या संस्थेला प्रशासकीय आणि सॉफ्टवेअर विकासासाठी मार्गदर्शक म्हणून भूमिका करावी लागेल सांस्कृतिक शिक्षणासाठी तयार करावयाच्या मार्गदर्शकांच्या प्रशिक्षणाचा सध्या चालू असलेला कार्यक्रम हा अधिक विस्तृत करावा लागेल. राज्यस्तरीय विभाग, उपविभाग राज्यातील खात्यांशी जवळचे सहकार्य साधण्यासाठी उघडावे लागतील. त्यांच्या मुख्य कार्याचा संबंध हा स्वस्त परंतु स्थानिक साहित्यातून परिणामकारक सॉफ्टवेअरचा विकास साधण्याशी असेल. एन. सी. इ. आर. टी. च्या सहकार्याने ते विभाग व उपविभाग दृक्श्राव्य छायाचित्रणे, भित्तीचित्रांचे संच, हस्तालेख, चित्रे असलेली पुस्तके (Albums) यांसारख्या सांस्कृतिक तंत्रज्ञानाच्या नमुन्यांचा विकास घडवून आणतील

**विद्यापीठीय अनुदान मंडळ**

विद्यापीठीय अनुदान मंडळ हे त्यांच्या संघटनेत खास व्यवस्था करून, संस्थांद्वारे कलांची वाढ करण्यावर देखरेख ठेवतील. त्याकरिता महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवर कला शिक्षणाची वाढ करणारे वर्ग आयोजित करून स्थानिक लोकांचा, राज्यशासनाचा व खाजगी संस्थांचा आर्थिक सहभाग मिळवण्यासाठी आणि उत्तेजन मिळविण्यासाठी एक नवीन योजना निर्माण करता येईल.

**प्रांतीय सांस्कृतिक केन्द्रे**

प्रांतीय सांस्कृतिक केंद्रांमुळे सबंध देशात तयार होणाऱ्या सांस्कृतिक केन्द्रांच्या जाळ्यामुळे आंतरराज्य सांस्कृतिक जुळणीस मदत होईल व जवळीक निर्माण होईल. ही प्रांतीय सांस्कृतिक केन्द्रे कलांच्या तिरनिराळ्या स्वरूपात पुनरूत्थान करण्यावर भर देतील एवढेच नव्हे तर विविधतेने नटलेल्या भारतीय सांस्कृतिक वारशामध्ये असलेल्या भरपूर

विविधतेची विद्यार्थ्यांच्या मनात जागरूकता निर्माण करून प्रदर्शने व कलाविष्कार करतील.

## स्काउटिंग चळवळ

या चळवळीस देशामध्ये फार व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. या चळवळीच्या कमी खर्चाच्या परंतु शिस्तबद्ध कार्यक्रमामुळे समूहगीत गायन, ऐतिहासिक वास्तूचे संरक्षण, सांस्कृतिक शिबिरे, सम्मेलने, बालवीरांचे भव्य मेळावे आणि आंतरप्रांतीय शिबिरे, यांसारख्या कार्यक्रमांना उठाव मिळेल, स्कांउटिंग, गाइडिंग व काही प्रमाणात रोव्हरिंग यांचा या चळवळींना उपयोग होईल. फार थोडे भांडवल गुंतवून फार मोठे यश मिळविण्याची क्षमता या चळवळीमध्ये आहे.

## एन.सी.सी; एन.एस.एस. आणि एन.वाय.के.

शिबिरांमधून आणि संघटित व शिस्तबद्ध कार्यक्रमांतून सांस्कृतिक शिक्षण देण्यास प्रोत्साहन देण्यासाठी या संस्था आवश्यक आहेत.

## वस्तुसंग्रहालये आणि उत्खनन सर्वेक्षण

तयार केलेल्या कार्यक्रमाच्या कार्यवाहीत हा कार्यक्रम अधिक पद्धतशीर करण्यासाठी ह्या संस्थांनी राष्ट्रीय व राज्यपातळीवरील शैक्षणिक संस्थांवर प्रक्रिया करण्यास सुरूवात करावी. वस्तुसंग्रहालयाचे समूह व उत्खनन सर्वेक्षण, यांनी शैक्षणिक संस्थांशी जवळचे सहाकर्य साधून परस्पर संबंध जुळवून आणावेत.

## नवीन संस्थांचा विकास

लोककथा व कला यांची वाढ करून त्यावर चित्रपट चित्रित करण्यासाठी काही खास संस्था ८ व्या पंचवार्षिक योजनेत निर्माण कराव्यात. ह्यांच्यामुळे खेड्यातील आणि आदिवासी भागातील विपुल व विविधतेने नटलेल्या कलांचे चित्रीकरण व संरक्षण करण्याबाबत काळजी घेण्यात येईल. ह्यांच्यामार्फत शिक्षक व हुशार विद्यार्थी यांच्यासाठी खास संयुक्त वर्ग आयोजित करता येतील.

## नैतिक शिक्षण देणाऱ्या संस्था

नवीन शैक्षणिक धोरणात मूल्यांचे उद्‌बोधन करणाऱ्या शिक्षणासाठी खास स्थान देण्यात आले आहे. मूल्यांवर आधारित शिक्षणाचा खास अभ्यास करणाऱ्या संस्थांची सुरवात करण्यात येईल. राष्ट्रीय अनुसंधान व राज्य संस्थांच्या सहकार्याने, एकात्मता, सत्य, सेवाभाव नम्रता इत्यादि मूल्यांचे जोपासन परिणामकारक व योजनाबद्ध स्वरूपात करता येईल.

□ □

प्रकरण २२ वे

# प्रसार माध्यमे व शैक्षणिक तंत्रज्ञान

## संगणकाचा शिक्षणात वापर

### सद्य:स्थिती

१. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी तांत्रिक साधनांचा वापर यापूर्वीच पुष्कळ वेळा केला गेला आहे. प्रक्षेपित/अप्रक्षेपित साधने, शैक्षणिक चित्रपटांचा वापर व प्रसार करण्यासाठी केंद्रात व राज्यात दृक् श्रवण विभाग, तसेच चित्रपट संग्रहालये सुरू करण्यात आली. टप्प्याटप्प्याने २१ 'शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष' राज्यात तसेच केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू करण्यात आले. दूरदर्शन व इतर शैक्षणिक माध्यमे यांचा अध्यापनात प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमध्ये "केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था" स्थापन करण्यात आली. शालेय आकाशवाणी कार्यक्रम गेल्या ४० वर्षांहून अधिक काळ प्रचलित आहे. देशातील आकाशवाणी यंत्रणेच्या ८८ केंद्रांपैकी ४४ केंद्रातून स्थापन केलेल्या शैक्षणिक कार्यक्रम कक्षातून आकाशवाणी शैक्षणिक कार्यक्रम प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी तयार केले जातात व हे कार्यक्रम सध्या ७४ केंद्रामार्फत प्रसारित होतात. १५–२० मिनिटांचे सर्वसाधारण पूरक असे कार्यक्रम दर आठवड्यातील ३ ते ५ शालेय दिवशी प्राथमिक शाळेतील मुलांसाठी प्रसारित केले जातात. अशाच प्रकारचे १५–२० मिनिटांचे कार्यक्रम माध्यमिक शाळेतील मुलांसाठी सर्व शालेय दिवशी प्रसारित केले जातात. विद्यापीठांनी चालविलेल्या पत्रद्वारा शिक्षण अभ्यासक्रमांना पूरक असे कार्यक्रम आकाशवाणीच्या दिल्ली, जालंधर, हैद्राबाद आणि तामिळनाडू राज्यातील सर्व केंद्रांवरून आठवड्या-तून ५ ते ७ दिवस प्रक्षेपित केले जातात. १४ आकाशवाणी केंद्रांमार्फत आठवड्यातून २ ते ४ प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम प्रसारित केले जातात.

२. सध्या ४ दूरदर्शन केंद्रामार्फत अभ्यासक्रमावर आधारित असे दूरदर्शन शैक्षणिक कार्यक्रम माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी प्रसारित केले जातात. ५–११ वर्षे वयोगटातील मुलांसाठी आठवड्यातील ६ दिवशी ६ 'इनसॅट' राज्यातील प्रादेशिक भाषांतून पूरक शैक्षणिक दूरदर्शन कार्यक्रम उपग्रहाद्वारा प्रसारित केले जातात आणि हेच कार्यक्रम ४ हिंदी भाषिय राज्यांतील सर्व प्रक्षेपकांद्वारे प्रसारित केले जातात. दररोज एक तास याप्रमाणे सर्वसाधारण पूरक असे दूरदर्शन शैक्षणिक कार्यक्रम विद्यापीठ/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रसारित केले जातात. २००० व्हीएचएफ व २००० सरळ ग्रहण संच (डायरेक्ट रिस्पेक्शन सेट) हे ६ 'इनसॅट' राज्यातील ठराविक भागातील निवडक ग्राम समूहासाठी, विशेषतः ग्रामीण शाळांतून सामुदायिकरीत्या पाहाण्यासाठी दूरदर्शन संच बसविण्यात आलेले आहेत. १९८२ साली 'इनसॅट फॉर एज्युकेशन' प्रकल्प व तसेच राज्य शैक्षणिक प्रकल्प सुरू करण्यात आले. या प्रकल्पाद्वारे आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, ओरिसा व उत्तरप्रदेश या राज्यांत शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (S. I. E. S) व तसेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमध्ये (N. C. E. R. T.) मध्यवर्ती शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (C. I. E. T.) केंद्र शासनातर्फे १०० टक्के अनुदानातून सुरू करण्यात आलेल्या आहेत. या संस्थांमार्फत मुलांसाठी शालेय दूरदर्शन कार्यक्रम निर्मिती करण्यात येत आहे. ६ विद्यापीठामध्ये दृक श्रवण संशोधन केंद्र (A. V. R. C.) व शैक्षणिक प्रसार माध्यम संशोधन केंद्रे (E. M. R .C) स्थापन करण्यात आलेली आहेत, या केंद्रांमार्फत विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लागणारे दूरदर्शन कार्यक्रम तयार करण्यात येतात.

काही तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्थांमधून (T. T. T. I.) दूरदर्शन कार्यक्रम निर्मितीसाठी काही सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत.

३. शिक्षणाच्या क्षितिजावर व्हिडीओ तंत्रज्ञान दृगोचर होऊ लागले आहे. इलेक्ट्रॉनिक्स ट्रेड व टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट कार्पोरेशन (E. T-and T.) यांचेतर्फे टेलेटीच (TELETEACH) या प्रकल्पामध्ये व्हिडिओद्वारा शैक्षणिक कार्यक्रम निर्मितीस सुरूवात झालेली आहे.

यावर्षी जवळजवळ ६०० शाळांमधून व्ही. सी. आर. वरील कार्यक्रम दूरदर्शन संचाच्या मदतीने पहाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येईल. ज्या विषयावर इलेक्ट्रॉनिक्स ट्रेड अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट कार्पोरेशन शैक्षणिक कार्यक्रम तयार करू शकेल अशा विषयाची निश्चिती मंत्रालयाने केलेली आहे.

**पदव्युत्तर पातळीवरील संगणक शिक्षण अभ्यासक्रम** (M. C. A.)

४. हे सध्या २५ विद्यापीठांतून सुरू आहेत. हे वर्ग आय. आय. टी. व इतर तांत्रिक संस्थेमार्फत पी. एच डी , एम. टेक. व बी. टेक. पदवी वर्गा व्यतिरिक्त आहेत. ३५ तंत्रनिकेतनामार्फत पदविका पातळीवर कार्यक्रम सुरू आहेत. संगणक, साक्षरता आणि शालेय शिक्षण प्रकल्प (CLASS) सुरू झाल्यामुळे संगणकांनी ठराविक संशोधन व तांत्रिक संस्थांच्या मर्यादा ओलांडून आता शाळेत पदार्पण केले आहे. संगणकाचे विविध उपयोग व अध्ययनाचे माध्यम म्हणून त्यांची प्रभावी क्षमता यांच्याशी मुलांना/शिक्षकांना परिचित व्हावे म्हणून सध्या ७५० माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना मायक्रो कॉम्प्युटर्स पुरविण्यात आले आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात गाठावयाची लक्ष्ये व त्यापैकी ७ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्राधान्यक्रमाने घ्यावयाच्या बाबी –**

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यातून खालील कामे उद्‌भवतात.

१) खालील संदर्भात दूरदर्शन व आकाशवाणी प्रसारणाचे जाळे वाढविणे.

१९९० पर्यंत सर्व प्रमुख भाषिक विभागांमध्ये कमीतकमी दूरदर्शन व आकाशवाणी शैक्षणिक कार्यक्रम पूर्व निश्चिती केलेल्या भागात प्रसारित करणे.

७ व्या योजनेमध्ये विद्यापीठे/महाविद्यालये यांमध्ये आकाशवाणी केंद्रे स्थापन करणे.

१९९१–९२ पर्यंत पूर्णतः शैक्षणिक दूरदर्शन वाहिनी (चॅनेल) देणे. दीर्घकालीन शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन पूर्णतः उपग्रहाद्वारा यंत्रणा निर्माण करणे.

२) १९९० पर्यंत प्रमुख भारतीय भाषांमधून संस्था निर्मितीच्या अंतर्गत सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देणे. इतरही भाषांमध्ये ८ व्या पंचवार्षिक योजनेत सोयी निर्माण करणे.

३) बिगर प्रसारण पद्धती/आरेखन अध्यापन साधने यांच्या मदतीने अभ्यासक्रम पूरक साहित्य तयार करणे. त्यांची मोठ्या प्रमाणावर पुनर्निमिती करणे आणि त्याचे वितरण करणे. यासाठी सुविधा/व्यवस्था ७ व्या पंचवार्षिक योजनेत विकसित करणे.

४) ७ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये शैक्षणिक प्रसार माध्यमांचे प्रशिक्षण कार्यक्रम/सुविधा विकसित करण्यासाठी मानव साधन निर्मिती करणे.

५) ७ व्या पंचवार्षिक योजनेस सर्व प्राथमिक शाळांना रेडिओ पुरविणे आणि १९९५ पर्यंत सर्व शाळांना दूरदर्शन संच पुरविणे.

६) कोणताही विलंब न लावता उपभोग, लालसा, उद्रेक इत्यादि गोष्टी या प्रसार माध्यमांच्या कार्यक्रमातून त्वरित समूळ नष्ट करणे.

७) १९९५ चे अपेक्षित लक्ष्य/पातळी गाठण्यासाठी ७ व्या पंचवार्षिक योजनेत संगणक क्षेत्रातील सध्याच्या मानव साधन संपत्तीत वाढ करणे, तसेच त्या संदर्भातील नवीन कार्यक्रमांची सुरूवात करणे.

८) सामान्य शिक्षण व व्यवसाय शिक्षणाच्या प्रथम पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमात संगणक शिक्षण अभ्यासक्रमाचा सहज सुलभ समावेश करणे आणि अशा पद्धतीने ७ व्या पंचवार्षिक योजनेत संगणक शिक्षणास प्रारंभ केलेल्या संस्थांना संगणक साहित्याचा पुरवठा १९९५ पर्यंत पूर्ण करणे.

९) सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये संगणक विज्ञान हा वैकल्पिक विषय उच्च माध्यमिक स्तरावर सुरू करणे.

१०) संगणक साक्षरता कार्यक्रमाचा विस्तार सर्व उच्च माध्यमिक शाळांमध्ये १९९१ पर्यंत, माध्यमिक शाळांमध्ये १९९५ पर्यंत आणि प्राथमिक शाळांमध्ये दीर्घ कालावधीत करणे.

११) ७ व्या योजनेमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक माहिती केंद्र प्रस्थापित करणे.

१२) दूरवरच्या अशा सर्व शाळांमध्ये एका तांत्रिक मोहिमेद्वारा खात्रीलायक अशी विद्युत पुरवठा करणारी यंत्रणा विकसित करणे.

**कार्यपद्धती आणि प्राथमिक गरज**

राष्ट्रीय धोरणाचा भर आराखड्यातील भेद टाळण्यासाठी आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान तुलनात्मक रीतीने विपुलता आणि सहज उपलब्धता असलेल्या क्षेत्राबरोबरच दूरच्या क्षेत्रातील, समाजातील वंचित विभागाच्या लाभार्थीपर्यंत एकाच वेळी पोहोचले पाहिजे यावर आहे. हा मार्ग नभोवाणी प्रक्षेपणाच्या पद्धतींना उपकारक आहे. त्यामुळे व्यवस्थापनाची सोय, किंमतीची परिणामकारकता आणि अधिक दूरच्या क्षेत्रापर्यंत तंत्रज्ञान पोहोचणे, या दृष्टीने अप्रक्षेपणात्मक पद्धति, की जी वैयक्तिक अध्ययन प्रवृत्त आहे, त्यापेक्षा परिणामकारक आहे.

प्रत्येक वर्गाच्या अध्यापनाचा वेळापत्रकाशी समन्वय साधून आकाशवाणी किंवा दूरदर्शन याद्वारे प्रत्येक वर्गासाठी कार्यक्रम प्रक्षेपित करणे शक्य नाही; ही प्रसार माध्यमे अध्ययन क्रिया परिणामकारक आणि संपन्न करण्यासाठी आणि शिक्षणक्रमाचे साहित्य दूरदर्शनासाठी पाठविण्यासाठी उपयोगात येऊ शकतील. तथापि परस्परांना जोडलेल्या केंद्रांची प्रक्षेपणाच्या क्षेत्रात व त्यासाठी येणाऱ्या मागणीची पद्धती यावर आकाशवाणी किंवा दूरदर्शन यांचा उपयोग शिक्षणासाठी किती प्रमाणात होऊ शकेल हे अवलंबून राहील. मोठ्या प्रमाणवर प्रक्षेपित आणि अप्रक्षेपित दृक्श्रवण कार्यक्रमाचे (Audio and Video) शैक्षणिक माध्यमाच्या व्यवस्थापनात काम करण्यासाठी पात्रताक्षम मनुष्यबळाची प्रचंड मागणी निर्माण होईल; शेवटी देखभाल करण्याच्या यंत्रणेचे प्रशासकीय आणि भौगोलिक दृष्टया विकेंद्रीकरण करणे इष्ट आणि आवश्यक होईल. तसेच स्थानिक तंत्र-व्यावसायिकाचे त्या जबाब

दाऱ्यासाठी प्रशिक्षण करणे शक्य होईल. शिक्षणाला प्रसार माध्यमांच्या पाठिंब्याची गरज आहे. अभ्यासक्रमाधिष्ठित शिक्षणाला शैक्षणिक साहित्याची गरज आहे की, जे साहित्य शिक्षक अध्यापनाच्या वेळी तयार करू शकतो. तक्ते, स्लाईडस्, पारदर्शिका इत्यादी स्वरूपात ते साहित्य पुरविता येऊ शकेल. व्हीडीओ तंत्रज्ञानामुळे उच्चस्तरावरील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी विशेष मदत होते.

७. व्यवसाय शिक्षणात संगणकाच्या उपयोगाबाबतचे प्रशिक्षण आणि संगणक वापरण्याचा सराव यामुळे संगणक विषयक विविध स्तरांवरील संगणकाच्या व्यावसायिक मनुष्यबळ विकसनाचा कार्यक्रम, सर्व व्यवसाय शाखांतील आणि प्रथम पदवी स्तरावरील सामान्य शिक्षणाचा अभ्यासक्रम, या संस्थांतील कमचारीवृंद, आणि संगणक साहित्याच्या सोयी, यांच्या तरतुदीसह त्यांचे एकत्रीकरण होणे अनुस्यूत आहे. मुलांना अधिक क्रियाशील करण्यासाठी त्यांना स्वयंशिक्षणाची अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी व अध्ययन अध्यापन प्रक्रियेची कार्यक्षमता उंचावण्यासाठी संगणकाची भूमिका महत्त्वाची आहे. औद्योगिक क्रांतीप्रमाणे संगणक साक्षरता ही विद्यार्थ्यांना मायक्रो कॉम्प्युटरच्या परिस्फोटाशी मुकाबला करण्यास उद्युक्त करणारी आणि समर्थपणे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास निर्णायक स्वरूपाची आहे. यासाठी निम्न माध्यमिक आणि प्राथमिक स्तरांवरील शालेय अभ्यासक्रमाशी संगणक साक्षरता कार्यक्रमाचा समन्वय समप्रमाणात व प्रगतीशीलपणे घालण्याची गरज आहे.

८. शैक्षणिक तंत्रज्ञानामुळे दुर्गम क्षेत्रांतील मोठ्या संख्येने असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांच्या बाबतीतील विषमता नाहीशी करून त्यांना स्वयंशिक्षणाच्या सोयी त्यांच्या गरजांनुरुप आणि अध्ययन गतिनुरूप पुरविण्यासाठी साधने उपलब्ध होतील. तथापि तंत्रज्ञानाला जे सोयी सुविधांसह व्यवस्थापनाचे जाळे (Infrastructure) आवश्यकता असते ते म्हणजे प्रशिक्षित मनुष्यबळ, कार्यक्षम आणि काम करण्यास तयार असलेले शिक्षक, शालेय इमारती इ. बाबीं असल्याशिवाय कोणतेही तंत्रज्ञान प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष यशस्वीं होऊ शकणार नाहीं. ग्रामीण

भागात आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविण्याच्या मार्गातील अनेक अडचणीं-पैकी प्रमुख अडचण म्हणजे खात्रीपूर्वक नियमित विद्युत पुरवठा उपलब्ध होणे, ही होय. विद्युत पुरवठा ही प्राथमिक गरज आहे आणि त्यामुळेच शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे शक्य आहे. या साठी या प्राथमिक गरजेला प्राधान्याने अग्रहक्क दिला पाहिजे.

### विविध विभागांची भूमिका

मनुष्यबळ विकास मंत्रालय व माहिती आणि नभोवाणी मंत्रालयांना संयुक्तरीत्या दीर्घ मुदतीच्या प्रसार माध्यमांच्या उपयोगां-बाबतचे चित्र आरेखित करावे. केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (C. I. E. T.) आणि विद्यापीठ अनुदान मंडळ (U. G. C) यांनी समन्वयकाच्या भूमिकेतून राज्यस्तरीय संस्थांना, विद्यापीठांना कार्यक्रम निर्मितीच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, त्यांच्या कर्मचारी वृंदाला प्रशिक्षण देणे, मूल्यमापनासाठी आणि संशोधन कार्यक्रमासाठी साहित्य आणि साधने यांचा आराखडा आखणे याबाबतीत व्यवस्थापन प्रस्थापित करण्यासाठी नेतृत्व द्यावे आणि मार्गदर्शन करावे. राज्यशासन आणि त्यांचे विविध विभाग यांनी स्थानिक स्थितीला सुसंगत, लक्ष्य असलेल्या श्रोत्यांसाठी कार्यक्रम तयार करावा. आवश्यक शैक्षणिक साहित्याची निर्मिती आणि वितरण, श्रोतृवृंद संशोधन आणि मूल्यमापन, रेडिओ व दूरदर्शन संचाची देखभाल करणाऱ्याचे प्रशिक्षण यांबाबतची जबाबदारी राज्य शासनाने घ्यावी. स्वयंसेवी संघटना व वैयक्तिक निर्माते यांना या कार्यक्रमात शक्य त्या प्रमाणात समाविष्ट करून घ्यावे. इलेक्ट्रॉनिक विभाग हा संगणकाच्या क्षेत्रात महत्त्वाचा आहे. त्या विभागाने सध्या-प्रमाणे मनुष्यबळ विकासाच्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात निकटपणे सहभागी व्हावे. विविध शैक्षणिक संस्थांच्या यंत्रसामग्री-बाबतच्या गरजा स्पष्ट नमूद करण्यात राज्य शासन आणि त्यांचे विभाग, विद्यापीठ अनुदान मंडळ आणि उच्चस्तरावर व्यावसायिक शिक्षणाचे नियंत्रण करणारी इतर वैज्ञानिक मंडळे यांनीही योग्य ती जबाबदारी उचलावी.

अभ्यासक्रमातील बदल, प्रवेश पात्रता, प्रमाणपत्रे, संस्थांच्या पायाभूत गरजा, यांबाबतची जबाबदारी शासनाने घ्यावी.

प्रकरण २३ वे

# शिक्षक आणि त्यांचे प्रशिक्षण

## सद्य:स्थिती

आपल्या देशात परंपरेने शिक्षकांनी फार मोठे मानाचे स्थान भूषविले आहे. धार्मिक नेते व समाज सुधारक यांचा लोकशिक्षक म्हणून उल्लेख केला जातो. हजारो शिक्षकांना आजही त्यांच्या विद्यार्थ्यांकडून व समाजाकडून मानाचे स्थान मिळते. तथापि एकंदरीने पाहाता गेल्या काही दशकात शिक्षकांची प्रतिष्ठा घसरली आहे. याची कारणे शोधणे तसे कठीण नाही. काही कारणे अशी– शिक्षकांच्या सेवाशर्तीत झालेली अधोगती, अलगपणाच्या वातावरणात शिक्षक करीत असलेले काम, शिक्षण पद्धतीचा झालेला असाधारण विस्तार, शिक्षक प्रशिक्षणाचा खालावलेला दर्जा, बहुसंख्य शिक्षक आपले काम नीट करीत नाहीत अशी झालेली सर्वसाधारण समजूत, समाजाच्या नीतिमूल्यांत झालेला बदल इ. शिक्षकाच्या सामाजिक प्रतिष्ठेचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रत्यक्ष परिणाम होतो आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर हा दुष्परिणाम करणाऱ्या अनेक गोष्टींचा संबंध समाजाने ज्या उपेक्षावृत्तीने शिक्षकाकडे पाहिले तिच्याशी व अनेक शिक्षकांनी आपले कर्तव्य ज्या पद्धतीने पार पाडले त्याच्याशी जोडता येतो.

## धोरण, ते कार्यान्वित करण्याचे मार्ग व कृतीसाठी पूर्वतयारी

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (रा. शै. धो.) शिक्षकांवर पूर्ण विश्वास टाकलेला आहे. शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये व शिक्षकाच्या कामाच्या स्वरूपामध्ये भरीव स्वरूपाची सुधारणा व्हावी असे 'रा.धो.शै.' चे म्हणणे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी, त्यांचे पालक, समाज

व स्वतःचा व्यवसाय या बाबत शिक्षकांवर येणाऱ्या उत्तरदायित्त्वावरही भर आहे.

३. शिक्षक आणि शिक्षकांचे शिक्षण या विषयी रा. शै. धो कार्यान्वित करण्याच्या पद्धतीमध्ये शिक्षकाच्या परिणामकारक उत्तरदायित्वासह शिक्षकांच्या प्रतिष्ठेत सुधारणा करणाऱ्या विविध बाबींचा व शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेमधील भरीव विकासाचा समावेश असेल.

अंमलबजावणी करण्याच्या पद्धतीची महत्वाची अंगे स्पष्ट शब्दात पुढील प्रमाणे सांगता येतील.

(अ) शिक्षकांची निवड करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा.

(ब) शिक्षकांच्या राहणीमानात आणि काम / सेवा शर्तींमध्ये सुधारणा.

(क) गाऱ्हाणी नाहीशी करण्यासाठी परिणामकारक यंत्रणेची निर्मिती.

(ड) शिक्षणाच्या नियोजन व व्यवस्थापनामध्ये शिक्षकांचा सहभाग.

(इ) शिक्षकांची प्रतिष्ठा, त्यांची व्यवसायातील निष्ठा व व्यावसायिक गैरव्यवहारास आळा घालणे यासाठी शिक्षक संघटनांचा सहभाग.

(फ) शिक्षकांसाठी व्यावसायिक नीतिसंहिता तयार करणे व स्वीकारलेल्या नियमाप्रमाणे शिक्षक काम करतात याची खात्री करून घेणे.

(ग) वरील (इ) व (फ) मधील तत्त्वांचे पालन करण्याच्या दृष्टीने कठोर निर्णय घेण्याची इच्छा.

(ह) शिक्षकांमध्ये नावीन्यपूर्ण उपक्रमशीलता व स्वायत्तता वृद्धिंगत करणारे वातावरण व संधी निर्माण करणे.

ही कार्यपद्धती कार्यान्वित करण्यासाठी कृतिनिश्चय, तपशीलवार काळजीपूर्वक नियोजन, उपक्रम कार्यान्वित करण्याच्या नावीन्यपूर्ण व शिक्षकांना सहभागी करून घेणाऱ्या पद्धती आणि मोठ्या प्रमाणात आर्थिक साधने यांची गरज लागेल.

## शिक्षकांची भूमिका

४. शैक्षणिक उपक्रम कार्यान्वित करण्याचे आणि शिक्षण सुसंघटित करण्याचे शिक्षक हे प्रमुख साधन आहे. शिक्षकांसंबंधी ज्यावेळी आम्ही बोलतो त्यावेळी त्यात शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, चाकोरीबद्ध शिक्षण संस्थांमधील पूर्णवेळ काम करणारे शिक्षक, चाकोरीबाहेरील व प्रौढ-शिक्षण केंद्राचे निर्देशक, दूरशिक्षणाच्या विविध तंत्रांमध्ये मार्गदर्शन करण्यात गुंतलेले शिक्षक आणि काही विशिष्ट काळासाठी, विशिष्ट भूमिका पार पाडण्यासाठी नियुक्त केलेले अंशकालिक व स्वयंसेवी (व्हालेंटरी) शिक्षक यांचा समावेश होतो. शैक्षणिक संस्थात पूर्ण वेळ काम करणाऱ्या शिक्षकांच्या बाबतीत त्यांची महत्त्वाची भूमिका आपल्या विद्यार्थ्यांना केवळ वर्गाध्यापन व ट्युटोरियल द्वाराच शिकविणे ही नसून प्रत्यक्ष सहवासातून व त्यांचे चारित्र्य घडविण्यास जे विविध मार्ग अवलंबिले जातात तिच्याद्वारे शिकविणे व मार्गदर्शन करणे ही असते व सदैव हीच राहील. सर्वच स्तरावरील शिक्षकांकडून त्यांनी संशोधन कार्ये, निरनिराळे प्रयोग, आणि नाविन्यपूर्ण उपक्रम अंगीकारावेत अथवा त्यांना उत्तेजन द्यावे अशी अपेक्षा करण्यात येते. विस्तार सेवा व समाजसेवा यांत शिक्षकांना महत्त्वाची भूमिका आहे. शैक्षणिक संस्था आपले कार्यक्रम पार पाडण्यासाठी ज्या विविध प्रकारची सेवा व उपक्रम करतात त्यांच्या व्यवस्थापनातही त्यांना सहभागी व्हावे लागते.

## उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण व व्यवस्थापन शिक्षण यामधील शिक्षक

५. उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण व व्यवस्थापन शिक्षण यांच्या कार्ययोजनांमधून शिक्षकांचे सेवापूर्व प्रशिक्षण व उद्बोधन आणि व्यावसयिक पात्रता वाढविण्यासाठी दर पाच वर्षांनी निरंतर शिक्षण योजनेद्वारा संधी उपलब्ध करून देणे याबाबत अगोदरच स्पष्ट चित्रण केलेले आहे संशोधनासाठी अधिक संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. संस्थेच्या यंत्रणेत सुधारणा करण्यात येत आहे. उच्च शिक्षणाची महाविद्यालये व विभाग यांना अधिक स्वायतत्ता देऊन अध्यापन कार्य अभ्यासक्रम रचना व मूल्यमापन या बाबतीत नावीन्यपूर्ण तंत्राचा वापर

करण्याच्या स्वातंत्र्याची निश्चिती करण्यात येईल. उत्पादक कार्याची मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संशोधन संस्था व उद्योग अथवा उत्पादक व्यवसाय यांची सांगड घालण्यास उत्तेजन देण्यात येईल. यामुळे शिक्षक अन्य संस्थेत काही काळ काम करू शकतील, व त्या संस्थेत त्यांची निवड झाल्यास एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेत जाताना पूर्वीच्या संस्थेत केलेल्या सेवेचा लाभ त्यांना घेता येईल. आपल्या कामाशी संबंधीत अशा सर्व क्षेत्राच्या व्यवस्थापनामध्ये शिक्षकांना निश्चितपणे सहभागी होता येईल. अशा रीतीने उच्च शिक्षणाच्या संस्थांच्या व्यवस्थापनाची नवीन रचना करण्यात येईल.

अशा परिस्थितीत शिक्षक त्यांच्याकडे असलेले सर्वोत्कृष्ट ज्ञान विद्यार्थी व समाज यांना देऊ शकतील व आपले काम कर्तव्य निष्ठेने व शिस्तीने करतील अशी स्वाभाविक अपेक्षा आहे. शिक्षक जी निरनिराळ्या प्रकारची कामे करतात त्याचे मूल्यमापन करण्याच्या यंत्रणेची स्थापना करण्यासाठी संस्थांना मदत करण्यात येईल. हे मूल्यमापन पूर्वग्रहरहित वस्तुस्थितीवर आधारलेले व संबंधीतांचा सहभाग असलेले असेल. या वस्तुनिष्ठ मूल्यमापनाचा शिक्षकाला बढती देताना विचार करण्यात येईल. शिक्षकाचे काम समाधानकारक नसेल तर त्याला सुधारण्याचे उपाय करण्यात येतील.

### गाऱ्हाणी दूर करणे (उच्च शिक्षण)

६. गाऱ्हाणी दूर करण्याचे काम, जलदगतीने काम करणाऱ्या सुयोग्य यंत्रणंची स्थापना करून, करण्यात येईल वेतनश्रेणी अथवा सेवाशर्ती इ. संबंधी अनेक विद्यालये अथवा संस्थांशी निगडित असलेली गाऱ्हाणी संस्थेच्या स्तरावर दूर करता येत नाहीत. म्हणून ठराविक कालमर्यादेत अशा गाऱ्हाण्यांची तपासणी करण्यासाठी आंतरसंस्थेस अथवा राज्यस्तरीय यंत्रणेची निर्मिती करण्यात येईल. दुर्दैवाने आजच्या शिक्षण संस्थांमधून अनेक वैयक्तिक गाऱ्हाणी वर्षोगणती साचली जातात व त्यामुळे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होतो. प्रत्येक विद्यापीठात वैयक्तिक गाऱ्हाण्याच्या संदर्भात सर्व काम पत्रांची छाननी करून कुलगुरु व कार्यकारी परिषद सभा यांना उपाययोजना करण्या-

साठी सल्ला देणारी प्रकुलगुरूंच्या दर्जाची एखादी ज्येष्ठ व्यक्ती संपर्काधिकारी म्हणून नेमता येईल काय हे तपासण्यासाठी पाउले उचलण्यात येतील.

गाऱ्हाणी दूर करणे (शालेय शिक्षक)

७ न्याय्य गाऱ्हाण्याची ताबडतोब दखल घेतली जाईल अशी खात्रीशीर व्यवस्था करण्यात येईल. पगार वेळेवर मिळणे, प्रवास व वैद्यकीय देयकांची परिपूर्ती, वार्षिक पगारवाढ, कार्यक्षमता अवरोध ओलांडण्यासंबंधीचे निर्णय, ज्येष्ठतासूची, नियमाप्रमाणे नियुक्त्या व बदल्या, नियमानुसार बढत्या इ. गोष्टी पात्र शिक्षकांना मिळतात याची खात्री पटणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. शिक्षकांमधील असमाधानाची त्वरित दखल घेणे हेही आवश्यक आहे. अशा गाऱ्हाण्याची तपासणी करण्यासाठी जिल्हा व राज्यपातळीवर संयुक्त सल्लागार समित्या स्थापन करण्यात येतील व विशेष वैयक्तिक गाऱ्हाण्याची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना नियुक्त केले जाईल व राज्यशिक्षण सल्लागार समितीच्या स्थायी समिती (स्टॅंडिंग कमिटी) अशा प्रकारचा सपक्रम घेऊ शकेल काय याची तपासणी करण्यात येईल.

शिक्षकांचे राहाणीमान व सेवाशर्ती

८. शिक्षकाच्या दर्जावर परिणाम करणारा महत्वाचा घटक म्हणजे त्याचे राहणीमान व सेवाशर्ती हा होय. त्याबाबत कारवाई करण्याच्या मार्गापैकी काही मार्ग पुढीलप्रमाणे –

(अ) वेतन आणि भत्ते

सर्व राज्यस्तरीय शिक्षकांना त्यांची शैक्षणिक गुणवत्ता, व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि समाजातील अपेक्षित दर्जा यांना साजेसा पगार व भत्ते देणे याकडे आपणास सरतेशेवटी जावयाचे आहे. उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण व व्यवस्थापन शिक्षण या शिक्षकांच्या बाबतीत ही गोष्ट विचाराधीन असून या बाबत लौकरच निर्णय घेण्यात येईल. हे करताना अन्य क्षेत्रातील वेतनमानाशी सुसंगतता राखण्याचा विचार

मनात ठेवण्यात येईल. शालेय शिक्षकाच्या बाबतीत राज्यसरकारे या प्रश्नाचा विचार करतील अशी अपेक्षा आहे. काही प्रकारच्या शिक्षकांना (उदा० शारीरिक शिक्षक, कलाशिक्षक, हस्तव्यवसाय शिक्षक) व ग्रंथपालांना निम्नवेतनश्रेणी देण्याचा अनियमितपणा बंद करण्यात येईल.

(ब) गुणवत्ता व व्यावसायिक बढती यांची सांगड घालण्यात येईल. त्यासाठी योग्य कालावधीनंतर करण्यात येणारे वस्तुस्थितीवर आधारलेले सर्वंकश मूल्यमापन आवश्यक आहे.

(क) **सेवानिवृत्त व म्हातारपणाचे फायदे आणि वैद्यकीय काळजी**

सरकारी नोकरीत असलेले, स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करणारे आणि शासन निर्मित संस्थात अथवा लोकसभा, राज्यसभा राज्यविधान सभेच्या कायद्याप्रमाणे अस्तित्वात आलेल्या संस्थांत काम करणारे सर्व शिक्षक हे सरकारी नोकरांना मिळणारे सेवानिवृत्ति व वैद्यकीय फायदे मिळण्यास पात्र असतील. शासनाने वेळोवेळी या संदर्भात निर्गमित केलेल्या सूचनांनुसार अनुदानित व खाजगी संस्थेतील शिक्षक सुद्धा अशा प्रकारचे फायदे मिळण्यास पात्र ठरतील.

(ड) **निवास** : शहरी तसेच ग्रामीण भागातील शिक्षकांना घरांची सोय उपलब्ध करून देण्यासाठी खास प्रयत्न करण्यात येतील. यासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीं बरोबरच निरनिराळी गृहनिर्माण महामंडळे व गृह निर्माण संस्था यांचा पैसाही या कामी उपलब्ध करून देण्यात येईल. निर्जन, डोंगराळ, आदिवासी, आणि अति दूर असलेले ग्रामीण भाग अशा ठिकाणी घरे बांधण्यासाठी विविध प्रकारच्या आर्थिक साधनांचा उपयोग करण्यात येईल.

(इ) **शिक्षणासाठी रजा** : सर्व शिक्षकांना एखाद्या अभ्यासासाठी दीर्घमुदतीची पूर्ण पगारी रजा मिळण्याचा हक्क राहील. या रजेच्या काळाचा अभ्यासासाठी जास्तीत जास्त उपयोग केल्याचा तपशील सादर करणे त्यांना आवश्यक राहील. निरंतर शिक्षणाची संधी सुद्धा शिक्षकांना उपलब्ध करून देण्यात येईल व अशा संधीचा फायदा घेण्यासाठी शिक्षकांना उत्तेजन देण्यात येईल.

(फ) **स्त्री शिक्षकांसाठी खास सवलती** : सर्व महिला शिक्षकांना त्यांचे पती निर्जन, डोंगराळ, आदिवासी किंवा दूरच्या ग्रामीण भागात काम करत असतील तर त्यांची इच्छा असल्यास पतीच्या गावीच नेमणूक दिली जाईल. शिक्षकांच्या बदल्या त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या लक्षात घेऊन करण्यात येतील. महिला शिक्षकांना मुलांसाठी संगोपनगृहाची सोय उपलब्ध करून देण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात येईल. आवश्यकता असल्यास मुलांचे संगोपन करण्यासाठी त्यांना दीर्घ-मुदतीच्या रजेची सोय उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांना अंशकालीक काम मिळवून देण्याची शक्यता अजमावून पाहण्यात येईल.

(ग) **सेवाशर्तींतील सारखेपणा** – एकाच प्रकारचे काम करणाऱ्या देशातील सर्व शिक्षकांच्या सेवाशर्तींमध्ये सारखेपणा असणे वांछनीय आहे व हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कसून प्रयत्न केले जातील. राज्यसरकारशी सल्लामसलत करून या संबंधी निश्चित धोरण तयार करण्यात येईल.

(ह) **शिक्षकांच्या नियुक्त्या व बदल्या** -- शिक्षकांच्या नियुक्त्या व बदल्या काही निकषानुसार करणे आवश्यक आहे. सामान्यतः प्रथम-नियुक्तीनंतर ३ वर्षांच्या आत शिक्षकांची बदली करू नये व पुढेही बढती अथवा काही अपरिहार्य निकड निर्माण झाल्याशिवाय शिक्षकांची बदली करण्याची वेळ येणार नाही अशी स्थिती निर्माण करण्याचा आपला सर्वसामान्य प्रयत्न असला पाहिजे.

(ध) **शिक्षक कल्याणासाठी राष्ट्रीय प्रतिष्ठान** – प्रतिष्ठान हे शिक्षकाच्या कल्याणाचे परिणामकारक साधन बनावे म्हणून प्रतिष्ठानाच्या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात येईल. शिक्षकांच्या पात्रतेचा विस्तार करण्यात येईल व आवश्यक संघटनात्मक आधार देण्यात येईल.

**शिक्षकांचा सहभाग**

१. सर्वस्तरावरील व्यवस्थापनातील सक्रिय सहभागातूनच केवळ शैक्षणिक बदल घडवून आणण्याची प्राथमिक जबाबदारी शिक्षकांवर

सोपविता येईल. शिक्षकांच्या सहभागाची महत्त्वाची अंगे पुढीलप्रमाणे असतील.

(अ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (रा शै धो) कार्यान्वित करण्यात शिक्षकांनी गुंतवून घेणे, त्यासाठी नियम पद्धती व निकष तयार करणे व धोरण कार्यान्वित करण्यात देखरेख करणे.

(ब) राष्ट्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळ ( CABE )
राज्य शैक्षणिक सल्लागार मंडळ ( SABE )

जिल्हा शिक्षण मंडळे, ग्राम शिक्षण समिती इ. सारख्या धोरण व व्यवस्थापन ठरविणाऱ्या संस्थांमध्ये शिक्षकांचा सहभाग असावा.

(क) संस्थानिहाय पद्धतीतील सुधारणा घडवून आणण्यासाठी येणारे खास प्रश्न अथवा सामान्य प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यासाठी शिक्षकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असणाऱ्या एक्झिक्युटिव्ह कमेटी सिंडीकेट व अकॅडेमिक कौन्सिल अशा समित्या स्थापन करण्याची सोय करणे.

**शिक्षकांच्या संघटना**

१०. शिक्षकांचे व्यावसायिक आचरण योग्य तऱ्हेचे असावे, तसेच शिक्षकांची प्रतिष्ठा व हक्क यांचे संरक्षण व्हावे म्हणून बळकट, एकसंघ, व जबाबदार शिक्षक संघटनांची आवश्यकता आहे. अशा संघटनांची वाढ होण्यास प्रोत्साहन देणे इष्ट ठरेल. शिक्षकांमध्ये आपली व्यावसायिक वाढ व विकास करण्याची जाणीव निर्माण करण्याचे काम करण्यासाठी व्यावसायिक शिक्षक संघटनांना उत्तेजन देण्यात येईल. या सर्व संघटनांचे काम लोकशाही पद्धतीनेच चालेल यावर भर दिला पाहिजे. अन्यथा त्यांचे लहान लहान गटात विभाजन होऊन त्यांची विश्वासार्हता व सेवा करण्याची क्षमता यांना तडा जाईल.

**शिक्षकांची भरती**

११. वस्तुनिष्ठता, गुणवत्ता व जागा आणि कार्यात्मक गरज या निकषांनुसार शिक्षकांच्या भरतीच्या पद्धतीची पुनर्रचना करण्यात

येईल. अशी भरतीची पद्धत तयार करण्यासाठी राज्यसरकारे आणि युजीसी/ए आय. सी. टी. ई. यासारख्या संस्थांशी लवकरच चर्चा सुरू करण्यात येईल. एतदर्थ व तात्पुरत्या नेमणुका कमी करून रिक्त जागा त्वरित भरण्याची गरज डोळ्यासमोर ठेवण्यात येईल.

१२. अध्यापन हा एक आकर्षक व्यवसाय वाटून त्याकडे बुद्धिमान व व्यावसायिक बांधिलकी मानणारे तरुण आकृष्ट होतील असा निकराचा प्रयत्न केला जाईल. शिक्षकांच्या कामाच्या व राहण्याच्या स्थितीत सुधारणा करण्याबरोबरच शिक्षकांच्या निवड करणाच्या पद्धतीमध्ये पुनर्रचना करण्यात येईल. अध्यापनात आवड, विद्यार्थ्यांबद्दल प्रेम, नवनिर्माण क्षमता, धाडस आणि सामाजिक उन्नतीशी बांधीलकी या गुणांचा प्रत्यय देणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. या गुणांसह उच्च शिक्षणाच्या स्तरावर बुद्धिमत्ता व तरुणांना नेतृत्व देण्याची क्षमता या गुणांचा विशेष विचार करण्यात येईल. प्राध्यापक, प्रपाठक व अधिव्याख्याते या जागांची निवड करण्यासाठी देशाच्या सर्व भागातील व्यक्ती पात्र समजल्या जातील ब विद्यापीठे, विद्यालये यातील १/४ शिक्षक तरी राज्याबाहेरील असतील असा प्रयत्न करण्यात येईल.

१३. शालेय स्तरावर विशेषत: प्राथमिक स्तरावर निर्जन, डोंगरी, आदिवासी व दूरच्या ग्रामीण भागात शिक्षक मिळणे अडचणीचे जाते. हा प्रश्न सोडविण्यासाठी पद्धतशीर व क्रमबद्ध कार्यक्रम तयार करण्यात येईल. या कार्यक्रमाचे महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे असतील.

(अ) जे शिक्षक अशा विभागात कायमचे राहण्यास तयार असतील, विशेषत: ज्यांच्या बायकाही शिक्षिका बनू शकतील, त्यांना त्यांच्या आवडीच्या ग्रामीण भागात दीर्घकाल नियुक्ती देण्यात येईल व त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देण्यात येतील.

(ब) घरबांधणीचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. ही घरे वस्तीच्या जवळ व संकुलात बांधण्यात येतील. शिक्षणाखेरीज ज्या व्यक्तींना त्या गावात राहाणे आवश्यक आहे असे कर्मचारीही या घरात राहू शकतील. यासाठी खास आर. एल. ई. जी. पी. (R. L. E G. P.) प्रोजेक्टस् तयार करण्यात येतील. अर्थ आयोग (Finance Commission),

आदिवासी उपयोजना, निर्जन प्रदेश विकास कार्यक्रम, डोंगराळ भाग विकास कार्यक्रम इ. योजनांमधील या उपक्रमांसाठी असलेल्या निधीचा उपयोग या कामासाठी सहाय्यक म्हणून करण्यात येईल.

(क) शिक्षक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश देताना शिक्षकांच्या किती जागा उपलब्ध आहेत याचा प्रामुख्याने विचार करण्यात येईल.

(ड) खेड्यातील स्थानिक स्त्रियांना शिक्षिका आणि चाकोरी-बाहेरील/प्रौढ शिक्षण शिक्षिका म्हणून काम करण्यासाठी त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी व त्यांना प्रशिक्षण द्यावे म्हणून एकात्म सघन अभ्यास-क्रम आयोजित करण्यात येतील.

(इ) खेड्यातील ज्या तरुणांजवळ शिक्षकांसाठी आवश्यक असलेलीं किमान शैक्षणिक पात्रता नसेल त्यांना दिवसातून २–३ तास प्राथमिक शाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी शिक्षक म्हणून (Voluntary Teacher) व संध्याकाळी चाकोरीबाहेरील/प्रौढ शिक्षण शिक्षक म्हणून नियुक्ती देण्यात यावी. ज्या विभागात उच्च दर्जाचे प्रशिक्षण देता येईल अशा विभागातच स्वयंसेवी शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी. एस. सी. ई. आर. टी (राज्य शैं. सं. प्र. प.) डी. आय. इ. टी. (जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्था) स्वयंसेवी संस्था व पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक लोक यांच्या सहकार्याने प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे शक्य होईल.

१४. 'रा. शैं. धो.' मधील प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व प्रौढशिक्षण यांच्या विकासाबाबत सांगितलेल्या पद्धतीमधील चाकोरी-बाहेरील शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता निर्देशकांच्या (इन्स्ट्रक्टर्स) प्रशिक्षणाची खास व्यवस्था करण्यात येईल. चाकोरीबाहेरील प्रौढ-शिक्षकां बरोबरच समाजसेवक म्हणूनही त्यांना भूमिका पार पाडावी लागेल. निरंतर शिक्षणाच्या खास अभ्यासक्रमातून त्यांची व्यावसायिक पात्रता वाढविण्याची व्यवस्था करण्यात येईल. या निर्देशकांना (इन्स्ट्रक्टर्स) यथोचित मान्यता व बक्षिसी देण्यात येईल.

## शिक्षकांचे शिक्षण

१५. देशातील सर्व भागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षक म्हणून नेमणूक करण्यासाठी सेवापूर्व व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केलेले असणे ही अट आहे. ज्या ठिकाणी शिक्षकांची तीव्र टंचाई आहे, अशा भागात अथवा गटात ही अट शिथिल करण्यात येते. देशात सध्या प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणाच्या सुमारे १२०० व माध्यमिक शिक्षक प्रशिक्षणाच्या सुमारे ३६० संस्था (विद्यालये) आहेत यातील बहुतांश संस्थांत उत्तम प्रशिक्षणास आवश्यक असलेल्या सुविधांची ( मानवी, भौतिक, व शैक्षणिक) कमतरता आहे. अभ्यासक्रम वर्षानुवर्षे बदलले जात नाहीत. वाचनासाठी दिलेल्या पुस्तकांच्या याद्या कालबाह्य झालेल्या असतात व शिक्षक प्रशिक्षक ज्या पद्धतीचा अवलंब करतात त्या होतकरू शिक्षकांच्या विकासाला बाधक असतात.

१६. शिक्षक प्रशिक्षणाचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन शिक्षक प्रशिक्षणातील आमूलाग्र बदल ही न. शै. धो. मध्ये शैक्षणिक परिवर्तना-मधील पहिली पायरी मानली आहे. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाला विशेष महत्त्व देण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षकांच्या सेवापूर्व व सेवां-तर्गत प्रशिक्षणासाठी व चाकोरीबाहेरील व प्रौढशिक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींच्या निरंतर शिक्षणासाठी म्हणून काही निवडक संस्थांचे ( डी. आय. इ. टी. ) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ( District Institute of Educational Training ) मध्ये रूपांतर करण्याचा विचार चालू आहे. माध्यमिक शिक्षक प्रशिक्षणाची पुनर्रच-नाही नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अंतर्भूत आहे.

१७. राष्ट्रीय शिक्षण प्रशिक्षण परिषदेला National Council of Education & Training) वैधानिक दर्जा देण्यात येऊन आपली भूमिका पार पाडण्यासाठी पुरेशी साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

## प्राथमिक शिक्षक, प्रशिक्षणाची पुनर्रचना

१८. सध्याच्या प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये आमूलाग्र बदल करून शिक्षण पद्धतीमध्ये महत्त्वाचा बदल घडवून आणण्यात येईल. प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण संस्थेची कामे पुढील प्रमाणे असतील :—

औपचारिक शिक्षण पद्धतीतील शिक्षकांचे सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षण करणे.

अनौपचारिक शिक्षण व प्रौढशिक्षण यांतील निर्देशक व पर्यवेक्षक यांना व्यवसाय पातळीच्या स्तराचे व निरंतर शिक्षण देणे.

संस्था प्रमुखाचे संस्थानिहाय नियोजन व व्यवस्थापन आणि सूक्ष्मस्तरावरील नियोजन या बाबतीत प्रशिक्षण व उद्‌बोधन करणे.

समाजधुरीण, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते व शालेय स्तरावरील शिक्षणावर प्रभाव पाडणारे इतर कार्यकर्ते यांचे उद्‌बोधन करणे.

शालासमूह व जिल्हा शिक्षण मंडळे यांना शिक्षणाच्या तात्त्विक भागासंबंधी सहाय्य करणे.

कृतिसंशोधन व प्रायोगिक कार्य करणे.

प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा तसेच अनौपचारिक व प्रौढ-शिक्षणाचे उपक्रम यांच्यासाठी मूल्यमापन केंद्र म्हणून काम करणे.

शिक्षक व निर्देशक यांच्यासाठी तज्ञ मार्गदर्शन व अध्ययन केंद्राची सोय करणे.

जिल्हा शिक्षण मंडळासारख्या संस्थांना (D B E) मार्गदर्शन करणे व सल्ला देणे.

१९. संबंधीत उपक्रम कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने राज्यात अशा प्रकारच्या किती संस्था लागतील याची मोजदाद करण्यासाठी प्रत्येक राज्य एका कार्यकारी गटाची (Task Force) त्वरीत स्थापना करील. सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्या संस्थांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत (डी आय ई टी) मध्ये बदलता येईल. याचीही पाहणी कार्यकारी गट करील. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेमुळे कमी दर्जाच्या संस्था कमी कमी होत जातील.

२०. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आधीच्या परिच्छेदांत सांगितलेली सर्व कामे करील. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रमुखाचा दर्जा अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या बरोबरीचा असेल व अन्य विभागातील सदस्य प्राथमिक शिक्षणाची पार्श्वभूमी

असलेले असतील. योग्य अशा व्यक्तींचीच निवड होईल. या दृष्टीने खास निवड पद्धती अनुसरल्या जातील. त्यांना पगाराची वरची श्रेणी देण्यात येईल व एन. सी. ई. आर. टी. नीपा, (NIEPA) एस. सी. ई. आर. टी. (S C E R T) विद्यापीठाचे शिक्षण विभाग, काही असामान्य शिक्षक इत्यादींच्या सहकार्याने त्यांचे उद्बोधन करण्यात येईल. अनौपचारिक शिक्षण, प्रौढशिक्षणाचे जिल्हा स्तरावरील तज्ज्ञमार्गदर्शन केंद्र हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे (DIET) अविभाज्य अंग असेल व त्यासाठी वेगळा विभाग ठेवण्यात येईल. या उपक्रमासाठी लागणाऱ्या खर्चाचा मोठा भाग मध्यवर्ती शासन सहन करील.

२१. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेत संगणकावर आधारित अध्ययन, व्ही. सी. आर., टीव्ही इ. सारख्या अत्याधुनिक तांत्रिक सोयी उपलब्ध करून देण्यात येतील. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेत उपलब्ध होणाऱ्या साधनांचा उपयोग करून तेथे प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांनी आपले स्वतःचे प्रोग्रॅम्स तयार करून त्यांचा अध्यापन साधने म्हणून उपयोग करण्यास त्यांना उत्तेजन देण्यात येईल. व्हिडीओ कॅसेट, ऑडिओ कॅसेट यांच्या प्रती इ. तयार करण्याची सोय या संस्थेमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. याशिवाय पारंपारिक शैक्षणिक साधनांचा कल्पक उपयोग करण्यावर भर देण्यात येईल व शिक्षकांना स्वतःची शैक्षणिक साधने अधिक चांगली करण्यास उत्तेजन दिले जाईल.

**माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण**

२२. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी यापुढेही चालू राहील. विद्यापीठ राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषद (NCTE) या संस्थेच्या सहकार्याने परीक्षा घेणे, पदव्या देणे व शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची गुणवत्ता राखणे यांसारख्या तात्त्विक कामाचे उत्तरदायित्व स्वीकारील. माध्यमिक शिक्षकांसाठी निरंतर शिक्षणाचे उपक्रम राबविण्याची जबाबदारीही याच महाविद्यालयाकडे राहील. नेहमीच्या बी. एड./एम्. एड अभ्यासक्रमाबरोबरच प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी व शक्य असल्यास १२ वी नंतर ४ वर्षाचा एकात्म अभ्यासक्रम कार्यान्वित करण्यासाठी,

काही शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा सर्वसमावेशक संस्था (Comprehensive Institutes) म्हणून विकास करण्यात येईल. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) या संस्थेच्या उपक्रमांना सहाय्य करण्यासाठी व संशोधन कार्य हाती घेण्यासाठी या सर्वसमावेशक संस्थांना सुविधा व कर्मचारीवृंद पुरविण्यात येतील. नावीन्यपूर्ण उपक्रम व प्रयोगशीलता यांना उत्तेजन देण्यासाठी म्हणून चांगल्या महाविद्यालयांना व विद्यापीठाच्या शिक्षण विभागालाही स्वायत्तता देण्यात येईल.

## शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण

२३. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) संस्थेकडे मोठ्या प्रमाणावर जबाबदारी सोपविण्यात येईल. सर्व स्तरावरील शिक्षक, निर्देशक व शिक्षणाशी संबंधित इतर व्यक्ती त्यांच्या सेवांतर्गत शिक्षणाच्या उपक्रमाचे नियोजन, प्रयोजन, सूत्रचालन व मूल्यमापन करणे ही महत्त्वाची भूमिका त्यांना करावी लागेल. राष्ट्रीय उद्दिष्टातील बदल, शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना, अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत पडणारी नवीन भर, शिक्षकांची असमाधानकारक पार्श्वभूमि इ. कारणांमुळे शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज निर्माण होते. एका विशिष्ट कालमर्यादेसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचा कार्यक्रम तयार करण्यापूर्वी राज्यस्तरीय यंत्रणेने या सर्व गरजांची जाणीव ठेवली पाहिजे.

२४. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदांनी शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी योग्य साहित्य तयार केले पाहिजे. मार्गदर्शकांचे उद्‌बोधन केले पाहिजे. कार्यक्रमावर देखरेख व कार्यक्रमाचे मूल्यमापन केले पाहिजे. व्यावसायिक शिक्षणाच्या बाबतही याच प्रकारची पावले राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने उचलली पाहिजेत.

२५. प्राथमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचे कार्यक्रम कार्यवाहीत आणणारी मुख्य यंत्रणा प्राथमिक स्तरासाठी असलेली जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था ही असेल. यासाठी जिल्हातील शाला-

समूह केंद्राचे सहाय्य घेतले जाईल. माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत शिक्षक प्रशिक्षण संस्था व निरंतर शिक्षण केंद्रे यांच्या मार्फत कार्यक्रमाचा विस्तार केला जाईल. कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी मदत करतील.

२६. शिक्षकांची संख्या लक्षात घेता सेवांतर्गत प्रशिक्षणाचे सर्वच कार्यक्रम प्रत्यक्ष संपर्क साधून कार्यान्वित करणे शक्य नाही. दूर सेवांतर्गत शिक्षण योजना तयार करण्यात येईल व प्रसारण यंत्रणांच्या मार्फत तिचा विस्तार करण्यात येईल. राज्य शैक्षणिक संशोधन परिषदांना (S C E R T) मुद्रणाव्यतिरिक्त अन्य अध्ययन साहित्याची उत्पादने करण्याची साधने पुरविण्यात येतील. प्रत्येक राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेला श्राव्य व दृष्य व्हिडिओ कार्यक्रमांची नोंद करणारी किमान आवश्यक सामग्री पुरविण्यात येईल. सर्वसमावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांना सुविधा पुरविण्यात येतील. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था व सर्वसमावेशक शिक्षण शास्त्र महाविद्यालये यांना पुरविण्यात आलेल्या निर्मिती सुविधांचा दर्जा व्यावसयिक दर्जा इतका नसेल, तथापि आपल्या प्रशिक्षण कार्यक्रमात व आपल्या संलग्न संस्थांच्या कार्यक्रमात उपयोगात आणता येईल असे साहित्य तेथे निर्माण करता येईल. सेवांतर्गत शिक्षणाचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी, साहित्याचा विकास करण्यासाठी व पद्धति ठरविण्यासाठी खास करून सेवाभावी संस्थांच्या अनुभवाचा फायदा घेण्यात येईल.

**शिक्षक प्रशिक्षकांची श्रेणी**

२७. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्था व जिल्हा शिक्षण प्रसारक संस्था ( D I E T ) मधील नोकर मंडळींच्या नेमणुकीसाठी एक स्वतंत्र श्रेणी निर्माण करण्यात येईल. या श्रेणीत निवड झालेल्या शिक्षकांना पगाराची वरची श्रेणी, निवासस्थान यासारख्या प्रोत्साहनपर सुविधा मिळतील. या व्यक्तीचे खात्रीशीरपणे निरंतर शिक्षण होईल अशी खास व्यवस्था करण्यात येईल. अध्यापन व शिक्षकांचे प्रशिक्षण यात सहसंबंध प्रस्थापित केला

जाईल. या श्रेणीतील व्यक्तींना दर ४–५ वर्षांनी १–२ वर्षासाठी शाळेत शिक्षक म्हणून काम करण्यासाठी शाळेमध्ये भरपूर जादा/राखीव जागा निर्माण करण्यात येतील.

**राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषद (N C T E)**

२८. राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षक परिषद (रा शि प) १९७३ पासून अस्तित्वात आहे. परंतु शिक्षक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नवनवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण यंत्रणेला ती मार्गदर्शन करू शकेल असे नाही. तिच्या घटनेतच काही अडचणी दडलेल्या आहेत. हे दोष काढून टाकण्यासाठी तिला स्वायत्त व वैधानिक दर्जा देण्यात येईल.

या संस्थेची कामे पुढील प्रमाणे असतील.

(अ) शिक्षक प्रशिक्षण संस्थांना अधिकृत मान्यता देणे/मान्यता काढून घेणे.

(ब) शिक्षक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा ठरविणारे घटक व निकष तयार करणे.

(क) शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व पद्धती ठरविणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचा विकास करणे.

(ड) याशिवाय सेवांतर्गत प्रशिक्षणाला द्यावयाचे महत्त्व ठरविणे, ( Credit ) निरनिराळ्या अभ्यासक्रमांचा कालावधी ठरविणे, अनौपचारिक, प्रौढशिक्षणमधील निदेशकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांत द्यावयाचा महत्वांश ठरविणे, शिक्षण प्रशिक्षणामध्ये पत्रद्वारा प्रशिक्षणाचे स्थान ठरविणे इ. कामे संस्थेला करता येतील. अध्ययन साहित्य तयार करणे, वरिष्ठ शिक्षक प्रशिक्षकांचे उद्‌बोधन करणे, इ. कामे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या संस्थानी राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेच्या (NCTE) सहाय्याने करणे पूर्वी प्रमाणेच चालू ठेवावे.

२९. नवीन शैक्षणिक धोरणात भर दिलेल्या बाबींचा विचार करून शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. विशेषतः त्यात शिक्षण व संस्कृती यांची एकात्मता, कार्यानुभव,

शारीरिक शिक्षण व खेळ, भारतीय संस्कृतीचा व भारताच्या एकतेचे व एकात्मतेचे प्रश्न यांचा अभ्यास यावर भर असला पाहिजे. नियोजन व व्यवस्थापन ही क्षेत्रे पुढे येत आहेत व अभ्यासक्रमात त्यांना महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेच्या पद्धतीवरच नव्हे तर त्यांचे घटक व स्वरूप यावरही शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभाव पडणार आहे. अभ्यासक्रम तयार करताना या गोष्टींचाही विचार करणे आवश्यक आहे.

पाठ्यपुस्तकामध्ये पश्चिमात्य विचारावर अवाजवी भर दिलेला असतो व प्रशिक्षणासाठी आलेल्या शिक्षकांना भारतीय तत्त्वज्ञानातील व मानसशास्त्रातील शिक्षणाच्या संकल्पनेचा पुरेसा बोध करून देण्यात येत नाही. म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी ज्यात भारतीय शिक्षण अनुभव प्रतिबिंबीत झालेला आहे अशी पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके, काव्यसंग्रह, वेचे, चित्रपट्ट्या, इ. नवीन अध्ययन साहित्य तयार करण्याचे कार्य अंगीकारावे.

□□□

प्रकरण २४ वे

# शिक्षणाचे व्यवस्थापन

**सद्य:स्थिती**

१. शिक्षणाची कार्यपद्धती ठरवून शैक्षणिक नियोजनाचा संबंध मनुष्यबळाच्या नियोजनाशी जोडणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्योग, व्यापार, व्यावसायिक सेवा, शेती व्यवसाय यामधील विविध तांत्रिक प्रवाह व विकास पद्धतीत सुधारणा यांच्या संदर्भात विचार होणे आवश्यक आहे. उत्पन्न, त्याची पातळी व त्याचे वाटप हे आधार धरून शैक्षणिक धोरण ठरविणे आवश्यक आहे. हे ठरविताना तांत्रिक शिक्षणाचे स्वरूप, जे पुढील १५ ते २० वर्षात अपेक्षित आहे ते फार मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारे मनुष्यबळ, त्यांचे कौशल्य व निरनिराळे दृष्टिकोन यावर अवलंबून राहील, त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत अशी कोणतीही व्यवस्था नाही की, जी हा भार पेलू शकेल किंवा ते हाती घेण्याचा विचार करू शकेल व याशिवाय दूरवरचे नियोजन. शिक्षण आणि मनुष्यबळ आवश्यकता यांचे संबंध प्रस्थापित करू शकेल. शिक्षण पद्धतीच्या व्यवस्थापन पद्धतींचा आराखडा करताना मनुष्यबळाच्या मागणीचा आढावा घेणे जरूर आहे.

**कार्यपद्धती राबविणे व धोरण**

२. शैक्षणिक व्यवस्थापनाचा आकृतिबंध आणि पद्धती ही शैक्षणिक उद्दिष्टे व निश्चित स्वरूपाचे कार्य यांच्या संदर्भात ठरविली जाते. उद्दिष्ट साध्य होण्यासाठी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण व निरक्षरता दूर करणे यासाठी विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे की जेणे करून शिक्षणापासून वंचित असलेले लोक विशेषत: दुर्बल घटक, स्त्रिया व

हरिजन, आदिवासी व प्रौढ निरक्षर हे शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील. अशा पद्धतीची शैक्षणिक कार्यक्रमाची आखणी असावी म्हणजे राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य होतील. त्या आखणीला आदर्श आखणी म्हणता येईल. त्या आखणीत विविध स्तरांतील सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण विषयक समान संधी, विशेषत: शैक्षणिक सुविधा ज्यांना मिळत नाहीत अशा लोकांसाठी जी चटकन बदलता येईल अशी लवचिकता असावी. नियोजन आणि व्यवस्थापनाचे विविध स्तरांवरील विकेंद्रीकरणामुळे शैक्षणिक कार्यक्रम राबविताना ह्यांचेकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. शैक्षणिक धोरण राबविताना कार्यक्रम व व्यवस्थापन यांचे विकेंद्रीकरण केल्याशिवाय विविध स्तरांवरील शैक्षणिक कार्यक्रमांचा आराखडा तयार करणे शक्य होणार नाही.

३. विशेषत: पदवीपूर्व, पदव्युत्तर, तांत्रिक व महाविद्यालयीन शिक्षण यांचा संबंध जिथे येतो तिथे शिक्षणाचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे या विकेंद्रीकरणामुळे शिक्षक विद्यार्थी व्यवस्थापन हे शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता उंचावण्याचे दृष्टीने पुढाकार घेऊन व उद्युक्त होऊन स्वत: कार्य करू शकतील, शिक्षणाची कार्यपद्धती परिणामकारक होण्याचे दृष्टीने केवळ शिक्षणाशी संबंधीत असलेले विविध गट व अधिकाऱ्यांचा सहभाग व जबाबदाऱ्या यांचीच केवळ तुलना करून चालणार नाही तर त्याचबरोबर संस्था व्यवस्थापकांना कार्य करण्याच्या दृष्टीने दिलेले अधिकार यांचीही परस्परांशी तुलना करावी लागेल. या संदर्भात संस्था-निहाय व्यवस्थापनासाठी काही नियमावली तयार करावी लागेल. या संदर्भात संस्था व्यवस्थापनात अशी व्यवस्था करावी लागेल की, ज्यांना काही अधिकार दिल्यावर ते आपल्या संस्थेची चांगली प्रगति दाखवू शकतील व विद्यार्थीही चांगली प्रगति दाखवू शकतील. त्यांचेकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत होईल. या प्रगतीसाठी काही मर्यादा घालून दिली पाहिजे व त्यांनी ती प्रगति दाखवून देण्यासाठी काही प्रोत्साहन दिले पाहिजे व न केल्यास अपात्रता लक्षात आणून दिली पाहिजे.

४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे जनतेचा सहभाग, अशासकीय संस्था व स्वेच्छेने केलेल्या प्रयत्नाला अतिशय महत्त्व देते. लोकांचा

सहभाग म्हणजे केवळ अशासकीय संस्था, सेवाभावी संस्था एवढाच नव्हे तर पालक, विकसनशील संस्थांचे चालक, व्यावसायिक, योग्य शिक्षक व सर्व स्तरावरील शिक्षण प्रक्रियांना आर्थिक सहाय्य करणाऱ्या संस्थांचाही यात अंतर्भाव आहे. लोकांनी शैक्षणिक संस्था व समाज यांना अधिकाधीक जवळ आणण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. तसेच शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी, गैरहजेरीचे प्रमाण कमी करण्यासाठी, बेजबाबदार वृत्ती कमी करण्यासाठी, तसेच शैक्षणिक संस्थांतून शिस्त व सुव्यवस्थापन आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्याचबरोबर शैक्षणिक संस्था स्थानिक राजकारण व अधिकाराचा गैरवापर यापासून दूर राहतील याकडे लक्ष असावे.

**शैक्षणिक धोरण राबविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे घटक व कार्यपद्धती**

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यान्वित करण्याचे दृष्टीने व ज्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे ते विभाग खालीलप्रमाणे आहेत.

(अ) कार्यपद्धती कार्यान्वित करणे

(ब) व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करणे व जिल्हा स्तरावर शिक्षण मंडळे, जिल्हा प्रशिक्षण मंडळे, स्वायत्तता व शैक्षणिक संस्थांची जबाबदारी व शिक्षक व शिक्षण पद्धती.

(क) राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचे विभाग व त्याची कार्यपद्धती, त्यांना लागणारा पैसा यांचा सर्वंकष विचार करणे.

(ड) मनुष्यबळाचे नियोजन व भविष्यकाळात लागणारी त्यांची गरज व आवश्यकता.

(इ) प्रौढ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, खुले निरंतर शिक्षण हे सर्व लक्षात घेऊन शिक्षणाचे माध्यम व तंत्र आखणे.

(फ) कालखंडातील अभ्यासक्रम अध्ययन अध्यापन प्रक्रिया यांचा आढावा घेणे, विविध कालखंडात असलेला अभ्यासक्रम व अध्ययन अध्यापन प्रक्रिया यांच्यात झालेल्या विकासाचा आढावा घेणे.

(ग) नेतृत्वाचे दृष्टीने मूलभूत, पायाभूत असलेली माहिती अधिक मजबूत करणे.

६. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण योग्य रीतीने राबविण्याचे दृष्टीने केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने वरील मुद्यांचा अभ्यास योग्य समित्यामार्फत वरील मुद्यांच्या अनुषंगाने करावा.

७. संस्थांच्या कार्याची जबाबदारी, ही खालील बाबी लक्षात घेऊन करण्यात यावी. राष्ट्रीय-विशेष महत्त्वाच्या बाबी, संबंधित संस्थांचा सहभाग कार्यक्रमाची मार्गदर्शक तत्त्वे आखून देणे, तांत्रिक सल्ला व मदत देणे, की त्यायोगे गुणवत्ता टिकविता येईल व मूल्यमापन करता येईल.

**राष्ट्रीय स्तरावरील कार्यपद्धती**

८. भारत सरकारकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी आणि विशेषत: शिक्षणाचे सार्वत्रिकरण व संपूर्ण राष्ट्रात एकच शिक्षणपद्धती राबविण्याचे दृष्टीने मनुष्यबळ मंत्रालयाच्या अधिकारात येणारी विविध खाती, ज्यांचा संबंध राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी आहे, ती अधिक मजबूत करण्याचे दृष्टीने पावले उचलणे आवश्यक आहे. ही खाती मजबूत करण्याकरिता, परिणामकारक नवीन अभ्यासक्रम, कार्यपद्धती व कार्यक्रम भजबूत करण्याच्या संदर्भात अंतर्गत परिणामकारक रचना करावी लागेल, विशेषत: कार्यक्रम तयार करणे व त्यातील परस्पर सहभाग यांचा अभ्यास करून त्याचे परिणाम पाहून वेळेवर त्यात सुधारणा करता येईल. तसेच या कार्यक्रमाचे व्यवस्थापन व संचालन करण्यासाठी राज्य शासन जेवढे जबाबदार राहील तेवढेच केंद्र शासनही जबाबदार राहील, विशेषत: प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापनावर जास्त भर दिला जाईल, जेणेकरून विविध राज्यातील अनुभवांची देवाणघेवाण करून अडचणी दूर करता येतील.

९. केंद्रस्तरावर कार्यक्रमाच्या आखणींचा विचार करताना शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे, अधिकार, मार्गदर्शन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे स्पष्टीकरण या सर्व बाबी एकाच नेतृत्वाखाली राहतील याचाही विचार व्हावा.

१० ऐतिहासिक कारणामुळे शासनाने स्वत:चे प्रशासकीय शैक्षणिक कार्यक्रमसुद्धा राबविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर

टाकली आहे. कारण या संस्था स्वयंशासित व राष्ट्रीय स्वरूपाच्या असल्यामुळे राज्यस्तरावर असणाऱ्या प्रतिनिधीशी ठामपणाने विचार-विनिमय करू शकत नाहीत, असे दिसून आले आहे तसेच, जेव्हा जेव्हा राज्याकरिता या संस्था काम करतात तेव्हा तेव्हा स्वत:च्या कांही अडचणींशी त्यांना राज्याशी जुळवून घ्यावे लागते आणि म्हणून खालीलप्रमाणे दोन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

**राज्यस्तरीय कार्यपद्धती.**

११ एक म्हणजे राज्यशासनाने विविध स्तरावर विविध कार्यक्रमाची आखणी करून प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने, तसेच कार्यक्रमाचे सुव्यवस्थापन होण्यासाठी केंद्र सरकार अधिक मोठमोठ्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. त्यादृष्टीने स्वत:ची भूमिका जबाबदारीने पार पाडणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे स्वायत्त संस्थांच्या जबाबदाऱ्या व सुविधा प्रस्थापित करून त्यांच्या सहभागाबाबत निश्चित स्वरूप ठरविणे. याकरिता राज्य सरकार एका शिक्षण सल्लागार मंडळाची स्थापना करेल. ते मंडळ जे मानवी विकासासाठी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचा विचार करून एक आकृतिबंध तयार करेल व त्याच्या छत्राखाली हे कार्य होईल.

१२ हे मंडळ स्थापन करताना राज्यसरकारने विशाल दृष्टिकोन ठेवावा जेणे करून राष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेल्या शिक्षणतज्ज्ञांचा ज्यांनी स्वयंस्फूर्तीने शिक्षणक्षेत्रात काम केलेले आहे अशांना प्रतिनिधित्व मिळेल. तसेच इतर राज्यातील शिक्षण योजनाकार, शास्त्रज्ञ उद्योगपती व विकसनशील खात्याचे प्रतिनिधी यांचाही समावेश असावा. स्त्रिया व युवक यांचेही प्रतिनिधित्व निश्चित स्वरूपात असावे. विविध धर्मसत्ता असलेल्या शैक्षणिक संस्थांतील गुणवान शिक्षकांना यात प्रतिनिधित्व दिले जाईल असे नाही, तर शिक्षणपद्धती योग्य रीतीने राबविण्याचे दृष्टीने विविध गटातील जे पालक अधारस्तंभ गणले गेलेले आहेत त्यांनाही या मंडळात सहभागी केले जाईल. पालकांचे पद्धतशीर मार्गदर्शन, सहभाग व त्यांचा सल्ला या गोष्टी शिक्षणपद्धती योग्य रीतीनें राबविण्यासाठी फार आवश्यक आहेत. याशिवाय स्वेच्छासेवाभावी

संघटना व व्यापारी संघटना यांचा सहभाग शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याचे दृष्टीने राज्यशिक्षण सल्लागार मंडळाशी असणे आवश्यक आहे.

१३. राज्यस्तरीय महाविद्यालयीन शिक्षण व विद्यापीठीय शिक्षण यांच्यातील परस्पर संबंध अपुरे आहेत. बहुसंख्य विद्यापीठे असलेली राज्ये राज्य सल्लागार मंडळ स्थापन करतील. ही मंडळे उच्चस्तरीय शिक्षणाचा आढावा घेतील. आर्थिक तरतुदीचा विचार करून त्याचे नियोजन करतील. या मंडळात उपकुलपती व्यतिरिक्त केंद्र विद्यापीठातील उपकुलपती असतील तर आवश्यकतेनुसार निपुण शिक्षणतज्ज्ञ, केंद्र स्तरावरील शास्त्रज्ञ प्रतिनिधी आणि शैक्षणिक संस्थांचे तज्ज्ञ यासारखे सदस्य राहतील.

१४. राज्यस्तरावर सुद्धा प्रशासकीय व्यवस्था अधिक मजबूत करावी लागेल. ही व्यवस्था पुनर्रचित करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्याचे दृष्टीने तसेच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, अनौपचारिक शिक्षण, निरक्षरता दूर करणे या सर्व बाबींचा विचार करावा लागेल. तसेच शिक्षणाची राष्ट्रीय पद्धती ठरवावी लागेल. महत्त्वाच्या शैक्षणिक कार्यक्रमांचे मूल्यमापन करावे लागेल.

**भारत शिक्षण सेवा**

१५. "भारत शिक्षण सेवा" स्थापन करणे हे राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थापनेच्या दृष्टीने उचललेले महत्त्वाचे पाऊल ठरेल या सेवेसाठी आवश्यक ती मूलभूत तत्त्वे, भरतीचे नियम व पद्धती यावर सखोल विचारविनिमय राज्य सरकारने करणे आवश्यक आहे, जेणेकरून या सेवेत हुशार व स्वतःची जबाबदारी ओळखून काम करणाऱ्या व्यक्ती आकर्षित होतील व त्यांच्या जबाबदारीनुरूप योग्य तो सन्मान त्यांना दिला जाईल. स्तर बदलताना करावयाची पर्यायी व्यवस्था, निवड पद्धती आणि शिक्षण क्षेत्रात काम करीत असलेल्या व्यक्ती, केंद्र व राज्य स्तरावरील अधिकाऱ्यांची देवाण घेवाण राज्याराज्यातील अधिकाऱ्यांचे स्थलांतर या सर्व बाबींचा राज्यसरकारशी सखोल विचार विनिमय करूनच नियम ठरवावे लागतील.

१६. शैक्षणिक नियोजन करणारे, व्यवस्थापक आणि संस्थाप्रमुख यांचे प्रशिक्षण

शैक्षणिक धोरण व व्यवस्थापन याला स्वतंत्र अशी प्रतिमा असून त्याकडे स्वतंत्र लक्ष देणे आवश्यक आहे. या क्षेत्रात संशोधनासाठी आणि विकासासाठी विशेष योजना सुरू करण्यात येतील.

१७. प्रशासन अधिकाऱ्यांच्या आणि संस्था प्रमुखांच्या केंद्र व राज्य स्तरावरील विशेष प्रशिक्षण संस्थांच्या व्यतिरिक्त इतरही व्यवस्थापन संस्थासारख्या अन्य संस्थांनाही प्रोत्साहित करून त्यांना प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्याविषयी सुविधा उपलब्ध करून देता येतील. अशा संस्था व्यवस्थापनातील प्रगति तसेच नवीन शैक्षणिक धोरणांचे विचार यावर भर देतील. हे करण्यासाठी प्रत्यक्ष जीवनातील परिस्थितीचा विचार करून त्याबरोबरच शैक्षणिक संस्थांच्या विकासाचाही विचार करतील.

१८. उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करून, सामाजिक विकासात शिक्षणाचे स्थान, शालेय नियोजन व विकास, अभ्यासक्रम नियोजन, मूल्यमापन, पुनरावलोकन तंत्रे यांचा आढावा घेणे याचाही समावेश करावा लागेल.

१९. संस्थांच्या प्रमुखांसाठी, आर्थिक व्यवस्थापनाचे नियम व पद्धती कायद्यातील तरतुदी, व्यक्तिगत व्यवस्थापन, कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणे, आढावा घेणे अशा शिक्षणाची आवश्यकता विचारात घेतली जाईल.

२०. शिक्षण सुरू करण्याआधी निरनिराळ्या स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी उदा. नियोजन अधिकारी, प्रशासन अधिकारी आणि संस्थाप्रमुख ह्यांच्या शिक्षणाची उद्दिष्टे निश्चित करणे आवश्यक समजले जाईल. तसेच त्याला लागणारे आवश्यक कौशल्य व संस्थानिहाय विकास यांचा विचारही करणे आवश्यक आहे.

२१. ज्यांची संस्थाप्रमुख म्हणून निवड होईल त्यांना सेवापूर्व प्रशिक्षण आवश्यक ठरविले जाईल. तसेच त्यांना नोकरीत निरनिराळ्या स्तरावर कायम करण्याकरिता परिविक्षाधीन कालावधी असावा व तो

समाधानकारकरीत्या पूर्ण करण्याची अट असावी. हा भाग सेवा भरतीच्या नियमात आवश्यक असावा.

२२. जिल्हास्तरावर प्रशिक्षण योजना राबविणारी व्यवस्था जिल्हा शिक्षण मंडळे स्थापन करून त्यांचेवर सर्व शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यांची जबाबदारी सोपविण्यात यावी. यात उच्च माध्यमिक शाळा, अनौपचारिक शिक्षण, प्रौढ शिक्षण व उच्च शिक्षण त्याचबरोबर, प्राथमिक, पूर्व माध्यमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या क्षेत्राचा विकास आणि संस्थानिहाय नियोजन, व्यवस्थापन व आर्थिक नियंत्रण व व्यक्तिगत व्यवस्थापन यांचीही जबाबदारी सोपविण्यात यावी.

२३. जिल्हा मंडळांना, संपूर्ण जिल्ह्यासाठी सर्व शैक्षिणक संस्थांचे बाबत त्यांची विकास कार्यपद्धती व शैक्षणिक उपक्रमांचा आराखडा आखण्याचे दृष्टीने एक योजना तयार करणे आवश्यक आहे. या आराखड्यात संस्थांचे वाटप, वस्तीची निश्चिती करणे व इतर बाबी यांचाही विचार करण्यात येईल. विविध वयोगटातील मुले व मुली यांचा सर्व शैक्षणिक स्तरावर सहभाग राहील व ते शाळेत टिकून राहतील या संबंधी जिल्हा शिक्षण मंडळे योजना करतील. या योजना केवळ आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विषमता दूर करून सर्वांना समान पातळीवर आणणाऱ्या नसतील तर त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जाही कायम राखणाऱ्या असतील.

२४. राज्य स्तरावर विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत घ्यावयाच्या निर्णयाच्यावेळी जिल्हा स्तरावर ज्या योजना आखण्यात आल्या आहेत व ज्या सूचना करण्यात आल्या आहेत त्यांना विशेष महत्त्व देण्यात यावे.

२५. अपेक्षित असलेल्या आदर्श योजना व कार्य परिणामकारकरीत्या यशस्वी होण्याचे दृष्टीने, जिल्हा शिक्षण मंडळांना निश्चित स्वरूपाचे कायदेशीर अधिकार दिल्याशिवाय ही मंडळे त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी परिणामकारकरीत्या पार पाडू शकणार नाहीत.

२६. अशी जी राज्ये आहेत की ज्या ठिकाणी शिक्षणाचे प्रशासन आणि व्यवस्थापन यांची जबाबदारी पंचायात राज्य मंडळावर सोपविण्यात आली आहे, त्या ठिकाणी जिल्हा शिक्षण मंडळही अस्तित्वात असलेल्या पंचायत राज्य समितीच्या विचार विनिमयाने काम करेल. अशी जी राज्ये आहेत की ज्या ठिकाणी पंचायत राज्य संस्था अस्तित्वात नाहीत त्या ठिकाणी जिल्हा शिक्षण मंडळ हे शिक्षण तज्ञ स्त्रिया, युवक-बालक प्रतिनिधी, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्यांक आणि जिल्ह्यातील उत्सुक असलेल्या प्रतिनिधींचे सहकार्य घेईल.

२७. जिल्हा शिक्षण मंडळाकडे सोपविण्यात आलेले शिक्षणविषयक सर्व कार्यक्रम पार पाडण्याचे दृष्टीने राज्याने त्यांना निधी देणे आवश्यक आहे. घटनात्मक कायदेशीर अधिकार जिल्हा शिक्षण मंडळाना देतांना ते स्वत.चे उत्पन्नाचे मार्ग वाढवू शकतील अशी कायद्यात तरतूद असावी. राज्य शासनाने जिल्हा शिक्षण मंडळांना ठराविक निधी व्यतिरिक्त अशी कांही आर्थिक तरतूद त्यांच्या ताब्यात द्यावी की, ज्याचा उपयोग ते आवश्यक त्यावेळी स्वतःचा तेवढाच निधी उभारून खर्च करू शकतील.

२८. राज्यशासन व जिल्हा शिक्षण मंडळ यांचेतील प्राथमिक, पूर्व माध्यमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या स्तरांवरील प्रशासन व आर्थिक नियंत्रण या संदर्भात कसे संबंध असावे याविषयी राज्य-सरकारने निश्चित मार्गदर्शक तत्त्वे आखून घ्यावीत. विविध स्तरावरील शिक्षकांच्या भरतीची नियमावलीही तयार करणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षकांचे जिल्हा स्तरावरील निरनिराळे स्तर ठरविण्यासाठीही राज्य शासन योजना आखेल.

२९. प्राथमिक, पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिक्षणावर देखरेख करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यासाठी एक प्रमुख शिक्षणाधिकारी असावा. त्याचे हाताखाली एक जिल्हा शिक्षणाधिकारी असावा. त्याच्याकडे आस्थापना, आर्थिक नियोजन व नियोजन करण्याची जबाबदारी असावी. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात कांही विशिष्ट शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याकरिता समकक्ष वेगळे अधिकारी असावेत.

३०. जिल्हा स्तरावर चाललेल्या विविध शैक्षणिक कार्यक्रमांवर जिल्हा शिक्षण मंडळ हे देखरेख व नियंत्रण ठेवील. हे मंडळ शिक्षणाचा विकास कसा होतो आहे यावरही देखरेखी करील.

३१. निरनिराळया जिल्हयातील चाललेल्या शैक्षणिक कार्यक्रमाची रूपरेषा, राज्य स्तरावर ठरविली जाईल व जिल्हय/जिल्हयांची कार्यक्रमाविषयीची तुलना करण्याकरिता काही मार्गदर्शक तत्त्वे आखली जातील. एखाद्या जिल्हयातील उपलब्ध असलेल्या सुविधा, उद्दिष्ट साध्य करण्याचे दृष्टीने दुसऱ्या जिल्हयातही आणता येतील.

३२. निरनिराळया स्तरावर चाललेला शैक्षणिक संस्थातील शिक्षणाचा दर्जा कायम राखण्याकरिता जिल्हा स्तरावर जिल्हा शाळा निरीक्षकांची नेमणूक करण्यात येईल. ते केवळ शिक्षणाच्या तात्त्विक बाजूकडेच लक्ष देतील, जिल्हा शाळा निरीक्षक, ज्याला आपल्यावर सोपविण्यात येणाऱ्या शाळेच्या तात्त्विक बाजू संबंधीची पूर्ण जाणीव आहे, ते शाळेच्या तात्त्विक बाजूसाठीच जबाबदार धरले जातील. ते शैक्षणिक निरीक्षक शिक्षण संस्थांच्या शैक्षणिक दर्जाकडे लक्ष देतील, बौद्धिक नेतृत्व पुरवतील व शिक्षणसंस्थांचे प्रमुख आणि शिक्षक यांच्या शैक्षणिक कार्यात ते अधिक चांगले होण्याच्या दृष्टीने साहाय्य करतील, आणि शिक्षक व संस्थाप्रमुख यांची तात्त्विक बाजू उंचविण्यासाठी मदत करतील. राज्य शिक्षण प्रशिक्षण मंडळ जिल्हा मंडळाच्या अधिपत्याखाली जिल्हा स्तरवरील सर्व शैक्षणिक कार्यक्रमातील पर्यायी अभ्यासक्रम व याबाबत विचार करतील आणि प्रौढ शिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षक अध्यापनशास्त्र व सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता जबाबदार समजले जातील.

**स्थानिक स्तरावर उपक्रम राबविण्याच्या योजना**

३४. संस्था प्रमुखांचे कर्तव्य व त्यांची जबाबदारी जाणूनच त्यांची निवड करणे आवश्यक आहे. संस्थाप्रमुख हे ठराविक काळ त्या संस्थेवर राहतील ह्याचा विचार करावा व त्यांच्या फार बदल्या करू नयेत हा दृष्टिकोन स्वीकारल्यास ते संस्थाप्रमुख संस्थेकडे विशेष

लक्ष देऊन ,नेतृत्व करू शकतील व तिचा विकास कसा चांगला होऊ शकेल याकडे लक्ष देतील.

३५. प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शाळा. प्रमुख हा ग्रामीण शैक्षणिक समितीला जबाबदार राहील व संस्था चालविण्याचे दृष्टीने या समितीचा तोही एक सभासद राहील.

३६. ग्रामीण शिक्षण समितीमध्ये १५ पेक्षा जास्त सभासद राहणार नाहीत व या समितीत पालक, पंचायत प्रतिनिधी, सहकारी सस्थातील प्रतिनिधी, स्त्रिया, हरिजन व आदिवासी तसेच अल्प संख्यांकांचे प्रतिनिधी राहतील. हे सर्व प्रतिनिधी ग्रामीण शैक्षणिक कार्यक्रमाच्या व्यवस्थापनेकडे लक्ष देतील.

३७ राज्य शासन या समितीचे गठन करण्याविषयीची मार्गदर्शक तत्त्वे ठरवील, तसेच संस्था प्रमुख व समिती यांचे परस्पर संबंध कशाप्रकारचे असावेत याविषयी मार्गदर्शन करून व निश्चित असे धोरण आखून देईल, त्याचप्रमाणे बालशिक्षण प्राथमिक शिक्षण, समग्र बाल विकास, अनौपचारिक शिक्षण आणि प्रौढ व निरंतर शिक्षण या संबंधातही शैक्षणिक कार्यक्रम आखतील.

**शाळा समूह योजनांचा विकास**

३८. शाळा समूह योजनांचे जाळे पसरविण्यात आल्यावर त्यातील संस्थांचे परस्परसंबंध विचारात घेऊन, शिक्षकांचे अनुभव व सुविधा यांचे आदानप्रदान करता येईल. शाळा समूह हा योजनेतील सर्वात लहान घटक राहील. त्यात ८ ते १० शाळांचा समावेश राहील. या शाळांतील शिक्षकांचे अनुभव, सुविधा, शैक्षणिक साधन सामुग्री, वैयक्तिक विचार यांचे आदानप्रदान करून विकास साधता येईल. या सर्वांचा उपयोग हे भागशः तत्त्वावर आवश्यकतेनुसार करतील.

३९. अशी अपेक्षा आहे की, योग्य वेळ येताच शाळा समूह योजना जेव्हा पूर्णपणे विकसित होईल तेव्हा निरीक्षण करण्याचे काम त्यांचेवर सोपवता येईल. शाळा समूहातील शाळा निरीक्षणाचे वेळी सहभागी शाळांमधील परस्पर संबंध सदृढ करण्याचे दृष्टीने विचार होवून त्यांची

गरज परस्पर विचाराने भागवता येईल. शैक्षणिक नकाशे, शाळांचे स्तर ठरविणे त्यातील लहान व मोठ्या शाळा यांचे वर्गीकरण करणे व शाळांचे निरीक्षण करतांना त्यांच्यातील दोष न दाखविता सध्याच्या स्थितीत कोणती सुधारणा करता येईल याकडे लक्ष दिले जाईल. ही निरीक्षणे सध्याच्या नियमित जिल्हा-गट शिक्षण मंडळाच्या निरीक्षणा व्यतिरिक्त राहतील.

४०. राज्य शासन गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने निरीक्षण व्हावे यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे, जी शाळासमूहाने अंगीकारावयाची आहेत ती तयार करतील. त्याच प्रमाणे शाळासमूह योजनांतर्गत संस्थांचे निरीक्षण करण्याचे दृष्टीने संख्यात्मक तत्त्वे निश्चित करतील.

४१. या शाळासमूहातील बऱ्याच शाळा या अशासकीय असतील असे गृहीत धरून राज्य शासनाने या शाळा समूहाच्या निरनिराळ्या खर्चासाठी उदा. प्रशिक्षण निरीक्षणासाठी लागणारे भत्ते, प्रवास भत्ता इत्यादीसाठी निधी उपलब्ध करून देणे जरूर आहे.

४२. वरील सर्व प्रस्ताव ताबडतोब अंमलात आणण्याकरिता राज्य शासनाने काही मार्गदर्शक तत्त्वे शाळा समूह योजनेचा विकास करण्याकरिता त्वरित घालून देणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळासमूह योजना १९८७ पासून लवकरात लवकर कार्यान्वित करता येईल.

**जनतेचा सहभाग व सेवाभावी संस्था**

४३. कार्यक्रम राबविण्यातील यशस्विता उदा. प्राथमिक शिक्षण-ज्यात अनौपचारिक बालशिक्षण, प्रौढ शिक्षण, अपंगांचे शिक्षण वगैरेचा समावेश आहे. या शिक्षणाकरिता लोकांचा सहभाग शैक्षणिक कार्यक्रमात अगदी खालच्या स्तरावर व मोठ्या प्रमाणावर सेवाभावी संस्था समाज-कार्यकर्ते यांचा . सहभाग यावर अवलंबून आहे. शासन व या सर्व सामाजिक संस्था यांच्यातील परस्पर संबंधातील निकड लक्षात घेऊन या सर्वांचा अधिकाधिक सहभाग प्राप्त करण्याचे दृष्टीने पुढची पाउले उचलेल व वारंवार या उभयतात विचार विनिमय होईल आणि वेळो-वेळी घ्यावयाच्या निर्णयात त्यांना प्रतिनिधित्व देऊन त्यांच्या विचारांचा,

सूचनांचा आदर केला जाईल. हा कार्यक्रम राबविण्याचे बाबतीत त्यांना निश्चितच काही सवलती दिल्या जातील. सेवाभावी संस्थांची निवड करताना त्यांना आर्थिक मदत दिली जाईल. जेणेकरून या सेवाभावी संस्था आपली आशावादी भूमिका चांगल्या तऱ्हेने पार पाडू शकतील.

**गरजांची टप्प्याटप्प्यानें विभागणी व आगाऊ तयारी करण्याची क्रिया व साधनांची आवश्यकता**

४४. शिक्षणाच्या व्यवस्थापनाच्या कार्याची दिशा ही राज्यपातळीवर स्थानिक पातळीवर ठरविणे आवश्यक आहे. त्या खेडे, गट, जिल्हा वगैरे राज्यशासनाने या संबधात निश्चित व विस्तृत योजना तयार करून बहुस्तरीय योजनेच्या विकासाबाबत स्वायत्त व विकेंद्रीकरण या दृष्टीनें आवश्यक ती मार्गदर्शक तत्वे सांगितली पाहिजेत.

४५. शहरी विभागातील शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनात स्थायी संस्थांना सहभागी करून घेणे व शाळासमूह योजना १९८६–८७ पासून सुरू करणे आवश्यक आहे.

४६. हा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून राज्यशासनाने माध्यमिक शिक्षण मंडळाला आवश्यक ते अधिकार प्रदान केले पाहिजेत. तसेच बहुस्तरीय नियोजन, शाळासमूह योजनेचा विकास यासाठी वर्षाला लागणाऱ्या निधीची तरतूद करून ठेवावी.

□□□

NIEPA DC
D09052

LIBRARY & DOCUMENTATION
National Institute of Educational
Planning and Administration.
17-B, Sri Aurobindo Marg,
New Delhi-110016
DOC, No .......... D-9052
Date .......... 22-02-96